
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल वा.
दा. क. ८२५



—निठल

# कादंबरीमय पेशवाई

१

पेशवाईतील

# पश्चिमदिग्विजय

लेखक

**विठ्ठल वामन हडप**

२६५७०
१९२९
२

कागदी बांधणी [illegible] ]  किंमत  [ कापडी बांधणी २ रु.

प्रकाशक
बळवंत विष्णु परचुरे
परचुरे, पुराणिक आणि मंडळी,
बुकसेलर्स व पब्लिशर्स, माधवबाग, मुंबई नं. ४.

[ 'कादंबरीमय पेशवाई'चे पुनर्मुद्रण, भाषांतर, रूपांतर वगैरेसंबंधीं सर्व प्रकारचे हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत.]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणे

८९७

# प्रास्ताविक

'पेशवाईतील पश्चिमदिग्विजय' ही 'कादंबरीमय पेशवाई'मधील नववी कादंबरी होय. श्रीमंत बाजीराव पेशवे, त्यांचे बंधु चिमाजीअप्पा वगैरे मराठशाहींतील कर्त्या पुरुषांनीं कोंकणपट्टींत हिंदु रयतेचा अनन्वित छळ करणाऱ्या जंजिरेकर सिद्दीवर मोहीम करून जो पश्चिमदिग्विजय केला व ज्याला अखेर सर्व सिद्दींतील अग्रगण्य कळीचा कांटा सिद्दीचा अंजनवेलचा सुभेदार सिद्दी सात याच्या संहारानें स्थिरता प्राप्त झाली, त्या मोहिमेला अनुसरून जरी प्रस्तुतची कादंबरी विरचिली गेली आहे, तरी मुख्यतः आंग्र्यांच्या घराण्यांतील भाऊबंदकी हा त्या कथानकरूपी वर्तुळाचा परिघ मानून त्या अनुरोधानें त्या परिघाच्या आंत प्रस्तुत कथानकाची उभारणी करण्यांत आली आहे.

हा कल्पिलेला परिघ एवढा व्यापक आहे कीं, पूर्वोक्त मोहिमेविषयींच्या सर्व ज्ञात व अज्ञात अशा महत्त्वाच्या घडामोडी त्या परिघांत बव्हंशीं साकल्येंकरून येऊं शकतात. कोंकणपट्टींत प्रथम सिद्दीची काय किंवा इंग्रज–फिरंगी वगैरे इतर परक्यांची काय, मराठमंडळाशीं म्हणून जी कटकट सुरू झाली, ती प्रथम आंग्र्यांशींच सुरू झाली. शिवाजीमहाराजांच्या अमदानींत कोंकणपट्टींत मराठमंडळाचा म्हणून जो दरारा गाजत होता, तो बव्हंशीं आंग्र्यांचाच दरारा होता. सिद्दीच्या हस्तें संपूर्ण कोंकणपट्टी मुसलमानमय करून टाकण्याचा अवरंगजेब बादशहाचा कावा फसला, तो सिद्दीला आंग्र्यांचा शह असल्यामुळेंच. शिवाजीमहाराजांच्या पश्चात् घसरगुंडीला लागलेल्या मराठशाहीचें पाऊल पुन्हा शाहूमहाराजांच्या कारकीर्दींत पेशव्यांच्या अभ्युदयामुळें स्थिर झालें, तेव्हांपासून छत्रपतींची सत्ता नाममात्र मानून पेशव्यांना मुळींच न मानणारा असा खंदा वीर उभ्या मराठमंडळांत पेशव्यांना आंग्रे हा एकटाच होता. इंग्रज व फिरंगी यांनीं कोंकणपट्टींत ठायीं ठायीं हातपाय ऐसपैस पसरण्याला सुरुवात करतांच त्यांची पथारी उचलून दूर फेंकून देणारा शेराला सव्वाशेर त्यांना प्रथम आंग्रे हा एकटाच भेटला. यावरून एकच एक गोष्ट निर्विवादपणें मनाला पटते ती ही कीं, आंग्रे शिवाजीमहाराजांच्या पश्चात् सर्वांनाच डोईजड होऊन बसले होते; व म्हणून ते सर्वांच्याच डोळ्यांत सलत होते. त्यांतल्या त्यांत ते कोणाच्या डोळ्यांत सलत नसतील अगर अत्यंत कमी ... च्या शाहू-

IRBK-0100897

IRBK-0100897

महाराजांच्या. कारण त्यांची सत्ता नाममात्र कां होईना; पण आंग्रे मानीत; व मराठशाहीच्या उबघाईच्या काळांत आंग्र्यांनीं नाममात्र कां होईना पण छत्रपतींची सत्ता कोंकणपट्टींत अबाधित राखली होती; निदान मराठशाहीच्या शत्रूंचें प्राबल्य तरी कोंकणपट्टींत माजूं दिलें नव्हतें.

मराठ्यांची जंजिऱ्यावरील मोहीम सुरू व्हावयाला व सिद्दी आणि आंग्रे ह्या सत्ताधारी वंशाचे प्रमुख कर्ते पुरुष अनुक्रमें सिद्दी रसूल आणि कान्होजी आंग्रे मृत्युवश व्हावयाला जवळजवळ एक गांठ पडली. कान्होजी आंग्र्याची उणीव सखोजीनें कांहीं काळ उत्तम प्रकारें भरून काढली; पण दुर्दैवानें सखोजी अकालीं कालवश झाला व आंग्र्यांच्या घराण्यांतील भाऊबंदकीला तीव्रता प्राप्त झाली. सखोजीच्या निधनानंतर त्याचा धाकटा भाऊ संभाजी आंग्रे याला सरखेलीचें पद मिळालें. पण मानाजी आंग्रे हा कान्होजी आंग्र्याचा दासीपुत्र त्या पदासाठीं भांडूं लागला. बाजीराव पेशव्यांनीं सिद्दीशीं तह करून माघारें साताऱ्याला जातांना चेऊल–रेवदंडा येथें आंग्र्यांची स्थापना केली, (ता. ४।१।१७३४) असें इतिहास सांगतो. पण बाजिरावांची ही तिऱ्हाइती वरकांतीच होती, असें पुढील परिणामां-वरून म्हणावें लागतें. कारण त्यानंतरही आंग्र्यांची भाऊबंदकी सुरूच होती व बाजीराव साताऱ्याला गेल्यावर सहा-सात महिन्यांच्या आंत त्या भाऊबंदकीचें उग्र स्वरूप उजेडांत आलें. पेशव्यांच्या फुशीमुळें मानाजीनें शिरजोर होऊन संभाजीचा उठाव केला; व पेशव्यांनीं मानाजीचाच पक्ष घेऊन आंग्र्यांच्या दौलतीचीं दोन शकलें केलीं. तो प्रकार विषयप्रवेशांत वर्णिलेला असल्यानें येथें त्याची पूर्वोक्ति करणें नलगे. पण त्या बाबतींत येथें प्रामुख्यानें विस्मयपूर्वक एक गोष्ट नमूद करणें प्राप्त आहे; ती ही कीं, ह्या प्रकरणीं बाजीराव पेशवे यांचें वर्तन आंग्र्यांच्या घराण्यांत भाऊबंदकी माजविण्याला व अखेर त्या इतिहास-भूषण पराक्रमी घराण्याचा नाश होण्याला कारण झालें! संभाजी हा कान्होजी आंग्र्यांचा औरस पुत्र व मानाजी हा दासीपुत्र होता. शिवाय मानाजीशीं तुलना करतां संभाजी मानाजीपेक्षां शूर, स्वाभिमानी व करारी होता. मराठमंडळाचे तेव्हांचे प्रमुख कार्यकर्ते पेशवे यांनीं त्याला पाठीशीं घालण्याचें नाकारलें, तरीही त्यानें शक्य तोंवर मराठमंडळाशीं इमानदारी सोडली नाहीं, असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. आतां, तो लहरी व हेकेखोर होता असें राजवाडे प्रभृति इतिहासकार म्हणतात; व तें खरेंही असेल. पण संकटांवर संकटें मस्तकावर कोसळत असतां

कोणताही शूर व स्वाभिमानी मनुष्य तशा प्रकारच्या तात्कालिक दोषांना सामान्यतः बळी पडतोच. त्या त्याच्या दुर्गुणांमुळें बाजीराव पेशव्यांसारख्या जबाबदार कार्यकर्त्या पुरुषानें त्याच्याविरुद्ध मानाजीचा—जो आंग्र्यांचा दासीपुत्र; संभाजी-इतका पराक्रमीही नाहीं, व शिवाय स्वार्थसाधनासाठीं इंग्रज, फिरंगी अशा शत्रूंना सामील होऊन त्यांच्या साह्यानें संभाजीला रसातळाला नेण्यासाठीं झटण्यांत न शरमणारा; त्या मानाजीचा एकांगी पक्ष स्वीकारावयाचा नव्हता असें म्हणणें प्राप्त आहे.

आंग्र्यांच्या घराण्यांतील ह्या दुहीच्या बाबतींत प्रसिद्ध इतिहासकार 'मराठी रियासत'कर्ते श्री० सरदेसाई यांचें मतही असेंच आहे. ते म्हणतात, "बाजिरावांनीं केलेल्या ह्या व्यवस्थेनें संभाजी व मानाजी यांचें ऐक्य न होतां उलट कायमचें वांकडें आलें. पेशव्यांनीं एकाचाच पक्ष उचलिला, न्याय केला नाहीं, याचा संभाजीला राग आला. त्यानें बाजिरावांचीं नानाप्रकारें आर्जवें केलीं, शपथा घेतल्या, 'आपण चुकलों तर अन्याय पोटांत घालून आम्हांस मार्गास लावा' असें वारंवार विनविलें; पण फुकट! ता. ११।६।१७३६ चें संभाजीचें बाजिरावांना गेलेलें पत्र वाचण्यालायक आहे. त्यावरून बाजिरावांनीं आंग्र्यांचे घरांत दुही माजविली अशी भावना होते. अशा प्रकारें आंग्र्यांचें प्रकरण उत्तरोत्तर विकोपाला गेलें... बावडेकर अमात्याला आपणाकडे वळविण्यासाठीं संभाजीनें एक पत्र ता. २९।८।१७३६ चें लिहिलें, त्यावरून संभाजीचा भाव व पेशव्यांचें कपट व्यक्त होतें. आंग्रे हा बलाढ्य सरदार मुख्य सरकाराशीं फटकून वागत असल्यामुळें त्याला निर्बल करण्याचे प्रयत्न बाळाजी विश्वनाथांपासून (पहिल्या भट पेशव्यापासून) चाललेले दिसतात. आंग्र्यांच्या घराण्याचे दोन भाग केल्यामुळें त्यांची शक्ति अर्थातच कमी झाली. संभाजी बाणेदार असल्यामुळें त्याला आपली सत्ता आणि मुलूख कमी झालेला खपला नाहीं. पेशव्यांनीं मानाजीला हाताशीं धरून संभाजीला दुर्बल केलें. पेशव्यांच्या विचारानें मानाजी इंग्रजांशीं सख्य ठेवून घरगुती तंट्यांत त्यांची मदत आणूं लागला; अर्थात् तितक्या मानानें मराठशाहीचा समुद्राकडील पाया लंगडा पडला. तेणेंकरून आंग्रे व पेशवे ह्या दोघांचेंही अकल्याण होऊन मुंबईच्या तिन्हाईत इंग्रजांचा फायदा झाला, ही गोष्ट पेशव्यांच्या कर्तृत्वाला व राजकारण-चातुर्याला कमीपणा आणते. मानाजीच्या मानानें संभाजी जास्त शूर व कर्तृत्ववान होता, आणि तोच कान्होजीचा औरस वारस असल्यानें त्याला दूर सारण्यांत पेशव्यांनीं दूरदृष्टि ठेविली नाहीं असेंच म्हणावें लागतें. मानाजीविषयीं तरी

पेशव्यांचा अनुकूल ग्रह नव्हताच. नानासाहेब पेशव्यानें पुढें पुन्हा हा उद्योग ध्यानीं घेऊन इंग्रजांच्या मदतीनें आंग्र्यांना सर्वस्वीं बुडविलें, त्याचा संदर्भ ह्या वेळेपासून ध्यानीं ठेवला पाहिजे." —( म. रि., म. वि. १ )

रियासतकारांचें जें मत वर दिलें आहे, तसेंच कै० पारसनीस यांचेंही मत त्यांच्या ब्रह्मेंद्रस्वामींच्या चरित्रांत स्पष्टपणें नमूद करण्यांत आलें आहे. ग्रँट डफ, डान्व्हर्स, लो, किंकेड वगैरे इतिहासकारांचे इतिहास व सध्यां उपलब्ध असलेले एतद्विषयक ऐतिहासिक कागदपत्रही ह्या प्रकरणीं अशीच साक्ष देतात. श्री० न. चिं. केळकर हे देखील, बाजिरावांच्या कारकीर्दींत आंग्र्यांच्या नाशाचा हा जो उपक्रम झाला व नानासाहेब पेशव्यानें संभाजीनंतर सरखेलपदावर आरूढ झालेल्या तुळाजी सरखेलाचा सर्वनाश करून आपल्या पित्यानें आरंभिलेल्या कार्याचा जो समारोप केला, त्याविषयीं म्हणतात, " आंग्र्यांच्या पराभवापर्यंत इंग्रजांचा मुंबईच्या दक्षिणेखालीं प्रवेश नव्हता; आंग्र्यांची दहशत गेल्यानें इंग्रजांना यापुढें कोंकणपट्टीभर अनिरुद्ध संचार करितां येऊं लागला. यांत पेशव्यानें कोणता दूरदर्शीपणा, कोणता स्वाभिमान व कोणती कर्तव्यनिष्ठा दाखविली ?... आंग्रे हे शिवाजीच्या वेळेपासून मराठी आरमाराचे अधिपति होते, व त्यांनीं जवळ जवळ शंभर वर्षे मराठी आरमाराचा लौकिक राखला होता. ताराबाईचा पक्षपाती म्हणून तो आंग्रे कांट्यासारखा पेशव्यांच्या मनांत कदाचित् सलत असेल; पण पेशव्यांना तो इंग्रजांपेक्षां खचित अधिक जवळ होता." —(मराठे व इंग्रज). कै० इतिहासाचार्य राजवाडे यांच्या ठायीं पेशवाईविषयीं किती सरोस आपलेपणा उत्कटतेनें वसत होता हें त्यांनीं आपल्या साधनखंडांना वेळोवेळीं लिहिलेल्या प्रस्तावनांवरून उघड दिसून येतें. पण त्यांनाही पेशव्यांची एतद्विषयक चूक 'चूक' नव्हेशी ठरविणें शक्य झालें नाहीं. त्यांनींही ही चूक आडवळणांच्या भाषेंत कबूल केली आहे. मात्र त्यांचा इतिहासकथनविषयक बाणा पुष्कळदां निःपक्षपाती न्यायाधिशाचा नसून वकिली थाटाचा असल्यानें त्यांनीं एकवार मनानें 'आपले' म्हटलेल्या पेशव्यांचें स्वयंप्रेरणेनें वकीलपत्र घेऊन आपल्या त्या अशिलांच्या पूर्वोक्त चुकीवर पांघरूण घालून त्यांना धुतल्या तांदळासारखे निर्दोषी ठरविण्यासाठीं 'चोराला सोडून संन्याशाला सुळीं' या न्यायानुसार पेशव्यांविरुद्ध आंग्र्यांच्या मनांत व आंग्र्यांविरुद्ध पेशव्यांच्या मनांत मानभावीपणानें मत्सरभावाचें विष ओतल्याचा डावपेंची मिथ्यारोप ब्रह्मेंद्रस्वामींवर

केला आहे; व त्यामुळें बाजीराव पेशवे आंग्र्यांवर चिडून त्यांचा निःपात करण्याला प्रवृत्त झाले, असें ठरविण्याचा कसोशीचा प्रयत्न आपल्या तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावांत पार पाडला आहे! इतिहाससंशोधनाच्या चिकित्सक दृष्टीनें ब्रह्मेंद्रस्वामीं-विषयींच्या कै० राजवाडे यांच्या पूर्वोक्त व अन्योक्त दुराग्रहमूलक मतांचें खंडन करण्याचें हें स्थळ सुतराम् नाहीं. तरी पण येथें एवढें मात्र स्पष्ट शब्दांत नमूद करून ठेवणें प्राप्त आहे कीं; बाजीराव पेशवे यांनीं आपल्या मताप्रमाणें मराठ-शाहीच्या आत्यंतिक हितासाठीं असो, आंग्र्यांविषयीं संशयग्रस्त होऊन आपला मार्ग निष्कंटक करण्यासाठीं असो, नजरचुकीनें असो अथवा अन्य कोणत्याही कारणानें असो; मानाजीला पाठीशीं घालून व त्याला इंग्रजांचें साह्य घेऊं देऊन आंग्र्यां-च्या सत्तेला जायबंदी केलें; त्यामुळें ते संभाजीसारख्या पराक्रमी पुरुषाच्या साह्याला मुकले, सिद्दी बळावला, व इंग्रजांना उभ्या कोंकणपट्टींत ऐसपैस हात-पाय पसरण्याला अवसर मिळून हिंदुपदपादशाहीच्या महत्तम कार्याला कमजोर-पणा आला! बाकी, इतकें सारें झालें तरी—अशीं कितीही वैगुण्यें आंग्र्यांच्या बाबतींतील पेशव्यांच्या धोरणाला असलीं तरी पश्चिमदिग्विजयाचें यश जें प्रस्तुत-च्या मोहिमेंत मराठमंडळाच्या पदरीं पडलें तें बाजीराव—चिमाजीअप्पा यांच्या धडाडीमुळेंच पडलें, असें कोणालाही कबूल करणें भाग पडेल. ह्याच विचारसरणीचा अवलंब प्रस्तुत कादंबरींत करण्यांत आला आहे.

प्रस्तुत कादंबरीचें स्वरूप 'पेशवाई'वरील पूर्वींच्या बहुतेक कादंबऱ्यांच्या स्वरूपाहून एका दृष्टीनें कांहींसें भिन्न आहे. आजवर मीं शक्य तों पेशवेच कथा-नायक शोभतील अशींच कथानकें 'पेशवाई'वरील कादंबऱ्यांसाठीं निवडीत आलों; पण प्रस्तुतच्या कथानकांत पेशव्यांना तसें प्रत्यक्ष प्राधान्य मुळींच नाहीं. याचें कारण कथानकाची अथ—इति—काल—मर्यादा व स्थल—मर्यादा विचारांत घेतां त्या काळांत त्या स्थळीं बाजीराव पेशवे वावरत असल्याची इतिहासाचीच साक्ष नाहीं. ते तेव्हां अन्यत्र महत्त्वाच्या कामगिरींत गुंतलेले होते. चिमाजीअप्पांचा संबंधही हे स्थल—काल—निर्बंध ध्यानीं घेतां कथानकांत दर्शविल्याप्रमाणें अगदीं शेवटीं शेवटीं येतो. तरी पण जंजिऱ्याची मोहीम व सिद्दी साताचा नायनाट हा प्रसंगच इतका महत्त्वाचा आहे कीं, केवळ पेशवे कथानायक होऊं शकत नाहींत, या सबबीवर तो तसाच 'कादंबरीमय पेशवाई'च्या क्षेत्राबाहेर टाकणें योग्य झालें नसतें. यापुढील म्हणजे दहाव्या कादंबरींत वर्णिला जावयाचा वसईच्या मोहिमेचा

संस्मरणीय प्रसंगही असाच आहे. पेशव्यांपैकीं फक्त त्यांत चिमाजीअप्पांचीच मर्दुमकी आहे. बाकी, अशा एखाद्या अत्यंतिक महत्त्वाच्या कथानकांत प्रत्यक्षतः पेशवे प्रामुख्यानें वावरतांना आढळले नाहींत, तरी त्या घटनांचे सूत्रचालक व प्रवर्तक तेच असल्यानें कथानकांतील सर्व पात्र त्यांच्याच हुकमतींत व मुत्सद्देगिरीच्या छायेंत वावरतांना स्पष्ट दिसतात, व त्यामुळें पर्यायानें पेशवेच त्या त्या घटनांचे नायक ठरतात, हें उघड आहे.

प्रस्तुत कादंबरींतील स्थल–काल–व्यक्ति–निर्देश करतांना बहुशः ऐतिहासिक सत्याचे निर्बंध यथावत् पाळण्यांत आले आहेत, हें जागोजागीं देण्यांत आलेल्या आधारभूत टिप्पणींवरून वाचकांना कळून येणार आहेच. जेथें असे आधार देण्यांत आलेले नाहींत तेथें तो कल्पनेचा खेळ आहे हें उघड आहे. इतिहास हाच सर्वाधार मानून कथानकांतील प्रत्येक बारीकसारीक गोष्ट देखील इतिहासाला साक्ष ठेवून सांगणें कथालेखनांत कितपत साध्य आहे हा प्रश्न बाजूला ठेवला तरी कांटेतोल इतिहासकथन हें माझें पेशवाईवरील कथालेखनांतील ध्येय नाहीं; सत्येतिहास हा पाया कल्पून त्यावर इतिहासाच्या सत्याभासाचें कथामंदिर उभारणें असा माझा परिपाठ आहे, व त्या कथामंदिरांत तत्कालीन इतिहासाचें यथावत् प्रतिबिंब वाचकांना पहावयाला सांपडावें हें माझें ध्येय आहे. वाचकांनीं— विशेषतः चिकित्सकांनीं माझ्या कादंबऱ्यांची सूक्ष्म चिकित्सा करतांना कृपा करून ही एक गोष्ट अवश्य ध्यानीं घ्यावी.

प्रस्तुत कादंबरींत सिद्दी सातानें केलेला अनन्वित हिंदुधर्मछल व त्याचें झालेलें यथावत् पारिपत्य हा हृदयस्पर्शी वृत्तान्त निवेदन करण्यांत आला आहे; त्याप्रमाणेंच पोर्तुगीज ऊर्फ फिरंगी लोकांनीं केलेला अनन्वित हिंदुधर्मछल व त्यांचें चिमाजी-अप्पांच्या नेतृत्वाखालीं महाराष्ट्रीयांनीं केलेलें पारिपत्य हा हृदयस्पर्शी वृत्तान्त वसईच्या वेढ्याच्या प्रसंगानुरोधानें

## 'पेशवाईतील धर्मसंग्राम'

ह्या 'कादंबरीमय पेशवाई'मधील पुढील दहाव्या कादंबरींत निवेदन करण्यांत यावयाचा आहे. ती कादंबरी यथाकालीं प्रसिद्ध होईल. इति.

व्यंकटपुरा, सातारा.<br>ता. २०।१२।२९

**विठ्ठल वामन हडप**

धा. क्र. ........ ग्रं. लि.
वि. ......... ........ क्र.. ........

# पेशवाईतील पश्चिमदिग्विजय

## विषयप्रवेश

आज चेऊलच्या राजकोटांत* श्रीमंत बाजीराव पेशव्यांच्या हस्तें नव्या तहांतील शर्तींप्रमाणें आंग्र्यांची स्थापना व्हावयाची होती; व सखोजी आंग्र्याच्या निधनापासून संभाजी आंग्रे आणि मानाजी आंग्रे यांच्यांत दौलतीविषयीं जी भाऊबंदकी आज सुमारें दोन वर्षें माजून राहिली होती, तिला मूठमाती मिळावयाची होती. आंग्र्यांची स्थापना व्हावयाची म्हणजे काय व्हावयाचें हें नुक्तेंच नवदरें येथील तहांत ठरल्यासारखेंच होतें. तें आतां फक्त जाहीर व्हावयाचें होतें. कारण नवदरें§ येथें बाजीराव पेशवे व मानाजी आंग्रे यांनीं तहाची योजना ठरविली,तेव्हां संभाजी अथवा त्याच्या पक्षाचा कोणीही माणूस तेथें हजर नव्हता. पण 'ह्या लढण्याचा एकदां कायमचा निकाल लावून घेण्यासाठीं तुम्ही राजकोटावर अमुक तारखेला हजर रहावें. तुम्हांपैकीं कोणाच्याच इभ्रतीला धक्का लागणार नाहीं व दौलतीचा गाडा सुयंत्र चालेल अशीच योजना आम्ही वरील दिवशीं राजकोटावर दरबार भरवून जाहीर

---

* अलिबागेच्या दक्षिणेला सात मैलांच्या अंतरावर रेवदंड्याच्या खाडीच्या कांठीं चेऊल-रेवदंडा हीं एकमेकांना लागलेलीं गांवें आहेत. पूर्वीं ह्या दोन्ही गांवांना मिळून चेऊल हें एकच नांव असून वरचें चेऊल ( सध्यांचें चेऊल ) व खालचें चेऊल ( सध्यांचें रेवदंडा ) असे त्याचे दोन भाग होते. चेऊल हें गांव बागाइती असून पूर्वीं तें हातमागावरील रेशमी कपडे, तांब्याचीं भांडीं व कलाकुसरीचें सुतारकाम यांविषयीं फार प्रसिद्ध होतें. चेऊल येथें राजकोट हा मध्यम प्रतीचा किल्ला आहे. तेथील कोरींवलेणीं व देवालयें पहाण्यासारखीं आहेत. त्यांत चतुःश्रृंगीचें देवालय विशेष प्रसिद्ध आहे ( इंपीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया ). रेवदंडा येथें पूर्वीं पोर्तुगीज लोकांचें ठाणें होतें. तेथें चांदीचीं भांडीं चांगलीं तयार होतात. येथें भुइकोट किल्ला आहे.

§ आंग्रे बंधूंमधील हा तह कुलाब्यानजीक नवदरें येथें बाजीराव पेशव्यांच्या मध्यस्थीनें एप्रिल १७३५ मध्यें झाला. —(शकावलि, पृष्ठ ७२)

करणार आहों. तुम्ही न आल्यास मात्र आम्हांला तुमची विरोधी वर्तणूक ध्यानीं घेऊन कांहीं कठोर उपाययोजना करावी लागेल' असें खासगी पत्र संभाजीला लिहून त्याला दरबाराला हजर राहण्याला भाग पाडलें होतें. संभाजी आजच्या दरबाराला हजर राहणार होता.

बाजीराव पेशवे प्रथमपासूनच मानाजी आंग्र्यांचे पक्षपाती होते, व या वेळीं त्यांनीं मुद्दाम मानाजीच्या शब्दाला मान देण्यासाठीं कोंकणांत येऊन संभाजीच्या ताब्यांतील बरेच गड-कोट वगैरे मानाजीच्या हातून जिंकविल्यामुळें त्यांनीं कसाही न्याय केला तरी तो पक्षपातानें मानाजीच्याच बाजूचा करणार असा सर्वांचा ग्रह झालेला होता. वहुतेक लोक श्रीपतराव प्रतिनिधि, फत्तेसिंग भोंसले, पेशव्यांचे कोंकणांतील कारस्थानी वकील यशवंत महादेव पोतनीस बाजीरावांच्या ह्या धोरणाविरुद्ध होते. फार काय, छत्रपति शाहूमहाराजांचाही मानस संभाजीला लाथाडून मानाजीला पाठीशीं घालावें असा नव्हता. पण 'बळी तो कान पिळी' सर्व सत्ताधारी बाजीराव पेशव्यांनीं मागच्या पुढच्या एकंदर परिस्थितीचा पूर्ण विचार करून अमुक एक गोष्ट करावयाची असें ठरविल्यावर त्यांना कोण विरोध करणार ! असो.

ह्या समारंभासाठीं तेव्हां कोंकणांत गोवळकोटाला वेढा§ देऊन तो कोट काबीज करण्यांत गढून गेलेले श्रीपतराव प्रतिनिधि, फत्तेसिंग भोंसले, यशवंतराव पोतनीस, उदाजी पवार, वांकाजी नाईक, वगैरे सर्व प्रमुख सरदार व तमाम गडकरी यांना त्याप्रमाणेंच मुंबईकर इंग्रजांचा मुत्सद्दी प्रतिनिधि कॅप्टन इंचवर्ड, नौकानयनपटु कॅप्टन ह्राल्डेन, चेऊल येथील ठाण्याची तपासणी करण्यासाठीं गोव्याहून आलेला पोर्तुगीज गव्हर्नर कँडेडि सँडो मिल, यांनाही आमंत्रण देण्यांत आलें होतें. किल्ल्यांतील दरबार महालांत हा दरबार भरावयाचा असल्यानें आज दरबार महाल फारच सुंदर शृंगारला असून सर्व मंडळीला आपापल्या मानाप्रमाणें वसतां यावें अशी व्यवस्था करण्यांत आली होती. ही व्यवस्था करण्याचें काम मानाजी आंग्र्याकडे होतें व त्याच्या वतीनें त्याचा विश्वासू मित्र रामाजी महादेव विवलकर या नांवाच्या गृहस्थानें ती सर्व व्यवस्था आपल्या देखरेखीखालीं करून घेतली

§ नवदरें येथील तहाच्या कालापासून पुढेंही वर्ष दीड वर्ष मराठे गोवळकोटाला वेढा देऊन बसले होते.
—( रोजनिशी.)

२८६५४ अनुक्रम ११

होती. खाशांचा दरबार, त्याचा थाट अपूर्व असावयाचाच. पण त्यांत विशेष उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे बैठकींच्या मांडणीची होय. आजच्या बैठकींत कोणी कुठें बसावें हें मानाजी व रामाजी महादेव यांनीं ठरविलें होतें, व मंडळीला बसविण्याच्या कामगिरीवर तर एकट्या रामाजीपंताची योजना करण्यांत आली होती. बैठकींत सर्व गाद्याच होत्या; फक्त एकच कोच बैठकीच्या मध्यभागीं मागच्या बाजूला मांडण्यांत आलें होतें. पुरुषांप्रमाणेंच आंग्र्यांच्या घराण्यांतील खाशा स्त्रियांनाही दरबार पहाणें सुलभ जावें म्हणून दरबारमहालावरील माडीच्या सज्जांत चिकाचे पडदे लावून व्यवस्था करण्यांत आली होती.

दरबाराची वेळ सूर्योदयाची ठरल्यामुळें उजाडतें न उजाडतें तोंच प्रेक्षकांची गर्दी जमूं लागली. सरदार, मानकरी वगैरे थोर थोर निमंत्रित लोक सूर्योदयापूर्वी अर्धी घटका तेथें दाखल होऊं लागले. त्यांना त्यांच्या त्यांच्या जागीं गाद्यांवर रामाजीपंतानें बसविलें. अगदीं मध्यभागच्या तीन गाद्या सोडून चौथ्या गादीवर प्रतिनिधि बसले; त्यांच्यापलीकडे फत्तेसिंग भोंसले बसले. सूर्योदयाचा समय होण्यापूर्वी थोडा वेळ कॅप्टन इंचबर्ड, कॅप्टन हाल्डेन व कॉडेडि सँडो मिल असे तिघेजण आले, त्यांना रामाजीपंतानें मुद्दाम त्यांच्यासाठीं जरा बाजूला मांडण्यांत आलेल्या कोचावर बसविलें. त्यांच्या मागोमाग येसाजी आंग्रे, तुळाजी आंग्रे, धोंडजी आंग्रे आणि महिपानजी व रघूजी हे मानाजी आंग्र्यांचे दोघे वडील मुलगे अशी मंडळी आली. त्यांना खाशांच्या गादीच्या उजव्या बाजूला फक्त मधल्या तीन गाद्या सोडून बसविण्यांत आलें. इतक्यांत संभाजी आपल्या भालदार-चोपदारांसह ललकारणीचा सन्मान घेत आला. त्याला मध्यभागच्या गादीच्या डाव्या बाजूला स्थान मिळालें. आतां फक्त मानाजी आंग्रे व बाजीराव हे दोघेच काय ते यावयाचे राहिले. निमंत्रित पाहुण्यांनीं व प्रेक्षकांनीं दरबार गजबजून गेला, व सूर्योदय झाला. तशी दरबाराविषयींची सर्वांची उत्कंठाही वाढूं लागली.

इतक्यांत चोपदारानें मानाजी आंग्र्याच्या नांवाचा ललकारा केला. त्या ललकाऱ्यांत मानाजी आंग्रे 'वजारतमाब' झाले असल्याचा उल्लेख होता. त्या ललकाऱ्यामागोमाग मानाजी दरबारांत प्रविष्ट झाला. सर्वांना मोठा अचंबा वाटला. संभाजी आंग्रे सरखेल त्या दरबारांत हजर होताच, त्यालाही तो ललकारा ऐकून जरा चमत्कारिक वाटलें. त्याची चर्या गंभीर झाली. दरबारांतील सर्व लोकांचे डोळे मानाजीकडे वेधून राहिले. मानाजी एखाद्या विजयी वीराप्रमाणें प्रसन्न वदनानें नोकर

चाकरांचे मुजरे घेत घेत दरबारांतील रुजाम्यांवरून गजगतीनें पावलें टाकीत खाशांच्या बैठकीकडे येऊं लागला. तो बैठकीच्या मध्यावर येतो तोंच त्याच्यावर स्त्रियांच्या बसण्याच्या जागांतून फुलें उधळण्यांत आलीं. त्याबरोबर दरबारांतील मंडळींचें आश्चर्य द्विगुणित झालें. 'आजचा प्रकार कांहीं निराळा दिसतो. सरखेल दरबारांत आले तेव्हां त्यांच्यावर कोणीं फुलें उधळलीं नाहींत, आणि मानाजीरावांवरच उधळलीं, हा योग सरखेलांचा हेतुपुरःसर अपमान करण्यासाठीं मुद्दाम जुळवून आणण्यांत आला असला पाहिजे. याच्या मुळाशीं पेशवे असतील का ? मानाजीरावानें मुद्दाम भाऊबंदकीच्या नशेंत हा डाव टाकला असला पाहिजे'. असे तर्कवितर्क जो तो जवळच्या माणसाच्या कानीं लागून लढवूं लागला. ज्याला हा देखावा पाहून कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं व निर्भेळ आनंद झाला, असा खुद्द मानाजीशिवाय तेथें एकच माणूस होता, तो रामाजीपंत होय. सूर्योदयींच्या कोमल किरणांचें स्नान घडतांच अर्धोन्मीलित कमल उमलूं लागावें त्याप्रमाणें मानाजी इतक्या डौलानें दरबारांतून एकेक पाऊल टाकीत बैठकीजवळ येत असलेला पाहून रामाजीपंताचें मुखकमल जास्त जास्त उमलत होतें. याच्या उलट ज्यांना हा प्रकार अत्यंत असह्य झाला अशा व्यक्ति त्या उभ्या दरबारांत दोनच होत्या. त्यांपैकीं एक येसाजी आंग्रे, व दुसरी खाशांच्या बैठकीच्या उजव्या दालनांतील बैठकींत आंग्र्याच्या किल्लेदारांत बसलेला कोटकामत्याचा किल्लेदार खाशाबा सुर्वे होता. मानाजी जवळ आलेला पाहून रामाजीपंतानें त्याला लवून मुजरा केला, त्याबरोबर आंगऱ्याच्या सर्व किल्लेदारांनीं व इतर नोकरांनीं एकमेकांकडे पाहून कांहींशा विस्मयानें उभे राहून रामाजीपंताचेंच अनुकरण केलें; पण खाशाबा मात्र उठून उभाही राहिला नाहीं.

कोण काय करतो इकडे रामाजीपंताचें सूक्ष्म लक्ष्य होतेंच. तो लगेच खाशाबा हा कुठचा किल्लेदार वगैरे माहिती काढून खाशाबापाशीं गेला व म्हणाला, "अहो किल्लेदार ! हें काय ? धनी आले तरी तुम्ही उठून उभे देखील रहात नाहीं ?"

खाशाबानें चोख उत्तर दिलें, "माझे धनी संभाजी सरखेल आले तेव्हां मी त्यांना योग्य मान दिला आहे. त्यावेगळा धनी मला माहीत नाहीं."

यावर 'अस्सें' असें म्हणून किंचित् ओंठ चावीत रामाजीपंत मागें आला. मानाजीनें तो प्रकार पाहिला; पण पाहून न पाहिल्यासारखें दर्शविलें.

मानाजी बैठकखान्याजवळ येतांच आतां तो कुठें बसतो इकडे सर्वांचें चित्त

वेधून राहिलें. कारण आतां अगदीं पुढच्या रांगेंत फक्त दोनच गाद्या रिकाम्या होत्या. त्यांपैकीं एक तर खुद्द पेशव्यांसाठीं राखून ठेवण्यांत आली होती हें उघड होतें. दुसऱ्या गादीवर पेशव्यांच्या बरोबरीनें त्यांच्या उजव्या बाजूला बसण्याचा मान आजच्या दरबारांत संभाजी सरखेलचा; पण त्यांना रामाजीपंतानें डाव्या बाजूच्या गादीवर बसविलें होतें. सर्व आंग्रेबंधूंत वयाच्या दृष्टीनें वडीलपणाचा मान येसाजी आंग्र्याचा, पण येसाजी तर आपल्या इतर बंधूंसमवेत डाव्या बाजूच्या बैठकींत एक गादी सोडून बसला होता. मानाजी हा येसाजीपेक्षां धाकटा, तेव्हां तो त्यांच्याबरोबरच बसावयाचा. पण आजच्या एकंदर रंगावरून मानाजी तसें करील असें कोणालाही वाटेना. पण तेवढ्यांत रामाजीपंतानें मानाजीला पेशव्यांच्या उजव्या बाजूला गादीवर बसविण्यासाठीं गौरवपूर्वक तिकडे नेलें. तें पाहून येसाजी आपल्या जागीं ताड्कन् उठून उभा राहिला.

इतक्यांत कॅ. इंचबर्ड, कॅ. हाल्डेन व कॉडेडी सँडो मिल यांनीं उठून मानाजी-शीं हस्तांदोलन केलें. संभाजी दरबारांत आला तेव्हांही हे तिघेही साहेब आपल्या उच्चासनावर बसले होते. त्यांना त्यांच्या पेहेरावांत गादीवर बसणें अवघड जाईल हें ध्यानीं घेऊन त्यांच्यासाठीं तेवढाच त्या दरबारांत एक कोच मांडण्यांत आला होता. ही सुधारणाही आंग्र्यांच्या दरबारांत नवीनच होती. आजवर कधींही कोणीही बूट पाटलोणवाला गोरा साहेब आला तरी त्याला बूट बैठकी-बाहेर काढून ठेवून होईल ती अडचण सोसून देशी बैठकीवरच बसावें लागे; पण आज तो मनू एकाएकीं पालटला होता.—त्या साहेबांना संभाजीचें देखील जितकें स्वागत केलें नाहीं, तितकें मानाजीचें स्वागत केलेलें पाहून सर्वांनाच विशेष आश्चर्य वाटलें. येसाजीला तर नुसतें आश्चर्य वाटून भागलें नाहीं, त्याला त्या एकंदर प्रकाराचा संताप आला. मानाजीनेंच ह्या भाऊबंदकीच्या भरीं पडून थोड्या दिवसांपूर्वी येसाजीचे डोळे काढल्यामुळें त्याला जरी कांहीं दिसत नव्हतें, तरी अनुमानानें त्याला सर्व गोष्टी ओळखतां आल्या; व तो बोलून चालून संभाजीचा कैवारी असल्यानें त्याला मानाजीचा हा अरेरावी बडे-जाव अगदीं असह्य झाला. त्यानें धोंडजीपाशीं चौकशी केली तेव्हां मानाजी पेशव्यांच्या उजव्या बाजूला बसत आहे असें त्याला कळलें. त्याबरोबर त्यानें ताड्कन् उठून मानाजीला बजावलें, "मानाजी! मागें फीर. सरखेलांच्या गादीचा असा अपमान करूं नकोस."

मानाजीनें आढ्यतापूर्वक येसाजीकडे पाहून विचारलें, "कां मागें फीर ? सरखेलांच्या जोडीनें पेशव्यांच्या उजव्या हाताला मी बसलों तर त्यांत सरखेलांचा अपमान तो काय झाला ? मीही कान्होजी सरखेलांचाच पुत्र आहें; आजच्या दरबारांत माझा मान सरखेलांच्या तोडीचा, नव्हे, त्यांच्याहून कांकणभर श्रेष्ठ आहे. संभाजी दौलतीवर वारस हक्क सांगतो; पण मीं स्वतःच्या मर्दुमकीनें संभाजीला चीत करून माझा दौलतीवरील स्वयंसिद्ध हक्क जगजाहीर केला आहे."

मानाजीच्या ह्या अरेरावीच्या उत्तरानें आगींत तेल ओतल्यासारखें झालें. येसाजीचा चेहरा तप्त लोहगोलाप्रमाणें लाल झाला. तुळाजी व धोंडजी यांच्या नेत्रांतून अग्निस्फुलिंग पडतात कीं काय असा भास होऊं लागला. व संभाजी तर डिवचलेल्या नागाप्रमाणें फूत्कार सोडूं लागला. संभाजी अत्यंत रागीट असल्याचें सर्वांना माहीत होतें; त्यामुळें आतां कोणता प्रसंग ओढवतो व कोणता नाहीं याविषयीं सर्वांचें चित्त अत्यंत अस्वस्थ झालें. तशीच वेळ आली तर आपण येसाजीची बाजू सांवरली पाहिजे, अशा बेतानें धोंडजी व तुळाजी हे दोघेही पवित्र घालून बसले. तुळाजी त्यांतल्या त्यांत जास्त तापट व घडाडीचा होता; त्यानें रामाजीपंताला अनुलक्षून येसाजीपाशीं हलकेच उद्गार काढले. " हा कळीचा नारद रामाजीपंत इथे कशाला आला ? पहावें तेव्हां हा आंब्याचा डहाळा अलीकडे प्रत्येक शुभाशुभ गोष्टींत लुडबुडावयाला तयारच असतो."

रामाजीपंताचें श्रवणेंद्रिय व दर्शनेंद्रिय हीं दोन्ही इंद्रियें अत्यंत तीव्र होतीं. तुळाजीचे उद्गार त्याला नेमके ऐकूं गेले. तो तसाच उठून तुळाजीपाशीं येऊन त्याच्या मानभावीपणानें कानांत म्हणाला, 'तुळाजीराव' हा रामाजीपंत आहे एवढें ध्यानीं ठेवा. उद्यां तुमचें कांहीं शुभाशुभ व्हावयाची वेळ आली तर तेव्हांही ह्या आंब्याच्या डहाळ्यावांचून अडेलच अडेल."

आतां तेथें खरोखरच अत्यंत विस्मयकारक असा अतिप्रसंग घडणार, मानाजी व संभाजी हे एकमेकांचे वैरी आतां त्या दरबाराला रणांगणाचें भयाण स्वरूप देणार ह्या भयानें सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. पण देवाला काळजी होती, त्यामुळें तेवढ्यांत बाजीराव पेशवे आल्याची ललकारणी सर्वांना ऐकूं आली, व लगेच भालदार चोपदारांच्या लवाजम्यानिशीं बाजीराव दरबारांत येऊन दाखल झाले. त्यांना दरोबस्त मंडळीनें उत्थापन देऊन मुजरे केले. बाजीराव मुजरे

स्वीकारीत पुढें येतात तोंच एका बाजूनें संभाजी व दुसऱ्या बाजूनें मानाजी असे दोघेही त्यांना सामोरे गेले. बाजिरावांनीं दोघांकडेही पाहून स्मितहास्य करीत दोघांचेही डावे उजवे हात आपल्या हातीं घेऊन त्यांना प्रथम दोन बाजूंच्या दोन गाद्यांवर बसवून नंतर ते मध्यें आपल्या गादीवर बसले. लगेच इंचबर्ड, कॅप्टन हाल्डेन व कॅडेडी सँडो मिल यांनीं पुढें येऊन बाजिरावांना मुजर केले, व बाजिरावांचा प्रतिमुजरा घेऊन ते तिघेही पुन्हा आपल्या जागीं जाऊन बसले. बाजिरावांनीं संभाजीला आपल्या डाव्या बाजूला व मानाजीला उजव्या बाजूला बसवून घेतलें, तो प्रकार इतक्या साहाजिकपणें झाला कीं, त्याबद्दल कोणालाही बाजिरावांनीं हा पक्षपात हेतुपुरःसर केला असेल असा संशयही आला नाहीं. ही सारी मानाजी आंग्रे व त्याचा पाताळयंत्री दोस्त रामाजी महादेव यांची कारवाई आहे असेंच ज्याला त्याला वाटलें.

प्रथम दरबारांत कलावंतिणींचें सुश्राव्य नृत्यगायन झाल्यावर बाजीराव पेशवे आजच्या दरबाराची मुख्य कामगिरी पार पाडण्यासाठीं उभे राहिले. ते उभे राहतांच आतां आंगऱ्यांची तडजोड ते कशी जाहीर करतात इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें. बाजिरावांनीं बोलण्याला सुरुवात केली, " आजचा दिवस हा महाराष्ट्राच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखा आहे. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं गोब्राह्मणसंरक्षणासाठीं हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्याचा संकल्प करून तो तडीला नेला, त्या त्यांच्या महत्कार्यांत स्वर्गवासी कान्होजीबाबा ऊर्फ जयसिंगराव आंग्रे सरखेल यांचा महाराजांना उजव्या हाताप्रमाणें उपयोग झाला. महाराजांच्या आरमाराला कान्होजीबाबांसारखा कुशल, पराक्रमी व तसाच मुत्सद्दी कर्णधार लाभला,म्हणूनच समुद्रसत्ता निर्वेधपणें मराठ्यांच्या हातीं आली व चिरस्थायी-पणानें टिकली.त्याप्रमाणेंच अविंधाधम अवरंगजेब बादशहानें कोंकणपट्टींत मराठ्यांची सत्ता नामशेष करण्याचा विडा उचलून जंजिऱ्याला सिद्दीची स्थापना केली, तेव्हां-पासून आजवर सिद्दीनें आपल्या बादशहाची हिंदुत्वविध्वंसाची इच्छा पूर्ण करण्या-साठीं अनन्वित अत्याचार केले, त्या अत्याचारांतूनही मराठी सत्ता कोंकणपट्टींत शाबूत राहूं शकली ती केवळ आंग्र्यांच्या मर्दुमकीमुळेंच. सिद्दीच्या जुलुमाचा कडेलोट झाल्यावर शाहूमहाराजांना त्याचें शासन करण्याची कामगिरी शिरावर घेणें भाग पडलें, ह्या कामगिरींत देखील आंग्रे घराण्यांतील सर्व कर्तबगार पुरुषां-ची आम्हांला कल्पनातीत मदत झाली आहे. थोरल्या महाराजांची राजधानी किल्ले

रायगड आज इतकीं वर्षें सिद्दी बळकावून बसला होता, ती आमची जुनी राजधानी पुन्हा जिंकून घेण्याच्या कामीं आम्हांला आंग्रेबंधूंचें साह्य होतें, म्हणूनच तो विजय आमच्या पदरीं पडला,* व यापुढेंही या कामीं आमची आंग्र्यांवर फार मोठी भिस्त आहे. कोंकणपट्टींतील आंग्र्यांचा अंमल हा मराठशाहीचा फार मोठा आधार आहे, व म्हणूनच हा अंमल असाच निर्वेधपणें दिवसेंदिवस अधिकाधिक भरभराटींत चालावा असें छत्रपति शाहूमहाराजांना व त्यांच्या आम्हां सर्व सेवकांना वाटतें.

" पण हिंदवी स्वराज्याचे वैरी जे आहेत, त्यांना आंग्र्यांचा व त्यांच्यामुळें हिंदवी-स्वराज्याचा हा वाढता उत्कर्ष बघवत नसल्यानें त्यांनीं नाना परींच्या कुटिल कारस्थानांचें विषबीज जें आंग्र्यांच्या घरांत पेरून ह्या घराण्यांत भाऊबंदकीचा वणवा पेटवून दिला, त्यामुळें मानाजीराव व संभाजीराव ह्या दोघांत निष्कारण तेढ उत्पन्न होऊन त्यामुळें आंग्र्यांच्या दौलतीचा व त्याबरोबर हिंदवी-स्वराज्याचाही भयंकर घात होत आहे. ही तेढ वेळींच मिटून सर्व आंग्रे बंधूंनीं गुण्यागोविंदानें वागूं लागणें आजच्या परिस्थितीला अत्यंत इष्ट आहे असें शाहूमहाराजांना व आम्हांलाही मनापासून वाटत असल्यानें आज आम्ही महाराजांच्या आज्ञेवरून सर्व आंग्रेबंधूंची तडजोड घडवून आणीत आहों."

इतक्यांत येसाजी आंग्रे पुढें येऊन म्हणाला, " आम्ही सर्व बंधु एकच आहों. मानाजीनें मध्येंच जे बखेडे माजविले आहेत, त्यांना श्रीमंतांनीं आळा घालावा

* कुलाबा जिल्ह्यांतील महाड तालुक्यांत रायरी नांवाचें खेडें आहे, तेथेंच रायगड हा इतिहासविश्रुत किल्ला इसवी सनापूर्वींच बांधण्यांत आलेला आहे. श्रीशिवाजी महाराजांनीं इ० सन १६७१ मध्यें रायगडाची डागडुजी करून व अनेक नवीन सुंदर इमारती, तलाव वगैरे बांधवून आपली राजधानी राजगडाहून तेथें नेली. संभाजी महाराजांच्या वधानंतर अवरंगजेब बादशहानें इ० सन १६९८ सालीं जंजिऱ्याचा तेव्हांचा हिंदुद्वेष्टा अधिपति व बादशाही आरमाराचा नायक सिद्दी कासीम याच्याकडून रायगड किल्ला मराठ्यांपासून जिंकून घेवविला. तेव्हांपासून इ० सन १७३३ पर्यंत तो सिद्दयाच ताब्यांत होता. त्या सालीं बाजीराव पेशवे शाहूमहाराजांच्या आज्ञेनें सिद्दीवर चाल करून आले, तेव्हां त्यांनीं आंग्रे, प्रतिनिधि, वगैरे सरदारांच्या साह्यानें रायगड पुन्हा जिंकून घेतला.

म्हणजे झालें. महाराजांनीं सखोजीच्या पश्चात् संभाजीला सरखेली दिली ही अत्यंत उचित गोष्ट केली. त्यांची हुकमत आम्ही शिरसावंद्य मानीत आलों. तशीच पुढेंही मानीत जाऊं. श्रीमंत पेशवे सरकारांची ही सदिच्छा पाहून आम्हाला फार आनंद होतो व जन्मभर ऋणी रहावेंसें वाटतें. पण त्यांनीं तडजोड करण्यासारखा बेबनाव आमच्यांत मुळींच नसल्यामुळें व क्षुल्लक मतभेद असले तर ते आपसांत समजून मिटविण्याइतका समंजसपणा आम्हां सर्वांच्या अंगीं असल्यानें तडजोडीसाठीं त्यांनीं श्रमी होण्याचें कांहीं कारण नाहीं, एवढेंच माझें म्हणणें."

येसाजीच्या भाषणानें दरबाराचा रंग एकदम बदलला. बहुतेक दरबाराचें मत तसेंच असल्यानें ते सर्वजण त्या भाषणाला माना डोलवूं लागले. संभाजीला सर्वांत जास्त संतोष वाटला. पण तें भाषण ज्यांना रुचलें नाहीं असे तीन गोरे साहेब, मानाजी, रामाजी महादेव वगैरे कांहीं लोक तेथें होते. त्यांच्या चर्या त्याच क्षणाला कांहींशा मलूल झाल्या. मानाजी तर संतापानें एकदम इंगळीसारखा लाल होऊन थरथर कांपत उभा राहून म्हणाला, " येसाजी! हा तुझा प्रश्न नाहीं. ज्यांच्या अंगीं स्वतंत्रपणें पराक्रम गाजविण्याची धमक नसेल, त्यांनीं पाहिजे तर खुशाल दुसऱ्याच्या गुलामगिरींत रहावें—"

" पण संभाजीची हुकमत मानणें म्हणजे गुलामगिरींत रहाणें नव्हे. संभाजी हाच सखोजीदादांच्या पश्चात् सरखेलीचा औरस वारस व आमचा धनी आहे. आम्ही त्याचे बंधु, आम्ही त्याला सर्वतोपरीनें साह्य करून त्याच्या आज्ञेंत वागून दौलतीची इभ्रत राखली पाहिजे. आम्ही आमची पायरी सोडतां कामा नये." येसाजी पुन्हा म्हणाला.

मानाजीनें पूर्ववत् संतापांत विचारलें, "तुमची पायरी! तुमची कसली पायरी? तुम्ही आम्ही कान्होजी बाबांचे दासीपुत्र झालों तरी त्यांचे पुत्रच ना? त्यांचेंच रक्त आमच्या नसानसांत सळसळत आहे ना? ह्या दौलतीवर जितका संभाजीचा हक्क आहे, तितकाच आमचाही हक्क आहे, व त्या हक्काच्या अंमलबजावणीसाठींच मी झगडतों आहें."

" मीं माझा सारा हक्क सरखेलांच्या पायीं वाहून त्यांच्या आज्ञेंत वागण्याचा संकल्प केला आहे व तो मी दौलतीच्या आबादानीसाठीं नानापरींच्या हालअपेष्टा–अमानुष छळ सोसूनही कृतज्ञपणें आमरण पाळणार. आंग्र्यांचा औरस वंशज जो कोणी सरखेलीच्या पदावर आरूढ होईल, तो माझा धनी!" येसाजी म्हणाला.

" असली नामुष्कीची ताबेदारी ज्यांना आवडत असेल त्यांना खुशाल आवडो. मला ती आजवर आवडली नाहीं व पुढेंही आवडणार नाहीं. माझ्या घरीं माझ्या कर्तबगारीला योग्य वाव मिळाला नाहीं, तरी तो मला मनगटाच्या जोरावर मिळवितां येतो, हें आतां सिद्ध झालेंच आहे. आज मला अर्धी दौलत सामोपचारानें देण्याला ज्यांची तयारी नसेल, त्यांना मी निक्षून सांगतों, कीं त्यांची अर्धीच काय, पण सारी दौलत मी मनगटाच्या जोरावर घेईन."

संभाजी इतका वेळ स्तब्ध होता. तो आतां उभा राहून मानाजीला म्हणाला, " मानाजी ! मी कान्होजी बाबांचा औरस पुत्र व तुम्ही सारे त्यांचे दासीपुत्र हा भेदभाव आजवर मनांत बाळगला नाहीं व पुढेंही बाळगणार नाहीं. सरखेलीचें पद मला मिळालें, तरी मी केवळ नांवाचा धनी आहे. ही सारी दौलत आपणां सर्वांची आहे असेंच मी समजतों. आपण पांच बंधु पांच पांडवांप्रमाणें एकदिलानें वागलों तर छत्रपतींच्या भगव्या झेंड्याखालीं आपणाला उभ्या कोंकणपट्टींत सरखेलीचा अंमल गाजवितां येईल. ही आमची जूट कायम रहावी यासाठीं मी, तूं सांगशील त्याप्रमाणें वागण्याला तयार आहें. मग तर झालें ना ? पण आपसांत दुही नको."

संभाजीचे उदारतेचे उद्गार ऐकून तेथला बहुजनसमाज त्याला मनांतून धन्यवाद देऊं लागला. तेव्हांच रामाजी महादेव मानाजीच्या कानाशीं लागून हळूच म्हणाला, " असाच चांगला इंगा फिरला पाहिजे. दुही नको कशी ? दुही अवश्य हवी. प्रत्येकाला आपलें ठरल्याप्रमाणें स्वतंत्रपणें कर्तबगारी गाजवून नशीब काढण्यासाठीं सवता सुभा अवश्य हवा. तें आतां पेशव्यांनींच बोलून दाखविलें म्हणजे सर्वांना गोड वाटेल. सोनारानें कान टोंचला म्हणजे तो दुखत नाहीं."

संभाजी पुन्हा म्हणाला, " श्रीमंत पेशवे जी तडजोड करतील ती मला अक्षरशः मान्य आहे. कोणीकडूनही त्यांनीं आमची एकी करावी म्हणजे झालें."

मानाजी म्हणाला, " पेशवे करतील ती तडजोड मलाही मान्य आहे. त्यांनीं प्रत्येकाच्या कर्तबगारीला स्वतंत्र वाव मिळण्यासाठीं सवत्या सुभ्याची योजना अंमलांत आणली म्हणजे आमच्यांत दुही पडली असें मुळींच नाहीं."

" आतां सर्व जबाबदारी पेशव्यांवर आहे." प्रतिनिधि जरा बाजूला वळून फत्तेसिंग भोसल्यांना म्हणाले.

"पेशवे आंग्र्यांची जूट कायम राखतील असें राव, तुम्हांला वाटतें ?" यशवंत महादेवांनीं हळूच प्रतिनिधींना विचारलें.

"शक्य नाहीं. तसें त्यांना करावयाचें होतें तर त्यासाठीं दरबार भरविण्याची कांहींच आवश्यकता नव्हती." प्रतिनिधि म्हणाले.

"थांबा. पेशवे काय म्हणतात तें ऐकूं." बाजीराव बोलावयाला उठून उभे राहिलेले पाहून यशवंत महादेव म्हणाले.

अर्थात् वरील संभाषण मागील बाजूला अगदीं हळू चाललें होतें. बाजीराव बोलूं लागतांच जिकडे तिकडे अगदीं शांत झालें. बाजीराव म्हणाले, "उभयतां आंग्रेबंधूंना दौलतीची पराकाष्ठेची आस्था आहे, हिंदवी स्वराज्याचा अभिमान आहे, व आमच्या ठायीं त्यांचा विश्वास आहे. महाराजांनींदेखील ह्या प्रकरणाचा समाधानकारक निकाल लावण्याचा अधिकार आम्हांला दिला आहे. ही आमच्या मस्तकावर फार मोठी जबावदारी येऊन पडली आहे. पण ती आपणां सर्वांच्या विश्वासानें व श्रीगजाननाच्या कृपेनें समाधानकारक रीतीनें पार पाडूं शकूं, असा आम्हांला भरंवसा वाटतो. ठरविलेली योजना जाहीर करण्यापूर्वी आम्हांला कांहीं गोष्टींचा स्पष्ट खुलासा येथें ह्या प्रसंगीं जमलेल्या सर्व मंडळींच्या निदर्शनाला आणावयाचा आहे कीं, आंग्रे हे कोंकणपट्टीचे स्वतंत्र राजे आहेत किंवा होतील असें मुळींच नसून तेही इतर सरदारांप्रमाणेंच छत्रपतींच्या हुकमतीचे सेवक आहेत. अर्थात् सरखेलांच्या दौलतीचा वारसा अमुक एकाचा आहे हें ठरविण्याचा अधिकार आंग्र्यांचा नाहीं; तो महाराजांचा व त्यांच्या वतीनें आमचा अधिकार आहे."

"पेशव्यांनीं आंग्र्यांच्या दौलतीच्या मुळाशींच कुऱ्हाड हाणली." फत्तेसिंग भोसले एकीकडे म्हणाले.

"त्यांना गादीचे जुने पिढीजाद वतनदार सेवक नको आहेत; कारण ते त्यांच्या तंत्रानें वागत नाहींत. त्यांना नव्यानव्या माणसांना प्रोत्साहन देऊन आपल्या ताटाखालील मांजरें बनवून सोडावयाचीं आहेत." प्रतिनिधि म्हणाले.

इतक्यांत संभाजी मध्येंच उठून म्हणाला, "श्रीमंत पेशवे माझ्या तीर्थरूपांना अनुलक्षून हें बोलत असतील तर पहिली गोष्ट, माझ्या तीर्थरूपांनीं मधल्या धामधुमीच्या काळांत जरी कांहींशी स्वतंत्रपणें सरखेलीची सत्ता गाजविली तरी त्यांनीं छत्रपतींच्या राजसत्तेला कधींच बाध आणला नाहीं. छत्रपतींचा भगवा झेंडा हातीं घेऊनच ते सत्ता गाजवीत होते. त्यांच्याच रक्ताचा मी आहें. मी या ठिकाणीं

असें शपथपूर्वक जाहीर करतों कीं, छत्रपतींच्या राजसत्तेला विरोध माझ्याकडून कधीं झालाही नाहीं व होणारही नाहीं."

बाजीराव पुढें म्हणाले, "आज आम्हांला हिंदुपदपादशाहीच्या सांगतेसाठीं अशा निरपेक्ष पराक्रमी सेवकांचीच फार गरज आहे. कोंकणपट्टीपुरती आमच्या ह्या उच्च ध्येयाच्या सांगतेची जबाबदारी आम्ही सर्व आंग्रेबंधूवर सारखीच टाकूं इच्छितों—"

"पेशव्यांचा विचार पालटला वाटतें. दौलतीची वांटणी दोघांत करावयाची सोडून ते सर्वांचा पक्ष घेत आहेत. हें काय ?" रामाजीपंतानें एकीकडे मानाजीला हळूच विचारिलें.

"ऐकूं तर खरें ते काय म्हणतात तें!" मानाजी हळूच रामाजीपंताला म्हणाला.

"दोन तरवारी एका म्यानांत कधींच रहात नसतात, त्याप्रमाणें मानाजीराव व संभाजीराव हे एकमेकांच्या हुकमतींत वागणें आजवरच्या अनुभवावरून दुरापास्त वाटत आहे. पण आम्हांला दोघांचीही थोरवी कळते, दोघांच्याही पराक्रमांवर आमचा पूर्ण विश्वास आहे, व दोघांचीही आम्हांला सारखीच गरज आहे. त्याबरोबरच हेंही खरें कीं, एका म्यानांत दोन तरवारी कधींच सामावूं शकत नाहींत. ज्या अर्थी संभाजी आंग्रे व मानाजी आंग्रे यांचें परस्परांशीं पटत नाहीं, त्या अर्थी त्यांच्या पराक्रमाला स्वतंत्रपणें वाव करून देणें आम्हांला प्राप्त आहे. यासाठीं आम्ही आज महाराजांच्या वतीनें असें जाहीर करतों कीं, आजपासून आंग्र्यांच्या दौलतीचीं विजयदुर्ग व कुलाबा अशीं दोन मुख्य ठाणीं समजण्यांत यावीं; संभाजी आंग्र्यांना त्यांचा वडिलार्जित 'सरखेल' किताब पूर्वींच बहाल करण्यांत आला आहे. तो तहाहयात त्यांच्याकडेच असावा, व त्यांनीं विजयदुर्गावर राहून त्या प्रांतींची दौलत सांभाळावी. त्याप्रमाणेंच मानाजी आंग्रे यांना आम्ही आज 'वजारतमाब' हा सरखेलीच्या दर्जाचा नवीन किताब तहाहयात बहाल करीत आहों, व त्यांनीं कुलाब्याचें ठाणें सांभाळावयाचें आहे. इतर आंग्रेबंधूंचा योग्य परामर्ष संभाजी व मानाजी यांनीं योग्य त्याप्रकारें घ्यावा. याप्रमाणें सर्व आंग्रेबंधूंनीं गुण्यागोविंदानें वागावें. या उप्परही आपसांत कांहीं वेबनाव उत्पन्न झाल्यास आम्हांला कळवावें; म्हणजे आम्ही महाराजांच्या विचारें सर्वांना हितकर अशी उपाययोजना करीत जाऊं. ही आमची योजना सर्वांना पूर्णपणें मानवेल अशी आम्हांला दृढ आशा आहे." लगेच रामाजीपंतांनीं भरजरी सरपोसा-

खालीं झांकून आणलेलें सोन्याचें ताट व रत्नजडित मुठीची तरवार असें साहित्य बाजिरावांपाशीं आणून दिलें. तें मानाजीला अर्पण करीत बाजीराव म्हणाले, "सर्वांच्या साक्षीनें आम्ही आज मानाजीला नव्या किताबतीची वस्त्रें अर्पण करतों."

बाजिरावांची ही योजना जाहीर होतांच दरबारांत एकदम मानाजीच्या नांवाचा जयजयकार होऊन फुलें उधळलीं गेलीं व बाहेर शुभसूचक नौबती झडूं लागल्या. पण ही योजना ज्यांना मुळींच रुचली नाहीं, असा एक लहानसा-मूठभर माणसांचा वर्ग तेथें होता. त्या माणसांनीं अर्थात् संभाजीच्या कैवाऱ्यांनीं तो अपशकुन मानून खालीं माना घातल्या. संभाजीही बिचारा खालीं मान घालून बसला.

* * *

दरबारांत मानाजीच्या नांवाचा जयजयकार होत होता, बाहेर नौबती झडत होत्या, दरबारांत लोक कोणी समाधानानें तर कोणी विस्मयानें तर कोणी खेदानें जवळच्या माणसाच्या कानांत कांहीं बोलत होते; त्या तशा गर्दींत रामाजीपंत मानाजीपाशीं येऊन त्याच्या कानाशीं लागून हळूच म्हणाला, "मानाजीराव! मनासारखें झालें कीं नाहीं ? मीं मुद्दाम भालदार-चोपदारांना तुमच्या नांवाचा ललकारा करतांना तुम्हांला 'वजारतमाब' म्हणावयाला सांगितलें होतें."

"शाबास ! पण ही नौबत झडते आहे, हा फुलांचा वर्षाव झाला, मघाशींही गच्चीवरून बायकांतून फुलें उधळलीं गेलीं, ही सारी योजना कुणाची ?" मानाजीनें तितक्याच हळू शब्दांत पण अत्यंत उत्साहभरानें हंसत विचारलें.

"कुणाची म्हणजे ? माझी ! माझा बाणाच असा आहे; एकदां हातीं काम घेतलें कीं मग शेंडी तुटो कीं पारंबी तुटो, अर्धवट म्हणून सोडावयाचें नाहीं." रामाजीपंत कृतार्थ बुद्धीनें स्मित हास्य करून उद्गारला.

यावर 'अस्सें' असें संमतिदर्शक वदून मानाजी हंसला. पण प्रश्न विचारतांना त्याची हंसरी चर्या जितकी तजेलेदार दिसत होती, तितकी आतां दिसली नाहीं. ती अंमळ कोमेजली. त्यानें रामाजीपंतापासून अगदीं निराळ्या उत्तराची अपेक्षा केली होती. आपण प्रत्यक्ष सिद्दी साताची राजधानी अंजनवेलही जिंकली; त्याप्रमाणेंच राजमाची, कोहाळा, कुलाबा, खांदेरी वगैरे किल्ले जिंकले, असे अतुळ पराक्रम आपण केवळ गेल्या चार-पांच महिन्यांत गाजविल्यामुळें सर्वांनीं पुष्प-

वृष्टि करून व जयजयकार करून अंतःकरणापासून आपला गौरव केला आहे, असें उत्तर रामाजीपंताच्या तोंडून ऐकण्याची इच्छा होती; पण ती पूर्ण झाली नाहीं.

ॐ ॐ ॐ

तुळाजी आंग्रे येसाजीच्या कानाशीं लागून खिन्नपणानें म्हणाला, "दादा! पेशव्यांनीं हा न्याय केला नाहीं. संभाजीबाबांच्या सरखेलीला तोडीला तोड देण्यासाठीं दौलतींत दौलत उत्पन्न करावयाची होती, तर त्यांनीं 'वजारतमाब' हा किताब तुम्हांला द्यावयाला हवा होता. कारण तुम्ही आम्हां सर्वांहून वडील आहां, दौलतीसाठीं तुम्ही अनंत हालअपेष्टा भोगल्या आहेत; पण तसें न करतां पेशव्यांनीं तुमच्या नाशावर टपून बसलेल्या मानाजीला तो किताब दिला. इतका तोच कोण एकटा पेशव्यांचा लाडका ?"

येसाजी विषण्णतापूर्वक त्याला म्हणाला, "पेशव्यांनीं मानाजीच्या भिडेला बळी पडून आमच्या दौलतीचीं धड एकीकडे व शीर एकीकडे अशीं दोन शकलें केलीं; त्यामुळें आज आमची दौलत प्राणहीन झाली."

प्रतिनिधि फत्तेसिंगाच्या कानाशीं लागून म्हणाले, "पेशव्यांना आंग्रे डोईजड झाले होते; त्यांना खच्ची करण्याचा प्रयत्न बाळाजीपंत नानाच्या वेळेपासून चालला होता; तें वडिलांचें ब्रीद चिरंजीवांनीं राखलें. दौलतीचा मालक संभाजी, त्याला विजयदुर्गाकडे हाकलले; व कारभारी सत्ता आणि कुलाब्याचा कारभार मानाजीच्या हातीं दिला; यामुळें ते दोघेहि या पुढें जास्त चुरशीनें सुंदोपसुंदासारखे आपसांत एकमेकाशीं भांडून नाश पावतील. पेशव्यांच्या इच्छेप्रमाणें आंग्र्यांच्या दौलतीची दुर्दशा होईल, व शिवाय स्वतः पेशवे नामानिराळेच !"

ॐ ॐ ॐ

यशवंतराव पोतनीस श्रीपतरावांपाशीं येऊन म्हणाला, "पेशव्यांनीं महाराजांच्या आज्ञेचा हेतुपुरस्सर दुरुपयोग केला. आपण इतके दिवस कोंकणांत राजकारणाची जी घडी बसविली, ती आतां पार विस्कळित होणार."

कॅ. इंचबर्ड, कॅ. हाल्डेन व कॉंडे डी सँडोमिल् प्रफुल्ल वदनानें आपसांत हळुहळू कांहीं बोलत होते. त्यांना उद्देशून तो पुढें म्हणाला, "आणि पहा ! आपल्या शत्रूंना पेशव्यांच्या ह्या भेदनीतीच्या वर्तनामुळें कसा आनंद झाला आहे, पहा ! त्यांना देखील आंग्र्यांचा नायनाट व्हावयाला हवाच आहे; तो त्यांचा हेतु आतां आंग्र्यांच्या घराण्यांत खरी दुही माजल्यावर आपोआप तडीला जाईल. मघाशीं

मानाजी दरबारांत आला तेव्हांच ह्या तिघां धूर्तांनीं तोंडपुजेपणानें त्याचें कसें स्वागत केलें तें तुम्हीं पाहिलेंच आहे."

याप्रमाणें बाजीरावांनीं केलेल्या निवाड्याविषयीं दरबारांत जो तो कुजबुजत होता. त्या वेळीं कोणी चिकाच्या पडद्याआड बसलेल्या आंग्र्यांच्या बायकांच्या मनावर त्या निवाड्याचा काय परिणाम झाला आहे, तें पहाण्याचा प्रयत्न केला असता, तर कान्होजी आंग्र्यांच्या मागें परम चातुर्यानें सर्व मुलांना समता न्यायानें वागवून दौलतीची आबादीआबाद राखणारी आंग्र्यांची चैतन्यदाती मानवी देवता–संभाजी–सखोजींची आई मथुराबाई आपल्या प्रेमळ सवतीपाशीं–लक्ष्मीशीं ह्या दुहीचे दुष्परिणाम अंदाजून आंसवें टिपीत आहे; याच्या उलट मानाजींची बायको राधिकाबाई आढ्यतापूर्वक दृष्टीनें आपल्या सवतीशीं–तितक्याच आढ्यतेने हर्षभरित झालेल्या भागीरथीबाईशीं हंसून खेळून बोलत आहे; संभाजीची बायको गीताबाई संतापानें थरारत आहे; असा देखावा तेथें दिसला असता.

याप्रमाणें दरबारांतील महत्त्वाची कामगिरी आटोपल्यावर अत्तर–गुलाब, पानसुपारी व रीतीप्रमाणें सर्व शिष्टाचार झाले, व दरबार बरखास्त झाला. पण दरबार सुरू होतांना त्यांत जो जिवंतपणा होता, तो दरबार बरखास्त होतांना आढळून आला नाहीं. शांततेनें दरबार पार पडला; पण ती शांतता स्मशानशांततेप्रमाणें भीषण होती. तरीपण बाजिरावांना मात्र आपण आपलें उद्दिष्ट परिपूर्णतेनें सफल केलें असेंच वाटलें. सायंकाळपर्यंत बाजिरावांचा मुक्काम तेथें होता; पण त्यांनीं ह्या बाबतींत कोणाशींही जाहीर वाटाघाट केली नाहीं. आंग्र्यांच्या दौलतीची समसमान वांटणी करण्यासाठीं व राजमाची वगैरे ठाणीं सरकारांत घ्यावयाचें मानाजीशीं पूर्वींच ठरलें होतें; त्याप्रमाणें करारपत्र करून घेण्यांत बराच वेळ गेल्यावर सायंकाळीं बाजीराव पुण्याला जाण्यासाठीं निघून गेले त्यानंतर सर्वत्र अशी दाट वदंता पसरली कीं, बाजिरावांनीं मानाजी आंग्र्याला मुद्दाम पाठीशीं घातलें असून ते धीरेधीरे त्यालाच आंग्र्यांच्या दौलतींत अग्रपूजेचा मान देणार आहेत. ह्या वदंतेला भरीवपणा ज्या एका बारीकशा गोष्टीमुळें आला, ती गोष्ट अशी कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं कोटकामत्याचा किल्लेदार खाशाबा सुर्वे कोटकामत्याला जाण्याला निघण्यापूर्वी सर्व खाशांचा रीतसर निरोप घेतां घेतां मानाजीचा निरोप घ्यावयाला आला, तेव्हां रामाजी महादेव तेथें हजर होता. त्यानें खाशाबाला बजावलें, " किल्लेदार, तुमच्या हिताची गोष्ट तुम्हांला सांगून ठेवतों कीं, संभाजी सरखेलांची सत्ता आतां मावळतीकडे वळली आहे. आतां ह्या बदललेल्या मनूंत मानाजीरावांपुढें तुमचा शिरजोरपणा मुळींच चालावयाचा नाहीं."

## प्रकरण पहिलें

# दसऱ्याच्या दिवशीं !

मागें वर्णन केलेल्या प्रसंगानंतर सुमारें सहासात महिन्यांनंतरची म्हणजे आश्विन शुद्ध दशमीच्या–दसऱ्याच्या–दिवशींची गोष्ट. होऊं नये तें झालें ! चांदीची पंचारती देवीच्या अवसराच्या हातून खालीं पडली. तेला-तुपाचा दीप पडणें अथवा पडून विझालेला पहाणें हा भाविक लोक मोठा अपशकुन समजतात. जेथें हा अपशकुन घडला तें कोटकामतें येथील श्रीभगवतीचें देवस्थान फार प्राचीन काळापासून परम जागृत व प्रभावशाली म्हणून प्रसिद्ध आहे.* त्या देवी-

* रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्यांत कोटकामतें हें एक लहानसें पण इतिहासप्रसिद्ध असें खेड आहे. येथें श्रीदेवी भगवतीचें पुरातन व परम जागृत असें देवस्थान आहे. तें कधीं बांधलें गेलें याविषयीं शोधच लागत नाहीं इतकें तें प्राचीन आहे. प्रतापगडची भवानी व ही देवी यांच्यांत इतकें अपूर्व साम्य आहे कीं, ह्या दोन्ही मूर्ति एकाच कारागिरानें बनविल्या असाव्या असें वाटतें. इ० सन १७२४ च्या सुमाराला छत्रपतींच्या वतीनें कान्होजी आंग्रे सरखेल कोंकणपट्टींत कारभार करीत असतां कोण्याप्रसंगानें त्यांना देवीचा साक्षात्कार पटून त्यांची देवीवर परमश्रद्धा बसली. त्यांनीं देवीच्या देवालयाचें गोपूर बांधलें व तें गांव देवीच्या वार्षिक पूजा-अर्चा नैवेद्य-उत्सवासाठीं देवीला इनाम दिलें. कान्होजी आंग्र्यांनीं देवालयाचा जीर्णोद्धार केल्याबद्दल देवालयाच्या भिंतीवर शिलालेख आहे. ह्या योजनेला छत्रपति, पेशवे वगैरे सर्वांची मान्यता मिळून पुढें सुमारें दोन वर्षांनीं तें गांव देवीला सनदशीर इनाम मिळालें. त्यानंतर देवालयाची वाढावळ व सुधारणा प्रतिष्ठित गांवकऱ्यांनीं वेळोवेळीं करून त्याला सध्यांचें भव्य व मनोहर स्वरूप दिलें आहे. कोंकणपट्टींत जीं कांहीं अतिप्राचीन, अति जाज्वल्य व अतिप्रेक्षणीय अशीं देवस्थानें आहेत, त्यांतलेंच सदर देवस्थान हें एक आहे. देवीची कृष्ण पाषाणाची मूर्तिही प्रेक्षणीय आहे. येथें आश्विन शुद्ध १ पासून शुद्ध १० पर्यंत गायन, कीर्तन, कलावंतिणींचा नाच, वाजंत्री, पालखीची मिरवणूक, असा फार थाटाचा उत्सव होत असतो. फक्त नवरात्रांत रोज उत्सवाचा रात्रींचा कार्यक्रम आटोपल्यावर देवीच्या पुजाऱ्यावर देवीचें वारें अथवा अवसर येतो. त्या वाऱ्या-

प्रकरण १ लें—



श्री देवी भगवति-कोटकामतें

ऱ्या देवालयांत सालाबादप्रमाणें नवरात्राचा उत्सव मोठ्या थाटामाटानें सुरू असतां पूर्वोक्त अपशकुन घडून आला, तो सर्वच गांवकऱ्यांच्या व गांवोगांवाहून मुद्दाम उत्सवासाठीं आलेल्या भाविक बाळगोपाळांच्या मनाला लागून राहिला. पण त्यांतल्या त्यांत तेथला किल्लेदार खाशाबा सुर्वे याच्या मनाला तर तो फारच लागला. पेशव्यांनीं चेऊल येथें राजगडावर आंग्ऱ्यांची स्थापना केल्या दिवसापासून मानाजी आंग्ऱ्यांचें खाशाबाशीं फारच वितुष्ट आलें असल्यामुळें आपणावर

---

ऱ्या हातीं पांच कांकडे पेटविलेली चांदीची मोठी पंचारती असते. उत्सवांत देवीच्या कानांवर गाऱ्हाणीं घालून आपलें कल्याण करून घेण्यासाठीं व उत्सव पाहण्यासाठीं आजूबाजूच्या भाविक यात्रेकरूंच्या झुंडीच्या झुंडी लोटत असतात. त्या वेळीं देवीला नवस होतात व पूर्वीचे नवस फेडण्यांत येतात. देवीची बाराही महिने नित्य तीन त्रिकाल पूजा आरती, कांकड-आरती होत असते. तीन त्रिकाल ताशा, सनई, चौघडा, शिंग, कर्णा, अशी प्रेक्षणीय नौबत झडत असते. देवीच्या गाभाऱ्यांत तीन त्रिकाल नंदादीप तेवत असतात. नवरात्राच्या उत्सवाशिवाय कार्तिक मासीं व चैत्र मासीं रोज रात्रौ देवीच्या पालखीची मिरवणूक निघते. तेव्हां पालखीबरोबर कलावंतिणींचें नृत्यगायन होत असतें. चैत्रमासीं वसंतपूजाही होत असतात. देवस्थानाचें उत्पन्न सध्यां सालीना सुमारें चार हजार रुपये आहे. ह्या देवस्थानांतील सर्व प्रकारची शिस्त दरबारी थाटाची व प्रशंसनीय आहे. ह्या गांवीं पूर्वी भुईकोट किल्ला होता. तो वाडीकर सांवतांनीं बांधलेला होता पुढें तो आंग्र्यांनीं सांवतांपासून बळकावला. कान्होजी आंग्र्यांच्या कारकीर्दींत तो एक बऱ्यापैकीं लढाऊ किल्ला होता. कालांतरानें त्याचें लढाऊ स्वरूप जाऊन पेशवाईच्या अखेरच्या काळांत तें त्या प्रांताच्या मामलेदाराच्या कचेरीचें ठाणे बनल. पेशवाईची अखेर झाल्यावर इंग्रजसरकाराच्या नव्या मनूंत तें ठाणें तेथून उठलें व देवगड येथें गेलें त्यामुळें तेथील कोटाचें महत्त्व नाहींसें होऊन तो नादुरुस्त होतां होतां आतां तेथें त्या कोटाचे कांहीं बुरूज मात्र नांवाला उभे आहेत. आपल्या अमदानींत इंग्रज सरकारनें तो कोट लिलांवात विकावयाला काढला तेव्हां त्या गांवचे मूळचे आदिलशाहीपासूनचे इनामदार इतिहासप्रसिद्ध प्रभूदेसाई यांनीं विकत घेतला. त्या कोटावरूनच त्या गांवाला कोटकामतें असें नांव पडलें आहे. पण कोटाच्या टापूला मात्र घेरें कामतें असें निराळें नांव आहे. देवस्थानच्या इनामांत त्या टापूचा समावेश करण्यांत आलेला नाहीं.

कधीं काय प्रसंग येईल ह्या भयानें आज खाशाबा देवीच्या अवसरापाशीं आपलें गाऱ्हाणें सांगणार होता. तोंच हा अपशकुन घडून आला !

खाशाबाच्या मनाला ती गोष्ट लागण्याचें कारण आठनऊ वर्षांपूर्वी असाच एक अपशकुन झाला होता. गुढीपाडव्याच्या पूर्व दिवशीं देवीचें निशाण अकस्मात् दांडीवरून कोसळून पडलें, व दुसऱ्याच दिवशीं त्याचा एकुलता एक दहाअकरा वर्षांचा राजबिंडा मुलगा घरांतून निघून गेला होता. त्याचा आजवर पत्ता नव्हता. वास्तविक हा घरांतील भांडणाचा, खाशाबाच्या दुसरेपणाच्या बायकोनें घरांत उत्पन्न केलेल्या कलहांचा परिणाम होता. त्याचा पूर्वोक्त अपशकुनाशीं कांहीं दैवीसंबंध होता किंवा नाहीं हें कोणीं कसें ठरवावें ! पण खाशाबाच्या मनानें मात्र घेतलें कीं, हा त्या अपशकुनाचाच परिणाम. स्वतःच्या दोषी व संशयी मनासारखा मनुष्याचा हाडवैरी दुसरा कोणीही नाहीं. खाशाबाची पहिली बायको यशोदा ही परमसाध्वी होती. देवदयेनें विशीच्या उमरींतच खाशाबाला तिच्या पोटीं पहिला मुलगा झाला. तेव्हां यशोदेचें वय केवळ पंधरा वर्षांचें होतें. यशोदा जशी गुणांनीं तशीच रूपानेंही परमसुंदर होती. पाचाडच्या रावबा नाईक महाडिकाची ती एकुलतीएक कन्या होती. रावबा नाईक महाडिक ही त्या काळीं रायगड सुभ्यांतच काय पण उभ्या कोंकणपट्टींत चांगली असामी म्हणून गणली जाई. पण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, नाइकानें सारें वैभव आपल्या हयातींत केवळ स्वपराक्रमावर संपादन केलें होतें. एरव्हीं त्याची मुलगी कितीही गुणी व सुंदर असली तरी तेव्हां थळचा किल्लेदार असलेल्या व फार पूर्वीपासून कुसगांवचा इनामदार म्हणून प्रसिद्ध असलेल्या दादजी सुर्व्यांची सून कशी झाली असती ! इतकेंही करून हा शरीरसंबंध जुळून आलाच असता असें नाहीं. पण रावबा नाइकाचा मुलगा बांकाजी नाईक हा खाशाबा सुर्व्यांचा परममित्र होता; त्या मित्रत्वाला नात्याचें चिरस्थायी स्वरूप प्राप्त व्हावें असें त्या दोघांच्याही मनानें घेतलें, व दोघांच्याही वडिलांना आपल्या पुत्रांच्या इच्छेला मान्यता द्यावी लागली. लग्नानंतर कांहीं काळ खाशाबा व यशोदा या जोडप्यानें सुखाचा संसार केला, व पुत्ररत्नाचा लाभ होऊन त्या जोडप्याच्या सुखाची परमावधि झाली. पण हें सुख चिरकाल भोगणें त्या जोडप्याच्या नशिबीं नव्हतें. म्हणूनच यशोदा पुत्रवती झाल्यावर त्या जोडप्याचें पटेनासें झालें. 'भार्या रूपवती शत्रु' हें सुभाषित सुंदर स्त्रीच्या पदरीं पतीचें शत्रुत्व बांधतें हा सर्वसामान्य नियम असेल; पण

अंदाधुंदीच्या काळांत स्त्रीचें सौंदर्यच स्त्रीचें शत्रुत्व करूं लागतें. यशोदा वयांत येऊन संसार करूं लागली तो काळ फारच अंदाधुंदीचा होता. तशांत रायगड सुभ्यांत यशोदेचें माहेर, रायगडावर सत्ता सिद्दींची होती. सिद्दींच्या सत्तेची अमलबजावणी करणारे सिद्दी रसूलचे मुलगे आणि सरदार सिद्दी सात हे एकाहून एक प्रबळ दैत्य होते. त्यांच्या पापी दृष्टींतून तेव्हां कोणाचें वित कलत्र अथवा जीवित सुरक्षित टिकणें अत्यंत दुरापास्त–जवळ जवळ अशक्यप्राय होतें. आतां, रावबा नाईक ही रायगड महालांतील मोठी असामी असल्यानें यशोदा त्या अत्याचारांतून बचावली गेली हें खरें. पण म्हणून ती त्या पापिष्ठांच्या दृष्टीनें दृष्टावली नव्हती असें नाहीं. ही झाली बाहेरच्या म्हणजे मुसलमानांच्या पापी दृष्टीची गोष्ट. त्या पापिष्ठांच्या पापी दृष्टीपासून रावबा नाईक आपल्या कन्येचें रक्षण स्वपराक्रमाच्या जोरावर करूं शकला. पण दुसरा एक रिपु त्याला खुद्द त्याच्या धन्याच्या घरांतच भेटला. कान्होजी आंग्र्याचा दासीपुत्र मानाजी आंग्रे हा तेव्हां नुक्ताच तारुण्यांत प्रविष्ट झाला होता. पुढें लौकरच मानाजीचें त्याच्या वयाच्या अठराव्या वर्षीं पहिलें लग्न झालें, त्या निमित्तानें रावबा नाईक व दादजी सुर्वे हे सहकुटुंब त्या समारंभाला गेले होते. मानाजीची पहिली बायको राधिकाबाई ही यशोदेची जीवश्च कण्ठश्च मैत्रीण असल्यानें यशोदा राधिकाबाईला पाठराखण गेली. दोघीही वयानें जवळ जवळ सारख्याच–वर्षाच्या आंतबाहेर होत्या. राधिकाबाई ही जरी रूपवान् होती, तरी यशोदेसमोर ती बरीच फिक्की पडे. दोघींच्या रूपांतील हा फरक मानाजीच्या तेव्हांच ध्यानीं आला, व त्याचें यशोदेवर मन बसलें. पुढें कांहीं दिवसांनीं यशोदा आपल्या घरीं गेल्यावर मानाजीनें तिला मागणी घातली. त्यापूर्वीं थोडे दिवस यशोदेचें खाशाबाशीं लग्न ठरलें होतें.

मानाजी आंग्रे हा कान्होजी आंग्रे सरखेल यांचा पुत्र असल्यानें वैभवाच्या दृष्टीनें त्याचा दर्जा खाशाबापेक्षां निःसंशय श्रेष्ठ होता. पराक्रमानें व रूपानेंही मानाजी बऱ्यापैकीं होता. अर्थात् रावबा नाइकासारख्या सरदाराला आपल्या कन्येसाठीं खाशाबापेक्षां तेंच स्थळ जास्त पसंत पडणें स्वाभाविक होतें. सवतीवर मुलगी कशी द्यावी हा विचार राजे रजवाडे व सरदार इनामदार अशा खानदानीच्या मोठ्या लोकांच्या मनाला कधीं शिवत नसतोच; अर्थात् मानाजीच्या पहिल्या लग्नाची आडकाठीही मानाजीच्या मागणीआड येण्याचा फारसा संभव नव्हता. पण मानाजी हा कान्होजी आंग्र्यांचा दासीपुत्र होता; ही अकुलीनता त्याच्या

मागणीआड आलो. त्यांतूनही रावबा नाइकानें कदाचित् मानाजीच्या मागणीला होकार दिला असता. कारण थोरां मोठ्यांच्या जातकुळीवरचे अकुलीनतेचे डाग मानवैभवाच्या प्रावरणाखालीं झांकले गेले कीं, ते जगाला आपोआप दिसेनासे होतात. पण बांकाजीनें मी माझी बहीण आंग्र्यांच्या लेंकावळयाला कधींच देणार नाहीं. ती असल्या अकर्मांशाच्या नांवानें बाटण्यापेक्षां मी माझ्या हातानें तिला तरवारीनें छाटून टाकीन' असें रावबाला निक्षून सांगितलें, व यशोदेनेंही तसाच हट्ट धरला; तेथें रावबाचा कांहीं उपाय चालेना. तरीही मानाजीच्या मनां-तून दंडेलीच्या जोरावर यशोदेला पळवून नेऊन तिच्याशीं लग्न करावयाचें होतें. पण रावबा नाईकानें कान्होजी आंग्र्यापाशीं तें गाऱ्हाणें नेलें व त्याच्यामार्फत परस्पर मानाजीची कानउघाडणी करवून तो प्रसंग टाळला. पुढें यशोदेचें खाशाबाशीं लग्न झालें व तीं नवराबायको सुखाचा संसार करूं लागलीं.

पण मानाजीचा द्वेषाग्नि कांहीं शांत झाला नव्हता. बापापुढें कांहींच चालेना म्हणून त्या वेळेपुरता तो मूग गिळून स्वस्थ बसला. पण हा स्वस्थपणादेखील जगाला दिसण्यापुरता–देखाव्याच्या जगाला शोभण्यापुरता–होता. मानाजी म्हणजे कमालीचा अहंमन्य व आंतल्या गांठीचा. त्यानें यशोदेवरून मनांत पक्का दावा धरला व त्या अपमानाचा सूड घेण्याची खूणगांठ मनाशीं मारून ठेवली. हस्तें पर-हस्तें ती सूडाची कल्पना कृतींत उतरविण्याचा क्रम आरंभिला. खाशाबाचें लग्न झाल्यावर थोड्याच महिन्यांत संभाजी सुर्वे वारला, व त्याच्या पश्चात् कान्होजी आंग्र्यांकडून खाशाबाला थळची किल्लेदारी मिळाली. पण पुढें कांहीं विघ्नसंतोषी लोकांच्या आगलावेपणामुळें कान्होजीचें खाशाबाशीं पटेनासें होऊन त्याला ती किल्लेदारी सोडावी लागली. तेव्हां थळची चौबुकजी आंग्र्यांच्या अंमलाखालीं असली व त्या निमित्तानें आंग्रे हे थळच्या किल्लेदाराचे धनी असले तरी आंग्रे कांहीं कोंकणपट्टीचे स्वतंत्र राजे नव्हते. त्याचे धनी सातारकर छत्रपति शाहू महा-राज हे होते. त्यांजपाशीं खाशाबानें पुन्हा आपलें गाऱ्हाणें नेलें, व त्यांची शिफा-रस मिळवून कान्होजी आंग्र्यांच्या पदरीं पुन्हा आश्रय मिळविला. पुढें खाशाबा आंग्र्यांच्या पदरीं मान्यतेला चढतां चढतां साळशी महालांतील पूर्वोक्त इतिहास-प्रसिद्ध कोटकामतें येथील किल्ल्याचा किल्लेदार झाला.

याप्रमाणें खाशाबाचा पुन्हा जम बसला तरी मानाजी आंग्र्यानेंही त्याच्याशीं दावेदारी करावयाची सोडली नव्हती. तो हरउपायांनीं खाशाबाला खड्यांत

लोटण्याचीं कारस्थानें रचीत होताच. त्या कारस्थानांत त्याला त्याच्यासारख्याच कुटिल बुद्धीच्या साथीदारांची मुळींच वाण भासली नाहीं. कावळा ज्याप्रमाणें पशूच्या अंगावर व्रण पडतो केव्हां व आपणाला त्या व्रणांत चोच खुपसावयाला सांपडते केव्हां, अशी वाट पहात असतो, त्याप्रमाणें मानाजी किती तरी दिवस एखादें खाशाबाचें गृहछिद्र शोधीत होता. गृहछिद्र शोधण्याचें कारण त्याला राज्यकारभारांत हात घालून खाशाबावर अस्मानी सुलतानी गाजविण्याची संधि कांहीं केल्या सांपडेनाच. कान्होजी आंग्रे ह्यात असे पावेतों त्याच्या कारभारांत मुखत्यारीनें हात घालण्याची त्याच्या कोणत्याच मुलाची छाती नव्हती. शिवाय खाशाबा हा पेशव्यांच्या मर्जीतील माणूस असल्यामुळें व पेशव्यांचें आंग्र्यांना सर्वच दृष्टींनीं भय असल्यानें खाशाबांच्या वाटेला आंग्र्यांपैकीं कोणीं जाणें तितकें सोपें नव्हतें. म्हणूनच खाशाबाला छळण्यासाठीं मानाजीला प्रथम वाममार्गांचा आश्रय करावा लागला. त्यासाठीं खाशाबाच्या वाड्यावर टपलेल्या लोकांना त्यानें जवळ करून त्याच्या मार्फतीनें यशोदेची बदनामी करण्याचा सपाटा चालविला, व खाशाबा बायकोच्या विषयांत बराच हलक्या कानांचा असल्यानें त्याच्या मनावर त्या शत्रुकारस्थानाचा शत्रूच्या दृष्टीनें इष्ट असा परिणाम झाला संशयाच्या पिशाच्चानें खाशाबाला पुरतेपणीं घेरलें, व तो यशोदेचा अतोनात छळ करूं लागला. तो छळ इतक्या परमावधीला पोंचला कीं, त्या साध्वीनें शेवटीं त्या छळाला कंटाळून एके रात्रीं आपला एकुलता एक मुलगा मागें ठेवून व अडीच वर्षांच्या लहानग्या मुलीला बरोबर घेऊन माहेरची वाट धरिली. पुढें तिची काय अवस्था झाली याची कोणी विचारपूसही केली नाहीं. ती माहेरीं जाऊन पोंचली नाहीं एवढें मात्र जगजाहीर झालें, व तेवढ्यावरून अनेकांनीं अनेक प्रकारचे तर्क केले.

दुसऱ्याच वर्षी खाशाबानें दुसरें लग्न केलें. त्याची ही दुसरी बायको दुथळच्या चौगुरुजीवरील अर्थात् खाशाबाच्या पूर्वपरिचयाची होती. ती भिकाजी गुजराची मुलगी. गजरा तिचें नांव. गजरा रूपानें चांगली होती, तरुण होती, सर्व कांहीं खरें. पण तिचें थोडक्यांत वर्णन करावयाचें म्हणजे तिच्या पाऊलवाटेनें अकाबाई खाशाबाच्या घरांत शिरली. त्या बायकोनें आपलें माहेर आणून खाशाबाच्या घरांत भरलें. खाशाबा तर गजरेच्या हातांतील बाहुलें बनून राहिला तिनें प्रथम लग्न होऊन घरांत येतांच पहिल्याच वर्षी आपल्या दहा वर्षांच्या सावत्र मुलाचा घरांतून उठावा केला. त्याच्याविषयीं खाशाबाच्या कानीं विष ओतून

त्याचें मन कलुषित केलें. तो मुलगा पाडव्याच्या दिवशीं जेवावयाला पाटावर बसला असतां भरल्या नाटावरून त्याला खाशाबानें लाथ मारून उठविलें व उपाशीं घराबाहेर घालवून दिलें. तो पोरगा पुढें कुठें गेला व त्याची काय दशा झाली, याची विचारपूस कोणींही केली नाहीं. त्याच्या पूर्वदिवशीं झालेल्या अपशकुनाचें दिग्दर्शन वर केलेंच आहे. हा सारा प्रयत्न खरें पाहूं जातां गजरेबरोबर तिच्या घरीं येऊन ठाणें देऊन बसलेल्या तिच्या दुष्टबुद्धि भावाचा होता. संताजी गुजराला सिद्दी, मानाजी, इंग्रज वगैरे जे कोणी आपणाला पाठीशीं घालतील, त्यांचा पाठपुरावा करून स्वतःचा अर्थलाभ साधावयाचा होता. त्याच्या मनांतून कोटकामतें येथील किल्लेदारी मानाजी आंग्र्यांच्या वशिल्यानें संपादन करावयाची असल्यानें मानाजीचें प्रिय करण्यासाठीं तो हे लांडे कारभार करीत होता.

हा सारा प्रकार नऊ दहा वर्षांपूर्वीचा होता. एवढया काळांत महाराष्ट्राच्या राजकारणांत अश्रुतपूर्व घडामोडी घडून आल्या. कान्होजी आंग्रे पूर्वी वर्णिलेला प्रकार घडल्यानंतर तीन चार वर्षांनीं वारला, व त्याच्या पश्चात् त्याचा थोरला मुलगा सखोजी आंग्रे हा छत्रपति शाहू महाराजांच्या आज्ञेनें सरखेलीच्या पदावर आरूढ झाला. ¶ तोही पित्याप्रमाणें कर्तबगार व पित्याहून न्यायी असल्यानें त्याच्या कारकीर्दींतही मानाजीला मनाजोगा गोंधळ उघडपणें घालावयाला अवसर मिळेना. मानाजीनें तसा गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला; पण सखोजीनें तो चालूं दिला नाहीं. बरें; जनताही सारी सखोजीलाच अनुकूल असल्यामुळें उघड उघड सखोजीच्या विरुद्ध जाण्याची मानाजीची छाती नव्हती. पण परमेश्वराची इच्छा आंग्र्यांच्या मान-धन वैभवाला उतरती कळा लागावी अशी असल्यामुळें कीं काय, सखोजी आंग्रे इंग्रज व सिद्दी यांच्याशीं झगडतां झगडतां अपघातानें मरण पावला. त्यानंतर सरखेलीच्या पदासाठीं कान्होजी आंग्र्यांच्या मुलांत कशी भाऊबंदकी माजली व त्या भाऊबंदकीला तात्पुरता आळा घालण्यासाठीं बाजीराव पेशव्यांनीं मध्यस्थी करून काय उपाययोजना केली, याचें दिग्दर्शन विषयप्रवेशांत करण्यांत आलेंच आहे त्या योजनेंत मानाजीला पेशव्यांची फूस मिळतांच त्याला अरेरावी गाजविण्याला भरपूर अवसर सांपडला, तेव्हांच मानाजीचा अपमान खाशाबाकडून

¶ कान्होजी आंग्रे जून इ सन १७२९मध्यें मृत्यु पावले; ता. २१।७।२९रोजीं त्याचा वडील मुलगा सखोजी ( यालाच सेखोजी असें म्हणत ) याला सरखेलीचीं वस्त्रें शाहूमहाराजांकडून मिळालीं.

झालेला वाचकांना स्मरत असेलच. खाशाबा सुर्व्याला पूर्वोक्त विजयादशमीच्या दिवशीं देवीच्या देवालयांतील अपशकुनाची प्रचीति पटल्याचें निवेदन जें पुढें करण्यांत यावयाचें आहे, त्याच्या मुळाशींही मानाजीचा दीर्घद्वेष होता, एवढें तूर्त सांगितलें म्हणजे पुरे.

देवीची पंचारती पडली, त्या अपशकुनाच्या क्लेशनिवारणासाठीं काय उपाय-योजना करावी, याविषयीं गांवच्या चार प्रतिष्ठित मानकऱ्यांना जवळ घेऊन खाशाबानें विचारविनिमय केला, व सर्वानुमतें देवालयांत एक उदक शांतिकरून पंचारती पावन करून घ्यावी असें ठरलें. ही उपाययोजना ताबडतोब व्हावी असेंही तेव्हां ठरविण्यांत आलें. कारण एरव्हीं देवीचा कोपानल केव्हां भडकेल, त्यांतून कोणतें अरिष्ट निर्माण होईल, त्यांत गांवाची कशी वाट लागेल, याविषयीं भाविक गांव-कऱ्यांना कांहींच भरंवसा वाटत नव्हता. त्यांनीं त्याचदिवशीं देवीला कौल लावून शांति करण्याबद्दल देवीची परवानगी मांगितली, व देवीनें हां हां म्हणतां उजवा कौल देऊन तशी परवानगी दिलीही. अशाप्रकारें देवीच्या कृपाछत्राखालीं गांवाचें रक्षण होईल अशी श्रद्धाळु गांवकऱ्यांची खात्री होऊन ते निश्चित झाले. पण खाशाबाचें स्वतःच्या सुरक्षितपणाविषयीं तेवढ्यानें समाधान होईना. तें समाधान न होण्याला एक कारण असें होतें कीं, आज बरींच वर्षे म्हणजे यशोदा परागंदा झाल्यापासून खाशाबाचें गृहस्वास्थ्य बिघडलें होतें, व खाशाबानें त्याबद्दल वारंवार देवीपाशीं कौल लावून किंवा देवीच्या अवसरासमोर गाऱ्हाणें जाऊन दाद मागण्या-चा प्रयत्न केला असतां, देवीनें त्याचें समाधान होईल असा कौल अथवा जबाब आजवर मुळींच दिला नव्हता. त्यामुळें पोळलेल्या खाशाबाच्या मनावर आजच्या अपशकुनाची असह्य डागणी बसली. त्यानें आपल्या वेड्या मनाच्या समाधाना-साठीं आज पुन्हा देवीला कौल लावून तिचें कृपाछत्र आपल्या मस्तकीं असण्या-बद्दल याचना केली; पण पुन्हा कौल डावाच मिळाला ! आणि त्याच दिवशीं सायंकाळीं शिलंगणाचा टोलेजंग समारंभ आटोपल्यावर खाशाबा देवीला सोनें वाहून कोटांत जाण्यासाठीं देवालयाबाहेर पडतो, तोंच कोटावरच्या एका शिपायानें घाबऱ्याघुबऱ्या धावत येऊन वर्दी दिली, “ सरकार ! कोटाला वेढा पडला ! ”

## प्रकरण दुसरें

# अपशकुनाचा पडताळा

कोटाला वेढा पडल्याची बातमी ऐकतांच खाशाबाची कंबर एकदम खचल्या-सारखी झाली. त्यानें शिपायाला विचारलें, "वेढा कोणाचा पडला? सावंतांचा कीं काय?"

वाडीकर सावंतांची तेव्हां कोंकणप्रांतीं ठिकठिकाणीं बरीच बंडाळी चाले. खाशाबाला प्रथम त्यांचाच संशय आला. याचें कारण एरव्हीं कोणीही परका अरेराव त्या सुमाराला मुलुखाच्या इतक्या आंत शिरून बंडाळी माजविणारा नव्हताच, व सावंतांविषयीं ओरड बरीच झाली होती. त्यांच्याविरुद्ध शाहूमहाराज व आंग्रे यांच्याकडे अनेकांनीं तक्रारी केल्या होत्या व शाहूमहाराजांनीं त्यांना कोंकणांत बंडबंडाळी न करण्याबद्दल ताकीदही दिली होती हें सारें खरें;[‡] तरीही सावंतांविषयीं बेभरंवसा बाळगण्याला कारणें होतीं.

पण खाशाबाच्या प्रश्नावर त्या शिपायाकडून नकारात्मक उत्तर मिळालें.

"तर मग वेढा कोणाचा पडला?" खाशाबानें विचारलें.

"धन्याचा!" शिपाई उत्तरला, "सरकार, कोटांतील कोणाही माणसाला दिवेलावणीपासून खंदकाबाहेर यावयाला किंवा बाहेरील माणसाला खंदक ओलांडून कोटांत जावयाला मोकळीक नाहीं. सारे चौकी-पहारे धन्यांनीं आपल्या ताब्यांत घेतले आहेत, व आपणाला कैद करण्याविषयीं हुकूम सुटला आहे."

धन्याचा वेढा पडला असें शिपायानें सांगितलें तरी खाशाबाची कांहींच समजूत पटेना. तो संभाजी आंग्र्यांच्या बाजूचा होता. त्याच्या दृष्टीनें पूर्वीपासून आणि नवदऱ्याच्या तहापासूनही त्याचे प्रत्यक्ष धनी संभाजी आंग्रे होते, आणि संभाजी आंग्र्याशीं तर खाशाबाचें सख्य होतें. अर्थात् खाशाबाला संभाजीची धास्ती मुळींच नव्हती. पण फितुरांच्या फितुरीचे दुष्परिणाम त्याला यापूर्वी अनेकवार भोगावे लागल्यामुळें त्याला तोही भरंवसा वाटेना. त्यानें शिपायाला पुन्हा विचारलें, "कोणत्या धन्याचा वेढा पडला?"

---

‡ संभाजीला उपसर्ग न करण्याविषयीं शाहूमहाराजांनीं वाडीकर फोंड सावंताला ता. १४।१।३४ रोजीं आज्ञापत्र पाठविलें होतें. (शाहूमहाराजांची रोजनिशी.)

शिपाई उत्तरला, "तें कांहीं मला माहीत नाहीं सरकार! पण थोड्या वेळापूर्वी कोणी एक चाळिशीच्या उमरीचा ब्राह्मण अधिकारी कोटांत आला, तो प्रथम बाबांची चौकशी करावयाला लागला. बाबा कोटांतच होते, ते लगेच त्या अधिकाऱ्याला सामोरे आले. थोडा वेळ त्या दोघांचे कांहीं खलबत झालें. तेवढ्यांत सुमारें पन्नास मराठा सैनिकांची एक तुकडी खंदक ओलांडून कोटांत आली.—"

"बाबांनीं त्या सैनिकांना प्रतिबंध केला नाहीं ?"

"छे! बाबांनींच तर त्या तुकडीला कोटाच्या मागच्या बाजूनें खंदकावर शिडी टाकवून कोटांत आणलें!"

"आणि पुढें ?"

"बाबा त्या अधिकाऱ्याला व त्या शिपायांच्या तुकडीला बरोबर घेऊन प्रत्येक चौकीपहाऱ्यावर गेले, व चौक्या त्या नव्या शिपायांच्या स्वाधीन करण्याचा हुकूम चौकीदारांना केला. आणखी थोड्या वेळानें पहातों, तों कोटासभोंवार खंदकाच्या बाहेरून शिपायांचा चांगलाच गराडा पडला!"

"बरें; पुढें काय झालें ?"

"लगेच बाबांनीं मला बोलावून सांगितलें, 'तूं देवळाकडे जाऊन खाशाबांना सांग कीं, धन्यांनीं कोट आपल्या ताब्यांत घेतला असून तुम्हांला कैद करून नेण्याचा त्यांचा इरादा दिसतो. प्रसंग मोठा कठीण आहे. अशा वेळीं दंगाधोपा करण्यांत अर्थ नाहीं. तुम्ही मुकाट्यानें धन्यांच्या स्वाधीन झाल्यास पुढें मागें धनी तुमच्यावर दया दाखवूं शकतील; सामोपचारानें असें न केल्यास ते तुम्हांला कैद तर करतीलच; पण मग कोणती कठोर शिक्षा तुमच्या वांट्याला येईल याचा नेम नाहीं'. हा बाबांचा निरोप आपणाला कळविण्यासाठीं मी धावत इकडे आलों. येतांना नव्या चौकीवाल्यानें माझ्या हातांतील तरवारही काढून घेतली."

खाशाबाला हा प्रकार ऐकून फार अचंबा वाटला. बाबा हा त्याचा मोठा मेहुणा–दुसऱ्या बायकोचा वडील भाऊ—संताजी गुजर होय. पण किल्लेदाराचा मेहुणा म्हणून त्याला सर्व लोक बहुमानानें बाबा असें संबोधीत. खाशाबाचें दुसरें लग्न झाल्यावर थोड्याच दिवसांत आपल्या बहिणीच्या घरीं पाहुणचारासाठीं म्हणून संताजी जो आला तो तेथेंच कायमचा तळ देऊन राहिला, हें वाचकांना पूर्वीं माहीत झालें आहेच. तो जात्याच हुषार व पाताळयंत्री असल्याने त्यानें हां हां म्हणतां सर्वत्र आपली छाप बसविली व खाशाबालाही आपल्या ताटाखालील



२९६.३२

मांजर बनवून सोडलें. खाशाबाच्या वशिल्यानें त्याला तेथली मामलेदारीही मिळाली. आणखी कांहीं दिवसांनीं तर खाशाबाचें संताजीवांचून पानदेखील हलेनासें झालें. खाशाबा नुसता नांवाचा किल्लेदार; पण न्यायमनसुबा सारा संताजीच्या मर्जीनुरूप चालावयाचा; असा परिपाठ पडून गेला. ह्या थोरपणाच्या नांवाखालीं संताजी नेहमीं लांचलुचपतीचे प्रकार करूं लागला; त्यामुळें त्यानें थोड्याच दिवसांत अलोट संपत्ति मिळविली. अशा लांचलुचपतीच्या प्रकारांबद्दल व बेदादी-बद्दल वारंवार आंग्रे व शाहू छत्रपति यांच्याकडे रयत तक्रारी करी. पण त्या तक्रारींची समाधानकारक दाद सहसा कधींच लागत नसे. याचें कारण राज्य जातें कीं रहातें असल्या प्रबळ संकटाशीं झगडण्यांत शाहूमहाराज काय, पेशवे काय किंवा आंग्रे काय, अष्टौप्रहर गढून गेलेले, त्यांच्यावरील पर्वतप्राय संकटाशीं तुलना करतां एखाद्या लहानशा सुभ्यांतील मूठभर रयतेच्या तक्रारी ह्या अगदींच सामान्यशा ठरत. पण न जाणो, शाहूमहाराज किंवा आंग्रे यांनीं त्या तक्रारी आतां मनावर घेण्याचें योजिलें असेल किंवा गांवांतील इतर हक्कदार सरकारांनीं कांहीं तरी कुरापत काढून कोट बळकावयाचें मनावर घेतलें असेल, अशी एक शंका खाशाबाच्या मनांत तेव्हांच आली. पण हा वेढा कोणींही दिला असला तरी वेढ्याचा ब्राह्मण अधिकारी कोण असावा याविषयीं खाशाबाला कांहीं कल्पना करतां येईना, व स्वतःचा मेहुणा त्या कोणा अधिकाऱ्याला कोट सर करण्याच्या कामीं सामील झाला हें ऐकून तर त्याची मति अगदीं गुंग होऊन गेली.

" माझ्या गैरहजेरींत कोट भलत्या माणसाच्या स्वाधीन करणारा हा बात्रा कोण ? " असा स्वतःला प्रश्न करीत खाशाबा तसाच तडक देवालयांत गेला, व ह्या संकटांतून आपला बचाव करण्यासाठीं त्यानें मनःपूर्वक डोळे मिटून देवीची प्रार्थना केली. पण काय चमत्कार ! प्रार्थना करून खाशाबा डोळे उघडून पाहतो तों त्याला देवीची मूर्ति इतकी उग्र दिसली कीं, त्याला तिच्या चर्येकडे पाहवेना ! असें उग्र स्वरूप देवीनें धारण केलेलें त्यानें यापूर्वीं एकदोन वेळां पाहिलें होतें, व त्यानंतर लौकरच गांवावर परचक्र कोसळल्याचे दाखले त्याला माहीत होते. त्यावरून आज देवीचें उग्र स्वरूप पाहून तो मनांत अगदीं चक्काचूर होऊन गेला, व देवीचा कोप झाला आहे त्याअर्थीं ह्या संकटांत माझा सर्वनाश होणार हें तर उघड दिसतेंच आहे. पण मरावयाचेंच तर मी वाघासारखा मरेन, शेळीमेंढीसारखा मरणार नाहीं ! असें स्वतःशीं तो पुटपुटत देवालयाबाहेर पडून कोटाकडे निघाला. जातांना त्याच्या

डोक्यांत जी एक अत्यंत तापदायक स्मृति घोळत होती ती ही कीं, 'आपल्या विश्वासांतील आपला मेहुणाच शत्रूला सामील झाला कीं काय ?'

खाशाबा नुसती चिंता करूनच थांबला नाहीं; त्यानें देवाच्या नगारेवाल्याला एकदम नौबत वाजविण्याला सांगितलें. अवेळीं व एका विशिष्ट पद्धतीनें नौबत वाजली कीं ती दरोडा अथवा स्वारी अशा परचक्राची इषारत होय, हें गांवच्या सर्व लोकांना माहीत झालें होतें. त्या लोकांच्या कानीं ती नौबत पडतांच लोक सावध झाले; पण ते घरेंदारें काळजीपूर्वक बंद करून बंदोबस्तानें रहाण्यापुरते. आज येथें तेवढ्यानें कार्यभाग उरकण्याजोगा नव्हता. कोटांतील सैन्य लढण्याच्या कामीं कितपत आपल्या उपयोगाला येईल याची खाशाबाला शंका असल्यामुळें त्याला त्या घटकेला मुख्यतः लढवय्या लोकांचें पाठबळ पाहिजे होतें. गांवांत त्यानें बरीच लोकप्रियता संपादन केली होती; त्या काळीं निधड्या छातीच्या रणमर्दांची महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत देखील वाण नव्हती; व रयतेच्या हातीं शस्त्रें असल्यानें रयतेच्याच हितसंरक्षणाला धोका पोंचण्याचा संभव असतो इतका दूरदर्शीपणाचा विचारही तेव्हांच्या सरकारांना सुचला नव्हता; त्यामुळें जरूर तेवढें मनुष्यबळ आपणाला म्हटल्या घटकेला मिळूं शकेल याविषयीं खाशाबाला खात्री वाटत होती, म्हणून त्यानें नौबतीबरोबर गांवांतील प्रत्येक वार्डांतून तशा अर्थाची दवंडी पिटविली.

त्या दवंडीला मान देऊन लोक लढण्याच्या तयारीनें घराबाहेर पडले असते; नाहीं असें नाहीं. पण ती नौबत व दवंडी लोकांच्या कानीं जाण्यापूर्वीच धनी किल्लेदारापासून कोट आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं आला आहे, व देवी किल्लेदारावर कोपली आहे, ह्या दोन वार्ता वाऱ्याप्रमाणें सर्वत्र पसरल्याकारणानें अशा वेळीं किल्लेदाराची बाजू संभाळण्यासाठीं पुढें जाणें म्हणजे देवी व सरकार ह्या दोन्ही प्रचंड शक्तींशीं द्रोह करणें होय, असें मानून कोणीही गांवकरी खाशाबाच्या दवंडीला धावून आला नाहीं. खाशाबा कांहीं वेळ देवालयाच्या भव्य पटांगणांत तिष्ठत उभा राहिला, व आतां काय करावें हेंच त्याला सुचेनासें झालें, तोंच कोटाकडून देवालयाकडे येण्याच्या राजमार्गावर त्याला लख्ख उजेड दिसला. थोड्याच वेळांत तो उजेड अधिक स्पष्ट दिसूं लागला. तेव्हां तो मशालींचा व हिलालांचा उजेड आहे व त्या उजेडांत सुमारें शंभर सशस्त्र लोकांचा घोळका देवालयाच्या रोखानें चालून येत आहे असें त्याला दिसून आलें.

आणखी थोड्या वेळांत ते सुमारें पन्नास लोक देवालयाच्या पटांगणांत खाशाबा उभा होता तेथवर येऊन पोंचले. ते सर्वजण लढाऊ सैनिक असून त्यांच्या अग्रभागीं एक पगडी धारण केलेला चाळिशीच्या घरांतील ब्राह्मण आणि त्या ब्राह्मणाच्या बरोबरीनें संताजी असे दोघेजण चालत होते.

खाशाबानें तो देखावा पाहून मनांतल्या मनांत हळहळत उद्गार काढले, "आतां बहुधा आपला कारभार आटोपला."

संताजीनें खाशाबाला बाजूला घेऊन पूर्वी शिपायाजवळ सांगितलेल्या निरोपाचीच पुनरावृत्ति केली.

"पण हे धनी धनी म्हणजे कोण?" खाशाबानें संताजीला विचारलें.

"हे धनी कोण? किल्लेदार! तुम्हीं ज्यांना राजगडावर भर दरबारांत मुजरा देखील करण्याचें बेदरकारपणें नाकारलें, तेच मानाजी आंग्रे 'वजारतमाब' तुमचे आजचे धनी आहेत; व मी तेव्हांच्या तुमच्या बेदरकारपणाला साक्षी असलेला त्या धन्याचा सध्यांचा कारभारी रामाजीपंत बिवलकर‡ आहे. काय समजलां?"

यावरून वाचकांना कळून आलेंच असेल कीं, कोट ताब्यांत घेण्यासाठीं आलेला ब्राह्मण अधिकारी रामाजीपंत बिवलकर हा होय. त्यानें इतका खुलासा केल्यावर खाशाबाला त्याची ओळख पटावयाला अवधि लागला नाहीं. खाशाबा म्हणाला, "मी सारें समजलों. पण नवदऱ्याच्या तहापासून हा मुलूख सर्वस्वीं संभाजी सरखेलांच्या अमलांत आहे. मानाजी आंग्र्यांना सरखेलांच्या दौलतीचा धनी कोणीं केलें?"

"त्यांना कोणीं कशाला धनी करावयाला हवें? देवाला जन्म कोणीं द्यावा लागतो का? सूर्याला प्रकाश उसना आणावा लागतो का? किल्लेदार! असें पहा, असले आडमुठेपणाचे प्रश्न आतां नकोत. तुम्हांला राजगडावर निरोप देतांना मीं काय सांगितले होतें तें आठवा पाहूं! आतां तरी एवढा शहाणपणा करा, कोट तर माझ्या स्वाधीन झालाच आहे, आतां बऱ्या बोलानें माझ्या स्वाधीन व्हा. मानाजीरावांच्या हुकुमानें मी तुम्हांला कैद करण्यासाठीं आज येथें आलों आहें."

‡ रामाजी महादेव बिवलकर हा मद्दा दीर्घसूत्री गृहस्थ पेशव्यांचा कोंकणांतील सरसुभेदार असून नानासाहेबांच्या अत्यंत विश्वासांतला होता. तीसचाळीस वर्षेपर्यंत कोंकणच्या कारभाराचीं एकूण एक सूत्रें व छिद्रें त्यास अवगत झालीं होतीं. अलिबागेस पुढें आंग्र्यांचे दिवाण म्हणून जे बिवलकर झाले, त्यांचा व

"मला आणि तुम्ही कैद करणार ? ह्या कोटाशीं पेशव्यांचा तरी काय संबंध ?" खाशाबानें प्रश्न केला.

"पेशवे हे छत्रपतींचे सर्वाधिकारी आहेत; पेशव्यांनीं आंग्र्यांच्या घरगुती भांडणतंट्यांत मानाजीरावांचा न्याय्य पक्ष स्वीकारला आहे; आणि आंग्रे हे छत्रपतींचे सेवक आहेत."

"पण मी सखोजी सरखेलांच्या पश्चात् संभाजी सरखेलांची सत्ता तेवढी मानतों. ते माझे धनी. त्यांचा कोणताही हुकूम मला शिरसामान्य आहे. याहीपेक्षां स्पष्ट बोलायचें तर मी आंग्र्यांच्या दौलतीचा चाकर असून त्या दौलतीची आबादीआबाद राखण्याला मी बांधलेला आहें; पण म्हणून कांहीं मी आंग्र्यांच्या रांडापोरांच्या गैरवांका हुकमतींत वागावें असें नाहीं."

---

रामाजी महादेवाचा कांहीं संबंध नाहीं. साष्टी, वसई, ठाणें व कुलाबा हे प्रांत रामाजीच्या हद्दींतले असून त्याचें वास्तव्य कल्याणास होतें. अद्यापि ह्या घराण्याचा वाडा व वंशज कल्याणास आहेत. ठाणें येथील कौपिनेश्वराचें देवालय रामाजीनें बांधलें. हल्लींचें ठाण्याचें जज्ज कोर्ट हाही रामाजीचाच वाडा होता. तुळाजी आंग्र्याविरुद्ध इंग्रजांचें कारस्थान घडवून आणणारा हा रामाजी महादेव होय. बहुधा याचें व तुळाजीचें प्रत्यक्ष वांकडें असावें. रामाजीच्या ठिकाणीं जास्त उदारबुद्धीचा व दूरदृष्टीचा मनुष्य कोंकणचे कारभारावर असता, तर कदाचित् या आंग्र्यांचे प्रकरणाचा निकाल अन्य तऱ्हेनें लागला असता. मराठ्यांचे कारभारांत आपला हात शिरकविण्यास इंग्रज उत्सुक होते; आणि ह्या रामाजीपंतास त्यांनीं वश करून आंग्र्यांचें आरमार नाहींसें करण्याचा आपला फार दिवसांचा उद्देश अल्पावधींत सिद्धीस नेला."—(मराठी रियासत, मध्यविभाग २) याशिवाय 'Forrest's Maratha Series'मधील कागदपत्रांवरूनही ह्या पाताळयंत्री माणसाच्या फितुरी काव्यावर चांगला प्रकाश पडतो. हा पेशव्यांचा कोंकणचा सर सुभेदार कधीं झाला हें जरी नक्की कळत नाहीं, तरी तो नानासाहेबांच्या कारकीर्दींत (१७४०–१७६१) एक मुरलेला राजकारणी व कुटिलनीतिज्ञ माणूस म्हणून गाजत होता. अर्थात् त्याचा बाजिरावाच्या कारकीर्दींतही शिरकाव होता, व तेव्हांपासून पेशव्यांच्या वतीनें भानगडी करून त्यांचें हित साधण्याचा बरावाईट प्रयत्न त्यानें केला. त्या त्याच्या प्रयत्नांमुळेंच त्याला नानासाहेब पेशव्यांचा मनकवडा बनतां आलें हें ओघानेंच सिद्ध होतें.

मानाजी हा कान्होजी आंग्र्यांचा दासीपुत्र; त्याला अनुलक्षून हा टोमणा आहे हें रामाजीपंत व संताजी ह्या दोघांनींही ओळखलें. रामाजीपंत चिडून म्हणाला, "असें पहा किल्लेदार! माणसानें जीभ सैल सोडली कीं ती ज्याची त्याला मारक होते. तुम्ही आतां मानाजीरावांच्या जातकुळीवर शिंतोडे उडविले; पण ते तुम्हांला दोघांनाही ढळढळां रडून आपल्या आंसवांनीं धुवून काढावे लागतील, याद राखून ठेवा."

"तें कांहींही झालें तरी चालेल; पण मीं माझ्या हातानें माझ्या धन्याची दौलत धन्याच्या बंडखोर रांडलेकांच्या घशांत लोटण्याला कारणीभूत होणार नाहीं—"

"पुन्हा तेंच! किल्लेदार! पुन्हा तुम्ही मानाजीरावांचा अपमान करीत आहां. छत्रपतींचे मुखत्यार पेशवे, यांचा वकील व मानाजीरावांचा प्रतिनिधि या दुहेरी तिहेरी नात्यानें मी तुम्हांला बजावतों—"

"गप्प बसा! छत्रपतींचे चरण मला केव्हांही वंद्य आहेत, व छत्रपतींनीं संभाजी सरखेल हेच आंग्र्यांच्या दौलतीचे आणि मानमरातबांचे वारस असल्याचें केव्हांच आपल्या शिक्कामोर्तबानिशीं मान्य केलें असून तसें छत्रपतींचें आज्ञापत्रही मला आलें आहे कोल्हापुरकर छत्रपतींचेंही तशाच अर्थाचें आज्ञापत्र मला आहे. त्या आज्ञापत्राला हरताळ फांसण्याची मुखत्यारी जर पेशवे गाजवीत असतील, तर मी साफ सांगतों, मी पेशव्यांचाही मुलाहिजा राखावयाला तयार नाहीं."

संताजी इतका वेळ अगदीं स्तब्ध होता. त्यानें आतां मध्यें तोंड घातलें, "खाशाबा! रागाच्या भरांत असें भलतेंच कांहीं तरी बोलूं नये. अशानें तुम्ही खाल्ल्या घराचे वांसे मोजल्याच्या आरोपाचे धनी व्हाल. पेशव्यांनीं आपला शब्द आंग्र्यांपाशीं खर्च केला, म्हणूनच तुम्हांला हे दिवस दिसत आहेत."

"आणि आजवर तुम्ही तुमच्या महालाचा कारभार अंदाधुंदीनें चालविला असतां लांचलुचपतीसारख्या अन्यायांची तुमच्या कारभारांत परमावधि झाली असतां देखील आंग्रे तुमची गय करीत आले, तें तुम्ही पेशव्यांच्या वशिल्याचें तट्टू म्हणून. पण त्या उपकाराची तुम्हांला जाणीव नाहीं." रामाजीपंत म्हणाला.

"खबरदार!" खाशाबा आपली तरवार म्यानांतून सर्रकन् बाहेर काढून रामाजीपंतावर धावून जाऊन गर्जत म्हणाला, "तुम्ही कोणीही असा, माझ्यावर जर सैल जिभेनें असले भलभलते आरोप कराल, तर ती जीभ ह्या तरवारीनें

मुळापासून छाटली जाईल; याद राखा ! जोंवर तुम्ही रीतीच्या रीतीनें बोललां, तोंवर मींही रीतीनें उत्तर दिलें कीं, मी मानाजी आंग्र्यांना ओळखीत नाहीं. हां, तुम्ही आमच्या खऱ्या धन्याचें आज्ञापत्र आणा, मग कोटाचा कारभारचसा काय, त्यांनीं मला माझी गर्दन उतरून तुमच्या स्वाधीन करावयाला आज्ञा केली असली तर त्या आज्ञेची देखील तामिली करण्याला मी मागेंपुढें पहाणार नाहीं. तुम्हीं विचारलेल्या प्रश्नाचा असा निकाल लागल्यावर बाकी काय राहिलें ?"

"अशानें ह्या प्रश्नाचा निकाल थोडाच लागणार आहे ?" रामाजीपंतानें आपल्या बरोबरच्या सैनिकांना डोळ्यानें खूण करीत म्हटलें, "हा असा निकाल ह्या प्रश्नाचा लागावयाचा." सशस्त्र सैनिकांचा गराडा खाशाबासभोंवार पडला-व आतां त्याचा वार होण्याचें भय नाहीं अशी खात्री होतांच त्यानें आढ्यतेनें खाशाबाकडे पाहून मान तुकवीत म्हटलें, "किल्लेदार ! आतां तुम्ही माझे कैदी झालां, एवढ्यापुरता हा प्रश्न मिटला. आतां तुम्ही बऱ्या बोलानें शस्त्र खालीं ठेवून आमच्या स्वाधीन होणार, कीं आपली आणखी शोभा करून घेणार ?"

संताजी शिष्टपणाचा आव आणून म्हणाला, "खाशाबा ! आतां तरी अति, प्रसंगाची पाळी आणूं नका. हात दगडाखालीं सांपडला आहे खरा; आतां तो हलके हलके साडवून घेतला पाहिजे."

"नाहीं ! नाहीं ! मी मरेन पण अशा अरेरावीसमोर मान वांकविणार नाहीं." खाशाबा वेडरपणानें गर्जून म्हणाला.

संताजी हंसून म्हणाला, "वेडे कसे तुम्ही ! मान वांकविण्याचें आतां काय बाकी राहिलें आहे ? कोट केव्हांच यांच्या स्वाधीन झाला !"

"आणि माझे सैनिक—"

"ते तुमचे सैनिक नाहींत, ते धन्याचे सैनिक. धन्याची आज्ञा त्यांनीं पाळली, धन्याच्या आज्ञेनें तुम्ही किल्लेदारीच्या कामावरून दूर झालां; आतां तुमची हुकमत इथें कशी चालणार ?" संताजी म्हणाला.

"पण तूं कोटांत होतास ! तूं काय बांगड्या भरल्या आहेस ? फितूर झाला ही रडकथा गात इथें काय उभा राहिलास ? असाच्या असा जा, व आपल्या लोकांना बरोबर घेऊन छातीचा कोट करून कोटाचें रक्षण करण्यासाठीं ह्या शत्रूंसमोर उभा रहा."

"पण—"

" पण बीण कांहीं नाहीं. माझ्यासाठीं नाहीं तरी तुझ्या वहिणीच्या हितासाठीं तूं या वेळीं माझी पाठ राखली पाहिजे."

" खाशाबा ! मला माझ्या गोतावळ्याच्या हितापेक्षां माझ्या कर्तव्याची किंमत जास्त वाटते."

" मी ह्या कोटाचा किल्लेदार–मी तुझा धनी तुला हुकूम करतों—"

" तो हुकूम मला पाळतां येत नाहीं. धन्याच्याही धन्याचा हुकूम मला धन्याच्या हुकुमापूर्वी शिरसामान्य केला पाहिजे."

" एकूण तूंच शत्रूला फितुर झालास तर ! तूंच आपल्या वहिणीच्या कपाळीचें कुंकू पुसावयाला ईर्षेनें पुढें सरलास ! अहारे नामर्दा !—"

इतक्यांत सभोंवारच्या शिपायांनीं रामाजीपंताच्या अंगुलिनिर्देशानुसार एकदम गिल्ला करून खाशाबाला कैद केलें, व तेथल्या तेथें त्याच्यापायीं सव्वामण वजनानाच्या लोखंडी बेड्या ठोकल्या. खाशाबानें त्यानंतर संताजीला व रामाजीपंतालाही शिव्यांची लाखोली वाहिली, पण पिंजऱ्यांत सांपडलेल्या सिंहाच्यापेक्षां त्या त्याच्या जळफळाटाला जास्त किंमत नव्हती.

त्या रात्रीं आणखी काय काय प्रकार घडले हें विस्तारानें सांगत न बसतां थोडक्यांत त्या खेदकारक प्रसंगाचा समारोप करावयाचा तर दुसऱ्या दिवशीं सूर्योदयापूर्वी त्या गांवांत मानाजी आंग्रे सरखेल यांची सत्ता स्थापन झाल्याची व संताजी तेथला किल्लेदार झाल्याची दवंडी गांवभर पिटविण्यांत आली. खाशाबाला रामाजीपंतानें कैद केलें एवढी बातमीही त्या दिवशीं सर्वांना महशूर झाली; पण त्याला कोठें नेलें किंवा त्याचें पुढें काय होणार, याविषयीं कोणालाच कांहीं कल्पना नव्हती. हा दसऱ्याच्या दिवशीं घडलेल्या अपशकुनाचा दाखला पटला असें म्हणून गांवकरी लोक शांत राहिले; पण मोहरीएवढ्या बीजांत कैक योजनें विस्तारणारा वटवृक्ष झांकलेला असतो, त्याप्रमाणें ह्या लहानशा अनर्थाच्या पोटीं अनेक अनन्वित घटना सामावून राहिल्या असतील, यांची तेव्हां कोणाला काय कल्पना असणार !

## प्रकरण तिसरें

# वादळ

मागील प्रकरणांत वर्णिलेल्या कोटकामतें येथील विस्मयजनक घटकेनंतर सुमारें पांचसहा महिन्यांनीं फाल्गुन महिन्यांतील वद्य प्रतिपदेच्या दिवशींची गोष्ट. फाल्गुन महिन्यांत समुद्र सामान्यतः अगदीं शांत असावयाचा, व समुद्राच्या पृष्ठभागावरून समुद्रयानांचें दळणवळण इतस्ततः सुरू असावयाचें. जेथला प्रकार आतां वर्णावयाचा आहे, त्या कुलाबा–अंजनवेल एवढ्या टापूंत तेव्हां सिद्दी व आंग्रे यांच्यांत हातघाईची आरमारी लढाई सुरू असल्यानें तेथल्या व्यापारी व प्रवासी दळणवळणाला आपोआप बराच आळा बसला होता हें खरें; पण उभय पक्षांच्या आरमाराच्या हालचालीनें तो समुद्र व आजूबाजूच्या सर्व मोठया खाड्या नेहमीं गजबजलेल्या असत. ह्या लढाईच्या भीषण स्वरूपांत भीषणतेची आणखी भर घालण्यासाठीं कीं काय, आज अकस्मात् जोराचें वादळ झालें.

पण त्या वादळानें ओढवलेल्या अकल्पित अनर्थाचा खेदजनक वृत्तान्त कथन करण्यापूर्वी त्या अनर्थांचें स्वरूप वाचकांना पूर्णपणें कळण्यासाठीं इतिहासाला साक्ष ठेवून तत्कालिन परिस्थितीचें सिंहावलोकन करणें अवश्य आहे.

बाजीराव पेशव्यांनीं आंग्र्यांची भाऊबंदकी मिटवितांना नवदऱ्याच्या तहाअन्वयें संभाजी व मानाजी ह्या उभयतांनाही अधिकाराच्या व दौलतीच्या कांहीं बाबी तोडून देऊन समेटाची हंडी शिंक्याला चढविली होती. बाजिरावांप्रमाणेंच शाहूमहाराज, छत्रपति–आंग्रे–पेशवे वगैरे सर्वांचे स्फूर्तिदाते गुरु परमहंस ब्रह्मेंद्रस्वामि, श्रीपतराव प्रतिनिधि वगैरे सर्व खाशा मंडळींच्या मनांतून कोणीकडूनही आंग्र्यांचें हित होऊन त्यांच्या हातून परस्पर सिद्दी, इंग्रज, फिरंगी वगैरे राजकारणी बुभुक्षितांचा योग्य बंदोबस्त व्हावा असें होतें. ही मंडळी वारंवार आंग्र्यांची चौकशी करी, तेव्हां प्रथम प्रथम त्यांना सर्वांच्या भलाईच्याच बातम्या ऐकावयाला मिळत व समाधान वाटे.

पण ह्या बाहेरून सुव्यवस्थित दिसणाऱ्या सरखेलीच्या कारभाराला सर्वांची दृष्टि चुकवून मानाजी आंग्रे व रामाजीपंत बिवलकर यांच्या कुटिल कारस्थानांची वाळवी लागली होती. रामाजीपंत हे पेशव्यांच्या कोंकणपट्टींतील हितसंबंधांना

जपणारे असल्यानें अर्थात् त्याच्या शब्दाला आंग्र्यांच्या दरबारीं प्रत्यक्ष पेशव्यांना जितका मान मिळावयाचा, तितका मान स्वाभाविकपणेंच मिळे. संभाजी आंग्रे हा फार शूर, करारी व अंमलाचा कडा होता. इतरांना निष्कारण आपल्या कारभारांत लुडबूड करूं द्यावयाची नाहीं, जिथें तिथें शक्यतों आपली हुकमत गाजवावयाची, असा त्याचा बाणा! तडजोड हा शब्द त्याच्या फारसा परिचयाचा नव्हता. अशा करारी पुरुषाच्या अंगीं हांजीहांजीखोरपणा नसावयाचाच. बरें; पेशव्यांच्या वतीनें संभाजीशीं पेशव्यांच्या गैरहजेरींत त्यांचा कैवारी या नात्यानें ज्याचा संबंध यावयाचा, तो रामाजीपंत जितका चतुर तितकाच पाताळयंत्री होता. चतुर व पाताळयंत्री माणसें मुत्सद्दी म्हणून गाजतात खरीं; पण धडाडीच्या पराक्रमाची त्यांच्या ठायीं बहुधा उणीव असते, व दुसऱ्याचा वरचष्मा त्यांना सहसा सहन होत नाहीं. याशिवाय संभाजी आंग्र्यानें आणखी रामाजीपंताचें काय घोडें मारलें होतें नकळे, कीं त्याला पेशव्यांनीं आखून दिलेलें विशिष्ट धोरण राखावयाचें होतें म्हणून नकळे, त्याचा ओढा मानाजीकडे होता. त्यानें व मानाजीच्या इतर कैवाऱ्यांनीं मिळून मानाजीला पाठबळ दिल्यावर मानाजी कसा चढणार नाहीं!

❧ ❧ ❧

आणखी असें कीं, बाजीराव पेशवे जरी आंग्र्यांची तडजोड करून गेले, तरी तो तह जवळ जवळ 'बोलाचीच कढी बोलाचाच भात' या न्यायाचा होता. इंग्रज व फिरंगी फार दिवसांपासून कोंकणपट्टींत आपला जम बसविण्याच्या खटपटींत होते. पण सिद्दी व आंग्रे यांच्या–विशेषतः आंग्र्यांच्या–जबरदस्त विरोधापुढें त्यांची कांहीं मात्र चालेना. आंग्र्यांच्या घराण्यांतील ही भानगड उपस्थित होण्याच्यापूर्वी शतकाहून जास्त काळ वारंवार आंग्रे व इंग्रज आणि फिरंगी यांचे सामने झाले होते, व त्या सामन्यांत आंग्र्यांनीं त्या दोघांचेही दांत वेळोवेळीं खासे पाडले होते.§ त्या सामन्यांत आंग्र्यांनीं पाडाव केलेलीं कांहीं जहाजें व

§ कान्होजी आंग्र्यानें अगदीं पहिला हल्ला कारवारच्या इंग्लिश फॅक्टरीचा गव्हर्नर मि० काउन (Chwn) आपल्या बायकोसह मुंबईला जात असतां त्याच्या जहाजावर केला. नंतर इ० सन १७१७ मध्यें 'सक्सेस' या नांवाचें मोठें इंग्लिश जहाज कान्होजी आंग्र्यानें धरलें; व इंग्रजांना तेव्हां तो अपमान निमूट-पणें सहन करावा लागला. विजयदुर्ग घेण्याचा प्रयत्न इंग्रजांनीं तेव्हांच केला.

त्या जहाजांवरील कांहीं गोऱ्या कातडीचे कैदी यांच्यावर अजून आंग्र्यांचा ताबा चालत होता; व याशिवाय जहाजें व कैदी सोडण्यासाठीं अनेकवार आंग्र्यांनीं इंग्रज व फिरंगी यांना पैशाची पिशवी रिती करावयाला आणि आपणासमोर मान नमवावयाला लावलें होतें, तें निराळेंच. इंग्रज काय किंवा फिरंगी काय, मोठे धोरणी लोक. आंग्र्यांचा चालता काळ आहे व सर्वजण एकजुटीनें कार्य करीत आहेत तोंवर त्यांच्यासमोर आपला कांहीं पाड लागावयाचा नाहीं, हें ओळखून त्यांनीं बगळ्याप्रमाणें ध्यानाचें साळसूदपणाचें ढोंग पांघरलें होतें; पण भक्ष्य आपल्या आवांक्यांत येतें केव्हां व आपण त्यावर झडप घालतों केव्हां, यापेक्षां त्या ध्यानधारणेचा दुसरा अर्थ नव्हताच. वास्तविक मराठ्यांनीं सिद्दीचें पारिपत्य करण्याची वेळा साधली ती त्यांच्या दृष्टीनें सुवेळाच होती. मराठ्यांची कोंकणांतील मोहीम सुरू झाल्यावर थोड्याच दिवसांत जजिऱ्याचा सज्जन अधिपति सिद्दी रसूल मरण पावला, व त्याच्या मुलांत गादीविषयीं तंटे लागले. शाहू महाराजांच्या वतीनें यशवंत महादेव पोतनीस यानें त्यापूर्वी कोकणांत जाऊन भेदनीतीच्या आधारावर कांहीं सिद्दयांना आपणाकडे वळवून घेऊन त्यांच्या साह्यानें इतर सिद्दींचा मोड करावयाचें कारस्थान रचिलें होतें; व तें कारस्थान चांगलें रंगांत आल्यावरच मराठ्यांनीं ती मोहीम तांतडीनें हातीं घेतली. सिद्दीचा प्रमुख बाटगा सरदार शेख याकूब याला यशवंतरावानें मराठ्यांच्या सर्व आरमाराचें आधिपत्य, सिद्दीच्या सर्व मुलुखाची सुभेदारी, कित्येक किल्ले व इनाम गांवें, त्याप्रमाणेंच पेणपासून कोल्हापूर-पर्यंत तळकोंकणांतील सरगोंडेपणाचा हक्क देण्याचें कबूल करून व त्याशिवाय त्याच्या भावाला रायगडची किल्लेदारी आणि सैन्याला एक लाख रुपये बक्षिसी देण्याचें कबूल करून प्रथम वश करून घेतलें; व त्याच्या वजनानें मरहूम सिद्दी रसूल याचा सर्वांत ज्येष्ठ मुलगा सिद्दी अबदुल्ला यालाही आपल्या बाजूला ओढलें.* सर्व सिद्दी राज्या-

---

तेथेंही कान्होजीनें त्यांना यथास्थित चोप दिला. इ० सन १७२२ त इंग्रजांनीं कुलाब्यावर हल्ला केला; परंतु तेथेही त्यांना विजयदुर्गाचाच अनुभव आला. इ० सन १७२७ मध्यें कान्होजीनें इंग्रजांचें 'डर्बी' या नांवाचें जहाज गारद केलें. असा आंग्र्यांच्या हातून इंग्रजांना वर्षानुवर्षें एकसारखा सिद्दीचें प्रकरण धसाला लागेपावेतों पराजय सहन करावा लागत होता.

* यशवंत महादेवाच्या ह्या कारस्थानाला इतिहासांत फार महत्त्व आहे. पेशव्यांनीं केलेल्या पश्चिमदिग्विजयाचें रहस्य ह्या कारस्थानांत आहे.

धिकारासाठीं हपापून एकमेकांच्या मानेला डसावयाला टपले होते. त्या खणाखणींत मराठ्यांसारख्या बलिष्ठ साह्यकर्त्यांच्या साह्याशिवाय आपल्याला आपल्या बापाची गादी मिळणें शक्य नाहीं हें ओळखून अबदुल्लानें मराठ्यांशीं दोस्ती केली; पण ही बातमी हां हां म्हणतां बाहेर फुटून इतर सर्व सिद्दी अबदुल्लयावर उलटले व त्यांचा पुढारी सिद्दी संबूल या नांवाचा एक गुलाम यानें इतरांच्या साह्यानें अबदुल्लाला ठार मारून जंजिऱ्याची गादी बळकाविली. त्या गादीवर वारसहक्क सांगणारांपैकीं अबदुल्लाचा मुलगा सिद्दी अबदुल रहिमान हा एक होता. तो बापाच्या वधामुळें चिडून उघडपणें शेख याकूब याच्या मध्यस्थीनें मराठ्यांना–पेशव्यांना सामील झाला. शाहूमहाराजांनीं ही वेळ साधण्यासाठीं मुद्दाम बाजीराव पेशव्यांना तांतडीनें उत्तरेकडून बोलावून कोंकणांतील मोहिमेचें आधिपत्य स्वीकारण्याला आज्ञा केली, व फत्तेसिंग भोंसले, प्रतिनिधि वगैरे पदरच्या इतर मातबर लोकांना पेशव्यांच्या दिमतीला दिलें. तेव्हां ती मोहीम इतकी रंगली.

बाजीराव पेशव्यांची घेडाडी विलक्षणच! सूर्याच्या सप्ताश्व रथासारखी त्यांची धांव जबरदस्त! शिवाय सिद्दीकडून मानखंडित झालेल्या ब्रह्मेंद्रस्वामींचीही त्यांना सिद्दीचें निमूल पारिपत्य करण्याविषयींची निर्वाणीची आज्ञा झालेली! त्यांनीं कोंकणांत उतरतांच चोहोंकडून सिद्दीच्या मुलुखावर चढाई करून सिद्दीनें फार दिवसांपूर्वीं बळकावलेला मराठ्यांचा मुलूख व गडकोट काबीज करण्याचा सपाटा चालविला. आंग्र्यांनींही बाजीरावाला त्या पवित्र देशकार्यांत मनःपूर्वक साह्य केलें; पण मराठ-मंडळांतील दुर्दमनीय अहमहमिका व परोत्कर्षासहिष्णुता त्यांची त्यांनाच त्या वेळीं नडली. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं; प्रतिनिधींच्यानें मोहिमेचा कार्यभाग होईना म्हणून पेशवे वगैरे मंडळीला शाहूमहाराजांनीं पाठविलें. हा आपला अपमान झाला असें मानून व जुन्या उखाळ्यापाखाळ्या आठवून प्रतिनिधि पेशव्यांशीं एक विचारानें वागण्याला राजी होईनात; प्रतिनिधींशीं आंग्र्यांकडील पराक्रमी मंडळींचें पटेना, म्हणून ती मंडळी तेढीनें वागूं लागली; सिद्दीनें सुरतेच्या सिद्दीची मदत आणविण्याची तजवीज केली, तेव्हां परस्पर सुरतकरांचा मार्ग अडवून धरण्यासाठीं शाहूमहाराजांनीं दाभाडे व गायकवाड यांना निक्षून आज्ञापत्रें पाठविलीं. तरी बाजिरावांनीं नुकतेंच कांहीं वर्षांपूर्वीं दाभाड्यांचें व तदंगभूत गायकवाडांचें पारिपत्य केलें होतें तो बांक मनांत धरून दाभाडे–गायकवाड गुजराथेंत अगदीं उदासीन राहिले; प्रतिनिधींनीं स्वतः

अदूरदर्शीपणाचें धोरण पत्करून आपलें हंसें करून घेतलें, व मराठमोळ्याच्या पदरीं अपयश बांधलें; यशवंत महादेवानें पूर्वी शेख याकूब याला जीं अघळपघळ वचनें दिलीं होतीं, तीं शेखजीकडून कांहींसा कार्यभाग होतांच पेशव्यांनीं मोडण्याचा उपक्रम केल्यामुळें शेखजी बिथरला; दुष्काळांत तेरावा महिना या न्यायानें त्याच सुमाराला बाजिरावांचा बलशाली पुरस्कर्ता सखोजी आंग्रे अकल्पितपणें मृत्युमुखीं पडला; अशी मराठमोळ्याची घडी पूर्णपणें विस्कळल्यामुळें बाजिरावांनीं कोंकणांत उतरतांच यशवंत महादेवाच्या कारस्थानाला अनुसरून ठायीं ठायीं विजय मिळविण्याची जी घडाडी दाखविली, ती लौकरच थंडावून शत्रूचा कमजोर पक्ष जोरावला. इंग्रज व फिरंगी जे बकध्यान लावून बसले होते, त्यांनीं मराठमोळ्यांतील बजबजपुरी पाहून मराठे व सिद्दी यांच्यांतील झगडयाची संधी साधून त्या बेबनावाच्या अग्नींत तेलाचा शिडकाव करण्याला सुरुवात केली. मराठ्यांची वाढती सत्ता इंग्रज व फिरंगी यांच्या डोळ्यांत कधींपासून सलत आहे हें सिद्दीला माहीत होतेंच. त्यानें मुंबईकर इंग्रजांपाशीं मराठ्यांविरुद्ध मदतीची याचना केली, व त्यांनीं किफायतशीर अटींवर त्याच्याशीं तह करून त्याला भरपूर मदत केली. सुरतेहूनही सिद्दीला मदत येऊं लागली. अशाप्रकारें सिद्दी व मराठशाहीचे इतर परशत्रु यांची जूट झाली, व मराठमोळ्यांत मात्र अंतस्थ फुटा. फुटीची कमाल झाली. तेव्हां पेशव्यांना त्या मोहिमेचीं लक्षणें बरोबर दिसेनात-कोंकणांत नवीन मुलूख कमावण्याचें बाजूलाच राहून कमावलेलाही गमावण्याची वेळ आली. तेव्हां बाजिरावांनीं प्रसंग ओळखून स्वतःकडे मोठेपणा घेऊन 'चोराची लंगोटी' मिळाली तेवढी पदरांत घेऊन सिद्दीशीं कसाबसा तह केला होता, व अशाप्रकारें त्या मोहिमेचा तात्पुरता समारोप झाला होता.

पण तो समारोप अखेर तात्पुरताच ठरला. बाजीराव पेशवे तहानें बांधले गेले तरी आंग्रे व सिद्दी यांचा झगडा तेवढ्यानें मिटला नाहीं. शिवाय बाजिरावांची पाठ फिरतांच पूर्वी नमतेपणानें तह करणारे सिद्दी पुन्हा उलटले. इंग्रज व फिरंगी यांना ह्या कलहापासूनच खरा लाभ व्हावयाचा असल्यानें जो कोणी आपल्या तंत्रानें वागून स्वजनद्रोह व स्वदेशद्रोह अशीं अघोर पापें जोडण्याला तयार असेल त्याला पाठीशीं घालण्याला उत्सुक होतेच. एवढा दातृत्वाचा आव इंग्रज व फिरंगी यांनीं आणतांच त्यांना मानाजी आंग्र्यासारखे भोक्तेही भेटले. संभाजी तिकडे अंजनवेलीकडे मोर्चे लावून गुंतून पडला आहे, अशी संधी साधून त्याच्या

अपरोक्ष मानाजीनें आपल्या हस्तकांकरवीं संभाजीचे कैवारी असे जे जे अधिकारी होते, त्यांना त्यांना दडपशाहीच्या जात्यांत भरडून टाकण्याचा उद्योग जारीनें आरंभिला. त्याचप्रमाणें घरच्या व्यवहारांत आपले भाऊ धोंडजी व तुळाजी यांना आपल्या कटांत सामील करून घेऊन येसाजीला केवळ नामधारी कारभारी करून ठेविलें. एवढेंच काय, पण संभाजीला तांदुळांतील खड्याप्रमाणें वेंचल्या-सारखा दूर फेंकून देऊन स्वतः सर्व सत्ताधारी होण्यासाठीं हळुहळू संभाजीच्या कारभाराविषयीं स्वामी व पेशवे यांच्याकडे गाऱ्हाणीं नेण्याला सुरुवात केली, व फिरंगी आणि इंग्रज यांचीही मदत घेण्याचें ठरविलें. मानाजीच्या ह्या कारवाईला संभाजीच्या ग्रहदशेची जोड मिळून पेशव्यांकडील वातावरण सर्वतोपरी संभाजी-च्या विरुद्ध असें निर्माण झालें अर्थात् मानाजी पेशव्यांना जास्त जवळचा झाला. ह्या सर्व गोष्टी करण्यांत मानाजीला पेशव्यांचा वकील रामाजीपंत याचें मनःपूर्वक साह्य होतें, व मानाजीचा त्याच्यावर अढळ विश्वास होता, हें कोटकामतें येथील किल्ल्यावरील हल्ल्याच्या वृत्तान्तावरून वाचकांना कळून आलेंच आहे.

पण पाप हें केव्हांना केव्हां तरी उजेडांत यावयाचेंच. मानाजी दौलतींत मन-सोक्त धुमाकूळ घालूं लागला व त्याला पेशव्यांचेंही साह्य आहे हा प्रकार संभाजी अंजनवेलीला वेढा देऊन बसला असतां त्याला समजला. त्याबरोबर तो दौलतीची विस्कळित झालेली घडी पुन्हा नीट बसविण्यासाठीं पुन्हा तांतडीनें कुलाब्याला आला. एवढ्या लौकर इतक्या निकराला ह्या गोष्टी येतील अशी मानाजीची कल्पना नसल्याने तो कांहींसा बेसावध होता. संभाजीनें तेथें येतांच मानाजी, धोंडजी व तुळाजी यांना कारभारांतून दूर करून सर्व कारभार पुन्हा येसाजीच्या स्वाधीन केला; व आपला विश्वासू सरदार बांकाजी नाईक महाडिक याला येसाजीच्या दिमतीला ठेविलें. मानाजी आपल्या उभयतां बंधूंसह रातोरात तेथून चौलरेवदंडा येथें पळून आला व तेथून फिरंग्यांच्या साह्यानें संभाजीचा मोड करून कुलाबा जिंकण्याचा उद्योग आरंभिला. या वेळींही संभाजीला सल्लामसलत देण्याला रामाजीपंत तयार होताच. त्याच्या मार्फत संभाजीनें पेशव्यांचें साह्य मागितलें, व आपणाविषयीं पेशव्यांचा जो गैरसमज झाला असेल, तो दूर करण्याची जबाब-दारीची कामगिरीही त्यालाच सांगितली.

मानाजीही इकडे स्वस्थ बसला असें नाहीं. त्यानें दंडेली करून कुलाबा आपल्या ताब्यांत घेतला, येसाजीचे डोळे काढून त्याला कारभारावरून दूर केलें,

धोंडजीचाही चांगलाच पाणउतारा करून त्याला सत्ताहीन बनवून सोडलें, आणि मथुराबाई आंग्रे व संभाजीचा कबिला वगैरे जी मंडळी कुलाब्यांत होती, त्यांना न कळत त्यांच्या सभोंवार नजरकैद निर्माण केली. दरम्यान बाजीराव पेशव्यांनीं साह्यार्थ येण्याचें कबूल केलें व ते यावयाला निघाल्याचीही बातमी येऊन धडकली; त्या धीरावर त्यानें पुन्हा अंजनवेलीवर तुळाजीसह स्वारी केली, व चेऊलकर पोर्तुगीजांच्या साह्यानें अंजनवेल कायम करून सिद्दी साताचें जणुं नाकच कापलें. बाजिरावांनीं येतांच प्रथम मानाजीच्या हस्तें राजमाची, कुलाबा, खांदेरी, कोह्ळा वगैरे कडकोट जिंकवून संभाजीची चांगलीच फजिती केली, व आंग्र्यांच्या दौलतींतून मानाजीला सवता सुभा तोडून देऊन त्याला 'वजारतमाब' हा बहुमानाचा किताब दिला. तो प्रकार विषयप्रवेशांत वर्णन करण्यांत आला आहेच. त्यानंतरही मानाजी संभाजीच्या विजयदुर्ग प्रांतीं कशी दंडेली गाजवीत होता, याचें प्रत्यंतर कोटकामतें येथील विस्मयजनक प्रकारावरून आपणाला पटलेलेंच आहे.

मानाजीचा अशा प्रकारचा उद्योग चालू असतांना सिद्दी सात अगदीं स्वस्थ बसला होता असें मुळींच नाहीं. अंजनवेल हातची गेली, इतर गडकोटही गेले, सिद्दीच्या मुख्य सत्तेचेंही आपणाला पाठबळ नाहीं, असें पाहून सिद्दी संतापानें चिडून जाऊन 'मरेन तरी किंवा राज्य तरी करीन' अशा निग्रहानें आंग्र्यांचा पूर्ण निःपात करण्याच्या हेतूनें कुलाब्याच्या आसमंतांतच जाळपोळ, लूटमार अशा राक्षसी उपायांनीं आपला अंमल बसविण्याचा सपाटा सुरू केला होता. कुलाब्याच्या पूर्वेला कनकेश्वराच्या टेंकडीपलीकडे नागोठण्याच्या खाडीच्या कांठीं असलेला सागरगडचा मजबूत डोंगरी किल्ला जिंकून तेथें आपली राजधानी स्थापन करण्याचा त्याचा बेत होता, व त्या बेतानें त्यानें त्याच टापूंत युद्धप्रसंग आणून विजयश्रीला वरण्याचा निर्धार केला होता.

अशा परिस्थितींत—सिद्दी सात व मानाजी यांची कुलाब्याच्या आसमंतांत आरमारी लढत जुंपून मारे रणकंदन माजून राहिलें असतांना त्या रणकंदनाच्या भीषणतेंत पूर्वोक्त दिवशींच्या वादळाची भर पडली. त्या दिवशीं म्हणजे वादळ होईल असें कोणाच्या ध्यानींमनींही नव्हतें; पण ईश्वरी नेमानेमच तो. एकाएकीं सोसाटयाचा वारा सुटला, समुद्र गर्जूं लागला, त्याच्या जोडीला आकाशांत मेघही अहमहमिकेनें गर्जूं लागले, विजा चमकूं लागल्या व हां हां म्हणतां मध्यरात्रीच्या सुमा

राला आकाशांत अभ्राच्छादनाचें एवढें अवडंबर माजलें कीं, नक्षत्र कसें तें नांवालाही दिसेना, व कोणत्याही नौकेवरचा दिवा वाऱ्यापुढें मुळींच टिकेना. त्या रात्रीं अनेक नौकांना जलसमाधि मिळाली; अनेक नौका मोडक्यातोडक्या किंवा खिळखिळ्या स्वरूपांत कोठें खडकाला तर कोठें किनाऱ्याला लागल्या; व माणसें आणि संपत्ति यांचा किती नाश झाला याचा तर पत्ताच नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत वादळाचा जोर होता. मग मात्र हवा पूर्ववत्‌ झाली, व समुद्रही शांत झाला.

त्या अनर्थांत सांपडलेली एक नौका सूर्यास्ताच्या सुमाराला थळच्या खाडींत किनाऱ्याला येऊन लागली. त्या नौकेवरून एक वीस-एकवीस वर्षांच्या उमरीचा ओंठावर मिसरूड देखील फुटलेली नाहीं असा ऐन ज्वानींतील पाणीदार कोंवळा तरुण किनाऱ्यावर उतरला. ज्या नौकेवरून तो तरुण आला ती नौका अगदीं नादुरुस्त झालेली होती, तसेंच ती वल्हविण्याला त्या तरुणाखेरीज दुसरा कोणीही मनुष्य आंत नव्हता. तो तरुण एकट्यानेंच ती नौका वल्हवून अत्यंत श्रमला असल्या-मुळें, व शिवाय एक पाय नौकेंत आणि दुसरा पाय यमाच्या दरबारांत अशी त्याची त्या वेळची शोचनीय स्थिति असल्यानें नौका प्रत्यक्ष किनाऱ्याला लागेपर्यंत त्याला वर अथवा आजूबाजूला मान वळवून पहावयालाही उसंत मिळाली नव्हती. त्यानेंच पहांटेच्या वेळीं दुसऱ्या एका बुडत असलेल्या नावेवरील दोन माणसांना मोठ्या चतुराईनें वांचविलें होतें, व तीं माणसें दुसऱ्या एका धड नावेंतून त्याच्यापुढें नुकतींच किनाऱ्यावर जाऊन पोहोंचलीं होतीं; तिकडेही त्याचें लक्ष नव्हतें. तात्पर्य, खवळलेल्या समुद्रांतून एखाद्या लांकडी ओंडक्याच्या आश्रयानें, मेलों तर मेलों व जगलों तर जगलों अशा निर्वाणीच्या भावनेनें समुद्रांतून तरंगत येणाऱ्या एखाद्या निराशामग्न माणसापेक्षां कोणत्याही प्रकारें त्या तरुणाची स्थिति कमी केंविलवाणी नव्हती; पण नाव जेव्हां अगदीं किनाऱ्याला येऊन लागली, व आतां आपण शीरसलामत बचावलों असें त्या तरुणाला खात्रीपूर्वक वाटूं लागलें, तेव्हां कोठें त्यानें एक दीर्घ उसासा सोडून वर पाहिलें. त्याच्या दृष्टीच्या रोखावरून त्याला चौबुरुजीवरील निशाण पहावयाचें होतें, हें कोणालाही कळून आलें असतें; पण त्याची दृष्टि वर जातांच त्याला काय वाटलें कोण जाणे, एकदम एखाद्याला खून चढावा किंवा एखाद्याच्या अंगीं पिशाच्चसंचार व्हावा त्याप्रमाणें त्याची अवस्था झाली. त्यानें क्षणकाल खालीं मान घालून दोनतीन उसासे सोडून पुन्हा वर पाहिलें, व लगेच आजूबाजूलाही

नजर फेंकली. पण त्याच्या पूर्वीच्या दृष्टींत व आतांच्या दृष्टींत तेवढ्या कांहीं क्षणांत जमीन अस्मानाचें अंतर पडलें होतें. त्यानें पहांटेच्या वेळीं ज्या दोन माणसांचा जीव वांचविला होता, तो एक चाळिशीच्या उमरीचा निमम्हातारा मराठा व त्याच्याबरोबरची सोळा वर्षें वयाची गोरीपान व तरतरीत देखणी बालिका अशीं दोघें किनाऱ्यावर उतरून नुक्तीच तेथें उभीं राहिलीं होतीं. त्यांचें त्या तरुणाच्या विषण्ण मनःस्थितीकडे तेव्हांच लक्ष वेधलें गेलें; पण त्याला हांक मारण्याचें अथवा त्याची विचारपूस करण्याचें त्या दोघांनाही धाडस होईना. त्यांना त्याच्या त्या विचित्र व अगम्य मनःस्थितीविषयीं विस्मय मात्र वाटला असल्याचें त्याच्या चर्येवरून अगदीं स्पष्ट दिसत होतें. असो; त्या तरुणाला तेव्हां काय वाटलें असावें बरें ?

प्रकरण चवथें

# थळच्या किनाऱ्यावर

थळच्या† किनाऱ्यावर तो तरुण, ती पंधरा वर्षांची तरुणी व तिचा सोबती या तीन माणसांशिवाय आणखीही कांहीं माणसें होतीं. त्यांत पांच लोक जखमी झालेले होते. त्यांनीं त्या तरुणाकडे व त्या तरुणानें त्यांच्याकडे न्याहाळून पाहिलें; पण कोणीच कोणाशीं बोलेना.

“आतां आपण काय करावयाचें?” त्या जखमी लोकांपैकीं एकानें दुसऱ्याला विचारलें.

“आजची रात्र तरी येथें वस्ती करण्याशिवाय गत्यंतर नाहीं.” दुसरा म्हणाला.

“पण हा शत्रूचा गोट आहे; येथें आपली घडगत नाहीं.” त्यापेक्षां सागरगड जवळच आहे, तेथें आपण वस्तीला जावें. म्हणजे आपणाला सिद्दीचीही भीति नाहीं व मानाजीरावांचीही भीति नाहीं.” तिसरा एकजण म्हणाला.

“हा शत्रूचा गोट असला म्हणून काय झालें? गडापेक्षां ही जागा कितीतरी सुरक्षित आहे. आपणाला कोण ओळखणार आहे!”

इतक्यांत दुसऱ्या माणसानें हातानें गप्प रहावयाला खूण केल्यामुळें त्या तिसऱ्या माणसानें आपलें वाक्य अर्धवटच सोडलें. तो दुसरा मनुष्य त्या मनुष्याजवळ जाऊन म्हणाला, “वेड्या! ह्या किल्ल्यावर सध्यां सिद्दीचा अंमल सुरू आहे. तूं मागें येथें नोकरीवर होतास तेव्हांचें सखोजी सरखेलांचें रामराज्य तुला आठवत असेल; पण तें रामराज्य संपून आतां येथें यमराज्य सुरू झालें आहे. बाटग्या

---

† कुलाब्याच्या उत्तरेकडे थळच्या खाडीच्या कांठीं समुद्रकिनाऱ्यापासून पाव मैलाच्या अंतरावर थळचा किल्ला होता, व अजूनही तेथें त्याचा अवशिष्ट भाग पहावयाला सांपडतो. चौबुरुजी किल्ला असल्यानें त्याला चौबुरुजी हें नांव मिळालें. कथानकाच्या काळीं मराठी राज्यांत ह्या चौबुरुजीला महत्त्व होतें. तेव्हां त्याचें वैभवही पहाण्याजोगें होतें. तेव्हांपासून पुढें इंग्रजी अंमलांत सर्वच गडकोटांची आबाळ होऊन ते पडून झडून निकामी झाले आहेत. त्यांतचे आजकाल थळच्या चौबुरुजीची जमा आहे—

शेखजीचा क्रूरकर्मा धाकटा भाऊ यमाजी या नांवानें सर्वांना माहीत आहे. तो आतां येथील किल्लेदार झाला आहे."

"काय म्हणालास ?" त्या किनाऱ्यावरच्या मंडळींत एक कृश झालेला बैरागी होता, तो कचित् लंगडत लंगडत पुढें होऊन एका डोळ्यानें त्या दुसऱ्या माणसाकडे पहात पहात पुढें येऊन म्हणाला, "आहा रे मर्द ! ज्यानें मदांध सिद्दी साताच्या हुकुमावरून त्याची मर्जी संपादन करण्यासाठीं पर्शरामाचें पुरातन देवस्थान उध्वस्त करून तेथल्या देव-ब्राह्मणांची विटंबना केली, हिंदु असून ज्यानें हिंदूच्या ब्रीदाला कालिमा आणली, त्या चांडाळाच्या नरडीचा घोट घेण्यासाठीं उडी घालावयाची सोडून तुम्ही त्याला इतके भितां ! तुम्ही हिंदूच्याच अवलादीचे आहांना रे ?"

वरील जळजळीत प्रश्न विचारणाऱ्या बैराग्याचें वय खरोखर चाळीस वर्षांच्या दरम्यान् होतें; पण काळजी व हाल-अपेष्टा यांनीं कृश झालेले त्याचें शरीर आणि त्याची अव्यवस्थितपणें वाढलेली दाढी यांवरून तो साठीच्या सुमाराचा तरी असावा असा भास होत होता. त्याच्या डाव्या डोळ्याची अगदीं खाच झाली असून त्या ताज्या जखमेवरून थोड्याच दिवसांत कसल्या तरी अपघातानें तो डोळा निकामी झाला असल्याची ओळख पटत होती. तो माणूस डाव्या पायानें किंचित् लंगडत होता. त्याच्या अंगावरील कपडे फाटलेले होते, व बरेच दिवस एखाद्याला अवजड पायबेड्या आणि हातबेड्या घातल्यावर त्याच्या हातापायांना जशा जखमा होतील, तशा जखमा त्याच्या हातापायांना झालेल्या होत्या. तो बैरागी त्या पूर्वोक्त माणसापाशीं चौकशी करतांना सुलतानजीच्या नांवाचा उच्चार करतांच त्वेषानें थूः ! थूः ! करून थुंकला. त्या लोकांना वाटलें कीं, तो कोणीतरी भुकेकंगाल माथेफिरू कांहींतरी बोलतो आहे; म्हणून त्याच्यापैकीं कोणीही त्याच्याशीं बोलावयाला धजेना. उलट ते त्याच्यापासून चार पावलें दूर मात्र सरले.तें पाहून तो बैरागी विषादपूर्वक हंसून म्हणाला, "काय ! तुम्ही माझ्याशीं बोलतदेखील नाहीं ? एका काळीं माझी थुंकी झेलण्यासाठीं तुमचे हात तत्पर असत, त्या तुम्हांला आज माझ्याशीं एक आपुलकीचा शब्द बोलण्यालाही लाज वाटते काय ? पण अरे भ्याडांनो ! निर्लज्जांनो ! लक्षांत ठेवा, सहा काळ, बारा मास सारखेच नसतात. तुमच्या भाषणाच्या ओघावरून तुमचा माझा शत्रु एकच असावा अशी माझी कल्पना झाली, म्हणून मी येवढें बोललों. पण तुमची माझ्याशीं बोलण्याची इच्छा नाहीं, तर माझें राहिलें.'

म. ग्रं. श्री शाळी, वाचनालय वाशी.

येवढें बोलून तो बैरागी सभोंवार आपली एकाक्ष नजर फिरवीत 'बजरंग बलीकी जय' असा मुखानें जयघोष करीत बंदरकिनाऱ्यानें उत्तरेकडे निघून गेला. तेवढ्या मुदतींत एक पिकल्या केंसांचा म्हातारा काठी टेंकीत टेंकीत चौबुरुजीवरून बंदरावर येण्याच्या वाटेनें तेथें येऊन पोंचला. त्याची दृष्टि प्रथम त्या धाडशी तरुणाकडे वेधली गेली होती; इतक्यांत तो कंगाल बैरागी त्याला समोरून जातांना दिसला. तो बैरागी आपल्याशींच विचार करण्यांत दंग असल्यानें त्याचें आजुबाजूच्या परिस्थितीकडे मुळींच लक्ष्य जात नव्हतें. पण त्या धाडशी तरुणाचें लक्ष्य मात्र त्याच्याकडे एकदोन वार गेलें. मागाहून आलेल्या म्हाताऱ्यानेंही त्याला पाहून 'हा कोण' अशी पृच्छा आपल्या मनाला केली. पूर्वोक्त पांच जखमी लोकांचेंही लक्ष्य त्याच्याकडे होतेंच. तोंच तो बैरागी आणखी दूर जाऊन व रस्त्याच्या वळणाकडे वळल्यामुळें तो म्हातारा व तो तरुण ह्या दोघांची-ही नजर त्याच्याकडे पोंचेनाशी झाली.

" हा कंगाल प्राणी कोण ? " त्या पांच माणसांतील एकानें इतरांना अनु-लक्षून विस्मयचकित होऊन विचारलें.

" ह्याला येथल्या किल्लेदाराची चांगलीच माहिती दिसते." दुसरा म्हणाला.

" त्या दोघांचें हाडवैर असावेसें दिसतें. एरव्हीं त्यानें किल्लेदाराला शिव्यांनीं संबोधिलें नसतें." तिसरा म्हणाला.

चौथ्यानें मध्येंच शंका काढली, " किंवा हा सिद्दीचा नाहींतर मानाजी आंग्र्यांचा हेर तर नसेल ? हेरांचा आजकाल फार सुळसुळाट झाला आहे."

पांचव्यानें चौथ्याच्या शब्दाला विशेष कल्पकतेनें दुजोरा दिला, " अथवा तो इंग्रज किंवा फिरंगी यांचाही हेर असूं शकेल. आजकाल अशा हेरांचा सर्वत्र फार सुळसुळाट झाला आहे."

" असेल, तसेंही असेल. आज इतके दिवस उभ्या कोंकणपट्टींत लढाईचा वणवा पेटला आहे; त्या वणव्यांत गरीब रयतेची शेतीभाती व दौलत भस्म झाल्यावर रयतेनें तरी काय करावें ? ज्याला जो पोटाचा उद्योग सांपडेल तो तो करणारच." चौथा पुन्हा म्हणाला.

पांचव्यानें विचारलें, " असें पहा, रयत काय करील तें करो; सध्यां आपण काय करावें हा निकडीचा प्रश्न आपणासमोर आहे. आम्हांला कुठची दुर्बुद्धि आठवली व आम्ही खाशांच्या भाऊबंदकींत उगाच संभाजीबाबांचा पक्ष घेऊन

मानाजीरावांची कुरापत काढली. हा सूर्याजी कदम कधींच अशा फंदांत पडणारा नव्हे. कान्होजीबाबांच्या कृपेनें मला एक गांव इनाम होता, त्यावर आमचा चरितार्थ सुखानें चालला होता; व मानाजीरावांनींही त्यांत अंतराय केला नसता. उलट संभाजीरावांपेक्षां आम्हांला मानाजीरावच जास्त जवळचे. संभाजीरावांनीं मानाजीरावांपासून सर्वांना आंग्र्यांचे लेकावळे असें निंदण्याचा सपाटा चालविला; अर्थात् ती निंदा आम्हांलाही लागू झाली. असें असतांही मीं दौलतीचा अभिमान धरून संभाजीरावांचा पक्ष स्वीकारला, म्हणून माझी अशी दशा झाली. आतां पेशव्यांनीं मानाजीरावांना पाठीशीं घातल्यामुळें व इंग्रज आणि फिरंगी यांचीही त्यांनाच मदत असल्यानें संभाजीरावांची वाताहात उडून त्यांचे कैवारी आम्ही उघड्यावर पडणार; बरें, मानाजीरावही आमच्या आगळिकीबद्दल आमचीं पाळेंमुळें खणून काढावयाला कमी करणार नाहींत."

दुसरा म्हणाला, "सूर्याजी ! जी अवस्था तुझी, तीच माझीही आहे. वास्तविक मानाजीराव हा माझा दोस्त. त्यानें माझा योगक्षेम आजवर चालवून मला वतन-वाडी देऊन सुखवस्तु केलें, व माझ्या कमरेला तरवार बांधून त्यानेच मला मर्दुमकीचा धडा घालून दिला. कान्होजीबाबांच्या वेळेपासून आमचें पडवळांचें घराणें आंग्र्यांच्या तोडीचें म्हणून गाजलेलें; पण हा गंगाजी पडवळ आंग्र्यांच्या भाऊबंदकींत पडावयाला तयार नाहीं,-मी सिद्दी साताचा आश्रय सोडावयाला तयार नाहीं, म्हणून संभाजीरावांनीं माझी शक्य तितकी अप्रतिष्ठा केली. माझी गांव-वतनें जप्त करून त्यांनीं काय म्हारापोरांना द्यावीं ? "

"असें होतें, तर तूं पुन्हा संभाजीरावांचाच पक्ष कां स्वीकारलास ? " तिसऱ्यानें प्रश्न केला.

"संभाजीरावांचा पक्ष कां स्वीकारला ? गड्या ! मी खोट्या मोठेपणाला बळी पडलों. कोठें बोलावयाची गोष्ट नाहीं; पण मानाजीराव आपल्या जातीवर गेले. त्यांनीं आपली मुलगी माझ्या मुलाला देऊं केली; त्याला मीं मान्यता दिली नाहीं म्हणून त्यांचा माझ्यावर धुस्सा झाला. मीं माझ्या जातकुळीचा पाकपणा अभंग राखण्यासाठीं मानाजीरावांचें मन मोडलें, व त्यांच्याविरुद्ध संभाजीरावांना सामील झालों." गंगाजी पडवळ म्हणाला.

"पण तुम्ही कोणत्या ना कोणत्या कारणासाठीं तरी संभाजीरावांना व येसाजी-रावांना सामील झालां." उरलेल्या तिघांपैकीं एकजण म्हणाला, "आम्ही तर

निष्कारण ह्या भांडणांत त्यांचा पक्ष धरून मानाजीरावांचें मन दुखविलें. ह्या आमच्या मूर्खपणाला कांहीं तोड आहे का?"

याप्रमाणें त्या पांच माणसांचें संभाषण सुरू असतांना तो धाडसी तरुण व तो चौबुरुजीवरून खालीं आलेला म्हातारा ह्या दोघांचेंही तिकडे लक्ष्य होतें. म्हातारा कांहींच बोलला नाहीं, पण तो तरुण मात्र 'अरेरे! क्षुल्लक स्वार्थासाठीं कसलाही अपमान व उपहास सहन करण्याची ज्याची तयारी, त्या शेणकिड्यांचा संभाजी सरखेलांसारख्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं तळमळणाऱ्या पुण्यपुरुषांना काय उपयोग होणार?' असें स्वतःशीं हळव्या मनानें म्हणत चार पावलें पुढें गेला. त्या पांचही लोकांना मात्र वाटलें कीं, हा कोणी तरी शत्रूचा हेर किंवा मानाजीरावांचा अधिकारी आपल्या पाठलागावर आहे. म्हणून ते तसेच घाईघाईनें तेथून थेट चौबुरुजीवर जाण्याच्या मार्गाला लागले. दूरवर जाईतों ते एकसारखे घाबरट नजरेनें मधून मधून मागें वळून पहात होते. तो तरुण आपल्या मागोमाग येतो कीं काय याचें भय वाटून ते घाबरले होते; पण त्या तरुणानें त्यांचा पाठलाग कांहीं केला नाहीं. तो म्हाताराही कांहीं न बोलतां मुकाटपणें त्या पांचजणांकडे ते दृष्टीआड होईतों एकसारखा टक लावून पहात होता.

ते लोक दृष्टीआड झाल्यावर तो म्हातारा कांहीं तरी बोलण्याच्या उद्देशानें त्या तरुणाकडे पाहूं लागला, तोंच कांहीं आडदांड मुसलमान तेथें येऊन थडकले. ते तेथल्या विपन्न लोकांना सहज करमणुकीखातर मगरूरपणें धक्के मारीत पुढें चालले. किनाऱ्यावर कांहीं हिंदु बायका संकटांत सांपडून उभ्या होत्या, त्यांनाही त्या अरेरावांनीं लगट करून धक्के देण्याला कमी केलें नाहीं. त्यांच्या मागोमाग एक भारी किंमतीचा सरदारी पोषाख केलेला काळ्याभोर कुरळ्या केसांच्या दाढीमिशांनीं सजलेल्या रुबाबदार चेहऱ्याचा, तिशीच्या उमरीचा उमरावी थाटाचा उमदा मुसलमान तरुण शिपाई-प्याद्याच्या प्रभावळींतून आस्ते आस्ते गजगतीनें चालत येत असलेला आढळला. तो तरुण व तो म्हातारा या दोघांचेंही त्या मुसलमान तरुणाकडे पूर्ण लक्ष्य होतें; व त्या मदोन्मत्त मुसलमानांनीं किनाऱ्यावरील त्रस्त लोकांचा सहज लीलेनें छळ चालविलेला पाहून त्या दोघांच्याही सर्वांगाची लाही लाही होत होती. किनाऱ्यावरील मंडळींत बहुतेक हिंदूच होते, हें सांगितलें; व तेव्हां मुसलमानांनीं कोंकणपट्टींत चालविलेल्या अत्याचारांची परमावधि ध्यानीं घेतली, म्हणजे मुसलमानांच्या त्या मगरुरीचें कारण वाचकांना उमजेल. किनाऱ्या-

वरील इतर मंडळींचें त्या अत्याचाराकडे लक्ष नव्हतें असें नाहीं. त्यांच्याच इतका थैमान घालीत पुढें चालत जाणाऱ्या अरेरावांची जाणीव त्यांना कशी नसेल? पण त्या अत्याचारांचा प्रतिकार करण्याचें धैर्य अथवा सामर्थ्य त्या मंडळींपैकीं कोणाच्याच आंगीं नसल्यामुळें कीं काय, सर्वजण अगदीं निमूटपणें तें सारें सहन करीत होते. नाहीं म्हणावयाला आपल्या पूर्वपरिचित तरुणानें जे दोन जीव वांचविले होते, त्यांपैकीं ती पाणिदार तरुणी मात्र तो प्रकार पाहून विद्युल्लतेप्रमाणें क्षणभर चमकली. आडदांड मुसलमान धक्काबुक्की करीत पुढें चाललेले पाहून त्या तरुणीनें त्यांतल्या एकाला सडेतोडपणें झाडण्यालाही कमी केलें नाहीं. तो प्रकार असा झाला कीं, वास्तविक त्या तरुणीला धक्का लागला तो सर्वांच्या मागाहून येणाऱ्या ऐटबाज मुसलमानाचा; पण ती एकट्या कोणाचाच उल्लेख न करतां मोघमपणें म्हणाली, "गुलामांनो! सत्ता हातीं आली म्हणून तुम्हांला तुमच्या आयाबहिणींचीही ओळख नाहींशी झाली कीं काय! तुमच्या आयाबहिणींचा कोणीं असा उपमर्द केला तर तो तुम्हांला खपेल काय!"

त्या तरुणीच्या तोंडून शब्दांच्या रूपानें बाहेर पडलेले अग्निस्फुलिंग सर्व मुसलमानांच्या-विशेषतः त्या एका ऐटबाज मुसलमानाच्या मनाला फारच झोंबले. त्यानें तोरेबाजपणानें हुकमतीच्या दृष्टीनें एकवार मागें वळून पाहिलें, तेव्हां त्याची व त्या तरुणीची क्षणभर दृष्टादृष्ट झाली. तेव्हां दोघांच्याही दृष्टि संतप्त झाल्या होत्या. त्या दोहोंत फरक असेल तर तो एवढाच कीं, त्या तरुणीची दृष्टि विद्युल्लते-प्रमाणें आवेशाच्या भरांत एकदां अत्यंत तीव्रतेनें चमकून गेली, आणि त्या म्होरक्या मुसलमानाची दृष्टि मात्र पेटत्या खदिरांगाराप्रमाणें क्षणोक्षणीं जास्त जास्त रसरसूं लागली. सर्वांना त्याचीं तीं संतापानें लाल होऊन गरगर फिरणारीं बुबुळें पाहून वाटलें कीं, आतां त्या सुकुमार तरुणीचीं शंभर वर्षें भरलीं. त्यानें आपल्या बरोबरच्या एका तिशीच्या उमरीच्या खुनशी नजरेच्या सिद्दी याकूब मुसलमानाला हांक मारून विचारलें, "याकूबखान! ती खुबसूरत मगरूर छोकरी कोणाची कोण!"

"कांहीं माहीत नाहीं किल्लेदारसाहेब!" सिद्दी याकूब उत्तरला.

वाचकांना सिद्दी याकूबच्या उत्तरावरून कळलेंच असेल कीं, तो तरुण म्होरका मुसलमान थळचा किल्लेदार होता. त्याचें नांव सुलतान असें होतें. सुलतानाचा प्रश्न ऐकून ती तरुणी एखादी नागीण शेंपटीवर पाय पडतांच उलटावी,

त्याप्रमाणें सुलतानाकडे तीक्ष्ण नजरेनें पाहूं लागली. तिच्याबरोबर असलेल्या माणसांचें तिच्याकडे लक्ष होतेंच. तो जो मागें उभा होता, तो तेथून सुलतानाचा प्रश्न ऐकून त्या प्रश्नाचें उत्तर देण्यासाठीं पुढें जात होता. इतक्यांत त्या तरुणीच्या चर्येवर संतापाची छाया पडलेली पाहतांच तो प्रथम तिच्याकडे गेला, व दुसऱ्या कोणालाही ऐकूं जाणार नाहीं इतक्या हळू स्वरांत तिच्या कानाशीं तोंड नेऊन पुटपुटला, "हें पहा, इथें रागाला येऊन आपला निभाव लागावयाचा नाहीं. ज्या प्रसंगाला आपण भीत होतों, तोच प्रसंग नेमका दत्त म्हणून आमच्या-समोर उभा राहिला आहे. हा किल्लेदार मोठा मानी कडों माणूस आहे. त्याच्या कचाटींतून सुटावयाचें तर गरीबपणाच धारण करावयाला हवा. त्यानें तुला ओळखलें नाहींसें वाटतें. हें एका परीनें बरें आहे. मीही त्याला तुझी ओळख न देता आतां कांहींतरी सांगून त्याची समजूत कशी करतों पहा. तो माझ्या ओळखीचा आहे. माझ्या शब्दावर तो सहज फसेल. तूर्त तूं मात्र येवढें ध्यानीं ठेव कीं तूं दिलारा आहेस."

ती तरुणी त्या माणसाच्या शब्दावर विश्वासून व तो प्रसंग ओळखून तिला रात्रीं वांचविणाऱ्या धाडशी तरुणाकडे पहात स्तब्ध राहिली. तिची समजूत करून झाल्यावर तो माणूस आजूबाजूला-विशेषतः त्या धाडशी तरुणाकडे पहात पहात सुलतानासमोर गेला व सलाम करून म्हणाला, "किल्लेदारसाहेब! तुम्हीं मला ओळखलें नाहीं तें बरोबर. कारण तुम्ही आतां बडे माणूस झालां! पण मीं तुम्हांला ओळखलें."

"कोण तूं? दत्ताजी!" सुलतान रागबीग चट्सारा टाकून देऊन एकदम शांतपणानें म्हणाला, "खरेंच, मीं प्रथम तुला ओळखलें नाहीं."

"आतां तरी नीट ओळखलें ना?" दत्ताजीनें किंचित् हंसून विचारलें.

"हो! आतां ओळखलें."

"तरीपण अजून पुरतें ओळखलें नसेल. उच्च पदावर चढणाऱ्या माणसांना पायांखालील जग आपोआप दिसेनासें होतें. हा दोष परिस्थितीचा; माणसांचा नाहीं. पण थोर माणसांच्या पायांखालीं माझ्यासारखे गरीब बिचारे हकनाहक चिरडले जावयाचे. त्यासाठीं आधींपासूनच जरा सावधगिरीनें वागणें चांगलें." असें बोलतां बोलतां दत्ताजी सुलतानाच्या अगदीं जवळ गेला, व त्याच्या कानांत

कायसे चार शब्द सांगितले. ते तिसऱ्या कोणालाही ऐकूं गेले नाहींत; पण सुलतान ते ऐकून एकवार त्या तरुणीकडे पाहून हंसला मात्र.

" समजलें ना ? ही दिलारा माझी मुलगी आहे असें समजा. आमच्यावर प्रसंग पडला म्हणून आम्ही दैवयोगासारखीं इथें येऊन पडलों. आम्ही फार श्रमलों आहों. आजची रात्र आम्हांला इथें रहावयाचें आहे. राहूं ना ? "

" वा: ! दत्ताजी ! हें काय विचारावयाला हवें ? तूं माझा जुना जिगरदोस्त. माझा पाहुणचार घेतल्याशिवाय तुला येथून कसें जातां येईल ? "

इतक्यांत ती तरुणी–पण दत्ताजीनें ज्या अर्थीं तिचें नांव सांगितलें आहे, त्या अर्थीं आपणही तिला त्याच नांवानें संबोधूं—दिलारा दत्ताजीला हातानें बोलावून म्हणाली, " दाजीबा ! आपण आतांच्या आतांच येथून दुसऱ्या एखाद्या दूरच्या ठिकाणीं जाऊं ना ? किंवा पाहिजे तर माघारीं अलिबागेला जाऊं; पण इथें राह्यचें नाहीं."

दत्ताजी यावर तिला हळूच म्हणाला, " वेडे मुली ! तूं तूर्त बोलूं नकोस म्हणतों ना ! माझे आई ! वेळ पाहून वागलं पाहिजे."

दिलारा पुन्हा गप्प बसली.

" काय ? तुझी दिलारा काय म्हणते ? " सुलतानानें हंसत हंसत विचारलें.

" तिला तुमची भीति वाटते." दत्ताजी उत्तरला.

" भीति कसली ? " सुलतान दोन पावलें पुढें येऊन म्हणाला. " दिलारा ! मला भ्यावयाला मी कोणी राक्षस आहें कीं काय ? दत्ताजीबाबाला मी वडिलांच्या ठायीं मानतों. या नात्यानें तूं माझी पाठची बहीण झालीस. माझी भीति बाळगण्याचें तुला कारण नाहीं."

" पण आम्ही गरीब माणसें, आम्हांला आपणासारख्या बड्या माणसांकडील पाहुणचार पचायचा नाहीं." दिलारा उत्तरली.

" वा: ! हें काय बोलणें झालें ? तें कांहीं नाहीं. दत्ताजी ! आज तूं माझा पाहुणचार घेतलाच पाहिजेस. आज इथें आमचे मालिक यावयाचे आहेत; त्यांच्याबरोबर एक बडा साहेबही यावयाचा आहे. त्यांची जंगी मिरवणूक आतां सूर्यास्ताला निघणार आहे. असलें वैभव तुम्हांला तरी एरव्हीं कधीं पहावयाला मिळणार ? "

" आंग्र्यांचें वैभव—" येवढे दोन शब्द दिलाराच्या तोंडून निघतात, तोंच दत्ताजीनें तिच्या तोंडावर हात ठेवून तिला गप्प केलें.

" काय म्हणते ती ? " सुलतानानें पूर्ववत् शांतपणानें पण किंचित् खोंचिकपणानें दत्ताजीला विचारलें. " तिला आंग्र्यांच्या वैभवाची आठवण होते ? पण तिला म्हणावें, आंग्र्यांचें वैभव आजच्या वादळांत बुडालें; आणि उरलेंसुरलें लौकरच बुडून जाईल."

आंग्र्यांच्या वैभवाला सुलतानानें नांवें ठेवलेलीं दिलाराला मुळींच मानवलीं नाहींत. तिनें लगेच हजरजबाब दिला, " पूर्वजांच्या पराक्रमाचें पुण्यस्मरणच नव्या पिढीला फिरत्या नंदादीपासारखा मार्ग दाखवीत असतें."

दिलारा वहात चालली असें पाहून दत्ताजीनें तिला पुन्हा दाबलें, व सुलतानालाही गप्प राहाण्यासाठीं एकीकडे डोळ्यानें खुणावीत म्हटलें, " बरें; किल्लेदारसाहेब, आम्ही फार श्रमलों आहों."

लगेच सुलतानानें जवळच्या एका शिपायाला हांक मारून हुकूम केला, " पर्विज ! ह्या पाहुण्यांना फत्तेकोठींत घेऊन जा; व त्यांची योग्य सरबराई ठेवण्याची व्यवस्था कर. ही खास माझी पाहुणेमंडळी आहे हें लक्ष्यांत ठेव. मी मग येतोंच."

" जसा आपला हुकूम सरकार ! " असें अभिवादनपूर्वक म्हणून पर्विज चौबुरुजीच्या वाटेला लागला. त्याच्या मागोमाग दत्ताजी दिलाराला घेऊन निघाला. दिलाराच्या मनांतून अजूनही सुलतानाचा पाहुणचार टाळावयाचा होता; पण दत्ताजीपुढें तिचा कांहीं इलाज चालला नाहीं. कसायाच्या हातीं गळ्यांतल्या दाव्यानें अडकून पडलेल्या गाईप्रमाणें तिला दत्ताजीबरोबर पर्विजच्या मागोमाग जावेंच लागलें. लगेच सुलतानही बरोबरच्या मुसलमानांसह पुढें निघून गेला.

प्रकरण पांचवें

# तोफांचा गडगडाट

किनाऱ्यावरचे इतर लोक तो देखावा स्तब्धपणें पहात होते. त्यांत तो काठी टेकीत चौबुरुजीवरून खालीं आलेला म्हातारा व तो धाडसी तरुण हे दोघेही होते. म्हातारा कां नकळे, सुलतान तेथून पुढें निघून जाईतों सर्व मंडळींच्या मागें आडवशाला एका खडकावर बसून होता. सर्व मंडळींच्या चेहऱ्यावर एक प्रकारचें आश्चर्य खेळत होतें; पण तो म्हातारा व तो तरुण ह्या दोघांच्या चेहऱ्यावर खेळणाऱ्या पाण्यांत निर्भेळ आश्चर्य नव्हतें. संशय, मानखंडना, चीड, संताप अशा नाना छटा त्यांच्या चेहऱ्यावर एकदम उमटल्यानें त्यांना वाटणाऱ्या आश्चर्याचा रंग बराच बदललेला दिसत होता. त्यांतल्या त्यांत त्या तरुणाच्या चेहऱ्यावर तर पूर्वोक्त भावनांची छाया स्पष्टपणें उमटलेली दिसत होती. इतकीं कीं, त्या तरुणाचा दिलाराशीं कांहीं संबंध असावा व सुलतान हा त्याचा सात जन्मांचा वैरी असावा, असाच भास कोणालाही झाला असाता, तो तरुण मधून मधून एकसारखा दिलारा दृष्टीआड होईपावेतों तिच्याकडे टक लावून पहात होता. म्हातारा तें लक्ष्यपूर्वक पहात होता. त्यानें सुलतानासह सर्व मुसलमान निघून गेल्यावर इतर लोकही आपापल्या वाटेनें जाऊं लागलेले पाहून त्या तरुणापाशीं जाऊन प्रेमळपणानें त्याला हांक मारून विचारलें, “बाबा! तूं कुठचा कोण? तूं कांहीं येथला रहिवासी दिसत नाहींस.”

तो तरुण उत्तरला, “मी येथला रहिवासी नाहींच. वादळांत सांपडून मी इकडे आलों. नाहींपेक्षां मला प्रथम कनकेश्वराच्या दर्शनाला जाऊन तेथून मग सागरगडावर माझ्या सोयरेमंडळीकडे जावयाचें होतें. बरें पण ह्या चौबुरुजीवर सध्यां सत्ता कोणाची आहे?” तो तरुण वर मान करून तटावर फडकणाऱ्या हिरव्या निशाणाकडे पहात म्हणाला, “हें निशाण तर सिद्दीचें दिसतें आहे. माझ्या आठ-वर्णीत मी अगदीं लहानपणीं एकदां ह्या प्रांतीं होतों, तेव्हां मराठ्यांचा भगवा-झेंडा ह्या चौबुरुजीवर हिरव्या निशाणाच्या जागीं फडकत होता.”

म्हातारा विषादपूर्वक हंसून म्हणाला, “गोष्ट खरी. ह्या किल्ल्यावर चांगला परवांपर्यंत मराठ्यांचा भगवा-झेंडा फडकत होता; पण आतां ती जागा सिद्दीच्या

झेंड्यानें बळकावली आहे. आम्ही मराठे आपापसांत भांडून सर्वस्वाची कशी होळी करून घेतों. व आमच्या भांडणांत त्रयस्थ शत्रूंचें कसें फावतें याची साक्ष देण्यासाठीं तो हिरवा झेंडा तेथें उभा आहे. पण आपण जरा बाजूला उभे राहून बोलूं." असें म्हणून म्हाताऱ्यानें त्या तरुणाला अंमळ बाजूला घेऊन म्हटलें, "मीं तुला प्रथमच त्या निशाणदांडीकडे पाहून जोडल्या हातांनीं वर मान करतांना पाहिलें व दुसऱ्याच क्षणाला तूं शरमिंदेपणानें खालीं मान घातलीस. त्यावरून मीं मनांत ओळखलें कीं, मराठ्याचें खरें पाणी ह्या एक तरी तरुणाच्या आंगीं खेळत आहे; आणि त्यावरूनच मीं अटकळ केली कीं, तूं येथला अथवा आजूबाजूचा रहिवासी खास नसावास. थळ सुभ्यांतील सारी भूमि ही आजकाल पापभूमि बनली आहे. पुण्यवान्, स्वाभिमानी, कर्तबगार व कर्तव्यदक्ष अशा कोणाही कुलवंत हिंदूला या भूमींत आजकाल थारा मिळावयाचा नाहीं, व अशा सुपुत्राला ही भूमि आतां प्रसवणारही नाहीं. येथले सारे हिंदू, अगदीं षंढ बनलेले आहेत. त्यांना अन्याय व अधर्म याची चीडच वाटेनाशी झाली आहे; मग प्रतिकारबुद्धि व प्रतिकारशक्ति त्यांच्या ठायीं कोठून चमकणार ! तूं आतांचाच प्रकार प्रतिपादलास ना ? मूठभर मुसंड्यांनीं येथल्या येवढ्या मोठ्या माणसांच्या जमावाला धक्काबुक्की केली, तरी त्यांना असें कां म्हणून विचारण्याची छाती कोणालाही झाली नाहीं. नाहीं म्हणावयाला ती एक पाणीदार पोरगी मात्र अगदीं दुबळ्या भाषेंत कां होईना, पण त्या अरेरावांची कान उघाडणी करूं शकली; पण ती देखील अर्थातच परगांवची आहे. बिचारी आपल्या पूर्वजन्मींच्या कर्मासारखी त्या राक्षसांच्या—त्या किल्लेदाराच्या जबड्यांत सांपडली आहे. तिची सुटका आतां भगवंतानेंच करावी तर !"

"बरें, हा सुलतान किल्लेदार कोण ?" त्या तरुणानें वर दिलेल्या प्रश्नावर थोडा अगदीं थोडा वेळ खोल विचार करून एक निःश्वास सोडून इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करीत म्हाताऱ्याला विचारलें.

"तो कोण म्हणून सांगूं ? आपल्या धर्मांतून एकवार परधर्मांत जो मनुष्य गेला, तो मेला. त्या दृष्टीनें सांगावयाचें झालें तर हा एक हिंदूंच्या अवलादींचा मुसंडा आहे."

"म्हणजे ! हा किल्लेदार बाटगा आहे कीं काय ?"

"होय. किल्लेदारी मिळविण्यासाठीं हा हरामखोर बाटून मुसलमान झाला !

बाबा रे ! जगांतील मोठेपणाचें मूळ शोधून पहातां तेथें विश्वासघात, दगलबाजी, गळेकापूपणा वगैरे अनीतिमय कृत्यांचा बुजबुजाट हा असावयाचाच."

बोलतां बोलतां म्हाताऱ्याचा कंठ दाटून आल्यामुळें त्याच्या तोंडून शब्द निघेनासा झाला. त्याच्या डोळ्यांत दुःखाश्रु चमकूं लागले. ते पहातांच त्या तरुणाला त्याची कींव आली. त्यानें सहानुभूतिपूर्वक त्या म्हाताऱ्याला विचारलें, "आजोबा ! तुम्हांला आपल्या मायभूमीची ही दुःस्थिति पाहून जसा खेद होतो, तसाच मलाही होतो. कारण माझीही हीच मायभूमि आहे. पण काय करणार ! मला त्या निशाणदांडीवर तें हिरवें निशाण फडकतांना पाहून किती खेद होत असेल याची तुम्हांला कल्पनाही नसेल. अगदीं लहानपणीं माझे बाबा येथल्या लोकांच्या छळाला विटून रोजगाराच्या निमित्तानें साळशी महालांत जाऊन राहिले. तेव्हांपासून आम्ही आमच्या ह्या मायभूमीला मुकलों. ही भूमि सोडून दूर प्रांतीं रोजगाराला जाण्याला कारण देखील तसेंच घडलें. ती शि या गोष्टीची परवड रचीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं; पण तुम्हीं जिव्हाळ्यानें माझी विचारपूस केली म्हणून मनमोकळेपणानें दोन शब्द बोलणें प्राप्त आहे. माझे आजोबा एका काळीं ह्या किल्ल्यावर किल्लेदार होते, त्यांच्यामागें माझे बाबाही येथले किल्लेदार होते, व त्यांच्या वैऱ्यांनीं कैक जन्मींचें वैर साधलें नसतें तर आजला आमच्याच वंशाचा किल्लेदार ह्या सुभ्याचा अंमल पहातांना तुम्हांला आढळला असता. आम्ही येथले वतनदार."

"कोण ? कोण ? तुझे आजोबा व वडील कोण ? त्यांच्या वैऱ्यांनीं त्यांचा दावा साधला म्हणतोस, त्यावरून तो दादजी सुर्वेच असावा. त्याच्या मुलाचें नांव खाशाबा. त्याचाच मुलगा तूं होय ना ?"

"होय. त्यांचाच मुलगा मी. तुम्हांला एकूण आमच्या घराण्याची बरीच माहिती दिसते."

"होय. पण तुझें नांव काय बरें ? मला आतां आठवत नाहीं."

"माझें नांव नानाजी. माझें पाळण्यांतलें नांव बजरंग असें होतें. कारण उत्तर वेशीवरील बजरंगबलीच्या कृपाप्रसादानें माझा जन्म झाला असें माझी आई मला सांगे. तें बजरंगबलीचें भव्य देवालयही माझ्या बाबांनीं अमूप पैसा खर्च करून बांधलें. माझ्या बाबांचा स्नेही व नोकर कोणी बाळाजी कोळी या नांवाचा होता. तो मासे मारावयाला गेला असतां त्याच्या जाळ्यांत एके दिवशीं ती बजरंग-

वलींची मूर्ति अकस्मात् सांपडली. ती त्यानें प्रासादिक देवता म्हणून गौरवानें आणून आमच्या बाबांच्या स्वाधीन केली. बाबांचा देवाधर्मावर मोठा विश्वास. त्यांनीं त्या मूर्तीची उत्तरवेशीवर स्थापना करून मोठें देवालय बांधलें, व अर्चेसाठीं दोनशें मोहरा खर्च केल्या. त्या कोळ्यालाही त्यांनीं गुहागर गांवाजवळचें त्याचें जन्मखेडें आंग्र्यांकडून बक्षीस देवविलें, व वर आणखी गुहागरची पाटीलकीही त्याला बहाल करविली. बाळाजी व माझे बाबा हे दोघेही परमहंस ब्रह्मेंद्रस्वामींचे परमशिष्य होते. पर्शराम येथील देवस्थान ऊर्जितावस्थेला आणण्यासाठीं त्या दोघांनींहि स्वामींना परोपरीनें साह्य केलें होतें; व आंग्र्यांचा लोभ स्वामींच्या ठायीं जडण्याला कारणही ते दोघे. माझे बाबा आंग्र्यांचे सेवक खरे; कारण थळची चौबुरुजी ही कान्होजी आंग्र्यांच्या आईची जन्मभूमि असून तेथले किल्लेदार वंशपरंपरेनें आमच्याच वंशांतील होते. आणि बाळाजी कोळी हा तर प्रथम आंग्र्यांचा सेवक असून पुढें पुढें आंग्र्यांच्या आरमारांत नोकरीला राहून पट्टीचा दर्यासारंग म्हणून गाजला होता. असें म्हणतात, आंग्रे आणि सिद्दी यांच्या झगड्यांत आंग्र्यांनीं सिद्दीला व टोपडे इंग्रज, फिरंगी वगैरे सर्व प्रतिस्पर्ध्यांना पाणी पाजलें तेव्हां खुष्कीच्या मार्गानें माझे आजोबा, माझे बाबा व जलमार्गानें बाबाजी कोळी यांनीं त्यांची पाठ चांगलीच राखली होती. एकदां तर मदांध सिद्दीसाताचा बाप सिद्दी सुलेमान हा पर्शराम येथील देवालयावर चालून आला. तेव्हां माझे बाबा व बाळाजी पाटील ह्या दोघांनीं कान्होजी आंग्र्याच्या वतीनें अपरात्रीं संधी साधून त्याच्या तंबूवर छापा घालून त्याची दाढी काढून आणली होती!" येवढें बोलल्यावर नानाजीचा शब्द एकाएकीं जड येऊं लागला. त्याचा ऊर भरून येऊन धडधडूं लागला. अंमळ विसांवा घेऊन मग तो बोलूं लागला. "आजोबा! आमच्या वैऱ्यांनीं—मुख्यतः भानाजी पिसाळ या नांवाचा एक दुय्यम किल्लेदार माझ्या आजोबाच्या हाताखालीं चौबुरुजीवर नोकरीस होता; त्यानें जर दगलबाजपणा केला नसता, तर येथली किल्लेदारी आमच्या हातून गेली नसती. तो भानाजी पिसाळ अजून हयात आहे का हो? कांहीं दिवसापूर्वी येथला एक माणूस भेटला. तो इकडची हकीकत सांगत होता. त्याच्याकडून मला तेव्हां कळलें होतें कीं, आम्ही येथून परागंदा झाल्यावर कांहीं वर्षे भानाजी थळचा किल्लेदार होता. पण कांहीं काळांत त्याला त्याच्या कर्माचीं फळें भोगणें प्राप्त झालें. जे डावपेंच त्यानें माझ्या आजोबांना व बाबांना नेस्तनाबूद

करण्यासाठीं उपयोगांत आणले, त्याच डावपेंचांचें जाळें त्याच्या नशिबानें त्याच्या सभोंवार पसरून त्याचा कोंडमारा केला. जशी भानाजीनें माझ्या बाबांविषयीं आंग्र्यांपाशीं खोटीनाटी चुगली केली, तशीच त्याच्या शत्रूंनीं त्याच्याविषयीं व त्याच्या मुलाविषयीं चुगली करून त्यांना राखेंत बसाविलें असें मीं ऐकलें; तें खरें काय ? माझ्या बाबांवरचें संकट केवळ परागंदा होण्यावर भागलें; पण भानाजीवरच्या संकटानें त्याला समूळ राखेंत बसविलें. सोन्यासारखा एकुलता-एक मुलगा त्याला होता. तो राजद्रोही ठरून उंदेरीवरील किल्ल्यांत कुजत पडला आहे; व त्याला स्वतःलाही नोकरीला मुकून नजरकैदेंत खितपत पडणें प्राप्त झालें आहे म्हणे ! हें सारें जर खरें असेल तर मी म्हणेन कीं, जगांत अजून देव आहे, तो जागा आहे, त्याला डोळे आहेत, व तो अगदींच अन्यायी नाहीं. आजोबा ! भानाजी जर मला आज भेटेल, तर मी मुद्दाम त्याच्यापाशीं जाऊन त्याला सांगेन कीं, बाबारे ! जसें करावें तसें भरावें. चालता काळ आला म्हणून कोणीही चढून जाऊं नये. पापाला प्रायश्चित्त देव देतोच देतो. सदा सर्वकाळ आपण ठरवूं ती पूर्वदिशा ठरेल, मनासारखें साधेल, किंवा लक्ष्मी आपल्या घरीं पाणी भरील असें थोडेंच आहे ? आणि आजोबा ! देवाघरचा न्याय तरी कसा आहे पहा ! भानाजीनें आमच्या वंशाचें शक्य तेवढें वाटोळें केलें, तरी त्या वंशांतला एक तरी अंकुर आजला जिवंत आहे. देवदया झाली तर त्याच अंकुराला पराक्रमाची पालवी फुटेल, व त्यालाच वैभवाचीं मधुर फळें येतील. मी दानतीचा धड असेन तर दीनदयाळ देवाच्या दुनियेंत मला कांहींच उणें पडणार नाहीं; पण मानाजीनें ज्या आपल्या एका पुत्रासाठीं एवढी सृष्टि उलथी-पालथी केली, त्याच्या मनांतून स्वतःला व स्वतःच्या पश्चात् स्वतःच्या पुत्राला थळच्या चौबुरुजीची किल्लेदारी व येवढ्या टापूंतील सुभेदारी मिळावी असें होतें; पण तोच मुलगा येथला किल्लेदार होण्याऐवजीं जिवंत असूनही मेला असा तुरुंगांतील बंदिवान् होऊन पडला आहे. बिचारा आजवर जिवंत तरी असेल किंवा नाहीं याचीही वानवाच आहे. खरेंच, आजोबा, भानाजी अजून हयात आहे का हो ? ”

“ होय. तो अभागी थेरडा अजूनही जिवंत आहे. स्वतःच्या दुष्कर्माचीं विषारी फळें चाखून कुत्र्याच्या मोतीनें मरण्यासाठीं त्याला देवानें नागाचें आयुष्य दिलें आहे. तो लवकर मरता तर एकदांचा सुटला असता; पण देव त्याला मरण कोठून देईल ! ” म्हातारा डोळ्यांना पदर लावून स्फुंदत उद्गारला. एखाद्या लहानग्या

पोराप्रमाणें तो मुळुमुळू रडूं लागलेला पाहून नानाजीला त्याची दया आली. नानाजीनें त्याचें शांतवन करण्याचा प्रयत्न केला, तसा तो ओक्साबोक्शीं रडूं लागला भानाजीनें त्याला पुनःपुन्हा विचारलें, " आजोबा ! तुम्ही असे रडतां कां ? "

" मी कां रडतों ? बाबा ! तुला काय सांगूं मी कां रडतों तें ? ज्या ठिकाणीं आम्हीं सोनें वेंचलें, त्याच ठिकाणीं गोवऱ्या वेंचण्याचें कपाळीं आल्यावर आम्हांला रडें येईल नाहींतर काय होईल ? आतां तुझ्यासारख्या कळकळीच्या तरण्या ज्वानांनीं आपल्या मायभूमीच्या उद्धारासाठीं कांहीं केलें तरच तरणोपाय आहे. तूं तुझ्या वैऱ्यांवर रूस; पण मायभूमीवर रुसणें हें कोणत्याही मायभूमीच्या खऱ्या सुपुत्राला शोभणार नाहीं. तुम्ही योगायोगानुसार रोजगार–धंद्यासाठीं दूरदेशीं गेलां असलां, तरी मायभूमीचा अभिमान तुम्ही सोडतां कामा नये. मायभूमीला विसरणें, म्हणजे आईबापांना विसरण्यासारखें आहे."

" आजोबा ! मी मायभूमीला विसरलों नाहीं व विसरणारही नाहीं."

" होय ना ! शाबास ! शतायुषी हो, बाबा ! शतायुषी होऊन वाडवडिलांच्या कीर्तीत भर घाल. दादजी सुर्वे म्हणजे एक धर्मावतार होऊन गेला, अशी तुझ्या आजोबाजी कीर्ति येथले लोक अजून गातात. वर चौबुरुजीवर त्याचें थडगें आहे, तेथें लोक त्याला भजतात, त्याला नवस बोलतात, आपलीं गाऱ्हाणीं त्याच्या कानावर घालतात, व त्यांच्या भक्तीला यशही येतें. म्हातारा देवमाणूस अशी कीर्ति संपादन करून गेला, व गेल्यावरही देवपदाला पोंचला. तुझा बाप देखील फारच सज्जन माणूस होता. त्याचे देखील लोक अजून गोडवे गातात. खरें, तूं त्याच्या पहिल्या टाकलेल्या बायकोचा मुलगा ना ? "

"होय ! तुम्हाला आमच्या घराण्याची चांगलीच माहिती आहे एकूण ! "

" तर ? तें काय सांगावयाला हवें ! बरें, अलीकडे तूं रोजगारधंद्याला कोठें असतोस ? "

" रोजगारधंदा ! " एवढा एकच शब्द बोलून नानाजी एक उसासा सोडून स्तब्ध बसला.

" कां रे ? असें काय ? " म्हाताऱ्यानें विचारलें.

" आजला मला म्हणण्यासारखा रोजगारधंदा कांहींच नाहीं. याचा अर्थ रोजगार आहे म्हटलें तर आहे, नाहीं म्हटलें तर नाहीं."

" याचा अर्थ काय ? "

" आतां तुम्ही विचारतांच त्या अर्थीं मला माझी कर्मकथा तुम्हांला निवेदन करणें प्राप्त आहे. माझे बाबा येथून गेले, ते प्रथम साताऱ्याला शाहू छत्रपतींच्या चरणापाशीं गेले; व त्यांच्यामार्फत पेशव्यांच्या शिफारशीनें माझ्या बाबांना कान्होजी आंग्र्यांनीं पुन्हा नोकरींत रुजू करून घेऊन विजयदुर्ग किल्ल्यावर किल्लेदारांच्या हाताखालीं आरमाराचा मुख्य नेमलें. आणखी कांहीं दिवसांनीं कान्होजी आंग्र्यांनीं कोटकामतें हा गांव तेथील देवी भगवतीला इनाम दिला. तेव्हां तेथला जुना किल्ला माझ्या बाबांच्या ताब्यांत आला. कोटकामतें हें माझ्या आजोबांचें आजोळ. तेथें श्रीदेवी भगवतीचें महाजागृत व अतिप्राचीन असें देवस्थान आहे. आंग्रे व छत्रपति आणि पेशवे यांच्यांत मागें कांहीं राजकीय भानगडींवरून फारच वितुष्ट आलें होतें. त्या अरिष्टांतून आपली सुटका कशी होईल, या फिकिरींत कान्होजी आंग्रे होते. माझे बाबा हे त्यांचे स्नेही. त्यांजपाशीं त्यांनीं सर्व गोष्टी उभयतांमधील सेव्यसेवकसंबंध ध्यानीं न आणतां मन मोकळें करून बोलाव्या. माझ्या आजोबांप्रमाणेंच माझ्या बाबांचीही श्रीभगवतीच्या चरणीं परमभक्ति होती. आंग्र्यांवर अरिष्ट कोसळलें आहे, अशी वार्ता कळतांच बाबांनीं आंग्र्यांना उपाययोजना सुचविली कीं, श्रीभगवतीला नवस बोला म्हणजे ती तुमचें सांकडें दूर करील. आंग्र्यांनाही श्रीदेवी भगवतीचा साक्षात्कार माहीत होताच. त्यांनीं तावडतेथल्या तेथ नवस केला, कीं आपण आणि छत्रपति व पेशवे यांचें सख्य झाल्यास आपण देवीचें गोपूर बांधूं, व संबंध कोटकामतें गांव देवीला नवरात्रोत्सव व नित्यपूजा, नैवेद्य वगैरे खर्चासाठीं इनाम करून देऊं त्याप्रमाणें अकस्मात् पेशवे यांनीं स्वतः कान्होजी आंग्रे यांजपाशीं येऊन उभयपक्षीं हितकारक अशी तजवीज केली. त्यामुळें कान्होजी आंग्र्यांना परमहर्ष होऊन त्यांनीं नवसाची फेड केली; आणि माझ्या बाबांनीं हा उपाय त्यांना सुचविला, म्हणून त्यांच्या उपकारांची फेड करण्यासाठीं त्यांना कोटकामतें येथील कोटाचे किल्लेदार नेमिलें. आपले अखेरचे दिवस श्रीचरणासन्निध जावे अशी बाबांची उत्कट इच्छा होती. तिला देवानें असें यश दिलें. हीच आमच्या उत्कर्षाची परिसीमा होय असें म्हटलें तरी चालेल. कारण पुढें थोड्याच दिवसांत आमचा काळ फिरला."

" पुढें काय झालें ! "

" कान्होजी आंग्र्यांच्या हयातीपावेतों सर्व ठीक चाललें होतें. पण ते वारल्या

वर सरखेली संभाजीरावांच्या हातीं आली. तेव्हां जुन्या राजवटीच्या नोकरांची फारच कुचंबणा होऊं लागली. कारण त्याच सुमाराला सातारकर छत्रपति व कोल्हापूरकर छत्रपति यांच्यांत बेबनाव उत्पन्न झाला, व दोघांपैकीं प्रत्येकजण आपणाला कोंकणपट्टीचा स्वामी म्हणवूं लागला. एकाचीं फर्मानें यावीं, त्याविरुद्ध दुसऱ्याचीं फर्मानें यावीं. दोघांच्या परस्परविरोधी आज्ञांची एकसमयावच्छेदेंकरून अंमलबजावणी करणें हाताखालच्या अधिकाऱ्यांना कधींच शक्य नसतें; व कोणा एकाचा हुकूम मानला तरी दुसरा नाखूष व्हावयाचा; आणि मुळीं कोणाचाच हुकूम मानला नाहीं तर तो बोल लागावयाचा. आंग्रे हे वास्तविक छत्रपतीचे सेवक; पण छत्रपतींच्या घरांत दुही माजलेली पाहून आंग्रे शक्य तों स्वतंत्रपणें आपल्या ताब्यांतील मुलुखाचा कारभार चालवूं पहात. आम्ही प्रत्यक्षतः आंग्र्यांचे सेवक असल्यानें आंग्र्यांची मर्जी राखण्यासाठीं आम्हांला परस्पर आलेल्या छत्रपतींच्या हुकुमाची अंमलबजावणी करतां येत नसे. त्यामुळें छत्रपति रुष्ट असत, आणि कान्होजी सरखेलांच्या पश्चात् त्यांच्या मुलांत भाऊबंदकी माजली. तेव्हां जो उठला तो स्वतःला सरखेलांच्या दौलतीचा वारस म्हणून कारभार बळकावूं पाही."

" आंग्र्यांच्या घरच्या दुहीमुळेंच तर ही चौबुरजी सिद्दीच्या हातीं गेली ! "

" होय ना ? आमच्याकडेही असाच परिणाम होण्याची वेळ आली होती; पण शाहूमहाराजांच्या सावधपणानें ती निभावली."

" तुमच्याकडे देखील सिद्दीचा चंचूप्रवेश झाला आहे कीं काय ? "

" नाहीं. आमच्याकडे सिद्दीचा काय प्रवेश होतो म्हणा ! सिद्दी नाहीं तर त्याच्या जागीं वाडीकर सावंत पुंडपाळेगारांसारखें सांपडेल तेवढा मुलूख मांडीखालीं घालण्यासाठीं झटत होते, व अजूनही झटत आहेत. त्यांना शाहुमहाराज व कोल्हापुरकर यांच्या ताकीदपत्राची जरब आहे, म्हणून जरा बरें आहे;—पण मी काय सांगत होतों तें विसरलों." नानाजी जरा डोकें खाजवीत म्हणाला, " हं ! आठवलें. धन्याची भाऊबंदकी आम्हांला कशी नडली तें मी सांगत होतों. कान्होजी सरखेलांच्या पश्चात् शाहूमहाराजांनीं सखोजीरावांना सरखेली दिली. तेव्हांपासून कांहीं दिवस सुखाचे गेले. सखोजीरावांचा राज्यकारभार म्हणजे रामराज्य ! खरोखर, आंग्र्यांच्या कुळांत असलें अद्वितीय रत्न आजवर कधीं निपजलें नाहीं व पुढें निपजणार नाहीं."

"कां बरें ! कान्होजी सरखेल देखील कांहीं कमी पराक्रमी नव्हते ! मला तर वाटतें कीं, सर्व छत्रपतींत जसे छत्रपतींच्या गादीचे संस्थापक श्रीशिवाजीमहाराज परम श्रेष्ठ, तसेंच सर्व आंग्र्यांत सरखेलीचे संपादक कान्होजी सरखेल परम श्रेष्ठ."

"तेंहि खरेंच. पण मी त्या अर्थानें बोललों नाहीं. पराक्रम हीच केवळ कांहीं माणसाच्या थोरवीची मुख्य खूण नव्हे. कान्होजीबाबा पराक्रमी होते; पण सखोजीराव पराक्रमी असूनही गुणी होते. कान्होजीबाबांचा दरारा उभ्या कोंकणपट्टींत गाजे, व त्या दराऱ्यासमोर छत्रपति व पेशवेही किंचित् नमून असत; पण सखोजीरावांनीं आपल्या प्रेमळ प्रभुत्वानें सारें तळकोंकण आपलेंसें करून घेतलें होतें, व छत्रपति आणि पेशवे यांचाही विश्वास संपादन केला होता. आजोबा ! खरें म्हणाल तर कान्होजी सरखेलांचे पुत्र कांहीं सारेच सुघे नाहींत. बहुतेकांच्या अंगीं थोडया फार प्रमाणांत घरमोडा आडमुठेपणा मुरलेला आहे; पण सखोजीरावांनीं आपल्या हयातींत सर्व रयतेला आणि आपल्या सर्व कुटुंबालाही अत्यंत निःपक्षपातानें व परम ममतेनें वागविलें. कलिपुरुष कधींपासून आंग्र्यांच्या घराण्यांत प्रवेश करण्यासाठीं त्यांच्या दाराशीं तिष्ठत होता; पण त्या पुण्यपुरुषाच्या हयातींत त्याला दाराच्या आंत प्रवेश मिळाला नाहीं. देवाला तें गुण्यागोविंदाचें रामराज्य सहन झालें नाहीं. म्हणून त्यानें सखोजीरावांना अल्पायुषी केलें, व त्यांच्या पश्चात् खरें पाहूं जातां आंग्र्यांच्या प्रतापवैभवाचा ग्रंथ आटोपलाच. सखोजीरावांच्या पश्चात् संभाजीरावांना शाहू महाराजांकडून सरखेलीचीं वस्त्रें मिळालीं, व आम्हां सेवकांवर त्यांची हुकमत सुरू झाली.—"

"पण तें त्यांच्या इतर भावांना बघवलें नाहीं !"

"होय ! म्हणूनच घरच्या घरीं तंटेबखेडे माजून दौलतीची होळी झाली ! आम्ही धन्यांच्या चरणांचे सेवक, आम्हाला धन्यांना नांवें ठेवण्याचा अधिकार नाहीं खरा; पण वेळ आली म्हणजे खरें बोलल्याविणें राहवत नाहीं. न्याय पहातां मानाजीराव व आंग्र्यांचे इतर लेकावळे यांनीं मुद्दाम आगळिकीनें आंग्र्यांच्या मुलुखांत अपहरण चालविलें, आणि खेदाची गोष्ट ही कीं, श्रीमंत बाजीराव पेशव्यांसारख्या सुज्ञांनींही त्या अरेरावांना पाठीशीं घालून आंग्र्यांच्या घराण्यांतील खासगी द्वेषाग्नि मुद्दाम चेतविला, मग फिरंगी व इंग्रज उलटले तर त्यांना बोल कशाला ?"

"असें कसें म्हणतोस ?"

"असेंच म्हणतों. मी प्रत्यक्ष पेशव्यांचा मिंधा असलों तरी मला असें

म्हणण्याला मुळींच प्रत्यवाय वाटत नाहीं. असें पहा, संभाजीराव कसे झाले तरी कान्होजीबावांचे औरस पुत्र व सखोजीरावांनाच सरखेलीचीं वस्त्रें मिळावीं हें रास्त होतें, व शाहूमहाराजांनीं रास्त तेंच केलें होतें; पण पेशव्यांनीं ती घडी विस्कटली. त्यांनीं दौलतीचीं दोन शकलें करून दौलतीचा घात केला."

" असें पहा, तीं थोरांमोठयांचीं राजकारणें झालीं. त्यांत तुझ्या-आमच्या-सारख्या गरिबांनीं पडणें योग्य नाहीं."

" असें कसें म्हणतां ? आम्ही सेवक झालों तरी माणसेंच आहों ना ? आम्हांला झाला तरी कांहीं सारासार विचार आहेच कीं नाहीं ? आम्ही धन्याची चाकरी इमानेइतबारें करूं, धन्याच्या जिवासाठीं जीव देखील देऊं, पण धन्याशीं बेइमान होण्याचें-खाल्ल्या घराचे वांसे मोजण्याचें कमअस्सलपणाचें काम आमच्या हातून होणें नाहीं."

" एकूण तूं पेशव्यांचा सेवक आहेस तर ? "

" मी सेवक कोणाचा आहें हा प्रश्न अगदीं निराळा आहे. तसें पहातां मी आतां कोणाचाही सेवक नाहीं. सेवावृत्तीच्या बंधनांत जखडून गेलेला माणूस बंदिवान मायभूमीचें दास्यविमोचन करण्याला अगदीं असमर्थ-अगदीं कुचकामाचा ठरतो, हें स्वानुभवानें जाणून मी तीं बंधनें तटातट तोडून मोकळा झालेला आहें, मीं माझ्या ह्या मायभूमीच्या उद्धाराचें असिधाराव्रत पत्करलें आहे. असें असतांही मी आमच्या घराण्याच्या मूळच्या अन्नदात्याला विसरलोंही नाहीं, व विसरणार नाहीं. पण ज्या मायेचें दूध मी प्यालों तिच्या नरडीला डसण्याचें अधमपणाचें कृत्य करणारा निमकहराम मी नव्हें."

" असें कृत्य करण्याची पाळी तुझ्यावर आली आहे कीं काय ? "

" आली होती; पण मीं ती जुमानली नाहीं, असें मीं तुम्हांला आतांच सांगितलें नाहीं का ? तेवढ्यासाठीं तर मला जिकडे पुढा 'तिकडे मुलूख थोडा' या न्यायानें परागंदा होऊन असें ऋणंगभिकाऱ्याप्रमाणें वणवण हिंडण्याची पाळी आली आहे. पण यांतही परमेश्वराचा कांहीं सद्धेतु असेल असेंच मी मानतों."

" पण हें कसें काय झालें ? "

" त्या नाजुक व खेदकारक गोष्टी मी तूर्त बोलूं शकत नाहीं. वेळ आली कीं तुम्हांला सर्व कांहीं समजेल. "

नानाजीची इच्छा तो गुह्य वृत्तान्त सांगण्याची नाहीं असा रंग दिसताच

म्हाताऱ्यानें तो विषयच सोडला, व त्याला म्हटलें, "बरें, तें कांहीं कां असेना; पण नानाजी; तूं ह्या थळभूमीचा सुपुत्र आहेस. तुझा जन्म ह्या भूमींत झाला आहे व तुझा पिंड तुझ्या आईच्या उदरांत पोसला गेला तोही ह्याच भूमीच्या अन्नावर. ह्या अभागी भूमीनें आतां दास्यविमोचनासाठीं तुझ्यासारख्या कर्तबगार तरुणाशिवाय दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे पहावें ? बाबारे देव करतो. तें बऱ्यासाठींच करतो. रात्रीं एवढें वादळ उत्पन्न झालें.—"

"येवढें म्हणजे फारच जोराचें वादळ होतें तें. किती नावा बुडाल्या आणि किती माणसांना जलसमाधि मिळाली, याचा थांग ना पत्ता ! माझ्या पूर्वजांची पुण्याई थोर, त्या बजरंगबलीची माझ्यावर पूर्ण कृपा, म्हणून मी मरतां मरतां बचावलों. खरेंच, आजोबा ! मी बऱ्याच दिवसांपूर्वी बजरंगबलीला सव्वाशेर तेल-शेंदूर वहाण्याचा नवस केला होता. त्याच्याच कृपेनें माझ्या आयुष्याचें तारूं रोजगारधंद्याच्या किनाऱ्याला लागलें; व तें पुन्हा भरकटलें याचें कारण मीं नवस अजून फेडला नाहीं हें असेल. आतां मी अनायासें येथें आलोंच आहें, तेव्हां प्रथम मला तो नवस फेडला पाहिजे. तुम्ही माझ्याबरोबर तिकडे याल का ? वाटेंत आपण तेलशेंदूर विकत घेऊं. माझ्यापाशीं थोडे पैसे आहेत"

"बजरंगबलीला नवस !" म्हातारा हळहळत उद्गारला, "मर्दा ! तूं ज्या देवास नवस केलास, तो देव आजकाल गोमांसभक्षक अविंधांच्या पायाखालीं तीन त्रिकाळ तुडविला जात आहे.—"

"म्हणजे ?"

"आतां मुसलमान लोक नमाज पढण्यापूर्वी हातपाय धुतात ते त्या मूर्तीच्या पाषाणावर !"

"काय बजरंगबलीची त्या दुष्टांनीं अशी विटंबना केली आहे ?"

"होय. आणि त्या देवालयाची त्यांनीं आतां मशीद बनविली आहे !"

इतक्यांत ज्या दिशेला बऱ्याच मुसलमानांसह किल्लेदार गेला होता, त्या दिशेनें मुसलमानी प्रार्थनेची सूचक अशी मुल्लाची आरोळी ऐकूं आली, व 'अल्ला हो अकबर' ह्या शब्दनादानें क्षणभर सारें वातावरण कंपित होऊं लागलें. त्या नादाला अनुलक्षून तो म्हातारा नानाजीला म्हणाला, "ऐक, त्याच मशिदींतील हा ध्वनि ! मघां जे मुसलमान गेले, ते त्याच मशिदींत नमाज पढण्यासाठीं."

"एकूण देवळाची मशीद झाली !"

"होय ! आणि बजरंगाची मूर्ति अत्याचारी अविंधांच्या पायातळची पायरी बनली ! पण आपण असे या ठिकाणीं किती वेळ बोलत बसणार ? आपण आतां घरीं जाऊं; मग आपणाला मनमोकळेपणानें बऱ्याच गोष्टी बोलतां येतील. तूंही फार श्रमलेला आहेस.—"

"मी श्रमलेला आहें ही गोष्ट खरी; पण आजोबा ! बजरंगबलीची अशी दशा झालेली ऐकून मला माझ्या त्या सर्व श्रमांचा विसर पडला आहे, व सर्वांगाची अशी लाही लाही झाली आहे कीं, बजरंगबलीची अशी विटंबना झालेली असमर्थपणें ऐकून स्वस्थ बसण्यापेक्षां मरणें बरें असें मला वाटतें. आमच्या देवाधर्मांचें देखील रक्षण आम्हांला करतां येत नाहीं, तर आम्ही हिंदु कसले ? बस्स ! आजोबा, मी प्रथम त्या देवालयाच्या जागीं जाऊन दर्शन घेईन, तेव्हांच माझा आत्मा शांत होईल. मग पुढचें पुढें." नानाजी गुहेंतून बळेंच हुसकून बाहेर काढलेल्या सिंहाप्रमाणें खवळून म्हणाला.

"जरा हळू बोल !" म्हातारा नानाजीच्या तोंडावर हात ठेवीत म्हणाला, "ताज्या दमाच्या तरुणा ! जरा हळू बोल, कोणी ऐकेल तर अनर्थपात होईल."

"कां ? हळू कां बोल ? सरळ गोष्टी बोलावयाला चोरी कसली ?"

"किल्लेदाराच्या लोकांनीं हें ऐकलें तर—"

"ऐकेनात ? आपल्या जीवांत जीव असेपावेतों आपल्या देश-देव-धर्म यांच्या रक्षणासाठीं झटणें हें प्रत्येक माणसाचें कर्तव्य आहे. तेवढें देखील ज्याच्या हातून होत नाहीं, तो मनुष्य कसला ! किल्लेदाराच्या लोकांनीं माझे बोल ऐकले व किल्लेदारापाशीं जाऊन चुगली केली, तरी तेवढ्यावरून कानपिसा बनण्याइतका किल्लेदार मूर्ख थोडाच असेल ? सिद्दी राजा आहे व किल्लेदार हा त्याचा सेवक आहे. हा हिन्दू, हा मुसलमान, अशा प्रकारचा पक्षपात राजापाशीं अथवा राजाच्या सेवकापाशीं मुळींच असतां कामा नये. शिवाय किल्लेदार रक्ताचा हिन्दू आहे. तुम्हांला प्रत्यंतर पहावयाचें तर पहा, मी खुद्द किल्लेदाराला भेटून त्याच्यापाशींच ह्या अन्यायाबद्दल दाद मागेन, व बजरंगबलीचें देवालय पुन्हा होतें तसें करून घेईन. चला, आजोबा ! तुम्ही माझ्याबरोबर प्रथम त्या देवालयाकडे चला."

"पण—"

" पण काय ? आजोबा, तुम्ही तर जातकुळीचे अस्सल मराठे दिसतां. आपल्या देवाधर्मांची अशी दुर्दशा डोळ्यादेखत झालेली तुम्हांला पाहवते तरी कशी ? "

" बाबारे ! सत्तेपुढें शहाणपण नाहीं. बाटग्या किल्लेदारानेंच ही देवालयाची मशीद केली आहे. कुंपणानेंच शेत खाल्लें, तिथें रखवालदार काय करणार ? " तूं म्हणशील तर तुझ्याबरोबर तेथवर यावयाला माझी ना नाहीं. पण कृपा करून तुझ्या व तुझ्याबरोबर माझ्याही गळ्याला तात लागेल असें उतावळेपणाचें वर्तन तूं करतां कामा नये."

" आजोबा ! " नानाजी अंमळ शांत होऊन म्हणाला, " तुमच्यासारख्या म्हाताऱ्या माणसांनीं तरुण पिढीला असें ऐन वेळीं नाउमेद करावयाचें कीं धीर द्यावयाचा ? "

इतक्यांत धडाडधूम असा तोफांचा आवाज त्यांच्या कानीं आला. त्याबरोबर नानाजी कान टवकारून पाहूं लागला.

प्रकरण सहावें

# औदुंबरापाशीं

एक-दोन तीन-चार असे किती तरी तोफांचे आवाज धडाधड होऊं लागलेले ऐकून नानाजी अचंब्यानें सभोंवार पहात म्हातार्‍याला म्हणाला, "आजोबा, मानाजी आंग्र्यांच्या आरमारानें सागरगडाकडे मोर्चा वळविला वाटतें!"

"कशावरून?" म्हातार्‍यानें विचारलें.

"हे तोफांचे आवाज होत आहेत ना? मानाजीराव संभाजीरावांच्या ताब्यांतून गड हिसकावून घेण्याच्या बेतांत असल्याचें आपण मघां त्या लोकांच्या तोंडून नाहीं का ऐकलें?"

"मीं नाहीं ऐकलें."

"पण मीं ऐकलें. मध्येंच त्यांनीं तो विषय थांबविला, म्हणून तुमचें तिकडे लक्ष्य गेलें नाहीं."

म्हातारा तोफा कोठून सुटतात म्हणून वर मान करून पाहूं लागला तों खरोखरच तोफा चौबुरुजीवरून सुटत होत्या. तो नानाजीला म्हणाला, "पहा, मीं म्हटलें तेंच खरें. तोफा चौबुरुजीवरूनच डागल्या जात आहेत. मला वाटतें, इंग्रजांचें एखादें जहाज बंदरांत येत असेल, त्याच्या सन्मानार्थ ह्या तोफा सुटत असतील. त्यांच्या पडसादीवरून त्या समुद्रांतूनच सुटत आहेत, असा तुला भास झाला; पण मानाजीरावांनीं तोफा डागल्या असतील असा भास कां बरें झाला?"

नानाजीचें लक्ष्य चौबुरुजीवरील तोफांकडे वेधलें असल्यामुळें त्याला म्हातार्‍याचा शेवटचा प्रश्न ऐकूं आला नाहीं. तो आपल्याच नादांत म्हातार्‍याला म्हणाला, "आजोबा! हा काय चमत्कार?"

"काय झालें?"

"निशाण देखील खालीं उतरलें."

"होय ना?" म्हातारा निशाणाकडे पाहून म्हणाला, "खरेंच. यावरून नक्की इंग्रजांचें एखादें जहाज बंदरांत आलें असलें पाहिजे."

"इंग्रजांच्या जहाजाच्या सन्मानार्थ सिद्दीनें आपलें निशाण खालीं करावयाचें?"

" होय बाबा ! चालू जमाना असाच आहे. 'चोर ते चोर आणि वर शिरजोर' ह्या म्हणीचा हाच अर्थ."

" एकूण हे सिद्दी आजकाल इंग्रजांना इतके वचकून वागतात म्हणावयाचे !"

" होय. सिद्दी आणि मराठे यांच्या झगड्यांत आज इंग्रज, फिरंगी यांच्यासारख्यांची सद्दी जोरावली आहे खरी."

" हें दृश्य माझ्या दृष्टीला कसेंसेंच वाटतें. वास्तविक कुठचे इंग्रज व कुठचे फिरंगी ! आमच्या देशांत त्यांचा व्यापारउदीम चालावयाचा तो आमच्या मेहेरबानीवर. सिद्दी देखीलही सामान्य नव्हे; तो हिंदुस्थानांतील बादशाही सत्तेचा प्रतिनिधि. इंग्रज काय, फिरंगी काय किंवा कोणीही परके उपरे लोक काय, त्यांचें जहाज आमच्या बंदरांत शिरतांच तटावरील आमच्या निशाणाच्या सन्मानार्थ त्यांनीं आपलें निशाण उतरावयाचें. कान्होजीबाबांची कारकीर्द तुम्हांला माहीत असेलच. इंग्रज काय, फिरंगी काय किंवा कोण काय, त्यांच्यासमोर चळचळां कांपत होते. मराठ्यांशिवाय इतर कोणाचेंही जहाज बंदरांत शिरलें रे शिरलें, कीं त्यानें आपलें निशाण उतरून मराठ्यांच्या भगव्या झेंड्याला सलामी दिली तर ठीक, नाहींपेक्षां त्याच्यावर तोफा डागल्या जाऊन तें बुडावयाचें हें ठरलेलेंच. सखोजी सरखेलांचा कारभारही असाच होता, व संभाजी सरखेलांची अमदानी तर असल्या मानापमानाच्या बाबतींत केवळ अस्मानी सुलतानी आहे. थोड्या दिवसांपूर्वी सखोजी सरखेल हयात होते. तेव्हां इंग्रजांचें एक भलें मोठें लढाऊ जहाज असेंच त्यांनीं संभाजीरावांच्या साहाय्यानें पाडाव केलें होतें, व अखेर त्या जहाजावरील कप्तान हातांपायां पडला, तेव्हां मोठ्या मिनतवारीनें हजारों रुपये दंड घेऊन संभाजीरावांनीं त्या जहाजाची सुटका केली, हें तुम्हांला ऐकून माहीत असेलच."*

" होय. तें मला ऐकून माहीत आहे. तूं तर खाशांची गोष्ट सांगतोस; पण मी स्वतः एथला—" लगेच म्हातारा जीभ चावून म्हणाला, " पण बाबारे ! आतांचा काळ निराळा आहे." म्हातारा वर पाहून निशाणदांडीकडे बोट दाखवून म्हणाला, " पहा ! तें पहा तटावरचें सिद्दीचें निशाण इंग्रजी जहाजावरील निशाणाला सलामी देण्यासाठीं दांडीवरून खालीं उतरविण्यांत येत आहे."

---

* इंग्रजांचें 'रोज' नांवाचें जहाज सखोजीनें जून १७३३ मध्यें पाडाव केलें होतें, तें त्यानें इंग्रजांपासून ७६०३ रुपये दंड घेऊन इंग्रजांना परत दिलें.

नानाजी तिकडे पहात उद्गारला, " नामर्द ! गोरी कातडी दिसली कीं हे बांगडीबहाद्दर सुरवारीवरि जोडल्या हातांनीं पुढें उभे ! मग तो गोऱ्या कातडीचा पशु कां असेना ! पण काय बरें त्या कप्तानाचें नांव ? शिंच्यांचीं नांवें मोठीं चमत्कारिक, ध्यानींच रहात नाहींत."

असें म्हणून नानाजी पूर्वी पाडाव झालेल्या त्या जहाजाच्या कप्तानाचें नांव आठविण्यासाठीं डोकें खाजवतो आहे, तोंच घाईघाईनें सरदारी थाटाचा मराठा दुसऱ्या चार मराठा शिपायांसह लगबगीनें मागाहून येतांना त्याला दिसला. त्या मराठ्याबरोबर चार मशालजी होते. व मशालजींच्या मागोमाग भोई दोन पालख्या घेऊन चालत होते. नानाजीनें मशालीच्या उजेडांत त्या पालखीकडे पाहिलें, तों ती रिकामीच होती. पालखी मखमालीच्या व जरतारीच्या कलाकुसरीच्या कामानें व मणिमौक्तिकांनीं चांगलीच सजविली होती. तिचे चौखूर व्याघ्रमुखी असून सुवर्णाचे होते.

नानाजीनें त्या पालखीकडे व त्या मराठा सरदाराकडे न्याहाळून पहात हळूच म्हाताऱ्याला विचारलें, " आजोबा ! हा कोण सरदार ही खाशांची पालखी बरोबर घेऊन चालला आहे ? "

पण इतक्यांत तो तरुण मराठा सरदार अगदीं जवळ आलेला पाहून म्हाताऱ्यानें नानाजीला हातानें मागच्यामागें चिमटा घेऊन गप्प रहाण्याची इषारत देत त्या मराठा सरदाराला लवून मुजरा केला. तो मराठा सरदार आढ्यतापूर्वक जरा मान तुकावून म्हाताऱ्याचा मुजरा स्वीकारल्यासारखें करून पुढें निघून गेला. जातां जातां त्यानें नानाजीकडे भेदक दृष्टीनें पाहिलें; त्या पहाण्याचा अर्थ ओळखून म्हाताऱ्यानें नानाजीला त्या मराठा सरदाराला मुजरा करण्यासाठीं हळूच सांगितलें; पण तें नानाजीनें ऐकलें नाहीं म्हणा किंवा ऐकूनही न ऐकलेंसें केलें म्हणा, त्यानें मुजरा कांहीं केला नाहीं.

" राव ! " त्या मराठा सरदारानें आढ्यतापूर्वक म्हाताऱ्याला हाक मारून विचारलें, " तुमच्याबरोबरचा हा कोणी पाहुणा गडी दिसतो."

" होय धनी ! तो—" इतक्यांत नानाजीनें कोणालाही दिसूं नये अशा बेतानें म्हाताऱ्याच्या कानाशीं लागून 'माझी ओळख देऊं नका' असें त्याला सांगितलें. त्याबरोबर म्हाताऱ्यानें सावध होऊन तोंडचें वाक्य पुरें केलें, " तो परदेशी आहे. रात्रीच्या वादळांत त्याचें जहाज फुटून तो या किनाऱ्याला लागला आहे."

"मला तसें वाटलेंच. त्याला येथला शिरस्ता माहीत नाहीं. तुम्ही तो त्याला नीट शिकवा." असें म्हणून तो मराठा सरदार डौलानें पुढें निघून गेला.

पालखीवाले भोई मागाहून जात होते, त्यांना म्हाताऱ्यानें हळूच विचारलें, "कोणासाठीं ही पालखी चालली आहे?"

"कप्तानसाहेबासाठीं" असें उत्तर एका भोयानें दिलें, व पालखी पुढें निघून गेली.

"कप्तानसाहेबासाठीं खाशा स्वारीची पालखी!" असे स्वगत उद्गार काढून नानाजीनें एक उसासा सोडला.

इतक्यांत आणखी एक पालखी मागाहून आली. ती देखील पहिल्या पालखी-सारखीच शृंगारलेली होती. पहिल्या पालखींत व ह्या पालखींत ठळकपणें दिसणारा फरक खुरांत काय तो होता. पहिल्या पालखीचे खूर व्याघ्रमुखी होते व ह्या पालखीचे खूर गजमुखी होते. ही पालखीही रिकामीच होती. नानाजी त्या पालखीकडे पहात म्हाताऱ्याला, म्हणाला, "आणि ही बजरंगबलीच्या छबिन्याची पालखी कोठें चालली?"

म्हाताऱ्यानें त्या दुसऱ्या पालखीच्या भोयांपाशीं चौकशी केली, तेव्हां त्याला कळून आलें कीं, कप्तानसाहेबांबरोबरच सिद्दी सात यावयाचा आहे. त्याच्यासाठीं ती पालखी आहे.

"धिक्कार! धिक्कार आम्हां मराठ्यांना!' नानाजी ताड्कन् कपाळावर हात मारून घेत म्हणाला, "ज्या पालखींतून बजरंगबलीचा छबिना निघावयाचा व जिला कधीं अपवित्र अविंधांच्या छायेचा स्पर्शही होत नसे, त्या पालखीला आज एका अविंधाचे व तेही गो-ब्राह्मणांचा संहार आणि हिंदु देवदेवतांचा विध्वंस करून हिंदूंना सरीस छळून बाटविणाऱ्या अविंधाधमाचे अपवित्र पाय लागणार! आणि तें आम्ही उघड्या डोळ्यांनीं पाहून सहन करणार!"

"बाबारे! तूं पालखीचें कसलें काय घेऊन बसलास? देवच देवळांत नाहींत, तर पालखींतून कोण मिरवणार?" म्हातारा म्हणाला.

"बरें; पण तो नटूनथटून सिद्दीला आणण्यासाठीं पालखी घेऊन निघालेला सिद्दीचा लेंकावळा कोण?"

"तो तुझ्या परिचयाचा नसेल; पण नात्याचा आहे. एका शब्दांत वर्णन करा-वयाचें तर तो तुमच्या-आमच्या रक्ताचें शोषण करून वाढलेलें बांडगूळ आहे.

मेलेल्या मढ्याच्या टाळूवरील लोणी खाऊन धष्टपुष्ट झालेला तो एक जिवंत सैतान आहे." म्हातारा दांतओंठ खात कडकडा बोटें मोडीत म्हणाला, "गुलामाला देवें कधीं पाहून घेईल तेव्हां खरें!"

"तो माझ्या नात्याचा आहे? त्याचें नांव काय?"

"त्याचें नांव सुभानजी गुजर. तुझा तो सावत्र मामा लागतो."

"सुभानजी गुजर?" नानाजी एकदम गंभीर होऊन म्हणाला, "भिकाजी गुजराचा पोर व संताजीचा भाऊ सुभानजी गुजर तो हाच का?"

"होय. तुळाच नव्या अमदानींत हा येथला सरदार झाला आहे. सिद्दी साताला फितुर होऊन हा हें वैभव भोगतो आहे. म्हणूनच सांगतों काय, कीं हा मेलेल्या मढ्याच्या टाळूवरचें लोणी खाणारा आहे. आतां तो तुझा मामा आहे—"

"मरो तो मामा! मी सर्वांना ओळखतों, व वेळ आली कीं त्यांना ओळख देईन. पण मला अगोदर सांगा, ह्या सुभानजीला पुन्हा इथें थारा कसा मिळाला? यांना मध्यें थळची चौबुरुजी सोडून जावें लागलें होतें ना?"

"होय. तो वृत्तान्त तुला माहीत आहे एकूण?"

"नाहीं. फक्त मला येवढेंच माहीत आहे व तेंही सांगोवांगीचें, कीं, भिवाजी गुजराला कान्होजी सरखेलांच्या करड्या अंमलामुळें कुलाब्याची किल्लेदारी सोडून प्रबळगडाचा आश्रय करावा लागला, तेव्हां—"

"गोष्ट खरी. फार वर्षें झालीं त्या गोष्टीला. मी तेव्हां सुमार तुझ्या वयाचा असेन किंवा नसेन. त्याच भिवाजीचा भाऊ म्हणजे तुझा सावत्र आजोबा भिकाजी गुजर. अगदीं प्रथम पाहूं गेल्या गुजरांची एक खोपटी चौबुरुजीवर होती. पण भिवाजीनें कुलाब्याला जाऊन नशीब काढल्यावर त्या घराण्याची स्थिति सुधारली. सर्व बाजूंनीं वठत चाललेल्या त्यांच्या वंशवृक्षाला नवी पालवी फुटूं लागली. पूर्वी भिवाजी व भिकाजी हे दोघेही भाऊ त्याच किनाऱ्यावर मच्छीमारीचा धंदा करून पोट भरीत. पण भिवाजीचें नशीब उघडल्यावर भिकाजीलाही त्याच्या ओळखीनें त्या किल्ल्यावरील छोट्याशा आरमाराचे अधिकार मिळाले. पण बाबा! वैभव ही चीजच अशी अंमली आहे कीं, ती प्राप्त होतांच—तिचें सेवन घडतांच माणसाला कैफ चढतो. मच्छीमारीचा धंदा करणाऱ्या गुजरांची दानत त्यांना वैभव प्राप्त झाल्यावर पालटली. त्यांची बुद्धि फिरली. भाग्यश्रीनें त्यांच्याकडे पाठ केली. सद्दीचा जोर संपला. भिवाजीला कान्होजी सरखेलांविरुद्ध कांहीं लांडे कारभार

२८५४० ७७ २१४५

करावेसे वाटले, ते सरखेलांना न खपून त्यांनीं म्हणे भिवाजीला कुलाब्यांतून काढून लावलें.—"

"खाल्ल्या घराचे वांसे मोजण्याचें बाळकडूच त्यांच्या घराण्याला पाजलेलें दिसतें !"

"हो ! हो ! असेंच. भिवाजीचा अपमान होऊन त्याला प्रबळगडाकडे पळ काढावा लागला, तेव्हां येथें भिकाजीच्या मस्तकांतील किडा उसळला. तो देखील सरखेलांशीं बांकड्यानें व मत्सरबुद्धीनें वागूं लागला. सरखेलांचें अन्न खावें, व सिद्दी, इंग्रज, फिरंगी अशा शत्रूंच्या गुप्त बातमीदारांचें काम करावें, असा उद्योग त्यानें आरंभिला. त्या वेळीं त्याला ह्या चाकरीबद्दल मुंबईकर इंग्रजांकडून नेमणूक मिळे असें म्हणतात; व तें खरें असेलही. कारण आज देखील इंग्रजांकडून सालीना पांचचार हजार रुपये त्यांना इंग्रजी जहाजांच्या वाटाड्याचें काम करण्याबद्दल मिळतात असें ऐकतों. असो. पुढें कान्होजी सरखेलांशीं भिकाजीचें पुन्हा सौरस्य झालें, व भिकाजीही ह्या चौबुरुजीवरील एक बुरुक असामी होऊन बसला, हा प्रकार अर्थात् खाशांनीं चौबुरुजी सोडल्यावर झाला. कान्होजी सरखेलांच्या पश्चात् सखोजी सरखेलांनींही गुजरांचा योगक्षेम भलेपणानें चालविला. इतकेंच काय; पण येथले बापलेक गुजर सखोजी सरखेलांचे डावे उजवे हात बनून राहिले. आंतून मात्र त्यांनीं घरभेदेपणा चालविला होताच. तो पुढें इतक्या थराला गेला कीं, सखोजी सरखेल गेल्या पावसाळ्यांत सिद्दी व इंग्रज यांच्याशीं झगडतां झगडतां अकस्मात् मृत्युमुखीं पडले. त्यांच्या मृत्यूच्या मुळाशीं भिकाजी गुजराच्या येथल्या ह्या धाकट्या–पोराची सुभानजीची कारवाई होती.–इंग्रज व सिद्दी यांच्या चिथावणीवरून यानेंच सखोजी सरखेलांना विषप्रयोग करून ठार मारलें, असा लोकप्रवाद आहे."

"तसा लोकप्रवाद आहे खरा. मला माहीत आहे. कारण मी त्या वेळ्यांत आंग्र्यांच्या बाजूनें लढत होतों, तेव्हांच माझ्या कपाळीं सिद्दीची कैद आली. पण त्या गोष्टी पुढें सवडीनें बोलूं. पण मला सांगा, तो लोकप्रवाद खरा असेल का ?"

"खरा तर ! आम्हीं तेव्हां असेंही ऐकलें होतें कीं; संभाजी सरखेलांना ह्या विषप्रयोगाचा नक्की सुगावा लागला; व त्यांनीं सुभानजीला देहान्त शासन

फर्माविलेंही होतें; पण लगेच सुभानजी रातोरात पळून मुंबईला इंग्रजांच्या आश्रयाला गेला. कोणा मोठया इंग्रज अधिकाऱ्याचा त्याच्यावर फार लोभ होता म्हणे."

" आमच्यांतले देशद्रोही घरभेदे तेवढे आमच्या प्रतिस्पर्ध्यांच्या गळ्यांतले ताईत असावयाचेच !"

त्या इंग्रज अधिकाऱ्याच्या वशिल्यानें सुभानजीनें पुन्हा आंग्ऱ्यांच्या पदरीं आश्रय मिळविला, व नाना कारस्थानें करून आंग्ऱ्यांत भावाभावांत कलागती लावून देऊन ही थळची चौबुरुजी सिद्दी साताच्या घशांत लोटण्याला मदत केली. सखोजी सरखेलांच्या हाताखालीं मोठमोठया आरमारी लढायांत हा होता, व कैक दिवस ह्या चौबुरुजीवर तो होता. त्याला चौबुरुजीच्या साऱ्या चोरवाटा व माऱ्याच्या जागा खडान् खडा माहीत असल्यामुळें सिद्दीला येथें पाय रुजवावयाला फारसे परिश्रम करावे लागले नाहींत. हें पांढऱ्या पायांचें गुणी बाळ प्रथम इतकें गरीब होतें कीं, बोलण्याची सोय नाहीं. माझें व संभाजी सरखेलांचें तेव्हां सख्य होतें.तेव्हां माझ्या शब्दानें आपलें काम होईल, संभाजी सरखेल आपणाला आपल्या अपराधांची क्षमा करतील, अशा भरंवशानें हा माझ्याकडेच प्रथम आला. मी त्याला पाठीशीं घातलें, व संभाजी सरखेलांशीं त्याची सलूख करून दिली. पुढें आंग्ऱ्यांचें घरगुती भांडण सुरू झालें, व ती संधी साधून सिद्दी सातानें ह्या चौबुरुजीवर स्वारी केली. तेव्हां सिद्दीशीं लढणाऱ्या आमच्या आरमाराचा एथला तांडेल हाच होता. ह्यानेंच सिद्दीशीं फितूर होऊन आम्हां सर्वांच्या गळ्याला तात लावली, व आपले बेचाळीस पूर्वज नरकांत लोटले !"

" आणि त्या फितुरीचें बक्षीस म्हणून ह्याला येथें सरदारी मिळाली, असेंचना ?"

" होय !"

" आणि तुम्ही देखील ह्या चौबुरुजीवरील एक अंमलदार आहां वाटतें ?"

" नाहीं पण—" म्हातारा जरा गोंधळत उत्तरला, " मी याच्यापूर्वी येथला किल्लेदार होतों." तो हेतुपुरःसर विषयांतर करण्याच्या उद्देशानें म्हणाला, " पण नानाजी ! तूं जें आतां म्हणालास कीं, मानाजी आंग्ऱ्यांच्या आरमारानें सागरगडाला वेढा दिला असेल म्हणून, तें कशावरून ?"

" कशावरून म्हणजे ? आज बऱ्याच दिवसांपासून त्यांचा तसा बेत आहे.

मी आजवर राजपुरीच्या किल्ल्यांत कैदेंत होतों. तेव्हां मला ही गुप्त बातमी कळली. सागरगड घेण्यासाठीं सिद्दी सात टपला आहे. त्याचा नायनाट करण्याचा मानाजीनें विडा उचलला आहे."

"होय का? तसें झालें तर फार बरें होईल."

"काय? बरें काय होईल? आजोबा, सरखेलांची सारी दौलत त्यांच्या रांडापोरांच्या घशांत उतरली तर तुम्हांला आवडेल का? देव्हाऱ्यांत देवांच्या पादुका पुजण्याच्या ऐवजीं पुजाऱ्याचीं पादत्राणें पुजण्याची पाळी तुमच्यावर आली तर तें तुम्हाला रुचेल का? संभाजीराव तिकडे दूर विजयदुर्गाकडे कामगिरीवर गुंतून पडले आहेत. ती संधि साधून इकडे मानाजीराव एकेक गड-कोट घशाखालीं टाकीत सुटले आहेत. त्यांतलाच त्यांचा हा एक डाव आहे. कुलाब्यांत तर मानाजीचेंच एकतंत्री राज्य आहे. अर्थात् तिथें संभाजीरावांचें आसन स्थिर होणें शक्यच नाहीं. खांदेरी मराठ्यांच्या ताब्यांत आहे, म्हणजे मानाजीच्याच ताब्यांत आहे म्हणावयाची. मात्र उंदेरीवर इंग्रज ठाणें देऊन बसले आहेत. एकीकडे सागरगडाला व दुसरीकडे उंदेरीला शह देण्यासाठीं त्याला थळची चौबुरुजी जिंकणें आहे. हा त्यांचा डाव साधला तर सिद्दी साताचा ह्या टापूंत पूर्ण मोड होईल; मग संभाजीरावांना इकडे यश मिळण्याची मुळींच आशा नाहीं. म्हणूनच मानाजीची हा गड घेण्यासाठीं इतकी घडपड चालली आहे. आतां सांगा आजोबा! मानाजीनें हा गड घेऊन सरखेली बाटवावी असें तुम्हांला वाटतें का?"

"गड्या! तूं म्हणतोस तें खरें." म्हातारा म्हणाला.

"सरखेलीची सत्ता संभाजी सरखेलांसारखा पराक्रमी औरस वारस तिला असतांना मानाजीकडे जावी असें कोणाला वाटेल? पण एथली परिस्थिति फार निराळी आहे."

"काय परिस्थिति आहे? सागरगडचा किल्लेदार हंबीरराव थोरात धन्याशीं इमानेंइतबारें वागतो आहे. सर्व कांहीं ठीक आहे."

"वरवर दिसावयाला सर्व कांहीं ठीक आहे; पण वर तुकतुकीत दिसणाऱ्या शरीरांतील काळजांत क्षयासारख्या भयंकर रोगानें ठाणें मांडलेलें असलें तर? इमारत मारे सातमजली व भव्य दिसली, तरी तिचा पाया घुशींनीं पोंखरला असल्यास तिला कोसळावयाला कितीसा वेळ लागेल बरें?"

"असा प्रकार सागरगडच्या बाबतींत तरी असेलसें मला नाहीं वाटत. निदान हंबीरराव तेथें किल्लेदार आहे तोंवर तरी अशी अंदाधुंदी तेथें शक्य नाहीं."

"पण मी एथला रहिवासी, माझे काळ्याचे पांढरे इथें झाले, मला जास्त माहिती असेल कीं तुला? बाबारे! हंबीरराव सच्चा माणूस आहे खरा; पण तो आतां अगदीं म्हातारा झाला आहे. त्याला स्वतःचा देह सांवरण्याची पंचाईत, तो गड काय सांभाळणार! आज वर्षभर तर तो अंथरुणाला खिळलेला आहे. तें पिकलें पान केव्हां झडेल याचा नेम नाहीं. तो आतांशा नुसता नांवाचा किल्लेदार आहे. खरा कारभार त्याच्या नतद्रष्ट जांवयाच्या हातीं आहे."

"तो जांवई कोण?"

"तुझा मामा सुभानजी!"

"पण सुभानजी सिद्दीचा सरदार आहेना?"

"होय. पण म्हणून कांहीं त्याचा गडाशीं व सासऱ्याशीं संबंध तुटला अशांतली गोष्ट नाहीं! सासरे–जांवयांचें कांहीं बाबतींत पटेना व सुभानजीला भावी लाभावर नजर देऊन तुटेपर्यंत ताणावयाचें नव्हतें; त्याप्रमाणेंच पुढें मागें आपलें व सासऱ्याचें मुळींच पटलें नाहीं, तर सिद्दीच्या राज्यांत आपणाला जागा असावी असेंही सुभानजीला वाटलें. एवढ्याचसाठीं त्यानें सिद्दीची सरदारी पत्करून अलीकडे चौबुरजीवर वास्तव्य केलें आहे. यांतही साधलें तर बारसे नाहींतर बारावा असा त्याचा डाव आहेच आणि सिद्दीचा कावा तर याहून खोल आहे. शक्य तर आंग्र्यांच्या डोळ्यांवर न येतां सिद्दीला सागरगड घशांत टाकावयाचा आहे. त्यानें मानभावीपणानें म्हाताऱ्या थोरातांशीं संधान बांधून त्याच्याच संमतीनें सुभानजीला तेथला किल्लेदार नेमण्याचें ठरविलें आहे. आतां जांवयाच्या लोभाला हंबीरराव बळी पडेल, व सुभानजी लौकरच सागरगडचा किल्लेदार होईल. बरें; सुभानजी तर सिद्दी साताच्या ताटाखालचें मांजर आहे सिद्दीकडील आपली सरदारकी टिकविण्यासाठीं व जास्तजास्त मानवैभव मिळविण्यासाठीं तो सिद्दीच्याच तंत्रानें आजवर चालत आला तसा पुढेंही चालणार हें उघड आहे. तात्पर्य काय कीं, आजदेखील सागरगड तत्त्वतः सिद्दीच्याच ताब्यांत आहे असें समजावयाला मुळींच हरकत नाहीं. सुभानजीला सांगून सिद्दी सातानें गडावरील भगव्या झेंड्याच्या ठिकाणीं आपलें हिरवें निशाण फडकविण्याची काय ती बाकी आहे. आणि सुभानजी तेवढेंही करील. फार काय, तो स्वार्थासाठीं बाटावयालाही तयार होईल, इतका

तो कर्मचांडाळ आहे. बरें; संभाजी सरखेलांची इकडे तूर्त तरी कांहीं मात्रा चालावयाची नाहीं. आतां मला सांग, अशा स्थितींत मानाजी आंग्र्यानें गड काबीज केला तर त्यांत काय वाईट झालें ? मानाजी दुष्ट असला, लेकावळा असला, तरी तो आंग्र्याचें घर मारून कुठच्या कोणा चोरा–लुटारूंची भर तर करणार नाहीं ना ? ”

“ नाहीं. तेवढी मात्र मी मानाजीचा हाडवैरी असूनही खात्री देईन. वैऱ्याचा देखील गुण असेल तो घ्यावा. मला ही आंतली फितुरी माहीत नव्हती, म्हणून मी प्रथम तसें म्हणालों. पण आतां मलाही वाटतें कीं, गड मानाजीच्या स्वाधीन झालेला बरा. संभाजीराव व मानाजीराव यांच्या पुरताच विचार जेव्हां आपण करूं, तेव्हां आम्हांला मानाजीपेक्षां संभाजीराव जवळचे. पण आंग्रे विरुद्ध सिद्दी ह्या भांडणांत मानाजीरावच काय; पण शत्रूशीं फितूर न होणारा कोणताही हिंदु आम्हांला जवळचा. मानाजीरावांनीं दौलतीशीं प्रतारणा चालविली आहे, माझें घराणें धुळीला मिळविलेंही त्यांनींच. हें सारें खरें असलें तरी, आजोबा ! अशा निकराच्या वेळीं सच्च्या दिलाच्या हिंदूनें असल्या आपसांतील भांडणांना प्राधान्य देतां कामा नये. बस्स ! आपण आतां प्रथम गड राखण्याच्या तयारीला लागलें पाहिजे. त्या बजरंगबलीनें मानाजीना ह्या गडाकडे लौकर मोर्चा वळविण्याची सुबुद्धि द्यावी.

इतक्यांत साहेबाची मिरवणूक पहाण्यासाठीं बरेच लोक ठाकठिकीचे पोषाक करून किनाऱ्याकडे चाललेले म्हातारा व नानाजी ह्या दोघांनाही दिसून आलें. त्यांतल्या त्यांत कोणीं म्हाताऱ्याला कुशलवृत्त पुसावें, कोणीं त्याला बरोबर मिरवणुकींत बोलवावें, कोणीं 'बरोबर कोण आहे हा नवा पाहुणा' अशी आगंतुक चौकशी करावी, असा प्रकार सुरू होताच. तें म्हातारा व नानाजी ह्या दोघांनाही रुचेना.

“ आजोबा ! आपणाला बजरंगबलीच्या दर्शनाला जावयाचें आहे. मी विसरावयाचा नाहीं. चला–मला इथें उभें राहणें फारसें सुरक्षितपणाचें वाटत नाहीं. उगाच कोणी तरी पाहील, व सिद्दी सातापाशीं जाऊन चहाडी करील कीं मग माझीं शंभर वर्षें भरलींच.” नानाजी उठून उभा राहून म्हणाला.

“ मला देखील तेंच भय वाटतें. आधींच सिद्दी सातानें मला शत्रु ठरवून येथून हाकलून लावलें आहे. पलीकडचें बजरंगगड खेडें हंबीररावाच्या इनामतीचें आहे.

म्हणून हंबीररावाच्या कृपेनें मला तेथें घर करून राहतां येत आहे इतकेंच. पण तूं नानाजी सुर्वे आहेस व मी तुझ्याशीं बोलत बसलों होतों अशी बातमी सुलतानाला कळावयाचा अवकाश, कीं त्यानें सिद्दी साताचे कान फुंकून मला गाडलेंच म्हणून समज.'' म्हातारा उठून म्हणाला, “ त्यापेक्षां आपण येथून पाय काढावा हें चांगलें.”

म्हातारा पुढें व नानाजी मागें असे दोघेही मार्गाला लागल्यावर नानाजीनें विचारलें, '' इतकें का तुमच्याशीं सुलतानाचें वैर आहे? वास्तविक तुम्ही त्यांच्या कोणत्याही भानगडींत पडत नाहीं. तुमच्याशीं वैर करण्याचें त्याला काय कारण? ”

“ काय कारण ! ” म्हातारा एक सुस्कारा सोडून म्हणाला, “ बाबा, तुला कारण काय सांगूं! माझ्या पदरीं माझ्या प्राणांचाही प्राण इतकी आवडती माझी एक अभागी मुलगी आहे. ती अजून लग्नाची आहे. ती तरुण, सुंदर व सद्गुणी आहे. हाच तिचा अपराध! ती सर्वांच्या डोळ्यांत सलते आहे. खरोखरच माझी चांगुणा अभागी म्हणून माझ्या पोटीं जन्माला आली. तिचें नशीबच खोटें,म्हणून माझ्या कपाळीं आयुष्याच्या अखेरीला हा अज्ञातवास आला. माझा चालता काळ असता, तर एव्हांना तिचें लग्न होऊन ती एखादी सरदारीण किंवा राणी होऊन सुखानें संसार करूं लागली असती. मी तिची एका ठिकाणीं सोयरीक जमविली देखील होती. पण चौबुरुजी सिद्दीच्या हातीं जाऊन मी देशोधडीला लागतांच त्या गृहस्थानें मज गरिबाशीं सोयरीक करण्याचें नाकारलें.”

“ इतक्या हलक्या मनाचा तो गृहस्थ होता ! लग्न सासऱ्याच्या मानमरातबाशीं किंवा संपत्तीशीं थोडेंच करावयाचें असतें ! ”

“ यांत त्या गृहस्थाचा मोठासा दोष नाहीं. जगांत माणसाला असा मुळींच मान नाहीं. मान माणसाच्या सत्तेला व संपत्तीला आहे. तूं देखील उद्यां मोठमोठे पराक्रम गाजवून मानमान्यतेला चढलास, धन्यांनीं तुझ्या कामगिरीवर खूष होऊन तुला दहा पांच हजार स्वारांची मनसबदारी दिली, कीं आजचा तो तूं मग उरणार नाहींस.”

“ तसेंच व्हावयाचे असेल. मोठेपणा व वैभव प्राप्त झाल्यावर मला जर माणुसकीचा विसर पडणार असेल तर मी देवाजवळ आजच अशी प्रार्थना करतों कीं, देवा ! मला माणूसच ठेव.”

“ बरें, तुझें लग्न झालें आहे का ! ”

“ होय. माझें लग्न तरवारीशीं झालें आहे. बाजीराव पेशव्यांनीं मागें

रायगड सर केला, तेव्हां तरवारीशीं माझें लग्न लावून देऊन माझा संसार थाटून दिला आहे." हे शब्द बोलतांना नानाजीचें मुख हंसरें झालें. त्यानें हंसतमुखानें विचारलें, " पण आजोबा ! तुम्हीं हें कां बरें विचारलें ? "

" आतांच काय त्याचें ? देवदयेनें तूं आणि मी मिळून धन्याची कांहीं सेवा तर करूं ! तोंवर संभाजीबाबाही सगळ्या अरिष्टांतून मोकळे होतील. मग पाहूं. माझी तर तुला पाहून फार इच्छा आहे कीं, माझी चांगुणा तुझ्या पदरीं पडावी. असेल योगायोग तसें होईल."

नानाजी यावर कांहींच बोलला नाहीं. ही नाजुक बाब आहे. आपण आजच बोललों यापेक्षां जास्त बोलतां उपयोगी नाहीं, असा विचार करून म्हाताऱ्यानेंही तो विषय तेथेंच थांबविला. कांहीं वेळपर्यंत दोघेही एकमेकांशीं कांहीं न बोलतां वाट चालत होते. नानाजी चालतां चालतां मध्येंच वाटेंत एका औदुंबराच्या पारापाशीं थबकून उभा राहिला.

म्हाताऱ्यानें मागें वळून विचारलें, " नानाजी ! कांरे थांबलास ? ह्या झाडाकडे काय पहातोस ? "

नानाजीनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. तो एकाएकीं कां थबकला हेंच म्हाताऱ्याला कळेना.

नानाजी कां बरें थबकला असेल ?

प्रकरण सातवें

# बजरंगबलीच्या आवारांत

"आजोबा! आजकाल देवांनीं देवपण अगदींच सोडलें काहो?" नानाजीच्या तोंडून ओघानेंच उद्गार निघाले.

काळाच्या ओघाबरोबर परिस्थिति पालटत जाते, व सृष्टींतील घडामोडी काळ आणि परिस्थिति यांच्या ओघाप्रमाणे सतत सुरू असल्यानें सृष्टीचें जें स्वरूप काल होतें तें आज दिसेल किंवा आजचें उद्यां दिसेल, अशी शाश्वती मुळींच नाहीं. निसर्ग व नियति जीवसृष्टींतील नव्या नव्या पिढ्या नित्य जन्माला घालीत असतात, व काळपुरुषाच्या नेत्रांच्या उघडझापीबरोबर सृष्टि ठायींठायीं उलथीपालथी होत असते. नानाजी सुर्वे आपल्या पित्याच्याबरोबर परागंदा झाला, तेव्हां पांचसात वर्षांचा असेल नसेल, तोच नानाजी आज हाडापेरानें खबरदार असा मर्द होऊन आपल्या भूमीला आला. तेव्हां त्यानें आपण अमक्याचा अमका असें सांगितल्याशिवाय त्याची कोणाही स्थायिकाला ओळख पटणें शक्य नव्हतें. त्याप्रमाणेंच तेथल्या स्थल–काल–परिस्थितींत येवढें परिवर्तन घडून आलें होतें कीं, तेथली प्रत्येक बाब नानाजींच्या दृष्टीला नवीन अगदीं परकीच दिसत होती. बजरंगबलीच्या देवालयाकडे जाण्याच्या मार्गावर फार प्राचीनकाळापासून अनेक लहान-मोठीं हिंदू देवालयें होतीं, तीं सर्व आतां इतकीं निकृष्टावस्थेला पोंचलीं होतीं कीं, कोणाला वाटावें, आज जणुं अर्धेपावशतक येथें सिद्दीची जुलुमी सत्ता नांदत आहे! इतकेंच काय पण त्यांच्या चौथऱ्याला चौथरे भिडवून मृत मुसलमानांच्या नांवानें थडगीं बांधण्यांत आलेलीं होतीं! एक फार प्राचीन काळचा प्रचंड औदुंबर वृक्ष त्याच वाटेवर होता. तें देवस्थान आहे असें सर्व लोक म्हणत, व अत्यंत पूज्य भक्तिभावानें त्याची पूजा करीत. चौबुरजीवर कोणतेंही एखादें मानवी अथवा दैवी संकट कोसळलें अथवा कोसळण्याचा रंग दिसूं लागला तर त्या दत्तस्थानाला अनुष्ठानें सुरू होत, व भजन–पूजनाला सारा गांव तेथें लोटे. दरसाल श्रीदत्ताचा वार्षिक उत्सव किल्लेदाराच्या मार्फतीनें खास सरकारांतून होई, व त्याप्रीत्यर्थ सरकारी खजिन्यांतून पांच-सात हजार रुपये तरी सहज खर्चा पडत. दूरदूरच्या गांवाहून अनेक भाविक लोक त्या देव

स्थानापाशीं येत व खुद्द आंग्रे सरकारही निदान उत्सवाच्या शेवटच्या दिवशीं तरी प्रसादग्रहणासाठीं तेथें यावयाला चुकत नसत. नानाजीनें किल्लेदाराचा पुत्र या नात्यानें हें सारें वैभव पाहिलें होतें. त्यानें त्या देवस्थानाच्या पाराचे चिरे मोडून इतस्ततः विखुरले आहेत, पारावरची जागा शेणगोंवऱ्यांखालीं झांकून गेली आहे, पशुपक्ष्यांनीं त्या जागेची अत्यंत नासधूस केली आहे, गोभक्षकांनीं तेथें अपवित्रतेची परमावधी केली आहे, अशी त्या देवस्थानाची सर्व बाजूंनीं दुर्दशा झालेली पाहूनच नानाजी तेथें थबकला होता, व देवांच्या देवपणाविषयीं त्याला संशय येऊं लागला होता.

म्हातारा त्यावर निराशेनें उत्तरला, "बाबा ! माणुसकी सोडली कीं देवदेखील देवपणाला जागेनासा होतो."

असेंच कांहीं बोलत बोलत ते दोघे सावकाश अर्धघटका रात्रीला बजरंगबलीच्या देवालयाजवळ गेले तों देवालयासभोंवारच्या विस्तीर्ण बागेंत जाण्याच्या चिरेबंदी दिंडीला लागून पूर्वीं जेथें तुळशीचे गेंदेबाज ताटवे मंजिऱ्यांनीं डवरलेले दिसत तेथेंच तितक्याच उंचीचें सब्रज्याचें बन वाढलेलें नानाजीला दिसलें होतें. बागेच्या आंत जातांच डाव्या हाताला एक सुंदर पुष्करिणी होती, व पलीकडे पुष्करिणीची विहीर होती. पुष्करिणीच्या एका बाजूला गायमुख होतें. त्या गायमुखांतून पुष्करिणींतील पवित्र जलाचा प्रवाह पूर्वीं अष्टौप्रहर सुरू असे. तो प्रवाह आजही पूर्ववत् सुरू होता. पण तें गायमुख मात्र छिन्नविच्छिन्न झालेलें होतें. पूर्वीं म्हणजे नानाजीचाच बाप थळचा किल्लेदार होता तेव्हां, देवाचा पुजारी रोज सोंवळ्यानें ह्या पुष्करिणीचें पाणी नेऊन त्याचा देवावर अभिषेक करी, व अभिषेकाचें तीर्थोदक–पुन्हा तळ्यांत आणून ओती. गायमुखावाटे वहाणारें तें तीर्थोदक भाविक लोक शुचिर्भूतपणानें प्राशन करीत व कोणी व्याधिग्रस्त असल्यास त्या व्याधिहरणार्थ त्या जलानें स्नान करीत हें नानाजीनें पाहिले होतें. त्या जलाच्या अंगीं व्याधिहरणाचें अपूर्व सामर्थ्य आहे अशी भाविकांची श्रद्धा होती. पण आज नानाजीनें तेथें जाऊन पाहिलें तों त्या जलाशयासभोंवारच्या कठड्यावर नमाज पढावयासाठीं आंत गेलेल्या मुसलमानांचीं पादत्राणें ठेवण्यांत आलेलीं त्याला दिसलीं.

नानाजीनें दुःखाश्रूंनीं डबडबलेले दोन्ही डोळे मिटून घेत म्हटलें, "शिव ! शिव ! माझ्याच्यानें हा अनर्थ पाहवत नाहीं."

" एवढ्यानेंच काय झालें आहे ? खरा अनर्थ तो यापुढेंच पहावयाचा आहे. असें पहा कीं, हे सभोंवार छिन्नभिन्न झालेले देव मूळचे नुसते दगड होते; त्यांना अनादिसिद्ध बजरंगबलीच्या प्रभावळींत स्थान मिळाल्यामुळें देवपणा प्राप्त झाला होता. सज्जनांचा व समर्थांचा सहवास जसा सजीव सृष्टीला मान्यतेला चढवितो, तशीच बजरंगबलीच्या सहवासानें येथल्या सृष्टींतील जल–तरु–पाषाणमात्राला देवकळा प्राप्त झाली होती. येवढें ज्या बजरंगबलीचें माहात्म्य, ती बजरंगबलीची मूर्ति आजकाल मुसलमानांच्या पायांखालीं तीन त्रिकाळ तुडविली जात असलेली तुला अजून पहावयाची आहे. चल, मी तीं तुला दाखवितों."

म्हाताऱ्यानें तोंडानें नानाजीला बजरंगबलीची मूर्ति दाखविण्याचें कबूल केलें; पण तेवढ्यांत नमाज आटोपून सारे मुसलमान घरीं जाण्यासाठीं मागें वळलेले पाहून म्हाताऱ्याचे पाय जागच्या जागीं गोंधळूं लागले. त्यानें नानाजीला हातानें मागें खेंचीत हळूच सांगितलें, " जरा थांब."

" कां ? " नानाजीनें विचारलें.

" ते लोक एकदां निघून जाऊं देत. मला वाटलें होतें कीं ते गेले असतील."

" त्या लोकांचें आम्हांला कसलें भय ? "

" भय नाहीं कसें ? येथला बाटगा किल्लेदार मोठा कडवा माणूस आहे. कोणालाही देवदर्शनाच्या लालसेनें येथें आलेला पाहतांच त्याला मोठा अपशकुन वाटतो. तो त्या हिन्दूस निष्ठुरपणें शासन करावयाला मागेंपुढें पहात नाहीं. थोड्या दिवसांपूर्वींचीच गोष्ट, एक तरुण विधवा बेल नेण्यासाठीं ह्या बागेंत आली असतांना किल्लेदार मशिदींतून नमाज पढून बाहेर पडला, त्याला भेटली. किल्लेदाराला वाटलें कीं, आपणांला अपशकुन झाला. त्यानें तिची तेथल्या तेथें आपल्या नोकरांकडून विटंबना करविली."

" आणि ती तुम्हीं निमुटपणें सहन केली ! अशा मदांधांच्या हातून बायकामुलींची व देवाधर्मांची विटंबना होत असलेली पहावयाला जिवंत रहाणाऱ्या षंढांचें जिवंतपण शहाणें जग कधींच जमेला धरीत नसतें. इतका हलकल्लोळ ह्या मदांध सैतानानें उडवून दिला असतां त्याचा प्रतिकार करण्याची ताकद येथल्या हिंदूंना नाहीं; असले बावळट लोक हिंदु म्हणवून घेण्याला अगदीं नालायक आहेत असेंच मी म्हणतों.

" लोक तरी काय करतील ! त्यांच्या हातीं शस्त्रेंदेखील ह्या नव्या किल्लेदारानें ठेविलीं नाहींत. अर्थात् हा अंमल फक्त हिंदूंच्या बाबतींत तेवढाच जारी झाला. मुसलमानांकडे कोणी वांकड्या डोळ्यांनीं ढुंकूनही पाहिलें नाहीं, किंवा त्यांनीं हिंदू रयतेचा कसाही व कितीही छळ केला तरीही त्याची कोणीं दाददेखील घेत नाहीं."

" हरामखोर ! रयतेला शस्त्रासाठीं नागविलें म्हणजे सुखानें राज्य करतां येईल असें किल्लेदाराला वाटत असेल; पण त्यांनीं याद राखून ठेवावी कीं, राजाचें आणि राज्याचें मरण रयतेच्या असंतोषांत असतें. एक वेळ अशी येईल कीं, त्या अरेरावांना म्हणावें, तुमच्या गांजणुकीनें गांजलेली रयत जिवावर उदार होऊन देव, धर्म व स्वतःची आणि स्वतःच्या बायकामुलांची इभ्रत व अब्रू रक्षण करण्यासाठीं मारूं किंवा मरूं अशा निर्धारानें पुढें पाऊल टाकील; तेव्हां रयतेच्या मनगटांत वज्र-मुष्टीचें सामर्थ्य उत्पन्न होईल व ती आपल्या शत्रूंच्या ओल्या कातड्याच्या पाय-घड्यांवरून मराठ्यांचा भगवा झेंडा हातीं घेऊन तो प्रत्येक किल्लेकोटांवर फडक-विण्यासाठीं 'हरहर महादेव' असा जयघोष करीत चालत जाईल." नानाजी जरा थांबून पुन्हा हलक्या आवाजांत म्हणाला, " आजोबा ! येथला किल्लेदार बाटगा आहे असें तुम्ही म्हणालां, नव्हे का ? "

म्हातारा भीतीनें अगदीं गांगरून जाऊन नानाजीला जरा गप्प रहाण्यासाठीं एकसारखा हातानें खुणावीत होता. कारण किल्लेदार मशिदींतून सर्व मंडळीसह निघाला तो आतां त्याच मार्गानें बाहेर पडावयाचा होता, व इतर मुसलमान आपलीं पादत्राणें घेण्यासाठीं पुष्करिणीवर यावयाचे होते. नानाजीनें किल्लेदार बाटगा असल्याची गोष्ट काढावयाला व दुरून किल्लेदाराची त्या दोघांकडे दृष्टि वळावयाला एक गांठ पडली. किल्लेदारानें स्वाभाविकपणें समोर पाहिलें असेल; पण म्हाताऱ्याला वाटलें कीं, त्यानें मुद्दामच आपणाकडे पाहिलें. तितक्यांत किल्ले-दार बरोबरच्या एका मुसलमानाशीं बोलण्यांत गढून गेलेला पहातांच तेवढी संधि साधून म्हाताऱ्यानें नानजीला हळुहळू पण आग्रहपूर्वक सांगितलें, " नानाजी ! किल्लेदार अजून इथेंच आहे. तो येथें नमाज पढत होता हें मला माहीत नव्हतें. त्याला चुकवून आपण येथून बाजूच्या रस्त्यानें मागील बाजूला जाऊं कसे ? "

" कां म्हणून ! "

"हळू, जरा हळू बोल!" म्हातारा नानाजीला हाताशीं धरून बळेंच बाजूच्या जाईच्या मंडपाआड ओढून नेत म्हणाला.

तेवढ्यापुरता तरी म्हाताऱ्याचा उद्देश सफल झाला. किल्लेदार सर्व मुसलमानांच्या घोळक्यांत मशिदीच्या आवाराबाहेर जाईतों नानाजीला आंवरून धरतां धरतां म्हाताऱ्याला पुरे वाट झाली. सर्व मुसलमान पादत्राणें नेण्यासाठीं पुष्करिणीवर आलेले पहातांच नानाजीनें दांतओठ चावीत 'या मदोन्मत्तांच्या पायांच्या स्पर्शानें अपवित्र झालेली पुष्करिणी मी त्यांच्याच रक्तानें धुवून पवित्र करीन तरच मराठ्याचें नांव सांगेन' असे उद्गार काढले. पुष्करिणीवरील मुसलमानांना ते ओझरते ऐकू गेले व त्यांनीं एकवार सभोंवार पाहिलेंही; पण म्हातारा व नानाजी हे दोघेही जाईच्या मंडपाआड उभे असल्यामुळें ते कोणालाही दिसूं शकले नाहींत.

किल्लेदारालाही ते उद्गार ऐकूं गेले. त्यानें घाबरटपणानें सर्व मुसलमानांना अनुलक्षून विचारलें, "आतां कोणी बोललेंसें वाटलें. खरें ना याकूब?"

"होय किल्लेदारसाहेब!" सिद्दी याकूब उत्तरला.

"कोण तें?" किल्लेदारानें पुन्हा कानोसा घेत विचारलें.

"सैतान!" उत्तर मिळालें.

"सैतान!" बऱ्याच मुसलमानांच्या तोंडून एक समयावच्छेदेंकरून उद्गार निघाले. किल्लेदारासह सर्व मुसलमान जास्तच घाबरटपणानें एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले. इतक्यांत आणखी कांहीं कुजबूज कांहीं मुसलमानांना–विशेषतः किल्लेदाराला ऐकूं आली. त्याबरोबर तो जो बाजूला उभा होता तो प्रथम सर्व मुसलमानांच्या घोळक्यांत येऊन उभा राहिला, व म्हणाला, "येथल्या सैतानाला तुम्हीं गाडलें होतें ना?"

"होय!" एक मुसलमान उत्तरला.

"मग तो पुन्हा कसा मोकळा सुटला?" किल्लेदारांनीं प्रश्न केला.

एक शिपाई उत्तरला, "किल्लेदारसाहेब! आपल्या दुष्टाव्यावर टपलेल्या कोणा माणसानें दावा साधण्यासाठीं त्या सैतानची मोकळीक केली असेल; किंवा दुसरा एखादा खवीस उठवून घातला असेल! समंध, सैतान, खवीस, देवचार, झोटिंग, असल्या पिशाच्चांना येथें मुळींच दुष्काळ नाहीं. येथें बजरंगबलीचें देवालय बांधण्यापूर्वी मसणवटच होती. सुर्वे किल्लेदाराचा लाभकाळ येथें उदेला, म्हणून या भूमीचें भाग्य उदयाला आलें."

नानाजी व तो म्हातारा यांचें संभाषण जरी पुष्करिणीजवळील मुसलमानांना ऐकूं येत नव्हतें, तरी ते दोघे मात्र साऱ्या मुसलमानांची कल्पनेच्या पिशाचानें त्रेधा तिरपट् उडवून दिलेली ऐकत होते. त्या शिपायानें मसणवटीचा व पिशाचांचा निर्देश करतांच इकडे नानाजी स्वगत म्हणाला, "तुम्हीच सैतान! तुम्हीच खवीस! तुम्हीच समंध! तुम्हीच झोटिंग! हरामखोरांनो! तुमच्या सहवासानें मात्र ह्या देवभूमीला सध्यां मसणवटीचें भयाण व अमंगल स्वरूप प्राप्त झालें आहे खरें!—ह्या सर्व पिशाच्चांना गाडल्याखेरीज गत्यंतर नाहीं."

"हळू बोल! बाबा, हळू बोल!" म्हातारा नानाजीला क्षणोक्षणीं दाबीत होता व त्याच्या तोंडावर हात ठेवून त्याचें तोंड बंद करण्याचा प्रयत्न करीत होता.

मुसलमानांच्या गांवीं तें मुळींच नव्हतें. त्यामुळें त्यांच्या बोलण्यांत नानाजीच्या स्वगत शब्दांनीं मुळींच खंड पडला नाहीं. त्या शिपायानें पिशाच्चांची परवड लावतांच पिशाचसृष्टीच्या पूर्वींच सर्व मुसलमानांची पूर्वस्मृति मात्र एकसमयावच्छेदेंकरून जागृत झाली, व तर्ककुतर्कांच्या लहरींवर नाचूं लागली.

दुसरा एक शिपाई समोरच्या एका उंचच उंच माडाच्या (नारळीच्या) झाडाकडे बोट दाखवून म्हणाला, "हा माड त्या किल्लेदाराचा फार आवडता होता. आपल्या एका आवडत्या मृत पुत्राच्या नांवानें त्यानें त्या माडाचें बीजारोपण केलें होतें; व जितका तो आपल्या पुत्राच्या जिवाला जपला असता, तितका ह्या माडाला जपे. अलीकडे हा माड सुकत चालला व तो किल्लेदारही अलीकडेच कधीं तरी वारला असें आमच्या कानीं आलें आहे. त्यावरून आम्हांला वाटतें कीं, त्या किल्लेदाराच्या समंधानें हें झाड धरलें असावें. पुष्कळ लोकही सांगतात कीं, अलीकडे तिन्हीसांजांच्या वेळीं कधीं कधीं तो समंध ह्या पुष्करिणीवर बसलेला आढळतो."

"अलीकडे चौबुरुजीवर देखील अपरात्रीच्या वेळीं कोणी तरी इकडून तिकडे घिरट्या घालीत असल्याचा भास मला होतो. बहुधा तो समंधच असावा." किल्लेदारानें शिपायाच्या तर्काला पुष्टि दिली.

तेव्हांच नानाजी एकदम उसळून अंमळ मोठ्यानें म्हणाला, "बाटग्या! विश्वासघातक्या! हा समंध येथें आला आहे; तो तुझ्या मानगुटीला बसून तुझा नायनाट करील तेव्हांच शांत होईल."

म्हाताऱ्यानें नानाजीचें तोंड दाबण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला, तरीही

आवेशाच्या भरांत त्याच्या तोंडून ते शब्द अंमळ जोरानेंच निघाले. किल्लेदार व इतर मुसलमान यांना ते ओझरते ऐकूं गेले, त्याबरोबर सर्वांच्या अंगाला भीतीनें कांपरें भरलें.

"ऐका ! हा कोणाचा शब्द ?" किल्लेदारानें भयचकित मुद्रेनें सभोंवार पहात विचारलें.

"बोलूं नका." एक मुसलमान म्हणाला. "अशा कातरवेळीं येथें रहाणें बरें नाहीं. आपण आतां येथून जावें हें उत्तम; आणि उद्यां एखादा पंचाक्षरी बोलावून ह्या पिशाच्चांचा बंदोबस्त करावा."

"बंदोबस्त जरूर केला पाहिजे." दुसरा एक मुसलमान म्हणाला. "आणि त्याबरोबरच अशीं भुतें घालणाऱ्या हरामखोरांना पकडून त्यांचाही नायनाट केला पाहिजे. भुतें घालतात म्हणजे काय बिशाद आहे !"

सिद्दी याकूब म्हणाला, "माझी तर अशी ठाम समजूत आहे कीं, हें काम त्या पाजी भानाजी पिसाळाचें असावें. तो फार नीच मनुष्य आहे. पूर्वीच्या किल्लेदाराचें निर्मूलन त्यानेंच हरउपायांनीं केलें. त्या किल्लेदाराच्या पश्चात् त्याला स्वतःला येथली किल्लेदारी मिळावयाची होती. तो त्याचा डाव हुकल्यामुळें तो अगोदरच नाराज झाला होता, व आतां त्याची दुय्यम किल्लेदारीही त्याच्या हातची जाऊन त्याची पोर तुरुंगांत पडल्यामुळें तर तो अगदीं वेडापिसा होऊन, किल्लेदारसाहेब ! तुमच्यावर व आम्ही तुमचे साह्यकारी म्हणून आमच्यावर-देखील उलटला आहे. नेहमीं त्याची देवदेवस्की चाललेली असते. तो वाटेवरचा औदुंबराचा पार त्याच्या प्रदक्षणांनीं गेल्या वर्ष-सहा महिन्यांत वीतभर तरी झिजला असेल ! त्या औदुंबरावर कोणी जाज्वल्य पिशाच आहे, त्याला प्रसन्न करून त्याच्या साहाय्यानें आम्हां सर्वांची वाताहात उडविण्याचा त्याचा निर्धार आहे."

"असें काय ! तर त्या थेरड्याला आजच्या आज पकडून त्याचे हातपाय तोडून मग त्याला त्याच औदुंबराच्या झाडावर फांशीं द्या.—" किल्लेदार संतापातिरेकानें उद्गारला.

"आणि त्याचा मुलगा उंदेरीच्या किल्ल्यांत कैदेंत आहे, त्याला पिशाच्च सिद्धीच्या योगानें सोडवून आणून त्याच्या पुढारीपणाखालीं ह्या किल्ल्यावर बंड करवून सध्यांच्या सर्व अधिकाऱ्यांचा नायनाट केल्यावर येथली किल्लेदारी पुन्हा

आपल्या घरांत आणावयाची, मरण्यापूर्वी दोन दिवस तरी किल्लेदारीच्या अधिकारांचा उपभोग घ्यावयाचा, व मग सुखानें मरावयाचें, असा त्याचा पण आहे." सिद्दी याकूब म्हणाला.

" उंदेरीच्या किल्ल्यांतून याचा पोर सुटून येणार काय ? आणि त्याच्या साहाय्यानें हा म्हणे किल्लेदार होणार ! बस्स ! माणकोजीला उंदेरीवरून हर उपायांनीं सोडवून आणावयाचा व ज्या फांसावर बापाला, त्याच फांसावर त्याच्या पोरालाही बळी द्यावयाचा. भुतें घाला म्हणावें,भुतें घाला ! त्या भुतावळीला शांत करण्यासाठीं रेडे बकरे देण्यापूर्वी हे दोन बळी दिलेच पाहिजेत. मात्र किल्लेदाराच्या समंधाचा बंदोबस्त झाल्याशिवाय मला येथें सुखानें दिवस कंठतां येणार नाहींत." असें म्हणून किल्लेदार बाहेर जाण्याच्या मार्गाला लागला. तो जरी मोठ्या आवांक्यानें बोलत होता, तरी त्याच्या अंतरंगांत भीतीचे आंवळे शिजत होते.

किल्लेदारानें पूर्वीच्या किल्लेदाराविषयीं असे उपमर्दकारक उद्गार पुन्हा काढलेले ऐकतांच नानाजी खवळला व त्याच्याबरोबरचा म्हाताराही संतापानें अगदीं बेहोष होऊन गेला. त्याच्या संतापाचें कारण तोच जाणे !

नानाजीला आपल्या पित्याची निर्भर्त्सना सहन होईना. त्यानें बेभान होऊन जणुं काय किल्लेदाराच्या नरडीचा घोंट घेण्यासाठीं एकदम जाईच्या मंडपाबाहेर उडी मारली. म्हाताऱ्यानेंही त्याचेंच अनुकरण केलें.

प्रकरण आठवें

# पाठलाग

नानाजी आणि त्याच्या बरोबरचा म्हातारा ह्या दोघांचा तो धावता पवित्रा पाहून किल्लेदार व त्याचे लोक यांना वाटलें कीं, हा पूर्वीच्या किल्लेदाराचा समंधच आपला पाठलाग करीत आला. त्या भयानें ते सर्वजण 'भूत! भूत! सैतान! सैतान!' असें ओरडत जीव मुठींत घेऊन पळत सुटले. कावळा बसायाला व डहाळी मोडावयाला एक गांठ पडावी, त्याप्रमाणें थोड्या क्षणापूर्वीच पुष्करिणीजवळच्या माडावर पूर्वीच्या किल्लेदाराचा समंध ठाणें देऊन बसल्याची गोष्ट निघावयाला, तो आभासात्मक समंध त्या निंदकांवर धांवून जावयाला व तो माड कडाड्दिशीं मुळासकट मोडून कोसळावयाला एक गांठ पडली. त्यामुळें नानाजी व म्हातारा हे दोघेही क्षणभर दचकून जागच्याजागींच थबकले, व किल्लेदार आणि त्याचे साथीदार तेथून असे जीव मुठींत घेऊन पळत सुटले कीं, ज्याचें नांव तें! एका अर्थीं झालें तें बरें झालें. किल्लेदार व त्याचे अनुयायी, आणि नानाजी व त्याचा सोबती म्हातारा ह्या उभयपक्षीं तें हितावह झालें. तें हित दोघांनाही कळलें नसेल ही गोष्ट निराळी; पण जर माड मोडला नसता, तर नानाजी व म्हातारा यांनीं मरेन किंवा मारीन याचा विचार न करतां आवेशानें पुढें जाऊन किल्लेदार व सिद्दी याकूब ह्या दोघांनाही लोळविलें असतें, किंवा ते दोघेही किल्लेदाराच्या हातीं सांपडून प्राणांना मुकले असते.

ते सर्व मुसलमान तेथून भयानें पळून गेलेले पाहून नानाजीनें म्हाताऱ्याला विचारलें, "आजोबा! हे मुसलमान असे भित्रे कसे हो?"

म्हातारा उत्तरला, "बाबारे, तें तसेंच. सिद्दी सात एवढा कडवा व उन्मत्त मुसलमान ना? पण जितक्या शौर्यानें त्यानें स्वामींच्या पर्शराम येथील हिंदुसेवकांना छळलें, गोब्राह्मणांची व बायकांची विटंबना केली व देवालयाचा विध्वंस केला, तितक्याच नेभळटपणानें स्वामीसमोर आपली ताठ मान नमवून स्वतःच्या तोंडून उडालेली थुंकी स्वतःच्या जिभेनें चाटून पुसून टाकली * ही

* जंजिऱ्याच्या सिद्दीचा अंजनवेलचा मदांध व हिंदुद्वेष्टा सरदार सिद्दी सात बाला सावनूरच्या नबाबाकडून एक हत्ती इनाम मिळाला होता. इतक्या दूरवरून

झाली सिद्दी सातासारख्या अस्सल कडव्या मुसलमानाची गोष्ट. आणि तूं जे मुसलमान आतां येथें पाहिलेस, ते सारे त्यांतला एक सिद्दी याकूबला वगळतां वेगडी मुसलमान आहेत. तीं मुसलमानांचीं सोंगें आहेत. तें सोनें नसून ती सोनपितळ आहे. गोंवें-चेऊल इकडील बरेच हिंदु जसे फिरंग्यांपासून होणाऱ्या भासमान फायद्याकडे दृष्टि देऊन अथवा छळाला भिऊन बाटून किरिस्ताव होतात, तसेच हे इथले हिंदु केवळ स्वार्थासाठीं बाटून मुसलमान झाले आहेत."

"काय ! केवळ क्षुल्लक व भणभंगुर स्वार्थासाठीं किंवा जीवासाठीं आम्ही मुसलमान होतों ? त्यापेक्षां मरत कां नाहीं ?"

"येवढ्यानेंच काय झालें आहे ? बाबा ! आम्ही क्षणभंगुर स्वार्थासाठीं आपला धर्म सोडतों, इतकेंच काय; पण आपल्या लेकी बाहिणीदेखील मुसलमानांच्या

---

हत्ती आणावयाचा तर मध्यें मार्गांत मराठ्यांचें भय. त्यामुळें सिद्दी सातानें ब्रह्मेंद्रस्वामींना, ते भिक्षाटनार्थ कर्नाटकांत निघाले असतां, त्यांना परत येतांना हत्ती आणण्याची कामगिरी सांगितली. जंजिऱ्याचा अधिपति सिद्दी रसूल याचें व स्वामींचें सौरस्य असल्यानें स्वामींनीं ती कामगिरी लोभाखातर पत्करली. मराठे व सिद्दी या उभयतांकडेही स्वामींना चांगली धन्यता मिळत असल्यानें त्यांना ही कामगिरी सुलभ होती. स्वामींनीं भिक्षेहून परत येतांना हत्ती बरोबर आणला. पण मध्यंतरीं स्वामि कार्यपरत्वें मागें राहिले व हत्ती पुढें रवाना झाला. त्यामुळें सिद्दीचा हत्ती म्हणून-स्वामींमार्फत तो आणला जात आहे हें माहीत नसल्यानें-संगमेश्वराच्या पुढें मार्लेजनच्या चौकीवर आंग्र्यांच्या लोकांनीं गैरसमजुतीनें हत्ती पकडून जयगडीं पाठविला. ही बातमी कळतांच सिद्दी सात खवळला. त्यानें बळजबरीनें हत्तीला आणण्यासाठीं फौज रवाना केली. त्या फौजेचाही आंग्र्यांच्या फौजेनें मोड करून फौजेला हाकलून लावलें. दरम्यान हत्तीला अटक झाल्याचा प्रकार स्वामींना मागच्या मुक्कामावर कळला. त्याबरोबर त्यांनीं कान्होजीला पत्र लिहून हत्ती सोडून देवविला व तो सिद्दी साताकडे रवाना झाला. पण त्या पूर्वीच सिद्दीचे लोक तेथून पराजित होऊन सिद्दीकडे गेले असल्यामुळें ही अरेरावी आंग्र्यांनीं हेतुपुरस्सर केली व त्यांना असें करण्याविषयीं स्वामींची फूस असली पाहिजे, असा सिद्दी साताचा ग्रह झाला. त्यानें चिडून ताबडतोब ह्या अपमानाचा सूड घेण्यासाठीं परशुरामावर स्वारी केली, ( फेब्रुवारी इ० सन १७२७ ) व

जनानखान्यांत लोटतों. तूं जर आज एखाद्या मुसलमान सरदारापासून तों सिद्दी-अवलादींतील खाशा मुसलमानांपर्यंत प्रत्येकाचे जनानखाने धुंडाळून पाहिलेस, तर तुला आमच्या लेंकी-बहिणींशिवाय दुसऱ्या अस्सल मुसलमान बायका फारच थोड्या आढळतील. लोक म्हणतात म्हणून मला माहीत, व तें खरेंही आहे कीं, दिल्लीच्या मोगल बादशहाचा वंश आजवर जो एवढा विस्तारला व जो वंश आजवर एका हातीं कुराण आणि दुसऱ्या हातीं तरवार घेऊन बळजबरीनें मुसलमानी धर्माचा प्रसार करीत आला, तो वंश आम्हां हिंदूंच्या—रजपुतांच्या लेंकी-बहिणीच्या उदरींच विस्तारलेला आहे."

---

शिवरात्रीच्या पवित्र दिवशीं तेथील देवालयाचा विध्वंस केला. त्याबरोबरच स्वामींच्या तेथील आश्रित ब्राह्मण मंडळींचाही समूळ उच्छेद झाला. ह्या प्रकार पाहून स्वामींना फार दुःख झालें. त्यांनीं हत्ती जयगडाहून चिपळुणाजवळ गोवळकोट येथें आणिला व सिद्दी सात याला तेथें बोलावून आणून तो त्याच्या स्वाधीन केला. याप्रमाणें स्वामींनीं प्रथम आपलें अंगीकृत कर्तव्य पार पाडून मग 'ज्या अर्थी तूं देव ब्राह्मणांचा उच्छेद केलास, त्या अर्थी तुझाही उच्छेद होईल' असा जळजळीत शाप सिद्दी साताला देऊन तेथून परशुराम क्षेत्रीं प्रयाण केलें. सिद्दी रसूल यानें स्वतः स्वामींची समजूत करण्याचा प्रयत्न केला. सिद्दी साताला स्वामींसमोर मस्तक नमवायला लावलें, स्वामींची सर्व नुकसानभरपाई करून द्यावयाला लावली, देवस्थानाला दोन गांवें इनाम देण्याचें आश्वासन देऊन स्वामींना गौरवपूर्वक जंजिरा येथें बोलविलें; पण स्वामींनीं ह्या विनवण्यांना तर मान दिला नाहींच; उलट 'ज्या राज्यांत हिंदुधर्माचा उच्छेद होतो, त्या राज्यांत अतःपर वास्तव्य करावयाचें नाहीं' असें ठरविलें. त्यांनीं परशुरामभूमींत मातलेल्या ह्या यवनसत्तेचें निर्मूलन करावयाचा निर्धार करून त्याप्रमाणें शाहूमहाराज, पेशवे, आंग्रे वगैरे सर्वांना त्या पवित्र धर्मकार्याला तत्पर करण्याचा उद्योग आरंभिला. ह्या शोचनीय प्रकार इ० सन १७२७ सालीं घडला. तेव्हांपासून स्वामींनीं कोंकणांतील धर्मछळ थांबविण्याच्या उद्देशानें मराठ्यांची मनोभूमिका तयार करून त्यांना सिद्दीचें पारिपत्य करण्याला उद्युक्त केलें. स्वामींच्या प्रयत्नांना यश इ० सन १७३२मध्यें आलें; शाहूमहाराजांनीं त्या सालीं जंजिऱ्यावरील मोहिमेचें कार्य निर्धारपूर्वक शिरावर घेऊन मोहीम सुरू केली.

" एकूण आमच्यांतले कुऱ्हाडीचे दांडेच आमच्या गोताला काळ होत आहेत! स्वार्थासाठीं देवाधर्मावर व स्वतःच्या माणुसकीवर देखील तिलांजलि देणाऱ्या कुलांगारांचें पीक ज्या समाजांत पिकूं लागलें, तो समाज रसातळाला गेल्या-शिवाय कसा राहील ? "

रागाचा प्रकार भरतीच्या पाण्यासारखा अथवा वळिवाच्या पावसासारखा असतो. आलेला राग पुढें टिकतो किंवा त्याची कार्यकारणपरंपरा अनेकदां कायम रहाते, असें असलें तरी रागानें उत्पन्न झालेला आंधळा अविचार भरतीच्या पाण्याप्रमाणें किंवा वळिवाच्या पावसाप्रमाणें थोड्याच काळांत ओसरतो. नानाजी व म्हातारा हे ज्या आवेशांत किल्लेदार व सिद्दी याकूब यांच्यावर धावून गेले, तो त्यांचा आवेश अंमळशानें वरच्या संभाषणांत आपोआप ओसरला, व आपण येथें कशा-साठीं आलों याची नानाजीला आठवण होऊन तो म्हाताऱ्याला, " त्या हराम-खोरांना जाऊं दे ! ते जाऊन कुठें जाणार, आकाश किंवा पाताळ फोडून जाण्या-ची तर त्यांची माय व्याली नाहीं ना ? वेळ आली म्हणजे त्यांना त्यांच्या कर्मांचें प्रायश्चित्त भोगावें लागेल. पण आजोबा ! बजरंगबलीची मूर्ति तुम्ही मला दाखविणार होतां ना ? "

" होय. असा माझ्या मागोमाग ये, म्हणजे मी तुला ती मूर्ति दाखवितों." असें म्हणून म्हातारा देवालयाच्या—नव्हे, मशिदीच्या अनुरोधानें पुढें व नानाजी त्याच्या मागोमाग, असे दोघेही हलके हलके पाय सांवरीत चालू लागले. त्यांची पायाखालची वाट मशिदीच्या उजव्या बाजूनें थेट मशिदीच्या मुख्य दरवाजांत जाऊन पोंचत होती; व मुख्य रस्त्यानें त्यांनीं जाण्याचें मनांत आणलें असतें तर तो रस्ताही दूर नव्हता. पण आपणाला कोणी पाहील का, कोणी पाळत राखून बसला असेल का, असल्या भयानें म्हाताऱ्याचा ऊर धडधडत असल्यानें त्यानें मुद्दाम आडवाट आंखली; व आडवाटेनें जातांना त्या स्थळाला अपरिचित असणाऱ्या नानाजीला ठेंच लागूं नये किंवा एखाद्या माडपोफळीच्या झाडाशीं टक्कर होऊन त्याचा कपाळमोक्ष होऊं नये, म्हणून तो सावधगिरीनें सावकाश चालत होता. इतका प्रकार होईतों रात्र चांगली घटका दीड घटका पडली होती. ती वद्य प्रतिपदेची तिथि असल्यानें त्या वेळीं वास्तविक चांदणें पडलेलें असावयाचें. पण आकाशांत अभ्रें दाटून आल्यामुळें त्या अभ्रांखालीं चंद्र बहुतेक झांकून गेला होता, व चांदण्यांचा प्रकाश एरव्हीं जरी पायाखालील वाट दिसण्याला पुरेसा

होता, तरी माड आणि पोफळी यांचें तेथें आगर असल्यानें त्यांच्या छायेखालून चालतांना अमावास्येच्या अंधाराचा अनुभव येणें अपरिहार्य होतें.

" आजोबा ! खरेंच, इतका वेळ आपण जिव्हाळयानें बोलत आहों. देवदयेनें मला तुमचा आधार मिळाला व डोकें टेंकावयाला जागा सांपडली, पण बोलण्याच्या गर्दींत मीं तुमचें नांव मात्र विचारावयाला विसरलों. आतां मलाही तुमच्याशिवाय ह्या जगांत दुसऱ्या कोणाचा आधार नाहीं. तुम्ही मला दूर लोटूं नका. तुमचें नांव काय बरें ? "

" मी तुला दूर काय लोटणार ? ताज्या दमाच्या मुला ! जशी राष्ट्राची तशीच माझीही मदार तुझ्यावर आहे. माझा माणकोजी आतां कैदेंतून सुटून येऊन मला म्हणजे भेटेल अशी मला मुळींच आशा नाहीं." तो मध्येंच जीभ चावून विषय बदलून म्हणाला, " तूं भेटलास हाच देवानें मला मुलगा पाठविला असें मी समजतों. माझी लाडकी चांगुणा मी मरेतों माझ्यापाशीं असावी असा माझा फार हेतु होता, तो देवालाही मानवला आहे असें दिसतें; आणि म्हणून त्यानेंच तुला आपल्या अघटित घटनांच्या जोरावर इकडे पाठविलें. एवढी माझी इच्छा मात्र तूं मोडूं नकोस. तसें पाहूं जातां मी तुला अगदींच परका नाहीं. माझें नांव भाऊराव पिसाळ."

" भाऊराव पिसाळ !- आणि भानाजी तुमचा कोण ? " नानाजीनें संशयपूर्वक विचारलें.

" तोही माझाच भाऊ. पण त्या गोष्टी बोलून तूं उगाच माझ्या मनाला त्रास देऊं नकोस. मला देखील ती आपल्या कुळाची अपकीर्ति सांगावयाला लाज वाटते. पण तो काळही बदलला, तें सर्व कांहीं बदललें, आतां त्यांचें काय ? तें कांहीं देखील मनांत न आणतां तूं माझ्या शब्दाला मान दिला पाहिजेस. माझ्या चांगुणेला पदरांत घेतलें पाहिजेस."

" आणि तुमचाही मुलगा कैदेंत आहे ? "

" होय. पण त्या गोष्टीच नकोत ना ! "

नानाजीनें–पुन्हा तो विषय काढला नाहीं. मात्र त्याला चांगुणेचा विषय कसेंही करून टाळावयाचा होता. पण तो कसा टाळावा हें कांहीं त्याला नीटसें कळेना. इतक्यांत त्याला एक उपाय सुचला. तो म्हणाला, " आजोबा ! मी बोलून चालून कुकेकंगाल भटक्या. मला ना घरदार, ना वतनवाडी.—"

" नसेना कां ? तुझा पराक्रम व तुझी मायदेशाविषयींची कळकळ हीच वतन-वाडी ! यापेक्षां इतर वतनवाड्या काय करावयाच्या आहेत ? सारें जग ही तुझ्या-सारख्या धडाडीच्या पराक्रमी तरुणाची वतनवाडीच होय. जग जिंकशील तेवढें तुला थोडेंच आहे. शिवाय व्यवहाराच्या भाषेत बोलावयाचें तर—नानाजी ! तुझ्या साऱ्या आर्थिक गरजा भागविण्याइतकी, नव्हे, तूं पांच चारशें स्वार पदरीं ठेवून दिग्विजयाला निघालास तरी तुला वर्ष दोन वर्षें पुरून उरेल इतकी माया माझ्या-पाशीं आहे. माझा माणकोजी आतां मला भेटणें शक्यच नाहीं, तेव्हां ती माया आतां माझ्या चांगुणेचीच आहे. मीं अजून कोणालाही तिचा थांगपत्ता लागूं दिलेला नाहीं. माझ्या पोरीला देखील आपल्या झोंपडींत इतकें धन पुरलेलें असेल याची दाद नाहीं. मी प्रथम हें तुझ्यापाशींच बोलतों आहें."

इतकें धन व मनाजोगी कान्ता आपणाला यदृच्छेनें मिळत आहे, तिचा अव्हेर कसा करावा अशी नानाजीला भीड पडली. पण पुन्हा त्याच्या मनांत काय विचार आला नकळे, त्यासरसा तो म्हाताऱ्याला म्हणाला, " आजोबा ! आपण सवडीनें त्या गोष्टीचा विचार करूं. आतांच काय त्याचें ? "

" पण आतांच मला तुझें वचन पाहिजे आहे कीं, तूं मला व माझ्या मुलीला अंतर देणार नाहींस."

" आणि समजा, मीं वचन देऊन फसवलें तर ?" नानाजीनें विनोदानें विचारलें.

" दिल्या वचनाची सचोगिरी सुर्व्यांच्या प्रत्येक रोमरोमांत कशी भिनलेली असते, याचा मला अनुभव आहे."

" बरें; मी तुम्हां दोघांनाही मरेतों अंतर देणार नाहीं. इतकेंच काय; पण तुमचा मुलगा कैदेंतून सुटून येऊन तुम्हांला पुन्हा भेटेल अशीही मी खटपट करीन. त्याला माझा भाऊ मानीन. मग तर झालें ? " नानाजी म्हणाला.

" ठीक आहे. आतां माझ्या मनाचें समाधान झालें. मुलाच्या सुटकेचें आपण मग पाहूं. मी तुझ्याशीं आणखीही कांहीं महत्त्वाच्या गोष्टी बोलणार आहें. पण त्या आपण फुरसतीच्या वेळीं बोलूं." म्हातारा माड-पोफळींच्या गर्द छायेंतून वाट काढीत पुढें जातां जातां म्हणाला.

म्हाताऱ्याच्या अखेरच्या बोलण्यावरून नानाजीला संशय आला कीं, हा म्हातारा भानाजी पिसाळांच्या वतीनें आपणाशीं रदबदली तर करणार नसेल ? तसें असेल तर आपण त्या भिडेला कधींच बळी पडणार नाहीं, असें त्याला

आपण वेळींच सांगून ठेवावें. ह्या इरायानें नानाजी त्याला म्हणाला, "आजोबा! यापुढें मी तुमचा व तुम्ही माझे. एकमेकांनीं एकमेकांना मरेतों अंतर द्यावयाचें नाहीं. आपणाला अजून मोठमोठीं कार्यें करावयाचीं आहेत. पहिली गोष्ट म्हणजे सागरगड ह्या राक्षसांच्या जबड्यांतून सोडवावयाचा. तो कसा सोडवावयाचा तें आपण मग ठरवूंच. पण एक मात्र मी तुम्हांला वेळींच सांगून ठेवतों, तुम्हीं त्या भानाजी पिसाळाच्या बाजूनें माझ्याशीं तरफदारी करतां कामा नये. तो तुमचा भाऊबंद असला तरी माझा कट्टा हाडवैरी आहे. त्याचा मी पुरेपूर सूड घेणार-च घेणार."

बोलतां बोलतां दोघेही देवालयापाशीं येऊन पोंचले. म्हातारा नानाजीनें काढलेला विषय सफाईनें टाळून म्हणाला, "हेंच देवालय." आणि समोरच्या पायरीकडे बोट दाखवून म्हातारा उत्तरला, "हीच बजरंगबलीची मूर्ति."

"असें काय! पण नवस आणावयाला आपण विसरलों. हरकत नाहीं." नानाजीनें तेथल्यातेथें भर रस्त्यांत त्या पाषाणाला साष्टांग प्रणिपात करून कन-वटीची एक मोहोर काढून त्याच्यासमोर ठेवली व प्रार्थना करून लगेच तो पाषाण दोन्ही हातांनीं वर उचलिला. इतक्यांत आकाशांतील अभ्रें थोडीं दूर झाल्यामुळें स्वच्छ चांदणें पडलें व त्या प्रकाशांत नानाजीला ती मूर्ति डोळाभर अवलोकन करावयाला सांपडली. त्या सगुण मूर्तीकडे पहातां पहातां नानाजीचे डोळे पाण्यानें भरून येऊन त्याच्या आसवांचा अभिषेक व त्या मूर्तीच्या चरणांवर सुरू झाला. त्यानें स्फुंदत स्फुंदत दोन्ही हातांनीं त्या मूर्तीवरील माती झाडून मूर्ति बरीच स्वच्छ केली व लगेच आपल्या डोक्याची मराठेशाही पगडी सोडून त्या वस्त्रानें मूर्तीवरील उरली सुरली माती पुशीत म्हाताऱ्याला म्हटलें, "आजोबा! तुमच्या नाकर्तेपणा-मुळें ही तुमची ग्रामदेवता मातीला मिळाली; पण तुमच्या सर्वस्वाची माती कशी बरें होणार नाहीं?"

"खरें आहे!" म्हातारा खेदानें त्या मूर्तीला वंदन करून उद्गारला, "पण आतां याला उपाय काय?"

"उपाय काय?" नानाजी म्हणाला. "आजोबा! अशा प्रसंगीं उपायासाठीं ज्यांची मति कुंठित होते, ते लोक उपाययोजना करण्याला अगदीं अपात्र असतात. देवांधर्मावर व समाजाच्या अब्रूवर दिवसाढवळ्या असे अमानुष अत्याचार होत असतांना स्वस्थपणें ते पहात जिवंत रहाणाऱ्या लोकांची मेल्यांत जमा होते. देवा-

ल्यावर मुसलमानांचा घाला पडला तेव्हां येथले लोक झोंपीं गेले होते, कीं मेले होते ? खरेंच, ह्या देवालयाची अशी दुर्दशा कोणीं केली म्हणालां ? सुलतान किल्लेदारानें ना ? ”

“ होय. तो वृत्तान्त फार मोठा व ऐकण्याला कष्टप्रद असा आहे.”

“ पण तो मला ऐकला पाहिजे.”

“ तें सारें मी तुला घरीं जातांना सांगतों. आतां रात्र झाली, आपण लौकर घरीं जावें हें बरें.”

“ पण ही मूर्ति येथें अशीच मुसंड्यांच्या ठोकरांखालीं तुडविली जाण्यासाठीं ठेवून मी घरीं येऊं ? छे ! छे ! ते माझ्या हातून कधींच होणार नाहीं.”

“ तर मग तूं येथें काय करणार ? ”

“ मी ही मूर्ति पुन्हा जशीच्या तशी ह्या देवालयांत स्थापन करणार.”

“ वेडा रे वेडा ! ” म्हातारा विषादपूर्वक हंसून म्हणाला. “ आज ती मूर्ति देवालयांत ठेवलीस तरी उद्यां ती येथें नमाज पढण्यासाठीं येणारे मुसलमान पहातील, व तिची जास्त विटंबना करतील. सत्तेपुढें शहाणपण कोणाचें चालणार ? ”

“ तुम्ही म्हणतां तेंही एका परीनें खरें आहे. सत्तेपुढें शहाणपण कोणाचें चालणार ? सत्ता ! सत्ता ! ही सिद्दीची सत्ता ! गो-ब्राह्मणांचा संहार करणारी, हिंदूंच्या देवांना पायाखालीं तुडवून देवालयांच्या मशिदी बनविणारी, हिंदूंच्या डोळ्यांदेखत त्यांच्या आया–बायका–बहिणींची अब्रू घेणारी ही सिद्दीची जबरदस्त सत्ता ! आणि अशा ह्या जुलमी सत्तेपुढें आम्ही मराठे मान वांकवितों ! ” नानाजी बजरंगबलीच्या मूर्तीच्या चरणांवर मस्तक नमवून प्रार्थनापूर्वक म्हणाला. “ देवा, बजरंगबली ! रावणासारख्या मदांधाचाही मद तूं जिरविलास व त्याच्या कचाटींतून सीतामातेला सोडविलेंस; रामराज्याचें सौभाग्य तूं होतास. आज सिद्दीदेखील रावणासारखा मातला आहे. त्यानें रावणापेक्षांही घोर अनर्थ चालविले आहेत. सीतामाईप्रमाणेंच आमच्या भूमातेला हा चांडाल आपली बटिक करूं पहात आहे. त्याचा नायनाट करण्याचें, भगवंता ! तूं मनावर घेतलेंस व आमच्या बाहूंत बळ दिलेंस, तर हे अनर्थ आम्हांला तुझ्या कृपेनें सहज थांबवितां येतील, व मायभूमीला दास्यमुक्त करतां येईल. भगवान् श्रीकृष्णांनीं नुसता करांगुलीचा आधार देतांच सारे बाळगोपाळ दुर्दम असा गोवर्धनगिरी उचलूं शकले; त्याप्रमाणेंच तुझ्या नुसत्या कृपाछत्राखालीं आम्ही मराठे आमचे सारे गडकोट हस्तगत करूं;

इतकेंच काय; पण उभ्या कोंकणपट्टींत सिद्दीला पाऊल ठेवण्यालाही जागा नाहीं असें करून तमाम गडकोटांवर आणि देवालयांवर मराठ्यांचा भगवा झेंडा फडकवूं. ज्यांनीं तुझ्या मूर्तीची व देवस्थानाची अशी दुर्दशा करविली, त्या सिद्दी राजाला, त्या सुलतानाला—सर्वांना ठार करून त्यांचीं शिरकमलें मी तुला अर्पण करीन, तेव्हांच ह्या देवालयाच्या आवारांत पुन्हा पाऊल टाकीन व तेव्हांच तुझा भक्त म्हणून मिरवीन."

येवढे शब्द नानाजी उच्चारतो आहे, तों देवालयाच्या आवारांतील प्रचंड आम्रवृक्षावर एका वानरानें बुभुःकार केला. आकाश देखील तेव्हां अगदीं निरभ्र झालें होतें, व जिकडे तिकडे दुधासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें. इतका वेळ वारा वहात नसल्यामुळें तटस्थ असलेलीं झाडें आतां वारा वाहूं लागल्यामुळें सळसळूं लागलीं, व देवालयाच्या—नव्हे, मशिदीच्या महाद्वाराशीं दोन्ही बाजूंना डंवरलेल्या पुष्पलतांवरील फुलांची तेथल्यातेथें पखरण पडली. हे सर्व प्रकार अगदीं स्वाभाविकपणें घडले असतील, अथवा त्यांच्यामागें कांहीं अदृश्य दैवी प्रेरणाही असेल. नानाजीच्या श्रद्धाळु मनाला मात्र तो दैवी साक्षात्कारसा वाटला. त्यानें हर्षभरित चित्तानें म्हाताऱ्याला बोलूनदेखील दाखविलें. आजोबा! माझ्या प्रतिज्ञेला बजरंगबलीचें पाठबळ आहे, याची खूण ह्या साक्षात्कारावरून माझ्या मनाला पूर्णपणें पटली."

"मलादेखील ती खूण पटली." म्हातारा आनंदित मनानें उद्गारला.

"होय ना? मग आतां तुम्ही मला सांगा, ह्या बजरंगबलीच्या मूर्तीला मी असाच येथल्या अज्ञातवासांत सोडूं?"

"तर काय तिला अशीच देवळांत बसविणार?"

"तिला मी देवळांत तर बसविणारच; पण आज मात्र नाहीं. देवळाची मशीद ज्यांनीं बनविली, त्यांच्या आहुति देऊन मीं प्रथम आजवर कोणींही संपादन केलें नसेल असें नरमेधाचें पुण्य संपादन करीन व त्या बळी घेतलेल्या चांडाळांचीं घरेंदारें खणून काढून, त्यांची सारी धनदौलत लुटून त्या लुटींत ह्या भ्रष्टावलेल्या देवालयाचा जीर्णोद्धार करीन, तेव्हांच ह्या मूर्तीची देवळांत प्रतिष्ठापना करीन. तोंपर्यंत तिला हें सांकडें निवारण्यासाठीं पुष्करिणीच्या पवित्र विहिरींत राहूं द्या."

लगेच नानाजीनें ती मूर्ति उचलून घेतली, व पुष्करिणीला लागून असलेल्या खोल विहिरींत नेऊन सोडली. नंतर ते दोघेही घरीं जाण्यासाठीं निघाले. ते

देवालयाच्या आवाराबाहेर येतात, तों त्यांच्या मागोमाग आपणाला सायंकाळीं किनाऱ्यावर भेटलेला बैरागी हळुहळू चालत येऊं लागला. पण नानाजी व म्हातारा हे आपल्याच विचारांत गढून गेले होते व शिवाय ती रात्रीची वेळ, त्यामुळें त्यांना त्या बैराग्याची चाहूल लागली नाहीं, तोंच त्या बैराग्याला खोकला आला. तो त्यानें दाबण्याचा प्रयत्न केला. पण त्यामुळें त्या दोघांना चाहूल मिळून त्यांनीं एकदम मागें वळून पाहिलें. त्यांची नजर चुकविण्यासाठीं तो बैरागी चटकन् माघारी वळून अदृश्य झाला. नानाजीनें 'कोण आहे' असें विचारून मागें वळून पाहिलें; पण त्याला कोणी दिसलेंही नाहीं व उत्तरही मिळालें नाहीं.

" आपला पाठलाग तर कोणीं केला नसेल ? " म्हातारा नानाजीला उद्देशून विस्मयचकित स्वरानें उद्गारला.

" असेल कदाचित्." नानाजी म्हणाला.

" त्यानें जर आपलें संभाषण ऐकलें असलें तर मोठा अनर्थ गुदरेल." म्हातारा म्हणाला.

" खरें आहे."

" बरें, मग याला उपाय काय ? "

" उपाय दुसरा तिसरा काय असणार ? दुखविलेला नाग तसाच जिवंत सोडला कीं दावा धरतो. त्याला चेंचून ठारच केला पाहिजे. चला, आपण त्या माणसाचा शोध करून त्याला ह्या जगांतून नाहींसा करूं." असें म्हणून नानाजी माघारी वळला.

इतक्यांत चौबुरुजीच्या बाजूनें हत्यारबंद घोडेस्वार मशालीच्या प्रकाशांत दौडत येतांना नानाजी व म्हातारा ह्या दोघांनाही आढळले. ते किल्लेदाराचे मुसलमान सैनिक आहेत हें म्हाताऱ्यानें तेव्हांच ओळखलें व नानाजीला म्हटलें, नानाजी ! मागें फीर. हे लोक आपलाच पाठलाग करीत येत असावेत. त्यांची व आपली दृष्टादृष्ट होण्यापूर्वी आपणास लपलें पाहिजे."

" पण ते लोक आपलाच पाठलाग करीत असतील कशावरून ? " नानाजीनें विचारलें.

" त्या नीच सुभानजीनें आपणाला पाहिलें आहे. त्यानें ही चुगली केली असेल. कदाचित् तूं इकडे आल्याची बातमीही सिद्दीसाताच्या कानांवर गेली असेल; ते तुझाही शोध करावयाला आले असतील. आपण आतां ऐथें एक क्षणभरदेखील

८२६

थांबणें सुरक्षितपणाचें नाहीं." म्हातारा बोलत होता तोंच ते घोडेस्वार दौडत दौडत सारखे जवळ जवळ येत होते. लगेच म्हातारा देवालयाच्या डाव्या बाजूला वळून 'पळ. माझ्या मागोमाग पळ. ह्या मागील बाजूनें गडाच्या माचीवर जावयाला एक गोवंडी वाट आहे. ती फारशी रहदारीची नसून जवळची आहे. त्या वाटेनें आपण लौकर घरीं जाऊं' येवढा इषारा देऊन पळत सुटला. तो इतक्या वेगानें पळाला कीं, नानाजीला त्याच्या अनुरोधानें पळ काढणें अशक्य झालें. तोंच ते घोडेस्वारही अगदीं जवळ येऊन थडकले.

आतां काय करावें तेंच नानाजीला कळेना. तेथून पळ काढावा तर त्याला वाट माहीत नाहीं. तेथेंच रहावें तर शत्रु जबडा पसरून समोर उभे! तो अगदीं गोंधळून जाऊन अविचारानें देवालयाच्या आवारांत घुसला. तें एका घोडेस्वारानें दुरून पाहून दुसऱ्याला म्हटलें, "तो पहा चोर! पकडा त्याला."

प्रकरण नववें

# बैरागी

आपणाला शत्रूंनीं पाहिलें, आतां ते देवालयाच्या आवारांत शिरून आपला शोध करणार, हें ओळखूनही नानाजी त्या प्रसंगीं डगमगला नाहीं. 'बजरंगवलि माझा पाठीराखा आहे. त्याला आपली प्रतिष्ठा पूर्ववत् व्हावी व अत्याचारी अविंधाचा भूमीला जो भार झाला आहे तो हलका होऊन गो-ब्राह्मणांचा छळ थांबावा असें त्याला वाटत असेल, तर तो माझें रक्षण करील' असा दृढ विश्वास हृदयाशीं बाळगून तो शत्रूंची नजर चुकविण्यासाठीं आवाराच्या भिंतीलगतच्या एका पोफळीच्या झाडावरून भिंतीवर चढला व तेथून त्यानें बाहेर उडी टाकली तोंच ते दौडत येणारे घोडेस्वार आवाराच्या महाद्वारांत येऊन थडकले व सर्वजण घोड्यांवरून उतरले. ते एकंदर सुमारें पंचवीस घोडेस्वार होते. त्यांतले कांहीं मुसलमान होते व कांहीं हिंदु होते. त्या सर्व सैनिकांत एक हिंदु व एक मुसलमान हे प्रमुख दिसत होते. त्या दोघांनीं मिळून एक विचारानें मुसलमान घोडेस्वारांना महाद्वारांत पहाऱ्यासाठीं उभें केलें, व 'कोणालाही बाहेर सोडावयाचें नाहीं. कोणी बाहेर जाऊं लागल्यास त्याला ताबडतोब कैद करावयाचें' असा त्यांना सक्त हुकूम करण्यांत आला. तोंवर बाकीच्या हिंदु शिपायांनीं मशाली पेटविल्या. लगेच ते दोघेही पहाऱ्यावरील शिपायांखेरीज बाकीच्या शिपायांना बरोबर घेऊन आंत गेले.

नानाजी भिंतीवरून खालीं उडी टाकल्यावर तेथून सांपडेल तसा मार्ग काढणार होता. पण पुन्हा त्याला वाटलें हे लोक येथें काय करतात तें पहावें तरी! म्हणून तो तेथून अंमळ दूरवर जेथें आपण कोणाला न दिसतां जेथून आवाराच्या आंत काय चाललें आहे हेंही आपणाला दिसेल, प्रवेशद्वारावरही नजर ठेवतां येईल, व तशीच वेळ आल्यास उडी टाकून पळ काढतां येईल अशा बेतानें भिंतीवर चढून आंतील माड–पोफळींच्या आडवशाला उभा राहिला. त्यामुळें तो कोणालाही दिसणें शक्य नव्हतें; पण त्याला मात्र मशालींच्या उजेडांत सर्वांचीं तोंडें दिसलीं. लगेच ते दोनही प्रमुख त्यानें लगेच ओळखले. त्यांतला एकजण सिद्दी याकूब होता, व दुसरा सुभानजी होता. त्या दोघांनाही नानाजीनें पूर्वी पाहिल्यामुळें त्याला त्यांची

ओळख चट्कन् पटली, व त्याबरोबरच म्हाताऱ्याच्या तर्कांची प्रचीतिही आली ती राहू–केतूची दुकल पुढें काय करते इकडे साहजिकपणेंच नानाजीचें चित्त वेधून राहिलें.

"सुभानजी ! आतांच कोणीतरी मनुष्य आंत लपला असला पाहिजे. खरें ना ?" सिद्दी याकूबनें विचारलें.

"होय. माझी कल्पना आहे कीं, तो बहुधा भानाजी पिसाळ किंवा त्याच्या बरोबरचा तो पाहुणा नानाजी सुर्वे असावा."

"तर मग तुझ्या शिपायांना त्याचा शोध करावयाला लाव तर खरा ! तेवढा एक सांपडला, कीं बाकीचे दोघे सांपडण्याला वेळ नाहीं. ते त्याच्याच आश्रयाला असणार हें उघड आहे. खरें पाहूं जातां हें काम तुझेंच आहे. कारण तूं निदान भानाजीला तरी पकडून किल्लेदारासमोर हजर करूं शकलास, तरच त्याची पोरगी तुझ्या हातीं लागेल. नाहींपेक्षां पोरगी हातची जाऊन शिवाय प्राणावर गदा येण्याचें भय तुलाच आहे." इतक्यांत त्याला पलीकडे केळीच्या बनामागें कोणीतरी खोकल्याचा भास झाला; त्याबरोबर तो शिपायांना म्हणाला, "पहातां काय ! त्या केळीच्या मागें तो मर्धाचा माणूस दडून बसलेला दिसतो. चला त्याला शोधूं."

सिद्दी याकूब येवढें बोलतो, तोंच त्या केळीच्या बनामागून एक माणूस लंगडत लंगडत बाहेर पडला. त्या माणसाचा वेष एखाद्या कंगाल बैराग्यासारखा होता. त्या बैराग्याच्या अंगावरील कफनी जागजागीं फाटल्यामुळें त्या छिद्रांतून त्याचा कंगालपणा धीटपणानें बाहेर डोकावत होता. तो बैरागी बाहेर आला तेव्हां येतां येतां एका फुलझाडाच्या मोडक्या फांदीचा शेंडा चुकून त्याच्या डाव्या डोळ्याला चाटून गेला; त्याबरोबर त्या डोळ्यांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. तें आपल्या अंगावरील फाटक्या कफनीच्या टोंकानें पुशीत तो बैरागी लगबगीनें पुढें येऊन सिद्दी याकूबला विचारूं लागला, "काय ? तुम्ही भानाजी पिसाळाला पकडण्यासाठीं आलां आहां ना ? मग माझ्याशीं तुमचा काय संबंध ?"

त्या बैराग्याचा तो दुखरा डोळा, तो लंगडा पाय, अंगावरील लक्तरें व कृश अंगलोट असा तो अवतार पाहून नानाजीनें ओळखलें, कीं सायंकाळीं किनाऱ्यावर जो बैरागी आढळला तो हाच, व हाच आपला पाठलाग करीत आपलें संभाषण चोरून ऐकत असला पाहिजे; पण सिद्दी याकूब वगैरे मंडळीला मात्र तो मुळींच ओळखतां आला नाहीं. त्या सर्वांना प्रथम त्या बैराग्याचा तो अवतार पाहून हा

माणूसच आहे कीं पिशाच आहे असा संशय उत्पन्न झाला. पण क्षणभरानें तो माणूसच आहे अशी सर्वांची खात्री झाली.

इतक्यांत त्या बैराग्यानें सुभानजीकडे पाहिलें तेव्हां धरणीकंपाच्या एकाद्या जबर-दस्त धक्क्यानें कंपित धरणीचें स्वरूप पार मावळून जावें, त्याप्रमाणें त्याची वृत्ति पार पालटून गेली. प्रथमच तो भानाजी पिसाळाविषयीं चवकशी करीत पुढें आला, तेव्हां त्याच्या चर्येवर रागाची ओझरती छटाही नव्हती व त्याच्या एकाक्ष नजरेंत शंखोदकाप्रमाणें निर्मल तेज खेळत होतें; पण आतां त्याच नजरेंतून जणुं अग्नीच्या ज्वाळा निघूं लागल्या.

एकाएकीं त्या बैराग्याच्या वृत्तींत इतकें अंतर पडलेलें पाहून सुभानजीनें त्याला विस्मयपूर्वक विचारलें, “ तूं कोण ? ”

बैराग्यानें तरवारीच्या घावाप्रमाणें उलट प्रश्न केला, “ तूं कोण ? ”

“ मी कोण ? ” सुभानजीनें मानखंडित झाल्यामुळें कंबरेची तरवार म्यानां-तून सर्रकन् बाहेर काढून बैराग्यावर वार करण्यासाठीं हात उगारीत क्रोधानें अर्थ-शून्य असा प्रश्न विचारला. सिद्दी याकूब व इतर शिपाई यांना तो एकंदर प्रकार फार चमत्कारिक वाटला. पण हा केवळ उभयतांच्या समजुतीचा घोंटाळा आहे असाच त्याचा अर्थ घेऊन सिद्दी याकूब एकीकडे सुभानजीची समजूत घालीत दुसरीकडे त्या बैराग्याला म्हणाला, “ ए बेवकूब ! सागरगडचे किल्लेदार आहेत; आतां तरी जरा जीभ आवरून बोल.”

“ जीभ आवरून बोल ! म्हणे जीभ आवरून बोल ! ” बैरागी सुभानजीला सिद्दी याकूबच्या शब्दांनीं वेडावीत निर्भयपणें उद्गारला, “ तूंच सुभानजी गुजर ना ? ”

“ होय. आतां तरी तूं त्यांना ओळखलेंसना ना ? ” सिद्दी याकूबनें विचारलें.

“ ओळखलें ! ” बैरागी पूर्ववत् बेफिकीरपणें उत्तरला, “ मेलेल्या मढ्यांच्या टाळूवरील लोणी चाटून खाऊन धष्टपुष्ट झालेल्या कर्मचांडाळाची ओळख मी ह्याच जन्मीं काय, पण पुढच्या जन्मींदेखील कधीं विसरणार नाहीं.”

“ काय म्हणालास ? ” सुभानजी पूर्वीपेक्षां दुप्पट अवसानानें व क्रोधानें पुन्हा तरवार उगारून त्या बैराग्यावर धावून जात म्हणाला, “ हरामखोरा ! मला आणि तूं—तूं कंगाल गोसावडा अशीं उणीं उत्तरें बोलणार ? ”

“ हो ! हो ! बोलणार, एकदां सोडून शंभरदां बोलणार ! वैभवाच्या लालसेनें

प्रत्यक्ष बापाविरुद्ध शत्रूला सामील होणारा व बहिणीच्या कपाळाचें कुंकूं पुसणारा तूं!" बैरागी पूर्वीपेक्षा आवेशानें व बेडरपणानें म्हणाला.

आतां मात्र त्या बैराग्याची धडगत नाहीं असें पाहून सिद्दी याकूबनें बैराग्याला आवरून धरण्याला सांगितलें, व आपण स्वतः सुभानजीला आवरून धरलें. सुभानजी आपला हात हिसकून घेण्याचा प्रयत्न करतां करतां खाऊं कीं गिळूं अशा भावनेनें बैराग्याकडे पहात सिद्दी याकूबला म्हणाला, " याकूबखान! सोड—माझा हात सोड. तुझी ही दया अगदीं अस्थानीं आहे. या वेळीं मी कोणाचाही मुलाहिजा धरणार नाहीं."

तेथें आलेल्या शिपायांना सुभानजीचा आततायीपणा रुचला नाहीं. त्यांतला एक हिंदु शिपाई त्या माणसाकडे पहात सुभानजीला म्हणाला, " सरदारसाहेब! हा माणूस कोणी साधु दिसतो. साधु–संन्याश्यांना ठार करणें हें आपणां हिंदूंचें ब्रीद नाहीं."

" तर मग मी हिंदूच नाहीं." सुभानजी उसळून म्हणाला, " माझ्या शत्रूंना असलीं ढोंगें पांघरून, जर उजळमाथ्यानें हिंदु समाजांत वावरतां आलें, तर असल्या धर्माचा अभिमान मीं तरी कां म्हणून धरावा? आधींच आजकाल हिंदु असणें हा गुन्हा आहे. हेंच पहा ना, हा किल्ला पाडाव होऊन सिद्दीच्या स्वाधीन व्हावा याविषयींची सारी खटपट मुख्यतः माझी; पण येथली किल्लेदारी मात्र सुलतानजीला मिळाली. कारण तो बाटून मुसलमान झाला!"

" पण तुलाही तुझ्या फितुरीचें–स्वजनद्रोहाचें, स्वधर्मद्रोहाचें पारितोषिक म्हणून उद्यां सागरगडची किल्लेदारी मिळावयाची आहे ना? अहारे चांडाळ! तुझ्यासारख्या घरभेद्या कुलांगारांचा नायनाट झाल्याशिवाय आमच्या देशाला बरे दिवस कसे येतील?" बैरागी रागानें तडफडत उद्गारला.

हा तंटा उगाच पेटत चालला असें पाहून सिद्दी याकूब अगदीं हिरमुष्टि झाला. त्या दोघांबरोबर आलेले हिंदु शिपाई सुभानजीच्या वल्गना ऐकून अगदीं शरमून गेले. त्यांनाही मनांतून त्या अपरिचित माणसाप्रमाणेंच आपणही सुभानजीचा तीव्र निषेध करावासा वाटला. पण ते त्याचे सेवक त्याच्या अन्नाचे पिंड पडल्यामुळें त्यांना स्पष्टपणें तसें बोलतां येईना. हा सारा प्रकार अर्थात् कांहीं क्षणांत झाला. तो अपरिचित साधु सुभानजीची निर्भर्त्सना करूं लागला, तेव्हां सिद्दी याकूबला देखील संताप आला. मग सुभानजी संतापानें जणुं उभा जळूं लागला यांत नवल

तें काय ? तरी पण सिद्दी याकूबनें त्याच क्षणीं सुभानजीला अंमळ बाजूला ओढून त्याच्या कानांत सांगितलें, “ दोस्त ! मलाही वाटतें कीं, असल्या बेदरकार माणसाची गर्दन या क्षणाला छाटून टाकावी. तुझी विटंबना तीच माझी विटंबना असें मी मानतों.”

“ तर मग मला कां अडवितोस ? ” सुभानजीनें विचारलें.

सिद्दी याकूब उत्तरला, “ यार ! तुला आडवतों याचें कारण आपणाला ह्या माणसापासून भानाजीची माहिती कळण्याजोगी आहे. त्यांत जसें माझें हित आहे तसेंच तुझेंही हित आहे. उंदेरीची किल्लेदारी मिळविण्यासाठीं सिद्दी सातासमोर मला भानाजी व त्याच्याबरोबरचा तो नवा पाहुणा यांची कुरबानी करावयाला पाहिजे आहे.”

“ मग ? उंदेरीची किल्लेदारी तुला मिळावयाची आहे; ती मला थोडीच मिळावयाची आहे ? ”

“ तुलाही आपल्या सासऱ्याला बाजूला सारून सागरगडचा किल्लेदार व्हावयाचें आहे, व भानाजीची पोर मिळवावयाची आहेच.”

“ पण भानाजी तुमच्या हातीं सांपडून ठार झाल्यावर त्याची मुलगी कशी मिळणार ? मी इकडे येण्यापूर्वी ती मला भेटली, तेव्हां तिनें मला विनवून सांगितलें आहे कीं, ‘सुभानजी ! कसेंही करून माझ्या बापाचा जीव वांचवा, त्यांना जिवानिशीं किल्ल्यापार करून द्या, कीं मी तुमची आहे. मात्र जर बाबांचा बचाव झाला नाहीं, तर मी तुमच्याच काय, पण कोणाच्याही हातीं जिवंत सांपडणार नाहीं’. आतां मला सांग, भानाजी ठार झाल्यानें चांगुणा मला कशी मिळेल ? ”

“ आणि भानाजी जिवंत राहिल्यानें तरी तुला ती मिळेल अशी तुझी कल्पना आहे ? भल्या माणसा ! तुझ्या पाठीला डोळे थोडेच आहेत ! आपण इकडे यावयाला निघाल्यापासून अर्ध्या पाव घटकेंत तिकडे काय काय घडामोडी झाल्या असतील याची तुला कल्पना तरी आहे का ? ”

“ काय घडामोडी झाल्या असतील ? ”

“ यार ! तुझी दिलप्यारी एव्हांना सिद्दी साताच्या महालांत दाखल होऊन केव्हांच त्यांची बिबीदेखील होऊन बसली असेल.”

"पुरे कर. मला सारें समजतें." सुभानजी खिन्नपणानें कपाळाला हात लावून म्हणाला.

"काय समजतें? तुला काय समजतें? मी तर म्हणतों कीं, तुला अजून कांहींच समजत नाहीं. तूं जर त्या बैराग्याला अविचारानें ठार केलेंस व त्यामुळें भानाजीचा तपास लागण्याला हरकत होऊन हा प्रकार आमच्या किल्लेदार आणि सिद्दी सात यांना समजला, तर तूं भानाजीचा जांवई होण्याची गोष्ट दूरच राहिली. तुझी आजची सरदारकी व उद्यांची किल्लेदारी जाऊन वर आणखी भानाजीच्या ऐवजीं तुला त्या औदुंबराच्या पारावर फांशीं जावें लागेल."

भावी अनर्थांच्या भीतीमुळें असो, डोकें ठिकाणावर आलें म्हणून असो किंवा अन्य कांहीं कारणामुळें असो; पण सिद्दी याकूबनें दिलेल्या इषाऱ्यानें सुभानजी बराच शुद्धीवर आला. तरीही त्याला आपला दुराग्रह सर्वस्वीं मागें घेणें नामुष्कीचें वाटलें, म्हणून तो तडजोडीच्या भाषेंत सिद्दी याकूबला म्हणाला, "याकुबखान! तुमचें म्हणणें मी मान्य करतों; पण तें एका अटीवर."

"कोणत्या अटीवर?" सिद्दी याकूबनें विचारलें.

"तुमचा कार्यभाग आटोपतांच तुम्ही त्या बदमाष बैराग्याला माझ्या स्वाधीन केलें पाहिजे. त्याला शासन माझ्या हातून झालें पाहिजे."

"कबूल. मग तर झालें?"

"हो!"

याप्रमाणें सुभानजीची समजूत एकदांची झाली, व ते दोघेही त्या बैराग्यापाशीं आले. सिद्दी याकूबनें बैराग्याला विचारलें, "तुला भानाजी पिसाळ कोठें आहे तें माहीत आहे?"

"तें मला माहीत असलें तरी तें मी तुमच्यापाशीं सांगणार नाहीं." बैरागी उत्तरला.

"तर मग तूंही आमच्या हातून जिवंत सुटणार नाहींस. बऱ्या बोलानें तुला काय माहीत असेल तें सांग, नाहींतर येथल्या येथें आतांच्या आतां तुझ्या अंगावरच्या कपड्यांना आग लावून तुला जिवंत जाळून मारूं." सिद्दी याकूब त्वेषांत उद्गारला.

बैरागी निर्भयपणें म्हणाला, "मी अस्सल मराठा आहें. अस्सल मराठ्याला मरणाचें भय मुळींच वाटत नाहीं. माझा बैराग्याचा पेशा नवा आहे; पण

मूळचा पेशा अस्सल लढवय्या मराठ्याचा आहे. बाबारे ! मी मरणाला भिऊन वागलों असतों तर आजला माझ्या वैभवाला पारावार उरला नसता. मीं भानाजीचा पत्ता तुम्हांला सांगितला असता. त्याच्यासारखे देशद्रोही तुमच्या-सारख्यांच्या हातून देहान्त प्रायश्चित्तानेंच पावन झाले पाहिजेत. फितुरी व व अनन्वित अन्याय करून संपादन केलेलें वैभव केव्हां केव्हां सव्याज ओकावें लागतेंच. पण इथें पहावें तो सारेच फितूर ! तुमच्यापेक्षां भानाजी शत-पटीनें बरा !"

"इतक्या बेदरकारपणें बोलणारा तूं कोण रे ?" सुभानजीनें पुन्हा विचारलें.

"मी कोण ? हरामखोरा ! मी तुझ्यासारख्या सर्पांना दूध पाजून जगविणारा व त्या सर्पांनीं ताजेतवाने होऊन आपल्या प्राणदात्याच्या मानेला दंश केल्यावर त्या प्राणांतिक वेदनांनीं तडफडत मृत्यूच्या दारीं धरणें धरून बसणारा एक भोळा मूर्ख माणूस आहे. मी कोण तें तुला तुझ्या धन्याच्या समक्ष सांगेन." बैरागी आपल्या सभोंवार उंच हातानें अंगुलिनिर्देश करून म्हणाला, "मी येथला मालक ! येथल्या साऱ्या सजीव व निर्जीव सृष्टीचा त्राता—पाता ! मी नसतों तर ही थळची चौबुरुजी इतकी भराभराटली नसती. मी नसतों तर ह्या बजरंगबलीच्या पवित्र देवालयाच्या भूमीची मसणवटच आज साऱ्या जगाला दिसली असती, व सागर-गड तर केव्हांच जमीनदोस्त होऊन गेला असता. ह्या थळसुभ्याचें वैभव कळसाला पोंचाविले तें मीं ! मीं माझें व माझ्या सग्यासोयऱ्यांचें रक्त येथें सांडून ही भूमि ऊर्जितावस्थेला आणली, म्हणून तुम्ही येथें आज आयत्या बिळांतील नागोबां-सारखे मिरवीत आहां ! झाड कोणीं लावलें व फळ कोण खातो ! सचोटीनें वाग-णारे वणवण करून देशोदेशीं भीक मागतात, व दगलबाज हरामखोर मारे ऐष-आराम भोगीत असतात !" बैरागी एक दीर्घ उसासा सोडून खिन्नतापूर्वक म्हणाला, "काळाचा महिमा अगाध आहे. त्या काळाला माझा कोंपरापासून नमस्कार असो."

"अरे यार !" सिद्दी याकूब सुभानजीकडे पाहून उपहासपूर्वक हंसून म्हणाला, "हा तर आपल्या माहितीचा वेडा बजरंग बैरागी दिसतो !"

"अस्सें !" सुभानजी किंचित् आश्चर्यानें म्हणाला, "मला माहीत नाहीं !"

"तुला माहीत नाहीं ? बरोबर. हा पूर्वी येथें आला होता तेव्हां तूं कुलाब्याला नोकरीला होतास. सुमारें चारपांच महिन्यांपूर्वी म्हणजे येथला सारा जमाना बदल-ल्यावर भानाजी पिसाळाला सिद्दी सातानें चौबुरुजीवरून हाकलून दिलें, त्याच दिवशीं

ही स्वारी आम्हांला चौबुरुजीवर भेटली. भानाजीच्या नाशांत आनंद मानून बजरंगबलीच्या देवालयांत गोरगरिबांना साखर वांटली ती ह्याच मूर्खानें. तेव्हांपासून हा कैक दिवस बजरंगबलीच्या देवालयांतच वास्तव्य करी. रोज भिक्षा मागावयाची, नित्यनियमानें चौबुरुजीवर येऊन रावबा सुर्व्यांच्या थडग्याला शंभर प्रदक्षिणा घालावयाच्या व तेथें भंडारा करावयाचा, असा त्याचा क्रम होता; त्या वेळींदेखील तो 'मीं बजरंगबलीची दीक्षा घेतली आहे, मी साक्षात् बजरंगबली आहें, मी येथला धनी आहें', अशा वल्गना नेहमीं करी. कोळी लोक तेव्हां याच्या इतके भजनीं लागले होते कीं, बोलण्याची सोय नाहीं. त्यांनीं त्याला खरोखरच बजरंगबलीचा अवतार बनविलें होतें. मध्यंतरीं स्वारी जी येथून आम्ही हांकलल्यामुळें काळें करून कोठें गेली होती, ती आज पुन्हा उमटली !"

सिद्दी याकूबचें बोलणें संपतांच तो बैरागी स्वतःच्याच तंद्रींत बेगुमानपणें ओरडला, " बजरंगबली की जय !"

## प्रकरण दहावें

# प्रळय

हिंदी याकूबनें त्या बैराग्याचा एवढा पूर्व परिचय करून दिल्यावर तेथल्या बहुतेक सैनिकांना व सुभानजीलाही त्याची ओळख पटली. सुभानजीनें जरी पूर्वी त्या बैराग्याला प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें, तरी त्याच्या पश्चात् त्याची कीर्ति आजवर अनेकदां त्याच्या कानीं आली होती. त्या बैराग्याला अनेक लोक वेडा असें म्हणत हें खरें, व बैराग्याचे कांहीं चाळे वेडेपणाला शोभणारे असतही. कधीं त्या बैराग्यानें एखादी सौभाग्यवती आढळतांच 'ए बाई' कुंकू कशाला लावतेस ? पूस, तें पूस' असें तिला म्हणावें. कधीं सशस्त्र सैनिक हातीं शस्त्रें घेऊन कोठें निघालेले आढळतांच 'अरे नामर्दांनो ! लुगडीं नेसून हातांत बांगड्या भरा बांगड्या ! तुमच्या हातांत तीं शस्त्रें मुळींच शोभत नाहींत' असें सांगावें. कधीं स्वतः भिक्षेंत जुनेरें व बांगड्या मागून स्वतः धारण करून इकडे तिकडे मिरवावें. कोणी भाविक पुत्रकामनेनें दर्शनाला आल्यास 'तुझी बायको वांझ होईल', 'तुझीं पोरें मरतील' आणि कोणी स्त्री आल्यास 'तूं विधवा होशील', 'तूं वांझोटी होशील' असे कटु शब्द त्या भाविकांना ऐकवावे. रस्त्यानें जातांच 'मुसलमान होऊन दोन्ही वेळां जेवावें', 'आपल्या पोरी-बहिणी मुसलमानांना देऊन त्यांच्या जिवावर सरदारी-शिलेदारी मिळवावी', 'नेकजात माणसांनीं उपाशीं मरावें व फितूर पिसाळांनीं तूपपोळी चापावी' अशीं स्वकृत वचनें गावीं. असले चाळे करणाराला जन वेडा म्हणेल नाहीं तर काय म्हणेल ! पण खरे श्रद्धाळू लोक हीं त्या बैराग्याचीं वचनें श्रद्धेनें ऐकत. व जिथें भाव तिथें देव या न्यायानें त्यांना तीं उपदेशक वाटत. त्यांना 'कुंकूं पूस' याचा अर्थ 'मायभूमि विधवा झाली आहे, तिथें तिच्या कन्यांच्या वेगळी सौभाग्याची काय किंमत' असा उमजे. 'बांगड्या भरा व लुगडीं नेसा' हे शब्द 'मायदेशासाठीं मरावयाला तयार होऊन हातीं शस्त्र धरा' अशा अर्थाचे भासत. 'तूं वांझ होशील', 'तुझीं पोरें मरतील', 'तुझी बायको वांझ होईल' 'तूं विधवा होशील' या शब्दांतून 'परदास्यांत कुजणाऱ्या समाजाची वाढ झाल्यानें देशांतील गुलामांचीच संख्या वाढणार; त्यापेक्षां परवश समाजांतील स्त्रिया वांझ झालेल्या बऱ्या', 'तुमचीं मुलें आपल्या मायभूमीच्या दास्यविमोचनासाठीं-आपल्या देवा-

धर्माच्या रक्षणासाठीं–शत्रूशीं झगडतांना कामीं येवोत', 'तुमचे पति आपला देश, आपला देव व आपला धर्म यांसाठीं धारातीर्थी पतन पावोत' असा सद्धेतुप्रधान अर्थ पटे; आणि अशा सद्भावनेनें जवळ येणाऱ्या भाविकांना तो बैरागी आपल्या कटु वचनांचा तसा अर्थ विशद करून सांगे. त्या बैराग्याच्या अशा प्रकारच्या शिकवणीनें तेव्हां तेथल्या अनेक स्त्री-पुरुषांना कार्यतत्पर केलें होतें, व त्याला एक भयंकर वेडा ठरवून स्थानिक अधिकाऱ्यांनीं चौबुरुजीच्या हद्दीबाहेर हाकलून दिलें नसतें तर कदाचित् त्याच्या प्रोत्साहनानें तेथें भयंकर क्रान्ति होऊं शकली असती; पण त्या भूतकाळांतील गोष्टी सांगण्यांत स्वारस्य नाहीं. या प्रसंगीं त्या भूतकालाविषयीं वैशिष्ट्यानें निर्देशण्यासारखी गोष्ट एवढीच कीं, आज त्या वेळीं तेथें आलेल्या सशस्त्र घोडेस्वारांतील एकजण भवानजी चव्हाण कोंकणराव हा त्या बैराग्याच्या तत्कालीन शिष्यवृन्दापैकीं एक शिष्य होता, व तो पूज्यभाव आज पुन्हा त्याच्या अंतःकरणांत उपजला होता. असो.

सिद्दी याकूबनें त्या बैराग्याचा पूर्ववृत्तान्त उपहासपूर्वक निवेदन केला. तेव्हां सुभानजीला त्या बैराग्याविषयीं जास्त तिट्कारा आला. तशांत त्या बैराग्यानें बेडरपणें बजरंगबलीचा जयजयकार केला. तेव्हां तर सुभानजीच्या नाकाला खाशा मिरच्या झोंबल्या. त्यानें रागानें डोळे लाल करून ओंठ चावीत त्या बैराग्याला दरडावणीच्या भाषेंत विचारलें, "तूं सरळ उत्तर देत नाहीं ना ?"

बैरागी यावर पूर्ववत् बेदरकारपणें उत्तरला, "वांकडया बुद्धीच्या माणसाला सारें जग वांकडेंच दिसावयाचें."

"काय ! पुन्हा आमचा अपमान ?" सुभानजी सिद्दी याकूबकडे वळून म्हणाला, "याकूबखान ! वेडा म्हणून याची गय करतां उपयोगी नाहीं. हाच उद्यां शेफारून जगभर सांगत सुटावयाचा कीं, अमुक फलाण्याची आपण अशी खोड मोडली." लगेच तो आपल्या बरोबरच्या सैनिकांकडे वळून त्यांतल्या एक-जणाला म्हणाला, "भवानजी ! पहातोस काय ? त्या वेडयाची गर्दन उडव !"

भवानजीनें लगेच उत्तर दिलें, "छे ! मामासाहेब ! तें माझ्या हातून होणार नाहीं. माझी ही तरवार ही माझी उपास्यदेवता आहे. दुर्जनांचें निर्दालन करतांना मला विजयश्रीनें माळ घालावी अशी मी तिची रोज पूजेच्या वेळीं प्रार्थना करतों, व ती देखील आजवर माझ्या गाऱ्हाण्याला जागली नाहीं असें झालें नाहीं. तिला जर मी साधुसंतांचें रक्त पाजूं लागलों, कसायाच्या सुरीच्या मोलानें तिला वागवूं

लागलों, तर ती क्रुद्ध होऊन मला शापील; व मी अशा बद्‌करणीनें माझे बेचाळीस पूर्वज नरकांत लोटल्याच्या पापाचा धनी होईन."

असें कसें झालें ? भवानजी एकाएकीं कसा उलटला ? याविषयीं स्वतःशीं खोल विचार करून सुभानजी भवानजीला म्हणाला, "भवानजी ! आपण ज्या पिशाचांचा बंदोबस्त करण्याचा पहिला उपाय योजण्यासाठीं येथें आलों, त्याच पिशाचांनीं तुला आजकाल पछाडलेलें दिसतें."

"नाहीं, तसें नाहीं. मी येथल्या ह्या पुण्यभूमींत येतांच आजवर मला पछाडून बसलेलीं पिशाच्चें येथल्या बजरंगबलीच्या भयानें मला बाधेनाशीं होत आहेत. त्याचा परिणाम आहे. नाहींपेक्षां आजवर तुमच्यासारख्यांच्या संगतीनें कांहीं थोडेथोडके अपराध केले नाहींत." भवानजी उत्तरला.

"बजरंगबलीकी जय !" बैरागी हर्षभरानें ओरडला.

"बजरंगबलीकी जय !" सिद्दी याकूब नाक फेंदारून बैराग्याला वेडावून म्हणाला, "म्हणे बजरंगबलीकी जय ! जसा बजरंगबली नामर्द, तसेच त्याचे तुम्ही भक्तही नामर्द ! खरोखरच बजरंगबलीकी जय असता, तर तो बजरंग-बली त्याच्या देवळाची मशीद आम्हीं केली तेव्हां आमचें शासन करण्याचें सोडून आमच्या पायातळची पायरी होऊन कशाला बसला असता ?"

बैरागी एकदम खवळून मुठी आंवळीत उद्गारला, "अरे लांड्या ! शिखा-नष्टा ! तुमच्या पापांचे घडे लौकर कांठोकांठ भरावे, व तुमच्या पापांतच तुमचा संहार व्हावा, म्हणून बजरंगबलीनें आजवर सौम्यवृत्ति स्वीकारली; पण आतां तुमची घटका भरत आली आहे. थोड्याशा कालानें ती पूर्ण भरेल व बजरंग-बलीचा प्रत्येक उपासक बजरंगबलीच्या कृपाप्रसादानें वज्रदेही होऊन मनगटाच्या मेखसूंनीं तुमचीं मस्तकें कचाकच फोडूं लागेल, तेव्हां तुमचे डोळे उघडतील व लगेच कायमचे मिटतील." येवढें बोलून बैराग्यानें एकदम गर्जना केली, "बोला बजरंगबलीकी जय !"

सर्व हिंदु सैनिक बैराग्याच्या सुराला सूर भिडवून 'बजरंगबलीकी जय' असें ओरडले. नानाजीलाही तेव्हां परिस्थितीचें भान न उरून तोही तसेंच ओरडला; पण सुदैवानें त्याचा स्वर हिंदु सैनिकांच्या प्रचंड स्वरांत मिसळून एकजीव झाल्या-मुळें कोणाचें तिकडे विशेष लक्ष्य गेलें नाहीं. तरीही बैराग्यानें मात्र तो अज्ञात स्वर ओळखला, व म्हटलें, "ऐका ! ऐका ! तुम्हां मुसंड्यांच्या व फितुरांच्या

अनन्वित छळामुळें देवा-धर्मांच्या रक्षणासाठीं ज्यांचे बळी पडले, ते हुतात्मे वायुरूपानें ह्या पुण्यभूमींत संचार करीत असतात; त्यांनींही बजरंगबलीचा एकमुखानें जयजयकार करून माझ्या पवित्र इच्छेला मान्यता दिली, ती ऐका!"

तो अज्ञात स्वर ऐकून सुभानजी व सिद्दी याकूब मनांत किंचित् खचल्यासारखे होऊन एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले. अंमळशानें सुभानजी भवानजीला म्हणाला, "भवानजी! तूं खाल्ल्या घराचे वांसे मोजणारा निमकहराम ठरणार काय?"

भवानजी उत्तरला, "मी खाल्ल्या घराचे वांसे मुळींच मोजीत नाहीं; उलट खाल्ल्या अन्नाला मी जागतों आहें. तुमचें अन्न मीं आजवर खाल्लें, म्हणूनच यापुढें तुमचा अधिक अधःपात होऊं नये एवढ्यासाठीं मी कायावाचामनानें झटतों आहे."

"तूं माझा हुकूम पाळीत नाहींस?"

"तुमचे गैरशिस्त व अनर्थकारक हुकूम मीं पाळले, तर त्यामुळें माझा स्वतःचा अधःपात तर होईलच; पण शिवाय तुम्हांला अधर्माचरणाला प्रोत्साहन दिल्याच्या पापाचा धनी मी होईन."

"अशानें तूं आपल्या सर्वस्वाचें वाटोळें करून घेत आहेस. समज, मीं तुला ह्या अपराधाबद्दल नोकरींतून कमी केलें तर?"

"अधर्मी धन्याची नोकरी करण्यासारखें पाप ह्या पृथ्वीतलावर दुसरें नाहीं."

"मग तुला चांगुणा लाभणार नाहीं."

"चांगुणा स्वजनद्रोही व स्वधर्मद्रोही कमअस्सल चांडाळाला कधींच लाभणार नाहीं. आणखी असें कीं, एका जिवाच्या जिवलगेसाठीं मी माझ्या देवाधर्माशीं कधींच बेइमान होणार नाहीं."

"विचार कर! भवानजी, याचा नीट विचार कर!"

"केला. मीं पूर्ण विचार केला."

"तर मग तुझें कर्म आणि तूं!" सुभानजी एकदम पुढें होऊन भवानजीच्या कमरपट्ट्यांतील तरवारीला हात घालून ती हिसकावून घेत म्हणाला, "चल, आण ती माझी तरवार इकडे."

त्यानें ती तरवार हिसकावून घेऊन धाड्कन् जमिनीवर आपटून पायांखालीं तुडवीत म्हटलें, "तुझ्यासारख्या बेवकूफाच्या स्पर्शानें विटाळलेली ही तरवार

हातीं घेतल्यानें माझे हात मात्र विटाळले. तिची व ती धारण करणाऱ्या तुझीही अशीच संभावना केली पाहिजे."

भवानजी आपल्या तरवारीला साक्षात् संग्रामदेवता मानून नित्य मनोभावानें तिची पूजा करी. तिला अपवित्रपणें कधीं स्पर्श देखील करीत नसे. त्या तरवारीची सुभानजीनें अशी विटंबना केलेली पाहून भवानजीला विलक्षण चेव आला. तो ती तरवार तशीच उचलून घेऊन म्हणाला, "बस्स! मामासाहेब, तुम्ही माझ्या संग्रामदेवतेचा असा अक्षम्य अपमान केला आहे, त्या अर्थी तुमचा माझा ऋणानुबंध आतां कायमचा तुटला. ही देवता इतकी प्रखर आहे कीं, ज्याच्या पापी स्पर्शानें तिला मालिन्य लागलें, त्याच्याच रक्तानें ते मालिन्याचे डाग धुवून काढल्याशिवाय ती कधीं शांत व्हावयाची नाहीं. यास्तव तें मालिन्य मला हें असें, हें असें धुवून काढलेंच पाहिजे." येवढें बोलतां बोलतां भवानजीनें डोळ्याचें पातें लवतें न लवतें, तोंच असा सफाईचा वार सुभानजीवर केला, कीं सुभानजीनें सावधपणानें तो चुकविण्याचा प्रयत्न केला तरी भवानजीची तरवार त्याच्या उजव्या बाजूला चाटून गेलीच.

सुभानजीनें तेवढ्यानें नाउमेद न होतां आपली तरवार म्यानांतून सरकन् बाहेर काढून भवानजीवर उलट वार करण्याचा प्रयत्न केला; पण त्याला तो चुकवितां आला नाहीं. त्या वाराची भवानजीच्या छातीवर जबरदस्त जखम होऊन तो धाड्कन् धरणीवर कोसळला.

लगेच सुभानजीनें आपल्या शिपायांना आज्ञा केली, "पहातां काय? त्या जोगड्याला पकडा."

हा सर्व प्रकार पाहून नानाजीच्या सर्वांगाचा संतापानें बेसुमार भडका झाला होता. तो त्या समरकुंडांत उडी घालण्याला अगदीं उत्सुक झाला होता; पण तो आपला कमरपट्टा पहातो तों तरवार नाहीं!

इतक्यांत तो बैरागी छातीठोकपणें त्या शिपायांसमोर जाऊन उभा राहिला, व त्यांना म्हणाला, "काय? तुम्ही मला पकडणार? तुम्ही सागरगडचे शिपाई आजवर तुम्ही आपल्या छातीचा कोट करून आपल्या गडाचें रक्षण केलेंत, त्या गडाचा शत्रूच्या साहाय्यानें पाडाव करून गड बळकावूं पहाणाऱ्या ह्या फितुराची आज्ञा पाळून तुमच्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं मरणाच्या मोलानें झटणाऱ्या मला तुम्ही पकडणार? मुसंड्यांचा लेकावळा हा, याच्या सांगण्यावरून तुमच्या हित-

कर्त्यांचा नाश केल्याचें महत्पाप जोडून तुम्ही आपल्या देवा-धर्मांची-आपल्या आया बायका-बहिणींची विटंबना करण्याला मुसंड्यांना मोकळें रान करून देणार ! बोला बजरंगबलीकी जय ! आणि आपल्या मायदेशासाठीं आपल्या देवा-धर्मासाठीं, आपल्या आया-बायका बहिणींच्या अब्रूसाठीं मरावयाला तयार होऊन माझ्या मागोमाग आपल्या गडाचें रक्षण करण्यासाठीं चला.'' जवळच निश्चेष्ट पडलेल्या भवानजीकडे बोट दाखवून बैरागी म्हणाला, "हा तुमचा अभिमन्यु रणांगणांत पडला आहे, याची कांहीं लाज धरा. अस्सल हिंदूंच्या अवलादीचे नसाल, नेकजात मराठ्यांचें पवित्र रक्त तुमच्या नसानसांतून खेळत नसेल, तर या, मला पकडा, या.''

इतका वेळ ते शिपाई बैराग्याला पकडण्याचें सोडून स्तब्ध कसे राहिले ही एक नवलाची गोष्ट आहे असें कोणाला वाटेल; पण वस्तुतः त्यांत नवल कांहींच नव्हतें. बैरागी आपल्या जिवंतवाणीनें त्या शिपायांवर मोहिनी घालूं लागतांच त्यांना हात वर उचलण्याचा धीरच होईना. सुभानजी व सिद्दी याकूब मधून मधून त्यांना टोंचून बोलून, धमकावून कार्यतत्पर करण्याचा प्रयत्न करीत होते; पण उपड्या घड्यावर पाणी ओतल्याप्रमाणें त्या प्रयत्नांची गत झाली. उलटपक्षीं बैराग्याच्या प्रत्येक कळवळ्याच्या शब्दाबरोबर स्वाभिमानाच्या तेजाची नवी नवी प्रभा त्या शिपायांच्या अंतःकरणांत फांकू लागली होती. अशा स्थितींत बैराग्याला कैद करणें दूरच राहिलें, हे शिपाई उलट आपणावरच उलटतात कीं काय असें सुभानजी व सिद्दी याकूब ह्या दोघांनाही भय वाटूं लागलें. ते दोघेही कुठचें काय व कुठचें काय, तेथून पळ काढण्याच्या विचारांत आहेत असें पहातांच बैरागी शिपायांना म्हणाला, "पहातां काय ! त्या हरामखोराला पकडा.''

बैराग्याची आज्ञा होतांच शिपाई त्या दोघांना घेरूं लागले. तेवढ्यांत बाहेर पहाऱ्यासाठीं उभे असलेले मुसलमान शिपाई गडबड ऐकून आंत आले व त्यांनीं हिंदू शिपायांवर एकदम हल्ला करून बैराग्याला घेरलें. बैराग्यानें 'बजरंगबलीकी जय ! हरहर महादेव' अशी घोषणा केली, त्याबरोबर हिंदू शिपाई मुसलमान शिपायांवर तुटून पडले. सुमारें पावघटकाभर तेथें दंगल झाली; व तिनें कल्पांतीं-च्या प्रळयकाळाची आठवण करून दिली.

नानाजी हा सारा प्रकार दुरून पहात होता. त्याच्या अंतःकरणांत विलक्षण कालवाकालव सुरू झाली होती, व बाहु वीरश्रीनें स्फुरत होते; पण हातीं शस्त्र

नसल्यानें तो पंगु झाला होता. अखेर ह्या दंगलींत बैराग्याच्या जिवाला धोका आहे अशी खात्री होतांच नानाजीनें तशा निःशस्त्र स्थितींतच बैराग्याच्या साह्याला धावून जाण्यासाठीं भिंतीवरून धाड्कन् आंत उडी मारली.

पण ईश्वरी योगायोग निराळा होता. त्यामुळें नानाजीनें खालीं उडी मारतांच त्याच्या पायाच्या धक्क्यानें भिंतीचा एक मोठा दगड कोसळला; तो नानाजीच्या अंगावरच नेमका कोसळून नानाजी तेथल्या तेथें बेशुद्ध होऊन पडला. सुदैवानें तिकडे कोणाचें लक्ष्य मात्र गेलें नाहीं. कारण एक तर इतकें स्वास्थ्य कोणाला नव्हतें, व दुसरें नानाजी पडला ती जागा इतकी आडवशाची होती कीं, सहज-गत्या तिकडे कोणाचें लक्ष जाणें शक्य नव्हतें.

सुमारें एका घटकेनंतर नानाजी शुद्धीवर आला. त्यानें मोठ्या कष्टानें आपल्या अंगावर पडलेला दगड दूर लोटून आपली मोकळीक करून घेतली, व सभोंवार नजर फेंकून पहातो तों जिकडे तिकडे स्मशानाप्रमाणें शांत-निस्तब्ध ! नाहीं म्हणा-वयाला तेथें थोडया अंतरावर मरून पडलेल्या मुड्याच्या मांसावर ताव मारण्या-साठीं तेथें जमलेल्या प्राण्यांच्या हालचालीनें व घुबडांच्या घुत्कारानें मात्र थोडीशी जाग मिळत होती. पण त्या जागेमुळें तेथल्या परिस्थितीच्या भयाण स्वरूपांत भरच पडत होती. त्याच वेळीं आकाशांत मेघांची गर्दी उडाल्यामुळें चांदणेंही नाहींसें झालें होतें. कदाचित् असें असेल, तेथें नुक्ताच घडून आलेला अनर्थ नभोमंडळांत तारांच्या रूपानें वास्तव्य करणाऱ्या तेथल्या दिवंगत पुण्यपुरुषांना पहावेनासा झाल्यामुळें त्यांनीं अभ्राच्या आच्छादनाखालीं आपलीं तोंडें लपवून घेतलीं असतील !

## प्रकरण अकरावें

# असें कसें झालें ?

पण असें कसें झालें ? सुभानजी व सिद्दी याकूब इतक्या तांतडीनें भानाजीचा तपास करण्यासाठीं बरोबर सैनिक घेऊन कसे धांवत आले ? त्या मंडळीला चौबुरुजीवर नानाजी आल्याचा सुगावा कसा लागला ? ह्या सर्व गोष्टींचा उलगडा करण्यासाठीं आपणाला थळच्या चौबुरुजीवर जाऊन त्या रात्रौ दिवेलागणीपासून भानाजीच्या शोधासाठीं लोक रवाना होईपर्यंतच्या दोन घटकांत काय काय घडा-मोडी झाल्या याबद्दल त्या स्थल काल परिस्थितीची साक्ष घेतली पाहिजे.

त्या दिवशीं सूर्यास्ताला सुलतान मशिदीकडे नमाज पढावयाला गेल्यावेळीं सुलतानाला तेथें पिशाचाचा संशय आला व सिद्दी याकूबनें ती वेळ साधून भानाजी पिसाळाविषयीं विष त्याच्या कानीं ओतलें; तेव्हां सुलताननें जरी भानाजी-ला पकडून औदुंबराच्या झाडावर फांशी देण्याचा व भानाजीचें घरदार उध्वस्त करण्याचा हुकूम तडकाफडकीनें सोडला, तरी भानाजी पिसाळ हा सर्व बाजूंनीं दुबळा झालेला मृतप्राय मनुष्य आहे हें त्याला व सर्वांना माहीत होतें. त्यामुळें त्या हुकुमाची तडकाफडकी अंमलबजावणी झालीच असती असें नाहीं. नमाज पढून माघारा चौबुरुजीवर जाईतों सुलतान तो हुकूम विसरूनदेखील गेला असता. याचा अर्थ सुलतान इतका विसरभोळा होता असा नव्हे. तो स्मरणशक्तीचा पक्का व मनाचा खंबीर होता. पण आज त्याचें मन त्याच्यापाशीं नव्हतें, तें दिलाराच्या प्राप्तीप्रीत्यर्थ तिच्याबरोबरच फत्तेकोठींत जाऊन बसलें होतें. आपण कधीं एकदां तिकडे जातों व कधीं एकदां दिलारा आपल्या आधीन होते, असें सुलतानाला होऊन गेलें होतें. इंचबर्डसाहेब व सिद्दी सात आज येणार, त्यांच्या सरबराईची कामगिरी सुलतानानें पूर्वीच सुभानजीच्या माथीं मारली होती, व भावी हितावर दृष्टि ठेवून–किल्लेदार व सिद्दी सात यांच्या कृपेनें आपणाला सागर-गडची किल्लेदारी मिळावयाची आहे व भानाजी पिसाळाची स्वरूपसुंदर चांगुणा-ही प्राप्त व्हावयाची आहे हें ओळखून, दोघांसमोर लाळघोटेपणा करण्याची संधि अनायासें प्राप्त होत आहे हा आपल्या भावी उत्कर्षाला शुभ शकुनच झाला असें समजून–ती कामगिरी सुभानजीनेंही आनंदानें पत्करली होती.

पण सुलतान आपल्या लोकांसह चौबुरुजीवर जाऊन पोंचतो व इंचबर्डसाहेब

आणि सिद्दी सात यांच्याशीं ख्यालीखुशालीचे चार शब्द बोलून झाल्यावर दोन घटका रात्रीला आजारीपणाचें खोटेंच निमित्त सांगून दिलाराला भेटण्यासाठीं फत्तेकोठडीकडे वळतो तोंच दिलाराबरोबर आलेला दत्ताजी त्याला दरवाज्याबाहेर भेटला.

" दत्ताजी ! तूं इकडे कोणीकडे चाललास ? सुलतानानें विचारलें.

दत्ताजी नम्रपणें लवून मुजरा करून म्हणाला, " किल्लेदारसाहेब ! मी तुम्हांला एक धोक्याची सूचना देण्यासाठीं इतका वेळ तुमचीच वाट पहात होतों."

दत्ताजी दिलाराविषयीं कांहीं आनंदाची बातमी आपणाला सांगेल, 'दिलारा तुम्हांला भेटण्यासाठीं अधीर झाली आहे' असले अमृतापेक्षांही मधुर बोल आपणाला ऐकवील, अशी अपेक्षा दत्ताजीला पहातांच सुलतानाच्या मनांत अंकुरित झाली होती. दत्ताजीच्या अनपेक्षित बोलांच्या झळीनें तो कोमल अंकुर तत्काळ करपून गेला. तरीही सुलतान आशाळभूतपणानें दत्ताजीला म्हणाला, " धोक्याची सूचना मग दे; पण अगोदर गुलिस्तानची परी तूं कोठें पैदा केलीस तें सांग."

" हें काय ? तुम्हीं तिला ओळखली नाहीं ? "

" छेः! मी कशी ओळखूं ? तूं तिचें नांव दिलारा म्हणून सांगितलेंस, तेवढें मात्र मीं ऐकलें."

" वाः ! किल्लेदारसाहेब ! ती प्रभावती नव्हे का ? "

" काय ? ती प्रभावती ? नानाजी सुर्व्यांच्या नादीं लागून पळून जाणारी तीच अस्मानची बिजली प्रभावती काय ? " सुलतानानें विस्मयोल्हासानें बेहोष होऊन विचारलें.

" होय. पण हें पहा, तिचें खरें नांव आपण लपवलेंच पाहिजे. नाहींपेक्षां वेळ अशी चमत्कारिक आली आहे कीं, ती अस्मानची बिजली तुमच्या व माझ्या दोघांच्याही डोक्यावर कडाडण्याचा संभव आहे."

" म्हणजे काय ? "

" प्रभावतीचा प्रियकर व तुमचा कट्टा वैरी नानाजी सुर्वे आज येथें आला आहे. त्याला जर प्रभावती इथें आहे असें कळलें, तर—"

" काय ! नानाजी सुर्वे इथें आला ! तो तर राजपुरीच्या किल्ल्यांत कैदेंत होता ! "

" होय. होता खरा; पण तो कसा नकळे, तुरुंगांतून बाहेर पडून येथवर आला

आहे. रात्रींच्या वादळांत त्याची व आमची गांठ पडली. त्यानेंच आम्हांला वादळांतून वांचविलें. नाहींपेक्षां आम्ही बुडून मरावयाचे"

"पण हें खरें ! तूं त्याला प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिलास ?"

"तर ! तुम्हींही त्याला सायंकाळीं किनाऱ्यावर पाहिलें असेल. पण ओळखलें नसेल, मीं त्याला रात्रींच ओळखलें. पण तेव्हां व किनाऱ्यावर उतरल्यावर तो भेटला तेव्हांही त्याला ओळख दिली नाहीं. अशासाठीं कीं, लगेच प्रभावती बिथरावयाची, व मग ती अस्मानची बिजली मुळींच हातीं धरतां यावयाची नाहीं. यासाठीं आपण तिचें खरें नांव विसरलेंच पाहिजे. ती आपली दिलारा आहे, ध्यानीं ठेवा."

इतक्यांत सुभानजी आपल्या घरीं जाण्यासाठीं निघाला होता, तो त्या दोघांना बोलतांना पाहून तेथें आला. सुभानजीला थोड्या वेळापूर्वीं सिद्दी याकूब भेटला होता. त्याच्या तोंडून भवानजीनें बजरंगबलीच्या आवारांत घडलेला सर्व वृत्तान्त ऐकला होता, त्यावरून भानाजी पिसाळ आतां नक्की फांशीं जाणार व त्याच्या घरादारावरून सुलतान गाढवाचा नांगर फिरविणार अशी सुभानजीला खात्री वाटू लागली होती. भानाजीच्या मुलीवर-चांगुणेवर-सुभानजीचा डोळा होता. पण चांगुणाच त्याला वरण्याला तयार नव्हती. चांगुणा आज चौबुरुजीवरील मिरवणुकीचा थाट पहाण्यासाठीं आली असतां सुलतानानें भानाजीला देहान्त शिक्षा देण्याचें ठरविलें असल्याची बातमी तिच्या कानांवर आली; त्याबरोबर तिनें असहाय स्थितींत सुभानजीपाशीं जाऊन पित्याच्या रक्षणासाठीं त्याची विनवणी केली, व 'माझ्या बाबांना तुम्ही वांचवाल तर मी त्या उपकारांचें ऋण जन्मावेरीं फेडण्यासाठीं तुमच्याशीं लग्न करीन. मात्र जर बाबा मला भेटले नाहींत, तर मीही पुन्हा या जगांत तुम्हांला दिसणार नाहीं, असें निक्षून सांगितलें. सुभानजीला कोणत्याही आमिषानें चांगुणा आपणाला वश होईल, असें मुळींच वाटत नव्हतें. त्यामुळें तो अलीकडे फारच निराश झाला होता. त्या निराशेंतील शेवटची धडपड म्हणून त्यानें कोणत्या ना कोणत्या उपायानें भानाजीला गोत्यांत आणून व चांगुणाला असहाय करून मग तिच्यापाशीं प्रेमयाचना करावयाची, किंवा भानाजीला ओलीस धरून चांगुणेची प्राप्ति झाली तर पहावयाची, असा निश्चय तुक्ताच दोन दिवसांपूर्वीं केला होता. त्या निश्चयपूर्तीची पहिली पायरी म्हणून त्यानेंच 'भानाजी किल्लेदाराविरुद्ध कट करीत आहे. एका कटवाल्याला बरोबर घेऊन तो सूर्यास्ताच्या वेळीं खाडीच्या

किनाऱ्याला हिंडत होता' अशी हूल उठवून दिली होती. अशी हूल उठविण्यांतील मुख्य उद्देश, आज सिद्दी सातहो अनायासें आला आहे. अशा वेळीं खाशांच्या कानापर्यंत ही ओरड गेल्यावर ते ताबडतोब भानाजीला शासन करण्याचें ठरवितील व ती कामगिरी आपल्या वांट्याला आल्यावर आपला डाव साधेल, हाच होता. ह्या बेत ठरल्यावर सुभानजीला पहिला श्रोता भेटला तो सिद्दी याकूब! सिद्दी याकूबच्या मनांतून देखील भानाजीचा नायनाट करावयाचा होता व त्या दृष्टीनेंच त्यानें ही कारवाई चालविली होती. त्याला सुभानजीनें आणलेल्या नव्या बातमीची जोड मिळतांच इतका आनंद झाला कीं, बोलावयाची सोय नाहीं. त्या आनंदाच्या भरांत त्यानें सुभानजीच्या सल्ल्यानेंच प्रथम ही बातमी ताबडतोब सुलतान व सिद्दी सात ह्या दोघांच्याही कानांवर घालण्याचें कबूल केलें होतें.

पण येवढा कळलावेपणा करून सुभानजी घरीं जातो न जातो तोंच चांगुणा त्याला भेटली, त्याबरोबर सारा रंग पालटला. आपलीच विद्या आपणाला मारक होणार असें सुभानजीला वाटूं लागलें. चांगुणेच्या अभिलाषानें त्याचा दृष्टिकोण एकदम बदलला; व भानाजीचें रक्षण होण्याची आवश्यकता त्याला भासूं लागली. तो आपलें कपटजाल आवरत घेण्यासाठीं प्रथम सिद्दी याकूबच्या घरीं गेला. पण सिद्दी याकूब कांहीं भेटला नाहीं. त्यावरून सिद्दी सात व किल्लेदार सुलतान यांच्या कानांत त्या वार्तेचें विष ओतण्याच्या कामगिरींत सिद्दी याकूब गढून गेला असावा असा तर्क सुभानजीनें केला, व त्या लावालावीचा वणवा ताबडतोब विझवून भानाजीचें रक्षण कसें करावें याविषयीं विचार करीत तो तसाच सुलतानाची भेट घेण्यासाठीं बाहेर पडला होता. सुलतानाच्या कोणा हस्तकानें आज एक खबसूरत पोरगी सुलतानासाठीं आणली आहे व फत्तेकोठींत तिची रवानगी करण्यांत आली आहे हें सिद्दी याकूबकडूनच सुभानजीला कळलें होतें. त्यावरून सुलतान या वेळीं नेमका फत्तेकोठींत भेटेल असा कयास बांधून सुभानजी तिकडे जावयाला निघाला होता. त्याच्या अपेक्षेप्रमाणें सुलतान त्याला तेथें भेटला.

" किल्लेदारसाहेब ! आपणापाशीं माझें एक महत्त्वाचें काय आहे." सुभानजी म्हणाला.

" कसलें काम ? " सुलतानानें विचारलें.

" भानाजी पिसाळाविषयीं आपल्या कानीं आलेली बातमी गैरसमजाची आहे.

भानाजीबरोबर सूर्यास्ताच्या वेळीं जो एक तरुण खाडीच्या किनाऱ्यानें फिरतांना मीं पाहिला तो कोणी कटवाला नसून त्याचा एक शेजारी होता." सुभानजी म्हणाला.

"काय ? भानाजीबरोबर कोणी तरुण होता ?"

सुभानजीची कल्पना होती कीं, सिद्दी याकूबनें आपल्या पूर्वींच सुलतानाला भेटून आपल्या लावालावीचा प्रतिध्वनि काढला असेल, म्हणून त्यानें एकदम आपली ढांसळलेली बाजू सावरण्याचा उपक्रम केला. पण सुलतानाच्या प्रश्नावरून त्याच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. आपल्याच दांतांनीं आपण आपलेच ओंठ चावले, याबद्दल त्यानें त्या क्षणाला आपणालाच मनांतल्या मनांत शतशः शिव्या दिल्या. पण अशानें एकवार तोंडावाटे बाहेर निघून गेलेले शब्द थोडेच मागें घेता येणार होते ! त्याला स्वतःच्या इच्छेविरुद्ध सुलतानाच्या प्रश्नाला होकार द्यावा लागला.

"आणि तो नानाजी सुर्वेच होता ना ?" सुलतानानें विचारलें.

"किल्लेदारसाहेब ! तें कांहीं मला माहीत नाहीं !" सुभानजी उत्तरला.

"तुला माहीत नाहीं ?" किल्लेदार एकदम घुश्शांत येऊन सुभानजीवर डोळे वटारून म्हणाला, "बद्नेक ! तुझा भाचा तुला माहीत नाहीं ?"

सुभानजीला खरोखरच नानाजी सुर्वे ही व्यक्ति कोण हें माहीत नव्हतें. त्यानें आजवर नानाजीला कधींच पाहिलें नव्हतें. नानाजींचें नांव व कीर्ति मात्र त्याला ऐकून माहीत झाली होती. तो भीतीनें कांपत खरें तें बोलला, "खरेंच, मी नानाजीला ओळखीत नाहीं. मी त्याला उभ्या जन्मांत काळा कीं गोरा कसा तो पाहिला देखील नाहीं."

"तूं खोटें बोलतोस !" दत्ताजी मध्येंच तोंड घालून सुभानजीची अशी संभावना करून सुलतानाला म्हणाला, "किल्लेदारसाहेब ! हा सुभानजी हेतु-पुरस्सर खोटें बोलतो आहे. याच्या मनांत कांहीं तरी काळेंबेरें खास आहे."

आपणावर ही काय उगाच तोहमत घेण्यांत येत आहे असें सुभानजीला वाटलें. तो आपला निरपराधीपणा सिद्ध करण्यासाठीं म्हणाला, "ईश्वरसाक्ष—"

"खबरदार ! ईश्वरसाक्ष खोटें बोलण्याइतका निढावलेला बदमाष तूं आहेस, हें मला पक्कें माहीत आहे. तुला जर नानाजीची ओळख नाहीं, तर तूं भानाजी-बरोबर फिरतांना भेटलेला तरुण कोणी कटवाला नसून शेजारी आहे असें ठांसून कसें सांगितलेंस ?" सुलतानानें विचारलें.

"तेंच; मी देखील तेंच विचारणार होतों." दत्ताजी म्हणाला. इतक्यांत सुभान-

जी दत्ताजीच्या हृदयांत जणुं भाले खुपसावे अशा भेदक दृष्टीनें त्याच्याकडे पाहूं लागला. त्यावरून दत्ताजी जास्तच संशयी बनून सुलतानाला म्हणाला, " किल्लेदारसाहेब ! हा नानाजीचा मामा ना ? "

" होय." सुलतान उत्तरला.

" तर मग मला वाटतें, हाही त्या कटवाल्यांपैकींच एक आहे." दत्ताजी क्षण-भर थांबून डोकें खाजवून आठवल्यासारखें करून म्हणाला, " मला तसा नक्की सुगावा लागला आहे; कीं सिद्दींची सत्ता समूळ उलथून पाडण्याची प्रतिज्ञा नानाजी-च्या मामानें केली आहे."

आतां मात्र सुभानजीला ब्रह्माण्ड आठवलें. तो काकुळतीला येऊन म्हणाला, " किल्लेदारसाहेब ! ईश्वरसाक्ष-अल्लाची कसम खाऊन मी सांगतों, सिद्दींच्या सत्ते-विरुद्ध विचाराचा विटाळ तरी जर आजवर माझ्या मनाला झाला असेल, तर माझी जीभ या क्षणाला गळून पडेल. हा मनुष्य गैरसमजानें ऐकींव बातम्यांवरून कांहींतरी बोलत आहे."

" याविषयीं आंग्र्यांच्या वाड्यांत मथुराबाई व येसाजी आंग्रे यांनीं वाटाघाटी केल्याची विश्वसनीय बातमी मला मिळाली आहे. असें असतां तुझ्या शपथांवर मी विश्वास कसा ठेवीन !" दत्ताजी म्हणाला.

" अहो ! तो मी नाहीं; तो बांकाजी नाईक असेल. बांकाजी नाईक हा नानाजी-चा सख्खा मामा आहे, व मी त्याचा सावत्र मामा आहे." सुभानजी सुलताना-कडे वळून म्हणाला, " किल्लेदारसाहेब ! बांकाजी नाइकानें आरंभापासूनच आम-च्याशीं कसें हाडवैर मांडलें आहे, याचा तुम्हांला इतक्या दिवसांचा अनुभव आहेच. मला फितूर करण्याचा त्याचा प्रथमपासून कसा प्रयत्न चालला आहे हेंही यापूर्वी मी वेळोवेळीं तुमच्या व मालिकांच्या नजरेला आणलें आहे. मथुराबाईची सारीं राजकारस्थानें बांकाजीच्या मार्फतीनें चालत असतात, ही कांहीं नवी गोष्ट नाहीं, तेव्हां हा गृहस्थ म्हणाला तें खरें. पण त्याच्या गैरमाहितीवर विश्वासून तुम्ही चोराच्या ऐवजीं संन्याशाला सुळीं देऊं नका, येवढी माझी विनंति आहे." तो पुन्हा मर्मभेदक नजरेनें दत्ताजीकडे पाहून म्हणाला, " माझा उत्कर्ष ज्यांना बघवत नाहीं, अशा कांहींनीं माझ्या पोळीवरील तूप आपल्या पोळीवर ओढून घेण्यासाठीं माझ्यावर भलभलतीं कुभांडें रचण्याचा उद्योग आरंभिला आहे हें मला वेळींच समजलें, ठीक झालें. स्वतःला मूल होत नाहीं म्हणून लेंकुरवाळ्या

सवतींच्या नांवानें कडकडां बोटें मोडणाऱ्या वांझोट्या विघ्नसंतोषी सवती जगांत असतात, हें मला माहीत आहे."

सुभानजीनें हे वाग्बाण दत्ताजीवरच सोडले होते. ते दत्ताजीच्या वर्मी झोंबले. चोराचीं पावलें चोरानें ओळखलीं. तो तिरस्कारपूर्वक सुभानजीकडे पहात म्हणाला, " सुभानजी ! कावीळ झालेल्याला सारें जग पिंवळें दिसतें, तशी तुझी अवस्था झाली आहे. पण हा दत्ताजी कनोजे आहे एवढं ध्यानीं ठेव; यापेक्षां जास्त मी या वेळीं कांहीं बोलत नाहीं."

" मी तुला उद्देशून मुळींच म्हणालों नाहीं; आपली जगाची रीत सांगितली." सुभानजी कांहींसा ओशाळा होऊन म्हणाला.

येथवरच्या त्या दोघांच्या झटापटीवरून सुभानजी सिद्दीच्या सत्तेविरुद्ध नसावा व दत्ताजीनें बांकाजी नाइकाच्या ऐवजीं त्याचें नांव घेतलें असावें इतपत सुलतानाची आपोआप समजूत पटली; पण नानाजीच्या बाबतींत सुभानजी खोटें बोलल्याबद्दल सुलतानाला संशय उत्पन्न झाला होता त्याची निवृत्ति कांहीं झाली नाहीं. येवढें मात्र झालें, पहिल्याच क्षणाला सुलतानाला जो संताप आला होता व ह्या सुभानजीला आतां खाऊं कीं गिळूं असें त्याला होऊन गेलें होतें, त्या संतापाचा संशयनिवृत्ति करून घेण्यापुरता कांहींसा उपशम झाला. त्यानें पुन्हा पूर्वीचाच सवाल सुभानजीला टाकला, " तें राहो. पण भानाजीबरोबरचा तरुण कोण हें जर तुला माहीत नव्हतें, तर तो कटवाला नसून भानाजीचा एक शेजारी आहे असें तूं ठांसून कसें सांगितलेंस ! "

ह्या बिनतोड प्रश्नावर काय उत्तर द्यावें हें सुभानजीला सुचेना. भानाजीला वांचविण्यासाठीं आपण खोटें बोललों असें सांगावें, तर सुलतानाचा भानाजी हा जुना शत्रु असल्यानें तो वांचावयाचें बाजूलाच राहून ओल्याबरोबर सुकेंही जळतें या न्यायानें त्याचा कैवार घेणाराचाही फडशा उडावयाचा ! तरीपण आलेली वेळ कशीबशी निभावून नेण्याशिवाय सुभानजीला गत्यंतर नव्हतें. त्यानें क्षणभर विचार करून मनांतला गोंधळ चातुर्यपूर्वक मनांत दाबून ठेवून उत्तर दिलें, " भानाजी तसें म्हणाला, म्हणून मला माहीत पडलें."

" तर मग भानाजीही त्या कटांत सामील असला पाहिजे." सुलतान आवेशानें मुठी आंवळीत म्हणाला, " पाजी ! हरामखोर ! असल्या उपद्व्यापांबद्दल त्याला मीं आजवर एकसारखा पायांखालीं तुडवीत आलों, त्याची मन-

दौलत जप्त करून त्याला देशोधडीला लावलें, तरी अजून देखील सिद्दीविरुद्ध कारस्थानें करतो काय ? बस्स ! ह्याला जगांतून कायमचा नाहींसा केलाच पाहिजे ! नुसतें त्याला नाहींसा करून भागावयाचें नाहीं, त्याचा वंशांकुर कुठें असेल तेथून शोधून खणून नाहींसा केला पाहिजे ! पिसाळाच्या संपर्कांतील एक पिसूदेखील जिवंत राहतां उपयोगी नाहीं. त्याचा एक मुलगा काय तो उंदेरीवर इंग्रजांच्या कैदेंत आहे, त्याचा देखील इंचबर्डसाहेबाला सांगून शिरच्छेद करवितों." तो सुभानजीकडे वळून म्हणाला, " सुभानजी ! तुझ्या नेकजातपणाविषयीं मला संशय येतो आहे; तरी पण एकवार तुला तुझी नेकी पटवून देण्याची संधि देतों. उद्यां सूर्योदयाच्यापूर्वी भानाजी जिवंत किंवा मेलेला माझ्यासमोर आला पाहिजे. जर का यांत कसूर झाली, तर याद राख ! त्याच्याऐवजीं तुला औदुंबरावर फांशीं देण्यांत येईल."

" पण किल्लेदारसाहेब ! आज नानाजी सुर्व्यांचा काय बंदोबस्त करण्याचें योजिलें आहे ?" दत्ताजीनें मध्येंच विचारलें.

सुलतान वरकांति बेफिकीरपणानें पण मनांत अत्यंत घाबरून म्हणाला, "त्याचा बंदोबस्त करणें अवघड नाहीं. पण तो येथें कोणाच्याच परिचयाचा नाहीं, त्यामुळें त्याला हुडकून काढणें जरा अवघड जाणार आहे. एक नानाजीचसा काय, असे बरेच कटवाले येथें आले असावे व ते सारे भानाजीच्या सभोंवार जमले असावे. यास्तव एक भानाजी हातीं सांपडला, कीं इतर सर्वजण सांपडण्याला अवकाश लागणार नाहीं. या बाबतींत पुढें कोणतें निश्चित धोरण ठरवावयाचें, तें मी मालिकांना भेटून ठरवितों, व मग माघारा येतों."

याप्रमाणें बोलून सुलतान सिद्दी साताला भेटावयाला गेला. कटाची कुणकुण लागतांच आणि त्यांतून नानाजी सुर्वे त्या कटवाल्यांपैकीं एक असून तो येथें आला आहे असें कळतांच कुठची प्रभावती आणि कुठचें काय ! सुलतानाचें धाबें दणाणून गेलें ! कारण उंदेरीच्या वेढयापासून नानाजीचा इंगा त्याला चांगलाच माहीत झाला होता. शिवाय सिद्दी सात आणि इंचबर्डसाहेब हे आज तेथें मुक्कामाला असल्यामुळें तर सुलतानजी जास्त भीत होता. सिद्दी साताच्या स्वभावाची त्याला पूर्ण माहिती होती. सिद्दी सात म्हणजे मुलुखाचा संशयी ! त्याचा मुसलमानांवर विश्वास असला तरी स्वार्थासाठीं बाटून मुसलमान झालेल्या लोकांविषयीं तो नेहमीं साशंक असे. सुलतान हा जरी नुकताच बाटून मुसलमान होऊन

चैंभवाला चढला होता, तरी सिद्दी साताचा विश्वास संपादन करण्याला तो अजून समर्थ झाला नव्हता. इंचबर्डसाहेब तर त्याला अजून बहुधा परकाच होता. उंदेरीचा किल्ला कोणीं घ्यावा याविषयीं त्या दोघांची थोडीशी धासाघीस झाली होती, तेवढाच काय तो त्यांचा परिचय. नानाजी सुर्वे हा सिद्दी सात, इंचबर्डसाहेब व सुलतान या सर्वांचाच वैरी होता हें तर खरेंच. नानाजी आज येथें आला आहे असें कळतांच इंचबर्डसाहेब व सिद्दी सात यांना काय वाटलें असतें हा प्रश्नच निराळा होता, पण सुलतानजीला मात्र भविष्यकाळाविषयीं भलभलतें भय वाटूं लागलें. 'इंचबर्डसाहेब मनांत काय म्हणेल ! उंदेरीचा किल्ला पुन्हा बळकावण्यासाठीं मी इंग्रजांचा वैरी व आंग्र्यांचा पक्षपाती नानाजी याच्याशीं सख्य करून ठिकठिकाणची इंग्रजांची सत्ता उलथून पाडण्याचा उद्योग आरंभिला आहे असें तर त्याला वाटणार नाहीं ! त्याचा तसा ग्रह झाला व त्यानें सिद्दी सातापाशीं माझ्याविषयीं वाईट मत दिलें, तर माझा पक्ष कितीही खरा असला तरी सिद्दी सातावर त्या गोऱ्या कातडीचें जास्त वजन पडणार, व मग माझी गत काय होणार ? सिद्दी साताच्या कैदेंतून नानाजी जो पळतो तो नेमका येथें उमटतो, हें पाहून मी त्याला सामील आहें, मी बाटून मुसलमान झालों असलों तरी अजून माझा ओढा हिंदूंकडे आहे व नानाजीसारख्यांना हाताशीं धरून मी मराठमंडळाच्या वतीनें सिद्दीची सत्ता संपुष्टांत आणण्याची खटपट करीत आहें, असें जर सिद्दी साताला वाटलें, तर आधींच तो बाटून मुसलमान झालेल्या उपऱ्या लोकांविषयीं साशंक असतो—मग माझी मुळींच धडगत नाहीं'.—असें भेकडपणाच्या विचारांचें सुदर्शन सुलतानाच्या मस्तकासभोंवार इतक्या वेगानें फिरूं लागलें कीं, त्यामुळें त्याचें मस्तक अगदीं भणभणून गेलें. वास्तविक त्याला कटवाल्यांचा सुगावा लागतांच त्यांचा बंदोबस्त करण्याची व्यवस्था काय ती ताबडतोब करावयाची पण त्याला तें कांहींच सुचेना. 'नानाजी सांपडला तर बरा, नाहींपेक्षां अपेशाचें खापर आपल्याच माथीं फुटावयाचें; त्यापेक्षां खाशांच्या हातूनच काय ती तजवीज झालेली बरी. लीनपणानें आपण त्यांच्यावर सर्व गोष्टींचा भार टाकून मोकळे झालों, म्हणजे कांहींही होवो' असा आपल्या मतें पोक्त विचार करून सुलतान तसाच तडक् सिद्दी साताला भेटण्यासाठीं त्याच्या निवासस्थानाकडे चालता झाला.

सुलतानाच्या मागोमाग सुभानजीलाही आपल्या कामगिरीवर जाणें भाग होतें. आतांच्या संभाषणांत प्रत्येक बाजू आपल्यावर उलटल्यामुळें सुभानजी मनांतल्या

मनांत पुष्कळच खजील झाला होता. भानाजीला वांचविण्यासाठीं म्हणून त्यानें जो जो उपाय केला, तो तो हटकून भानाजीला अपायकारक झाला होता. त्यांतल्या त्यांत भानाजीला पकडण्याचें काम आपणाकडेच आल्यामुळें त्याला थोडें समाधान वाटलें. पुढें काय करावयाचें हा प्रश्न सौकर्यानें सोडविण्याला त्याला तेवढा वेळ मिळाला पण त्याबरोबरच भानाजीला पकडून सुलतानासमोर हजर करण्याच्या जबाबदारीची अवजड धोंड त्याच्या मस्तकावर लादण्यांत आली होती, तें विसरून त्याचें चालण्यासारखें नव्हतें. चांगुणेचा लाभ व्हावा म्हणून त्याला ती जबाबदारी पार पाडावयाची होती असें नाहीं. चांगुणेवर त्याचें शुद्ध प्रेम होतें म्हणून तो तिची अपेक्षा करीत होता असें मुळींच नाहीं; स्वतःच्या चैनीच्या साधनांत ती एक गुल्जार छेलछबेली अवश्य पाहिजे, एवढाच त्याच्या अभिलाषबुद्धीचा अर्थ होता. चांगुणेसाठीं इतर कोणत्याही प्रकारच्या स्वार्थावर पाणी सोडण्याला तो तयार नव्हता. आज देखील चांगुणेचा नाद सोडल्यानें सर्व संकटें टळतात असें जर त्याला खात्रीपूर्वक वाटलें असतें, तर त्यानें तिचें नांव सोडलें असतें. पण तेवढ्यानें निभावण्याजोगा तो प्रसंगच नव्हता. भानाजी जर कोणत्याही कारणानें सकाळपावेतों सांपडला नाहीं, तर त्याचा दोष सर्वस्वी आपल्या माथीं मारला जाईल, सिद्दी सात व सुलतान हे मग आपणाला भानाजीचा साहाय्यक व सिद्दीची सत्ता उलथून पाडण्याच्या कटाचा एक म्होरक्या असें समजतील, नानाजी हा आपलाच भाचा असल्यानें यदृच्छया त्याची गुन्हेगारी देखील आपणांवर लादली जाईल, व अखेर सुलतानानें आताच बजावल्याप्रमाणें औदुंबराच्या पारावर आपणालाच फांशीं जावें लागेल, हें सुभानजी ओळखून होता. याशिवाय आणखी एक तरवार त्यानें भानाजीच्या मानेवर म्हणून जी लटकत ठेवली होती, ती आतां आपल्याच मानेवर लटकूं लागल्याचा भास त्याला होत होता. ती तरवार केव्हां तुटेल व तिच्याखालीं सुभानजीची कर्दन केव्हां छाटली जाईल याचा खरोखरच भरंवसा नव्हता. भानाजीवर कुभांड आणण्यासाठीं म्हणून भानाजीच्या नेतृत्वाखालीं सिद्दीविरुद्ध एक जंगी कट उभारला जात आहे अशी खोटी वार्ता त्यानें सिद्दी याकूबच्या कानांत ओतली होती, तिला सिद्दी याकूबच्या तोंडून प्रसिद्धि मिळणें आतां भानाजीच्याच नाशाला कारण झालें असतें. दत्ताजीच्या मताला त्यामुळें पुष्टि मिळाली असती, व सुभानजीनें मुद्दाम आपणापासून ती बातमी लपवून ठेवून आपल्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा प्रयत्न केला असा सुलतानचा पक्का समज होऊन त्याच्या दृष्टीनें सुभानजी त्या कटाचा सूत्रधार ठरला असता.

हा प्रसंग टळण्यासाठीं सिद्दी याकूबची सुलतान व सिद्दी सात यांच्याशीं भेट होण्यापूर्वी सिद्दी याकूबला गांठून आपल्या चुकीवर पांघरूण घालणें, आणि भानाजीला पकडून सुलतानासमोर हजर करणें ह्या दोन गोष्टी सुभानजीला अपरिहार्य होऊन बसल्या. भानाजीला त्या तरुणाबरोबर बजरंगबलीच्या देवालयाकडे बोलत जातांना त्यानें पाहिलें होतें व त्या दोघांचें संभाषणही ओझरतें ऐकलें होतें; त्यावरून आपण चपळाई केल्यास भानाजी तेथें सांपडण्याचा संभव आहे असें हेरून सुभानजीनें तांतडीनें पुढील उद्योगाला लागण्याचें ठरविलें. हा एवढा अनर्थ ज्या दत्ताजीच्या चुगलखोरीमुळें घडून आला, त्याला कच्चा खाऊं कीं भाजून खाऊं असें सुभानजीला होऊन गेलें होतें पण दत्ताजी आजला सांबाच्या पिंडीवर बसलेला विंचू आहे; त्याला ठेचण्यासाठीं पादत्राण फेंकल्यास तें सांबाला लागून सांब कोपेल व त्या कोपानलांत आपण जळून जाऊं, ह्या परिणामाकडे लक्ष्य देऊन त्याला त्या बाबतींत तूर्त मूग गिळून स्वस्थ बसणें शहाणपणाचें वाटलें तरीपण दत्ताजीविषयीं त्याच्या मनांत इतकी दावेदारी दृढमूल होऊन बसली होती कीं, सुलतानाच्या मागोमाग तोही तेथून आपल्या कामगिरीवर जावयाला निघाला, तेव्हां दत्ताजी जवळच उभा होता तरी त्याच्याकडे त्यानें ढुंकूनदेखील पाहिलें नाहीं. अर्थात् दत्ताजीनेही त्याच वेळीं सुभानजीची पाठ फिरते न फिरते तों मिशीला पीळ देऊन स्वतःशीं म्हटलें, " हरामखोरा ! तूं माझें उणें काढलेंस काय ? त्या मानखंडनेबद्दल मीं तुझें समूळ वाटोळें केलें नाहीं तर नांवाचा दत्ताजी कनोजेच नव्हे. मी मी म्हणणाऱ्या आंग्र्यांच्या दौलतीला चूड लावून त्या दौलतीचा होम पेटवावयालाही ज्या दत्ताजीनें कमी केलें नाहीं, त्याला तुझ्यासारख्या चिलटाला चिरडून टाकण्याला कितीसा अवकाश !"

त्या तात्कालिक प्रतिकूल परिस्थितींत एकच गोष्ट सुभानजीच्या मनासारखी झाली. तो सिद्दी याकूबचा शोध करण्यासाठीं पन्नास कदमें दूर गेला नाहीं, तोंच सिद्दी याकूब त्याला समोरून येतांना अचानक भेटला. त्याला पाहून सुभानजीला साक्षात् परमेश्वर भेटल्याप्रमाणें आनंद झाला. त्यानें सिद्दी याकूबला मारे जमिनीपासून लवून मुजरा करून खडीताजीम देत विचारलें, " सलाम बडे मियाजी ! किल्लेदार भेटला का ? "

" नाहीं." सिद्दी याकूब सुभानजीच्या सलामानें शेफारून जाऊन हंसरा चेहरा करून उत्तरला. तें ऐकून सुभानजीला हायसें वाटलें.

"बरं; मालिक तरी भेटले का ?" सुभानजीनें हस्तिदंती दाखवीत कापटयपूर्ण भावनेनें विचारलें.

"नाहीं. तेही भेटले नाहींत. मालिक साहेबाची सरबराई करण्यांत गुंतले आहेत; तेव्हां किल्लेदाराला भेटून भानाजीला वेळींच पकडण्याची तजवीज करावी म्हणून मी त्यांच्याच शोधांत आहें." सिद्दी याकूब उत्तरला.

"देव पावला !" असें मनांत म्हणून सुभानजीनें सिद्दी याकूबचा हात आपल्या हातीं घेऊन त्याला आपल्याबरोबर ओढीत नेतां नेतां सांगितलें, "तर मग चल माझ्याबरोबर. मला किल्लेदार आतांच भेटला. तो हा माझ्यापुढें मालिकांना भेटण्यासाठीं गेला. त्याची आमची सर्व बाबतींत भरपूर वाटाघाट होऊन आतांच्या आतां भानाजीला कैद करावयाचें ठरलें आहे आतां तूं चपळाई करून माझ्याबरोबर चल म्हणजे झालें."

"पण चल कुठें ? मी आतांच घोडेस्वार पाठवून भानाजी घरीं आहे कीं काय याचा तपास केला. तों तो घरीं नाहीं. त्याची पोरगी देखील घरीं नाहीं. तो येथून कोठें तरी पळ काढण्याच्या विचारांत असला पाहिजे खास. तो आतां कसा सांपडतो ? तो हातीं सांपडेल तर केवढी तरी बहादुरी गाजविल्याचें श्रेय आपणाला मिळेल !"

"तुला काय त्याचें ? मी चल म्हणतों ना ? त्याचा नेमका तपास लावून देण्याचें माझ्या जिभेला लागलें. तूं नुसता माझ्याबरोबर माझ्या मदतीला चल म्हणजे झालें. आपण भानाजीला पकडल्याचें श्रेय निम्मेनिम वांटून घेऊन दोघेही नशीब काढूं. माझ्या बहादुरींत तूं वांटेकरी झालास म्हणून मला मुळींच विषाद वाटणार नाहीं. कारण आपण दोस्त पडलों."

"पण—"

पण सुभानजीनें सिद्दी साताचा 'पण' तेथेंच खुडून आपलाच पण अखेर खरा केला. त्यानें "पणवीण कांहीं नाहीं. हजीर तो वजीर. लौकर चल. माझे घोडेस्वार तयार आहेत, आमचा भवानजीही आहे. त्यांना बरोबर घेऊन प्रथम आपल्या सावजाला पकडूं. जेवणखाण देखील मग." असें म्हणून सिद्दी याकूबला आपल्याबरोबर ओढीत नेलें. सिद्दी याकूबला तर आवडतें तेंच कपाळीं आलेंसें वाटलें. फुकाफुकी बहादुरीचा अर्धा वांटा सुभानजीच्याबरोबर जाण्यानें पदरीं पडणार होता. असली सोन्याची संधी तो तरी कां गमावील ?

ते दोघे बरेच दूर गेल्यावर इतका वेळ त्यांचें संभाषण जेथें चाललें होत तेथून तीनचार हातांच्या अंतरावर असणाऱ्या एका पडक्या देवालयांतून एक मनुष्य जो बाहेर पडला, तो आजूबाजूला पहात आपणाला कोणी पहात नाहीं अशी खात्री करून घेऊन सुभानजीच्या वाड्याकडे वळला.

तो मनुष्य कोण बरें असेल ?

* * * *

पुढें काय झालें ? सुभानजी व सिद्दी याकूब यांच्या ध्यानींमनींही नाहीं अशी कलाटणी परिस्थितीनें घेऊन सर्वांना कसें घोटाळ्यांत पाडलें, हें वाचकांना पूर्वी माहीत झालेंच आहे.

## प्रकरण बारावें

# इंचबर्डसाहेबाचा कावा

बजरंगबलीच्या आवारांत कल्पनातीत घडामोडी झाल्यामुळें परिस्थितीचें पारडें जें एकदम उलटलें, त्या पारड्याखालीं झांकल्या गेलेल्या रहस्यांचा उलगडा केव्हां एकदां होतो, इकडे वाचकांचें चित्त वेधून राहिलें असेल यांत संशय नाहीं. पण तितक्याच किंवा त्याहूनही रहस्यमय व अत्यंत महत्त्वाच्या घडामोडींचें ज्ञान करून घेण्यासाठीं आपणाला तेथें त्या रात्रीं ऐषआरामांत लोळत पडलेल्या अनेकावधानी इंचबर्डसाहेबांच्या अंतरंगाची ओळख करून घेणें अवश्य आहे. म्हणजे त्या निमित्तानें सिद्दी सात, सुल्तान किल्लेदार, दिलारा व दत्ताजी यांच्या अंतरंगाचाही अनायासें ठाव लागेल.

इंचबर्डसाहेब हा सिद्दी साताचा पाहुणा, शिवाय मराठे व सिद्दी यांच्या झगड्यांत दोघांनाही थोडीफार मदत करण्याचा आव मुंबईकर इंग्रजांनीं आणल्यामुळें दोघांनाही मदतीची फार आवश्यकता असल्यानें दोन्ही बाजूंना इंग्रजांचा बाजारभाव, त्यांची पत, पुष्कळच वाढली होती. त्या इंग्रजांचा इंचबर्डसाहेब हा प्रतिनिधि असल्यानें व त्यानें सिद्दीच्या दरबारीं आपल्या कारस्थानामुळें चांगलेंच वजन पाडलें असल्यानें त्याला आज न भूतो न भविष्यति असा मिरवणुकीचा मान मिळाला होता; व एरव्हीं कधींही जो दर्यामहाल खास सिद्दी साताशिवाय दुसऱ्या कोणालाही ऐषआराम करण्यासाठीं खुला मिळावयाचा नाहीं, व इंचबर्डसाहेबासारख्या सामान्य माणसाला तर जो नुसता डोळाभर पहावयालाही मिळावयाचा नाहीं, त्या राजमहालतुल्य दर्यामहालांत आज इंचबर्डसाहेब अभूतपूर्व असा पाहुणचार घेत होता. दर्याबाई या नांवाची कान्होजी आंग्र्यांची एक आवडती रक्षा होती, तिच्या नांवानें व तिची हौस पुरविण्यासाठीं म्हणून हा दर्यामहाल बांधला होता. सवतीमत्सराला भिऊन व कंटाळून दर्याबाईनें दहा पावलें दूर राहण्याचें मनांत आणल्यामुळें कान्होजीनें तिच्या शब्दाला मान देऊन तिच्यासाठीं हजारों रुपये खर्च करून अत्यंत सुंदर व सर्व शृंगारोपयोगी साधनांनीं संपन्न असा हा दर्यामहाल बांधला होता. त्या दर्यामहालांतील आरसेमहाल तर इतका प्रेक्षणीय होता कीं, त्याला उपमाच द्यावयाची तर मयसभेची उपमा देणें अयोग्य ठरलें नसतें. त्या आरसेमहालाला लागूनच आंतल्या बाजूला सुशृंगारित विलासमंदिर होतें. अर्थात् तें दर्याबाईचे

शयनमंदिर होतें हें सांगावयाला नकोच. दर्यामंदिरांत जाण्याचा मार्ग परस्पर दर्यामहालाच्या खालच्या मजल्यावरून होता. ऐनेमहालांत कान्होजीची तो चौबुरुजीवर असे तेव्हां बैठक असे. तेथल्या मुक्कामांत असतांना तो सर्व कामकाज ह्या महालांत बसूनच करी. ऐनेमहालांत येण्याचा रस्ता परस्पर बाहेरून होता. ऐनेमहालांतून दर्यामंदिरांत जाण्याला मात्र दोन्ही महालांना सांधणाऱ्या भिंतींत दरवाजा होता. हे दोन्ही महाल आज इंचबर्डसाहेबाच्या तैनातीला देण्यांत आले होते. त्यामुळें सिद्दी साताचा मुक्काम आज जयमहालांत होता. जयमहाल देखील कान्होजीनेंच बांधला होता. कान्होजीचेंच जयसिंग असें दुसरें नांव होतें, व त्यावरूनच 'जयमहाल' हें नांव त्या वाड्याला प्राप्त झालें होतें. अर्थात् हा वाडाही फार प्रेक्षणीय असाच होता; पण दर्यामहालाशीं तुलना करतां कांहींसा डावा होता इतकेंच. अर्थात् हा महाल दर्यामहालापूर्वी बांधण्यांत आलेला होता. खाशाबा सुर्वे येथला किल्लेदार होता; तेव्हां व त्यानंतरही जोंवर चौबुरुजी आंग्र्यांच्या स्वाधीन होती तोंवर हे दोन्ही महाल खास खाशांसाठीं राखून ठेवण्यांत आलेले असत. कान्होजी वारला त्यापूर्वीच दर्याबाई वारली होती. त्यानंतर त्यांचे मुलगे मधून मधून चौबुरुजीवर येत तेव्हां ह्या दोन महालांत वस्ती करीत. ती परंपरा चौबुरुजी सिद्दीच्या ताब्यांत गेल्यावरही अव्याहत चालली होती. सिद्दी साताच्या ताब्यांत चौबुरुजी येतांच त्यानें हे दोन्ही महाल खास आपणासाठीं राखून ठेविले होते. किल्लेदारासाठीं फत्तेकोठी या नांवाचा निराळा वाडा पूर्वीच बांधण्यांत आलेला होता. खाशाबा सुर्वे व त्यानंतर भानाजी पिसाळ तेथला किल्लेदार होता. तेव्हां त्यांचें वास्तव्य फत्तेकोठींतच असे. सुलतान किल्लेदार झाल्यावर मात्र त्यानें आपणासाठीं नवा वाडा बांधून त्याला आपल्या बायकोचें नांव दिलें होतें. सुलताना हें तिचें नांव असल्यानें त्या नव्या वाड्याला 'सुलतानामहाल' हें नांव मिळालें होतें. थळच्या किनाऱ्यावरून चौबुरुजीवर जाऊं लागलें म्हणजे प्रथमच किल्ल्यावरील निरनिराळ्या इमारती लागत. त्यांतलाच एक जुना, लहानसा पण प्रशस्त वाडा सिद्दी साताकडून सुभानजीला बक्षीस मिळाला होता. येथे सुभानजी राही. येथून पुढें पूर्वेकडे कांहीं अंतरावरील एका उंचवट्यावर दर्यामहाल होता. तितक्याच अंतरावर पण दर्यामहालाच्या पश्चिमेला फत्तेकोठी होती. फत्तेकोठी व दर्यामहाल यांच्या मध्यावर सुलतानानें आपला नवा महाल बांधला होता. फत्तेकोठीच्या पलीकडे थेट उत्तरेच्या म्हणजे बजरंगगडाच्या

बाजूला एका उंच टेकाडावर जयमहाल होता. एकाच ठिकाणाहून चौगुरुजी, उंदेरी-खांदेरी, कुलाबा वगैरे ठिकाणांवर व कांहींशी समुद्रांतील वाहतुकीवरही नजर ठेवतां यावी अशा उद्देशानें कान्होजीनें ती जागा आपल्या महालासाठीं मुक्रर केली होती. असो.

इंचबर्डसाहेब त्या रात्रीं दोन प्रहर रात्रीच्या सुमाराला दर्यामहालांतील ऐने महालांत पसरलेल्या मौल्यवान रुजाम्यांवरून इकडे तिकडे येरझारा घालतां घालतां स्वतःशींच विचार करण्यांत गढून गेला होता, "हिंदुस्थान ही सुवर्णभूमि आहे असें म्हणतात तें अक्षरशः खरें आहे-नव्हे, सुवर्णभूमिदेखील ह्या हिंदभूमीसमोर दरिद्री ठरेल, इतकी अपार संपत्ति ह्या हिंदुस्थानांत खच्चून भरलेली आहे; ती कोणालाही लुटतां लुटून संपावयाची नाहीं. ही चौगुरुजी म्हणजे एक लहानसा किल्ला; पण येथलें हें वैभव पाहून आमच्यांतले धनवान् म्हणून गणले गेलेले बडेबडे उमराव लाजेनें खालीं मान घालतील. ह्या ऐनेमहालांतील व आंतील महालांतील एकंदर शृंगारसाज पाहून मला तरी वाटतें कीं, ह्या दर्यामहालाच्या सजावटीसाठीं जितका पैसा खर्च झाला असेल, तितकी आमच्या राजाच्या राजवाड्याचीही किंमत होणार नाहीं. आज ज्या सुवर्णरत्नखचित पालखींतून किल्लेदारानें मला मिरवीत आणलें, तसल्या पालखींतून मिरविण्याइतकें महद्भाग्य आमच्या राजाचेंही नाहीं. आमच्या राजाच्या जवाहीरखान्यांतदेखील जितकीं मौल्यवान रत्नें नसतील, तितक्या मौल्यवान रत्नांनीं ती पालखी जणुं मढविलेली होती. असें असतांही 'मला ही पालखी फार आवडते' असें मी सिद्दी सातापाशीं म्हणतांच त्यानें एकदम ती मला बक्षिस देऊन टाकली! येवढ्याशा लहानग्या किल्ल्यांतदेखील जर इतकी संपदा आहे, तर अंजनवेल, जजिरा, रायगड वगैरे मोठमोठ्या किल्ल्यांत किती संपदा असेल! उंदेरी किल्ला माझ्या हातीं लागला, त्यापूर्वींच मराठ्यांनीं तेथील सारी दौलत लांबविली होती म्हणतात; तरीही त्या किल्ल्याच्या कोनाकोंपऱ्यांत पडून राहिलेली संपदा आमच्या हातीं लागली, तितकी किंमत आमच्या एकाद्या वखारीचीही होणार नाहीं.

"बाकी, मी इतके दिवस पहातों आहें, मराठे लोक मोठे लबाड आहेत. मुसलमान लोक भोळे व उदार; पण मराठे मोठे ठक! ते सुखानें आपलें पाप देखील आमच्यासारख्याच्या हातीं लागूं द्यावयाचे नाहींत. डावपेंच व गनिमी कावा हा तर बेट्यांच्या पाचवीला पुजलेला आणि पेशवे तर मराठ्यांहूनही कांकणभर चढ! आम्ही इंग्रज लोक इतके बस्ताद-ठकाला महाठक असतांना पेशव्यांनीं आमची

देखील आजवर डाळ शिजूं दिली नाहीं ! दिल्लीचे बादशहा, त्यांचे वजीर, त्यांचे निजामासारखे महाचतुर सुभेदार, यांनादेखील युक्तिप्रयुक्तीनें लोळवणारे हे पेशवे सिद्दीला थोडीच दाद देतात ! यांना धूळ चारण्याचा उपाय एकच, व तोही आस्ते आस्ते उपयोगांत आणावा, तरच आमचा टिकाव लागेल, व ह्या देशाचा राज्यकर्तेपणा आमच्या कंपनीच्या हातीं येईल. विश्वासाचा अव्वल भेदनीतीचा अवलंब करून दोघांचें भांडण चेतवून आपला कार्यभाग साधावयाचा, एवढा एकच मार्ग मान-धन-वैभवाच्या भव्य मंदिराकडे जाण्याला हितकारक आहे,अशी माझी स्वानुभवानें खात्री झाली आहे. हेच सिद्दी सर्व मराठ्यांनीं मिळून त्यांचा निःपात करण्यासाठीं चंग बांधून पुढें येण्यापूर्वी आम्हांला पायांतल्या पायपोसा-इतकी किंमत देत होते. मला पक्कें आठवतें, कोंकणपट्टींतील कांहीं महत्त्वाच्या बंदरीं नाक्यांच्या टिकाणीं वखारी बांधण्याची परवानगी जंजि-याच्या सिद्दीपासून कंपनीला मिळवून देण्यासाठीं मी ह्याच सिद्दी साताकडे गेलों असतां मला त्याच्या समोर उभें राहून अर्घातास बोलावें लागलें, व जातां येतां मुजरे करतां करतां माझ्या कंबरेचे कांटे ढिले झाले ! पण तोच सिद्दी सात आज आपल्याबरोबरीनें माझी पालखींतून मिरवणूक काढतो, व घडोघडीं 'साहेब ! कप्तानसाहेब !' म्हणून माझी थुंकी झेलण्याला तयार असतो ! याचें कारण काय; तर त्यांना मराठ्यांच्या प्राणघातक हल्ल्यांतून त्यांचा बचाव करण्यासाठीं आम्हां इंग्रजांचें साह्य पाहिजे आहे. आणि गोष्ट खरीच आहे. आम्हीं जर सिद्दींना पाठीशीं घातलें नसतें, तर पेशवे व आंग्रे ह्या दोघांनीं मिळून आजला ह्या उभ्या कोंकणपट्टींत मुसलमानांची एकही दाढी शिल्लक राहूं दिली नसती. खरोखर ब्रिटानियाचें भाग्य थोर ! आम्हां कंपनीवाल्यांचें नशीब सवाई शिकंदर ! म्हणूनच आज आंग्रे व सिद्दी या कोंकणपट्टींतील दोन्ही प्रबळ सत्तांना आपसांतील भाऊबंदकीचा महारोग जडला आहे. ह्या भाऊबंदकींतून त्यांचें डोकें वर येण्याची आतां मुळींच आशा नाहीं. पण त्यांतच त्यांचा शक्य तितक्या लौकर फडशा उडावा यासाठीं आम्हीं त्यांना असेंच सदा काळ बारा मास झुंजत ठेवलें पाहिजे, कीं त्यांचा शक्तिपात तितक्या झपाट्यानें होऊन आमची पोळी पिकेल. ह्या लढ्यांत पेशव्यांनीं आंग्र्यांची बाजू घेतली तेव्हां प्रारंभीं आम्हांला कांहींसें भय वाटलें कीं, आतां ते दोघे सिद्दीला गिळून ढेंकर देत देत आम्हाला गिळण्यासाठीं जबडा उघडणार!-

पण हे अकाशांतील बापा ! तूं आमच्यावर मोठे उपकार केलेस कीं मराठा-मंडळांतील दुफळी पेशव्यांनाही चांगलीच भोंवत आहे ! कंपनीचा वकील मराठी मुलुखांत व्यापारी सवलती मागण्यासाठीं गेला असतां ज्या पेशव्यांनीं त्या वकिलाला एखादा भिक्षेकरी दारीं यावा त्याप्रमाणें उद्दामपणानें वागविलें, त्याच पेशव्यांना 'आपल्या वतीनें मानाजी आंग्र्याला मदत करा' अशी आमची मनधरणी करणें प्राप्त झालें. आम्हीं मानाजीला पाठीशीं घातलें आहे तें पेशव्यांच्या मैत्रीचा सतत लाभ मिळावा म्हणून, असें पेशव्यांना वाटत असेल, तर खुशाल वाटूं द्या. पण त्यांना म्हणावें, परस्पर पाहुण्याच्या हातून विंचू मारून आपण नामानिराळे रहाण्याची कला जितकी तुम्हांला अवगत आहे, त्यापेक्षांही जास्त आम्हांला अवगत आहे. डोईजड आंग्र्यांचा निःपात होऊन साऱ्या कोंकणपट्टींत आपली एकतंत्री सत्ता प्रस्थापित व्हावी असें तुम्हांला जसें वाटतें, तसेंच आम्हांलाही वाटतें कीं, कोंकणपट्टींतून आंग्रे, मराठे, सिद्दी वगैरे सर्वांचा एकजात उठावा होऊन त्यांचीं राज्यें आम्हांला व्यापारी दळणवळणाच्या नांवाखालीं जिंकतां यावीं व त्यांचा अपार दौलत तागडीनें मोजून पदरांत घेतां यावी. सिद्दीपेक्षांही आम्हांला आंग्र्यांचेंच भय जास्त होतें व आहेही. पण त्यांना म्हणावें, याद राखा ! कान्होजी आंग्रे व सखोजी आंग्रे यांनीं पावलोपावलीं आमची भयंकर अर्थहानि व मानखंडना केली आहे, तिची आम्ही सर्वतोपरी सहस्रपटीनें भरपाई करून घेऊं. शत्रूच्या उरीं मारावी ती सुरी मारावी; पण सोन्याची सुरी मारावी. तरवारीनें गळा कापतांना कापल्याची जाणीव होते, पण तो केंसानें कापतांना कापल्याचा भास देखील होत नाहीं. चाखणाराच्या जिभेला अमृताप्रमाणें गोड लागणाऱ्या पण चाखल्यावर प्राण घेणाऱ्या विषाचा जिवंत झरा ह्या इंचबर्ड-साहेबाच्या वाणींतून नेहमीं झुळझुळ वहात असतो, हा माझ्या अंगचा अलौकिक गुण ओळखूनच गव्हर्नरसाहेबांनीं सिद्दी, आंग्रे व पेशवे यांच्याशीं राजकारणाचे डाव खेळून त्या डावांत त्यांना परिणामीं हरविण्याची कामगिरी माझ्यावर सोंपविली आहे—"*

* आंग्र्यांच्या गृहकलहांत इंग्रजांचें हित अंतर्भूत असल्यामुळें त्यांनीं तो कलह कसा वाढविला याविषयीं मि॰ अंडरसन ह्या प्रसिद्ध इंग्रज लेखकानें त्या वेळच्या आंग्रे व सिद्दी यांच्या सत्तेसंबंधीं लिहिलेल्या एका लेखांतील उतारा मननीय आहे. त्या उताऱ्याचा मराठी तर्जुमा पुढें दिला आहे. त्यावरून इंचबर्डसाहेबाच्या

इतक्यांत ऐनेमहालाचा बाहेरील दरवाजा वाजला. त्याबरोबर इंचबर्ड-साहेब आपल्या मनांत मांडलेला बुद्धिबळाचा डाव एकदम आवरून सिद्दी सात आला ह्या भावनेनें 'दाढीवाला बोकड आला वाटतें' असें स्वतःशीं पुटपुटत पण बाह्यात्कारी चर्या अगदीं सोज्ज्वळ हंसरी करून दरवाजाकडे गेला, व दरवाजा पुरा उघडण्यापूर्वींच एखाद्या बंद्या गुलामाप्रमाणें लवून मुजरा करीत म्हणाला, "आइये, जनाब ! आइये !"

---

वर्तनावरही प्रकाश पडणार आहे "—पण सिद्दींची सद्दी संपली होती. त्यांची सत्ता खालावत चालली होती, व त्यांचा इंग्लिशांना बलिष्ठ आंग्र्यांशीं झगडण्याच्या कामीं फारसा उपयोग होण्याजोगा नव्हता. त्या खलाशांनीं (आंग्र्यांनीं) इंग्लिशां-चें केलेले नुकसान इतकें भयंकर होतें, व व्यापाराच्या संरक्षणासाठीं जहाजांची सजावट करतां करतां इंग्लिशांचा इतका अतोनात पैसा खर्च होत होता कीं, त्या-मुळें त्यांना व्यापारासाठीं भांडवलही पुरवठ्याला येईना व आपला दक्षिण हिंदु-स्थानांतील व्यापार संपुष्टांत येतो कीं काय असेंही सकारण भय त्यांना वाटूं लागलें. आंग्रे विजयश्रीनें उत्साहित होऊन व साताऱ्याच्या महाराजांकडून मदत मिळेल अशा आशेनें सिद्दींचा मुलूख बळकावीत सुटले व गोंव्यापासून मुंबईपर्यंत प्रत्येक बंदर ताब्यांत घेण्यासाठीं खटपट करूं लागले. त्यांच्या घरा-ण्याला जर भाऊबंदकीची कीड लागली नसती, तर त्यांचे बेत निःसंशय तडीला गेले असते. मानाजी व संभाजी हे एकमेकांशीं भांडूं लागले असें पाहून कंपनीच्या कौन्सिलला व अध्यक्षाला फार संतोष वाटला, व त्यांनीं आंग्र्यांची भाऊबंदकी हरउपायांनीं चेतविण्याचें ठरविलें. याच हेतूनें त्यांनीं कॅ० इंचबर्ड याला—तो कोंकणांतील भाषा व चालीरीति आपल्या इतर सर्व सहकाऱ्यांपेक्षां जास्त नैपुण्यानें जाणत असल्यामुळें व तेव्हां तो चांगल्या प्रतीचा डावपेंची मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध असल्यानें—कुलाब्याला रवाना केलें. त्याला देण्यांत आलेला कानमंत्र अगदीं साधा व सरळ होता. मानाजीला पैसा व युद्धसाहित्य लागेल तेवढें पुरवावें व त्याचा संभाजीशीं वैरभाव वाढत जाईल अशी मसलत त्याला देण्याची एकही संधि वायां जाऊं देऊं नये." (इंडियन क्वार्टरली रिव्ह्यू). ह्याच इंचबर्डसाहेबानें वसईच्या वेढ्याच्या बाब-तींतही आपलें कौटिल्य कसें गाजविलें, तें पुढील 'पेशवाईतील धर्मसंग्राम' ह्या कादंबरींत वाचकांना कळून येईल.

पण इंचबर्डसाहेबाच्या अपेक्षेप्रमाणें तो जनाब नव्हता, तो त्याच्या खास तैनातीला दिलेला काफूर नांवाचा हबशी हुजऱ्या होता. काफूरला पहातांच जितका इंचबर्डसाहेब ओशाळा झाला, तितकाच काफूरही साहेबानें आपणाला 'जनाब' अशी गौरवानें हांक मारून मुजरा केला हें पाहून ओशाळा झाला. साहेब म्हणजे साक्षात् अल्ला; साहेबाला आपण आपल्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें लवून कुर्निसात करून चालेल कीं साहेबासमोर यावयाचें, म्हणजे रस्त्यांतच चढाव काढून ठेवून रस्त्यापासून हात जोडून गुडग्यानें आलें पाहिजे, कीं मशिदींत जाऊन आपण रोज नमाज पढतों त्याप्रमाणें दरवाजांतच गुढगे टेंकून दोन्ही हात जोडून बोललें पाहिजे, अशा प्रकारच्या साहेबाविषयींच्या परमादरयुक्त भावनेनें काफूर अगदीं गोंधळून गेला होता. कुराणांत सांगितल्याप्रमाणें जे वागतात, त्यांना स्वर्गीं गेल्यावर तेथें उंची मद्यें प्राशन करावयाला मिळतात व अप्रतिम लावण्यललनांचाही लाभ होतो असें कुराण वाचणाऱ्या कांहीं मुल्ला-मौलवींच्या तोंडून काफूरनें ऐकलें होतें. तो स्वर्ग व तो सुखोपभोग यांचा लाभ आपणाला मरणोत्तर होईल कीं नाहीं याविषयीं काफूरला जबर शंका होती. पण विलायतेंतील सर्व साहेबांची तशा प्रकारची चंगळ ह्या जन्मीं सद्दा काळ बारा मास चाललेली असते असें त्यानें ऐकलें होतें; व आज इंचबर्डसाहेबही त्या बंगल्यांतील दिवाणखान्यांत तशा प्रकारच्या ऐषआरामांत लोळत होता, त्यावरून प्रत्येक साहेब कोणाही हिंदी माणसापेक्षां कोणाही हिंदु-मुसलमानापेक्षां फार श्रेष्ठ; केवळ अल्ला नसला तरी जवळ जवळ अल्लाच्या योग्यतेचा असतो अशी काफूरची प्रामाणिक समजूत होती. अशा साहेबानें आपणाला 'जनाब' म्हणून इतक्या नम्रतेनें मुजरा केलेला पाहून काफूरला किती धन्यता वाटली, तिचें शब्दांनीं वर्णन करतां येणें अशक्य आहे. त्याला वाटलें कीं आपण आज स्वर्गांतच आहों.

पण-पण काय ! त्याच साहेबानें—त्या अल्लातुल्य साहेबानें—ओशाळून काफूरला दुसऱ्याच क्षणाला " कोण तूं ? काफर ? " असें हटकलें, त्याबरोबर बिचारा काफूर स्वर्गांतून एकदम लोटून दिल्याप्रमाणें गडगडत खालीं आला, व आपण नरकांत पडलों कीं काय असा भास त्याला झाला. इंचबर्डसाहेबाला काफूरच्या नांवाचा नीट उच्चार करतां न आल्यामुळें त्याच्या तोंडून 'काफर' असा शब्द सहज निघून गेला. पण काफूरला मात्र वाटलें कीं, साहेब आपणावर कोपला ! लगेच काफूरनें खरोखरच साहेबासमोर गुडगे टेंकून दोन्ही हात जोडून अत्यंत नम्र भावनेनें म्हटलें, " परवरदिगर ! कसूर माफ ! "

काफूरच्या हातून कसूर काय झाली व ती माफ कशी करावयाची, याविषयीं डोक्याला जरादेखील शीण न देतां इंचबर्डसाहेबानें आढ्यतापूर्वक त्याला विचारलें "तूं येथें कशाला आलास?"

साहेब आपणाशीं सौम्यपणाने बोलला, यामुळें काफूरला केवढी धन्यता वाटली. साहेबानें 'काफर' म्हटल्याबद्दल त्याच्या मनाला जी जखम झाली होती, ती झटक्यासरशीं भरून येऊन त्याच्या अंगावर मूठभर मांस वाढलें. तो पुन्हा हात जोडून पूर्ववत् नम्रपणानें म्हणाला, "परवरदिगर! मालिक आपल्या भेटीला आले आहेत."

"मग ते वर कां नाहीं आले?" इंचबर्डसाहेबानें विचारलें.

"ते आपल्या परवानगीची वाट पहात दरवाजांत उभे आहेत." काफूर पूर्ववत् नम्रपणानें उत्तरला.

इंचबर्डसाहेब केव्हांचा कपडे करून सिद्दी साताला भेटण्यासाठीं तिष्ठत होता. तो सिद्दी साताला मनापासून इतका मान देत होता किंवा कसें, हें त्याच्या पूर्वीच्या उद्गारांवरून कोणालाही कळून येण्याजोगें आहे. पण मुसलमानी बडेजावाला नमून हांजीहांजीखोरपणा करणारे लोक सिद्दी सातासारख्यांना जास्त प्रिय होतात हें इंचबर्डसाहेबाला पक्कें माहीत असल्यानें असल्या नटव्या नम्रपणानें त्यांना चीत करून आपला कार्यभाग साधण्याचा त्याचा परिपाठच होता. 'मालिक खालीं उभा आहे असें कळतांच तो तसाच लगबगीनें त्याचें स्वागत करण्यासाठीं काफूरच्या मागोमाग खालीं गेला, तो सुलतान व सिद्दी सात हे दोघेही खालीं उभे होते. परस्परांचे मामुली मुजरे झाल्यावर इंचबर्डसाहेबानें त्या दोघांनाही गौरवपूर्वक आंत आणून एका कोचावर बसविलें व तो स्वतः जवळच्या दुसऱ्या एका कोचावर बसला.

आपणाला इंचबर्डसाहेबानें इतका मान दिलेला पाहून सिद्दी सात व सुलतान यांना जरी काफूरप्रमाणें तो प्रतिअल्ला आहेसें वाटलें नाहीं, तरी तो फार थोर, फार सज्जन व स्नेहाला लायक माणूस आहे असें मात्र पहिल्या झटक्यासरसें वाटलें. आणि इंचबर्डसाहेब वरवर दिसावयाला होताही तसाच. त्याची ती हास्यमुद्रा, ते पाणीदार डोळे, तें अणकुचीदार नाक, ती सडपातळ पण बांधेसूद अंगलट व गौरकाया पाहून त्याच्याविषयीं पहाणाराला एक प्रकारचा आपलेपणा वाटे, व कांहीं काळ त्याच्याशीं सहवास होतांच तर कोणाचेंही असें ठाम मत होई कीं, हा आपला जिवाचा दोस्त आहे; संगतीला माणूस असावा तर असा असावा.

अंतःकरण कोणाचें कोणाला कधीं थोडेंच दिसतें ! तशांत इंचबर्डसाहेब अंतःकरणाचा फार खोल असल्यानें त्याचा अंत सहसा कधींच कोणाला लागत नसे. जसा माणूस भेटेल तसें त्याच्याशीं वागून त्याच्यावर आपली छाप ठेवून द्यावी कशी याचें इंग्रज लोकांना जणुं बाळकडू पाजलेलें असतें. आणि त्यांतल्या त्यांत ईस्ट इंडिया कंपनीच्या मुंबई येथील धूर्त गव्हर्नरानें मुद्दाम कोंकणांतील राजकारणाचे डाव खेळण्यासाठीं त्याची नेमणूक केली होती. यावरून त्याच्या धूर्तपणाची व कार्यसाधुपणाची कांहींशी अटकळ होण्याजोगी आहे बाहेर दिसावयाला तो केवळ एका मोठ्या इंग्रजी लढाऊ जहाजाचा कप्तान होता; पण खरें पाहूं जातां आंग्रे, सिद्दी व मराठे यांच्या कोकणपट्टींतील हितसंबंधरूपी नावेचाही तोच एकटा कुशल कर्णधार होता.

वास्तविक आज इंचबर्डसाहेब तेथें यावयाचा नव्हे; तो थेट कुलाब्याला जावयाचा होता. त्याचे लढाऊ जहाज पुढें रवाना झालें होतें व तो एका लहानशा विहारनौकेंतून रामाजी महादेवासह निघाला होता. तोंच वादळानें त्याला आपला प्रभाव दाखविला, त्यामुळें त्याला किनाऱ्याकडे वळावें लागलें तो मांडल्याच्या बंदरांत येतो, तोंच सिद्दी सात धरमतरीकडून जहाजांतून तेथें आला. तेथें त्या दोघांची गांठ पडली. सिद्दी सातानें त्याला महत्त्वाच्या कामासाठीं थळला बोलावून घेतलें होतें, व त्याच्या स्वागताची तयारी करण्यासाठीं लगेच एक हरकारा एका लहानशा जहाजांतून थळकडे रवाना झाला; तो दोन प्रहरींच थळला येऊन पोंचला होता. सिद्दी सातचें आपणापाशीं काय काम आहे हें जरी त्याला नक्की कळलें नव्हतें, तरी आंग्र्यांनीं अंजनवेल काबीज केल्यामुळें सिद्दी साताची हवेलंडी उडाल्याचें त्याला माहीत होतें. त्यावरून सिद्दी सात मदत मागणार हें उघड होतें. पण त्या बाबतींत निश्चित विचारविनिमय करण्याला त्या दोघांनाही मार्गांत अवसर मिळाला नव्हता. किनाऱ्यावर उतरल्यावर चार घटका तर मिरवणूक वगैरे आगत–स्वागतांतच गेल्या; व त्यानंतर सुलतानाशीं अनेक महत्त्वाच्या गोष्टींची वाटाघाट करतां करतां सिद्दी साताचा बराच वेळ मोडला, त्यामुळें इंचबर्डसाहेबाची भेट घेण्याला इतका उशीर झाला.

मूर्तीबरोबर जशी छाया अथवा पाखराबरोबर पिसारा, त्याप्रमाणेंच मालक आंत येतांच मागोमाग त्यांच्या ऐषआरामाची तरतूद राखणारा त्यांचा जनानी लवाजमाही अंमळशानें आंत आला. सिद्दी सात या बैठकखान्यांतून त्या बैठक-

खान्यांत गेला तरी तेथें हुक्का, पिकदाणी, पानदान वगैरे त्याच्या ऐषआरामाच्या उपकरणांची सिद्धता अवश्य लागे. आणि त्याच्या ह्या ऐषआरामांतील विस्मयकारक विशेष हा कीं, त्याला पानदानांतील विडा तोंडांत कोंबण्यासाठीं, विडा चघळून झाल्यावर ओंठाशीं पिक्दाणी धरण्यासाठीं, हुक्क्याची नळी हातीं धरण्यासाठीं, वें वारा घालण्यासाठीं वगैरे सुंदर सुंदर दासी फार आवडत व त्या बहुधा बलात्कारान भ्रष्टविलेल्या उच्च वर्णीय हिंदु रमणी असण्यांत त्याला मोठें भूषण वाटे. सिद्दी सात कोणत्याही ठिकाणीं गेला कीं तेथली एखादी तरी उच्च वर्णीय हिंदु तरुणी बिबी म्हणून, नाटकशाळा म्हणून किंवा दासी म्हणून त्याच्या जनानखान्यांत खेचली गेली नाहीं असें क्वचित्च होत असे. त्याप्रमाणेच एखादें संपन्न प्राचीन हिंदु देवालय विध्वंसिल्यावर त्यांत सुवर्णाचें अभिषेकपात्र अथवा देवासन सांपडलें तर तें पिकदाणी अथवा पानदान म्हणून उपयोगांत आणणें, देवांचे अलंकार आपल्या दासीबटकींना धारण करावयाला देणें, देवमुकुटांतील रत्नें काढून तीं आपल्या व आपल्या आवडत्या रमणींच्या अलंकारांत गुंफणें, अशा प्रकारचे अनेक वेडे नाद सिद्दी साताला असत. ही नुसती ऐषआरामांसाठीं हिंदु समाज व हिंदु देवधर्म यांवर सिद्दी साताकडून करण्यांत येणाऱ्या अत्याचारांची ओझरती झुळूक झाली. याशिवाय इस्लामाचा प्रसार करण्यासाठीं, दुर्दम राक्षसी धनवैभवतृष्णा शमविण्यासाठीं सिद्दी सात व त्याचे अनुयायी यांजकडून कसकसे अमानुष अत्याचार हिंदु समाजावर हरहमेष करण्यांत येत असत, तो किळसवाणा व त्वेषकारक वृत्तान्त यथावत् कथन करून जिव्हा व लेखणी विटाळण्याचें कार्य निःसंशय कोणाही अस्सल रक्ताच्या हिंदूच्या हातून होणें शक्य नसल्यानें त्या वृत्तान्ताविषयीं तत्कालीन इतिहासाकडे अंगुलिनिर्देश करून स्तब्ध रहाणें प्राप्त आहे.

असो. सिद्दी साताच्या मागोमाग बहुमोल वस्त्रालंकारांनीं नटलेल्या पांच सुंदर युवती पानदान, पिकदाणी, पंखा, हुक्का वगैरे विलासोपयोगी साहित्य घेऊन आंत आल्या, व तीनही खाशांना लवून मुजरा करून सिद्दी साताच्या मागें आदबीनें उभ्या राहिल्या.

त्या पांचही जणी सिद्दी साताच्या यःकश्चित् दासी; पण त्यांच्या अंगावरील बहुमोल वस्त्रालंकार पाहून इंचबर्डसाहेबाचे डोळे दिपून गेले! तो मनांतल्या मनांत म्हणाला, "ह्या प्रत्येक दासीनें धारण केले आहेत असले बहुमोल अलंकार आमच्या इग्लंडच्या राणीला तरी धारण करावयाला मिळत असतील कीं नाहीं याची शंका आहे."

इंचबर्डसाहेब त्या पांचही दासींकडे अंमळ टक लावून पाहूं लागतांच सिद्दी सातानें त्याला विचारलें, " कप्तानसाहेब ! तुम्हांला ह्या दासींचा हिंदु पेहेराव व त्यांच्या कपाळींचें कुंकूं पाहून आश्चर्य वाटलें असेल. होय ना ? "

चांभाराचें लक्ष्य जोड्याकडे, त्याप्रमाणें इंचबर्डसाहेबांचें लक्ष्य वास्तविक त्या दासींच्या बहुमोल वस्त्रालंकारांकडे होतें. असें असतां त्यानें आपल्या स्वभावानुसार सिद्दी साताला तोंडदेखलें उत्तर दिलें, " होय."

इतक्यांत सिद्दी साताला विडा खाण्याची लहर आली, त्याबरोबर त्यानें पानदान हातीं घेऊन जवळच उभी असलेल्या सुमारें बावीस–तेवीस वर्षें वयाच्या पाणीदार दासीकडे नुसतें एकवार पाहिलें. लगेच त्या दासीनें पानदानांतील विडा सिद्दी साताच्या तोंडांत घातला. तिच्या मागोमाग इतर दासीही पिकदाणी, पंखा, वगैरे साहित्यासह सिद्दी साताची सेवा करण्यासाठीं त्याच्या डाव्या उजव्या बाजूंनीं पुढें आल्या.

" कप्तानसाहेब विडा खातात का ? " सिद्दी सातानें विडा चघळीत इंचबर्डसाहेबाला विचारलें.

इंचबर्डसाहेब गालांतल्या गालांत हसून उत्तरला, " नाहीं मेहेरबान ! माफ करा."

" एकूण कप्तानसाहेब अजून अशा ऐषआरामांत डुंबूं लागले नाहींत म्हणावयाचे ! " सिद्दी सात विडा तोंडांत असल्यानें किंचित् अस्पष्टपणानें म्हणाला.

" खरें आहे." इंचबर्डसाहेब पूर्ववत् त्या दासीकडे पहात उद्गारला.

" कप्तानसाहेब ! तुम्हांला माझ्या दासींकडे पाहून फारच आश्चर्य वाटत आहेसें दिसतें. तुमच्या पदरीं असल्या हिंदु दासी नसतील ? "

" छेः ! नाहींत."

" तुमच्या गव्हर्नरसाहेबांच्या जनानखान्यांत तरी ? "

" छेः ! आमची वागणूक तुम्हां हिंदी लोकांपेक्षां फारच निराळी व अत्यंत काटकसरीची असते." काटकसरीच्या ऐवजीं सभ्यता हा शब्द उच्चारण्याचें इंचबर्डसाहेबाच्या अगदीं जिभेवर आलें होतें. पण त्यानें प्रसंगावधान राखलें. तो पुढें म्हणाला, " आम्ही व्यापारी पेशाचे लोक आहों. आम्हांला असे ऐषआराम करावयाला फुरसतच मिळत नाहीं. तुमच्यासारख्या सत्ताधीश वैभवशाली नबाबांची गोष्ट वेगळी व आमची गोष्ट वेगळी."

" तें खरें आहे. मीदेखील माझी सत्ता व माझें वैभव आमच्या प्रतिस्पर्ध्यांना न बोलतां पटवून देण्यासाठींच मुद्दाम अशा मोठमोठ्या हिंदु लोकांना धुळीला मिळवून त्यांच्या कुटुंबांतील खुबसूरत औरतींना माझ्या दासीवटकी करून अशा बरोबर हिंडवितों. दिल्लीच्या बादशहांनीं तर आजवर कैक हिंदु राजा-महाराजांच्या राजकन्यांना ओढून आणून आपले जनानखाने सजविले आहेत. माझ्या या पांचही दासी खानदानीच्या हिंदु घराण्यांतील आहेत; व त्या हिंदु आहेत हें जगजाहीर होण्यासाठींच मीं त्यांना त्यांच्या पेहरावांत रहाण्याची मुभा दिली आहे."

सिद्दी सात आत्मप्रौढी सांगत होता व इंचबर्डसाहेब ती शांतपणानें ऐकत होता. पण मधून मधून त्या दासींकडे त्याची नजर होतीच. त्या पांचही-जणींच्या चेहऱ्यावर त्यांना ह्या जुलुमाची पूर्ण जाणीव व पूर्ण चीड असल्याच्या छटा इंचबर्डसाहेबाच्या खोल व तीक्ष्ण दृष्टीला स्पष्टपणें दिसत होत्या. सिद्दी साताच्या तोंडूनच त्यानें चालविलेल्या अत्याचारांचा आढ्यतापूर्वक कबुलीजबाब ऐकून इंचबर्डसाहेबाच्या अंगावर शहारे आले, व त्याच क्षणीं त्याच्या मनांत विचारांची वीज चमकली, " सिद्दी सात हा केवळ एक सैतान आहे. त्याच्यावर सर्व हिंदु रयत उलटली आहे ती अगदीं बरोबर ! आज तो प्रसंग येथल्या हिंदु रयतेवर आला आहे, तोच उद्यां आमच्यावर येणार नाहीं कशावरून ! यासाठीं आम्हीं प्रथमपासूनच फार सावधगिरीनें वागलें पाहिजे. राज्यवृद्धीच्या अंतिम इच्छेनें व्यापारी पेशानें वागतांनाही आम्हांला जुलमी इस्लामी सत्तेपासून पुष्कळच शहाणपणा शिकण्यासारखा आहे. पोर्तुगीज लोक आमच्या पूर्वीं हिंदुस्थानांत आले, त्यांचा व आमचा पेशा व अंतिम हेतु जरी एकच असला, तरी त्यांनीं धर्मवेडाला बळी पडून हिंदु लोकांना अमानुषपणें छळून बाटविण्याचा सपाटा चालविला आहे, म्हणूनच सारा हिंदु समाज त्यांच्याविरुद्ध खवळून त्यांच्या नाशावर टपलेला आहे.† बाकी, पोर्तुगीज लोकांना देखील ही दुर्बुद्धि आम्हां इंग्रजांच्या

---

† पोर्तुगीज म्हणजे फिरंगी लोक हे हिंदुस्थानांत व्यापार करण्याच्या उद्देशानें इ० सन १५९४ मध्यें प्रथम कालिकोट येथें आले. त्यांचा मुख्य सरदार वास्को-डि-गामा याची व कालिकोटच्या राजाची भेट होऊन त्याला तेथें राजाश्रय मिळाला. त्यांनीं तेथून एकेक पाऊल पुढें टाकीत गोमांतकांत प्रवेश केला व तेथें

हिताच्या दृष्टीनें सुवेळीं सुचली हेंच खरें. त्यांच्या मागाहून शंभर वर्षांनीं आमच्या कंपनीनें हिंदुस्थानांत पाय ठेवला, असें असतां आमचे पाय त्यांच्याहीपेक्षां येथें हळुहळू पण चांगलेच खोल रुजत आहेत याचें सारें श्रेय केवळ आमच्या सावधपणाच्या वागणुकीला नसून ते व सिद्दी यांच्या जुलुमी कारभाराचाही अप्रत्यक्षपणें त्या यशांत बराच वांटा आहे. यापुढेंही आम्ही येथील रयतेच्या भावना न दुखवितां व त्यांच्या पोटांतील पाणी हलूं न देतां संधि साधून जेवढा स्वार्थ साधतां येईल तेवढा साधला पाहिजे. प्रतिस्पर्धी भेटला व त्याला दुर्बलच करावयाचें झालें, तरी त्याला छळून दुर्बल करण्यापेक्षां गुदगुल्या करून हंसवून खेळवून त्याचा शक्तिपात करून दुर्बल करणें यांतच खरें व्यवहारचातुर्य आहे."

वीज चमकून पुन्हा क्षणार्धांत अदृश्य होते, त्याप्रमाणेंच इंचबर्डसाहेबांच्या मनांत वरील विचार इतक्या जलदीनें येऊन गेले कीं, त्यांच्या चर्येवरून तेथल्या कोणाला तशा प्रकारचा संशयदेखील आला नाहीं. लगेच इंचबर्डसाहेब सिद्दी

---

अनन्वित अत्याचार करून तो प्रांत जिंकून गोंवें येथें आपली राजधानी स्थापन केली. तेव्हांपासून त्यांनीं समुद्रकिनाऱ्यानें उत्तरेकडे आपली सत्ता अत्याचारांनीं वाढविली. इ० सन १६६४ मध्यें पोर्तुगीज लोकांचें चांगलेंच प्राबल्य होऊन मुंबई किनाऱ्याचा सर्व भाग त्यांच्या ताब्यांत आला होता. परंतु त्यापुढें युरोपामधून इतर राष्ट्रांतील अनेक प्रतिस्पर्धी व्यापारी मंडळ्या हिंदुस्थानांत आल्यामुळें पोर्तुगीजांचें माहात्म्य ओहोटीला लागलें. याचें मुख्य कारण त्यांचे अत्याचार होत. पोर्तुगीज लोक हे रोमन कॅथॉलिक पंथाचे असल्यानें जबरदस्तीनें धर्मप्रसार करणें हें त्या पंथाचें मुख्य तत्त्व ते फार दक्षतेनें पाळूं लागले. 'जेसुएट' उपदेशकांनीं 'इन्क्विझिशन' नांवाची सभा स्थापून तिच्या शाखा मुलुखोमुलुखीं स्थापण्याचा क्रम ठेविला होता. बंदींत टाकणें, उपाशीं मारणें, चाप लावणें, तापलेल्या तव्यावर उभें करणें, अंगाला पलिते लावून जिवंत जाळणें, यासारख्या दुष्ट व अमानुष उपायांनीं लोकांना बाटविण्याचा आपला धर्म आहे, असें ते 'जेसुएट' लोक मानीत असत. पोर्तुगीज लोकांच्या राज्याच्या सुरुवातीच्या पाठोपाठ वरील 'इन्क्विझिशन'ची शाखा अर्थातच हिंदुस्थानांत आली, व अत्याचारी धर्मप्रसाराला सुरुवात झाली. ह्या अत्याचारांचा परिणाम काय झाला वगैरे हृदयद्रावक वृत्तान्त 'पेशवाईतील धर्मसंग्राम' ह्यापुढील कादंबरींत यावयाचा आहेच.

सातालां म्हणाला, " बरें; मला पहांटेलाच येथून पुढें कुलाब्याला जावयाचें आहे. यासाठीं आपलीं कामें आतांच्या आतां आटोपलीं तर बरें होईल."

" कप्तानसाहेब! " सिद्दी सात आळसामुळें अंगाला आळेपिळे देत म्हणाला, " आज तुम्ही व मी दोघेहा फार श्रमलेले आहों. यास्तव मला वाटतें, आतां तुम्हीही खुशाल आराम करा व मलाही थोडा आराम घेऊं द्या. बोला, ह्या खुब-सूरत औरतांपैकीं तुम्हांला कोणती आवडते? "

" छेः ! छेः !— "

" काय तुम्हांला ह्या माझ्या दासी म्हणून आवडत नाहींत? बरोबर आहे. तुमच्यासारख्या थोर पाहुण्याला मीं तशाच दर्जानें वागविलें पाहिजे. कारण ह्या पाहुणचारावरून आमची कीर्ति विलायतेंत तुमच्या राजापर्यंत जावयाची आहे. नुसता ऐषआराम करण्यासाठीं म्हणून तुम्ही पुन्हा केव्हांतरी माझ्याकडे आपण होऊन आलें पाहिजे, असाच आजचा पाहुणचार असावयाला हवा." असें म्हणून सिद्दी सातानें सुलतानाकडे वळून त्याला आज्ञा केली, " सुलतान! ती अस्मानची परी-ती दिलारा मीं कप्तानसाहेबांना कायमची बहाल केली आहे. जा, तिला दासीमार्फत आंतल्या महालांत आणून सोडण्याची व्यवस्था कर " लगेच तो जवळच पानदान हातीं घेऊन उभी असणाऱ्या दासीकडे बोट दाखवून म्हणाला, " आणि कप्तानसाहेब! ही सुंदर औरत आज सकाळींच माझ्या लोकांनीं मराठ्यांचें एक जहाज लुटलें त्यांत मिळाली; ती मला आणून अर्पण केली आहे. तीही मीं तुम्हांला तुमच्या तैनातीसाठीं बहाल केली आहे. ह्या दोघींनाही तुम्ही तुमच्याबरोबर खुशाल घेऊन जा."

सिद्दी साताच्या ह्या शब्दांचा सुलतानाच्या हृदयावर वज्राघात झाला. आपल्या थोर नशिबानें आपल्यापुढें जें सुग्रास अन्नाचें ताट वाढून आलें, तें आपल्या पुढ्यांतून उचलून ह्या टोपड्याला मेजवानी देणारा हा सिद्दी सात अगदी पाजी माणूस आहे असें त्याला वाटलें. पण तो नोकर पडयलानें त्याला धन्याची आज्ञा डोळे झांकून मान्य करणें प्राप्त होतें. त्याप्रमाणेंच ज्या दासीवर इंचबर्ड-साहेबाची तैनात राखण्याचा प्रसंग यावयाचा होता, तिची चर्या तर त्याच क्षणीं कसायाच्या सुरीखालीं मान दिलेल्या गाईसारखी दीनवाणी दिसूं लागली.

इंचबर्डसाहेब हें सारें लक्ष्यपूर्वक पहात होता. पण तो त्या स्त्रीमोहाला बळी पडला नाहीं. तो स्मितहास्यपूर्वक उत्तरला, " मेहेरबान! ह्या पाहुणचारा-

बद्दल तुमचा मी फार फार आभारी आहें. पण आधीं काम व मग ऐषआराम, असा माझा बाणा आहे."

सुलतानानें हायसा एक उसासा सोडला. त्या दासीचीही चर्या जरा निवळली. मला तुमच्याकडे लौकर येतां आलें नाहीं, याचें कारण मी येथून गेलों व लगेच एका अकल्पित आफतीची बातमी मला मिळाली." सिद्दी सात म्हणाला.

" ती कोणती ? " इंचबर्डसाहेबानें विचारलें.

" तुमचा आमचा एक कट्टा वैरी आजवर राजपुरीला आमच्या तुरुंगांत होता, तो मोकळा सुटून आजच येथें आला आहे. तसेंच आमच्या सत्तेविरुद्ध ठिकठिकाणच्या मराठ्यांना बंडाला प्रोत्साहन देणाऱ्या मार्थोफिल बैराग्याचें नांव तुम्हीं कदाचित् ऐकलें असेल ! "

" होय."

" तोही येथें आल्याची दाट बातमी आहे."

" बरें; पण तो तुमचा आमचा कट्टा वैरी कोण ? "

" उंदेरीच्या वेढ्यांतील नानाजी सुर्वे."

नानाजी सुर्व्याचें नांव ऐकतांच इंचबर्डसाहेबाच्या मस्तकावरील केंस ताठ उभे राहिले ! त्यानें 'नानाजी सुर्वे' हें नांव एकवार जिभेवर घोळवून उजव्या हाताची मूठ वळवून गालाला टेंकून क्षणभर विचार केला. दुसऱ्याच क्षणाला त्याची नजर सहज तेथल्या दासींकडे वळली, व पानदान हातीं घेऊन उभ्या असलेल्या दासीच्या दृष्टीशीं त्याची दृष्टि भिडली. तेव्हां त्या दासीच्या दृष्टींत एकदम विशेष चोकस-पणाचें पाणी खेळत असल्याचें स्पष्टपणें त्याच्या निदर्शनाला आलें. लगेच इंचबर्ड-साहेब सिद्दी साताला म्हणाला, " मेहेरबान ! अशा महत्त्वाच्या वाटाघाटी नोकर-चाकरांसमोर करणें धोक्याचें असतें. मला पहांटेला जाणें भागच असल्यानें आप-णाला ह्याच बैठकींत सर्व कामें उरकून घेतलीं पाहिजेत. माझ्या सोईसाठीं मेहेर-बानांना थोडासा त्रास होणार हें उघड आहे; पण त्याला कांहीं इलाज नाहीं. तुम्ही ह्या सर्व दासींना बाहेर पाठवून द्या; मग आपण काय बोलावयाचें तें बोलूं."

इंचबर्डसाहेबानें सर्व दासींना बाहेर जावयाला कां सांगितलें याचा जास्त विचार न करतां, व आपलेंच काम साहेबापाशीं असून साहेबाला उद्यांच्या दिवस रहावयाला ज्या अर्थी सवड नाहीं, त्या अर्थी तें आतांच्या आतांच उरकून घेणें शहाणपणाचें आहे असा पोक्त विचार करून सिद्दी सातानें सर्व दासींना आपल्या

निवासस्थानीं जाण्याचा हुकूम केला. लगेच पुन्हा त्याच्या मनांत काय आलें नकळे, त्यानें काफूरला हांक मारून पानदानवाल्या दासीला मात्र खालच्या दिवाणखान्यांत थांबवून घेण्याचा हुकूम केला.

तावडतोब सर्व दासींनीं जनानखान्याच्या शिस्तीप्रमाणें खाशांना त्रिवार हिंदु-पद्धतीचा प्रणाम करून खाशांकडे पाठ न करतां मागच्या पायीं मागें सरकत दरवाजापर्यंत जाऊन तेथून प्रयाण केलें. सुलतान देखील इतका वेळ बाहेर जावयाला उतावळा झाला होता. चित्त दिलाराकडे व देह इथें अशी त्याची अवस्था होती. केवळ निरुपाय म्हणूनच तो इतका वेळ तेथें तिष्ठत बसला होता. त्याला या वेळीं जगांत दिलाराशिवाय दुसरें तिसरें कांहींच दिसत नव्हतें, व कांहीं ऐकू येत नव्हतें. त्यानें ती संधी साधून सिद्दी साताला विचारलें, "मालिक ! मी देखील रजा घेऊं का ?"

सिद्दी साताला सुलतानाची अंदरकी बात काय माहीत ! प्रकृति नीट नसल्याबद्दल सुलतान सायंकाळपासून कुरकुरत होता, तें मात्र त्यानें ऐकलें होतें. शिवाय सुलतान सिद्दीच्या बाजूचा मुसलमान असला तरी बाटगा मुसलमान होता; व तोही कनक-कान्तेच्या मोहानें बाटलेला होता. अशा क्षुद्र भावनांच्या स्वार्थी लोकांशीं वागतांना सिद्दी सात मोठ्या धूर्तपणानें वागे. त्यानें सुलतानाला आपणाबरोबर इंचबर्डसाहेबाकडे आणलें होतें, तें केवळ आपला लवाजमा म्हणून; आणि आज रात्रौ साहेबाशीं महत्त्वाची वाटाघाट करावयाची नाहीं असा आगाऊ बेत ठरवूनच आणलें होतें. पण आतांच सर्व बोलणें व्हावयाचें ठरल्यावर त्याला सुलतानाची अडचण भासण्याचा संभव होता. तो आपोआप दूर होत आहे असें पाहून त्यानें सुलतानाला आनंदानें घरीं जावयाला परवानगी दिली. सुलतान हर्षभरित चित्तानें इंचबर्डसाहेब व सिद्दी सात यांना मुजरा करून जावयाला निघाला. त्याच्या मागोमाग सिद्दी सातही दरवाजापर्यंत गेला. त्यानें सुलतानाच्या कानांत कायसें सांगितलें. तें ऐकतांच सुलतानाच्या मनाचा इतका विरस झाला कीं, ज्याचें नांव तें ! पण सुलतान मालिकाच्या हुकुमाचा बंदा सेवक पडला. त्याला मालिकाच्या हुकुमाची अंमलबजावणी करणें प्राप्त होतें.

सुलतानाचा इतका विरस होण्यासारखें सिद्दी सातानें त्याला काय सांगितलें बरें ?

प्रकरण तेरावें

## खलबत

तेथें आतां कोणीही तिसरा माणूस नाहीं असें पाहून इंचबर्डसाहेबानें सिद्दी सातापाशीं प्रथम नानाजी सुर्व्याच्या कटाचा विषय काढला. ह्या कटाचा मूळ उगम अथवा तसा आभास कोठें व कसा झाला होता, याविषयींचें दिग्दर्शन पूर्वीच करण्यांत आलें आहे. सुलतानाला सुगावा लागतांच त्यानें ताबडतोब सिद्दी साताकडे जाऊन सर्व गोष्टी त्याच्या कानांवर घातल्या होत्या. प्रथम सुलतानाचा विचार दत्ताजी आल्याची वार्ता अजिबात सिद्दी साताच्या कानांवर घालावयाची नव्हती. कारण कीं मग 'दत्ताजी कां आला ?' 'त्याच्याबरोबरची ती दिलारा कोण ?' वगैरे गोष्टी एकामागून एक उजेडांत यावयाच्या; व अखेर कटाची चौकशी कांहींही होवो अगर न होवो, इतक्या प्रयासांनीं हातीं लागलेली दिलारा हातची जावयाची !

पण सिद्दी सात जेव्हां कसून चौकशी करूं लागला, त्यानें जेव्हां दत्ताजीची समक्ष गांठ घेऊन त्याच्या साक्षीच्या आधारानें कटाचा जास्त जास्त शोध चालविला, तेव्हां बुद्धीला चकित करून सोडणाऱ्या एकेक गोष्टी उजेडांत यावयाला लागून त्यांची अशी कांहीं बेमालूम संगति जुळत गेली, कीं सांगण्याची सोय नाहीं. नानाजी कटाचा एक घटक असून तो तेथें आला आहे. हें दत्ताजीच्या चहाडखोरीवरून उजेडांत आलें, सुभानजीनें भानाजी पिसाळ हा कटवाल्यांचा म्होरक्या आहे अशी खोटीच हूल स्वार्थ साधण्यासाठीं उठविली; ती त्या पूर्वीचा तशा प्रकारचा इतिहास भानाजीच्या मागें असल्यामुळें खरीच ठरली; आणि दिलारा ही नानाजीची आवडती प्रभावतीच आहे, हें सत्य उजेडांत येतांच तर संशयी सिद्दी साताला ती देखील कटवाल्यांची साथीदारीण दिसूं लागली ! सायंकाळच्या वेळीं आंग्र्यांचे कांहीं दर्यावर्दी लोक किनाऱ्याला लागले असल्याचें व ते सर्वांच्या पूर्वी चौबुरुजीवर गेल्याचें वाचकांना स्मरत असेलच. ते वर गेल्यावर एका एकांताच्या जागीं बसून सागरगडच्या वेढ्याविषयीं व कुलाबा येथील दंगलीविषयीं गोष्टी बोलत असतां, किल्लेदाराच्या शिपायांनीं त्यांना पकडून किल्लेदार व सिद्दी सात खलबत करीत बसले

होते, त्यांच्यासमोर नेलें. तेव्हां सुक्याबरोबर ओलेंही जळावें त्याप्रमाणें तें पांचहीजण बिचारे भानाजी व नानाजी यांना सामील असलेले कटवाले ठरून त्यांना सिद्दी साताच्या हुकुमानें तावडतोब तोफेच्या तोंडाशीं बांधून ठार करण्यांत आलें ! इतक्या भडकलेल्या संशयाग्नींत तेलाचा शिडकाव बजरंग बैरागी तेथें आल्याच्या बातमीनें झाला. ज्या भाविकांची त्या बैराग्याच्या ठायीं निःसीम श्रद्धा होती, अशा कांहीं गांवकऱ्यांनीं त्याला सायंकाळीं बजरंगबलीच्या देवालयाच्या आसमंतात् भटकतांना पाहिलें होतें, व त्यांच्या तोंडून त्या बातमीचा सर्वत्र वाऱ्याप्रमाणें प्रसार झाला होता. सिद्दीच्या हस्तकांना ह्या बातमीचा सुगावा लागतांच त्यांनीं तिखटमीठ लावून खाशांच्या कानावर ती घातली; त्यावर त्या बैराग्याला हुडकून पकडून आणण्यासाठीं निराळे लोक चौबुरुजीवर व आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतून तावडतोब रवाना होऊन 'नानाजी, भानाजी, तो बैरागी व आणखी कोण त्यांचे साथीदार असतील त्यांना पकडून आणणारांना बक्षीस आणि त्यांना आश्रय देणारांना देहान्त शासन रातोरात दवंडी पिटून जाहीर करण्यांत आलें. इतका सारा अनर्थ भानाजीला पकडण्यासाठीं सुभानजी देवालयाकडे गेला त्या दरम्यान झाला होता.

एकदां अग्नि भडकला व त्याच्या विस्तवाप्रमाणें आहुति त्याला मिळेनाशी झाली, म्हणजे तो स्वतःलाच जाळून भस्म करीत सुटतो. सिद्दी साताचा संशयाग्नि हां हां म्हणतां त्या रात्रीं इतका भडकला कीं, संशयाचा मुद्देमाल हातीं लागण्याचीं फारशीं चिन्हें दिसेनात; तेव्हां त्याचा संशयाग्नि ज्यांच्याकडून ह्या संशयाला मूळ चालना मिळाली, त्याच सुभानजी–सुलतान–दत्ताजी ह्या तीन लोकांकडे पाहून वखवखल्या आशाळभूतपणानें ज्वाळांच्या जिभल्या चाटूं लागला. ते तिघेही भानाजी वगैरे कटवाल्यांना फितुर असतील असें मानण्याला जरी कांहींच पुरावा नव्हता, तरी ते तिघेही हिंदु होते,–सुलतान बाटगा असला तरी तोही रक्ताचा हिंदूचा होता व शिवाय तो प्रभावतीच्या प्रेमपाशांत गुरफटून गेला होता, आणि दत्ताजी प्रभावतीचा रक्षणकर्ता असून सुलतानाला सामील होता, येवढा पुरावा सिद्दी सातासारख्या संशयी माणसाला काय थोडा होता ! पण हा संशय सिद्दी सातानें प्रगट मात्र केला नव्हता. भानाजी, नानाजी, तो बैरागी वगैरे आपले शत्रु हातीं लागल्यानंतर आपल्या अस्तन्या शोधावयाच्या व सुलतान, दत्ताजी आणि सुभानजी हे अस्तनींतील विंचू ठरले तर त्यांना ठेंचावयाचें, असें त्याचें अंतस्थ भावि धोरण होतें.

असो. सिद्दी सातांच्या तोंडून कटाची सर्व बातमी विस्तारानें ऐकल्यावर गंभीर चर्चा करून इंचबर्डसाहेब म्हणाला, "एकूण मराठे व आंग्रे यांनीं तुम्हां सिद्दींची सत्ता कोंकणपट्टींतून उलथून नामशेष करण्यासाठीं सत्तेच्या पायांखालीं अंधारांत फारच भयंकर सुरुंग पेरलेले दिसतात. नानाजी सुर्वे तुमच्या सक्त कैदेंतून मोकळा होऊं शकला, यावरून थेट सिद्दीच्या राजधानीपर्यंत ह्या कटाचें जाळें पसरविण्यांत आलें असलें पाहिजे, खास."

"होय. मला देखील असेंच वाटतें. सागरगडचा भानाजी पिसाळ हा एकटाच ह्या कटाचा म्होरक्या असेल असा जो माझा समज होता, तो चुकीचा असण्याचा संभव आहे. आंग्र्यांच्या हातीं ह्या कटाचीं सूत्रें असलीं पाहिजेत, अशी आतां माझी समजूत होऊं लागली आहे."

"हें तर उघडच आहे. आंग्रे आणि सिद्दी यांचें वैर जगजाहीर आहे. त्यांचें ह्या कटवाल्यांना पाठबळ असल्याशिवाय नानाजी तुमच्या हातावर तुरी देऊन निसटतो काय, तो येथें येतो काय, भानाजीची व त्याची लगेच मुलाखत होते काय, त्याच वेळीं तो बंडवाला बैरागी एथें उमटतो काय, मानाजीच्या आवडत्या प्रभावतीला घेऊन तो कोणी दत्ताजी नेमका त्याच वेळीं येथें येतो काय, आंग्र्यांच्या कांहीं लोकांना संशयावरून पकडून तुम्हीं तोफेच्या तोंडीं दिलेंच म्हणतां; ह्या सर्व गोष्टी यंत्राच्या हालचालीप्रमाणें एकाच वेळीं घडून आल्या, त्या आंग्र्यांच्या कारस्थानीपणाशिवाय थोड्याच घडून आल्या !"

"मलादेखील प्रथम तसा संशय आला खरा. पण पुन्हा वाटलें, प्रभावतीच्या येथें येण्याशीं नानाजीच्या येण्याचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसावा."

"हें तुम्ही कशावरून म्हणतां ?"

"सुलतान उंदेरीच्या वेढ्यापासून त्या पोरीवर फिदा झाला आहे व तिच्यासाठीं तो उछूपणानें उंदेरीचा किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन करण्याला तयार झाला होता, हें तुम्हांलाही माहीत आहेच."

"बरें; हा दत्ताजी कोण ?"

"उंदेरीच्या किल्लेदाराचा जो हस्तक आम्हांला फितूर झाला होता व ज्याच्या फितुरीमुळेंच तुम्हांआम्हांला त्या वेढ्यांत यश मिळालें, तोच हा माणूस. त्याचा सुलतानावर लोभ आहे. कदाचित् सुलतानानें प्रभावतीच्या आशेनें त्याला आपल्या

पदरीं बारगिरी-शिलेदारी देण्याचें कबूल केलें असेल; तेवढ्या लाभासाठीं त्यानें प्रभावतीला आंग्र्यांच्या वाड्यांतून फुसलावून पळवून येथें आणली असेल. नानाजी येथें आल्याची खबरही त्यानेंच सुलतानाला दिली. यावरून वाटतें कीं, तो फितुरींत सामील नसावा."

"हा दत्ताजी कोण ? आंग्र्यांचा दावेदार दत्तोजी कनोजे तो हाच काय ?"

"होय. तोच हा. तो आंग्र्यांचा दावेदार आहे; म्हणूनच तो आंग्र्यांच्या बाजूनें अशा एखाद्या कारस्थानांत सामील होणार नाहीं असें वाटतें."

"मेहेरबान ! हा तुमचा चुकीचा समज आहे. मला खबर मिळाली आहे ती अशी कीं, दत्ताजी हा ब्रह्मेंद्रस्वामींचा हस्तक आहे. आंग्र्यांचा अक्षम्य गुन्हा त्यानें केला असतांही स्वामीनें त्याला पाठीशीं घातलें व त्याला पुन्हा त्याच्या रोजगारावर रुजू करून घ्यावें म्हणून आंग्र्यांपाशीं आपलें होतें नव्हतें तेवढें वजन खर्च करून शिकस्त केली."

"पण आंग्र्यानें स्वामीचा शब्द मुळींच मानला नाहीं, म्हणून तर आंग्र्यांच्या नांवानें दत्ताजी जळतो आहे."‡

"तसल्या गोष्टींवर तुम्ही मुळींच भरंवसा ठेवूं नका. स्वामीचा तुमच्यावर त्या हत्तीच्या प्रकरणापासून किती रोष झाला आहे हें तुम्ही जाणतांच. कोंकणपट्टींतून सिद्दीच्या सत्तेचीं पाळेंमुळें देखील खणून काढण्याची स्वामीची प्रतिज्ञा आहे; व स्वामीच्या निकडीच्या आज्ञेमुळेंच शाहूराजे आणि पेशवे यांनीं ही

‡ दत्ताजी कनोजे या नांवाचा कोणी मनुष्य आंग्र्यांच्या पदरीं नोकर होता. त्यानें कांहीं गैरकायदा आगळिक केल्यावरून व संभाजीतर्फे सखोजीच्या विरुद्ध फितुर केल्यावरून सखोजीनें त्याला कामावरून दूर केलें. दत्ताजी ब्रह्मेंद्रस्वामींकडे फिर्याद घेऊन गेला, तेव्हां ब्रह्मेंद्रस्वामींनीं त्याला शिफारसपत्र देऊन पाठविलें, आणि 'तुमच्या कामाकरितां याचा घात झाला, तेव्हां तुम्हीं यांस अवश्यमेव आश्रय दिला पाहिजे' अशी संभाजीला निक्षून आज्ञा केली. संभाजीनें ती आज्ञा शिरसा मानली असती; पण लौकिकांत केवळ गौण दिसेल ह्या भीतीनें ती मानण्याचें त्यानें मोठ्या दिलगिरीनें नाकारलें. (राजवाडेकृत 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें'—खंड ३ रा; लेखांक २६६.)

मोहीम प्रथम उभारली. दत्ताजीचें संभाजी आंग्र्यांशीं वैमनस्य असेल; पण तुमचा नायनाट करण्याचा विडा स्वामीनें उचलल्यावर तो काय करणार नाहीं? स्वामीचें मराठी दुनियेवर येवढें वजन आहे कीं, मराठमुलुखींच्या वाघिणीला जर स्वामीनें गाईचें वासरूं पाजावयाला सांगितलें, तर वाघीण देखील त्याची आज्ञा मानील. मग दत्ताजी व संभाजी यांसारख्या माणसांची काय कथा घेऊन बसलां? आणखी असें पहा कीं, हे मराठे लोक मोठे कावेबाज असतात. ते कल्पनातीत कारस्थान लढवून तुमच्या डोळ्यांतलें काजळ काढून नेतील, तरी देखील तुम्हांला कळावयाचें नाहीं. तुमच्यांतलाच शेखजी फितवून, तुमच्या राजवंशांत दुही माजवून तुमच्या सत्तेला लंगडेपणा त्यांनीं केव्हां कसा आणला, याची तुम्हांला दाद तरी लागली? तसेंच कांहीं कारस्थान करण्यासाठीं हा दत्ताजी कनोजे स्वामी, पेशवे व शाहूराजे यांच्या वतीनें इकडे आला असेल, आणि गळाला मासा लागावा म्हणून सुलतानाला भुलविण्यासाठीं उंदेरीच्या किल्लेदाराच्या पोरीला बळी द्यावयाचा त्याचा डाव असेल. मला कांहीं एकंदरींत हीं बऱ्याचीं लक्षणें दिसत नाहींत. समजा, तुम्हीं येथले मूठभर कटवाले कापून काढले, तरी कटाच्या प्रचंड वृक्षाच्या चार पारंब्या तोडल्याचें श्रेय फार तर तुम्हांला मिळेल; पण मूळचा वृक्ष तसाच अधिकाधिक फोंफावत राहील. एक पारंबी तोडली तरी तिथें दुसऱ्या चार पारंब्या फुटतील. हेंच पहाना! राजपुरींत तुम्ही बंदोबस्तानें ठेवलेला कैदी सुटतो, याचा अर्थ काय? ह्या कटाचीं पाळेंमुळें रायगड–जंजिऱ्यापासून तों तहत पुणें–साताऱ्यापर्यंत एकजात पसरून फोंफावत आहेत. यासाठीं तुम्ही तो कट मुळापासून उखडून काढून नामशेष केला पाहिजे. मराठशाहीची सत्ता नामशेष केल्याशिवाय तुम्हांला तरणोपाय नाहीं. वास्तविक इतकें खोल व खासगी राजकारण मीं तुमच्याशीं बोलावयाचें नव्हे. कारण आम्ही मुंबईकर इंग्रज आंग्रे व पेशवे यांचे दोस्त आहों; त्यांना जाचक होतील अशा गोष्टी आम्ही बोलतां उपयोगीं नाहीं.”

“पण तुम्ही आम्हां सिद्दींचेही दोस्त आहांच. आम्ही प्रथमच तुमच्याशीं दोस्ती केल्यामुळेंच पेशव्यांना शह लागला, व म्हणून त्यांनीं तुमच्याशीं दोस्ती केली. बरें; बादशाही संबंध घ्यानीं आणला तरी इंग्रजांना आम्ही मुसलमानांनींच प्रथम पाठीशीं घातलें. आमचा राजाश्रय तुम्हांला मिळाला नसता, तर आज

तुमच्या कंपनीच्या व्यापाराची इतकी भरभराट झाली नसती. बादशाही फर्माना-प्रमाणें देखील तुम्हीं आम्हांलाच मदत केली पाहिजे.''‡

"गोष्ट खरी आहे. ही जुनी दोस्ती स्मरूनच आम्हीं कोणत्याही प्रकारें तुमच्या-आमच्या स्नेहांत अंतराय पडूं दिलेला नाहीं. आम्ही तुम्हांला हरवखतीं शक्य तें साह्य करीतच आलों कीं नाहीं ?''

"तुम्ही आम्हांला साह्य करीत आलां; मी कुठें नाहीं म्हणतों ? पण आम्हीही तुमचे उपकार स्मरत आलों आहों. उंदेरीचा किल्ला आम्हीं तुमच्या हातीं दिला म्हणजे आरबी समुद्रांतील व्यापाराचें नाकच तुमच्या हातीं दिलें म्हणाना !''

"बरें; मग पुढें तुमचें म्हणणें काय ?''

"पुढें म्हणणें हेंच कीं, आंग्रे-मराठे विरुद्ध सिद्दी अशा ह्या प्रस्तुतच्या झगड्यांत तुम्हीं आम्हांला साह्य केलें पाहिजे. आंग्रे जसे आमचे शत्रु आहेत तसेच तुमचे-ही शत्रु आहेत. त्यांची कोंकणपट्टींतून कायमची उचलबांगडी होऊन आमची एक तंत्री सत्ता स्थापन झाली कीं, तुम्ही मुंबईकर इंग्रज व्यापाराच्या वगैरे जेवढ्या सवलती मागाल तेवढ्या आम्ही तुम्हाला देऊं. आंग्र्यांनीं आजवर वेळोवेळीं तुमचा कसा तेजोभंग केला, तें तुम्ही विसरलां काय ?''

"नाहीं; तें आम्ही मुळींच विसरलों नाहीं. आंग्रे हे आमचे शत्रु आहेत, हें आम्हांला कळत नाहीं असें तुम्हांला वाटतें काय ?''

"मग काय, हें कळून सवरून तुम्ही मानाजी आंग्र्याला पाठीशी घालणार ?''

"हो ! कळून सवरून आम्ही हें करीत आहों.'' इंचबर्डसाहेब गालांतल्या गालांत हंसत म्हणाला. "पण यांत देखील आमचें व तुमचें—उभयतांचेंही हित आहे.''

‡ '....सिद्दींनीं मराठ्यांच्या हल्ल्यामुळें बेजार होऊन चेऊलचे पोर्तुगीज, सुरतेचे सिद्दी, मुंबईचे इंग्रज, दिल्लीचा बादशहा वगैरे सर्वांकडे मदतीची याचना केली (इ० सन १७३३–३४). तेव्हां दिल्लीच्या बादशहाच्या वजिरानें त्यांना फौजेची व आरमाराची तावडतोब मदत करण्याविषयीं पूर्वींच्या करारमदारांना अनुसरून हुकूम पाठविला. 'आमचा धंदा व्यापाराचा आहे; तथापि आपण फौजेची व पैशाची मदत केल्यास आम्ही आरमार पाठवून सिद्दीला मदत करूं' असें इंग्रजांनीं परत कळविलें.''—मराठी रियासत, मध्यविभाग १.

" तें कसें काय ? "

इंग्बर्डसाहेब आपल्या कोचावरून उठला व सिद्दी साताच्या कोचावर त्याच्या जवळ असून भुंवया चढवीत म्हणाला, " मेहेरबान ! ही कांट्यानें कांटा काढण्याची युक्ति आहे. मानाजी आंग्रे काय किंवा संभाजी आंग्रे काय, दोघेही आमचे शत्रूच ! सर्पाचीं पिलें शेवटीं आपल्या जातीवरच जाणार हें आम्ही पुरेपूर जाणतों. त्यांचा समोरासमोर फडशा उडविणें आम्हांला शक्य नाहीं, म्हणून आम्हांला आडवळणांनीं जावें लागतें त्यांतल्या त्यांत मानाजी आंग्रे बराच समंजस माणूस आहे. तो उघड उघड आमच्याशीं दावेदारी मांडावयाला संभाजीइतका निधड्या छातीनें तयार होत नाहीं, म्हणून तो आम्हांला जरा जवळचा. त्या दोघां भावांच्या स्वभावांत जमीनअस्मानाचें अंतर आहे."

" हें मात्र खरें. संभाजीला आपल्या पूर्वजांचा नांवलौकिक व दरारा कायम ठेवून स्वतःची दौलत व मराठशाहीची इभ्रत राखावयाची आहे. 'पेशवे हे मराठशाहीचे उपरे कारभारी आहेत व आपण मराठ्यांच्या गादीचे पुरातनचे सेवक आहोंत; आपण पेशव्यांच्या ताटाखालील मांजर होऊन बसावयाचें नाहीं ! हा जो कान्होजी आंग्र्याचा बाणा, तो संभाजीच्या अंगीं तंतोतंत उतरला आहे. मानाजीचें तसें नाहीं. त्याला आंग्र्यांच्या नांवलौकिकाची चाड नाहीं व मराठशाहीच्या गादीची चाड तर त्याच्याहीपेक्षां नाहीं. आंग्र्यांचें सत्तावैभव आपल्या हातीं येऊन आपली चंगळ उडावी एवढाच मानाजीच्या साऱ्या धडपडीचा भावार्थ आहे."

" वाः ! मेहेरबान ! तुम्ही फार खोल बुद्धीचे दिसतां ! तुमच्यासारखे पराक्रमी व मुत्सद्दी पुरुष सिद्दींच्या सत्तेचे पाठीराखे आहेत, म्हणून तर ती सत्ता आजवर टिकली आहे."

" एकूण कप्तानसाहेबांचेंही आंग्र्यांच्या बाबतींत माझ्यासारखेंच मत आहे तर."

" अगदीं तंतोतंत. यावरून आम्ही मानाजी आंग्र्याला कां पाठीशीं घालतों हें तुम्ही ओळखा."

" पण मानाजी व पेशवे हे आमचे शत्रु आहेत. पेशव्यांच्या फुसलावणीमुळेंच मानाजीनें अंजनवेलींतून माझा उठावा केला; व सागरगड जिंकून तेथें नवी राजधानी स्थापतांना मला त्यांचा पुन्हा कसून विरोध होणार.—आजच होत आहे. यावेळीं तुम्हीं मला मदत केलीच पाहिजे."

" असें पहा मेहेरबान ! आम्ही व्यापारी पेशाचे लोक. सिद्दी काय, पेशवे काय, किंवा आंग्रे काय, सारेच आम्हां व्यापाऱ्यांचे धनी. आम्हांला साऱ्यांचीच गरज आहे. कोणाशींही उघड दावेदारी करून आमचें चालावयाचें नाहीं. पेशव्यांनीं आमच्या गव्हर्नरसाहेबांकडे मानाजीसाठीं शब्द टाकला, तो आम्हांला मानणें भाग पडलें. बरें; आम्हीं मदत केली नसती तरी ते अडून थोडेच बसले असते ! आणि अजूनही आम्हीं मदत केली नाहीं, तरी मानाजी मागें पाऊल थोडेंच घेणार आहे ! त्याला पेशव्यांचें पूर्ण पाठबळ आहे. तुम्ही सागरगड जिंकण्याच्या खटपटींत आहां हें ओळखून त्यानेंही जय्यत तयारी चालविली आहे, व चिमाजीअप्पा प्रचंड फौजेनिशीं त्यांच्या साह्याला यावयाचा आहे."

" काय ? चिमाजीअप्पा यावयाचा आहे ? "

" म्हणजे ? तुम्हांला हें माहीत नाहीं ? "

" नाहीं."

" मग तुमचे बातमीदार झोंपा काढीत असतात कीं काय ? ह्या चारसहा दिवसांत ते कुलाब्याला येऊन पोंचतील."

" तर मग मला गड काबीज करण्याची जलदी केली पाहिजे. मराठ्यांचा गडाला वेढा पडण्यापूर्वीच गडावर निशाण रोंवलें पाहिजे. मेहेरबान ! तें कांहीं नाहीं. तुमची मदत आम्हांला अवश्य व्हावयाला हवी."

इंचबर्डसाहेबाला हा मोठाच पेंच पडला. कारण त्यानें मुंबईहून निघण्यापूर्वीच मानाजीच्या मदतीसाठीं युद्धसामग्रीनें सज्ज असें एक मोठें आरमारी जहाज कॅ. होल्डन् यांच्या नेतृत्वाखालीं कुलाब्याला रवाना केलें होतें. रामाजी महादेवाच्या मध्यस्थीनें ही तरतूद झाली होती. पण सिद्दी साताला त्याची दाद नाहीं अशी इंचबर्डसाहेबाची खात्री असल्यानें त्यानें भावी हिताकडे नजर देऊन साखरघोळ भाषेंत सिद्दी सातार्चें समाधान केलें " हें पहा, मी कसा झालों तरी कंपनी-सरकारचा नोकर, केल्या हुकुमाचा ताबेदार. तुम्हो पाहिजे तर असें करा, आमच्या गव्हर्नरसाहेबांना भेटून त्यांच्याशीं वाटाघाट करून काय तें ठरवा. पाहिजे तर मींही परत मुंबईला गेल्यावर तुमच्या वतीनें गव्हर्नरसाहेबांपाशीं खटपट करीन."

" तुमची खटपट अवश्य पाहिजे. कोंकणांतल्या राजकारणांत मेहेरबान गव्हर्नर-साहेब बहादुरांचा तुमच्यावर सर्वस्वी विश्वास आहे. तेथें तुम्ही म्हणाल ती पूर्वदिशा ठरत असते. तुम्ही तेथें येऊन माझ्या वतीनें खटपट केलीच पाहिजे. आंग्र्यांचा

नायनाट होण्यांत जसें आमचें हित आहे तसें कंपनीसरकारचेंही हित आहे. कबूल ?"

"कबूल—" इंचबर्डसाहेब म्हणाला. तो देखील आतां ह्या कंटाळवाण्या वाटा-घाटीला अगदीं कंटाळला होता. सिद्दी सातानें त्याला अर्ध्यामार्गांत गांठून मुद्दाम वाटाघाट करण्यासाठीं चांबुरजीवर बोलावून आणलें, तेव्हांच त्यानें ह्या वाटाघाटीचें स्वरूप अजमावलें होतें. तूर्त सिद्दीच्या सोई गैरसोयी ध्यानीं न घेतां संभाजीविरुद्ध मानाजीला साह्य करून दोघांनाही मरेतों झुंजवावयाचें, हें मुंबईकर इंग्रजांचें धोरण आगाऊच ठरलें असून त्याची अंमलबजावणीही सुरू झाली होती. यामुळें सिद्दी साताशीं जी वाटाघाट करावयाची ती तत्त्वतः शून्यार्थाची करावयाची; पण सिद्दी सात लाचार होऊन त्या शून्याच्या मागें धापा टाकीत धावूं लागेल अशीही खबरदारी घ्यावयाची; असें आगाऊ ठरवूनच इंचबर्डसाहेब वाटाघाटीला बसला होता. त्यामुळें हा काथ्याकूट एकदांचा संपलेला पाहून त्याला हायसें वाटलें.

"बरें तर; आतां मी कप्तानसाहेबांची रजा घेतों." सिद्दी सात झोंपेला आलेले डोळे चोळीत अंगाला आळोखे पिळोखे देत म्हणाला.

"हो ! हो ! जरूर !" इंचबर्डसाहेब म्हणाला. इतक्यांत त्याला वाटलें कीं, जातां जातां ह्या उल्लू बुढ्याला आणखी बुचाडतां आलें तर पहावें. जवळच छाती-इतके उंच अत्तराचे सुवर्णदीप तेवत होते व त्यांचा सुगंध वातावरणांत दरवळत होता. उदबत्त्या लावण्याचीं सुवर्णाचीं दोन रत्नखचित झाडें पेटत्या उदबत्त्यांनीं फुललेलीं दोन बाजूंना दोन होतीं. ह्या चार बहुमोल वस्तु केव्हांपासून इंचबर्ड-साहेबाच्या डोळ्यांत सलत होत्या. सुवर्णाची रत्नखचित पालखी आपणाला आवडते असें म्हणतांच सिद्दी सातानें ती त्याला बहाल केली होती. त्यावरून ह्या बहुमोल वस्तु देखील आपणाला उपटतां आल्या तर बऱ्या; असें इंचबर्डसाहेबाच्या तोंडाला पाणी सुटलें होतें. हीच वेळ त्या वस्तू मिळविण्याची आहे असें ओळखून तो सिद्दी साताला म्हणाला, "मेहेरबान ! हे सुंदर रत्नदीप, हीं आश्चर्यकारक झाडें, असल्या वस्तु आमच्या गव्हर्नरसाहेबांना फार आवडतात. ते फार शोकी आहेत. तुमच्यावर त्यांचा फार लोभ आहे. मला देखील तुम्हीं दिलेली पालखी किती आवडली म्हणून सांगूं ! तुमच्या ह्या मित्रऋणांतून अंशतः उतराई व्हावें म्हणून मीही अशीच एक अमोल देणगी तुम्हांला देतों. असें म्हणून त्यानें

ची देणगी काढण्यासाठीं खिशांत हात घातला, व आपलें चांदीचें घड्याळ काढून तें सिद्दी साताच्या हातीं दिलें.

" हें काय ? " सिद्दी सातानें स्मितपूर्वक त्या घड्याळाकडे पहात विचारलें. इतक्यांत त्या घड्याळाचा टिक् टिक् असा आवाज होऊं लागला. त्याबरोबर त्यानें तें कानाशीं नेलें व जास्तच विस्मयचकित होऊन आ पसरून हंसत म्हटलें. " अरे वा ! ही तर कांहीं अजब चीज आहे ! "

" याला घड्याळ म्हणतात." इंचबर्डसाहेब म्हणाला.

" आणि हें बोलतें ! " सिद्दी सातानें तें घड्याळ पुन्हा कानाशीं लावून म्हटलें, " याच्या आंत काय आहे ? "

" आंत यंत्रें आहेत. थांबा, मी तुम्हांला तीं दाखवितों." असें म्हणून इंचबर्डसाहेबानें तें घड्याळ आपल्या हातीं घेऊन उघडून सिद्दी साताला आंतील यंत्ररचना दाखविली.

" अरे बापरे ! " सिद्दी सात तोंडावर हात ठेवून म्हणाला, " असलीं यंत्रें तुम्ही इंग्रज लोक तयार करतां ? कमाल आहे तुमची ! इतकीं लहान लहान यंत्रें ह्या एका यंत्रांत भरलेलीं आहेत कीं, हीं तुम्ही कशीं तयार करतां याचेंच मला नवल वाटतें. अशीं यंत्रें तयार करावयाला लाखों रुपये खर्च होत असतील नाहीं ? "

" तर ! " इंचबर्डसाहेबानें सिद्दी साताचा मूढपणा पाहून लोणकढी थाप ठोकून दिली, " लाखों रुपये खर्चून देखील नुक्तीं कुठें हीं घड्याळें होऊं लागलीं आहेत. आजला साऱ्या विलायतेंत अशीं दहा पांच घड्याळें असताल."

" अर्थात् तीं राजे आणि अमीर उमराव ह्या लोकांशिवाय कोणापाशीं नसतील ? "

" नाहींतच. मला तरी हें मिळालें म्हणजे काय, माझ्या हिंदुस्थानांतील कामगिरीवर खूष होऊन प्रत्यक्ष राजानें मला हें स्वतःचें घड्याळ देऊन माझा गौरव केला."

" शाबास ! ही अमोल चीज आहे खरी. याचें काय करावयाचें ? "

" हें वेळ पहावयाचें साधन आहे."

" यांत वेळ कशी पहावयाची ? " सिद्दी सातानें आंतील यंत्राकडे पहात

म्हटलें, " यांत तर यंत्राशिवाय कांहीं दिसत नाहीं, व टिक् टिक् आवाजाशिवाय कांहीं ऐकूं येत नाहीं."

इंचबर्डसाहेबानें तें घड्याळ आपल्या हातीं घेऊन बंद केलें, व त्याची तबकडी सिद्दी साताला दाखवून वेळ कसा पहावयाचा याची त्याला थोडा वेळ समजूत दिली. इतक्या लौकर त्या रोमन आंकड्यांची ओळख पटून घड्याळ कसें पहावें हे त्याला नीट समजणें शक्यच नव्हतें. पण आपली साहेबाबरोबर फजिती होऊं नये म्हणून इंचबर्डसाहेबानें सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीला होकारार्थी मान हलवून त्यानें कशीबशी वेळ मारून नेली. मात्र ही अपूर्व बहुमोल चीज इंचबर्डसाहेबानें आपल्याला दिल्याबद्दल त्याला इतका आपला आदर झालासा वाटला कीं त्या आनंदाच्या भरांत त्यानें ते रत्नदीप व तीं उदबत्तीचीं झाडें गव्हर्नरसाहेबांना देण्यासाठीं म्हणून इंचबर्डसाहेबाला देणगीदाखल देऊन टाकलीं. इंचबर्डसाहेबानें कोरड्या साखरघोळ शब्दांनीं त्याचे आभार मानून परतवाण फेडलें.

" आतां कप्तानसाहेब ! तुम्ही मजेंत आराम करा." असें म्हणून सिद्दी सातानें बाहेर जावयाला उठतां उठतां दरवाजाकडे वळून काफूरला हांक मारली. हांक ऐकतांच काफूर तेथें हजर झाला व शिरस्त्याप्रमाणें कुर्निसात करून अदबीनें उभा राहिला.

" काफूर ! खालीं जा, व मीं सांगितल्याप्रमाणें साहेबांच्या आरामाची तयारी झाली आहे किंवा नाहीं तें दासीला विचारून ये."

काफूर हुकुमाप्रमाणें खालीं जाऊन चौकशी करून आला व म्हणाला, " मालिक सर्व तयारी आहे असें दासीनें सांगितलें आहे."

" ठीक आहे. तूं आतां खालीं जा." असें म्हणून सिद्दी सातानें काफूरला निरोप दिला, व पुन्हा एकवार इंचबर्डसाहेबाला खुषींत आराम करावयाला सांगून सकाळीं त्याला जहाजावर पोंचविण्यासाठीं लौकरच येऊन भेटण्याचें कबूल करून त्यानें त्याचा निरोप घेतला.

सिद्दी साताच्या सांकेतिक भाषेंतील पाशवी अर्थ तेव्हांच इंचबर्डसाहेबाच्या ध्यानीं आला. त्याबरोबर त्याला विषादही वाटला व रागही आला. त्या रागासरशीं त्यानें सिद्दी साताला दहापांच इंग्रजी शिव्याही हांसडल्या. इतक्यांत त्याच्या शयनमंदिराचा दरवाजा हळुहळू उघडला जाऊं लागला व त्या आघातामुळें दरवाजावरचा भरजरी मखमालीचा पडदा हलूं लागला. पण इंचबर्डसाहेबाचें तिकडे लक्ष्य

नव्हतें. तो स्वतःशीं पुटपुटत होता, "असलें पाशवी कृत्य करून मी माझ्या देशाची अपकीर्ति कधींच होऊं देणार नाहीं. मला माझें व माझ्या देशाचें कीर्ति-वैभव वाढवावयाचें आहे. ईश्वरानें ह्या सुवर्णभूमींत आम्हांला वैभवशाली होण्या-साठींच पाठविलें आहे. पण येथील रयतेचे शिव्याशाप घेऊन आम्ही कधींच वैभव-शाली होणार नाहीं. मुसलमान तेवढा पशुवत् अत्याचारी असतो असा जो मुसल-मानांचा ह्या हिंदुस्थानांत सर्वत्र दुर्लौकिक झाला आहे, त्याला कारण सिद्दीसाता-सारख्यांचे अमानुष अत्याचार होत. अशी अपकीर्ति मला माझी व माझ्या देशबांध-वांची व्हावयाला नको आहे. इंग्रज तेवढा अत्यंत सज्जन, अत्यंत नीतिमान् व अत्यंत कनवाळू असतो, अशीच आमच्या येथील वर्तनावरून हिंदुस्थानांतील सर्व लोकां-ची खात्री झाली पाहिजे; आणि इंग्रजांसारख्या न्यायी देवमाणसांचें राज्य आमच्या-वर सुरू होवो अशी येथल्या सर्व रयतेनें एकमुखानें प्रभूपाशीं मागणी केली पाहिजे."

असे पवित्र विचार मनांत घोळवीत इंचबर्डसाहेब शयनमंदिराच्या दरवाजाकडे पाठ असलेल्या तेथल्या एका कोचावर बसला होता इतक्यांत त्याची दृष्टि समोर-च्या भव्य आरशाकडे वळली. आरशांत शयनमंदिराच्या दरवाजाचें स्पष्ट प्रतिबिम्ब उमटलें होतें. त्याची दृष्टि आरशाकडे वळावयाला व दरवाजावरील मखमलीचा जरतारी पडदा हळुहळू दूर सरकूं लागावयाला एक गांठ पडली. इंचबर्डसाहेबाला वाटलें कीं, आपणाला सिद्दी सातानें बहाल केलेली ती कोणी सुंदर तरुणी अथवा ती दासी यांपैकीं कोणीतरी पडदा दूर सरकविला. आतां आपण त्या स्त्रीशीं काय बोलावें ह्या विचारानें क्षणभर इंचबर्डसाहेब गोंधळून जातो, तोंच त्या महालाचा एकच मुख्य दरवाजा धाड्कन् लावला गेला.

दरवाजा बाहेरून लागला गेला असें पाहतांच इंचबर्डसाहेबाला संशय आला. तो लगेच उठून दरवाजापाशीं गेला व दरवाजा ठोठावूं लागला, तों तो बाहेरून लावून बंद करण्यांत आला आहे असें त्याला आढळून आलें. इंचबर्डसाहेबाचा संशय दुणावत चालला. त्यानें काफूरला एक दोन हांका मारून पाहिल्या पण काफूर कांहीं ओ देईना. हा काय प्रकार आहे अशा बुचकळ्यांत पडून इंचबर्ड-साहेब दरवाजांतच आश्चर्यपूर्वक हनुवटीला हात लावून मागें वळतो, तोंच त्याच्या शयनमंदिराचाही दरवाजा लागल्याचा भास झाला. खरें खोटें पहाण्यासाठीं तो त्या दरवाजापाशीं येऊन दरवाजावरचा पडदा दूर लोटून पहातो तों तोही दरवाजा आंतून बंद!

प्रकरण चवदावें

# नानाजी

आतां आपण एकवार नानाजीची हालहवाल पाहूं. त्या भयाण रात्रीं त्या भयाण जागीं नानाजी एकटाच शून्य चित्तानें किंकर्तव्यमूढ होऊन उभा होता. आकाशांत अभ्रें दाटल्यामुळें चांदण्याचा अभाव व सभोवार तरुछाया पसरलेली असल्यामुळें जिकडे तिकडे दाटलेला अंधारी अंधार, अशा भयानक स्थितींत त्याला जरी चर्मचक्षूंनीं पाऊलवाटही धड दिसत नव्हती, तरी त्याच्या कल्पनाचक्षूसमोर त्याला फार दूरवरचे देखावे काल्पनिक परिणामांत प्रतिबिम्बित झालेले स्पष्ट दिसत होते. अर्थात् तीं प्रतिबिंबें वस्तुस्थितीचीं दर्शक असण्यापेक्षां स्वतः नानाजीच्या कल्पनेचींच प्रतिबिंबें असणें व त्यांनीं नानाजीची थोडीफार दिशाभूल होणें बरेंच संभवनीय होतें, हें सांगावयाला नकोच. 'सगनजी व सिद्दी सात हे दुखवलेले सर्प जिवंत सुटले असतील काय? तो बैरागी त्या चांडाळांच्या हातून सुटला असेल का? कीं कैद झाला असेल? कीं तो रणकंदनांत ठार झाला असेल?' असे प्रश्न सकृद्दर्शनीं त्याच्या अंतःकरणांत उत्पन्न झाले, व त्यांचीं उत्तरें त्याला निराशात्मकच मिळालीं. भवानजीचें काय झालें असेल हा प्रश्नच त्याच्या अंतःकरणांत उत्पन्न झाला नाहीं याचें कारण भवानजी ठार झाला अशीच त्याची 'चक्षुर्वैसत्यं' कल्पना होऊन बसली होती. त्याबद्दल हळहळण्यापेक्षां आपल्या हातीं कांहीं देखील नाहीं असेंच तो स्वतःशीं म्हणत होता.

सबंध दिवस पोटांत अन्नाचा कण गेला नसल्यामुळें भुकेनें प्राण व्याकूळ झालेले, तशांत आणखी नुक्ताच दगडांचा मार बसल्यामुळें त्या वेदनांचे विंचू एकसारखे डसतच आहेत; आणि इतकेंही करून ह्या आपत्तींचा अंत होण्याचें कांहीं लक्षण नानाजीला दिसेना. नुक्ताच परिचय झालेल्या भाऊराव पिसाळाच्या आधारानें त्याला गोळाभर अन्न मिळून पोटांतील 'खा-खा'ची आग शमवितां येऊन घटकाभर डोकें टेंकावयाला जागा मिळाली असती, व त्याच्याच साहाय्यानें पुढचा पल्ला गांठतां आला असता. पण भाऊराव अगोदरच कोठें निघून गेला असल्यानें व त्याच्या घराचा ठावठिकाणा नक्की माहीत नसल्यानें तीही आशा करावयाला नानाजीला जागा नव्हती. त्यामुळें आतां काय करावें, कोठें जावें

ह्या दुर्गम चिंतेची टांगणी एकसारखी त्याच्या जिवाला लागून राहिली होती. शरीर आणि मन हीं दोन्ही एकदम घायाळ झाल्यामुळें व 'पुढें काय' हें कांहींच सुचेनासें झाल्यामुळें तो तेथें जो दगड त्याच्या मस्तकावर कोसळून त्याला इतका वेळ बेशुद्ध करण्याला कारण झाला होता, त्याच दगडावर बसून शून्य चित्तानें कपाळाला हात लावून 'आतां मी काय करूं ! कोठें जाऊं ! मार्ग कोठें आहे !' याचा विचार करूं लागला. तो परिस्थितीला भ्याला होता अशांतली गोष्ट नाहीं, भय मूळपासूनच त्याच्या गांवीं नव्हतें. कर्तव्याची तळमळ त्याच्या मनाला एकसारखी लागून राहिली होती, व मायदेशाचें मंगल हीच आपली इतिकर्तव्यता होय असेंही त्याला मनापासून वाटत होतें. मायदेशासाठीं मरण्याला देखील तो तयार होता; पण मायदेशासाठीं मरावयाचें झालें, तरी त्यासाठीं देखील कार्य-कारणभावानें आंखून दिलेल्या स्थल-काल-परिस्थितीचा विचार करणें अवश्य असतें. मनानें मरणाची तयारी झाली म्हणजे चिंता-भय-दुःखाची मार्गांतील अडचण कमी झाली इतकेंच. पण काय करून मरावयाचें हा प्रश्न शिल्लक राहिलाच. त्याचा निर्णय करतां करतां पूर्वरात्रीं त्यानें वादळांतून वाचविलेल्या मुलीची कल्पनामूर्ति अकस्मात् त्याच्यासमोर येऊन आर्तस्वरानें त्याला विचारूं लागली, "तेजस्वी तरुणा ! माझी—एका धर्मभगिनीची अब्रू जर तुला राखतां आली नाहीं, तर तूं मायदेशाची अब्रू कशी राखणार ?"

हा सारा अर्थात् नानाजीच्या कल्पनेचा खेळ; त्याच्याशीं बोलली ती कल्पनेची तरुणी बोलली. खरोखरीची तरुणी किल्लेदाराच्या हुकुमाप्रमाणें पूर्वींच किल्ल्यावर जाऊन डांबून पडलेली वाचकांना माहीत आहेच. पण अशा आणीबाणीच्या वेळीं देखील नानाजीला ती तरुणी कां आठवली, ह्या गूढाचा उलगडा होण्यासाठीं येथें नानाजीच्या आयुष्याचें सिंहावलोकन करणें अवश्य आहे.

मानाजी आंग्र्यांच्या कुटिल कारस्थानानें प्रथम यशोदेचा—नानाजीच्या आईचा बळी कां व कसा घेतला हें वाचकांना प्रारंभींच माहीत झालें आहे. त्याप्रमाणेंच नानाजीला आपल्या सावत्र आईच्या—गजरेच्या जाचामुळें कसें परागंदा व्हावें लागलें, हा वृत्तान्तही वाचकांना आठवत असेलच. 'सुटले केंस पाठीला शरण जावयाचें' या न्यायानें नानाजी जो आपल्या बापाच्या कृपाछत्राखालून बाहेर पडून वणवण हिंडत निघाला, तो प्रथम हिंडत हिंडत आपल्या आईचा शोध करीत कुसगांव येथें आपल्या आजोळीं गेला. पण तेथेंही त्याला आई भेटली

नाहीं. कोणी म्हणत, ती इकडे आलीच नाहीं; कोणी म्हणत, ती मेली; व कोणी म्हणत, ती मानाजी आंग्र्यांच्या जनानखान्यांत आहे. ती इकडे आलीच नाहीं, व मेली ह्या दोन्ही वार्ता तिच्या माहेरीं पिकल्या होत्या; किंवा पिकाविण्यांत आल्या होत्या. जग तरी खऱ्याखोटयाची परीक्षा इतकी कसून कशाला करील? आतां, यशोदेच्या माहेरचीं माणसें तिला जगांतील इतर माणसांपेक्षां जवळचीं खरीं; पण एकवार मानाजीच्या कारस्थानांमुळें यशोदेच्या वर्तनाविषयींचा बोभाटा झाला, प्रत्यक्ष नवऱ्यानें तिला टाकून दिल्यामुळें त्या बोभाट्याला सत्यता प्राप्त झाली, व त्यामुळें अर्थातच यशोदा तिच्या माहेरच्या माणसांना जिवंत असूनही मेल्यासारखी वाटूं लागली; व तिच्या मृत्यूची बातमी पसरवून आपल्या घराण्याच्या बेअब्रूवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न तिच्या माहेरची सर्व मंडळी करूं लागली. त्याच अभागी स्त्रीचा पुत्र नानाजी; अर्थात् जो डाग त्याच्या आईच्या चारित्र्याला लागला; तोच डाग त्याच्या चारित्र्यावर जन्मवेळेपासून उमटलेला प्रत्येकाला दिसूं लागला. त्यांतल्या त्यांत त्याचा मामा त्रिंकाजी नाईक यानें एकच केलें;—नानाजीला रायगडाच्या पायथ्याशीं असलेल्या पाचाडगांवीं गुराख्याचें काम मिळवून दिलें. कालांतरानें रायगडाची ग्रहदशा संपली व पेशव्यांनीं प्रतिनिधि वगैरे इतर सरदारांच्या साह्यानें तो किल्ला सिद्दीपासून जिंकून पश्चिमदिग्विजयाची मुहूर्तमेढ रोंवली, तेव्हां नानाजीचाही भाग्योदय झाला. पेशव्यांचें सैन्य उघड्या रस्त्यानें गडावर जाण्याची मुळींच सोय नव्हती; सर्व रस्ते शत्रुसैन्यानें अडविले होते; अशा वेळीं बाजीराव पेशवे वेषांतरानें गडावर जाण्याच्या एखाद्या मार्गाची टेहळणी करीत असतां त्यांना हा पोरगेला गुराखी गडाच्या माचीवर गुरें वळतांना आढळला. तो तोंडानें शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकाचा पोवाडा गात होता. इतक्यांत एक मुसलमान पोरगा तेथें येऊन त्याला शिवाजीमहाराजांची स्तुति केल्यामुळें अद्वातद्वा बोलूं लागला, त्याबरोबर नानाजीनें दुसरें तिसरें कांहीं केलें नाहीं, त्या पोरग्याला जवळच्या कड्यावरून खालीं लोटून दिलें.

बाजिरावांनीं तें पाहिलें. त्यांना नानाजीचा हा जाज्वल्य स्वाभिमान पाहून परम संतोष झाला. त्यांनीं त्याला जवळ बोलावून त्याचें नांवगांव वगैरे पुसलें, तेव्हां त्यांना त्याची ओळख पटण्याला वेळ लागला नाहीं. थळच्या किल्ल्यावरून खाशाब्रा सुर्व्यांचा आंग्र्यांकडून उठावा झाल्यावर खाशाब्रा साताऱ्याला शाहूमहाराजांपाशीं दाद मागण्यासाठीं गेला होता, व शाहूमहाराजांनीं पेशव्यांना

सांगून त्यांच्यामार्फत खाशाबाला पुन्हा आंग्र्यांच्या पदरीं आश्रय मिळवून दिला होता. त्याच खाशाबाचा हा पुत्र असें कळतांच बाजिरावांना त्याच्या विषयीं आपुलकी वाटूं लागली. त्यांनीं त्याची कहाणी ऐकून घेऊन त्याला आपल्या पदरीं आश्रय देण्याचें व जरूर तर आंग्र्यांपाशीं त्याची शिफारस करण्याचें कबूल करून गडावर जाण्याच्या चोरवाटा समजावून घेण्याच्या कामीं त्याची मदत मागितली. नानाजीनें आनंदानें त्यांना साह्य करण्याचें कबूल केलें, व कबूल केल्याप्रमाणें केलेंही. तो नुसतें वाटाड्याचें काम करूनच थांबला नाहीं, मराठे व सिद्दी यांची गडावर खडाजंगीची लढाई सुरू झाली तेव्हां एका अत्यंत महत्त्वाच्या मार्‍याच्या जागीं स्वतः तो निधड्या छातीनें उभा राहून लढला, व त्या लढाईंत एका सिद्दी सरदाराला ठार मारून नंतर जखमी होऊन पडला. तेवढ्या अवकाशांत मराठ्यांच्या सैन्याला गडावर घुसून सर्व नाकेबंदी करावयाला भरपूर अवसर सांपडला. युद्धांत शिपाईप्यादयांचे अमोल प्राण खर्ची पडावे,— शिपाईप्यादयांनीं खंदकांत आपल्या देहांची भर खचून खंदक बुजवावे, व सेनापतीनें त्या खंदकावरून चालून येऊन गडकोटावर विजयध्वज फडकवावा; वळी शिपाई–प्यादयांचे पडावे; पण नांवलौकिक मात्र सेनापतीचा व्हावा; हा जगाचा न्यायच असल्यानें रायगड मराठ्यांनीं जिंकला, त्या वेळच्या विजयी वीरांत नानाजीचें नांव प्रामुख्यानें झळकलें नाहीं ही गोष्ट निराळी. पण बाजिरावांना रायगडावरील विजयाचें मर्म माहीत असल्यानें ते मात्र नानाजीला विसरले नाहींत. त्यांनीं रायगड फत्ते करून परत जातांना नानाजीला आपल्या पदरीं शिलेदारी दिली, व त्या दिवसापासून बाजिरावांच्या अत्यंत विश्वासू खासगी नोकरांत नानाजीची गणना होऊं लागली.

पुढें बाजिरावांना त्याच मोहिमेंत अनेक लहान लहान आरमारी लढाया मारण्याचा प्रसंग आला, तेव्हां नानाजीचा दर्यावर्दीपणाही त्यांच्या चांगलाच प्रत्ययाला आला, व त्यावरून खूष होऊन त्यांनीं त्याला त्याच्या पूर्वजांचें वैभव परत देण्याचें ठरवून त्याच्या हातीं 'थळची किल्लेदारी पूर्वीपासून याचे आजोबा व वडील यांजकडे चालत आली तशीच पुन्हा चालवावी' अशा अर्थाचें पत्र मथुराबाई आंग्रे हिला दिलें. योगायोग असा कीं, नानाजी मथुराबाईच्या मैत्रिणीचा मुलगा निघाला ! तिनें योग्य वेळीं नानाजीला थळची किल्लेदारी देण्याचें तर कबूल केलेंच; पण मानाजी आंग्र्याच्या अत्याचारांनीं त्याच्या सर्वस्वाचें वाटोळें झालें होतें, त्याचीही

भरपाई करून देण्याचें मनावर घेतलें. तिनें मानाजीला आणवून त्याजपाशीं नानाजीचा बाप खाशाबा सुर्वे व आई यशोदा यांच्याविषयीं विचारपूस केली. मानाजीनें कांहींच थांगपत्ता लागूं दिला नाहीं. पण इतरत्र बारकाईनें चौकशी करतां तिला असें कळून आलें कीं, यशोदा परागंदा झाल्यावर लगेच मानाजीनें तिला पकडून आपल्या रंगमहालांत आणलें, व तिला बलात्कारानें भ्रष्ट करण्याचा त्याचा विचार होता; पण त्याची बायको राधिकाबाई हिनें एके दिवशीं त्याची नजर चुकवून तिला तिच्या मुलीसह किल्ल्याबाहेर काढून दिलें. पुढें त्या मायलेंकींचें काय झालें हें मात्र कोणालाच माहीत नव्हतें. त्याप्रमाणेंच खाशाबा सुर्वे याला कोटकामतें येथील किल्लेदारीवरून पदच्युत केल्यावर विजयदुर्गच्या किल्ल्यांत कैद ठेवण्यांत आलें होतें, पण तेथून तो जो युक्तीनें पळाला, त्याचा पुढें मुळींच तपास लागला नाहीं. वस्तुस्थिति अशी होती, पण त्या वास्तवतेवर इतक्या वर्षांत ऐकीव लोकवार्तेचें एवढें दाट रान माजलें होतें कीं, त्या रानांत वास्तवता कोठें दडपून गेली होती याचा पत्ता नव्हता. कोणीं म्हणावें, यशोदा आपन्न स्थितींत चेऊल-रेवदंड्याच्या फिरंग्यांच्या हातीं सांपडून बाटली; कोणीं म्हणावें, तिनें मानाजीच्या सूड घेण्याच्या उत्कट भावनेनें सिद्दी साताचा आश्रय पत्करला; असें कोणीं कांहीं तर कोणीं कांहीं म्हणावें. नानाजी मात्र ह्या विविध लोकवार्ता ऐकून अत्यंत कष्टी होई. तरीही त्यानें आपल्या परीनें आपल्या आई-बहिणींचा शोध लावण्याची शिकस्त चालविली होती. असो.

मथुराबाईच्या पदरीं आल्यावर नानाजीचें हितच झालें. तिनें सखोजीला सांगून त्याच्याकरवीं नानाजीला प्रथम एका आरमारी काफिल्याची तांडेली देवविली. सिद्दी व आंग्रे यांचें भांडण तेव्हां ऐन रंगांत आलें होतें, अशा वेळीं सखोजीला सिद्दीशीं झगडण्याच्या कामीं नानाजीचा चांगलाच उपयोग होऊं लागला. प्रथम बाजीराव पेशवे मोहीम अर्धीमुर्धी आटोपून साताऱ्याला गेले, व शाहूमहाराजांच्या आज्ञेवरून सिद्दीचें पारिपत्य करण्यासाठीं उदाजी पवार, बाजी भीवराव, राजाज्ञा, शेखमिरा वगैरे मंडळी कोंकणांत आली. तेव्हां सखोजी आंग्र्यांच्या वतीनें नानाजीनें त्या मंडळीला अमोल साह्य केलें. महाड, बाणकोट वगैरे स्थळें तेव्हां मराठ्यांनीं हस्तगत केलीं व सिद्दी वंशांतील एक प्रबळ शत्रु सिद्दी अंबर अफवानी याला ठार मारलें. त्या पराक्रमांत नानाजीचा बराच मोठा वांटा होता.

अशा धडाडीनें नानाजी अल्पावधींत एकसारखा पुढे येऊं लागल्यावर त्याला त्याच्या अपेक्षेप्रमाणें थळची किल्लेदारी मिळणें मुळींच अवघड नव्हतें. नानाजीला तरी थळचीच किल्लेदारी पाहिजे होती. याचें कारण, त्याच्या पूर्वजांना गांजून राखेंत बसविणाऱ्या शत्रूंचें वास्तव्य थळच्या चौबुरुजीवर किंवा आसपास होतें; व त्यांचा निःपात केल्याशिवाय त्याला समाधान वाटणें शक्य नव्हतें. वडिलार्जित दौलत जर नानाजीला कांहीं मिळाली असेल, तर ती एवढीच कीं, ज्यांनीं शत्रूशीं फितूर होऊन आपला नाश केला, त्यांचा नाश करावयाचा व सर्वांच्या नाकावर टिचवून तेथलें वैभव पुन्हा उपभोगावयाचें ही ईर्षा ! पण येथेंही पुन्हा नानाजीचें दुर्दैव त्याच्या मार्गांत आडवें आलें. सिद्दी व मराठे यांचा झगडा लागलेला पाहून मुंबईकर इंग्रजांनीं सिद्दीच्या साह्यानें उंदेरी किल्ला घशात टाकण्याच्या इराद्यानें इंचबर्ड साहेबावरोबर 'मेरी' नांवाचें मोठें लढाऊ जहाज रवाना केलें; तेव्हां इंग्रजांशीं तोंड देण्यासाठीं सखोजीनें आपल्या वतीनें नानाजीला आरमार घेऊन खांदेरीवरील मराठ्यांच्या मदतीला पाठविलें. मराठ्यांनीं खांदेरीवरून खुष्कीनें व नानाजीनें जलमार्गानें इंग्रज व सिद्दीपाशीं लढण्याची शिकस्त केली. पण उंदेरीच्या किल्लेदाराचा कोणी एक नवा नोकर सिद्दी साताला फितूर झाला. त्यानें सिद्दी साताला किल्ल्याचा अचूक भेद देऊन किल्ल्यांत शत्रूचा प्रवेश होऊं दिला. कॅप्टन इंचबर्ड यानें सिद्दी साताशीं कांहीं कारस्थान करून मराठ्यांविरुद्ध सिद्दींना हरतऱ्हेनें मदत करण्याचें कबूल करून उंदेरीचा किल्ला इंग्रजांसाठीं मागितला. 'इंग्रज हे कोंकणपट्टी ग्रासावयाला टपून बसले आहेत. त्यांची सत्ता उंदेरीसारख्या नाक्याच्या जागीं जोरावल्यास ती दोघांनाही जाचक होईल. यास्तव हा किल्ला आमच्या स्वाधीन करा, आम्ही त्याचा योग्य तो मोबदला तुम्हांला द्यावयाला तयार आहों' असें सखोजी आंग्रे, नानाजी वगैरेंनीं सिद्दी सातापाशीं त्यांच्यांतलाच प्रबळ सरदार शेख याकूब याच्या मार्फत बोलणें लावून पाहिलें. त्यासाठीं शेखजीच्या भावाला सुलतानजीला पूर्वी कबूल केल्याप्रमाणें रायगडची किल्लेदारी देण्याचें व इतर अटीही पुऱ्या करण्याचें कबूल केलें; व शेखजी आणि सुलतान यांनीं साक्षात्कारीं प्रथम त्या योजनेला होकारही दिला. पण इंग्रजांच्या चिथावणीनें व मराठमंडळांतील फुटीमुळें सिद्दी आधींच शेफारून गेले होते; तशांत पेशव्यांनीं शेखजीशीं यशवंत महादेव पोतनीस यांच्यामार्फत केलेला करार यथावत् न

पाळल्यामुळें शेखजी आणि सुलतानजी हे दोघेही भाऊ विरमले होते. त्यांना मराठ्यांचा विश्वास वाटेना.†

इतकेंही करून कदाचित् सिद्दीपासून उंदेरीचा किल्ला मराठ्यांना मिळाला असता. सिद्दींच्या वतीनें मराठ्यांशीं भांडणारा सुलतानजी एका अटीवर तो किल्ला मराठ्यांच्या स्वाधीन करण्याला अंतस्थ रीतीनें तयार झाला होता; पण ती अट मराठ्यांना मानवते किंवा नाहीं, ह्या गोष्टीचा निर्णय लागण्यापूर्वींच नानाजीकडून व्यक्तिशः ती अट मोडली गेली, व त्यामुळें सर्व पारडें एकदम फिरलें.

ती बाब वर वर पाहूं गेल्यास किती क्षुल्लक होती! पण वर वर क्षुल्लक दिसणाऱ्या बाबीही कधीं कधीं अत्यंत अनर्थकारक ठरतात. अग्नीची एकच क्षुल्लकशी ठिणगी; पण ती त्रिखंडालादेखील वणवा लावूं शकते! उंदेरीच्या मराठा किल्लेदाराच्या पदरीं एक नक्षत्रासारखी देखणी व विद्युल्लतेप्रमाणें चपल अशी पंधरा वर्षांची एक मुलगी होती. सुलतानजीला ती बातमी कळतांच त्याचें तिच्यावर मन बसलें, व त्यानें तिला मागणी घातली. ती मागणी ऐकून किल्लेदाराच्या हृदयावर जणुं वज्राघात झाला. पोटीं संतान नाहीं, म्हणून किल्लेदारानें ती एक अनाथ मुलगी पाळून आजवर लहानची मोठी केली होती. उंदेरीची किल्लेदारी मिळण्यापूर्वीं तो आंग्र्यां-

† शाहूमहाराजांच्या वतीनें यशवंत महादेव यानें जंजिरेकरांचा पाडाव करण्याचें कारस्थान केलें. तेव्हां शेख याकूब या नांवाचा हबशीचा एक पराक्रमी सरदार मूळचा कोळी असून बाटून मुसलमान झाला होता; तो शेखजी या नांवानें प्रसिद्ध असून हबशांच्या राज्यांत त्याचें चांगलें वजन होतें. त्याला प्रथम वश करून घेतलें. मराठ्यांच्या सर्व आरमाराचें आधिपत्य, हबशांच्या सर्व मुलुखाची सुभेदारी, कित्येक किल्ले व इनाम गांवें, पेणपासून कोल्हापुरापर्यंत तळ कोंकणांतील सरगौंडिपणाचा हक्क इतकें शेखजीला देण्याचें कबूल करून शिवाय त्याच्या भावाला रायगडची किल्लेदारी व फौजेतील लोकांना एक लक्ष रुपये बक्षीस देऊन त्यांना आपल्या राज्यांत सामील करून घ्यावें असें ठरविलें होतें. पण पुढें ह्या अटी मराठ्यांकडून यथावत् पाळल्या गेल्या नाहींत, व शेखजीनेंही मराठ्यांना मनापासून मदत केली नाहीं. खोकरीच्या किल्ल्याची वाट दाखविण्यापलीकडे कांहींच मदत त्यानें मराठ्यांना केली नाहीं. पण त्याची त्याच्या जातींत ह्या फितुरीबद्दल नाचक्की मात्र झाली. (म. रि०, म. वि. १).

त्या १८रीं चेऊल–रेवदंडा येथें पाटीलकी सांभाळून होता. त्याच सुमाराला फिरंग्यांनीं तीं गांवें पादाक्रान्त करून तेथें हिंदूंना बळजबरीनें बाटविण्याचा सपाटा सुरू केला. त्या सत्रांत फिरंग्यांच्या कचाटींतून त्यानें महत्प्रयासानें त्या मुलीला सोडवून घरीं आणून पाळलें होतें. यापूर्वी थोडे दिवस त्याची एकुलती एक लाडकी कन्या प्रभावती मृत्युमुखीं पडली असल्यानें तिची आठवण म्हणून किल्लेदारानें ह्या मुलीचें नांवही प्रभावती असेंच ठेविलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं त्या किल्लेदाराला आंग्र्यांच्या वतीनें सिद्दीशीं लढून पराक्रम गाजविण्याची संधी मिळाली; व कान्होजी आंग्र्यानें त्याला उंदेरीची किल्लेदारी दिली. आपला इतका उत्कर्ष झाला हा प्रभावतीचाच पायगुण होय असें समजून तेव्हांपासून किल्लेदार प्रभावतीवर जास्तच प्रेम करूं लागला होता. लोकांना तर वाटे कीं, ती त्याची औरस मुलगीच आहे; व तोही लोकांना तसेंच सांगे. कान्होजी आंग्र्यांच्या निधनानंतर नोकरीच्या निमित्तानें त्या किल्लेदाराचा सखोजी आंग्र्यांशीं संबंध येऊं लागला. हा सेव्य–सेवकसंबंध उत्पन्न होण्यापूर्वींपासून त्या दोघांचा स्नेह होताच. शिवाय किल्लेदाराची बायकोही आंग्र्यांच्या घराण्यांतील माहेरवाशीण असल्यानें मथुराबाईचाही त्या किल्लेदारावर लोभ होता. तिनें नानाजीला जवळ केलें होतें. सखोजीनें तर त्याला आपला पुत्र मानलें होतें; व संभाजी त्याला आपला परममित्र मानी. नानाजीला प्रभावती द्यावी असा किल्लेदाराचा मानस होता, व त्याला सखोजी आणि मथुराबाई यांची पूर्ण संमति होती. तें लग्न लौकरच व्हावयाचें होतें, तोंच मध्यें हें आकस्मिक संकट ओढवलें.

असो. सुलतानजीनें किल्लेदारापाशीं प्रभावतीची मागणी घातली, ती किल्लेदार चोहोंकडून संकटांत सांपडला आहे अशी संधी पाहूनच घातली; व तो मराठ्यांशीं सख्य करावयाला तयार होता तो तरी ह्या एकाच अटीवर. आपला विश्वासू नोकर दत्ताजीच शत्रूला फितूर झाला होता, हें किल्लेदाराला तरी काय माहीत ! त्यानें दत्ताजीच्या हातीं नानाजीला एक पत्र लिहून प्रभावतीचें रक्षण करण्याला सांगितलें. त्या नीच माणसानें तें पत्र वाचून तसेंच दडपून ठेवलें, व नानाजीला भेटण्याचेही श्रम न घेतां सुलतानजीपाशीं 'नानाजीला प्रभावती देण्याचा किल्लेदाराचा इरादा आहे' एवढी चुगली केली. त्यामुळें सुलतानजी बिथरला, व त्यानें नानाजी आणि किल्लेदार ह्या दोघांनाही धाब्यावर बसवून प्रभावतीला बळजबरीनें पळविण्याचा घाट घातला. वरील प्रकार घडल्यावर दुसऱ्या-

च रात्रीं दत्ताजीच्या साहाय्यानें किल्लेदाराच्या वाड्यावर सुलतानजीचा छापा पडला. पण प्रभावती वाड्यांत नाहीं ! सुलतानजीची कल्पना झाली कीं, किल्लेदार व त्याची बायको ह्या दोघांनीं तिला कोठें दडवून ठेवली असेल. म्हणून त्यानें त्या दोघांचा अमानुष छळ केला अखेर त्या दोघांनाही त्यानें समुद्रांत लोटून दिलें. पण प्रभावतीचा कांहीं शोध लागला नाहीं. आपल्या वाड्यावर छापा पडणार व प्रभावतीला धोका आहे, असें पाहून किल्लेदारानें परस्पर किल्ल्यावरच्या एका चोरवाटेनें तिला गडाखालीं पाठवून दिलें होतें. दत्ताजीला ह्या प्रकाराची कुणकुण असल्यानें तो नानाजीपाशीं तिचा तपास करण्यासाठीं गेला. पण खरोखर पहातां प्रभावती तेथून केव्हां कशी निसटून गेली याची नानाजीलाही दाद नव्हती. मात्र गडावर प्रभावतीच्या शोधाची दंगल चालली असतांना एक उमदा तरुण गडाच्या तटावरून दोराला धरून खालीं उतरला, व दूरवर किनाऱ्याला एक नौका तयार होती त्या नावेकडे जातांना त्यानें नानाजीला निरोप कळविला कीं, " प्रभावती सुखरूपपणें माझ्याबरोबर गडावरून खालीं आली. ती मथुराबाई आईसाहेबांच्या आश्रयाला जात आहे. तुम्ही तिच्याविषयीं मुळींच काळजी करूं नका. आम्ही तुम्हांला कुलाब्यांत मथुराबाई आईसाहेबांकडे भेटूं. मात्र तुम्ही शक्य तों किल्लेदार व त्याची इतर मंडळी यांचें रक्षण करा. सुलतानजीच्या हातून त्यांच्या जिवाला अपाय होण्याचा संभव आहे."

नानाजीनें प्रभावतीच्या रूपगुणांची कीर्ति पूर्वीं ऐकलीच होती. ती आपली भावी वधू आहे ह्या मधुर भावनेनें उचंबळून त्यानें तिच्या संदेशानुसार ताबडतोब किल्लेदार व त्याची मंडळी यांना वांचविण्याची शिकस्त केली; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सुलतानजीनें गडावर घुसून नाकीं ताब्यांत घेतलीं होतीं, व इंग्रजांच्या आरमारानें समुद्रांतून नाकेबंदी केली होती. अशा कडेकोट बंदोबस्तांतून नानाजीचा किल्ल्यावर शिरकाव कसा होणार ?

एवढीशी ठिणगी; पण तिनें येवढा प्रचंड वणवा पेटविला. उंदेरी किल्ला इंग्रजांच्या घशांत जाऊं न देण्याचे मराठ्यांचे प्रयत्न त्या वणव्यांत जळून खाक झाले ! सुलतानजीनें चिडून इंचबर्डसाहेबाच्या साहाय्यानें मराठ्यांच्या आरमाराचा धुव्वा उडविला. गडावरील लोकांना दहशत बसावी आणि प्रभावतीचा शोध लागला तर पहावा ह्या उद्देशानें किल्ल्यांतील शेंकडों रहिवाशांची कत्तल करून त्यांच्या घरादारांची होळी पेटविली. चुगलखोरीमुळें—दत्ताजीच्या चुगलखोरीमुळें—सुलतानजी

ला प्रभावतीच्या बाबतींत नानाजीचा जब्बर संशय आला असल्यानें नानाजीचीही किल्लेदारासारखीच गत करण्याचा त्याचा मानस होता; पण नानाजीच्या आयुष्याची दोरी खबरदार असल्यानें तो त्या प्रळयांतून बचावला. बाकी, तो तरी बचावला कसला ? सिद्दीच्या एका आरमारी काफिल्यानें त्याचें जहाज पकडलें, व व त्याच्या हातापायांत अवजड लोखंडी बेड्या ठोकून त्याला राजपुरीच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें रवाना केलें. त्या दिवसापासून नानाजी सिद्दी साताच्या तुरुंगांत डाम्बला गेला ! प्रभावती हातची निसटली म्हणून खवळलेल्या सुलतानजीला आपल्या बाजूला वळवून घेणें इंचबर्डसाहेबाला फार सोपें गेलें. शिंकें तुटलें व बोक्याची धन झाली. इंचबर्डसाहेबानें सुलतानजीला पुढें मागें खांदेरीचा किल्ला किंवा थळची चौबुरुजी मिळवून देण्याच्या कामीं साहाय्य करण्याचें कबूल करून उंदेरीचा किल्ला मुंबईकर इंग्रजासाठीं मागून घेतला. इतकेंच काय, पण इंग्रजांच्या सत्तेचें द्योतक असें निशाण उंदेरीवर प्रथम उभारण्याचा समारंभ सुलतानजीच्या हस्तेंच पार पाडला ! ह्या सर्व उलाढालींत सर्वस्वीं हिरमुष्टी कोणी झाला असेल तर तो एकटा निमकहराम दत्ताजी ! प्रभावती सुलतानजीला अर्पण करून त्या मोबदल्यांत त्याला जें साध्य करावयाचें होतें, तें प्रभावती हातून निसटल्यामुळें लांबणीवर पडलें. तरीही दत्ताजीनें उमेद सोडली नाहीं. 'प्रभावती जाऊन जाणार कुठें ? ती आंग्र्यांच्या आश्रयाला गेली असेल, ती सप्तपाताळांत दडून बसली असली तरी तेथून तिला ओढून आणून सुलतानजीच्या स्वाधीन करीन, व माझें ध्येय गांठीन' अशा वाढत्या ईर्षेनें दत्ताजी प्रभावतीचा शोध लावण्याच्या कामगिरीवर निघाला.

ह्या गोष्टीला आतां दीडवर्ष लोटलें होतें. इतके दिवस नानाजी राजपुरींत बंदीवान होऊन पडला होता. वास्तविक तो केव्हांच ठार व्हावयाचा. कारण सुलतानजी त्याच्या नाशावर टपलेला होता. तो राजपुरीला कैदेंत आहे असें कळतांच सुलतानजी त्याचा तेथें नायनाट करण्यासाठीं मुद्दाम राजपुरीला गेलाही होता; पण दरम्यान संभाजी आंग्र्यानें अंजनवेलीला वेढा देऊन कहर मांडल्यामुळें तिकडे संभाजीशीं झगडण्यांत सुलतानजी गुंतून पडला. त्यामुळें त्याचा नाइलाज होऊन तो बेत एकदां लांबणीवर पडला तो पडला. तेवढी एक गोष्ट सुलतानजीच्या इच्छेप्रमाणें झाली नाहीं; तरी त्यानें त्याही वेळेचा फायदा घेऊन संभाजी अंजनवेलीला मोर्चे लावून अडकून पडला आहे, व मानाजी कुलाब्यांतून संभाजीचा उठावा

करण्याच्या कामांत गुंतून पडला आहे अशी संधी साधून सिद्दी सात व आपला वडील बाटगा भाऊ शेखजी यांच्यामार्फत मुंबईकर इंग्रजांशीं संधान बांधून त्यांच्या साहाय्यानें थळचा किल्ला आंग्र्यांपासून हिसकावून घेतला तेव्हांच सागरगड पाडाव करण्याचाही त्या मंडळीचा बेत होता; पण तेथल्या किल्लेदारानें योग्य बंदोबस्त राखून किल्ला आपल्या ताब्यांत ठेवला, त्यामुळें नाइलाज झाला. त्यांतूनही आंग्र्यांच्या धांदलीचा फायदा घेऊन गड पाडाव करणें सिद्दी व इंग्रज यांना अगदीं अशक्य झालें असतें असें नाहीं; पण तेथल्या किल्लेदारांचा जांवई सगनजी हा सिद्दी व इंग्रज यांचा फितूर व एक प्रमुख साहाय्यकर्ता असल्यानें त्याच्या मोहबतीखातर तो अतिप्रसंग घडण्याचें टळून गडाचा बचाव झाला इतकेंच.

थळची चौबुरुजी पाडाव झाल्यानंतरही सुलतानाला तेथली किल्लेदारी मिळण्याच्या कामीं एक नवीन अडचण उत्पन्न झाली. बऱ्याच दिवसांपासून सिद्दी साताला एका रक्षेपासून झालेली सुलतान या नांवाची शहाजादी सुलतानजीवर फिदा झाली होती; व सुलतानाचेंही तिच्यावर मन बसलें होतें. हा प्रकार सिद्दी साताच्या नजरेआड झाला होता असें नाहीं; पराक्रमी हिंदूंना बाटवून आपल्या धर्मांत आणण्यासाठीं त्याच्यासभोंवार कनक व कान्ता यांचें मोहजाल पसरण्यांत सिद्दी सात पक्का निढावलेला होता. बरें; सुलतानजीचा वडील भाऊ शेखजी हा यापूर्वीच अशा मोहजालांत सांपडून बाटल्यामुळें व तो सिद्दी साताचा जिगरदोस्त असल्यानें आपल्या एखाद्या दासीकन्येनें शेखजीच्या भावाशीं–सुलतानजीशीं–प्रेमसंबंध जुळविल्यास त्यांत सिद्दी साताला नामुष्की मानण्याचें कांहींच कारण नव्हतें. सुलतानजी प्रथम केवळ शहाजादीसाठीं धर्मांतर करावयाला मनापासून तयार नव्हता. त्या वेळीं त्याचा भर प्रभावतीवर होता; पण प्रभावतीचा कांहीं केल्या थांगपत्ता लागेना. सुलतान तर त्याला तो मुसलमान झाल्याशिवाय वश होईना; व सिद्दी सातानेंही तो मुसलमान झाल्याशिवाय त्याला थळची किल्लेदारी देण्याचें साफ नाकारलें. त्यानंतर सुलतानजीनें तेथली किल्लेदारी मिळविण्यासाठीं व सुलतानेशीं शादी करण्यासाठीं मुसलमानी धर्म कवटाळला, आणि सुलतानजीचा शेख सुलतान झाल्यावर आपल्या त्या मायभूमीवर काय काय अमानुष अत्याचार केले, हें वाचकांना पूर्वीं विदित झालेंच आहे. इतकें झालें तरीही त्यानें प्रभावतीचा अभिलाष सोडला नव्हता, व त्याला खूष करून स्वार्थ साधण्यासाठीं दत्ताजीनेंही तिचा कसून शोध चालविला होता.

पण ज्याप्रमाणें कंसानें सर्व मथुरावासी प्रजेला त्राहि भगवान् करून सोडलें असतां भवितव्यता त्याला नकळत त्याचें भाग्यचक्र निराळ्याच दिशेनें फिरवीत होती,—वसुदेव-देवकीच्या पोटीं कंसाचा नायनाट करणारा भगवान् श्रीकृष्ण अवतरून कंसाच्या पापांचे घडे पूर्ण भरण्याची वाट पहात होता, त्याप्रमाणेंच प्रत्यक्ष सिद्दी साताच्या राजपुरींत सिद्दी सात, सुलतान, शेखजी वगैरे दुरात्म्यांचा नायनाट करण्याची संधि केव्हां मिळते याची वाट पहात नानाजी बंदीवास भोगीत होता; आणि दुरात्म्या कंसाचा संहार करून भूभार हलका करण्यासाठीं अवतरेल्या श्रीकृष्ण भगवानांना ज्याप्रमाणें बंदिशालेच्या कडेकोट दरवाजांपासून यमुनानदीपर्यंत प्रत्येक अचेतन वस्तूनेंही बंदीवासापार होण्याला मार्ग दिला, त्याप्रमाणेंच कांहींसा प्रकार नानाजीच्याही बाबतींत झाला. सिद्दीनें नानाजीला 'बाटून मुसलमान तरी हो, किंवा मरणाला तयार तरी हो' अशी राक्षसी अट घालून छळण्याचा सपाटा चालविला असतां अखेरच्या दिवशीं नानाजी बंदीशालेच्या कडेकोट बंदोबस्ताला झुगारून देऊन राजपुरीपार झाला. इतकेंच काय पण नानाजीनें राजपुरीच्या खाडीवर येऊन तेथें एका आडवशाच्या जागीं सज्ज असलेल्या नावेंत पदार्पण करून नाव हाकारली. तेव्हां समुद्रांत वादळ मी म्हणत होतें, त्यामुळें समुद्रही नानाजीला आपला हाडवैरीसा भासला; पण नानाजीनें त्या संकटांना न डगमगतां बजरंगबलीचें नांव घेऊन व 'हरहर महादेव !' हा मराठ्यांचा रणमंत्र उच्चारून आपली नाव तर हाकारलीच !

त्या रात्रीच्या त्या वादळानें काय काय अनर्थ केला, याचें यथावत् वर्णन करण्याला शब्दसृष्टीचा विस्तार निःसंशय अपुरा पडेल; तरी पण नानाजी त्या अनर्थांतूनही सहीसलामत बचावून अखेर किनाऱ्याला लागलाच. त्यापुढें बजरंगबलीच्या आवारांतील रक्तपात पहातां पहातां अपघातानें बेशुद्ध पडलेला नानाजी भयाण मध्यरात्रीच्या सुमाराला शुद्धीवर येऊन 'पुढें काय' हा विचार करीत एका दगडावर बसला असतां त्याला प्रभावतीची आठवण झाली, व लगेच त्या 'दिलारा' नांवाच्या मुलीची कल्पनामूर्ति त्याच्या अंतश्चक्षूसमोर उभी राहून स्वसंरक्षणासाठीं दीनवाणीनें त्याची करुणा भाकूं लागली. तेव्हां तिच्याविषयीं पहिला शंकित विचार त्याच्या मनांत आला तो हा, 'भर वादळांत काळाच्या जबड्यांतून ज्या मुलीला मीं वांचविले, व जी आतां सुलतानाच्या हातीं सांपडली आहे, ती माझी प्रभावती तर नसेल ?'

प्रकरण पंधरावें

# नानाजींचा मोहनिरास

"खरेंच, ती प्रभावतीच असेल का! जिच्यासाठीं मी आजवर इतक्या हाल-अपेष्टा भोगल्या, तुरुंगवासही पत्करला; जिला भेटण्यासाठीं व आपल्या संसाराची धनीण—आपल्या आयुष्याची भागीदारीण करण्यासाठीं मीं करूं नये त्या उलाढाली करून कैदेपार पडलों; जिच्यापायीं मी माझ्या धन्यांच्या समुद्रावरील सत्तेचा आत्मा असा उंदेरीचा किल्ला गमावून बसलों; व इंग्रजांसारख्या परक्या देशींच्या दर्यावर्दी लोकांना आमच्या काळजांत घर करूं दिलें; तीच ती प्रभावती असेल का?"

"छे! पण ती दिलारा आहे असें तो दत्ताजी म्हणाला. बरें; जिला मीं गेल्या रात्रीं वादळांतून वांचविलें, तिचें नांव तर पुतळा होतें. पण सुलतानाचा व पुतळेचा संबंध काय? आणि पुतळा अशा संकटांत सांपडण्याला आपल्या आईबापांचा आश्रय सोडून कशाला येईल? कुलाब्याच्या लढ्यांत मानाजींची पडती बाजू असती, तर त्याची बायकामुलें देशोधडीला लागून अशीं संकटांत सांपडण्याचा संभव होता. पण आज तर कुलाब्यांत पुतळेचा बाप मानाजी करील ती पूर्वदिशा आहे. शिवाय ती पुतळा असती, तर तिनें त्यावेळींच मला ओळखलें असतें व माझा तिरस्कार केला असता. माझ्याविषयीं तिच्या मनांत सहानुभूति असणें शक्यच नाहीं. कारण मी तिच्या बापाचा हाडवैरी आहे. पण ज्या अर्थी त्या मुलीनें माझ्याविषयीं सहानुभूति दाखविली, त्या अर्थी ती पुतळा खास नव्हे."

"कदाचित् असें तर नसेल? आपल्या पराक्रमी व सत्ताधीश बापाशीं दावेदारी करणारा तरुण अद्वितीय प्रतापशाली व स्वयंप्रकाशी आहे अशी वेडेपणाची कल्पना करून घेऊन तर पुतळा माझ्या नादीं लागली नसेल?—पण छे! कांहीं कांहीं प्रणयी युवतींच्या आयुष्यांत अशी एक आणीबाणीची वेळा येते खरी; पण ती पुतळेच्या आयुष्यांत ती यापूर्वींच येऊन गेली आहे. 'मला तूं पदरांत घेशील का' असें विचारीत पुतळा मागें माझ्यासमोर आली तेव्हां मीं तिला लाथाडली, व तेव्हांच तिनें 'आंग्र्यांच्या वंशांतली ही जहाल नागीण आपली फणा उभारून तुझ्या माथां छाया धरण्यासाठीं आली असतां तूं तिला लाथाडलीस; पण याद राख! ही जातिवत नागीण आहे. तूं सप्तपाताळांत जाऊन दडलास तरी ही तुझी दावेदारीण तेथून

तुला हुडकून काढील व तुझा बळी घेईल' अशी प्रतिज्ञा केली आहे. आणि शिवाय पुतळा माझ्या पूर्ण ओळखीची आहे. मीं थळच्या किनाऱ्याला लागलेली मुलगी पाहिली ती पुतळा खास नव्हे. कदाचित् असें असेल, ती दुसरी कोणी मुलगी वादळांतून बचावून किनाऱ्याला लागली असेल."

" पण मग प्रभावतीची आजवर काय अवस्था झाली असेल ? सिद्दी साताच्या जबड्यांतून माझी मुक्तता होण्याची आशा नाहीं असें पाहून संभाजीबाबा व मथुराबाई आईसाहेब यांनीं कोणामार्फत तरी तिचें अन्य ठिकाणीं लग्न जुळवून दिलें, असें तर नसेल ? तिचें कोणा मुसलमानाशीं लग्न झाल्यामुळें तर 'दिलारा' हें नवें नांव तिला ठेवलें गेलें नसेल ? आणि त्या मुलीबरोबरचा तो दत्ताजी कोण बरें ? मला प्रथम तीं पितापुत्री असावींसें वाटलें. पण तसें खास नाहीं. तो सुलतानाला एका बाजूला घेऊन त्याच्या कानाशीं लागला व खवळलेल्या सुलतानानें लगेच शांत होऊन त्या दोघांची चौबुरजीवर रवानगी करून दिली. यावरून तिथें कांहीं तरी पाणी मुरत असलें पाहिजे खास ! तो त्या मुलीचा हितकर्ताच असेल हेंही संभवत नाहीं. कारण आपल्या मुलीवर दुष्ट किल्लेदाराचा पापी डोळा आहे हें उघड उघड दिसत असतां न चिडणारा व त्याच किल्लेदाराच्या आश्रयाला जाण्याला यत्किंचितदेखील न डरणारा म्हणजे पर्यायानें आपल्या पोटच्या पोरी मुसंड्यांच्या जनानखान्यांत लोटण्याला न शरमणारा नेभळट हिंदू माझ्या स्वाभिमानी मराठ्याच्या जातींत निघेल असें मला मुळींच वाटत नाहीं. बरें; ती मुलगी किल्लेदाराच्या शिपायांबरोबर किल्ल्यावर जावयाला मुळींच खुषी नव्हती. यावरून संशय येतो कीं, ती मुलगी कोणीही असली तरी ती सिद्द्याची छावी आहे, व ती चुकून ह्या जाळ्यांत अडकली असली पाहिजे. अशा धर्मभगिनींना अशा संकटाच्या वेळीं जर आम्ही रक्षिलें नाहीं, तर आम्ही हिंदु कसले ? बस्स ! काय पाहिजे तें झालें तरी तिचें रक्षण मला केलेंच पाहिजे. मग ती कोणीही असो. माझी खरोखरीची बहीण अशा संकटांत सांपडली असती तर मीं काय केलें असतें ? तेंच मला त्या मुलीविषयींही केलें पाहिजे."

त्या रात्रीच्या भयाण वेळीं प्रभावतीची आठवण होतांच नानाजी त्या आठवणीच्या अनुरोधानें वरच्यासारख्या परस्परविरोधी विचारांच्या जाळ्यांत पूर्णपणें गुरफटून गेला होता. एखादी वस्तु प्राप्त करून घेण्यासाठीं आपणाला जितके जास्त परिश्रम पडतात तितकी ती वस्तु आपणाला जास्त प्रिय होते.

याच न्यायानें प्रभावतीची आठवण होतांच नानाजीच्या अंतःकरणांत चिंतेची बोंचणी सुरु झाली. वास्तविक सूर्यास्ताच्या सुमाराला ती मुलगी किनाऱ्यावर उभी असलेली पाहिली व किल्लेदारानें आपल्या शिपायाबरोबर तिची किल्ल्यावर रवानगी करून दिली, तेव्हांच नानाजीच्या हृदयाला धक्का बसून जखम झाली होती. पण तेव्हांपासून ह्या वेळपर्यंत त्याला त्या गोष्टीचा विचार करण्याला एका क्षणाचीही उसंत मिळाली नव्हती. ती उसंत त्याला आतां मिळाली व चिंतेचें ब्रह्माण्ड त्याच्या समोर उभें राहिलें.

प्रभावतीमुळेंच नानाजीवर संकट ओढवलें व तिच्या पायींच उंदेरीचा किल्ला इंग्रजांच्या घशांत उतरला, ही गोष्ट सूर्य-चंद्राइतकी सत्य होती. आजवर नानाजीनें खरोखरच प्रभावतीसाठीं कल्पनातीत साहस केलें होतें. तुरुंगांत देखील त्याचा असा एकही दिवस गेला नाहीं कीं, ज्या दिवशीं त्यानें प्रभावतीची गोड आठवण करून व तिची कल्पनामूर्ति आपल्या अंतश्चक्षूंसमोर उभी करून तिच्या सान्नि-ध्यांत कल्पनेच्या जगांत आपल्या भावी संसाराच्या टोलेजंग हवेल्या बांधल्या नाहींत. हा अर्थात् सारा कल्पनेचाच खेळ होता; ज्या प्रभावतीवर नानाजीच्या भावी सुखसंसाराची सारी मदार होती, त्या प्रभावतीला त्यानें आजवर कधींच प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. अटकेंतून मोकळीक होतांच प्रथम मथुराबाईला जाऊन भेटावयाचें; तिथें आपणांला प्रभावती भेटेलच, मग मथुराबाईच्या आज्ञेबरहुकूम पुढील मार्ग आंखावयाचा, असा नानाजीचा बेत होता. त्या बेतांत 'आतां आपणांला आपल्या भावी सहचारिणीची भेट होईल' ह्या गोड आशेचा जिवंतपणा असल्यानें नानाजी त्या आशेवर विसंबून वादळाचें भय न बाळगतां आपल्या लहानशा नावेंतून खवळलेल्या समुद्राच्या पर्वतप्राय लाटा तुडवीत सागरगडच्या अनुरोधानें निघाला. कारण तेवढ्यांत मानाजीनें कुलाब्यांत अत्याचार चालविले आहेत व मथुराबाई त्या भयानें सागरगडावर निघून गेली आहे अशी बातमी त्याला मिळाली होती, व प्रभावतीही तिच्याबरोबर गेली असेल, असें अंदाजून त्यानें सागरगडावर जावयाचें ठरविलें; पण वादळ जास्तच वाढलें, आकाश काळ्याकुट्ट ढगांनीं पूर्णपणें व्यापून गेलें. त्यामुळें आजूबाजूला कांहींच दिसेनासें झालें. वादळा-च्या प्रळयांत सांपडलेल्या नावांवरील दिवे वाऱ्याच्या सोसाट्यांत पार विझून गेल्यामुळें व शिडेंही तटातट फाटून गेल्यामुळें अनावर झालेल्या व्यापारी किंवा खासगी उताराना नेणाऱ्या नावा कचाकच एकमेकांवर आदळून फुटूं लागल्या,

आरमारी जहाजांचाही असाच चक्काचूर उडूं लागला, त्या अनर्थांत नानाजीची नाव कुलाब्याचा मार्ग चुकून प्रचंड लाटांच्या हेलकाव्यांत कोठें भरकटत जात होती याचा स्वतः नानाजीलाही पत्ता नव्हता. अशा स्थितींत दुसऱ्या एका बुडत्या नावेंतील दोन माणसांना वांचविण्याची संधी नानाजीला मिळाली, तीं दोन माणसें म्हणजेच ती मुलगी व तिच्याबरोबरचा तो दत्ताजी हीं होत. संकटांत सांपडलेलीं तीं दोन माणसें कोण असावीं याविषयीं नानाजीला कांहींच माहीत नव्हतें, व त्यानेंही त्या निर्वाणीच्या वेळीं त्यांची जास्त चौकशी केली नाहीं. तरी पण त्यानें आपला जीव धोक्यांत घालून समुद्रांत उडी मारून त्या दोघांनाही वांचविलें. त्यांना आपल्याच नावेंत त्यानें घेतलें असतें; पण त्याची नाव एक तर तीन माणसांचा आंत समावेश होईल एवढी मोठी नव्हती, व शिवाय ती बरीच खिळखिळी झाल्यामुळें कधीं बुडेल याचा नेम नव्हता. त्यामुळें त्यानें दुसरी एक मोठी नाव जवळून जात होती तिच्यावर त्या दोघांची सोय लावून दिली. त्या वेळीं त्या मुलीचे नानाजींविषयींचे उद्गार इतके जिव्हाळ्याचे होते कीं, जिव्हाळ्याच्या माणसाशिवाय तोंडून तसे उद्गार निघणें शक्यच नव्हतें. त्या मुलीला आपणाविषयीं तेव्हां खरोखर काय वाटत होतें हें समजण्याला नानाजीला कांहींच मार्ग नव्हता. पण तिची ती अत्यंत प्रेमळपणाची वर्तणूक पाहून मात्र नानाजीला क्षणभर वाटलें कीं, संसारांत सोबतीण मिळावी तर अशी जिव्हाळ्याची मिळावी. एक क्षणच कां होईना; पण नानाजीच्या डोळ्यांवर तें मोहपटल आलें. अर्थात् तें अत्यंत विरल असें मोहपटल होतें; दुसऱ्याच क्षणाला नानाजीला त्याच्या आवडत्या प्रभावतीची आठवण होऊन त्या आठवणीच्या धक्क्यानें तें मोहपटल नाश पावलें. 'असला कसला पापी विचार माझ्या डोक्यांत आला ! अशा प्रसंगीं मी माझ्या प्रभावतीला विसरून पावघटकेची देखील ओळख नसलेल्या कोणाच्या कोणा तरुणीचा अभिलाष धरण्याइतका पागल पशु कसा बनलों ?' असा शहाणपणाचा पवित्र विचार तेव्हांच नानाजीच्या मनांत येऊन त्यानें शरमिंदेपणानें खालीं मान घातली. त्याच्या चित्तचांचल्याला पुन्हा उसळी घेण्याला वाव मिळूं नये म्हणूनच कीं काय, पुन्हा एकेक पर्वतप्राय प्रचंड लाटा उसळूं लागल्या व ज्या दुसऱ्या नावेवर नानाजीनें ती मुलगी व तिच्याबरोबरचा तो माणूस यांची सोय लावून दिली होती, त्या नावेवर नानाजीची नाव आदळून त्या नावेपासून दहा वीस हात दूर लोटली गेली. नानाजीनें

पुन्हा त्या नावेच्या अनुरोधानें आपली नाव चालविण्याचा प्रयत्न केला; पण तो नीटसा साधला नाहीं. आतां ती मुलगी कांहीं आपणाला भेटत नाहीं असें वाटून उसासे सोडीत तो भ्रमिष्टासारखा आपली नाव जिकडे भरकटत जाईल तिकडे जाऊं लागला. असें भरकटणें कांहीं काळ चालल्यावर त्याचें उचंबळलेलें मन बरेंच शांत झालें, व तो कांहींसा भानावर येऊन नाव वल्हवूं लागला.

हा सारा प्रकार कथानकांत वर्णन केलेली घटना ज्या रात्रीं घडत होती, त्याच्या पूर्वरात्रींचा होता. त्यानंतर नानाजी कसाबसा थळच्या किनाऱ्यावर येऊन लागल्यावर पुढें काय प्रकार झाला हें वाचकांना विदित आहेच. त्या वेळीं त्याला त्या मुलीकडे लक्ष्य द्यावयाला अवसर सांपडला नव्हता, तो आतां सांपडला. त्याबरोबर त्याच्या कोमल भावना पुन्हा उचंबळून आल्या; व 'ती कोणीही असली, कोणा-लाही तिचा लाभ व्हावयाचा असला, तरी ती माझी धर्माची बहीण आहे. तिच्या संरक्षणासाठीं झटणें हें माझें कर्तव्य आहे!' असें त्याला वाटूं लागलें.

पण विचार व आचार यांमधून खळखळ वहाणाऱ्या परिस्थितीच्या प्रवाहामुळें विचार एका तीराला व आचार अन्य तीराला असें जें अंतर पडलेलें असतें, तें तोडून विचारांचा आचारांशीं प्रत्यक्ष मेळ घालावयाला मनुष्यमात्राला ज्याच्या त्याच्या अनुकूलतेप्रमाणें थोडाफार कालावधि लागतो; व परिस्थिति ज्या मानानें बिकट त्या मानानें तें अंतर दुर्लंघ्य होऊन बसतें. नानाजीला ह्या सर्वसामान्य व्यावहारिक सिद्धान्ताचा प्रत्यय हातोहात आला, व किल्लेदाराच्या मगरमिठींतून त्या मुलीला सोडविण्याची आशा मृगजलवत् आहे असा सत्याभास त्याला होऊं लागला. परिस्थितीच्या जबरदस्त भोंवऱ्यांत आपण सारींच अडकून पडलों आहों ह्या जाणिवेनें त्याला तेव्हां अंमळ धीरानें वागण्याला शिकविलें. ह्या शिकवणीचा स्वतः नानाजी, त्याची मायभूमि, त्याचा देवधर्म व त्यांचे हिंदु देशबांधव ह्या सर्वांच्या हिताच्या दृष्टीनें एवढा तात्कालिक हितकारक परिणाम झाला कीं, नानाजीला त्या कोणा मुलीच्या संरक्षणाविषयीं आत्यंतिक कळकळ हृदयांत बाळगूनही केवळ स्त्रैणपणाला अथवा भावनोद्दीपनाला बळी पडून तोच एक नाद डोक्यांत घेण्याचें सोडून 'माझा देश, माझा धर्म व माझे बांधव यांच्या मंगला-साठीं शत्रूंना मारून विजयी होणें, किंवा शत्रूंना मारतां मारतां मरून स्वर्गाची जोड मिळविणें' ह्या स्वतःच्या ध्येयसाधनाप्रीत्यर्थ आयुष्याच्या अखेरच्या क्षणा-साठीं झगडण्याइतका तो धैर्यशाली व दृढनिश्चयी बनला.

नानाजीच्या अंतःकरणांतील दुर्दम चिंतेचीं अभ्रें व अंतरिक्षांतील काळ्या-निळ्या ढगांचीं अभ्रें एकदमच दूर झालीं. नानाजी नवोदित निश्चयपूर्वक आपल्या अंतश्चक्षूंनीं अंतःकरणाच्या अंतरिक्षाकडे पाहूं लागला, तों तेथें त्याला त्याच्या ध्येयाचा ध्रुवतारा चमकतांना आढळला; व तेव्हांच तो बहिश्चक्षूंनीं सृष्टिजन्य अंतरिक्षाकडे पाहूं लागला, तेव्हां खराखुरा ध्रुवताराही आपल्या तेजानें चमकतांना त्याला दिसून आला. चंद्रदर्शन घडतांच मध्य रात्र उलटून पहांटेचा सुमार झाल्याचें त्याला कळलें व इतका वेळ आपण बेशुद्ध होतों हें पाहून त्याला विस्मय वाटला. चांदण्याच्या स्वच्छ प्रकाशांत त्यानें समोर पाहिलें, तों थोड्या अंतरावर—पुष्करिणीजवळ ज्या ठिकाणीं बऱ्याच वेळांपूर्वी रण माजलें होतें, त्या ठिकाणीं जिवंतपणाची कांहीं हालचाल झाल्याचा भास त्याला झाला. पहिल्याच क्षणाला तो भयानें अमळ दचकला; पण तें भय क्षणभरच टिकलें. लगेच तो आपल्या जागयावरून उठला व जिकडे हालचाल दिसली तिकडे जाऊं लागला. दहा पांच पावलें पुढें जातांच समोर एक घोडी कोणातरी हालचाल करणाऱ्या मनुष्यदेहावर छाया धरून उभी असल्याचें त्याला दिसून आलें. तो घोडा नानाजीला पहातांच मोठ्यानें खिंकाळून नानाजीचा चावा घेण्यासाठीं कीं काय, बाणासारखा दोन पावलें पुढें आला. नानाजी दचकून दोन पावलें मागें सरला.

त्याच वेळीं कोणी एक अज्ञात व्यक्ति घोडा उभा होता तिकडे येत होती; ती नानाजीची चाहूल लागतांच तेथून शक्य तितक्या चपळाईनें नानाजीला न कळत पळून जाऊन पुष्करिणीच्या आडवशाला दडून बसली.

## प्रकरण सोळावें

# ती व्यक्ति कोण ?

" अहाहा ! ह्या जनावराच्या ठायींदेखील आपल्या धन्याविषयीं इतकी पूज्य-बुद्धि आहे, आणि आम्ही माणसें मात्र आमच्या धन्याशीं बेइमान व्हावयाला, खाल्ल्या घराचे वासे मोजावयाला शरमत नाहीं ! पण मनुष्यजात अरेरावीनें सृष्टी-वर राज्य करते, म्हणून मनुष्येतर जीवसृष्टि मनुष्यजातीच्या दास्यांत युगेंचीं युगें खितपत पडली आहे, व तिच्या जीवितालाही मोल नाहींसें झालें आहे. आमच्या देवाधर्मांची, आमच्या आयाबहिणींची व आमच्या मायभूमीची दुरात्मे अविंध अमानुषपणें विटंबना करतात, म्हणून आम्ही त्यांच्याशीं दावेदारी करतों. पण ते काय व आम्ही काय, मनुष्यच; आमच्याविषयीं बिचारी मुकी मनुष्ये-तर सृष्टि मनांत काय बरें म्हणत असेल !" असे विचार त्या स्वामिनिष्ठ घोड्याला पाहातांच नानाजीच्या मनांत आले. पण नानाजीही मनुष्यच होता; 'हें असें चालावयाचेंच' अशी त्यानें त्या विचाराची मनांतल्या मनांत लीलेनें बोळवण केली.

नानाजीनें तर्क केला कीं, तो हालचाल करणारा भवानजीच असावा व तो घोडाही त्याचाच असावा. त्यानें धीटपणानें पुढें जाऊन 'भवानजी' अशी हांकही मारली. त्या हांकेला जरी 'ओ' मिळाली नाहीं, तरी तो घोडा मात्र नानाजीकडे टक लावून पाहूं लागला. त्याच वेळीं तेथें कोणा दुसऱ्या माणसाच्या हालचालींचा भास झाला पण नानाजीचें तिकडे लक्ष गेलें नाहीं. लगेच नानाजीनें आणखी थोड्या धिटाईनें पुढें जाऊन त्या घोड्याच्या पाठीवर प्रेमळपणानें थाप मारून म्हटलें, " गड्या ! मी तुझ्या धन्याचा वैरी नाहीं; त्याचा साहाय्यकर्ता आहे."

माणसांपेक्षां जनावरांना अक्कल व इमानदारी जास्त असते. असें म्हटल्यानें दुनियेचें राज्य करणाऱ्या मनुष्यजातीचा अपमान होईल म्हणून तसें म्हणावयाचें नाहीं इतकेंच; पण त्या घोड्याला नानाजीच्या सहानुभूतिपूर्ण शब्दांचा अर्थ कळला असावा. एरव्हीं तो आनंदानें समाधानपूर्वक फुरफुरत बाजूला सरलाच नसता.

लगेच नानाजीनें जवळ जाऊन पाहिलें तों तो भवानजीच होता. भवानजीचा मंदमंद श्वासोच्छ्वास सुरू असलेला पाहून तो जिवंत आहे अशी नानाजीची खात्री झाली, व त्याला परमानंद वाटला. त्यानें भवानजीला हाक मारली," भवानजी !"

पण भवानजी शुद्धीवर कोठें होता तो ओ देईल! नानाजीनें जवळच्या केळीचें एक पान थोडें फाडून घेतलें, आणि त्याचा द्रोण करून त्या द्रोणांतून पुष्करिणीचें पाणी आणून तें थोडें भवानजीच्या मस्तकावर शिंपडलें, थोडें तोंडावर शिंपडलें व थोडें त्याच्या तोंडांत घातलें. जिभेला त्या पाण्याचा थोडा ओलावा मिळतांच व मेंदू जरा थंड होतांच भवानजी किंचित् शुद्धीवर आला. त्याबरोबर त्याच्या तोंडून अडखळत शब्द निघाले, " मंगले! काय मीं सुभानजीचा आशाभंग केला म्हणून तूं माझा आशाभंग करणार? आणि आमचे भावी वैभवाचे सारे मनोरथ– ते माझे कसले मनोरथ? ते तुझेच मनोरथ–ढांसळून पडले तरी देखील तूं आपला रुसवा सोडावयाला तयार होणार नाहींस ना? गडे! फितुरी, स्वदेश-द्रोह, स्वधर्म-द्रोह, अशा अघोर पापांच्या परवडी रचून ह्या परवडींच्या पायांवर उभारलेलीं वैभव-मंदिरें कधींच कोणाला लाभत नसतात. हें तुला कळत नाहीं का? काय म्हणालीस? तूं मला लाभावीस म्हणून मीं हें सारें केलें पाहिजे? तुझ्या सहवाससुखासाठीं मी माझ्या–देशाशीं माझ्या बांधवांशीं–माझ्या देवाधर्माशीं बेइमान व्हावें काय? मी तुझ्यासाठीं सुभानजी, सिद्दी सात व किल्लेदार ह्या सर्वांना साष्टांग नमस्कार घालून माफी मागूं?–नाहीं! नाहीं! मंगले! मी तुला स्पष्ट सांगतों कीं, माझ्या वाड-वडिलांनीं कधीं असला कमअस्सलपणा केला नाहीं. कोंकणरावाच्या वंशांत असला नापीक अंकुर आजवर कधीं उगवला नाहीं व पुढेंही उगवणार नाहीं.–तसें असेल तर आजपासून मला तूं मेलीस व तुला मी मेलों."

भवानजी तें सारें स्वप्नांत बोलत होता. पण त्या स्वप्न-सृष्टींत मंगलेचा प्रेमपाश तोडून जातांच त्याला इतका आवेश चढला होता कीं, 'तुला मी मेलों' असें तोंडानें म्हणतां म्हणतां तो झोंपाळू स्थितींत उठून अर्धवट उभा राहिला.

नानाजीनें त्याला सांवरीत विचारलें, " तूं कुठें चाललास?"

पण भवानजी नानाजीच्या प्रश्नाला उत्तर देऊं शकला नाहीं. त्याला पुन्हा ग्लानि आली. तो खालींच पडावयाचा, पण तेवढ्यांत नानाजीनें त्याला आपल्या बाहूंत सांवरून धरलें म्हणून बरें झालें. नानाजीनें पुन्हा पाणी पाजून पूर्ववत् भवानजीच्या मस्तकावर शिंपडलें व तोंडांत घातलें. तेव्हां मात्र त्याला थोडी हुषारी आली. त्या शुद्धींत त्यानें डोळे उघडतां उघडतां पहिली हांक मारली, तीही मंगलेलाच. नानाजीनें जेव्हां त्याला पुन्हा 'तूं शुद्धीवर आलास का' असें विचारलें, तेव्हां मात्र त्याची नजर नानाजीच्या नजरेला भिडली, व त्याबरोबर त्यांत

एकदम चकित होऊन जवळ पडलेली तरवार चांचपडून हातीं घेतां घेतां विचारलें, " तूं कोण ? "

" भवानजी ! भिऊं नकोस. असा घाबरूं नकोस. मी तुझा हितकर्ता आहे. तुझा पराक्रम मीं आतां माझ्या डोळ्यांनीं पाहिला आहे, म्हणूनच मला तुझ्याविषयीं प्रेम वाटतें."

नानाजीच्या आश्वासनपर शब्दांनीं भवानजीला बराच धीर आला. त्यानें पडल्या जाग्यावरूनच एकवार सभोंवतीं तीक्ष्ण नजर फेंकून कण्हत कण्हत विचारलें, " ते चांडाळ कुठें गेले ? "

नानाजी उत्तरला, " ते कुठें गेले तें मला कळलें नाहीं."

" बरें; त्या बैराग्याचें काय झालें ? "

" त्याला त्यांनीं कैद करून नेलें असावेंसें वाटतें."

" काय ? त्याला कैद करून नेलें ? अरेरे ! ज्याच्यासाठीं मीं माझ्या सुखसर्वस्वावर लाथ मारली, ज्याच्यावरून मीं माझ्या पंचप्राणांची ओंवाळणी काढली, तो माझा गुरु शेवटीं शत्रूच्या हातीं लागला ना ! हाय ! हाय ! " भवानजी खिन्नतापूर्वक जवळच्या एका दगडावर डोकें टेंकीत कण्हत उद्गारला.

" भवानजी ! तूं कण्हतो आहेस. तुला वर्मी जखमा झाल्या आहेत का ? " असें विचारीत नानाजी भवानजीच्या जवळ गेला व खालीं वांकून पाहूं लागला, तों भवानजीचा उजवा हात जायबंदी होऊन रक्तबंबाळ झाला आहे व त्याच्या छातीवर जबर जखम झाल्यामुळें त्याचे कपडे रक्तानें चिंब भिजून निघाले आहेत असें आढळून आलें. भवानजी हळहळत उद्गारला, " अरेरे ! त्या चांडाळानें तुझ्या वर्मी घाव घातला ! "

" होय. वर्मी घाव घातला खरा. मी आतां ह्या अपघातांतून वांचेन अशी मला फारशी आशा वाटत नाहीं." एवढें बोलतांच भवानजीच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. नानाजीला तीं आंसवें जरी चांदण्याच्या मंद प्रकाशांत दिसूं शकलीं नाहींत, तरी त्याचा आवाज एकाएकीं घोगरा झालेला ऐकून तो रडतो आहे हें नानाजीनें ताडलें. तो त्याच्या मस्तकावरून हळुहळू हात फिरवीत म्हणाला, " भवानजी ! असा रडूं नकोस, असा निराश होऊं नकोस. बजरंगबलीच्या कृपेनें तूं लौकरच बरा होशील. तुझ्या माझ्यासारख्यांच्या हातूनच आपल्या ह्या मातृभूमीच्या कपाळीं आलेले दुर्धर वनवास टळावयाचे आहेत. सिद्दीसातासारखे

अविंध जे या भूमंडळावर मातले आहेत, त्यांचा संहार होऊन त्या परशराम भूमींतील देवाधर्माची विटंबना थांबावी अशी पवित्र इच्छा जोंवर आमच्या अंतःकरणांत वसत आहे, तोंवर आम्हांला कळिकाळाचेंही भय बाळगण्याचें कारण नाहीं. देव आम्हांला मरण देईल, तर स्वतः देवाच्या देवपणावर घाला घालणाऱ्या व देवाच्या लेंकरांना त्राहि भगवान् करून सोडणाऱ्या त्या दैत्यांचा जाच कोण वारील ? आपल्या सृष्टीची रहाटी सुरळीतपणें चालावी म्हणून देवच आमच्यासारख्या आपल्या सुपुत्रांना सहस्र नागार्जुनांचें बळ व आयुर्दाय देत असतो. बरें, इतकेंही करून अशा देवकार्यांत ज्यांचा बळी पडला, ते मरून अजरामर होतात. मरणाचें एवढें भय कसलें ? "

ह्या वेळपर्यंत भवानजीला नानाजीच्या पाणीदारपणाची कल्पना नव्हती, ती आतां कल्पना आली. आपणाप्रमाणेंच देवा-धर्माच्या व देशाच्या मंगलासाठीं तनु-मन-धनाच्या मोबदल्यांत झटणारा तो एक तेजस्वी तरुण आहे असें पाहून त्यानें नानाजीला विचारलें, " गोष्ट खरी. पण गड्या ! तूं कोण ? "

" मी कोण ? " हे शब्द उच्चारतांच नानाजीचा कंठ दाटून आला. तो गद्गद स्वरानें उद्गारला, " भवानजी ! मी कोण म्हणून तुला सांगूं ? नांव सांगण्यासारखें माणसानें कांहीं करावें व मग नांव सांगावें ! "

" बरोबर ! अगदीं बरोबर बोललास. माझ्या इतक्या दिवसांच्या आयुष्यांत माझ्या मताला मनापासून मान्यता देणारा तूंच एक मला भेटलास. नुसतें नांव सांगून वाडवडिलांच्या कीर्तीवर जगण्यांत पुरुषार्थ नाहीं, म्हणूनच मी कोणाला माझी खरी ओळख देत नाहीं. "

" एकूण तूंही पोरका आहेस तर ? "

" होय. आणि तूं ? "

" मीही तसाच."

" पण तूं आईबापें नसून पोरका असशील ! "

" होय. परमेश्वरानें खरें पोरकेंपण मजवर लादलें आहे."

" मी आईबापें असून पोरका आहे."

" तो कसा काय ? "

" लहानपणीं—मी पुरा वर्षाचा होतों—नव्हतों, तेव्हांच माझ्या आईच्या कांहीं भोरसवदा आगळिकीवरून माझ्या बाबांनीं तिला घराबाहेर घालवून दिलें, तेव्हां-

पासून मी घराला अंतरलों. माझी आई माझ्या आजोळीं आजोबापाशीं वनवास भोगतां भोगतां बिचारी मरून गेली; तेव्हां मी सारा बारा वर्षांचा असेन. तेव्हां माझ्या आईनें मला पोटाशीं घेऊन शेवटचा निरोप सांगितला होता कीं 'सूर्याजी' 'चव्हाणांच्या पोटीं जन्म घेतल्यासारखा कांहीं पराक्रम करून नांव कर, तव्हांच त्यांना तोंड दाखव."

"एकूण तूं चव्हाणांचा मुलगा तर!"

"होय. पण तूं खाशाबांचा कोण?

"आपण फुरसतीच्या वेळीं त्या गोष्टी बोलूं. माझी कर्मकहाणीही हृदयाला झोंबणारी आहे. पण त्या गोष्टी बोलत बसण्याची ही वेळ नव्हे."

"ही वेळ नव्हे कशी? हीच वेळ आहे. गड्या!—पण तुला हांक मारतांना माझी जीभ अनोळखीपणामुळें अडखळते. तूं माझा अंतकाळचा सोबती मला भेटलास; मरतां मरतां तुझें नांव तरी माझ्या कानीं पडूं दे."

"मी नानाजी सुर्वे"

"काय? तूं नानाजी सुर्वे?" भवानजीच्या अंगीं उठून बसण्याचें त्राण नव्हतें तरी देखील अंगीं होती नव्हती तेवढी सर्व शक्ति एकवटून तो पडल्या जागींच उठून बसतां बसतां म्हणाला, "नानाजी सुर्वे! ज्याचें नांव ऐकतांच सिद्दी साताच्या उरांत धडकी भरते, मानाजी आंग्रे व थळचा किल्लेदार हे ज्याच्या रक्ताचा टिळा कपाळीं लावून मिरवण्यासाठीं हपापलेले आहेत, तो नानाजी तूं! महाभागा! तूं काळाच्या जबड्यांत उभा आहेस याची तुला जाणीव कशी नाहीं!"

भवानजीच्या तोंडून हा परिस्फोट होण्यापूर्वीच आपला पाठलाग होणार याची नानाजीला अटकळ होती, तिला भवानजीच्या बोलांनीं दुजोरा मिळाला. आतां काय करावें, हा विचार डोक्यांत घोळूं लागल्यामुळें नानाजी क्षणभर स्तब्ध राहिला. भवानजी थोडा विसांवा घेऊन त्याला पुन्हा म्हणाला, "नानाजी! वेड्या! आपणासभोंवतीं कुटिलकारस्थानांचा केवढा प्रचंड वणवा पेटला आहे याची तुला मुळींच कल्पना कशीरे नाहीं? थोड्या वेळापूर्वी येथें जें रण माजलें तें केवळ तुझ्यापायीं माजलें. तुझ्यावर त्या सर्वांचा खरा दांत आहे."

"पण त्या मंडळीचा रोख तर भानाजी पिसाळावर दिसला."

"होय. भानाजी पिसाळावर त्यांचा रोख होता खरा; पण त्याच्या मुळाशीं फार खोल कारणें आहेत."

" तीं कोणतीं ? "

" तीं सांगत बसण्याइतकें बळ माझ्या अंगीं उरलेलें नाहीं. पण येवढें मात्र खरें कीं, त्या कारणांतलें एक कारण तूं आहेस. तूं भानाजीच्या आश्रयाला आला आहेस अशी बातमी बहुधा सुभानजीकडून किल्ल्यावर समजली असली पाहिजे."

" सुभानजी माझा सावत्र मामा खरा; पण त्याची व माझी आजवर कधीं तोंडओळख देखील झालेली नाहीं. तो मला काय ओळखणार ? शिवाय मी भानाजी पिसाळालाही अजून काळागोरा कसा तो पाहिलेला नाहीं ! "

" तूं सूर्यास्ताच्या वेळीं भानाजी पिसाळाबरोबर बोलत चालला होतास; तेव्हां तुम्हां दोघांना सुभानजी भेटला, खरें ना ? "

" होय. सुभानजी आम्हांला भेटला खरा. तो सुभानजी असें माझ्याबरोबरच्या माणसानेंच मला सांगितलें. पण तो माझ्याबरोबरचा माणूस भानाजी पिसाळ-खास नव्हता."

" तर मग तो कोण होता ? "

" त्यानें आपलें नांव भाऊराव पिसाळ आहे व आपण भानाजीचा भाऊ आहों असें सांगितलें. इतकेंच काय; पण भानाजी पिसाळाला मी हाडवैरी मानतों व त्याचा निःपात करण्याचा माझा निश्चय आहे, असें पाहतांच त्यानेंही माझ्या म्हणण्याला होकार देऊन भानाजीचा मला पत्ता लावून देण्याचें कबूल केलें आहे त्यानेंच मला येथला गेल्या कैक महिन्यांचा वृत्तान्त निवेदन केला, व सागरगड जिंकण्याच्या कामीं मला मनःपूर्वक साह्य करण्याचेंही कबूल केलें. येथें बजरंग-बलीच्या देवालयांत त्यानेंच मला आणून सोडलें."

" हें सर्व त्यानें तूं नानाजी सुर्वे आहेस असें त्याला कळल्यावर केलें असेल ? "

" होय."

" तर मग तो भानाजी नसेल. कारण एक तर सुर्व्यांविषयीं त्याच्या मनांत यत्किंचित् देखील ओलावा नाहीं. व दुसरें, तुझ्याशीं मैत्री करणें म्हणजे सुलताना-पासून सर्व सत्ताधाऱ्यांशीं वैर करणें होय, हें तो बरोबर ओळखतो. तो उगाच जळता निखारा कशाला आपल्या पदरीं बांधून घेईल ? तो कोणीतरी शत्रूचा हेर असावा."

" तसें असतें, तर तो थोडया वेळापूर्वी दुरून तुम्हांला दौडत येतांना पाहून कां भ्याला असता ? "

" तो भ्याला ! "

" होय; भ्याला म्हणूनच मला टाकून पळाला."

" आणि आम्ही आलेले त्याला भेटलों नसतों तर काय करण्याचा त्याचा विचार होता ? "

" तो मला आपल्या घरीं घेऊन जाणार होता, व तेथून पुढें आमचे बेत काय ते ठरावयाचे होते.' नानाजी म्हणाला. भाऊरावानें आपणांला जांवई करून घेण्याची गोष्ट काढली होती तें भवानजीला सांगावेंसें त्याच्या मनांत एकदां आलें. पण संकोचामुळें त्यानें तें सांगितलें नाहीं.

" भोळा रे भोळा !" भवानजी विस्मयपूर्वक किंचित् हंसून म्हणाला, " नानाजी ! तुला येथल्या सध्यांच्या परिस्थितीची मुळींच कल्पना नाहीं. सिद्दी व इंग्रज यांच्या गुप्त हेरांचें ह्या टापूंत येवढें जबरदस्त जाळें पसरलें आहे कीं, स्वतःचा बाप, भाऊ, मुलगा व बायको हीं देखील शत्रूच्या बातमीदारांपैकीं आहेत कीं काय, असा संशय एखाद्याला आला तर तो देखील फारसा अतिशयोक्तीचा ठरणार नाहीं. मी सांगतों; माझें ऐक. आठ घटकांत तुला गळ्यांतला ताईत मानून तुझ्याशीं राज्यक्रान्तीची उघड उघड वाटाघाट करणारा तो भाऊराव शत्रूचा हेर असला पाहिजे, व तो तुझ्याविरुद्ध चाललेल्या एखाद्या कारस्थानांत सामील असला पाहिजे. तुला गोंरवून सागरगडाकडे जाण्याच्या निमित्तानें बरोबर घेऊन नेमका शत्रूच्या स्वाधीन करण्यासाठीं त्यानें तुझ्यासभोंवार हें मोहजाल पसरलें असावें; व शिपाई आले, आतां तूं नक्की पकडला जाणार, अशी खात्री होतांच त्यानें नामानिराळा राहण्यासाठीं तुला नकळत पळ काढला असावा. एकूण ईश्वर तुझा पाठीराखा आहे यांत संशय नाहीं.–" बोलतां बोलतां भवानजीला ते श्रम सहन न झाल्यामुळें एकदम उचकी आली, व त्या उचकीसरशीं त्याला रक्ताची उलटी झाली. तरीही तें मनावर न घेतां तो धापा टाकीत नानाजीला म्हणाला, "नानाजी! माझ्याच्यानें जास्त बोलवत नाहीं. शिवाय आपण असेच येथें गोष्टी बोलत बसणें सुरक्षितपणाचें नाहीं. माझें काय, मी आतां वांचेन असें मला तरी वाटत नाहीं. पण मला तुझ्याविषयीं मात्र फार काळजी वाटते. तूं मुकाट्यानें येथून पाय काढ कसा ! आणि जाशील तो थेट सागरगडावर जाऊन तेथल्या किल्लेदाराला भेट. पण तूं कोणत्या रस्त्यानें जाशील, सांग बरें ! तूं असें कर, असाच थेट पश्चिमेकडे महाद्वारापासून वडाच्या झाडाखालून पायवाट जाते त्या वाटेनें सरळ जा. डावी-

उजवीकडे मुळींच वळावयाचें नाहीं; सरळ जावयाचें. म्हणजे तूं बजरंगगड गांवांतून जाशील. गांवाबाहेर जातांच वाटेंतच एक पडकें देऊळ लागेल. तीन दीपमाळा समोर उभ्या आहेत ही त्या देवळाची खूण. त्या देवळाच्या मागील बाजूनें एक गोवंडी वाट डोंगरांत जाते. त्या वाटेनें गेलास म्हणजे थोडी चढण लागेल. ती चढून गेलास, कीं कनकेश्वराची टेंकडी लागेल. प्रथम तूं कनकेश्वराला जा, व तेथून—पण तुला भुयारांचें वगैरे भय वाटत नाहीं ना ? ”

“ नाहीं.”

“ झालें तर मग ! कनकेश्वराच्या जवळच पंचवीस हातांवर एक तळें बांधलेलें आहे तें तळें एका बाजूनें पोकळ आहे. तळ्यांत उतरून पोहत त्या पोकळींत गेलें कीं अगदीं आंतल्या बाजूला चिरेबंदी पायऱ्या लागतात. ती सातआठ पायऱ्यांची चढण आहे. ती चढून गेलें कीं तिथें ब्रह्मा–विष्णु–महेश अशा तीन मूर्ति उभ्या असलेल्या आढळतील. त्या बाजूला करून ठेवल्या कीं तेथून जी बांधवाट लागते, ती थेट सागरगडावर जाते. गडावर त्या वाटेच्या तोंडाशीं चौकीपहारा असतो. तिथून तुझी सुटका एरव्हीं व्हावयाची नाहीं.” भवानजी आपल्या हातांतील आंगठी काढून नानाजीच्या हातीं देत म्हणाला, “ ही आंगठी घे. ही तूं गडावरील पहारेकऱ्याला दाखवून माझें नांव सांगितलेंस, कीं तो तुला बिनतक्रार आंत सोडील. आंत जाशील तो प्रथम किल्लेदाराला जाऊन भेट.’

“ खरें; पण तो किल्लेदार सुभानजीचा सासरा आहे ना ? ”

“ असेना कां ? तुला काय त्याचें ? तूं माझ्या शब्दावर विश्वासून त्यांना जाऊन भेट. पाहिजे तर त्यांना माझें नांव सांग. तुझ्या हिताची गोष्ट तुला सांगतों, त्या किल्लेदाराला आज तुझ्यासारख्या पराक्रमी सहकाऱ्याची फार गरज आहे. सुभानजी त्यांचा जांवई असला तरी सुभानजीवर त्याचा विश्वास नाहीं. मी तुला फसवीत नाहीं. मी जातकुळीचा अस्सल मराठा व आंगऱ्यांचा नेकजात अभिमानी आहें. त्या सत्पुरुषाच्या रक्षणासाठीं मीं त्याच्या पायांखालीं माझ्या देहाची पायघडी अशी पसरली, हें तूं प्रत्यक्ष पाहिलेंच आहेस. त्याचें रक्षण करण्यांत व त्याच्या साह्यानें माझ्या मायभूमीला अविंधांच्या जाचांतून सोडविण्याला माझा आयुर्दाय अपुरा पडला त्याला माझा नाइलाज आहे. तरी पण मरतां मरतां देखील माझ्या हातून सत्कार्य व्हावें इतकी माझ्या पूर्वजांची पुण्याई माझ्या गांठीला होती, म्हणूनच ही महत्त्वाची वार्ता तुझ्या कानावर घालून तुला

सावध करण्यासाठीं ईश्वरानें मला घायाळ करून येथें पाडून ठेविलें. ईश्वराच्या प्रत्येक कृतीकडे आपण अशाच आशावादानें व सद्भावानें पाहिलें पाहिजे. जा-नानाजी ! तूं अतःपर एका क्षणाचाही विलंब न लावतां वाऱ्याच्या वेगानें तूं येथून निघून जा कसा !"

एवढें भवानजी म्हणतो तों पुन्हा त्याला रक्ताची गुळणी आली. नानाजी आपल्या वस्त्रानें त्याचें तोंड पुशीत गहिंवरलेल्या कंठानें उद्गारला, "पण भवानजी ! तुला अशा असहाय स्थितींत मरणाच्या दारीं टाकून मी कसा रे जाऊं ?"

"मी मेलों असें समज." भवानजी जोराजोरानें श्वासोच्छ्वास करीत कष्टानें म्हणाला. "आपल्या ह्या मायभूमीच्या उद्धारासाठीं आज हें जें धर्मयुद्ध चाललें आहे, त्या युद्धांत आपले हजारों बांधव आजवर बळी पडले असतील व आणखी हजारों बळी पडतील; त्यांतच मी एक सार्थकीं लागलों असें समज, आणि तांतडीनें येथून पाय काढ. माझ्या ह्या अल्पस्वल्प उपकारांची फेड तुला करा-वयाचीच असली. ऋणानुबंधाचे ऋण तुला फेडावयाचेंच असलें, तर तूं माझ्यासाठीं एक कर—" इतक्यांत भवानजीला पुन्हा ठसका लागला, व त्या ठसक्यासरसा त्याच्या तोंडून रक्तमिश्रित फेंस बाहेर पडला.

नानाजी तो फेंस आपल्या हातानें पुसून भवानजीच्या मस्तकावरून ममताळू-पणानें हात फिरवीत म्हणाला, "सांग भवानजी ! तुझ्यासाठीं मी काय करूं ?"

"किल्लेदाराकडे तूं गेलास म्हणजे मंगला तेथें तुला भेटेल. तिला माझा अखेर-चा निरोप सांग कीं," भवानजी मध्येच जीभ चावून म्हणाला, "—पण नको. तिला तूं कांहींच सांगूं नकोस. वेळच आली व तिनें विचारलेंच, तर मात्र तिला येवढेंच सांग कीं, 'भवानजी आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत तुझी आठवण करीत होता. तूं त्या दिवशीं उगाच त्याच्यावर चिडून त्याचा धिक्कार केलास व पुन्हा त्याचें तोंडदेखील न पहाण्याचा निश्चय केलास, आणि मला तर तुझें दर्शन झाल्याशिवाय एक दिवसदेखील जगणें शक्य नव्हतें. तेव्हां झालें हें एकापरीनें चांगलेंच झालें. पण माझें तुझ्यावरचें प्रेम अढळ होतें, म्हणून मरणघटकेलादेखील मला तुझा विसर पडला नाहीं. मेल्यावरदेखील—मी पवित्र धारातीर्थी मरत आहें व असें मरण ज्याला लाभतें त्याला मुक्ति लाभते असें म्हणतात, तरीही अतृप्त वासनांच्या जीवाला पुनर्जन्म घेतल्याशिवाय सुटका नाहीं. तुझें सतत सान्निध्य लाभावें ही

माझी वासना अगदीं अतृप्त राहिली आहे, ती तृप्त करण्यासाठीं मी पुन्हा तुझ्याच उदरीं जन्म घेईन' येवढें तिला सांग. बरें; तूं माझा अंतकाळचा ऋणानुबंधी मित्र? ह्या मित्रत्वाची खूण म्हणून तुला मी काय बरें देऊं ?–ही माझी भवानी मी तुला अर्पण करतों." भवानजीनें जवळच पडलेली आपली तरवार अत्यंत कष्टानें डाव्या हातानें जवळ घेऊन नानाजीपुढें करून म्हटलें, "ही भवानी फार शकुनाची आहे. हिनें आजवर कैंक मुसंड्यांचें रक्त प्राशन केलें आहे. मात्र तूं हिच्या अपमानाची भरपाई केली पाहिजेस. ज्या चाण्डाळानें हिला बेदरकारपणें पायांखालीं तुडविलें, त्याचें रक्त हिला तूं पाजलें पाहिजेस. त्यानें माझी हत्या केली म्हणून नव्हे, तर तो देशाचा, धर्माचा, देवाचा शत्रु आहे म्हणून अशा दुष्टाचें निर्दालन तूं केलें पाहिजेस. तसेंच माझा हनुमान–माझ्या जिवाचा जिवलग हनुमान आतां अनाथ झाला ! त्यालाही तूंच सांभाळ." असें म्हणून भवानजीनें आपल्या घोड्याला हांक मारली, "हनुमान !"

धन्याची हांक ऐकतांच हनुमान एखाद्या पोरक्या पोरासारखा दीनवाणी मुद्रा करून धन्याजवळ येऊन उभा राहिला. भवानजीनें नानाजीकडे अंगुलिनिर्देश करून त्याला सांगितलें. "दोस्त ! आजपासून हा तुझा धनी. याला तूं अंतर देऊं नकोस." लगेच तो नानाजीकडे वळून म्हणाला, "नानाजी ! तूं ह्याला अंतर देणार नाहींस-च; तुला सांगावयाला नको."

भवानजीची ती शोकाकुल अवस्था व अखेरची निरवानिरव पाहून सारी सृष्टि पहांटेच्या दंवबिंदूंच्या रूपानें आसवें गाळूं लागली. नानाजीलाही शोक आवरेनासा झाला. तो स्फुंदत स्फुंदत भवानजीला म्हणाला, "भवानजी ! मी एखाद्या मांग-हृदयी माणसासारखा तुला अशा हालअपेष्टांत सोडून कसा रे जाऊं ?"

"नामर्द !" भवानजी एकदम धापा टाकीत संतापून म्हणाला, "एका बांधवाचें मरण तुला पाहवत नाहीं, मग अशा शेंकडों–हजारों बांधवांच्या आहुति ज्या स्वातंत्र्ययुद्धांत पडावयाच्या, तें युद्ध तूं कसा लढणार ? मूर्खा ! माझें अवतारकार्य संपलें ! देवाजीला जें आवडलें, त्याला तूं कसा आळा घालणार ! अशानें तूं मात्र हकनाहक येथल्या येथें शत्रूच्या हातीं सांपडून मरशील, व माय-देशाचें मंगल करण्याची सोन्याची संधि प्राप्त झाली असतां ती दवडल्याच्या महत्पापाचा धनी होऊन रौरव नरकांत पडशील !—"

दिवा विझतांना मोठा होतो, त्याच न्यायाचें भवानजीचें तें अखेरचें बोलणें होतें. तें बोलणें संपतें न संपतें. तोंच त्याला पुन्हा रक्ताची गुळणी झाली, व त्याचे डोळे फिरले. नानाजीनें त्याला दोन तीन हांका मारून पाहिल्या; पण उत्तर मिळेना. नानाजीनें पुन्हा पुष्करिणीचें पाणी आणून तें त्याच्या मुखावर शिंपडलें. पण मरणाच्या आंचेनें करपून निर्जीव झालेल्या त्या देहांत जिवंतपणा कोठून येणार."

भवानजीला आणखी दोनतीन उचक्या आल्या, व तिसऱ्या उचकीसरशी त्याच्या आयुष्याची दोरी तुटली ! नानाजीला अतोनात दुःख झालें. पण दुःख करण्यापलीकडे त्याच्या हातीं तरी काय होतें ! भवानजीच्या शवाला अखेरची मूठमाती देऊन तरी जावें अशी नानाजीची फार इच्छा होती. पण त्याला सभोंवारच्या प्रतिकूल परिस्थितीमुळें खेदानें व नाइलाजानें ती इच्छा मनांतल्या मनांत दाबावी लागली. आतां येथें फार वेळ रहाणें धोक्याचें आहे हें ओळखून त्यानें गडावर जावयाला निघण्यासाठीं घोड्याला हांक मारली, " हनुमान ! "

हांक ऐकतांच हनुमान भवानजीच्या शवाजवळ येऊन उभा राहिला. त्यानें भवानजीचें शव एकवार पायापासून मस्तकापर्यंत हुंगलें. एखाद्या पोरक्या पोराची दया यावी तशी नानाजीला हनुमानाची दया आली. त्याचें सांत्वन करण्यासाठीं नानाजीनें त्याच्या गळ्याला मिठी मारून त्याचें मस्तक आपल्या खांद्यावर ठेवलें, तेव्हां त्याचें गालफड नानाजीच्या गालाला चिकटतांच ओलें लागलें. त्यावरून नानाजीला कळून आलें कीं, हनुमान आपल्या धन्यासाठीं शोक करीत होता.

इतक्यांत पहांट झाली. कोंबडा आरवलेला नानाजीला ऐकूं आला. आपणांला कोणीं पाहूं नये म्हणून दिशा फांकतात न फांकतात, तोंच त्याला चौबुरुजीचा टापू ओलांडून जावयाचें होतें. त्यासाठीं त्यानें तेथून निघण्याची चपळाई केली. नानाजी निघाला तेव्हां बागेंतील सर्व फुलझाडें फुलून त्यांचा मधुर सुवास प्रातःकाळीं झुळझुळ वहाणाऱ्या शीतळ वायूबरोबर आसमंतात् दरवळत होता; पक्ष्यांची किलबिल नुकतीच सुरू झाली होती, असें सर्व सजीव-निर्जीव सृष्टीला नैसर्गिक नवजीवन प्राप्त झालें होतें. पण नानाजीला त्यापासून मुळींच उत्साह वाटत नव्हता. त्याला ते सृष्टीचे निसर्गविलास जणुं प्रेतावर शृंगारसाज चढविल्याप्रमाणें नीरस वाटत होतें. 'पुढें काय' हा गुंतागुंतीचा प्रश्न निरनिराळ्या समीकरणांनीं मनांतल्या मनांत सोडवीत तो घोडा दौडीत चालला होता.

नानाजीची पाठ बजरंगबलीच्या देवालयाकडे वळते न वळते, तोंच थोड्या वेळा-

पूर्वी लपत छपत धापा टाकीत पुष्करिणीजवळच्या फुलांच्या ताटव्यांत लपून बसलेली व्यक्ति हलकेच तेथून निघाली, व देवालयाच्या आवाराबाहेर येऊन चौबुरुजीच्या मार्गाला लागली. चौबुरुजीकडे जातांना ती व्यक्ति नानाजी दृष्टिआड होईंतों एकसारखी त्याच्याकडे वळून पहात होती. त्या वेळीं कोणीं जर त्या व्यक्तीच्या दृष्टीला दृष्टि भिडवून पाहिलें असतें, तर पहाणाराला त्या दृष्टींत सूड, स्वार्थपरायणता व पशुवृत्ति—नव्हे पशूंनाही लाजविणारी सैतानी वृत्ति पूर्णपणें प्रतिबिंबित झालेली दिसली असती.

ती व्यक्ति कोण असेल बरें ?

## प्रकरण सतरावें

# सुभानजीचें आगमन

ती रात्र एकंदरींत सर्वांनाच काळरात्रशी भासली. त्या रात्रीं चंद्रालाही भले मोठें खळें पडलें होतें. भालूंचें भयाण ओरडणें त्या रात्रीं सभोंवतालच्या जंगलांतून ऐकूं येत होतें, व घुबडांनाही अशुभसूचक घूत्कार करण्याला त्याच दिवशीं फावलें होतें.

सिद्दी सात इंचबर्डसाहेबाला जयमहालांत आराम करावयाला लावून जो बाहेर पडला, तो आपणही आतां आराम करावा अशा आतुरतेनें घोड्यावर स्वार होऊन दर्यामहालांतील आपल्या निवासस्थानाकडे जावयाला निघाला. तो महालांत जाऊन पोंचला तेव्हां मध्यरात्रीचा समय होता. आतां तो आराम घेण्यासाठीं शयनमंदिरांत जाणार, तोंच महालाच्या प्रवेशद्वारावरील तुर्की पहारेकरी आंत आला व नम्रतापूर्वक कुर्निसात करून म्हणाला, " मालिक ! सरदार सिद्दी याकूबखान आपली भेट घेण्यासाठीं आले आहेत."

" जा. त्याला म्हणावें, मालिक आतां फार दमले आहेत, सकाळीं भेट होईल." सिद्दी सात उत्तरला.

त्यांना मीं प्रथमच सांगितलें कीं, " मालिक आतांच बाहेरून श्रमून आले आहेत, त्यांना आतां भेट घेतां येणार नाहीं. पण ते ऐकेनात. त्यांना कांहीं अत्यंत जरुरीच्या कामासाठीं आतांच्या आतां आपली भेट घ्यावयाची आहे." पहारेकरी म्हणाला.

" तर मग जा, त्याला आंत पाठवून दे." सिद्दी सात घुश्शांत म्हणाला. वास्तविक तो या वेळीं फारच श्रमला होता. सूर्यास्तसमयींच्या अर्धोन्मीलित कमलांप्रमाणें त्याचे डोळे झोंपेच्या आशेला येऊन उघडझांप करीत होते. असें असतांही त्याला सिद्दी याकूबची भेट घेण्याचें टाळवेना. याचें कारण, तसाच एखादा आणीबाणीचा प्रसंग ओढवल्याशिवाय सिद्दी याकूब आपणाकडे अशा अवेळीं आला नसेल, हें तो ओळखून होता.

पहारेकरी बाहेर गेला, त्याच्या पाठोपाठ सिद्दी याकूब आंत आला. त्याचे सर्व कपडे रक्तानें माखलेले होते, व अंगावरच्या जखमा आणि दौडीचे श्रम

-यांनीं तो घामाघूम झाला होता. अशा त्याच्या अवस्थेवरून सिद्दी सातानें ओळखलें कीं, ही स्वारी कटवाल्यांशीं झालेल्या एखाद्या झटापटींत खरपूस मार खाऊन आलेली असावी.

" काय; कोठून मार खाऊन आलां सरदारसाहेब ? " सिद्दी याकूब समोर येऊन अभिवादन करून अधोवदनानें उभा राहिलेला पाहून सिद्दी सातानें त्याला तुच्छतेनें विचारलें.

सिद्दी याकूब वर मान न करतां उत्तरला, " मालिक ! कटवाल्यांनीं नुसता धुदोस मांडला आहे, ती खबर आपल्या कानांवर घालण्यासाठीं मला अशा अवेळीं आपणाला त्रास द्यावा लागला. तरीही माझा आपली झोंपमोड करण्याचा विचार नव्हता. किल्लेदारास भेटून त्याच्या साह्यानें कटवाल्यांचा बंदोबस्त करावा म्हणून मी प्रथम किल्लेदाराच्या महालाकडे गेलों. पण किल्लेदार कांहीं भेटला नाहीं. बरें; सकाळपावेतों स्वस्थ बसावें तर तेवढ्या वेळांत कटवाले आणखी काय काय अनर्थ करतील याचा मुळींच भरंवसा नाहीं. त्यांचा विचार सागरगड घेण्याचा आहे, व त्या रोखानें त्यांची सारी तयारी चालली आहे. म्हणून मला आपणाला त्रास देणें भाग पडलें."

" त्या गोष्टी राहूं देत. ते सागरगड घेवोत नाहीं तर कांहीं घेवोत. पण तूं सुभानजीबरोबर भानाजी पिसाळाला पकडावयाला गेला होतास ना ? "

" होय, मालिक ! मी व सुभानजी असे दोघे बरोबर दहा घोडेस्वार घेऊन सुभानजीच्या टेहळणीप्रमाणें सुलतानी मशिदीकडे गेलों, तों तेथें भानाजी तर सांपडला नाहींच; पण बजरंग बैरागी मात्र अचानक भेटला. त्या बैराग्यानें सर्व हिंदु शिपायांना चिथावतांच सर्वांच्या अंगांत पिशाच संचारल्यासारखें झालें. सुभानजीचा भाचा भवानजी तर इतका बिथरला कीं, त्याला शेवटीं तेथल्या तेथें ठारच करावें लागलें ! त्या शिपायांना आम्ही बैराग्याला कैद करण्याचा हुकूम केला, तो हुकूम तर त्यांनीं मानला नाहींच; पण आम्ही माझ्याबरोबरच्या मुसलमान शिपायांच्या साहाय्यानें त्या बैराग्यावर तुटून पडतांच उलट ते आमच्यावर तुटून पडले. त्यांच्या हल्ल्यांत माझे फक्त दोन शिपाई जिवंत राहिले; त्यामुळें आम्हांला हार खावी लागली, व बैरागी जो बजरंगबलीच्या नांवाचा जयजयकार करीत तेथून निसटला, तो सागरगडावर जाण्याच्या रोखानें बजरंगगडाकडे वळला. मीं ताबडतोब माझ्या दोन मुसलमान शिपायांसह निधड्या छातीनें त्याचा पाठलाग केला. बैरागी व त्याला

फितूर झालेले हिंदु शिपाई पुढें व आम्ही त्यांच्या मागोमाग असा पाठलाग ते लोक माचीवर जाईतों एकसारखा चालला होता. माचीवर जातांच ते लोक एकदम आडवळणाला वळून दिसेनासे झाले. त्यांची किंचित् नजरभूल करून त्यांना गांठतां आल्यास पहावें, अशा बेतानें आम्ही सर्वजण थोडा वेळ तेथेंच एका मोठ्या पडक्या भिंताडाआड दडून राहिलों. बैराग्याला पुढें जाऊं देऊन थोड्या वेळानें अचानक त्याच्यावर छापा घालावयाचा, व त्याला पकडून किंवा ठार करून तसाच भानाजीच्या शोधासाठीं त्याच्या घराकडे मोर्चा वळवावयाचा, असा आमचा बेत होता; पण तेवढ्यांत एक मुलगी आमचा डोळा चुकवून आमच्या मागोमाग आली. माझे शिपाई बेसावध होते, त्यामुळें त्यांना ती मुलगी प्रथम दिसली नाहीं. त्यांच्या बेसावधपणाचा फायदा घेऊन तिनें मागच्या मार्गे त्यांच्यावर गोळ्या झाडल्या—"

" अहा रे नामर्द ! यःकश्चित् एका औरतीनें तुमच्यावर गोळ्या झाडल्या ! " सिद्दी सात तिरस्कारपूर्वक म्हणाला.

सिद्दी याकूब सिद्दी साताच्या त्या शब्दांनीं अगदीं मेल्यासारखा होऊन म्हणाला, " मालिक ! आमचें सारें लक्ष्य त्या लोकांच्या शोधांत गुंतल्यामुळें त्या औरतीला असा दगा करावयाला फावलें. माझे दोन्ही शिपाई पडले व मलाही जखम झाली.–"

" पुरे; तुझी रडकथा आतां पुरे. हेंच सांगावयाला तूं आपलें काळें तोंड घेऊन इकडे पळत आलास वाटतें ! त्यापेक्षां तूंही तेथेंच कां मेला नाहींस ? आतां तुला उंदेरीची किल्लेदारी देण्यासाठीं मी इंचबर्डसाहेबापाशीं तुझी हीच शिफारस करूं वाटतें ! " सिद्दी सातानें क्रुद्ध स्वरांत विचारलें.

वास्तविक एवढा मोठा पराजय पदरीं घेऊन आलेल्या माणसाची गर्दनच सिद्दी साताच्या तरवारीच्या एका फटकाऱ्यासरशीं धडावेगळी व्हावयाची. पण सिद्दी याकूब हा सिद्दी साताचा नातलग व अत्यंत मर्जीतील विश्वासू सेवक असल्यामुळें त्याला त्या क्षणीं सिद्दी साताकडून प्राणदंडाची शिक्षा मिळाली नाहीं. सिद्दी सातानें सिद्दी याकूबला उंदेरीची किल्लेदारी मिळण्याविषयीं जी खटपट चालविली होती, तिच्या मुळाशीं निराळेंच कारण होतें. उंदेरीचा किल्ला इंग्रजांच्या हातीं जावा असें सिद्दी साताचें प्रथमपासूनच मत नव्हतें. जशी मराठ्यांना, तशीच सिद्दी सातालाही इंग्रजांची उंदेरीवरील सत्ता फार जाचक वाटत होती. असें असतांही इंचबर्डसाहेबानें उंदेरी मिळण्याविषयीं अत्याग्रह धरला, तेव्हां आंग्रे

आणि मराठे यांच्याशीं झगडतांना इंग्रजांच्या साह्यासाठीं आपलें अडेल हें ओळखून सिद्दी सातानें मोठ्या नामुष्कीनें उंदेरी इंग्रजांच्या स्वाधीन केली होती. पण आज ना उद्यां आंग्रे व मराठे यांना कोंकणपट्टींतून हुसकून लावल्यावर पुन्हा उंदेरी आपण जिंकणार असा सिद्दी साताचा डाव होता. त्यावेळीं आपणाला सोपें जावें, तोंवर वेळींवखतीं उंदेरीहून आपणाला हुकमी साह्य व्हावें, यासाठीं सिद्दी साताला आपल्या विश्वासांतील किल्लेदार तेथें पाहिजे होता. इंचबर्डसाहेबानें उंदेरी ताब्यांत आल्यावर तेथें महंमदखान या नांवाचा जो किल्लेदार नेमिला होता, तो सिद्दी साताच्या संमतीनेंच नेमण्यांत आला होता. पण पुढें पेशव्यांनीं सिद्दी अबदुल रहिमान याला जंजिऱ्याच्या गादीवर स्थापन केल्यापासून महंमदखान अबदुल रहिमानचा पक्षपाती बनला असल्याबद्दल बोलवा होती. अबदुल रहिमाननें पेशव्यांशीं तह करून गादी मिळविल्यावर अर्थात् सिद्दी सात व त्याचा पक्ष याच्याशीं त्याचा विरोध सुरू झाला, व त्यामुळें पुढेंमागें महंमदखान आपणांला मदत करील अशी आशा करण्याला सिद्दी साताला जागा उरली नाहीं. त्यामुळें महंमदखानाच्याऐवजीं आपल्या विश्वासांतील सिद्दी याकूबची उंदेरीचा किल्लेदार म्हणून नेमणूक व्हावी अशी सिद्दी साताची खटपट होती. इमानदारी—किंवा इमानदारी म्हणण्यापेक्षा सिद्दी साताच्या ठायीं अलोट विश्वास हा एकच गुण, व तोही गुण मानला तर सिद्दी याकूबच्या ठायीं होता. एरव्हीं तो पराक्रमी नव्हता, मुत्सद्दी नव्हता, कांहींच नव्हता. त्याच्याहून पराक्रमी व मुत्सद्दी असें आणखी कितीतरी लोक सिद्दी साताच्या पदरीं होते. पण ते सिद्दी साताच्या हातांतील कळसूत्री बाहुल्याप्रमाणें वागण्याला तयार झाले नसते. मुसलमानी धर्माचा कडवा अभिमान किंवा दुरभिमान व मुसलमानेतरांविषयीं तीव्र तिरस्कार ज्यांच्या नसानसांतून सळसळत आहे, असे कडवे मुसलमान सिद्दी साताला शेकड्यांनीं सांपडले असते. पण त्यांच्यावर विश्वास टाकण्याला सिद्दी साताची तयारी नव्हती. याचें कारण ते सिद्दींच्या अस्सल राजवंशाचे भक्त होते, व म्हणूनच गादीच्या खऱ्या वारसांना बाजूला लोटून स्वतः जंजिऱ्याचा अधिपति होण्याच्या सिद्दी साताच्या महत्त्वाकांक्षेला ते अनुकूल झाले नसते. अशा प्रकारचा पीळ मुख्यतः सिद्दी याकूबच्या अंगीं नसल्यामुळेंच तो सिद्दी साताच्या मनानें उंदेरीचा किल्लेदार लायक ठरला होता.

सिद्दी याकूबला देखील सिद्दी सातचा स्वभाव चांगला माहीत होता. सिद्दी

सात तरवारीला हात न घालतां नुसता जळफळू लागलेला पाहून त्यानें अंदाजलें कीं, आपल्या तक्दिरानें खैर केली. सिद्दी सात संतापला, त्याच्यासमोर त्यानें अंमळ गयांवयां केलें, तेव्हां सिद्दी सात किंचित् शांत होऊन म्हणाला, "त्या वैराग्याला फितुर झालेलें सारे शिपाई हिंदूच असतील ?"

"होय मालिक ! ते सारे हिंदु होते, इतकेंच काय पण ते सुभानजीचे शिपाई होते." सिद्दी याकूब उत्तरला.

"तर मग तो काफरही त्या कटवाल्यांपैकींच असला पाहिजे. हरामखोर ! माझें अन्न खाऊन माझ्यावरच उलटतो काय ?" सिद्दी सात दांत-ओंठ खात म्हणाला.

"म्हणूनच मालिक ! चौबुरुजी आपल्या हातीं आली तेव्हांच, मी आपणाला सांगत होतों कीं, काफर तेवढा एकजात कापून काढावयाला हवा ! पण आपण तेव्हां माझा शब्द मानला नाहीं." सिद्दी याकूब हळूच म्हणाला.

"तेव्हां ती माझी चूक झाली. बरें; तुला सुलतानाविषयीं काय वाटतें ?" सिद्दी सातानें विचारलें.

सिद्दी याकूब पराक्रमी नसला, तरी आपल्या मतलबापुरतें प्रसंगावधान त्याच्या ठायीं भरपूर होतें. सिद्दी साताला आतां संशयाचें पिशाच्च घेरूं पहात आहे असें पाहून त्यानें मनांतल्या मनांत कयास बांधला कीं, ही वेळ सुलतानाविषयींदेखील सिद्दी साताच्या मनांत विष भरवून द्यावयाला बरी आहे; त्यामुळें जर आपलें नशीब उघडलें व सुलतान सिद्दी साताच्या अवकृपेच्या आगींत होरपळला गेला, तर—उंदेरीची किल्लेदारी मिळेल तेव्हां मिळेल, त्यापूर्वी थळची चौबुरुजी व सागरगड हीं दोन्ही ठाणीं अनायासें आपल्या ताब्यांत येतील. पण सुलतानाविरुद्ध काय बोलावें हें त्याला त्या वेळीं सुचेना. कारण, न जाणो, सुलतानाला जर हें कळलें तर—पुढें लाभ होईल तेव्हां होईल; पण त्यापूर्वी सुलतानच हात धुवून आपल्या पाठीला लागावयाचा !

अखेर 'पुन्हा वेळ येईल तेव्हां पाहूं' असें स्वतःशीं म्हणून सिद्दी याकूब मार्मिकपणें उत्तरला, "मालिक ! आपण काय किंवा सुलतान काय, खाशी मंडळी ! आमच्यासारख्या दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांनीं अशा बाबतींत कांहींच न बोलणें शहाणपणाचें ठरेल."

"बरें आहे. तूं सुलतानाचा आतांच्या आतां शोध करून त्याला घेऊन ये.

त्या हरामखोर बैराग्याचा बंदोबस्त करण्याच्या कामीं दिरंगाई करतां कामा नये त्याचा पाय जर सागरगडच्या टापूंत रुजला, तर अनर्थ होईल."

"जसा आपला हुकूम. पण मालिक! मी सुलतानाला आतांच आणूं कीं सकाळीं?"

"जा. आतांच्या आतां त्याला घेऊन ये."

"मालिकांच्या आरामांत व्यत्यय येईल म्हणून म्हणतों."

"तें कांहीं नाहीं. माझा एवढा मोठा जबरदस्त दुष्मन् माझ्या नाशावर टपून बसलेला आहे, त्याचा नायनाट केल्याशिवाय मला आराम मिळावयाचा नाहीं. जा. आतांच्या आतां सुलतानाला शोधून घेऊन ये. ह्या कामीं दिरंगाई उपयोगाची नाहीं."

सिद्दी याकूब यावर जास्त वाटाघाट न करतां सुलतानाच्या शोधार्थ बाहेर निघून गेला. तो दरवाजाबाहेर जातो न जातो तोंच सुलतान दरवाजाच्या बाहेर सुभानजीशीं बोलत उभा असलेला त्याला आढळला. दत्ताजीही त्यांच्याबरोबर होता. सुलतानानें सिद्दी याकूब भेटतांच त्याच्यापाशीं सिद्दी साताच्या भेटीविषयीं एकंदर हालहवाल विचारली, तेव्हां सिद्दी याकूबनें थोडक्यांत सर्व वृत्तान्त निवेदन केला. त्यावरून सुभानजीवर सिद्दी साताच्या कोपाची वीज कडाडणार अशी सुलतानाची व खुद्द सुभानजीचीही खात्री झाली! सिद्दी सातानें तांतडीनें आपला शोध चालविला आहे असें पाहून सुलतान तसाच आंत जावयाला निघाला.

सिद्दी याकूबच्या तोंडून ऐकलेल्या वृत्तान्तावरून सुभानजी फारच घाबरला होता. तो सुलतानाला हांक मारून हात जोडून म्हणाला, "पहा. किल्लेदारसाहेब! झाल्या गोष्टींत मी अगदीं निरपराधी आहे अशी आतां तरी तुमची खात्री झाली ना! आतां तुम्ही मालिकापाशीं आपला लाखाचा शब्द खर्च करून मला वांचविलें पाहिजे."

"मीं तुला वांचविलें असतें पण चांगुणा—"

"आजपासून चांगुणा तुमची झाली. मग तर झालें? ती माझी बहीण आहे असें या उप्पर मी मानीन, व माझ्या अंगीं आहे नाहीं तेवढी शक्ति-युक्ति खर्च करून तिला तुमच्या स्वाधीन करीन. पण मला वांचवा."

मनुष्य एकदां विषयवासनेच्या आधीन झाला कीं तो डोळस असूनही आंधळा बनतो. सुलतानही आज तसाच आंधळा बनला होता. सायंकाळपासून तो प्रभा-

त्तीच्या मोहपाशांत गुरफटून गेला होता. पण सिद्दी सातच्या हुकुमावरून प्रभावतीला इंचबर्डसाहेबाच्या आराममंदिरांत पाठविण्याचें कपाळीं आल्यामुळें त्याची पूर्ण निराशा झाली होती. प्रभावती इतकी तिखट, इतकी स्वाभिमानी, ती सुखानें इंचबर्डसाहेबाकडे जाण्याला कशी तयार झाली, हें गूढ तर खरेंच ! सिद्दी सातानें जी दासी इंचबर्डसाहेबाला बहाल केली होती, त्या दासीमार्फतच प्रभावतीला इंचबर्डसाहेबांच्या महालांत आणविण्यांत आलें होतें, अर्थात् ती त्या दासीची करामत होती. तिनें आपली करामत कशी लढविली हें आपणाला पुढें कळून येईलच. मात्र सुलतानानें तेव्हां निराशेनें हातपाय गाळले नाहींत. प्रभावती नाहीं तर चांगुणा तरी मिळविण्याच्या उद्योगाला तो लागला. चांगुणेवर त्याचा फार दिवसांपासून डोळा होताच. ती सायंकाळीं चौबुरुजीवर सुभानजीच्या वाड्यांत आलेली त्यानें पाहिली होती. सुभानजी घरीं नाहीं व भानाजी पिसाळही बेपत्ता आहे, चांगुणेला आपल्या जनानखान्यांत ओढून आणण्याला ही संधि चांगली आहे,असा विचार मनांत येतांच प्रभावती हातची गेल्यामुळें झालेलें दुःख विसरून सुलतानानें बजरंग-गडावरील सुभानजीच्या वाड्यांत कटवाले लपून बसले असतील ह्या सबबीवर त्या वाड्याला वेढा देऊन चांगुणेचाही शोध केला. पण घरांत सारा शुकशुकाट ! त्यावरून सुलतानाला इतका संताप आला कीं, त्या संतापाच्या भरांत त्यानें सुभानजीच्या वाड्याची होळी पेटवून दिली, व माचीवर आपल्या घरांत तरी चांगुणा सांपडेल अशा आशेनें तो तिकडे गेला. प्रभावतीच्या मोबदल्यांत नशीब काढण्यासाठीं धडपडणारा दत्ताजीहो त्याच्याबरोबरच होताच. अजूनही आजना उद्यां आपण साहेबाच्या महालांतून प्रभावतीला ओढून आणूं असें सुलतानला आश्वासन देऊन दत्ताजीनें त्याची मर्जी पुन्हा संपादन केली होती. ते दोघेही ताबडतोब रातोरात माचीवर जाऊन चांगुणेचा तपास करून आले. पण व्यर्थ ! लांगूलचालन करून स्वार्थ साधण्याला ही संधि बरी आहे, या वेळीं सुभानजीला शह दिला तर त्याच्या ताब्यांतील बजरंगगड आपल्या ताब्यांत येऊं शकेल असें पाहून चौबुरुजीवर सुलतानाबरोबर माघारा येतांना सुभानजीविषयीं सुलतानाचा शक्य तितका गैरसमज करून दिला होता व सुलतानही त्याच्या मायावी मधुर भाषणा-वर मोहित होऊन सुभानजीचा सत्यानाश करण्याला तयार झाला होता. सुभानजी-चा निकाल लागला व प्रभावती पुन्हा आपल्या हातीं आली कीं थळची दुय्यम किल्लेदारी सुलतानानें दत्ताजीला द्यावयाची असें त्याचें ठरलें होतें.

ते दोघे याप्रमाणें बेत ठरवीत चौबुरुजीवर येऊन पोंचतात तोंच बैराग्याला कैद करण्याच्या कामीं हतबल होऊन माघारा आलेला सुभानजी त्यांना मार्गांतच अचानक भेटला. नानाजी अपघातांतून शुद्धीवर येऊन भवानजीकडे वळला तेव्हां एक व्यक्ति त्याचा डोळा चुकवून हलकेच पुष्करिणीच्या बाजूला जाऊन दडून बसली, व भवानजीचें प्राणोत्क्रमण झाल्यावर नानाजी सागरगडाकडे निघाला; नंतर ती व्यक्ति त्याच्या मागोमाग चौबुरुजीकडे वळली, हें वाचकांना आठवत असेलच. तो सुभानजीच होता. दंगलींत मर्मस्थानीं धक्का बसल्यामुळें तो तिरिमिरी येऊन तेथेंच बेशुद्ध पडला होता; तो बऱ्याच वेळानें सावध झाला होता. दरम्यान बैरागी कुठें गेला व सिद्दी याकूबची काय अवस्था झाली याची त्याला मुळींच दाद नव्हती. शुद्धीवर आल्यावर त्यानें प्रथम आजूबाजूला नजर देऊन पाहिलें. तों तेथें भवानजी निश्चेष्ट पडला आहे व त्याचा घोडा त्याच्यावर छाया धरून उभा आहे, यापेक्षां आणखी कोणीही जाया झालेलें माणूस त्याला आढळलें नाहीं, यावरून सिद्दी याकूब बैराग्याला कैद करून घेऊन गेला असावा असा कयास त्यानें बांधला. इतक्यांत नानाजीची चाहूल लागतांच तो पुष्करिणीच्या बाजूला जाऊन लपून बसला. तेथून त्याला भवानजी व नानाजी यांचा सर्व संवाद ऐकूं आला. त्याच वेळीं नानाजीला कैद तरी करावें अथवा ठार तरी करावें असें त्याच्या मनांत आलें. पण तो एकटा पडल्या मुळें त्याचा नाइलाज झाला. आतां आपण अपजयानें काळें झालेलें तोंड घेऊन माघारें गेल्यास आपल्या विटंबनेला पारावार उरणार नाहीं असें सुभानजीला प्रथम वाटलें, व त्यानें प्रथम तेथून पळ काढण्याचा विचार केला होता. पण नानाजी व भवानजी यांचें संभाषण ऐकून आपण त्या बातमीच्या जोरावर नानाजीला पकडून देऊं शकूं, व आपलें नशीब पुन्हा उदयाला येईल अशी आशा त्याला पुन्हा वाटूं लागली. आतां, नानाजी सागरगडावर किल्लेदाराच्या म्हणजे प्रत्यक्ष आपल्या सासऱ्याच्या आश्रयाला गेल्याची बातमी देणें म्हणजे प्रत्यक्ष आपल्या सासऱ्याच्या नाशालाच कारण होणें होय असेंही त्याला क्षणभर वाटलें. शिवाय त्याची बायको पुरे महिने भरल्यामुळें बाळंतपणासाठीं माहेरीं गेली होती; व गड पाडाव होतांना तिच्या जिवालाही अपाय होण्याचा संभव होता. पण आपण तिच्या रक्षणाची जबाबदारी सिद्दी सात व सुलतान यांच्यावर टाकल्यावर काम भागेल अशी त्याला खात्री वाटत असल्यानें व गड पाडाव

झाल्यावर आपणाला तेथली किल्लेदारी मिळणार आहे हें आमिष त्याच्या पुढें असल्यानें, त्यानें आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. त्यानें सुलतान मार्गांत भेटतांच त्याला सर्व वृत्तान्त थोडेंसें तिखट–मीठ लावून निवेदन केला. त्यामुळें सुलतानाचें मन त्याच्याविषयीं बरेंच निवळलें, व सागरगड पाडाव करावयाचें ठरवून पुढील बेत निश्चितपणें सिद्दी साताच्या सल्ल्यानें आंखण्यासाठीं ते तिघेही सिद्दी साताकडे यावयाला निघाले. जयमहालापाशीं येईपावेतों त्यांचें संभाषण ह्याच विषयावर चाललें होतें, व सुलतानाच्या मनांत सुभानजीविषयीं उठलेलें काहूर तेवढ्या वेळांत बरेंच शांत झालें होतें. आपलें घर जळालें ही बातमी सुभानजीला पूर्वीच कळली होती. पण प्राणावर गदा आलेली टळली, तिथे घर जळलें म्हणजे आपलें पाप जळलें असेंच तो समजला.

सुलतान तरी इतक्या पडूपणानें सुभानजीशीं वागत होता याचें कारण चांगुणा! चांगुणेवर सुभानजीचें प्रेम आहे हें सुलतानाला माहीत होतें. त्यामुळें उघड उघड चांगुणा मिळविण्याचा प्रयत्न सुलतानाला करतां येण्याजोगा नव्हता. कारण सुभानजी हा कांहीं अगदीं सामान्य गडी नव्हता. त्याला सिद्दी सातापाशीं मान्यता होती, व तो उद्यां सागरगडचा किल्लेदार होणार होता, हें जाणून त्याला शक्य तों बरोबरीनें मान देणें हें सुलतान आपलें निरुपायाचें कर्तव्य समजत होता. पण कधीं तरी सुभानजी संकटांत सांपडेल व आपणाला चांगुणा प्राप्त करून घेण्याच्या बाबतींत त्या परिस्थितीचा उपयोग करून घेतां येईल, अशी संधि सुलतान पहात होता. सिद्दी साताचा सुभानजीविषयीं फारच गैरसमज झाला आहे व आतां तो सुभानजीचा बळी घेणार, हें जरी सिद्दी याकूबकडून मिळालेल्या ताज्या माहितीवरून निश्चित होतें, तरीही आपण सुभानजीच्या बाजूनें शब्द टाकून सिद्दी साताचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केल्यास तो वांया जाणार नाहीं असा सुलतानाला भरंवसा वाटत होता. म्हणूनच त्यानें ही संधि साधून सुभानजीपाशीं त्याच्या जीविताच्या मोलादाखल चांगुणेची मागणी करण्याचें धाडस केलें, व त्यांत त्याला कल्पनेबाहेर यश आलें. पण हें यश प्रत्यक्ष पदरीं पडेपावेतों त्याला सुभानजीची गरज होतीच. म्हणूनच तो त्या प्रसंगीं सुभानजीला अभय देऊन त्याच्याविषयीं सिद्दी साताचा झालेला गैरसमज दूर करण्यासाठीं प्रथम एकटाच आंत गेला. तोंवर सुभानजी, सिद्दी याकूब व दत्ताजी हे बाहेरच बोलत उभे होते.

प्रकरण अठरावें

# सुभानजीच्या मागें

कांहीं वेळानें पहारेकरी बाहेर आला व सुभानजी, सिद्दी याकूब आणि दत्ताजी ह्या तिघांनाही म्हणाला, "मालिकांनीं तुम्हां सर्वांना आंत बोलावलें आहे."

आतां कोणते भोग आपल्या वांट्याला येतात व कोणते नाहींत, याविषयीं सुभानजीची छाती धडधडत होती. आंत जातांना त्याचे पाय लटपटत होते. ते तिघेही आंत जातात न जातात तों सुलतानानें सुभानजीला बैठकखान्याच्या बाहेरील दरवाजांत गांठून हळूच त्याच्या कानांत सांगितलें, "हें पहा, मालिक जें जें काय सांगतील, त्याला मुकाटपणें मान तुकावीत जा."

"ठीक आहे." सुभानजी उत्तरला. त्याला बराच धीर आला

सुभानजी, सिद्दी सात व दत्ताजी हे तिघेही आंत जातांच सिद्दी साताला मुजरा करून बाजूला उभे राहिले. सिद्दी सात सुभानजीकडे पाहून गुरशांत म्हणाला, "सुभानजी! तुझ्यासारख्या नामर्दांना पुन्हा कामगिरीवर नेमणें हा गुन्हाच आहे खरा. पण पुन्हा एकवार तुला नशीब काढण्याची संधि द्यावी असें मला आतां सुलतानाच्या सांगण्यावरून वाटूं लागलें आहे."

सुलतानानें कबूल केल्याप्रमाणें सिद्दी साताची समजूत केली अशी सुभानजीची खात्री पटली व त्याचा चेहरा आनंदित झाला. तो लगेच सिद्दी साताला काकुळतीच्या स्वरांत म्हणाला, "मालिक! किल्लेदारसाहेबांनीं सर्व गोष्टी आपल्या कानांवर घातल्याच असतील, तेव्हां माझ्या तर्फेनें मी आणखी कांहीं बोलत नाहीं. आपण माझे मायबाप, आपण मला सर्व कसूर माफ करून पुन्हा पराक्रम करण्याची संधि देत आहां, यावेळीं मी आपल्याकडून शाबासकी मिळविण्याजोगी कामगिरी केली नाहीं, तर जातीचा अस्सल मराठाच नव्हे."

"चूप!" सिद्दी सात सुभानजीला दापीत म्हणाला, "मला तुझ्या जातीची थोरवी इथें नको आहे. जातीचा अस्सल मराठा तूं असतास तर पराजयानें काळें झालेलें तोंड दाखवावयाला पुढें आलाच नसतास. जातीचे अस्सल मराठे हातीं घेतलेल्या कामासाठीं मरतील पण मागें हटणार नाहींत. कनकेश्वरावर मीं हल्ला केला

तेव्हां ज्यांनीं कनकेश्वराच्या मंदिराचें रक्षण करण्यासाठीं आपल्या छातीचा कोट उभा केला, ते खरे मराठे. तुझ्याबरोबरचे शिपाई मेले, भवानजी मेला, ते जातीचे अस्सल मराठे खरे. असले दुस्मन पाहिले तरी त्यांच्याविषयीं कौतुक वाटतें. असा अस्सल मराठा एखादा मला वळला तरी तो अकरांना भारी असेल. अस्सल मराठा कधींतरी आपल्या देवाधर्माशीं व आपल्या मायदेशाशीं बेइमान होईल ? आणि असें पहा, मला येथें अस्सल मराठे नको आहेत व अस्सल मुसलमानही नको आहेत. कांहीं विचार न करतां माझा हुकूम अक्षरशः पाळणारे हुकुमाचे बंदे मला पाहिजे आहेत. इतके हुकमेहुकूम जे वागतील, ते माझे असें मी समजतों.–"

सुभानजीला येनकेन प्रकारेण स्वतःची बाजू सांभाळावयाची होती. तो निर्लज्ज-पणानें म्हणाला, " मग त्याप्रमाणें वागावयाला मी तयार आहें मालिक ! आपल्या आज्ञेव्यतिरिक्त जात–गोत–देव–धर्म मला कांहींही नाहीं. आजवर देखील मी इतक्या आज्ञाधारकपणेंच वागत आलों आहें. आपणाला आठवण असेल, बजरंग-बलीच्या देवालयाची मशीद करण्याचें आपण ठरविलें तेव्हां आपल्या पदरचा कोणताही मुसलमान त्या कार्याचें पुढारीपण घेण्याला पुढें सरसावेना." तो सुलतान व सिद्दी याकूब यांच्याकडे वळून पहात म्हणाला, " हे दोघेही तेव्हां थोडेसे भ्यालेच होते. त्या हल्ल्यांत आपल्या हुकुमाप्रमाणें मीच धिटाईनें पुढें झालों. बजरंगबलीची मूर्ति मीं माझ्या हातानें पाषाणाच्या आसनावरून ढळविली, तेव्हांच देवळाची मशीद करण्याला ह्या दोघांना धैर्य आलें. दूर कशाला ? आजचीच गोष्ट घ्या. आज कटवाल्यांचा शोध करण्यासाठीं त्या देवळावर हल्ला करण्याच्या कामींदेखील मलाच पुढाकार घ्यावा लागला. त्या कार्यांत मीं प्रत्यक्ष माझ्या भाच्याला ठार केलें. आतां, माझा डाव हुकला त्याला इलाज नाहीं. पण म्हणून कांहीं माझ्या नेकीला नाट लागत नाहीं."

सिद्दी सात म्हणाला, " ही नेकी कीं बद्नेकी, हें आतां अनुभवानें ठरावयाचें आहे. आतांच त्याची परीक्षा व्हावयाची आहे. त्यासाठीं मी तुझ्यावर फार महत्त्वाच्या कामगिरीची जबाबदारी टाकणार आहें."

" आपण जी कामगिरी मला सांगाल, ती पार पाडण्यासाठीं मी माझा देव-धर्म-जात-गोत ह्या सर्वस्वावर पाणी सोडून पुढें यावयाला तयार आहें." सुभानजी वाढत्या उत्साहानें म्हणाला.

सिद्दी सात पुढें म्हणाला, "कटवाल्यांनीं कटाचें जाळें फार दूरवर पसरलेलें आहे व सागरगडचा सारा टापू हें त्यांचें घर बनलें आहे. तुझा सासरा, त्याची मंडळी, भानाजी पिसाळ, त्याची पोरटी, तो बैरागी, तो नानाजी सुर्वे ही सारी हरामखोर मंडळी एक आहे, व ज्याअर्थी तो बैरागी आज सागरगडाकडे गेला आहे, त्याअर्थी तो त्या टापूंतील लोकांना बंडाची चिथावणी देऊन गड लढविण्याची शिकस्त करील यांत संशय नाहीं. ह्या चौबुरुजीवरदेखील त्या हरामखोरानें चांगलीच फितवाफितवी केलेली दिसते. हे सर्व काफर जर एकदम बंडाला प्रवृत्त झाले, तर सागरगड व तेवढा सारा टापू आमच्या हातचा जाऊन मोठा कठिण प्रसंग ओढवेल. आजवर तो बैरागी जेथें जेथें गेला, तेथें तेथें त्यानें बंडाचा वणवा चेतवून मला सतावून सोडलें आहे. त्याला त्या टापूंतील लोकांना चिथावणी देण्याला अवसर सांपडण्यापूर्वीच आम्हांला खबरदारी घेतली पाहिजे. एकदां पेशव्यांचें सैन्य तेथें येऊन ठाणें देऊन बसले कीं मग आमचा कांहीं इलाज चालणार नाहीं. त्यापूर्वीच आम्हीं तिकडील नाकेबंदी केली पाहिजे."

सुभानजी वाढत्या उत्साहानें म्हणाला, "अगदीं बरोबर मलाही तसेंच वाटतें. आपण तांतडी केली तरच हा डाव साधेल. नाहीं तर एकदोन दिवसांत चिमाजी-अप्पा आपल्या प्रचंड सैन्यासह तेथें येईल. मानाजी आंग्रे तर शेजारींच आहे. दोघांचा जमाव एकत्र झाला तर मग उगाच नखाच्या कामाला कुऱ्हाडी लागतील."

"म्हणूनच तुला मी महत्त्वाची कामगिरी सांगतों. मला त्यांच्या जुटीची पर्वा नाहीं. माझी दहा बारा हजार फौज चोहोंबाजूंनीं गडासभोंवार जमा होत आहे. एवढ्या प्रचंड फौजेला मराठ्यांची फौज चण्याकुरमुऱ्यांनाही पुरणार नाहीं. मात्र तूं आतांच्या आतां गडावर जाऊन प्रथम आपल्या सर्व मंडळीला वश करून घे. मुख्य भय तुझ्या सासऱ्याचे. तो जर वश झाला तर गड पाडाव करणें मुळींच अवघड नाहीं. आंग्र्यांचे कबिले गडावर रवाना झाले आहेत असें ऐकतों. साधला डाव तर ती मंडळीही अनायासें ताब्यांत येईल. पण पहिली गोष्ट त्या बैराग्याचा नायनाट करावयाचाही. किल्लेदार वळला तर उत्तमच; पण तो जर आमच्या विरुद्ध जाऊं लागला—"

"तर मग तो माझा सासरा नव्हे; तो माझा शत्रु. मग त्याला शासन करण्याला मी मुळींच मागें पुढें पहाणार नाहीं. पण तेवढा प्रसंग येणार नाहीं असें मला वाटतें." सुभानजी म्हणाला.

२८६३०१ 9412

" हा डाव साधला तर सुभानजीच्याच हातून साधेल." सुलतान सिद्दी साता-कडे वळून म्हणाला.

सिद्दी सात सुलतानाकडे वळून म्हणाला, " सुभानजीनें याप्रमाणें गडावर जाऊन भेद करावा, व तूं तावडतोबीनें तेथें जाऊन रेवस, चरई वगैरे ठिकाणीं आपलें सहा हजार सैन्य आहे तें घेऊन गडाला वेढा द्यावा, व नाकेबंदी करावी. तुला मीं ह्या मोहिमेपुरता माझा सेनापति नेमीत आहें."

सिद्दी याकूबनें मध्येंच विचारलें, " आणि मालिक ! आपण मला कोणती कामगिरी सांगणार ? "

" तूं माझ्याबरोबर रहा. तुला मी निराळी कामगिरी सांगणार आहें " सिद्दी सात पुन्हा सुभानजीकडे वळून म्हणाला, " सुभानजी ! तुला मी ही अखेरची संधि देत आहें. तुझ्या हातून ही कामगिरी बिनबोभाट पार पडली, तूं कटवाल्यांना गडावर आंतल्या आंत नेस्तनाबूद करून गडावर आमचें हिरवें निशाण फडकवलें-स, कीं मग तूंच तेथला किल्लेदार होशील. त्याप्रमाणेंच भानाजीचा नायनाट तूं केलास, कीं त्याच्या पोरीची तुझ्याशीं आम्ही बादशाही थाटानें शादी करून देऊं. त्याबरोबरच येवढें सांगून ठेवतों कीं, जर तुझ्याकडून एवढी कामगिरी बजावण्यांत कसूर झाली, तर गड आम्ही जिंकू तो जिंकूंच, —तशीच वेळ आली तर गड पाडून जमीनदोस्त करूं, व तुझा परिणाम काय होईल हें निराळे सांगावयाला पाहिजे असें नाहीं." सिद्दी सात म्हणाला.

" हें सर्व मला कबूल आहे " सुभानजी म्हणाला. " गड जर सामोपचारानें किल्लेदारानें माझ्या स्वाधीन केला नाहीं, तर गडाला आपला वेढा पडणारच आहे; बाहेरून आपला हल्ला चढला, कीं तो आंतून परतविला जाणार नाहीं एवढी खबर-दारी मी घेतों. एक किल्लेदार वश झाला नाहीं तरी गडावरील सैनिक व शिपाई-प्यादे मला सारे वश आहेत त्यांच्या साह्यानें मी सर्व कटवाल्यांना हां हां म्हणतां पकडीन. मात्र मालिक ! तशा परिस्थितींतही मी एक विनंति आपणाला आगाऊ करून ठेवतों. माझी बायको गडावर आहे, तिच्या केंसालाही धक्का लागणार नाहीं असें आपलें अभय मला पाहिजे आहे."

" तेवढें अभय तुला आहे. तूं आतांच्या आतां गडावर जाऊन आपल्या उद्योगाला लाग." सिद्दी सात लगेच सुलतानाकडे वळून म्हणाला, " आणि सुल-

तान ! तूं आतांच्या आतां वेढ्याची तयारी करण्यासाठीं नीघ. आम्ही तुझ्या मागोमाग येतोंच."

"पण मालिक ! मला आपण कोणती कामगिरी सांगणार आहां ?" सिद्दी याकूबनें पुन्हा विचारलें. त्याला वाटलें, आपला बैराग्याला पकडण्याच्या कामीं एकवार पराजय झाला, म्हणून सागरगडच्या मोहिमेंत मालिक आपणाला अजिबात कामांतून काढतात कीं काय ?

पण सिद्दी सातानें त्याला पुन्हा पूर्वींचेंच उत्तर दिलें. त्यामुळें सिद्दी याकूबला थोडा धीर आला. त्याला सिद्दी सात कोणती निराळी कामगिरी सांगणार आहे याचा सुभानजी व सुलतान यांना मुळींच बोध होईना. पण तो खुलासा सिद्दी साताला विचारण्याचें धाडसही त्यांना होईना.

आतां सिद्दी सातापाशीं ज्याची मुळींच दाद लागली नाहीं असा दत्ताजी मात्र बाकी राहिला होता. तो हळूच सुलतानाला बाजूला घेऊन म्हणाला, "किल्लेदार-साहेब ! एकटाच सुभानजी जर गडावर गेला, तर तो आपल्या सासऱ्याशीं दगलबाजी करून व औट घटकांत आपल्या फितुरीचा पराक्रम गाजवून साऱ्या कट-वाल्यांना कदाचित् धुळीला मिळवील, व गडावर सिद्दीच्या सत्तेचें निशाणही रोंवील. आणि मग सिद्दी सात त्याला तेथली किल्लेदारीही देईल. मला स्वतःला त्याच्याविषयीं इतका विश्वास वाटत नाहीं. तो ऐन वेळीं शत्रूला फितूर होऊन आपणां सर्वांना तोंडघशीं पाडील असाच माझा होरा आहे. पण त्यानें सिद्दी साताच्या भयानें व तेथली किल्लेदारी बळकावण्याच्या आशेनें हें सारें केलें, तरी इतका विजय पदरीं पडल्यावर तो चांगुणा आपणाला अर्पण करून आपलें वचन खरें करील असें तुम्हांला वाटतें का ? त्याचा कैक दिवसांपासून चांगुणेवर डोळा आहे, व तिच्या प्राप्तीसाठीं तो भानाजीलाही क्षमा करण्याला तयार आहे हें तुम्ही जाणतांच."

सुलतानाच्या कानांत याप्रमाणें विष ओतण्यांत दत्ताजीचा अंतस्थ हेतु निराळा होता. त्याला मथुराबाई आंग्रे व संभाजी आंग्र्याचा कबिला सागरगडावर गेला असल्याचें माहीत होतें. 'संभाजीनें माझ्या जन्माची होळी पेटविली, तशी मी त्याच्या दौलतीची होळी पेटवीन; व त्या होळींत त्याला त्याच्या परिवारासह जाळून भस्म करीन, तरच नांवाचा दत्ताजी कनोजे' अशा ईर्षेनें त्याच्या आज-वरच्या साऱ्या हालचाली चालल्या होत्या. ती ईर्षा पुरी करण्यासाठीं त्याला स्वतःला सागरगडावर जावयाचें होतेंच. शिवाय त्या दगलबाजींत आपणाला

आर्थिक किफायतही सुलतानाच्या साह्यानें चांगली करून घेतां येईल अशीही त्याची खातरजमा झाली होती. ही किफायत सुभानजीला बाजूला लोटून आपणाला करून घेतां येईल, असा आत्मविश्वासही त्याला वाटत होता. हें सारें साधण्याला त्याला सुभानजीच्या संगतीनें व अधिकारानें गडावर प्रवेश पाहिजे होता. तो प्रवेश मिळविण्यासाठीं त्याची ही सारी धडपड चालली होती. ही महत्त्वाकांक्षा काटेतोल खरेपणानें बोलून दाखविण्याची सोय नसल्यानें त्यानें चांगुणेचें नुसतें बुजगावणें पुढें केलें होतें.

हा दत्ताजीचा डाव अचूक साधला. त्याचा युक्तिवाद सुलतानाच्या विकारवश मनाला ताबडतोब पटला. त्यानें लगेच दत्ताजीला संमति देऊन विचारलें, "तूं म्हणतोस तें खरें आहे, पण आतां यांत मीं काय करावें असें तुला वाटतें ?"

"मला सुभानजीबरोबर गडावर जावयाला मालिकांकडून परवानगी मिळेल असें करा, कीं पुढचें सारें कारस्थान मी बिनबोभाट पार पाडतों. तुम्ही माझ्यासाठीं मालिकांपाशीं एक फुकाचा शब्द खर्च करा, कीं सारें काम आपोआप सुरळितपणें होत आहे." दत्ताजी म्हणाला.

ते दोघे एका बाजूला हळूहळू कांहीं बोलत आहेत असें पाहून सिद्दी सातानें सुलतानाला विचारलें, "सुलतान ! काय खलबत चाललें आहे ?"

सुलतान म्हणाला, "मालिक ! आणखी एक महत्त्वाची बाब मी आपल्या कानावर घालणार आहें." इतक्यांत सुभानजी त्याच्याकडे टवकारून पाहूं लागला. तेव्हां तो सिद्दी साताला म्हणाला, "मालिक ! सुभानजीला आपल्या कामगिरीवर तांतडीनें जाऊं द्या. कटवाल्यांना एक क्षण जास्त फुरसत मिळाली तरी तें आपल्याविरुद्ध एवढें कारस्थान उभारतील कीं तें पुढें आपणालाच जड जाईल."

"खरें आहे." सिद्दी सात सुभानजीला म्हणाला, "सुभानजी ! तूं आपल्या कामगिरीवर जा कसा !"

सुलतान म्हणाला, "सुभानजी ! तुझ्यासारखाच हा दत्ताजीही पट्टीचा कारस्थानी आहे. यालाही मी मालिकांच्या परवानगीनें तुझ्या मदतीला लौकरच पाठवितों. तूं पुढें जा."

सुभानजीला हा एकंदर प्रकार कांहींसा संशयास्पद वाटला. पण सुलतान हा त्याचा उपकारकर्ता होता. त्याच्या शब्दाला मान देऊन त्याला कामगिरीवर निघून जावें लागलें.

## प्रकरण एकोणिसावें

# दत्ताजी गरळ ओकला !

सुभानजी निघून गेल्यावर सुलतान सिद्दी साताला म्हणाला, "मालिक ! सुभानजी आपल्या पक्षाचा आहे खरा; पण तो बाह्यात्कारीं तरी आंग्र्यांच्या बाजूचाच आहे. तो ऐन वेळीं त्यांना सामील होणार नाहीं कशावरून ? सुभानजी मोहाला बळी पडणें शक्य आहे. त्या टापूंत अझून मराठ्यांचा चांगलाच जोर आहे. शिवाय चिमणाजीअप्पा मोठी फौज घेऊन तो टापू जिंकण्यासाठीं लौकरच कोंकणांत उतरून येणार हेंही आपणाला माहीतच आहे. याप्रमाणे सारे मराठे एक झाले तर सुभानजी त्यांच्याशीं इमानदारी दाखवून त्यांना सामील होऊन गड अचानक त्यांच्या स्वाधीन करणार नाहीं कशावरून ?"

"ही शंका मलाही होती व आहेही; पण मीं तुझ्याच शिफारशीवरून तर सुभानजीला त्या कामगिरीवर पाठविलें !" सिद्दी सात म्हणाला.

आपलीच शिष्टाई आपल्या गळ्यांत आली असें पाहून सुलतान जरा गोंधळला. पण तो गोंधळ बाहेर न दाखवितां त्यानें मोठ्या शिताफीनें आपली बाजू सांवरून घेतली. "मालिक ! मीं त्याची शिफारस केली खरी; आणि आपण जी कामगिरी सुभानजीवर सोंपविली आहे, ती त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाच्याही हातून तडीस जाण्यासारखी नाहीं; पण त्याच्यावर पूर्णपणें आपण विश्वासून बसणें अंमळ धोक्याचें आहे यास्तव मी म्हणतों, आपण ह्या दत्ताजीला त्याच्याबरोबर त्याच्यावर नजर ठेवण्यासाठीं पाठवावें, म्हणजे त्याला फितूर होण्याला अवसर सांपडणार नाहीं. संभाजी आंग्र्याचे कबिले गडावर रवाना झाले आहेत—"

"असें ?"

"होय मालिक !" दत्ताजी मध्यें तोंड घालून म्हणाला, "मानाजी आंग्र्याच्या भयानें मथुराबाई आंग्रे संभाजीच्या कबिल्यासह गडावर निघून गेली आहे. आणि मला वाटतें, ती मंडळी जर आपणाला कैद करतां आली, तर त्या जोरावर सर्व आंग्र्यांनाच काय, पण सर्व मराठ्यांना आपण दांतीं तृण धरून शरण आणूं शकाल. त्या मंडळींच्या सुटकेसाठीं आपण घालाल त्या अटी मान्य करून आंग्र्यांना व मराठ्यांना आपणाशीं तह करावा लागेल. आपण त्या तहांत

जंजिऱ्याची गादी मागितली तरी ती मराठ्यांना आपल्या स्वाधीन करावी लागेल. मात्र ती मंडळी आपल्या हातीं सांपडली पाहिजे."

अगदीं साध्या माणसाच्या डोक्यांतून निघालेला अगदीं साधा विचार. पण तो सिद्दी साताला तंतोतंत पटला. तो म्हणाला, " ही मसलत अगदीं बरोबर आहे."

दत्ताजी म्हणाला, " पण ती साधली तर ! आपण जर ही कामगिरी किल्लेदार म्हणतात त्याप्रमाणें मजवर सोंपविली, तर मी ती बिनतक्रार पार पाडीन."

" पण—"

" अशी शंकाच आपणाला येण्याचें कारण नाहीं." दत्ताजी म्हणाला, " मालिक ! माझ्या सचोटीविषयीं आपणाला शंकाच घ्यावयाला नको. आंग्ऱ्यांनीं माझ्या उभ्या जन्माची कशी होळी पेटविली आहे हें आपण जाणतांच. ह्या जगांत मला जगण्यालाही हक्क नाहींसा त्यांनीं केला आहे. त्यांनीं माझ्या घरादाराची राख-रांगोळी केली, माझी वतनवाडी जप्त केली. त्यांच्या छळामुळें माझीं बायकोपोरें अन्नान्नदशा होऊन दाही दिशा भीक मागत वणवण हिंडतां हिंडतां तडफडून मरून गेलीं. अशी माझी समूळ वाताहत त्यांनीं केली, मग त्यांची वाताहात मीं कां करूं नये ! ह्या जगांत आतां खरें पाहूं जातां आंग्ऱ्यांवर सूड घेण्याशिवाय दुसरें तिसरें कांहींच कर्तव्य मला उरलेलें नाहीं. हां, मला संसाराचा व ऐहिक सुखांचा मोह अगदींच नाहीं असें नाहीं. आपल्या कृपेनें मला आपल्या पदरीं आश्रय मिळाला, एखादा हुद्दा व एखादी इनामत मिळाली, तर मी पुन्हा संसार थाटून सुखी होईन, व इमानें इतबारें आपल्या दौलतीची नोकरी करीन. आपण मला एकवार संधि देऊन अनुभव तर पहा ! पण ह्या साऱ्या गोष्टी नंतरच्या; मला प्रथम आंग्ऱ्यां-वर सूड घ्यावयाचा आहे. मी उंदेरीला होतों, व तेथें फितूर करून तो किल्ला आपल्या स्वाधीन केला. तो केवळ सूडबुद्धीनेंच. तो किल्ला आपण इंग्रजांना दिला ती गोष्ट निराळी. पण तेवढा सूड मीं माझ्या वैऱ्यांविरुद्ध घेतला, तेवढेंच माझ्या मनाला समाधान वाटलें. आतां ओघालाच आलें म्हणून सांगतों, मालिक ! नानाजी सुर्वे माझा शत्रू नाहीं; उंदेरीचा किल्लेदारही माझा शत्रू नव्हता; व प्रभा-वतीला तर मीं माझ्या पोटच्या मुलाप्रमाणें मानीत होतों—नव्हे, अजूनही मानतों. असें असतांही मी माझ्या धन्याशीं बेइमान झालों, व नानाजीला मी शत्रू मानतों, याचें कारण ते आंग्ऱ्याच्या पक्षाचे लोक. प्रभावतीला मथुराबाईनें आपल्या पोटच्या मुलीप्रमाणें मानलें, तिच्या जन्माची माती केल्यानें मथुराबाईला

व नानाजी सुर्व्यालाही दुःख होईल अशी माझी खात्री आहे, म्हणूनच मीं प्रभावतीचें नानाजीशीं लग्न होण्याच्या कामीं विघ्न आणलें, व तिला किल्लेदाराच्या स्वाधीन करून बाटविण्याला तयार झालों. तिला एवढ्याचसाठीं हुडकून फुसलावून एथवर आणण्यासाठीं मला किती श्रम पडले तें माझें मला माहीत. ती या नाहीं तर त्या मार्गानें एकदांची भ्रष्ट झाली, कीं माझ्या मनाचें समाधान झालें. तरीही ही वार्ता मी नानाजीच्या व मथुराबाईच्या कानांवर घालून त्यांचे चेहेरे कसे खिन्नावतात तें पाहीन, तेव्हां माझ्या मनाला खरा आनंद होईल; आणि आंग्र्यांच्या कबिल्याला मी पेंचांत आणूं शकलों, तर माझ्या आनंदाला पारावार उरणार नाहीं. तो कबिला आपण सफा कापून काढला किंवा बाटविला तरी वाहवा; त्याला इरेला घालून आंग्र्यांची दौलत धुळीला मिळविली तरी वाहवा! एवढें माझें आंग्र्यांशीं हाडवैर असतांना मी त्यांना साह्याय्य करीन असें आपणाला वाटतें का ?"

सिद्दी सात म्हणाला, "पण पेशवे तुझे हितकर्ते आहेत, स्वामी तुझा गुरु आहे."

"त्या रामावतारांतील गोष्टी होत्या." दत्ताजी खदिरांगाराप्रमाणें लाल होऊन म्हणाला, "एक काळ असा होता कीं, मी पेशव्यांना व स्वामीला मानीत होतों; पण पेशव्यांनीं किंवा स्वामीनें तरी माझ्यासाठीं काय केलें आहे ? त्यांनीं मला आपल्या पदरीं आश्रय दिला नाहीं; ज्या आंग्र्यांनीं मला लाथाडलें त्याच आंग्र्यांच्या पायांवर मला त्यांनीं पुन्हा क्षमायाचनेसाठीं लोटांगण घालावयाला लावलें, व पुन्हा अपमान-उपहास-विटंबना माझ्या वांट्याला आणली. मग मी तरी त्यांचा मुलाहिजा कशाला धरूं ? तें कांहीं नाहीं. आतां पेशवे माझे कोणी नाहींत, आंग्रेही माझे कोणी नाहींत, स्वामी माझा कोणी नाहीं; त्या सर्वांचे शत्रु तेवढे माझे. याउप्परही आपला माझ्यावर मी काफर म्हणून विश्वास बसत नसेल तर आपण मला मुसलमान व्हावयाला सांगा. त्यालाही मी तयार आहें. आपण काय पाहिजे तें करावयाला सांगा, पण माझी सूडाची हौस एकदां भागवा. माझी कामगिरी पाहून मग पाहिजे तर मला आधार द्या किंवा देऊं नका; पण एवढी संधि मला द्या. आपल्या तोंडानें अशा गोष्टी बोलणें नामुष्कीचें होय. म्हणून मीं रात्रौ आपणापाशीं व किल्लेदारापाशींही हा परिस्फोट केला नाहीं; पण मनांतली गोष्ट साध्य होण्याचा समय इतका समीप आलेला पाहून मला राहवेना, म्हणून आतां बोललों."

सिद्दी सात, सुलतान व सिद्दी याकूब हे तिघेही दत्ताजीचे जळजळीत बोल

ऐकून अगदीं स्तंभित झाले. दत्ताजी हा एक माथेफिरू आहे अशी सिद्दी साताची चालंबाल खात्री झाली. पण त्याचा तो माथेफिरूपणा आपणाला पोषक आहे असें पाहून सिद्दी सातानें त्याची पाठ थोपटली व त्याला आश्वासन दिलें, “ दत्ताजी ! तुझ्यासारख्या तेजस्वी माणसाला आंग्र्यांनीं गमावलें, ही घोडचूक केली; पण त्या घोडचुकींतून आमच्या दौलतीची आबादानी व तुझा भाग्योदय व्हावा असा अल्लाच्या दरबारांतील न्याय दिसतो. कांहीं हरकत नाहीं. मी तुला तुझी प्रतिज्ञा पूर्ण करावयाला सदर परवानगी देतों. इतकेंच काय, पण जर तुझ्या चतुराईनें गड आमच्या हातीं लागून आंग्र्यांचा कबिलाही हातीं लागला, तर मी सुभानजी-ला बाजूला सारून तुलाच तेथली किल्लेदारी देईन, व आमच्यांतल्या एखाद्या शहाजादीशीं तुझी शादी करून देऊन तुला एवढ्या मान्यतेला चढवीन कीं, तुझें तें मानवैभव पाहून सर्व मराठ्यांनीं लाजेनें खालीं माना घालाव्या.”

“ बस्स ! मालिक ! मला एवढेंच पाहिजे होतें.” दत्ताजी संतुष्टपणानें सिद्दी साताला मुजरा करून म्हणाला.

“ मग मालिक ! मी सुभानजीला भेटून त्याच्याबरोबर दत्ताजीलाही गडावर पाठवून देतों.” सुलतान म्हणाला.

“ जरूर ! जलदीनें हें काम करा.” असें म्हणून सिद्दी सातानें सुलतान व दत्ताजी ह्या दोघांनाही निरोप दिला. तो निरोप घेऊन जातांना सुलतान व दत्ताजी यांच्या आनंदाला पारावार नव्हता.

ते दोघे बाहेर गेल्यावर सिद्दी सात सिद्दी याकूबला जवळ घेऊन म्हणाला, “ याकूबखान ! तुला मी आतां जी कामगिरी सांगणार आहें, ती फार महत्त्वाची आहे. सागरगडचा वेढा अशा सरळ उपायांनीं यशस्वी होईलच असें मला सांगवत नाहीं.”

“ मला वाटतं, मालिक ! होईल.”

“ होईल; पण कदाचित् होणारही नाहीं. नेम काय सांगावा ? पेशव्यांची टोळ-धाड पुन्हा कोंकणांत आली नसती, म्हणजे एक सागरगडच काय पण गोवळ-कोटापासून सागरगडापर्यंतचे सारे गड मीं पटावरील सोंगट्यांप्रमाणें पटापट जिंकले असते.”

“ आणि पेशवे आले तरी आपणाला डर कसली ! आपण त्यांचा हां हां म्हणतां धुव्वा उडवूं.”

" मूर्ख आहेस ! तुला कांहींच अक्कल नाहीं. मला ह्या राजकारणांत तुझी सल्ला नको आहे. माझ्या हुकुमाची अक्षरशः अंमलबजावणी व्हावयाला हवी आहे. तूं उत्तम सांगकाम्या आहेस अशी अशी माझी खात्री असल्यामुळें मीं तुला विश्वासांत घेतला, तो तूं माझ्या शब्दाला शब्द देतोस ! निमूटपणें मी काय सांगतों तें ऐक." सिद्दी सात एकदम खवळून म्हणाला.

सिद्दी याकूब त्याला सिद्दी सातानें खासगी कामगिरीसाठीं ठेवून घेतल्यामुळें घमेंडखोरीनें धुंदावत चालला होता. ती त्याची धुंदी जितक्या झपाट्यानें चढली होती, तितक्या झपाट्यानें उतरली. तो एकदम गोगलगाय बनून दोन्ही हात जोडून म्हणाला, " मालिक ! कसूर माफ ! हा बंदा हुकमेहुकूम आपली नोकरी बजावयाला तयार आहे. ती नोकरी बजावतांना माझी गर्दन गेली तरी बेहेत्तर ! माझ्या कर्तबगारीवर आपला फारसा विश्वास नसला तरी मी अस्सल मुसलमान आहें, सिद्दीच्या अवलादीचा आहें. मी जबान पालटणार नाहीं, व इमान सोडणार नाहीं."

" तूं अस्सल मुसलमान आहेस, म्हणूनच सुभानजीसारख्या काफरापेक्षां व सुलतानासारख्या बाटग्या उपऱ्या मुसलमानापेक्षां तुझ्यावर माझा जास्त विश्वास आहे."

" आपकी मेहेरबानगी मालिक !" सिद्दी याकूब पुन्हा खुलून म्हणाला, " काय तो हुकूम व्हावा."

" तूर्त हुकूम एवढाच कीं,—तूं तुझ्यासारखेच इमानी, धर्मासाठीं गर्दन उतरून द्यावयाला तयार असणारे दोनशें-चारशें-पांचशें जेवढे गाजी मिळतील तेवढे जमा कर."

" बरें; पुढें ! "

" पुढचें पुढें. एवढी निधड्या छातीच्या गाजींची तुकडी तर निवडून काढ !"

" मालिक ! एवढें काम मी करतों; पण मला वाटतें—कसूर माफ !"

" सांग, काय तें सांग."

" आपण कप्तानसाहेबांना सांगून उंदेरीची मदत मिळविली तर आपणाला तेथून अशा दोनशें व पांचशेंच काय हजार कडव्या मुसलमान गाजींचा पुरवठा होऊं शकेल. येथली निवडक फौज आतां किल्लेदाराबरोबर जाणार तेव्हां—"

" तें तर मी करतोंच. साधलें तर मी तुला उंदेरीची किल्लेदारीच कप्तानसाहेबा-

कडून देववितों, म्हणजे कांहींच हरकत नाहीं. तेवढ्यासाठीं मी पाहिजे तर ही चौथुरुजीदेखील इंग्रजांच्या स्वाधीन करीन, किंवा खांदेरी जिंकण्याच्या कामीं त्यांना मदत करण्याचें ठरवीन. पण तूं अगोदर एवढी कामगिरी कर."

"मी जरूर करतों मालिक!"

"पण याचा कोठेंही बोभाटा होतां कामा नये. सुलतानालादेखील ह्या बेताची कुणकुण लागतां कामा नये. याद राख. हा बेत तुला कीं मला माहीत. जर का बातमी बाहेर फुटली, तर मात्र तुझी गर्दन उडवीन."

"मालिक! मी माझ्या मनाशीं देखील गुणगुणणार नाहीं. मग तर झालें?"

"बस्स! आतां कामगिरीला लाग. ही तयारी ताबडतोब झाली पाहिजे."

सिद्दी याकूब खुललेल्या अंतःकरणानें मालिकाला त्रिवार मुजरा करून आपल्या कामगिरीवर निघून गेला.

सिद्दी सात तसाच उठून त्या महालांत येरझारा घालतां घालतां स्वतःशींच बोलूं लागला, "बस्स! हा एकच उपाय तसाच प्रसंग आला तर सर्व मराठ्यांची दिशाभूल करून गड पाडाव करण्याला उपयोगी पडेल. आणि तो माझा कट्टा दुष्मन-तो बैरागीदेखील-तिथें दर्शनाला आल्यावर अचूक नेस्तनाबूत करतां येईल. सारे कटवाले सागरगडावर कोंडी करून रहातील हें शक्यच नाहीं. निदान गडाला आम्ही वेढा देऊन बसतों असें पाहातांच तरी त्यांना बाहेर यावेंच लागेल. आणि बाहेर आले म्हणजे त्यांना कनकेश्वराच्या टेंकडीशिवाय दुसरें सुरक्षित स्थान कोणतेंच नाहीं. तो बैरागी तर गडावर वस्ती खास करणार नाहीं. अष्टौप्रहर सर्व हिंदूंना सिद्दीविरुद्ध चिथविण्यासाठीं धर्माभिमानाच्या जळजळीत उपदेशाची पेटती चूड हातीं घेऊन हिंडणें हा त्याचा व्यवसाय. तो गडाच्या तटबंदींत थोडाच स्वतःला डांबून घेणार आहे? तो आजूबाजूच्या खेड्यांतून हिंडत रहाणार, व कनकेश्वराच्या देवालयालाच आपला बालेकिल्ला बनविणार. त्याला एकदां गांठून ठार केला, कीं मराठ्यांच्या अंगचा चेव गेला. त्यांचा धर्माभिमान कोमेजूं लागला असें समजावयाला मुळींच हरकत नाहीं."

"ही ब्याद कोंकणांत उतरण्यापूर्वी कोंकणपट्टींतील मराठ्यांच्या अंगीं इतका धर्माभिमान कोठें होता? उभ्या कोंकणपट्टींतील हिंदवीचें सौभाग्य जें परशुरामाचें देवालय, तें मीं लुटून जाळून बेचिराख केलें,-तेथल्या सर्व देव-ब्राह्मणांची विटंबना केली, हातीं सांपडलीं तेवढीं हिंदूंचीं बायकामुलें बाटवून

गुलाम म्हणून माझ्या सैनिकांना वांटून टाकलीं, तेव्हां उभी कोंकणपट्टी हळहळली, रडली, कढली, पण कितीसे मायेचे पूत माझा प्रतिकार करण्यासाठीं पुढें आले ? बजरंगबलीचें देवालय भ्रष्टवून त्याची मशीद बनविली. तेव्हां आजूबाजूचे सर्व कोंकण्ये कसे भित्र्या भागूबाईप्रमाणें आपल्या घरांचे दरवाजे लावून भीतीनें अर्धमेले होऊन बसले ! बरें, जाज्वल्य धर्माभिमान नाहीं, पण ज्वलज्जहाल देशाभिमान त्यांच्या अंगीं आहे म्हणावें, तर बाजीराव पेशवा मारे चंग बांधून आमच्या पारिपत्यासाठीं दोनदां कोंकणपट्टींत घिरट्या घालून गेला. मराठ्यांचे इतके सरदार आज इतके दिवस—नव्हे, इतकीं वर्षें—कोंकणपट्टींत ठाणें देऊन बसले आहेत, हिंदुपद-पादशाहीच्या स्थापनेसाठीं सर्वांचा मारे इतका अट्टहास चालला आहे, तरी त्यांच्या भगव्या झेंड्याखालीं सर्व मराठे एकदिलानें कोठें जमा झाले ? पेशव्यांचें सैन्य एवढें प्रचंड, कुबेरासारखे धनवान आंग्रे त्यांचे मदतनीस, एकाहून एक पराक्रमी मराठे सरदार आमची सत्ता कोंकणपट्टींतून कायमची उलथून टाकण्यासाठीं आपापल्या सरंजामानिशीं वाघांसारखे धावून आले; पण त्यांनीं कोंकणपट्टींत विजय संपादन केला म्हणजे काय, तर डोंगर पोंखरून उंदीर बाहेर काढला ! आणि तोंही इंग्रज व फिरंगी यांना हाताशीं धरून ! अंजनवेल माझ्या हातून आंग्र्यानें घेतली म्हणजे काय, त्या परदेशी पाताळयंत्री गोऱ्यांनीं त्यांना पाठीशीं घातलें म्हणून ! एवढें साह्य जर मला असतें. निदान आम्हां सिद्दींत जर फूट पडली नसती, तर ह्या सिद्दी सातानें सारी कोंकणपट्टी एकजात आपल्या अंमलाखालीं आणून जंजिऱ्याची गादी बळकावली असती. इतकेंच काय पण थेट साताऱ्यापर्यंत मोहीम करून छत्रपतींचें सिंहासन लाथांखालीं तुडवीत अजिमताऱ्यावर सिद्दीच्या सत्तेचें हिरवें निशाण फडकावलें असतें.

"कोंकणपट्टींतील कोंकणे हिंदु म्हणजे हालतेबोलते जिवंत मुडदे आहेत असा माझा इतक्या दिवसांचा अनुभव; पण त्या जोगड्या गोसावड्या ब्रह्मेंद्रानें माझ्या अनुभवाला नाट लावली. ती ब्याद कोंकणपट्टी सोडून काळें करून देशावर कायमची निघून गेली हें एकपरीनें चांगलें झालें असें मी समजत होतों; पण तेथूनही त्याचीं माझ्या नाशाचीं कारस्थानें सुरूच आहेत. त्या कारस्थानांनाही मीं दाद दिली नसती. शाहूराजा अष्टौप्रहर आपल्या रंगमहालांत ऐषआरामांत लोळतां लोळतां थोडीं कारस्थानें करतो ! मराठ्यांची टोळधाड पेशव्यांच्या झेंड्याखालीं कोंकणावर चालून आली हें त्याचेंच कारस्थान. अशा उंटावरून मेंढ्या

झांकणाऱ्या ऐषआरामी पलंगी मुरसद्यांच्या कारस्थानांवर ह्या सिद्दी सातासारखे तरवारबहाद्दर रणगाजी बेदरकारपणानें थुंकतात; पण एकच माणूस–हा एकच बजरंग बैरागी–ब्रह्मेंद्राच्या चिथावणीनें तर्र होऊन कोंकणांत उतरला व कोंकणच्या मुडद्यांना हिंदुधर्माभिमानाच्या जळजळीत उपदेशाचें मंतरलेलें पाणी पाजून जिवंत करूं लागला, तेव्हांपासून हा सारा बखेडा माजला आहे. ही पीडा प्रथम कोंकणांत उतरली व मानाजी आंग्र्याविरुद्ध लोकांना चिथवूं लागली, तेव्हां मला वाटलें कीं छान झालें; कांट्यानें कांटा निघतो आहे. पण तो हरामखोर केवळ मानाजी आंग्र्याच्या नाशानें संतुष्ट होणारा नसून त्याला अलम् कोंकणी दुनियेंतून सिद्दीची सत्ता जमीनदोस्त व्हावयाला पाहिजे आहे ! धर्मरक्षणाच्या गोंडस नांवाखालीं साऱ्या हिंदूंना चिथावून मृत्यूविषयींदेखील बेडर बनविण्याची कला त्या हरामजाद्याला किती बेमालूम साधली आहे ! आगीची एकच ठिणगी भडकत भडकत वणव्याचें अक्राळविक्राळ रूप धारण करून दुनिया जाळीत सुटते ती अशी ! ही ठिणगीच प्रथम विझविली पाहिजे. ह्या जोगड्यालाच प्रथम ठार केलें पाहिजे. त्याशिवाय पल्ला गांठतां यावयाचा नाहीं. इकडे कनकेश्वराच्या देवालयावर कुऱ्हाड उगारावी, कीं सारे मराठे–पेशवे, आंग्रे, मराठे झाडून सारे कनकेश्वराच्या रक्षणासाठीं धावून येतील; तोंच तिकडे गड पाडाव करावा. हें काम याकूबखानाशिवाय दुसऱ्याच्या हातून तितक्या खबरदारीनें तडीला जावयाचें नाहीं. या अल्ला ! या खुदा ! या रहमान ! तुझ्या मेहेरबानगीनें गड माझ्या हातीं येऊं दे, कीं कनकेश्वराच्या देवालयाची मशीद बनवून जितके म्हणून हिंदु कैदी हातीं लागतील तितक्यांना त्या मशिदींत बाटवून मुसलमान करीन. तुझ्या धर्माचा तुला अभिमान असेल, तर मला शिकंदर कर.''

ही सिद्दी सातची आत्मगत विचारकंथा आणखी कोठवर चालली असती कोण जाणें ! पण तेवढ्यांत त्याला एकाएकीं मंजुळ कंकणनिनाद ऐकूं आला, व महालाच्या पार्श्वदारावरील मोत्याची झालर कोणीतरी बाजूला सरकविल्यासारखी सळसळली. त्याबरोबर सिद्दी सातानें कपाळाला तिरस्काराच्या आंठ्या घालून विचारलें, " कोण आहे ? "

प्रकरण विसावें

# सकवारची लावालावी

सिद्दी साताच्या 'कोण आहे' या प्रश्नाला 'मी आहें, सकवार' असें मंजुळ कंकण-निनादाला शोभणारें मंजुळ उत्तर मिळालें. व लगेच एक दासी-रात्रौ त्याची सेवा करण्याला तत्पर असणाऱ्या दासींपैकीं एक जी अगदीं तरुण विशेष सुंदर व सिद्दी साताची सर्वांत जास्त आवडती होती, ती सकवार- हलक्या पावलांनीं त्या महालांत आली. पण अशा चिंतातुर स्थितींत त्याला त्या दासी--सारख्या विलासरमणीची कसली किंमत ! तो तिला घुश्शांत म्हणाला, " सकवार ! या वेळीं मला तुझ्याशीं गुजगोष्टी करण्याला वेळ नाहीं."

" पण मालिक ! मीही आपणाशीं गुजगोष्टी करण्यासाठीं आलेली नाहीं. आपण माझे मालिक, आपण माझे परवरदिगार, सध्यां चाललेल्या कारस्थानां-तील कांहीं ठोकताळे मला कळलेले आहेत, ते मी आपणाला कळविण्यासाठीं इथें आलें आहें." सकवार नखरेलपणानें मुरके मारीत लाजत म्हणाली.

एखाद्यावर तुटून पडणारा कुत्रा त्याच्या हातांतील भाकरीचा तुकडा दिसतांच शेंपूट हालवीत लाडीगोडीनें पुढें यावा, त्याप्रमाणें 'सकवारनें कारस्थानाच्या धागयादोऱ्याची गोष्ट काढतांच सिद्दी सात एकदम नरम येऊन सकवारला विचारूं लागला, " सांग, बिजली ! सांग, कसले ठोकताळे तुला कळले आहेत ? "

" आपण जी दासी साहेबांच्या तैनातीला दिली आहे, ती पक्की दगलबाज आहे असें नाहीं का आपणाला वाटत ? "

" तुला तसें वाटतें का ? "

" अर्थात् ! "

" कशावरून ? "

" असें पहा मालिक ! ती दासी आपल्या पदरीं आल्यापासून एक क्षणभर देखील प्रसन्न दिसली नाहीं. उलट आम्ही सर्वजणी आपल्याबरोबर इकडे येऊं लागलों तेव्हां मार्गांत ती एकसारखी रडत होती. मीं तिला तिची माहिती विचारली; पण तिनें कांहीं ती नीटशी सांगितली नाहीं. 'उगाच नांव-गांव सांगून सासर-माहेर अशा दोन्ही कुळांची बदनामी कशाला करूं?' असें ती म्हणाली. फक्त

तिनें येवढेंच सांगितलें कीं, 'आपण ज्या जहाजांतून येत होतों तें जहाज बाणकोटापाशीं यांचे लोकांनीं लुटलें व आपण त्यांच्या हातीं सांपडलों'. आणि त्या लोकांनीं तिला आपल्या पदरीं आणून सोडलें. बाकी, तिच्या एकंदर लक्षणांवरून तिचा नानाजी सुर्व्याशीं कांहीं तरी संबंध दिसतो, व ती फार भानगडींची बाई दिसते. रात्रौ दर्यामहालांत साहेबाशीं बोलतांना आपण नानाजीचें नांव काढलें तेव्हां तिची नजर कशी एकदम चौंफेर फिरूं लागली हें आपण पाहिलें का ? "

" नाहीं. माझें तिकडे लक्ष्य नव्हतें."

" ती दर्यामहालांतून बाहेर आल्यावर नानाजीसाठीं फार हळहळली. सुभानजीशीं देखील तिचा कांहीं तरी वैरभाव दिसतो. कारण सुभानजीच्या नांवानें तिनें खडे फोडले. त्याप्रमाणेंच फत्तेकोठींतील प्रभावतीला आपण साहेबाच्या रंगमहालांत पाठविण्याचें ठरविलें, तेव्हां तिला तें रुचलें नाहीं. 'मी त्या मुलीला वांचविणार' असें ती माझ्यापाशीं म्हणाली. मी मुद्दाम तिच्याशीं गोड बोलून तिच्या मनांतलें काढून घेत होतें; म्हणून माझ्याशीं ती इतक्या मोकळेपणानें बोलली. किल्लेदाराबरोबर आम्ही फत्तेकोठीकडे गेलों, व बाकीच्या दासी इकडे आल्या. तेथून आम्ही पुन्हा दर्यामहालांत आल्यावर बराच वेळ बोलत बसलों होतों. मी अगदीं पहिल्यापासून तोंडदेखलें बोलत होतें, म्हणून मला त्या दोघींच्या अंतरंगांत शिरतां आलें. तों त्या दोघींच्या मागें शत्रूच्या कारस्थानाचें केवढें तरी ब्रह्माण्ड उभें असलेलें मला कळून आलें."

" एकूण ती पोरटीदेखील शत्रूला सामील आहे तर ! "

" होय. मी तर म्हणतें कीं, ती ह्या कटाच्या देव्हाऱ्यांतली चंडीदेवी आहे. कुणाला हें खरेंदेखील वाटायचें नाहीं. उंदेरीच्या किल्लेदाराची ती मुलगी. येथल्या किल्लेदारांचा तिच्यावर डोळा असल्यामुळेंच उंदेरीला येवढा अनर्थ ओढवला हे आपणाला माहीत आहे का ? "

" असेल. बरें मग ? "

" बरें; नानाजी सुर्वे व प्रभावती यांचे एकमेकांवर अत्यंत प्रेम आहे, मथुराबाई आंग्र्यांच्या खटपटीनें त्या दोघांचें लग्न व्हावयाचें होतें, हें तरी आपणाला माहीत आहे ? "

" नाहीं. हें मी नवीनच ऐकतों आहें. ह्या सर्व गोष्टी तुला कशा समजल्या ? "

"कशा समजल्या म्हणजे ? मीं आपणासाठीं त्या दोघींच्या अंतरंगांत शिरून त्या काढून घेतल्या." येवढें बोलून सकवार जरा चपापली. तिच्या चुगलखोरीच्या आधारानें कारस्थानाच्या डोहांत अधिकाधिक खोल जातां जातां सिद्दी साताला आंतल्या आंत गुदमरल्यासारखें होत होतें व त्याच्या चेहऱ्यावर दारुण चिंतामय संतापाचीं अभ्रें दाटूं लागलीं होतीं; तीं पाहून तिला वाटलें कीं, आपणावरच तो संतापत आहे. म्हणून तिनें घाबरटपणानें विचारलें, "मालिक ! आपला हुकूम मोडून मी बराच वेळ दर्यामहालांत राहिलें, त्याबद्दल आपणाला राग नाहीं ना आला ?"

"छे: ! मला राग नाहीं आला. लौकर काय तें सांग."

"आपण मला आपली बेगम बनविण्याचें वचन दिलें आहे, अर्थात् आपलें हित तेंच माझें हित असें समजून आपल्या हितासाठीं सर्वतोपरी झटणें हें माझें कर्तव्य आहे असें मी समजतें—"

सकवार बोलली तें तिच्या दृष्टीनें बरोबरच बोलली. केवळ ऐषआराम करण्यासाठीं जिचा जन्म, नीती अनीतीच्या कल्पनेचा वारा देखील जिच्यावरून कधीं गेलेला नाहीं, अशा तिला सिद्दी साताच्या राजकीय संकटांची काय मातब्बरी ! तुळशीच्या बनांत भांग निपजावी त्याप्रमाणें सकवार ही एका उच्च मराठा कुळांत जन्माला आलेली व एका उच्च कुलीन मराठा किल्लेदाराची धर्मपत्नि होती. सिद्दी सातानें त्या किल्ल्यावर स्वारी केली, तेव्हां किल्ल्यावरचा दुसरा एक मराठा अंमलदार त्याला फितूर झाला. तो मराठा सकवारप्रमाणेंच अत्यंत रूपवान व उमदा असा होता, व सकवारचें त्याच्यावर मन बसलें होतें. त्याला सिद्दी सातानें त्याच किल्ल्याची किल्लेदारी देण्याचें कबूल करून फितूर केलें, व त्या वैभवाच्या आशेनें सकवारनें आपला मार्ग निष्कंटक होण्यासाठीं आपल्या पतीला दग्यानें ठार करण्याच्या कामीं त्या आपल्या प्रियकराला साह्य केलें. किल्लेदार ठार मारला गेला, किल्ला सिद्दी साताला पाडाव करतां आला; पण तेवढ्यांत सिद्दी साताला सकवारचें दर्शन घडून ती आपल्या जनानखान्यांत असावी असें वाटलें. त्यानें लागलीच त्या फितूर मराठ्याला दगा देऊन ठार केलें व सकवारला आपली बेगम करण्याचें वचन देऊन पदरीं घेतलें. आपला प्रियकर ठार झाल्यामुळें सकवारला जो खेद झाला होता, तो सिद्दी सातानें तिला आपली बेगम करण्याचें कबूल केल्यामुळें दूर झाला होता, व आपण केव्हां बेगम

होतों याची वाट पहात सकवार सिद्दी साताचें दास्यत्व पत्करून राहिली होती. तिला सिद्दी साताची मर्जी अहाल राखून ऐषआराम व वैभव भोगण्यापलीकडे जगांत कांहींच कर्तव्य नव्हतें. पण मनुष्यस्वभावांतील एक वैशिष्ट्य असें आहे कीं, कांहीं कांहीं माणसांना जी परिस्थिति अथवा वस्तु आपणाला जन्मांत प्राप्त होणें शक्य नसतें, ती वस्तु अथवा ती परिस्थिति दुसऱ्या एखाद्या निकटवर्ति माणसाला प्राप्त झालेली त्या असंतुष्ट माणसाला बघवत नाहीं. सकवारच्या बाबतींतही तसाच प्रकार झाला होता. सकवारला वहीम आलेली गुल्शन-हें तिचें नवें नांव होतें-सिद्दी साताच्या पदरीं नुक्तीच दोनतीन दिवसांपूर्वी आली होती, व सकवारनें मानभावीपणानें तिच्याशीं जिगरदोस्ती जमवून तिला भुरळ पाडली होती. तेव्हां-पासून गुल्शन एकसारखी सिद्दी साताच्या पाशवी वासनेला बळी पडलेल्या व पडणाऱ्या हिंदु स्त्रियांना त्यांच्या दुबळेपणाबद्दल नांवें ठेवीत होती. अर्थात् सकवारही त्यांत आलीच. गुल्शनचें मत असें कीं, ग्रहदशेच्या फेऱ्यांत एखादी स्त्री सांपडली व तिला आपल्या अब्रूचा होम पेटविल्याशिवाय गत्यंतरच उरलें नाहीं, तर तिला आत्मघात करून तरी स्वतःच्या अब्रूचें रक्षण करतां येणार नाहीं काय ? सकवारला गुल्शनच्या ह्या प्रश्नासमोर निरुत्तर होणें भाग पडलें होतें. या ठिकाणीं सकवारच्या ऐवजीं एकादी दुसरी प्रवाहपतित, मनदुबळी पण पवित्र भावनांची स्त्री असती तर तिनें गुल्शनच्या धाडसी निग्रहाचें कौतुक केलें असतें. पण सकवार तशी नव्हती. त्यामुळें तिला गुल्शनविषयीं हेवा वाटूं लागून ती केव्हां एकदां आपणासारखी होते असें तिला झालें होतें. माशानें माणिक गिळलें कीं, तें जसें पुन्हा हातीं लागणें दुरापास्त, त्याप्रमाणेंच सिद्दी साताच्या कबज्यांत आलेल्या स्त्रीचें पावित्र्य अभंग टिकणें दुरापास्त होय, हें सकवारला पक्कें माहीत असल्यानें तिनें तसें भय गुल्-शनला घालून तिला निरुत्तर करण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. पण यावर 'मरणाच्या मोलानें तर माझी अब्रू मला राखतां येईल ना!' असें गुल्शनचें उत्तर होतें.

'असें बोलणें सोपें आहे पण याप्रमाणें करणें फार कठीण आहे' असें प्रत्युत्तर देऊन सकवारनें त्या नाजुक वादाचा तात्पुरता समारोप केला होता. पण तिला मनांतून मात्र वाटत होतें कीं, गुल्शन केव्हां एकदां आपल्यासारखी होईल ! येव-ढ्याचसाठीं, सिद्दी सातानें जेव्हां रात्रौ इंचबर्डसाहेबाच्या सेवेंत गुल्शनची योजना केली तेव्हां सकवारला अत्यानंद झाला होता, व 'आतां तूं काय करशील' असें

गुल्शनला हिणवून लाजविण्यासाठींच मुख्यतः ती दर्यामहालांत गुल्शनशीं गोष्टी बोलत बसली होती. गुल्शनला सकवारचें काळेंकुट्ट अंतरंग काय माहीत ! तिला वाटलें कीं, ही आपली जिवाची मैत्रीण; आपणाला सिद्दी साताच्या मगरमिठींतून मोकळीक मिळविण्याच्या कामीं हिचा उपयोग होईल. बुडत्या माणसाला काडीचा आधारही केवढा तरी मोठा वाटतो, सिद्दी साताच्या जनानखान्यांत जेथें सहानुभूतिपूर्वक दोन शब्ददेखील ऐकावयाला मिळण्याची मारामार, तेथें सकवारसारखी जुनी मैत्रीण भेटतांच तिला तिचा केवढातरी आधार वाटूं लागला. सकवारनेंही मानभावीपणानें गुल्शनच्या मनमोकळेपणाचा स्वतःच्या क्षुल्लक फायद्याकडे पुरेपूर उपयोग करून घेण्याचें ठरविलें होतें. तो फायदा कोणता, तर सिद्दी साताची बेगम होणें हा ! शेणकिड्यांचा स्वर्ग–मोक्ष–वैकुंठ शेणाच्या गारेंतच असतो तो असा !

सुंदर, मोहक व तरुण विलासरमणी आपणाविषयीं इतकी आपुलकी दाखविते, असें पाहून कितीसे रसिक तिला झिटकारूं शकतील ? त्यांतून सिद्दी सात तर पहिल्या प्रतीचा स्त्रियांचा नादी ! एका नाटकशाळेला बेगम केल्यानें त्याचा तोटा थोडाच होणार होता ! आणि प्रत्यक्ष बेगम करण्याचा प्रसंग येईल तेव्हां येईल, कार्यापुरतें अघळपघळ वचन देण्याला त्याचें काय वेंचत होतें ! सकवार जी माहिती देत आहे, तिचा आपणाला फार उपयोग होईल असें त्याला वाटलें, व तेवढ्यासाठीं त्यानें तिला आपल्या हृदयाशीं धरून तिला आपण बेगम करणारच करणार; अशी तिच्या हृदयाची खात्री पटवून दिली. तेवढ्यानें सकवारची गोड समजूत पटली.

“ बरें; पण तूं गुल्शनच्या संगतींत राहून आणखी कोणत्या कारस्थानाचा तपास लावलास ? ” सिद्दी सातानें अधीरपणानें विचारलें.

“ उंदेरीच्या वेढ्यांतून प्रभावती पळाली, ती कुलाब्याला मथुराबाई आंग्र्यांच्या आश्रयाला गेली. तिला उंदेरीहून पळायला मदत माणकोजी पिसाळाची झाली.”

“ माणकोजी पिसाळ ? माझ्या येथल्या हाडवैऱ्याचा–भानाजी पिसाळाचा–पोर माणकोजी ? ”

“ होय. तोच माणकोजी. तोच असें तरी मी अशावरून म्हणतें, कीं प्रभावतीनें दर्यामहालांत येतांच आपली सारी कर्मकथा आम्हांला सांगितली, त्यावरून मला तरी माहीत. माणकोजी पिसाळ उंदेरीच्या किल्लेदाराला फितवून कैदेंतून निसटला, तो थेट कुलाब्याला येऊन मथुराबाई व येसाजी आंग्रे यांना

भेटला, व त्या सर्वांनीं संगनमत करून ताबडतोब उंदेरीवर चालून जावयाचें ठरलें. खांदेरीच्या किल्लेदाराला तशा अर्थाची सावधगिरीचीं पत्रेंही रवाना झालीं आहेत म्हणे! मात्र मानाजी त्या मंडळींचा प्रतिस्पर्धी, म्हणून त्याला नकळत त्यांना ही मसलत पार पाडायची होती. उंदेरी किल्ला जिंकल्यावर तेथली किल्लेदारी माणकोजीलाच देण्याचें मथुराबाईनें कबूल केलें. पण तेवढ्यांत मानाजीने कुलाब्यांतून संभाजी आंग्र्याच्या कैवाऱ्यांची कायमची उचलबांगडी करण्याचे ठरवून संभाजीच्या सर्व कैवाऱ्यांवर शस्त्र धरलें. संभाजीच्या वतीनें कारस्थानें करणाऱ्या प्रमुख मथुराबाई व लक्ष्मीबाई व संभाजीचीं बायकामुलें कनकेश्वरच्या यात्रेला म्हणून आलीं होतीं, त्यांना युक्तीनें सागरगडावर रवाना केलें, व येसाजी वगैरे मंडळीला तेथल्या तेथें कैदेंत डांबून ठेविलें. अडचणीत अडचण अशी उत्पन्न झाली कीं, मानाजीचा मोठा मुलगा महिमाजी याच्या मनानें प्रभावतीशीं लग्न करावें असें घेतलें; व म्हणून प्रभावतीला मात्र त्या मंडळींबरोबर सागरगडावर पाठविण्यांत आलें नाहीं. माणकोजी हा संभाजीचा व प्रभावतीचा म्हणून त्याला देखील कैद करण्याचा हुकूम महिमाजीनें सोडला. पण तो कांहीं तेव्हां सांपडला नाहीं. दत्ताजी कनोजे त्यापूर्वीच बहुरुप्याचा वेष घेऊन प्रभावतीचा शोध करीत कुलाब्यावर हिंडत होता; तो अचानक प्रभावतीला भेटला. आपला जुना हितकर्ता भेटला म्हणून प्रभावतीला अतिशय आनंद झाला. तिनें त्याच्याबरोबर सागरगडावर मथुराबाईपाशीं जाण्याचें ठरविलें, व काल रात्रौ तीं दोघें सर्वांचा डोळा चुकवून एका नावेंतून सागरगडावर जावयाला निघालीं—"

"आणि तोंच वाटेंत वादळ झालें; तेव्हां त्यांना नानाजीनें वांचविलें; होय ना?"

"तें आपणाला काय माहीत?"

"तें मला माहीत आहे. दत्ताजीनें तो सर्व वृत्तान्त मला सांगितलेला आहे. पुढें काय झालें तें सांग."

"दत्ताजीनें नानाजीला ओळखलें असेल; पण प्रभावतीला कांहीं दर्यामहालांत गजरेच्या तोंडून माहिती कळेतों त्याची ओळख नव्हती. नानाजी ह्या जगांत नाहीं अशीच त्या वेळेपर्यंत तिची कल्पना होती, व दत्ताजीला ती प्रथम आपला हितकर्ता समजत होती. माणकोजीविषयीं तर तिला किती तरी आपलेपणा वाटत होता. मला वाटतें, त्यांचें लग्न व्हायचें असेल."

" तरीही प्रभावती खुषीनें तुमच्याबरोबर दर्यामहालांत आली का ? "

" हो ! 'तुला आपली अब्रू बचावायची असेल, नानाजी सुर्वे तुला भेटायला हवा असेल, तर मुकाट्यानें माझ्याबरोबर ये. येथून एकवार बाहेर पडल्यावर आपणाला मार्ग मोकळा होईल' असें गुल्शननें हळूच प्रभावतीच्या कानांत सांगितलें व आपण नानाजीची सावत्र आई असल्याचीही ओळख दिली. तेव्हां प्रभावती कांहींच आढेवेढे न घेतां आमच्याबरोबर दर्यामहालांत आली दत्ताजी दगलबाज ठरल्यावर तिला तरी आणखी कुणाचा आधार ! किल्लेदार व तिच्याबरोबरचा तो दत्ताजी असे दोघेही आम्हांला महालाच्या दरवाजापर्यंत पोंचवून निघून गेल्यावर आम्हांला मनमोकळेपणानें गोष्टी बोलायला अवसर सांपडला. तेवढ्यांत माणकोजी आपला आकाशांतून पडल्यासारखा तिथें हजर ! "

" काय, माणकोजी इथें चौबुरुजीवर आला आहे ? "

" होय. प्रथम कांहीं आम्हांला कळलें नाहीं; आम्ही फत्तेकोठीकडून दर्यामहालाकडे येऊं लागलों तेव्हां कोणी तरी माणूस आमच्या मागोमाग कांहीं अंतरावरून चालत होता खरा. तो कोणीतरी गडावरचा गांवकरी अथवा एखादा शिपाईप्यादा असेल असे समजून आम्हीं त्याच्याकडे कानाडोळा केला. किल्लेदाराचें तर तिकडे लक्ष्यच गेलें नाहीं पण आम्ही महालांत येऊन गोष्टी बोलत बसलों, प्रभावतीनें आपली सारी कर्मकहाणी आम्हांला निवेदन केली, तों थोड्या वेळानें कोणींशी दरवाजांत येऊन एकदम प्रभावतीला हांक मारली, व प्रभावतीनें त्याला ओळखून नांव घेऊन हांक मारली ! त्यावरून मीं ओळखलें कीं, तो माणकोजी ! प्रभावती लगेच उठून दरवाजाबाहेर गेली, व त्या दोघांचें हळुहळू कांहीं संभाषण झालें. तें कांहीं मला नीटसें ऐकूं आलें नाहीं. पण माणकोजी निघून गेल्यावर प्रभावतीनें आमच्यापाशीं येऊन सांगितलें कीं, माणकोजी आणखी थोड्या वेळानें—आपण साहेबाशीं बोलत बसलां होतां, ते निघून गेल्यावर—आम्हांला सोडवून नेण्यासाठीं तेथें येणार आहे, व आम्हांला सागरगडावर पोंचवून लगेच तसाच उंदेरीवरील मोहिमेची तयारी करण्यासाठीं विजयदुर्गाकडे संभाजीपाशीं जाणार आहे. मला त्यांचा तो बेत तेव्हां फार भयंकर वाटला. त्या दोघींनीं मलादेखील आपणाबरोबर येण्याचा आग्रह केला; तेव्हां मात्र मीं भीतीनें तें नाकबूल केलें. पण त्याचा परिणाम भयंकर होणार असें मला वाटूं लागलें. मी त्यांच्याबरोबर पळून जायला तयार नाहीं असें पाहून त्या दोघी अंमळ बाजूला जाऊन आपसांत कांहीं कुजबुजूं

लागल्या. त्यांच्या कुजबुजीचा अर्थ मीं अंदाजानें ओळखला; 'ही दासी कदाचित् आपला बेत बाहेर फोडील व मग अनर्थ ओढवेल, त्यापेक्षां हिला येथल्या येथें नाहींशी केली पाहिजे' असाच त्यांचा मानस होता. तेव्हां मात्र माझें धाबें दणाणलें. लगेच मीं प्रसंगावधान राखून त्या दोघींपाशीं जाऊन त्यांच्याशीं चार साखरघोळ गोष्टी बोलून त्यांच्याबरोबर पळून जाण्याला होकार दिला; त्यामुळें त्यांना हायसें वाटलें. अंमळशानें मी त्या दोघींची नजर चुकवून जी बाहेर पडलें, ती जीव मुठींत घेऊन इकडे पळत आलें. पण इकडे येण्यापूर्वी मीं एक मात्र सावधगिरी केली आहे,–त्या दोघींवर सक्त नजर ठेवण्यासाठीं काफूरला बजावून सांगितलें आहे."

" मग गधडे! तूं इतका वेळ गप्प कां बसली होतीस?" सिद्दी सात सकवारवर वस् करून ओरडून म्हणाला. "अशा महत्त्वाच्या गोष्टी ताबडतोब सांगावयाच्या असतात, एवढीदेखील अक्कल अल्लानें तुला दिली नाहीं? कीं तूंदेखील त्या हरामजादीप्रमाणेंच माझ्या डोळ्यांत धूळ टाकीत आहेस?"

एखाद्यानें अमृत मुखांत पडेल म्हणून 'आ' पसरावा व त्यांत अचानक गोमूत्राची धार पडावी, तशी सकवारची अवस्था झाली. तिला वाटलें होतें कीं, आपण येवढी महत्त्वाची बातमी दिल्याबद्दल मालिक आपणाला शाबासकी देतील; आपण रहस्यभेद करण्यासाठीं तोंड उघडतांच त्यांनीं आपणाला हृदयाशीं कवटाळलें, ते आतां आपणाला उचलून डोकीवर घेतील व बेगम असावी तर अशीच राजकारणी असावी असें म्हणतील. तें बाजूलाच राहून साराच प्रकार विपरीत झाला, हें पाहून तिनें खेटर खाल्ल्यासारखें तोंड करून खजिलपणानें खालीं मान घातली. तरीही आपण यांत कांहीं चूक केली असें तिला वाटेना. ती नम्रपणानें उद्गारली, " मालिक! माझ्याविषयीं आपण असा संशय घ्यावा!—"

सिद्दी सात सकवारला पूर्णपणें बोलूं न देतां तिच्यावर लाथ उगारून म्हणाला, " चूप! बेशरम! येथून चालती हो!"

मालिक इतका संतापल्यावर त्याच्या दृष्टीसमोर उभें रहाण्याची सकवारची छातीच होईना. ती मुकाटपणें खालीं मान घालून आंत निघून गेली. तिच्यासाठीं आंत याहूनही दारुण मानखंडनेचें ताट वाढून ठेवलेलें होतें. तिच्याबरोबरच्या इतर तिघी दासी आंतील दालनांत उभ्या राहून दोघांचा बाहेरील संवाद चोरून ऐकत

होत्या. त्या तिला आंत आलेली पहातांच उपहासपूर्वक लवून मुजरे करून हंसत म्हणाल्या, " यावें बेगमसाहेबा ! "

ॐ ॐ ॐ

सकवारच्या तोंडून ऐकलेल्या हकीगतीवरून सिद्दी साताच्या मनाला तिकडे दर्यामहालांत काय अनर्थ झाला असेल व काय नाहीं ही नवी हुरहूर लागली. तिचें निराकरण करून घेण्यासाठीं तो तसाच तिकडे जावयाला निघाला. जातां जातां–ती पहांटेची वेळा असल्यानें त्याला नमाज पढण्याची सूचक अशी 'अल्ला हो अकबर !' ही मुल्लाची आरोळी जवळच्या मशिदींतून ऐकूं आली. पण तो नमाज पढण्यासाठींही मागें वळला नाहीं. त्याला आजच्या घटकेला अल्लापेक्षां इंचबर्डसाहेबाची प्रार्थना करणें जास्त महत्त्वाचें वाटत होतें.

पण सिद्दी सात दर्यामहालापाशीं जाऊन पोंचतो तों प्रथमदर्शनींच अपशकुन ! त्याचा विश्वासू नोकर काफूर दरवाजांतच मरून पडलेला त्याला आढळला !

## प्रकरण एकविसावें

# एक कोडें उलगडलें

दुर्यामहालांत आणखी कोणतें दृश्य सिद्दी साताला पहावयाला सांपडलें ? प्रभावती व गुलशन यांना चुकवून सकवार तेथून निघून गेल्यावर त्या दोघींची पुढें काय अवस्था झाली ? आंग्र्यांवर व नानाजी सुर्व्यांवर सूड घेण्यासाठीं म्हणून दुरात्म्या दत्ताजीनें प्रभावतीच्या कौमार्याचा भंग होऊन ती जन्मांतून उठावी अशी जी यातायात चालविली होती, व प्रभावती इंचबर्डसाहेबाच्या शयनमंदिरांत रवाना झालेली ऐकून आपला आसुरी संतोष व्यक्त केला होता, त्याचें झालें होतें काय ?—वगैरे रहस्यमय प्रश्नांचा उलगडा करण्यापूर्वी, वाचकांनीं तितक्याच किंवा त्याहूनही जास्त रहस्यमय अशा नानाजीच्या प्रयाणाची फलश्रुति जाणण्यासाठीं प्रहरभर रात्र मागें जाऊन बजरंगगडच्या वाटेला वळलें पाहिजे. म्हणजे तेथें आणखी बऱ्याच गूढ रहस्यांची कुतूहलजनक गुंतागुंत पहावयाला सांपडेल.

नानाजी जो सुभानजीनें निर्देशिलेल्या मार्गानें निघाला, तो झुंजूमुंजू दिसतें न दिसतें अशा सुमाराला भानाजीच्या घराचा पत्ता काढीत एकदांचा तेथें जाऊन पोंचला. मार्गानें घोडा आपल्या 'हनुमान' नांवाला शोभेसा दौडत होता; पण नानाजीचे विचार त्याच्याही पुढें दौडत होते. मात्र हनुमानाची दौड व नानाजीच्या विचारांची दौड यांत अंतर असलें तर एवढेंच कीं, हनुमान नानाजीला पाठीवर घेऊन नीट मार्ग कापीत दौडत होता, व नानाजीच्या विचारांची धांव शिकाऱ्याच्या भयानें घाबरलेल्या एखाद्या हरणीसारखी सैरावैरा होती. आपणाशीं ज्यानें दोस्ती केली, तोच भानाजी पिसाळ असेल का, अशी जबर शंका भवानजीच्या बोलण्यावरून जी नानाजीच्या मनांत उत्पन्न झाली होती, तीच नानाजीच्या ध्यानींमनीं व्यापून राहिली होती. प्रभावती त्याची आवडती, तिचा त्याला निदिध्यास लागलेला; दिलाराची सुलतानानें एका रात्रींत काय दुर्दशा केली असेल ही चिंता एकसारखी त्याच्या मनाला बोंचणी लावून बसलेली; पण भानाजीविषयींच्या विचारांत त्याचें ध्यान-मन पूर्णपणें गुरफटून गेल्यामुळें त्या दोघींपैकीं एकीविषयींच्याही विचारांना तेथें थारा नव्हता. किंवा थारा असलाच तरी ते

विचार बिचारे त्याच्या अंतःकरणाच्या कोठल्या तरी एका कोंपऱ्यांत तोंड लपवून गप्प बसले होते. उभ्या रस्त्यानें एकच विचार वळणावळणांनीं त्याच्या अंतःकरणापासून डोक्यापर्यंत थैमान घालीत होता, 'तो भाऊराव कीं भानाजी ? तो भानाजी असता, तर मी त्याच्या हाडवैऱ्याचा मुलगा त्याच्यावर पिढीजाद वैराचा पुरेपूर सूड घेण्यासाठीं तान्हेलेलों आहें असें कळल्यावरदेखील तो माझ्याशीं इतक्या ममतेनें कां वागला असता ? त्यानें आपली मुलगी मला देऊं केली व वर अपार संपत्तीचा ठेवाही देऊं केला, यावरून तो भानाजी खास नसला पाहिजे.—पण तसें म्हणावें तर भाऊरावानें मला आपल्या मुलीचें नांव चांगुणा असेंच सांगितलें, व सुभानजी आणि सुलतान या दोघां नरपशूंचे प्राण कासावीस होत होते तेही चांगुणेसाठींच ! त्यांच्या बोलण्यांत तर चांगुणा ही भानाजीची मुलगी आहे असें आलें. तेव्हां भाऊराव तोच भानाजी असण्याचा संभव आहे. पण भानाजी जर मला वाटतो तसा देशद्रोही निमकहराम असता, तर सुलतान व सिद्दी सात यांच्या रोषाला कां पात्र झाला असता ? त्यांचा तर त्याच्यावर बंडखोरीचा आरोप आहे. बरें, भवानजीनें जी शंका घेतली, ती तरी खरी असेल का ? तो इंग्रजांचा गुप्तहेर असेल का ? त्यानें मला गोटयांत आणण्यासाठीं कनक व कांता असें दुहेरी आमिष माझ्यासमोर धरलें असेल का ? छेः ! पण तें शक्य दिसत नाहीं. गांवभोरपांत दशावतारांचें नाटक करतात, तेव्हां रामकृष्णादि सोंगांच्या लीला पाहून क्षणभर त्यांच्यासमोर मस्तक नमवावेंसें वाटतें; पण म्हणून काय त्या सोंगांना खऱ्या दशावतारांची योग्यता येईल ? किंवा तेच खरे दशावतार म्हणून कोणी फसेल ? भाऊराव माझ्याशीं कळकळीनें बोलला, मला त्यानें आपली मुलगी व अंथरुणाखालच्या भुयारांत झांकून ठेवलेली अपार संपत्ति देऊं केली, त्यांत प्रामाणिकपणाचा जिव्हाळा होता खास. आतां प्रश्न एवढाच कीं, तोच भानाजी होता किंवा कसें ?'

याप्रमाणें विचार करतां करतां नानाजी माचीवर तर आला. येतांना तो कांहींसा रस्ता चुकला, तरी त्यानें आजूबाजूच्या लोकांना विचारून तपास लावण्याला कमी केलें नाहीं.

नानाजीनें एखाद्याला विचारावें, "भाऊराव पिसाळाचें घर कोणतें ?"

त्या माणसानें उलट विचारावें, "कोण भानाजीबाबा ?"

भानाजीचा आपण भाऊ असें म्हाताऱ्यानें नानाजीला सांगितलें होतें, त्या

आधारावर भानाजीच्या घरीं त्याचा तपास लागेल किंवा तोच भानाजी असला तर तसें कळेल, अशा भरंवशानें नानाजीनें म्हणावें, "होय. मला भानाजी-बाबाचेंच घर पाहिजे आहे."

त्या माणसानें पुन्हा विचारलें, "कोण तूं त्यांचा मुलगा का ?"

नानाजीनें यावर 'होय' अशी वेळ मारून न्यावी.

लगेच त्या माणसानें डाव्या उजव्या बाजूचा पत्ता सांगून कांहीं खूण सांगावी, त्या खुणेच्या अनुरोधानें नानाजीनें आपला घोडा वळवावा. असें होतां होतां उमाळ्यावर सूर्य येतो न येतो येवढ्या सुमाराला नानाजी एकदांचा भानाजीच्या घराकडे जाऊन पोंचला. तों घरांत अगदीं सामसूम. नानाजीनें घोड्यावरून न उतरतां मोठ्यानें हांक मारून विचारलें, "पिसाळांचें घर हेंच का ?"

प्रथम नानाजीच्या प्रश्नाला कांहींच उत्तर मिळालें नाहीं; पण एक पंधरा-सोळा वर्षांची सुंदर तरुणी मात्र अत्यंत खिन्न वदनानें दरवाजांत आली. त्या बालिकेच्या चर्येवरून त्या घरांत कांहीं तरी विपरीत घडलें असल्याची शंका आली.

त्या बालिकेनें तिरस्कारपूर्वक रागीट चर्या करून नानाजीला विचारलें, "तुम्ही कोण ?"

"मी नानाजी सुर्वे." नानाजी उत्तरला.

"त्याला आंत बोलावून आण जा." असा घरांतून एक अत्यंत क्षीण स्वर निघालेला तेव्हांच नानाजीला अस्पष्ट ऐकूं आला. लगेच ती मुलगी पदरानें डोळे पुशीत दरवाजाबाहेर आली, व खालीं मान घालून घोगऱ्या आवाजानें नानाजीला म्हणाली, "तुम्हांला बाबांनीं आंत बोलावलें आहे."

त्या तरुणीची ती शोकाकुल अवस्था पाहून नानाजीचें चित्त बरेंच विषण्ण झालें. त्या वेळीं त्याच्या डोक्यांत 'हा भानाजी असेल का ? कीं भाऊराव असेल ? ही मुलगी अशी रडते कां'—अशा नव्या विचारांचें जाळें पुन्हा विणलें जाऊं लागलें. तशाच स्थितींत तो घोड्यावरून खालीं उतरला, व तसाच आंत गेला. दरवाजाच्या आंत पाऊल टाकतां टाकतां त्याला कोणाच्या तरी कण्हण्याचा आवाज ऐकूं आला. तो लक्ष्यपूर्वक ऐकत नानाजी त्या मुलीमागोमाग त्या लहानशा घरांतील एक दालन ओलांडून आंतील दालनांत गेला. तेथें साधारण अंधारच होता. कोपऱ्यांत एक मंदशी समई तेवत होती. पण बाहेरून आल्यामुळें नानाजीला तेथें स्पष्ट दिसेना. त्यामुळें ती मुलगी डाव्या बाजूला वळली तरी नानाजी किंचित

गोंधळल्यासारखा होऊन दरवाजांतच उभा राहिला. त्या दालनाच्या डाव्या बाजू-कडूनच कण्हण्याचा आवाज निघत आहे, एवढें मात्र त्याला तेव्हांच ओळखतां आलें.

" बाबा ! ते आले आहेत." त्या मुलीचे शब्द नानाजीच्या कानीं पडले. त्या मुलीनें समईंतील वात जरा सारली, व बाजूची खिडकी उघडली; त्यामुळें आतां तेथें बराच प्रकाश झाला. त्या प्रकाशांत नानाजीला त्याचा नूतनपरिचित म्हातारा विव्हळत बिछान्यावर पडलेला आढळून आला.

" नानाजी !" म्हाताऱ्याने क्षीण स्वरानें विव्हळत हांक मारली, " तूं मला भेटलास, देवाघरचा तुझा-आमचा ऋणानुबंध बळकट आहे. ये. माझ्यापाशीं बैस, ये."

नानाजी म्हाताऱ्याच्या बिछान्यापाशीं जाऊन बसतां असतां उद्गारला, " आजोबा, हें काय ? येवढ्या थोड्या अवकाशांत हें कोणतें अरिष्ट तुमच्यावर कोसळलें ! "

नानाजी म्हाताऱ्याच्या बिछान्यापाशीं जाऊन बसला तेव्हां ती मुलगी म्हाताऱ्याच्या बिछान्याच्या पलीकडील बाजूला जाऊन जवळच उभी राहिली. त्या मुलीच्या डोळ्यांवाटे अश्रुप्रवाह सुरूच होता.

" विशेष कांहीं नाहीं; भिण्याचें फारसें कारण नाहीं. जखम झाली आहे, बहुधा बरी होईल." म्हाताऱ्यानें भिंतीकडील बाजूला दृष्टि फिरवीत क्षीण स्वरांत हांक मारली, " चांगुणे !"

" काय बाबा !" त्या शोकाकुल मुलीनें नवा हुंदका आंवरीत डोळ्यांना पदर लावून म्हाताऱ्याच्या उशाशीं बसून विचारलें.

" पाणी—मला पाणी पाहिजे." म्हातारा अडखळत उद्गारला.

नानाजीनें ओळखलें कीं तीच चांगुणा. चांगुणेनें जवळच तांब्या–भांडें होतें त्यांतलें भांडें पाण्यानें भरून म्हाताऱ्याच्या ओठांना लावलें.

" आजोबा ! तुम्हांला कष्ट होतात, तुम्ही बोलूं नका " असें म्हाताऱ्याचें शांतवन करीत नानाजीनें संकोचवृत्तीनें पण संकोचाचा आडपडदा निरुपायास्तव अंमळ बाजूला सारून अधोरेखित दृष्टीनें चांगुणेकडे पहात विचारलें, " यांची अशी दशा कोणीं केली ? "

" त्या दुष्ट बैराग्यानें." चांगुणा स्फुंदत उद्गारली.

" त्या बैराग्यानें "—असा त्याच शब्दाचा पुनरुच्चार करून म्हातारा एकदम थांबला, व थोडी उसंत घेऊन चांगुणेला म्हणाला, " चांगुणे ! ती बैरागीण

भेटतेशी पहा जा; आणि जर ती भेटली, तर तिला बोलावून आण. आतां माझ्यापाशीं हा नानाजी आहे. कांहीं काळजी करण्याचें कारण नाहीं."

"कोणती बैरागीण आजोबा ?" नानाजीनें विचारलें.

"इथें चार दिवसांपूर्वी एक बैरागीण आली आहे. बिचारी भिक्षा मागून पोट भरते. कुणाला औषध देखील पाहिजे तर देते. जखमेवर फार रामबाण औषध तिच्यापाशीं आहे. तीन दिवसांत कसलीही भयंकर जखम बरी होते म्हणे !" म्हातारा पुन्हा चांगुणेकडे वळून म्हणाला, "जा बाळ ! लौकर जा. नाहीं तर ती भिक्षेला निघून जाईल. आणि हें पहा, तिला अमक्यासाठीं बोलावतो असें सांगूं नकोस. मी इथें आहें याची कोणालाही खबर देऊं नकोस. नाहीं तर उगाच फट् म्हणतां ब्रह्महत्या व्हावयाची !"

चांगुणा जरा गोंधळली. पण पुन्हा तिला काय वाटलें कोण जाणे; ती जावयाला निघाली. जातां जातां नानाजीकडे वळून डोळ्यांना पदर लावून म्हणाली, "तुम्ही इथें आहांच ना ?"

"तो इथें आहे. तूं लौकर जाऊन ये." म्हातारा उद्गारला. चांगुणा बाहेर जाईतों थांबून तो पुन्हा नानाजीशीं बोलूं लागला, "नानाजी ! आतां सांगतों तें ऐक. मीं तुला काल फसविलें. मींच तुझ्या बापाला छळून चौगुरुजीवरून देशोधडीला जावयाला भाग पाडणारा कर्मचांडाळ भानाजी पिसाळ. तुझी सूडाची भाषा ऐकून मला काल भय वाटलें, म्हणून मीं तुला माझी ओळख दिली नाहीं."

"असें मला मागाहून वाटलेंच. तुम्ही देवालयाकडून मला सोडून पळाल्यावर तिथें जो अनर्थ झाला, तेव्हांच्या आपल्या वैऱ्यांच्या संभाषणावरून मीं तें अजमावलें."

"मी पळालों तों तुला सोडून पळालों असें नाहीं. माझी कल्पना कीं, तूं मागाहून येत आहेस. बरें; पण तिथें काय अनर्थ झाला ?"

नानाजीनें थोडक्यांत त्या अनर्थाचा सारा वृत्तान्त भानाजीला निवेदन केला. तो ऐकून भानाजीला फार खेद वाटला. त्यांतल्या त्यांत भवानजीचा शेवट व तो प्रत्यक्ष त्याच्या मामाच्या—सुभानजीच्या—हातून झालेला ऐकून तर त्याच्या डोळ्यांना पाणी आलें, व मुखावाटे हळहळीचे उद्गार निघाले, "अरेरे !"

"त्याच बैराग्यानें, आजोबा ! तुमचा घात केला का ?"

"होय, त्यानेंच."

" त्याचा तुमचा दावा—"

" सांगतों. पण अगोदर मला सांग नानाजी! माझी विनंति तुझ्या लक्ष्यांत आहे ना? माझी चांगुणा व माझी दौलत—ह्या माझ्या बिछान्याखालीं तळघरांत जाण्याचा रस्ता आहे. पाहिजे तर आतां पाहून घे." असें म्हणून भानाजी आंथरुणावरून उठण्याचा प्रयत्न करूं लागला. नानाजी त्याला थोपवीत म्हणाला, " आजोबा! तुम्ही उठूं नका. दौलत कोठें जाते आहे?"

" मग माझ्या चांगुणेला तूं पदरांत घेणार ना?"

नानाजीला मोठा पेंच पडला. पुन्हा प्रभावतीची त्याला आठवण झाली; पण प्रभावतीसाठीं चांगुणा नाकारावी तर दौलत जाते.—त्याला त्या दौलतीवर केवळ स्वतःचें नशीब काढावयाचें नव्हतें. सैन्यसामग्री जमवून देशाचें दास्य लयाला न्यावयाचें होतें. त्या दौलतीचा मोह तर त्याला सोडवेना, प्रभावतीशीं प्रतारणा करण्याला मन धजावेना, व भानाजीच्या अखेरच्या घटकेला त्याच्याशीं खोटें बोलण्याची छाती होईना. भानाजी आपला हाडवैरी आहे असें म्हणण्याइतका पाषाणहृदयीपणा त्याच्या ठायीं आतां उरला नव्हता. तो गोंधळून डावपेंचाच्या भाषेंत म्हणाला, " आजोबा! तुमची अशी दशा डोळ्यासमोर दिसत असतांना मी कनक व कान्ता यांना कसा कवटाळूं? तुम्ही बरे व्हा, मग आपण पाहूं."

" नाहीं. 'मग पाहूं' नाहीं. माझा आतां भरंवसा नाहीं." भानाजी आपल्या अंगावरील पांघरूण बाजूला सरकवून छातीवरील जखम दाखवीत म्हणाला, " पहा ही केवढी खोल जखम माझ्या छातीला झाली आहे, पहा! अगदीं काळजाला जाऊन भिडली आहे. तशांत हें म्हातारपण. मी म्हणजे अमुकच दिवसांनीं बरा होईन असा काय भरंवसा आहे? बाकी, यांतच मरण आलें तरी देखील मरणाला आतां माझी तयारी आहे. फक्त एकच पाश मागें आहे. तेवढ्यांतून तूं मला सोडव. खाशाबाचे मी सहस्र महदन्याय केले, त्यांचें अर्धें परिमार्जन—" भानाजी छातीवरील जखमेला हात लावून म्हणाला,—" काळजांतलें रक्त ओतून केलें, आणि माझी लाडकी लेंक व माझी दौलत खाशाबाच्या घरांत घालून मला उरलेल्या अर्ध्या पापाची फेड करावयाची आहे. अशानें मीं खाशाबापुरती पापाची फेड केली तरी देशद्रोहाचीं महान् पापें माझ्या गांठीला अजून शिल्लकच आहेत. पण माझी चांगुणा तुझी सहचारिणी होऊन सुखाचा संसार करूं लागली, कीं मी—वोंवर मी—पूर्वी मेलों तरी पुन्हा तुमच्या पोटीं जन्म घेऊन नेकजात मराठा वीर-

सारखें देशाचें ऋण फेडीन. आपल्या दोन वंशांचा एकजीव झाला, कीं माझा वंश पावन होईल. केल्या पापांबद्दल प्रायश्चित्तापरी प्रायश्चित्त मिळाल्यासारखें होऊन माझ्या पोरीचें जन्माचें कल्याण होईल. माझ्याच्यानें जास्त बोलवत नाहीं. मुद्दाम हें तुला सांगण्यासाठीं मीं चांगुणेला कांहीं तरी निमित्तानें बाहेर घालविलें. आणखीही एक महत्त्वाची आनंदाची बातमी तुला सांगावयाची आहे. पण अगोदर चांगुणेला अंतर देणार नाहीं असें वचन मला दे."

पश्चात्तापाच्या प्रायश्चित्तानें परमेश्वर देखील महापातक्यांना पावन करून घेतो; मग नानाजी तर मनुष्य ! त्याला भानाजीचा शब्द मोडवेना. प्रभावतीची आठवण अंतःकरणांत ताजी असूनही त्यानें भानाजीला तसें वचन दिले.

" आतां मी निश्चिंत झालों. मरण आलें तरी आतां मला सुखानें मरावयाला मोकळीक झाली." भानाजी थोडी उसंत खाऊन नवा दम घेऊन पुन्हा बोलूं लागला, " नानाजी ! आतां तुला आनंदाची बातमी सांगावयाची; पण चांगुणेला इतक्यांत ही बातमी कळतां कामा नये, तर सांगतों. काय समजलास ? "

" कोणती ती बातमी ? "

" आधीं मीं सांगितलें तें कबूल कर."

" कबूल."

" आतां सांगतों. ऐक, खाशाबा सुर्वे जिवंत आहे."

" खरें ? " नानाजीनें एकदम हर्षातिरेकानें उचंबळलेल्या हृदयाला हातानें आवरीत विचारलें, " माझे बाबा जिवंत आहेत ? "

" होय. बजरंग बैरागी तोच खाशाबा. त्याला मीं काल ओळखलें नाहीं; पण त्यानेंच मला माझ्या पापांचें प्रायश्चित्त देतांना आपली ओळख दिली. त्याच्यावर माझा मुळींच राग नाहीं. येवढा भाग्यवान् साधु पुरुष तो, स्वतःच्या संसाराला मुकून आपल्या मायभूमीचा संसार सजवीत आहे. रामाच्या हातून रावण मारला गेला, वामनाच्या हातून बळी मारला गेला; त्या दोन्ही दुरात्म्यांचा उद्धार झाला ! तसाच आज मोक्षाचा मार्ग त्यानें मला दाखवून दिला असें मी समजतों. त्यानें मला ठार कां बरें केलें नाहीं ? अशा देव पुरुषाच्या हातून मरण येण्यालाही पदरीं जबर पुण्याई असावी लागते. मात्र चांगुणेला तें पटणार नाहीं. तिला हा प्रकार इतक्यांत कळला, तर ती खाशाबाला व त्याच्याबरोबर तुलाही वैरी मानूं लागेल व आपल्या जन्माचें मातेरें करून घेईल. बायका फार भावनाप्रधान, विकारवश

व अतिशय हळव्या मनाच्या असतात. तशांत ती माझी लाडकी लेंक. एक सोन्यासारखा पोरगा होता, तो देवानें असून नाहींसा केला! ह्या अफाट दुनियेंत तिच्याशिवाय मला व माझ्याशिवाय तिला दुसऱ्या कोणाचाही आधार नाहीं. माझी आबाळ होईल म्हणून ती लग्न देखील नको असें आजवर म्हणत आली; पण आज मीं तिची योग्य ती समजूत केली आहे. तिला माझा विचार सांगितला आहे. तुझी माहिती सांगितली आहे, व तिला हा संबंध आवडलाही आहे. तुझ्या पुरुषार्थावरून ती आपले पंचप्राण देखील ओंवाळून टाकावयाला तयार आहे हें पाहून मला धन्यता वाटली. परमेश्वर पुन्हा तुझी भेट घडवून आणतो कीं नाहीं याचीच मला व तिलाही काळजी होती. तूं भेटलास, सोन्याहून पिवळें झालें."

"आजोबा! माझ्या वडिलांनीं तुमच्या रक्तानें आपले हात लाल करावे, आणि तुम्ही त्या अपकारांची फेड अशी उपकारांनीं करावी, असा कसा हा देवाघरचा चमत्कारिक योगायोग तरी? बाबा जुन्या वळणावर गेले. पाषाणाचाही देव बनतो हें त्यांना माहीत नाहीं. असो. जें झालें तें होऊन गेलें. माझ्या बाबांच्या हातून जी चूक झाली. तिच्याबद्दल मी तुमची मनःपूर्वक क्षमा मागतों." असें म्हणून नानाजीनें नेत्रांत चमकूं लागलेलीं आसवें आंगरख्याच्या बाहीनें पुशीत भानाजीच्या पायांवर मस्तक ठेवलें.

"क्षमा कसली मागतोस? वेड्या! झालें तें यथान्याय झालें. हें पहा आतां तूं ताबडतोब सागरगडाकडे जा कसा! आणि जातांना आपल्या चांगुणेला घेऊन जा. एथें तिला सुरक्षितपणा नाहीं. तुझी दौलतदेखील तूं आजच नेलीस तरी हरकत नाहीं. पण आतांच सवड नसली, तर केव्हांही रात्रीच्या वेळीं येऊन तेवढें काम कर म्हणजे झालें. येथून सागरगड म्हणजे कांहीं फारसा लांबीचा पल्ला नाहीं. तीन चार घटकांच्या घोडदौडीची वाट आहे."

"पण तुमचें कसें होणार?"

"माझें! असेल देवाची मर्जी तसें होईल. मी आतां जगलों तरी वाहवा, मेलों तरी वाहवा! मी मरणार नाहीं म्हणा, चार दिवसांनीं बरा होईन. तोंवर इथेंच राहीन. तूं मात्र आतां अगोदर सागरगडावर जा, व तिथें शत्रूचा शिरकाव होणार नाहीं असें कर. खाशाबाही गडाकडेच गेला असेल.—"

"खरेंच!"

"हो! आपल्याबरोबरच्या लोकांना तो 'आतां थेट दौडत गडावर चला' असें

म्हणून येथून गेला खरा. त्याची तुझी एकदां गांठ पडली, कीं तुमच्या अर्जुन-अभिमन्यूच्या जोडीपुढें शत्रूची कांहीं मात्रा चालणार नाहीं. तुम्ही दोघे एका विचारानें वागा असें मी सांगावयालाच नको. तो बजरंगबलि तुम्हांला यश देईल."

"आम्हांला यश मिळालेंच पाहिजे. येरव्हीं गो-ब्राह्मणांचा छळ कसा थांबणार? आणि बजरंगबलीच्या मूर्तीची पुन्हा प्राणप्रतिष्ठा कोण करणार?"

"विजयी हो, मुला! विजयी हो. रावण-जरासंधाप्रमाणें उन्मत्त झालेल्या त्या अविंधाधमांचीं व सुभानजीसारख्या देशद्रोह्यांचीं शिरकमलें तोडून त्यांनीं बजरंगबली-ची पूजा बांधून मला दाखव, कीं माझे डोळे निवतील. मीदेखील धड झालों, तर सिद्दी सातार्शीं लढतां लढतां धारातीर्थीं पडून मरून अजरामर व्हावयाला येतोंच आहें. तेवढ्यासाठीं जगावें, व आजवर उभा जन्म ज्याचें हाडवैर साधलें, त्या स्वाशात्राच्या झेंड्याखालीं त्याच्या पाठच्या भावाप्रमाणें उभें राहून एकजुटीनें स्वराज्यासाठीं लढतां लढतां धारातीर्थीं पडून मरून अजरामर व्हावें, असें मलाही आतां वाटूं लागलें आहे. माझा माणकोजी मोकळा असता, तर तोही स्वराज्या-साठीं लढतां लढतां आपला जन्म सार्थकीं लावता. पण—"

आजोबा! सत्याचा वाली परमेश्वर आहे. तुम्हांला ही सुबुद्धि कोणीं दिली? त्यानेंच. माझ्या बाबांना साधुत्वाचें अमोघ सामर्थ्य देऊन अजाणपणाच्या अंधारांत चांचपडत पडलेल्या एथल्या रयतेला कर्तव्यतत्पर करणाऱ्या उपदेशाची संजीवनी त्यांच्या वाणींतून कोण वर्षवीत आहे? तोच. मला काळाच्या दाढेंतून ओढून काढून हा दिवस कोणीं दाखविला? त्यानेंच. तोच परमेश्वर. तोच आपला बजरंगबली तुम्हांला आयुर्बल देईल, तुमच्या माणकोजीला बंधमुक्त करून तुमच्यापाशीं आणील, व तुम्हां दोघांकडून सेवा घेईल."

"तुझ्या तोंडांत साखर पडो." भानाजी प्रसन्न चित्तानें उद्गारला. इतक्यांत चांगुणा आंत आली. तिला पाहून भानाजीनें नानाजीला पूर्वसंकेताची आठवण देण्यासाठीं डोळ्यानें खुणावलें.

नानाजीला खूण पटली.

प्रकरण बाविसावें

# भावी वधू-वरें

"बाबा ! त्या जोगिणीनें हें औषध दिलें आहे. ही मुळी लावल्यावर एका घटकेंत जखमेच्या वेदना थांबतील, व तीन दिवसांत जखम साफ बरी होईल असें ती म्हणाली. ती कांहीं येत नाहीं. ती भिक्षेला निघाली आहे." तिनें भानाजीची मुद्रा किंचित् प्रफुल्ल झालेली पाहून डोळे पुशीत विचारलें, "आतां तुम्हांला जरा बरें वाटतें का ?"

"होय. बाळ ! मला आतां फारच बरें वाटतें. मघाशीं मला भय वाटत होतें, तसें आतां वाटत नाहीं. शिवाय आणखी तूं तें औषध लावलेंस म्हणजे तर मला वाटतें, मी सायंकाळपर्यंत पूर्वीसारखा चांगला हिंडूं फिरूं लागेन."

"मग आपण असें करूं. सायंकाळीं एकदमच गडावर जाऊं, म्हणजे कोणी कोणाविषयीं काळजी करण्याचें कारण उरणार नाहीं." नानाजी चांगुणेकडे पहात म्हणाला.

"हो ! तसेंच करूं." चांगुणा क्षणभर नानाजीच्या दृष्टीला दृष्टि भिडवून म्हणाली, व तशीच आंत गेली.

"तूंही दोन दिवसांचा श्रमलेला व उपाशी आहेस. खरेंच, हें मी इतका वेळा विसरलों होतों." भानाजीनें स्वयंपाकघराच्या दरवाजाकडे दृष्टि वळवून हांक मारली, "चांगुणे !"

"काय बाबा !" चांगुणा दरवाजांत येऊन विचारूं लागली.

"नानाजी दोन दिवसांचा उपाशी आहे. तो किती श्रमलेला आहे याची तुला कल्पना आहेच." भानाजी म्हणाला, "त्याच्या आंघोळीची व जेवणखाणाची व्यवस्था कशी झटपट करतेस पाहूं बरें !"

चांगुणा यावर आंत जातां जातां 'हूं' येवढा एकच एकाक्षरी शब्द उद्गारली. पण तेव्हांच ती नानाजीकडे किती आतुरतेनें व आपलेपणानें पहात होती, हें तिला व त्याच भावनेनें तिच्याकडे पहाणाऱ्या नानाजीला माहीत ! भानाजीचें कांहीं तिकडे लक्ष्य नव्हतें. मात्र आणखी एक जीव त्या प्रेमळ युव-युवतींच्या मधुर नेत्र-मीलनाला साक्षीदार होता-कीं तो त्यांच्यावर पाळत राखून बसला होता कोण जाणे ! "माणिक हें काय ? बाहेर जा पाहूं !" असें म्हणून चांगुणेनें आपले

ओंवे पुढच्या पायांनीं पकडून लडिवाळपणे वर चढूं पहाणाऱ्या आपल्या आवडत्या बोक्याला हातांनीं वर उचलून घेऊन त्याचा एक गोडसा मुका घेतला, व नानाजी-कडे चोरून पहात त्याला हलक्या हातांनीं दरवाजाबाहेर टाकलें. चांगुणेनें चोरून पाहिलें तरी नानाजीला तें समजलेंच. कारण तोदेखील त्या वेळीं तशीच चोरी करण्यांत गुंतला होता.

"ये! माणिक! इकडे ये!" नानाजीनें हातानें खूण करून बोक्याला जवळ बोलावलें. माणिक आपल्या भाषेंत उत्तर देऊन नानाजीजवळ आला, व थेट त्या-च्या मांडीवर जाऊन बसला. नानाजीनें त्याला कुरवाळून त्याचा मुका घेण्याचा प्रयत्न केला; त्याबरोबर मात्र त्यानें आपल्या दोन पंजांनीं नानाजीच्या डाव्या-उजव्या गालांना बुचकारलें.

"हां, माणिक!—" चांगुणा दरवाजांत उभी राहून कौतुक पहात होती, ती माणिकला धमकावीत हळूच गालांतल्या गालांत हंसत म्हणाली, "अनोळखी माणसापाशीं तो असेंच करतो; पण थोडी ओळख झाली, कीं अगदीं गळ्यांत गळा घालील."

केवडा हुंगतांना एखादे वेळीं नाकाला लागला तर कांटे बोंचतात, पण घ्राणेंद्रिय तृप्त होतें; त्याप्रमाणेंच नानाजीला माणिकचें बुचकारणें गोड वाटलें. कारण तें चांगुणेच्या आवडत्या माणिकचें होतें.

"तो चांगुणेचा भाऊ आहे." नानाजी म्हणाला, "माणकोजी कैदेंत पडल्या-मुळें ती त्याच्या सहवासाला मुकली, ती उणीव नांवापुरती तरी भरून काढण्या-साठीं तिनें ह्या गुलामाला तेंच नांव ठेविलें आहे."

चांगुणेनें माणिकची तरफदारी केली, ती ऐकून नानाजीला चांगुणेच्या पहिल्या दृष्टभेटीची आठवण झाली थोड्या वेळापूर्वीं नानाजीनें तेथें येऊन बाहेरच्या बाहेरूनच 'पिसाळांचें घर हेंच का' असें विचारलें, तेव्हां चांगुणेनें दरवाजांत येऊन 'तुम्ही कोण' असें विचारतांना तिरस्काराचा व रागाचा मारा नानाजीवर केला होता, तो प्रसंग नानाजीला आठवला. त्यानंतर नुसती नांवाची ओळख होतांच चांगुणा प्रथम ओशाळून लज्जानम्र होऊन कांहीं काळ मुकी बनली, आणखी कांहीं वेळानें जरा धीट होऊन चोरून पाहूं लागली. आणखी अंमळशानें जोगिणीकडे जातांना 'तुम्ही इथें आहां ना' असें–जरुरीपुरतेंच–पण बोलली; आणि तिकडून औषध घेऊन परत आल्यावर असेंच आडपडद्यानें बोलण्याची संधि साधण्यांत तत्परता

दाखवूं लागली. ही चांगुणेच्या प्रणयाची चढती कमान ध्यानीं घेऊन नानाजीनें तिनें आतांच केलेल्या माणिकच्या तरफदारीला अनुलक्षून स्वतःशीं म्हटलें, "जशी बहीण तसा भाऊ."

चांगुणेनें मुळी उगाळून आणली, ती आपल्या हातानें भानाजीच्या जखमेला चोपडली; तोंवर त्या तिघांचेंही संभाषण सुरूच होतें, व चांगुणाही आडपडद्यानें नानाजीशीं बोलण्याचें धाडस मधून मधून करीत होती. त्या औषधानें भानाजीला खरोखरच एका घटकेंत विलक्षण आराम वाटला. तो बिछान्यावर उठून बसला. इतक्यांत त्यानें घोडा बाहेर बांधून ठेवला होता तो खिंकाळला. त्याबरोबर 'खरेंच, मी हनुमानाला अगदींच विसरलों होतों. बिचारें मुकें जनावर, धन्याविणें पोरकें झालेलें. त्याला उभ्या रात्रींत चारापाणी नाहीं' असें म्हणून उठला. तें पाहून चांगुणा लगबगीनें उठली, व 'मी करतें त्याची व्यवस्था. इतका वेळ माझ्या तोंडचें अगदीं पाणी पळालें होतें. बाबांचें काय होतें व काय नाहीं अशी जिवाला एकसारखी हुरहूर लागून राहिली होती. अर्धी काळरात्र कशी एकटीनें जागून काढली ती माझी मला माहीत. तो बैरागी जर माझ्या हातीं सांपडता, तर त्याला मीं तिथल्या तिथें ठार करायलाही कमी केलें नसतें. अजूनही तो सांपडला तर— पण तें इतक्यांत कशाला बोलूं!' असें म्हणून हनुमानाची व्यवस्था करण्यासाठीं ती बाहेर निघून गेली.

"पाहिलास? इतका त्वेष त्या बैराग्याविषयीं तिच्या ठायीं वसतो आहे. होईल,—तोही आपोआप कमी होईल. मी मघांपासून एकंदर जीं लक्षणें पहात आहें, तीं सारीं शुभ लक्षणें आहेत; पण आणखी थोडा वेळ जावयाला हवा." भानाजी चांगुणा बाहेर गेलीसें पाहून हलके हलके नानाजीला म्हणाला.

"तिला अजून त्या बैराग्याच्या लोकोत्तर कामगिरीचें महत्त्व कळलें नसेल, म्हणून तिचा असा गैरसमज कायम आहे."

"नाहीं. मीं तिच्यापाशीं खाशाबाविषयीं कांहीं म्हटल्या कांहींसुद्धां अजून बोललों नाहीं. तसें पाहिलें तर कांहीं महिन्यांपूर्वी खाशाबा याच बैराग्याच्या वेषांत ह्या टापूंत आला होता. तेव्हां त्याचें वास्तव्य चौबुरुजीवर तुझ्या आजोबाच्या थडग्यापाशीं होतें. तेव्हांदेखील कोणीच त्याला ओळखूं शकलें नाहीं; इतका त्याच्या वृत्तीप्रमाणें शरीरांतही फरक पडला होता. अनेक भाविक लोकांप्रमाणें चांगुणाही तेव्हां त्याच्या भजनीं लागलेली होती. तिनें जर त्याला रात्रीं समक्ष

पाहिलें असतें तर खास ओळखलें असतें, व मग एवढा प्रसंगच आला नसता. पण ती उशिरां आली. तेव्हां तो निघूनही गेला होता. तोच बैरागी हा असें जर तिला आपण समजावून सांगितलें, व शिवाय तो आपला भावी सासरा हें तिला कळलें, तर तिचा विचार खास पालटेल."

"तें आपणाला थोड्या अवकाशानें करतां येईल. पण भानाजीबाबा !" आतां भानाजीला आजोबा म्हणतांना नानाजीची जीभ अडखळूं लागली म्हणून त्यानें भानाजीला नवी हांक मारण्याला सुरुवात केली. "–तुम्ही बाबांना माझी ओळख दिली नाहीं का ?"

"दिली तर ! म्हणून तर एवढ्यावर निभावलें नाहींतर त्यानें मला सफा ठारच केलें असतें. खरें पाहिलें तर केवळ तुझ्यासाठींच खाशाबानें माझ्या घराकडे येवढें आडवळण घेऊन मोर्चा वळविला. मला भेटतांच त्यानें प्रथम तुझीच चौकशी केली."

"त्यांना मी इथे आहे ही माहिती कशी बरें मिळाली असेल ? मला वाटतें, आपलें बजरंगबलीच्या आवारांतील संभाषण त्यांनीं ऐकलें असावें."

"होय. तो तसें म्हणालाच. म्हणूनच त्यानें प्रथम सामोपचारानें 'माझा मुलगा मला भेटव' असें मला सांगितलें. त्याला वाटलें कीं, तूं माझ्याबरोबरच आहेस. पण मला जेव्हां त्याचें समाधान करतां येईना, तेव्हां त्याचें पित्त खवळलें, व एकदम संतापून 'माझ्या मुलाला तूं कांहींतरी दगाफटका केला आहेस' असा आरोप माझ्यावर करून आवेशाच्या भरांत माझ्या छातींत तरवार खुपसली. तरीही मीं समजावून हातांपायां पडून सांगितलें कीं, 'मी आतां तुझा पूर्वींचा वैरी उरलेला नाहीं. मीं नानाजीला एकवार माझा म्हटलें आहे, ती माझी जीभ मी नरकांत घालणार नाहीं. नानाजीची व माझी चुकामूक झाली; पण तो सागरगडावर गेला असेल'. तेव्हां कुठें त्याला माझी अंमळ दया आली. माझ्या बोलण्यावर त्याचा थोडा विश्वासही बसला, व तो मला सोडून तुला भेटण्याच्या उत्कंठेनें गडावर निघून गेला."

"आपली थोडी चुकामूक झाली, त्यामुळें हा अनर्थ झाला. पण माझी खात्री आहे, बाबांना हा सारा प्रकार कळल्यावर आपल्या हातून अविचार झाल्याबद्दल वाईट वाटेल. काय आश्चर्य तरी पहा ! रात्रौ मीं बाबांना पाहिलें, पण ओळखूं शकलों नाहीं. इतकें माझ्या डोळ्यांनीं मला फसविलें कसें नकळे !"

"मी देखील तसाच फसलों ना ! खाशाबानें स्वतःची ओळख देईपर्यंत मी

कांहीं त्याला ओळखूं शकलों नाहीं. खाशाबा म्हणजे कसला धष्टपुष्ट व राजबिंडा पुरुष ! "

" हो ! म्हणूनच मी म्हणतों, त्यांची अशी दशा कशी झाली ? "

" मला वाटतें, मानाजी आंग्र्यानें त्याला छळलें."

" मानाजी तर प्रथमपासूनच आमचा हाडवैरी आहे."

" त्यानेंच खाशाबाला पकडून कैदेंत टाकलें असावें, तेथें त्याचा अमानुषपणें छळ केला असावा, व त्या छळांतून खाशाबा नुकताच युक्तीनें सुटला असावा. रात्रौ मला माझ्या पातकांची जाणीव देण्यासाठीं तो आपल्या हालअपेष्टांची कहाणी भडाभड ओकून गेला. त्यावरून माझा असा ठाम तर्क झाला आहे कीं, तुमच्या घराण्याच्या नाशाला मानाजी आंग्रे कारण आहे."

" मानाजी आंग्रे आमच्या घराण्याच्या नाशाला कारण !" नानाजी संतापानें सुस्कारे सोडीत दांतओंठ खात व हाताच्या मुठी आवळीत उद्गारला, " मानाजी कलीचा अवतार आहे. प्रत्यक्ष आपल्या रक्ताशीं तो बेइमान झाला,—ज्या कान्होजी सरखेलांच्या पोटीं त्याचा जन्म, त्यांच्या दौलतीचे धिडवडे त्यानें काढले व त्यांचा वंश अर्धामुर्धा धुळीला मिळविला ! आणि आम्हीं सागरगडावर रक्त सांडून विजय मिळविला, तर तोही त्याच्या वांट्याला जाणार !—ही कल्पना डोक्यांत आली, कीं एकेकदां असा चेव येतो,—दौलत बेचिराख झाली तरी बेहेत्तर, पण ह्या मदोन्मत्त सैतानाचा नायनाट करावा ! माझ्या बाबांना देखील असेंच वाटत असेल. नाहीं का ? "

इतक्यांत चांगुणा आंत आली. त्याबरोबर मानाजीनें नानाजीला गप्प रहावयाची खूण केली.

" कोणाच्या गोष्टी चालल्या आहेत ? " चांगुणेनें आंत येतांच विचारलें.

" कांहीं नाहीं. तूं घोड्याला दाणावैरण घातलीस ? आणि हें पहा, जा–अगोदर आपल्या वाड्याचा दरवाजा बाहेरून बंद करून त्याला कुलूप ठोक, व सायंकाळपावेतों मागील दारानें सारा वापर चालूं दे. पुन्हा ते लांडगे कदाचित् आमच्या पाठलागाला येतील.—"

" नक्की येतील. मीं रात्रौ त्यांचें संभाषण ऐकलें, त्यावरून मी खात्रीलायक सांगूं शकतों कीं, आपणा दोघांवर तर शत्रूचा दांत आहेच; पण चांगुणेवरही त्या दुष्ट सुभानजीचा डोळा आहे."

“ तें मला माहीत आहे; पण त्या हलकटाचे डोळे मीच फोडीन तर नांवाची चांगुणा.” चांगुणा क्रोधाविष्ट होऊन म्हणाली, “ भविष्यकाळीं वैभवाला चढणाऱ्या भाग्यवंताच्या मस्तकावर जी नागीण आपल्या फणेची छाया करील, तीच नागीण सुभानजीसारख्या पापिष्टांच्या वर्मी चावा घेऊन त्यांना यमसदनाला पाठवील, एवढी माझी व माझ्या पूर्वजांची पुण्याई खबरदार आहे, म्हणूनच काल रात्रीं मी काळाच्या जबड्यांतून सुखरूप बाहेर आलें व त्या बैराग्यालाही काळाच्या जबड्यांतून वांचाविलें. पण त्याचें मात्र व्हावें तसें चीज झालें नाहीं.—”

“ पण तूं कां उगाच जिवाचा संताप करून घेतेस ! नानाजीसारखा जन्माचा पाठीराखा तुला मिळाल्यावर आतां तुला कसलें भय ? तूं अगोदर आंत जा पाहूं ! पाहुणे फार दमलेले आहेत,—दोन दिवसांचे उपाशी आहेत.—”

“ मी आंत जातें. पण बाबा ! माझी अशी फसवणूक कशाला करतां ? ”

“ कसली फसवणूक ? ”

“ ती तुम्हांला माहीत. मी कांहीं आतां बोळ्यानें दूध पीत नाहीं; किंवा मी बहिरीही नाहीं. एवढें मात्र खरें कीं, त्या वेळीं जर तो बैरागी माझ्या हातीं लागता, तर होऊं नये ती गोष्ट माझ्या हातून झाली असती. पण परमेश्वर प्रत्येक गोष्ट करतो ती बऱ्यासाठींच करतो असें मानून वाइटांतून चांगलें शोधायचें तर मीही म्हणतें कीं, झालें तें एका अर्थी बरेंच झालें.” एवढें बोलून चांगुणा भानाजीच्या सूचनेप्रमाणें दरवाजा बाहेरून बंद करून घेण्यासाठीं निघून गेली; व दरवाजा बंद करून मागील दारानें पुन्हा घरांत आली.

नानाजी व भानाजी तटस्थपणें एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागले. त्यांचा तो तटस्थपणा आश्चर्य व समाधान यांचा द्योतक होता. आपलें संभाषण चांगुणेनें चोरून कसें ऐकलें याचें त्यांना आश्चर्य वाटलें; व ज्या प्रसंगाला—चांगुणेच्या रागाला व दुराग्रहाला—ते भीत होते, तो प्रसंग आपोआप टळला, हें पाहून समाधान वाटलें. चांगुणेला चुकवून बोलण्याचें त्यांना आतां कांहीं कारण उरलें नाहीं. मात्र चांगुणा जातां जातां स्वतः काळाच्या जबड्यांतून सुखरूप बाहेर आल्याचें व बैराग्यालाही काळाच्या जबडयांतून वांचविण्याचें बोलून गेली. त्याचा नानाजीला बोध झाला नाहीं. आपल्या भावी सहचारिणीचा तो पराक्रम ह्या दृष्टीनें त्याला तो वृत्तान्त ऐकण्याची फार उत्कंठा लागून राहिली होती. भानाजीनें इतर सर्व वृत्तान्त सांगतांना तसा कांहीं प्रकार रात्रीं घडून आल्याचें सांगितलें नव्हतें.

त्यामुळें नानाजीला एकदां वाटलें कीं, आपण त्याला विचारावें; पण आतां त्याचें भानाजीशीं नातें निराळें होतें. त्याचा संकोच त्याला तेवढें धाडस करूं देईना. बरें; प्रत्यक्ष चांगुणेलाच विचारावें, तर त्याला अजून अवकाश होता. चांगुणा पूर्वीसारखी त्रयस्थ असती तर गोष्ट निराळी होती.

" आपलें संभाषण तिनें ऐकलें वाटतें ! भानाजी हळूच म्हणाला. त्यानें पुन्हा विषयाला सुरुवात केलेली पाहून नानाजीला बरें वाटलें. आतां भानाजीच्या तोंडून आपोआप सर्व उरल्यासुरल्या गोष्टी बाहेर पडतील, व चांगुणेच्या चतुराईच्या कर्ण-मधुर गोष्टी आपणाला ऐकावयाला मिळतील अशी नवी बुभुक्षा नानाजीच्या मनांत अंकुरित झाली. तो म्हणाला, " होय, असें वाटतें खरें."

तोंच चांगुणा माणिकला कटिखांद्यावर खेळवीत बाहेर आली व म्हणाली, " बाबा ! आंघोळीची तयारी झाली आहे." ती एक वाटी नानाजी व भानाजी यांच्या मध्यावर ठेवून म्हणाली, " हें अंगाला लावायला तेल."

" आणि कपडे ? त्याला स्वच्छ कपडे काढून दे ना ! " भानाजी म्हणाला.

" सारी तयारी आहे. आंघोळ व्हायची खोटी, कीं सैंपाकदेखील तोंवर तयार होतो आहे." असें सांगून चांगुणा आंत गेली. जातां जातां तिनें नानाजीकडे चोरून पहावयाला कमी केलें नाहीं. तेव्हांच नानाजीही माणिककडे पहाण्याचें निमित्त करून आपणाकडे चोरून पहात असल्याचें तिला आढळून आलें, त्या बरोबर—कांहींतरी म्हणून किंवा प्रणयाचा एक नाजुकसा चाळा म्हणून—तिनें माणिक-ला 'जा' म्हणून खालीं सोडलें. शब्दाला शब्द, नजरेला नजर अशीं त्या प्रणयी युवयुवतींचीं कधीं मुकीं तर कधीं बोलकीं प्रश्नोत्तरें केव्हांपासून सुरू होतींच. त्यांत-लाच माणिकच्या मध्यस्थीनें बोलावयाचा हा एक प्रकार चांगुणेनें शोधून काढला, व नानाजीनें तो ओळखून माणिकला हांक मारली; पण माणिकला कांहीं तें कोडें उकललें नाहीं. तो नानाजीकडे न जातां बाहेर एक चिमणी अंगणांत दाणे टिप-तांना आढळली, तिला पकडण्यासाठीं म्हणून झडप घालून बाहेर गेला.

पण तो जाईना कां ? त्याचें कार्य त्यानें करण्यापूर्वीच पार पडलें होतें. चांगुणे-ची आपणाविषयीं प्रत्येक बाबतींतील कळकळ पाहून नानाजीला धन्यता वाटत होती. तेलाच्या वाटींतील तेल अंगाला लावण्यापूर्वीच आपलें अंग नाजुक हातांनीं तेल लावून अतिशय मृदुपणानें मर्दून निघाल्यासारखा गोड भास त्याला होत

होता. सैंपाक तयार झाल्याचें ऐकून त्याचें पोटही भरून आलें असेल असें कोणाला वाटेल तर तें मात्र तसें नाहीं. आधींच नानाजी भुकेलेला होता, तशांत आज त्याच्या भावी पत्नीच्या हातचे गोड घांस त्याच्या पोटांत जाणार होते; त्यासाठीं त्याची भूक फारच हांवरेपणा करीत होती. मनानें तो मारे प्रणयानंदांत डुंबत होता; पण म्हणून त्याच्या शारीरिक आंघोळीची गरज तेवढ्यानें थोडीच भागते! शिवाय शरीरालाही आज चांगुणेच्या श्रमसौंदर्यानें पवित्र झालेल्या जलाचें स्नान घडणार होतें, ही काय लहानसान पर्वणी होती! नानाजी लगेच कपडे काढून आंघोळीला निघाला.

## प्रकरण तेविसावें

# माणकोजीचें निवेदन

कुरागिणीच्या सांगण्याप्रमाणें भानाजीला थोड्याच वेळांत पुष्कळच आराम वाटला. त्यामुळें तो नानाजीबरोबर पंक्तीला बसून भोजन करूं शकला. रात्रीपावेतों आपण घोड्यावर स्वार होऊन गडावर जाण्याइतके ताजेतवाने होऊं व एक दोन दिवसांत तर आपली जखम साफ बरी होऊन आपण समरांगणात उडी घालूं शकूं अशी त्याला खात्री वाटूं लागली. दुसऱ्या दिवशीं पहांटेला सागरगडावर जाण्याचा बेत ठरल्यामुळें त्या मंडळीला आतां सुखदुःखाच्या गोष्टी बोलत बसण्यापलीकडे कांहींच उद्योग नव्हता. तोंपर्यंत आपल्या तेथील वास्तव्याची कोणाला खबर लागूं नये एवढी खबरदारी मात्र त्यांनीं घेतली होती. मनुष्याच्या इच्छा व प्रयत्न यांना परमेश्वराचें पाठबळ असलें कीं सारें ठीक; परमेश्वरकृपेनें पाषाणदेखील पाण्याच्या पृष्ठभागावर तरतात. सिद्दी सात व सुलतान यांचे लोक तेथें भानाजी, नानाजी वगैरे मंडळीचा शोध करण्यासाठीं मुळींच आले नाहींत असें नाहीं. ते उभ्या दिवसांतून एक दोन वेळां तेथून फेऱ्या घालून गेले. वास्तविक सुलतानाला प्रथम रेवस येथें सिद्दीच्या सैन्याला मिळण्याला जावयाचें होतें व तो राजमार्ग बजरंगगड गांवाच्या वेशीबाहेरून किहीमवरून थेट रेवसला जात होता, असें असतां सुलतान मुद्दाम आडवळणानें भानाजीच्या वाड्यावरून गेला. हेतु हा कीं, भानाजी व चांगुणा आपल्या हातीं लागतील. पण भानाजीच्या वाड्याचा दरवाजा बाहेरून बंद असलेला पहातांच भानाजी सागरगडावर पळून गेला असेल अशी कल्पना करून सुलतान आपल्या सैन्यासह तेथून निराशेनें निघून गेला. सुलतानाचें सैन्य जात असतांना भानाजी, नानाजी व चांगुणा यांना त्यांची चाहूल मिळाली, व आतां हे आपल्या वाड्यावर हल्ला करतात कीं काय असें भयही त्यांना वाटून आतां पुढें कसें करावयाचें ह्या चिंतेनें त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. पण प्रसंग जसा आला तसा निभावला. सुलतान निघून जातांच चांगुणेनें आणखी एक सावधपणाची गोष्ट केली. बाहेर तबेल्यांत त्यांचे घोडे होते, त्यांना कोणीं पाहिलें तर त्यावरून मंडळी घरांत असल्याचा संशय पहाणाराला येईल असें हेरून चांगुणेनें आपल्या जनावरांना तबेल्यांतून मागील दारानें आपल्या वाड्यांत

आणून बांधलें. त्यानंतर सिद्दी साताच्या वतीनेंही कांहीं सैनिक एकदोनदां येऊन भानाजीच्या वाड्याला प्रदक्षिणा घालून गेले. पण त्यांना दाद लागली नाहीं.

त्या मंडळीच्या बैठकींत गोष्टींवरून गोष्टी निघतां निघतां भानाजी, नानाजी व चांगुणा ह्यांच्या कर्मकहाण्या येऊन गेल्या. अर्थात् त्यांत बैरागी, सुलतान, सिद्दी सात, सुभानजी, मंगला, भवानजी वगैरे सर्वांच्या कर्मकथा येऊन गेल्या. त्याबरोबरच देश-काल परिस्थितीचेंही सूक्ष्मतेनें व सहृदयतेनें सिंहावलोकन करण्यांत आलें. ह्या गोष्टी चालल्या असतां कधीं आनंद, कधीं दुःख, कधीं गांभीर्य, कधीं रौद्र, कधीं भयानक असे नाना परींचे रसरंग मधून मधून निर्माण होऊन त्या तिघांच्याही मनोगतांवर इंद्रधनुष्याप्रमाणें सप्तरंगांची खुलावट करीत होते. भवानजीचा विस्मयजनक शेवट झालेला ऐकून भानाजी हळहळला, व मंगला ही चांगुणेची प्रिय मैत्रीण असल्यानें चांगुणेच्या डोळ्यांना पाणी आलें. बैराग्याचा विषय पुन्हा निघाला तेव्हां मात्र भानाजीनें त्याचीं गुणगीतें इतक्या मुक्त कंठानें गाइलीं, कीं तीं ऐकून चांगुणेच्या मनांतील उरलासुरला रागरोष तर पार लयाला गेलाच; पण नानाजीलाही आपल्या पित्याची यथावत् थोरवी उभ्या आयुष्यांत त्या दिवशींच पहिल्यानें ऐकावयाला मिळाली. 'आपल्या पित्यानें आपल्या आईला छळलें; तिला व आपल्या लहानग्या बहिणीला देशोधडीला लावून अन्नाला, अब्रूला व आयुष्याला महाग करून सोडलें; आपल्या नाशालाही तोच कारण' अशी नानाजीची आजवर ठाम समजूत होती, ती आज भानाजीच्या कळकळीच्या बोलण्यानें बरीच पालटली. आजवर तो खाशाबाला, केवळ आपला जन्मदाता म्हणून मानीत होता, खाशाबाच्या अन्यायाचा उच्चार देखील कोठें चुकून सुद्धां न करण्याइतकी सावधगिरी राखीत होता, हें सारें पुत्रकर्तव्य म्हणून तो करीत होता; पण आज त्याचा दृष्टिकोण बराच बदलला. तरीही त्यानें आपली आई व बहीण यांचा त्या बैठकींत उल्लेख केला नाहींच; वर वर बोलून वेळ मारून नेली. कारण काय तें त्याचें त्याला माहीत. पण त्या आठवणींनीं त्याला कांहीं काळ दुःखीकष्टी केलें हें मात्र खरें.

त्या तिघांच्या त्या दिवशींच्या गुजगोष्टींत त्यांचा पुढील बेत ठरला तो असा कीं,–आतां तेथें वास्तव्य करणें धोक्याचें असल्यानें तिघांनींही रात्रीच्या वेळीं गुपचूप स्थानत्याग करून सागरगडाच्या वाटेला लागावें. भानाजीला गडाची चांगली माहिती होतीच. तेव्हां प्रथम साधल्यास अंमळ दूरच्या मार्गानें

शत्रूचा डोळा चुकवून कनकेश्वरावरून गडावर जाऊन तेथल्या किल्लेदाराला सावध करावयाचें, व मथुराबाईला वगैरे भेटून शत्रूशीं सामना देण्याची तयारी करावयाची, तें नच साधलें तरी तो सारा टापू व कनकेश्वराचा डोंगरही भानाजीच्या पायांखालचा असल्यानें त्यांना कोठेंही गुप्तपणें संचार करून आपली पुढील योजना साधतां येण्याजोगी होती. ती योजना म्हणजे काय,–पैसा भानाजीपाशीं बराच होता, त्या पैशाच्या जोरावर कनकेश्वराच्या टापूंत नवीन सैन्यसामग्री वगैरे जुळवून शत्रूशीं झुंजून त्याला नामोहरम करावयाचा. अंजनवेलचा पाडाव झाल्यापासून सिद्दी साताला सुरक्षितपणें वास्तव्य करावयाला व नवी राजधानी स्थापण्याला एकही बळकट गड हातीं न उरल्यामुळें सिद्दी साताची वक्र दृष्टि सागरगडाकडे वळली होती, अर्थात् तो आपलें आहे नाहीं तेवढें सामर्थ्य एकवटून आयुष्याच्या अखेरच्या क्षणापावेतों गड काबीज करण्यासाठीं झटणार, व एकदां गड त्याच्या हातीं आला कीं, तेथून मराठ मुलुखाच्या बेचिराखीला व गोब्राह्मणांच्या उच्छेदाला नव्या राक्षसी जोरानें सुरुवात करणार हें ठरल्यासारखेंच होतें. म्हणूनच तर मानाजीनें तांतडीनें पेशव्यांची मदत मागितली होती, व त्याप्रमाणें चिमाजीअप्पा अफाट फौजेनिशीं सिद्दी साताचें पारिपत्य करण्यासाठीं कोंकणांत उतरले होते. अर्थात् सागरगडचा टापू हें रणक्षेत्र बनून ती भूमि धारातीर्थीं पतन पावणाऱ्या असंख्य वीरांच्या रक्तानें न्हाऊन निघणार याविषयीं तिळमात्र संदेह नव्हता. भानाजी त्या प्रांतींचा चांगला माहीतगार असल्यानें व तेथें त्यानें पूर्वीं लढाया मारलेल्या असल्यानें आपणाला कोठें लपून बसतां येईल व तेथून शत्रूला हुलकावण्या देऊन शत्रूचा कोंडमारा करून कसा डाव साधतां येईल हें भानाजी चांगल्या प्रकारें जाणत होता. त्यानें आपल्या पूर्वतयारीसाठीं कनेकश्वरचा टापू पसंत केला होता. शिवाय खाशाबा बैरागी त्याच हेतूनें गडाकडे वळला होता; त्याचा व आपला मिलाफ झाल्यावर तर आपण पेशव्यांच्या मदतीशिवाय देखील शत्रूला लोळवूं शकूं अशी भानाजीला खात्री वाटत होती. खाशाबा बैरागी ही त्या प्रांतीं परमेश्वरानें पाठविलेली अमोघशक्ति होती; त्याच्या हांकेला हजारो मराठे मायदेशासाठीं मरण्याला तयार होऊन लढावयाला धावून येणार हें उघड होतें. बरें; खाशाबाचा पंचीप्यारा नानाजी आतां भानाजीबरोबर असल्यानें त्यांचा मिलाफ होणेंही अगदीं सुकर झालें होतें. सैन्य–सामग्रीला पडणारा तुटवडा भरून काढण्यासाठीं भानाजीपाशीं पैसाही विपुल होता.

मात्र एका मुद्द्यावर भानाजी व नानाजी यांचें मतैक्य होईना. ह्या दिग्विजयाचें यश मानाजी आंग्र्याच्या पदरीं पडतां कामा नये,सिद्दी सातप्रमाणेंच मानाजीलाही आपण धुळीला मिळवून धन्याची दौलत पुन्हा धन्याच्या—संभाजीच्या—स्वाधीन करणार, असा आग्रह नानाजीनें धरला. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, चांगुणाही नानाजीसारखेंच बोलूं लागली ! अखेर भानाजी, व चांगुणा आणि नानाजी यांच्यांतील मतभेदाचा प्रश्न तसाच राहून गेला. त्या मुद्द्यावर भानाजीनेंही फारसा जोर दिला नाहीं, व नानाजी आणि चांगुणा ह्या दोघांनींही भानाजीच्या पिकल्या केंसांना मान्यता द्यावयाची ती दिली.

त्याच रात्रौ सर्वत्र सामसूम झाल्यावर पहांटेच्या सुमाराला भानाजी, नानाजी व चांगुणा ह्यांचें सागरगडावर निघून जाण्याचें ठरलें. रात्रौ जाण्याचें कारण असें कीं, न जाणो; एरव्हीं शत्रूला दाद लागावयाची व अनर्थ कोसळावयाचा ! जर तसा प्रसंग आलाच तर आपणाला काय करावें लागेल, कोणत्या मार्गानें कसें गडावर जातां येईल, वगैरे गोष्टी बोलतां बोलतां प्रहर रात्रीचा सुमार झाला. सुदैवानें भानाजीला झोंप लागल्यामुळें चांगुणा व नानाजी यांना अवांतर गोष्टीही मनमोकळेपणानें बोलतां आल्या. त्या गोष्टींच्या भरांत वेळ कसा निघून जात होता याचीही त्या दोघांना दाद लागली नाहीं.

ॐ ॐ ॐ

मध्यरात्रीच्या सुमाराला भानाजीच्या वाड्याच्या पुढच्या दरवाजावर कोणीं तरी थाप मारली, म्हणून चांगुणा कानोसा घेते, तों तिला बाहेरून हांक ऐकूं आली, " चांगुणे ! "

ती हांक ऐकून नानाजी व चांगुणा दोघेंही दचकलीं. तोंच पुन्हा दुसरी हांक ऐकूं आली, " चांगुणे ! दार उघड."

" हा आवाज तर माझ्या दादाच्या आवाजासारखा वाटतो." चांगुणा पुन्हा कानोसा घेत नानाजीकडे पहात म्हणाली.

" काय, माणकोजी सुटून आला ? माझा माणकोजी सुटून आला ? " भानाजी एकदम जागा होऊन म्हणाला.

चांगुणा व नानाजी हीं अगदीं हळुहळू बोलत होतीं. पण भानाजी मात्र अंमळ मोठ्यानें बाहेरील मंडळीला देखील त्या रात्रीच्या प्रशांत समयीं ऐकूं जाईल इतक्या मोठ्यानें बोलला.

"होय बाबा! मी माणकोजीच आहें, लौकर दार उघडा." बाहेरून पुन्हा शब्द आला.

त्या वेळीं चांगुणा व भानाजी यांना किती आनंद झाला असेल, वत्सलतेनें त्यांचें मन कसें उचंबळून आलें असेल, याचें वर्णन करण्यापेक्षां तें काम सहृदय वाचकांच्या कल्पनाशक्तीवरच सोंपविणें चांगलें. 'देव पावला. माझी पूर्वजन्मींची पुण्याई फळाला आली. तुझ्या पायगुणानें माझा माणकोजी घरीं आला' असे बानाजीविषयीं कृतज्ञतापूर्ण उद्गार काढीत भानाजी आपलें दुःख वगैरे चट्सारें विसरून अंथरुणांतून उठतां उठतां चांगुणेला म्हणाला, "चांगुणे! पोरी, तुझा दादा आला. दरवाजाची कडी काढ जा."

पण जितका भानाजीला तितकाच चांगुणेलाही माणकोजी आल्याचें ऐकून आनंद झाला होता. तिनें पूर्वींच बाहेर धावत जाऊन दरवाजाची कडी काढली होती. त्यामुळें भानाजीच्या तोंडचें वाक्य पुरें होते न होतें तोंच माणकोजी आंत येऊन भानाजीच्या चरणांना वंदन करून म्हणाला, "बाबा! तुमच्या पायांच्या पुण्याईनें मी उंदेरीच्या तुरुंगांतून सुटून आलों."

"बजरंगबलीकी जय" असा बजरंगबलीच्या नांवाचा जयजयकार करून भानाजीनें माणकोजीला वात्सल्यप्रेमानें घट्ट आलिंगन देत म्हटलें, "ये. माझ्या पाडसा, ये." लगेच तो नानाजीकडे वळून म्हणाला, "नानाजी! ईश्वरानें तुला सुखी केलें तसेंच मलाही सुखी केलें. आपणाला आज एकामागून एक शुभशकूनच होत आहेत, यावरून बजरंगबलीच्या कृपेनें आपण सागरगडच्या मोहिमेंत विजयी होणार यांत शंका नाहीं.

'नानाजी' हें नांव भानाजीच्या तोंडून निघालेलें ऐकतांच माणकोजीनें नानाजीकडे पहात भानाजीला विचारलें, "बाबा! हे नानाजी कोण?"

"हा नानाजी सुर्वे; खाशाबा सुर्व्यांचा हा मुलगा. व तुझा उद्यांचा मेहुणा."

"असें का?"

"होय. आणि खाशाबा सुर्व्यांची तुला ओळख यावयाची म्हणजे—"

"तें मला माहीत आहे."

"नाहीं. बाळ! तें तुला माहीत नाहीं. तुला पिसाळ व सुर्वे ह्या दोन घराण्यांची जुनी दावेदारी माहीत आहे; पण ती दावेदारी आतां संपली असून दोघेही एक झाले आहेत."

चांगुणेला भय वाटत होतें, आतां माणकोजी आपल्या लग्नांत खो घालतो कीं काय म्हणून ती प्रसंगावधान राखून मध्येंच म्हणाली, "दादा! तूं बजरंग वैराग्याचें नांव ऐकलें असशील?"

"होय. नुसतें त्यांचें नांवच काय; पण बजरंगस्वामींना मीं माझे गुरु मानलें आहे. आतां मी आलों तो त्यांच्याचकडून."

"ते कुठें आहेत?" नानाजीनें विचारलें.

"सध्यां खंडाळ्याच्या गुहेंत त्यांचें वास्तव्य आहे. त्या टापूंत सैन्य जमविण्याचा त्यांचा उद्योग झपाट्यानें चालला आहे. त्यांच्याच आज्ञेवरून तर मी तुझा शोध करण्यासाठीं आलों. त्यांनींच मला येथें तुझा तपास करण्यासाठीं सांगितलें." माणकोजी भानाजीकडे वळून म्हणाला, "आणि बाबा! त्यांच्याच हातून गैर समजुतीनें तुम्ही जखमी झालां, हेंही मला त्यांनींच सांगितलें. माझी व त्यांची मी सागरगडावरून येतांना अचानक गांठ पडली. वास्तविक मी अगदीं प्रथम तुमच्या समाचारासाठीं आलों होतों. पण तुम्ही घरांत भेटलां नाहीं; तेव्हां मी तसाच माघारा चौबुरुजीवर गेलों, व तेथून मग गडावर गेलों. चौबुरुजीवर तरी एक मौजच झाली. चौबुरुजीवरच्या भानगडी तुम्हांला कळल्या असतीलच." तो नानाजीकडे वळून म्हणाला, "नानाजी! तुला तर त्या कळल्याच असल्या पाहिजेत. तुला आणखी आनंदाची बातमी सांगावयाची म्हणजे काल रात्रीं मीं तुझ्या सावत्र आईला सिद्दी साताच्या मगरमिठींतून सोडविलें."

"काय? माझी माई इकडे आली आहे?" नानाजीनें विस्मयचकित होऊन विचारलें.

"होय." माणकोजी म्हणाला, "गजरा कोटकामत्याला आपल्या भावापाशीं होती; ती संभाजी सरखेलांनीं तो कोट पाडाव करून तेथल्या किल्लेदाराला-संताजी पिसाळाला कैदेंत टाकल्यामुळें निराधार होऊन संभाजीची कैदी झाली. तिला विजयदुर्गावर कैदेंत ठेवण्यांत आलें होतें. तेथून ती युक्तिप्रयुक्तीनें निसटली व एका नावेंतून आपल्या माहेरीं यावयाला निघाली. पण मार्गांत ती नाव सिद्दींच्या पदरच्या चांचे लोकांकडून लुटली जाऊन गजरा त्या लोकांच्या हातीं सांपडली. ती त्यांनीं सिद्दी साताला नजर केली."

"ही केव्हांची गोष्ट?"

" ह्या गोष्टीला तीनचार दिवस झाले असतील. सिद्दी सातानें तिला आपली दासी बनविलें होतें."

" ती तुझ्या हातीं कशी सांपडली ? "

" ऐक तर खरें ! मी काल दिवेलावणीच्या सुमाराला उंदेरीच्या किल्ल्यावरून निसटलों—"

नानाजी मध्येंच म्हणाला, " तुझें व माझें नशीब थोर म्हणूनच तुला उंदेरीवरून इकडे येतां आलें. शाबास तुझी ! पण हें कसें झालें ? "

" उंदेरीचा किल्लेदार महंमदखान हा किल्ल्यावर नव्हता, तो जंजिरेकर सिद्दीच्या निकडीच्या बोलावण्यावरून जंजिऱ्याला गेला होता, ती संधि साधून उंदेरीचा जुना किल्लेदार किल्ल्यावर आला. त्यानें आम्हांला कैदेंतून मोकळें केलें, व बंड पुकारण्याचें आमचें ठरलें. मीं स्वतः माझ्या हातानें किल्ल्यावरील इंग्रजांचें निशाण काढून तेथें आमचा भगवाझेंडा फडकविला व बंडाचा बाहुटा रोंवला."

" शाबास ! माणकोजी ! शाबास तुझी." नानाजी चांगुणेकडे वळून म्हणाला. " सिंहाचा छावा कोल्ह्याकुत्र्यांनीं कोंडला तरी स्वतःच्या बळावर ती शत्रूची कोंडी फोडून बाहेर पडतो तो असा. आणि त्या किल्लेदाराचीही धन्य ! "

माणकोजी नानाजीला म्हणाला, " पण नानाजी ! इतकी वाखाणणी करण्याजोगा आमचा तो पराक्रम टिकाऊ ठरला नाहीं. कारण मी किल्ल्यावर भगवा झेंडा फडकवून कंपनीच्या निशाणाचा चोळामोळा करीत मागें फिरतों, तोंच तेथला दुय्यम किल्लेदार मोहबतखान यानें तें आपल्या वाड्यांतून पाहिलें, कीं कोणीं चुगली केली तेंही नकळे ! लगेच माझा पाठलाग झाला. मी एकटा असल्यानें मला तेथून स्वसंरक्षणासाठीं जिवाची पर्वा न करतां त्या अवघड बुरुजावरून खालीं उतरावें लागलें. उतरतां उतरतां माझा पाठलाग करणाऱ्या लोकांच्या वल्गना माझ्या कानीं आल्या, त्यांवरून मला कळलें कीं, आमचा पुढारी जुना किल्लेदार व त्याचे साथीदार ह्यांना शत्रूनें कापून काढलें असून मी एकटाच त्या बंडखोरांपैकीं मोकळा होतों. मला ठार करण्याची मोहबतखानानें शिकस्त केली. तो ईर्षेनें माझ्या मागोमाग बुरुजावरून खालीं उतरला. पण मी त्याला ठार करून निसटलों. माझ्या आयुष्याची दोरी खबरदार म्हणून माझा पाठलाग करणारे आणखी चार लोक खालीं उतरूं लागले त्यांनाही ठार करून मी तेथून निसटलों.

## प्रकरण २३ वें—



“ मी किल्ल्यावर भगवा झेंडा फडकवून कंपनीच्या निशाणाचा चोळामोळा करीत मागे फिरतों, तोंच माझा पाठलाग झाला. ”

नौ सबंध दिवस एका कोळ्याच्या झोंपडींत आश्रयाला राहून रात्र पडली तेव्हां किनाऱ्यावर एक नाव सांपडली तिच्यांतून चौबुरुजीवर आलों."

" एकूण तुमचा डाव कांहीं साधला नाहींतर !" भानाजी म्हणाला.

" नाहीं. पण तो आज ना उद्यां खास साधेल. तेथला किल्लेदार महंमदखान जो जंजिऱ्याला गेला आहे, तो त्याच बाबतींत कांहीं वाटाघाट करण्यासाठीं गेला असल्याचें मला कळलें आहे. तो आहे सिद्दी अबदुल रहमानच्या पक्षाचा; आणि सिद्दी अब्दुल् रहमान आहे मराठ्यांचा मिंधा. त्याला जर आंग्रे किंवा पेशवे म्हणाले, कीं उंदेरी आम्हांला हवी; तर नाहीं म्हणण्याची त्याची छाती नाहीं."

" त्या बिचाऱ्याच्या हातीं काय आहे ! किल्ला आहे इंग्रजांच्या हातीं." भानाजी म्हणाला.

" तें खरें; पण महंमदखान सिद्दीच्या बाजूचा आहे; मराठ्यांनीं किल्ल्यावर अचानक हल्ला केला व महंमदखानानें किल्ल्याचा बचाव केला नाहीं, कीं काम झालें. आमचा विचार होता कीं, सिद्दी सात सागरगडावरील मोहिमेच्या धांदलींत आहे, तो ऐनवेळीं इंग्रजांच्या मदतीला येणें शक्य नाहीं; किल्लेदार अनायासें बाहेर गेला आहे; अशा संधींत साधलें तर बंड उभारून किल्ला बळकवावा. पण तो बेत फसला."

" बरें; पुढें काय झालें ?" चांगुणेनें विचारलें. ती आपल्या भावाची हकीकत ऐकण्याला फार उत्सुक झाली होती.

इंचबर्डसाहेब व सिद्दी सात यांची मिरवणूक पार पडल्यावर सुलतान आजारीपणाचें निमित्त करून सिद्दी सातापासून निघून दिलाराच्या अर्थात् प्रभावतीच्या अभिलाषानें फत्तेकोठीकडे गेला व दत्ताजीशीं बोलत उभा राहिला, तेव्हां एक व्यक्ति जवळच्या पडक्या भिंताडाआड लपून बसली होती व ती मग सर्वांचा डोळा चुकवून तेथून निघून गेली. तो प्रकार पूर्वी अकराव्या प्रकरणांत वर्णन केलेला वाचकांना आठवत असेलच; त्यानंतर सकवारनें सिद्दी सातापाशीं माणकोजी, गजरा व प्रभावती यांच्याविषयीं चुगली केली, तो वृत्तान्तही विसाव्या प्रकरणांत येऊन गेला आहेच; तोच सारा वृत्तान्त माणकोजीनें निवेदन केला, त्याची एथें पुनरुक्ति करणें नलगे. तो वृत्तान्त ऐकून सर्वांना मोठें कौतुक वाटलें. पण नानाजीच्या मनावर मात्र त्या वृत्तान्ताचा विपरीत परिणाम झाला. ज्या प्रभावतीचें नानाजी इतके दिवस चिंतन करीत होता, व जी प्राप्त होणें शक्य

नाहीं अशी निराशा झाल्यामुळें त्यानें चांगुणेला आपली जन्माची भागीदारीण करण्याचें ठरविलें होतें; ती अजून सुखरूप आहे व आपण वादळाच्या रात्रीं जिला वांचविलें ती तीच, हें कळतांच नानाजीला वाटलें, 'चांगुणेशीं विवाह करण्यासाठीं वचनबद्ध होण्यांत मीं आत्मवंचना केली. आतां प्रभावती मला भेटेल, तिला मी तोंड कसें दाखवूं? तिला मीं फसविलें आहे; मी महापातकी आहें. ती मला काय बरें म्हणेल? बरें; तिच्यासाठीं मीं चांगुणेशीं वचनभंग केला, तर चांगुणा, तिचा बाप व तिचा भाऊ मला काय म्हणतील?' इतक्यांत त्याला विचार करतां करतां एक शंका आली, ती फेडून घेण्यासाठीं त्यानें माणकोजीला विचारलें, "त्या प्रभावतीचें लग्न झालेलें आहे का?"

"नाहीं." माणकोजी गालांतल्या गालांत हंसून म्हणाला, "पण ती कांहीं माझ्या बहिणीची सवत व्हावयाला राजी होणार नाहीं."

"म्हणजे काय?" चांगुणेनें विस्फारित नेत्रांनीं एकदां नानाजीकडे व पुन्हा माणकोजीकडे पहात विचारलें, "दादा! तुझ्या बोलण्यांतील खोंच माझ्या ध्यानीं आली नाहीं."

नानाजीलाही चांगुणेप्रमाणेंच वाटलें. नानाजीची वृत्ति इतकी आनंदी होती ती एकाएकीं पालटली व गंभीर झाली. जाईचें कोमल पुष्प कोमल सूर्यकिरणांच्या एका तिरपीसरसें कोमेजून जावें, तशी नानाजीची चर्या कोमेजून गेली. पण प्राप्त प्रसंगाला तोंड देणें त्याला प्राप्तच होतें. तो शक्य तितकें आत्मसंयमन करून व बळेंच चर्या हंसरी करून चांगुणेकडे वळून म्हणाला, "चांगुणे! माणकोजी बळेंच माझी ही थट्टा करतो आहे."

"थट्टा नव्हे, मी खरेंच सांगतों." माणकोजी पुन्हा किंचित् हंसून म्हणाला. तें ऐकून नानाजीच्या हृदयावर पुन्हा जोराचा आघात झाला; पण त्यानें उसनें हंसें आपल्या चर्येवर खुलवून जसा कांहीं आपला व प्रभावतीचा कांहींच संबंध नाहीं व आपण सहज कुतूहलानें प्रभावतीविषयीं चौकशी केली असें सर्वांना भासविलें. तो त्याचा आविर्भाव इतका बेमालूम साधला कीं, सर्वांनीं ती बाब तशीच थट्टेवारी सोडून दिली.

"बरें; पण त्या दोन्ही बायका आतां कुठें आहेत?" चांगुणेनें विचारलें. विचारतां विचारतां ती खोंचिकपणानें जरा हंसली. त्या हास्यांतील खोंच माणकोजीच्या तर ध्यानीं आलीच; पण नानाजीच्याही ध्यानीं आली. माणकोजीचें फार

दिवसांपासून प्रभावतीवर प्रेम असलेलें त्या दोघांनाही माहीत होतें, त्या प्रेमाला अनुलक्षून चांगुणा बोलत होती.

"चांगुणे! तूं हंसलीस कां?" माणकोजीनें जरा ओशाळल्यासारखें गोरें-मोरें तोंड करून विचारलें.

"मी आपली सहज हंसलें." चांगुणेनें पुन्हा हंसून खोंचिकपणानें भुंवया चढवीत विचारलें, "पण प्रभावतीला तूं कुठें ठेवून आलास तें सांग तर खरें!"

"त्या दोघींनाही मी गडावर पोंचवून आलों. त्या हंबीररावाकडे मंगलेच्या संगतींत सुरक्षित आहेत." माणकोजी पूर्ववत् ओशाळेपणानें उत्तरला.

"एकूण जगांत पुरुषांना बहिणीपेक्षां बायकांची माया जास्त असते!" आपलें खोंचिक बोलणें माणकोजीच्या मनाला जरा झोंबून त्याचा चेहरा जास्त गोरामोरा झाला असें पाहून चांगुणा मनमोकळेपणानें हंसत म्हणाली, "दादा! तूं रागावूं नकोस! माझी ही थट्टा शुभलक्षणी आहे भावाची अशी थट्टा करायचा वहिणी-ला अधिकारच असतो."

"बरें; पण आपण गोष्टी बोलण्यांत वेळ घालविणें बरें नाहीं. आतांच्या आतां आपणाला गडावर गेलेंच पाहिजे." माणकोजी प्रभावतीच्या गोष्टी निघतांच बेभान झाला होता तो पुन्हा भानावर येऊन नानाजीकडे वळून म्हणाला, "नानाजी! आपला एकेक क्षण लाखांच्या मोलाचा जातो आहे. आपणाला उजाडण्याच्या पूर्वी गडावर जाऊन पोंचलेंच पाहिजे. कारण सिद्दी सानाची फौज चोहोंकडून रेवस-चरईच्या आसपास झपाट्यानें जमा होत आहे व गडाला वेढा घालण्यासाठीं सुलतान चौबुरुजीवरील निवडक फौज घेऊन आजच तिकडे जाऊन पोंचला आहे अशी खबर मला दोनप्रहरीं गडावरच मिळाली. शिवाय सुभानजी आज गडावर गेला आहे, तो देखील तिथें कांहीं भानगड करील यांत संशय नाहीं." आपल्या बोलण्याकडे नानाजीचें लक्ष्य नाहीं, असें पाहून माणकोजीनें त्याला हांक मारून विचारलें, "नानाजी! तुझें लक्ष्य कुठें आहे?"

"कां? तूं काय म्हणालास तें सारें मीं ऐकलें." नानाजी एकाएकीं झोंपेंतून खडबडून जागा झाल्याप्रमाणें भानावर येऊन म्हणाला.

"काय ऐकलेंस? मीं काय सांगितलें?" माणकोजीनें स्मितहास्यपूर्वक विचारलें.

"माझें तिकडे लक्ष्य होतें. सुलतान सागरगडावर चालून गेला आहे."

"आणि काय ?"

"सुभानजीही गडावर जाऊन पोंचला आहे. मला सारें कळलें. आणि मी तरी विचार करीत होतों तो आतां पुढें कसें करावयाचें याचाच." नानाजी म्हणाला. त्याला आपल्या मनांतील विचार प्रगट होऊं द्यावयाचे नव्हते.

माणकोजी नानाजीला म्हणाला, "तूं विचार कसला करीत आहेस तें मला माहीत आहे. त्या बाबतींत मी तुझ्याशीं फुरसतीनें थोडें खासगी बोलणार आहें. ह्या ऋणानुबंधाच्या जाळ्यांत तूं आणि मी दोघेही सारखेच गुंतून पडलों आहों, व दोघांनाही एकमेकांच्या केंसालाही धक्का न लावतां ही गुंतागुंत सोडवावयाची आहे. तूर्त मी तुला एवढें वचन देऊन ठेवतों कीं, मी कोणत्याही निमित्तानें तुझ्या सुखाआड मुळींच येणार नाहीं." इतक्यांत भानाजीनें तळघरांतून चांगुणेला हांक मारली ती ऐकून माणकोजी थांबून चांगुणेला म्हणाला, "चांगुणे ! बाबा तुला हांक मारीत आहेत."

चांगुणा खालीं गेली, ती संधि साधून माणकोजी नानाजीला म्हणाला, "नानाजी ! चांगुणेच्या व बाबांच्या देखत मला स्पष्ट बोलतां येईना, तें आतां बोलतों. प्रभावतीचा व तुझा काय संबंध आहे हें मला प्रभावतीच्याच तोंडून कळलें आहे. त्या पूर्वीपासून म्हणजे तुझ्याशीं प्रभावतीचें लग्न व्हावें अशा अर्थाच्या वाटाघाटी सुरू होण्याच्या पूर्वीपासून माझें प्रभावतीवर प्रेम आहे.—तूं रागावूं नकोस; मी तुला माझ्या पाठच्या भावाप्रमाणें मानून तुझ्याशीं माझें अंतःकरण उघडें करीत आहें. आपणाला जास्त बोलावयाला वेळ नाहीं म्हणून अगदीं थोडक्यांत सांगतों; प्रभावतीवर माझें किती उत्कट प्रेम आहे हें एक मला व दुसरें परमेश्वराला माहीत. त्या प्रेमाला मूर्त स्वरूप प्राप्त होण्याची वेळा देवदयेनें मध्यंतरीं आली होती; पण ती वायां गेली. उंदेरीच्या किल्लेदारानें प्रभावती मला देऊं केली होती, व बाबांनाही प्रथम हा संबंध मान्य होता. पण प्रभावती ही किल्लेदाराची पाळलेली मुलगी आहे असें त्याना कोणीं तरी येऊन सांगितलें. व तेवढ्यावरून बाबांनीं ती सोयरीक मोडली. त्यानंतर ती तुला सांगून गेली. बाबांच्या इच्छेविरुद्ध वागण्याचें धैर्य तेव्हां माझ्या अंगीं नव्हतें व अजूनही नाहीं. तरी पण माझें प्रभावतीवरील प्रेम मात्र अढळ आहे. दरम्यान् उंदेरीचा किल्ला पडल्यावर किल्लेदाराच्या सर्वच कुटुंबाची वाताहात झाली व तुम्ही दोघे दोन दिशांना पांगलीं गेलां. माझ्याही वांट्याला कैद आली." इतक्यांत तळघरांतून दिव्याचा उजेड

दिसूं लागला. तो पाहून माणकोजी आपलें निवेदन आवरतें घेऊन म्हणाला, "बाबा वर येत आहेत. आपण मग सवडीनें ह्या गोष्टी बोलूं. तूर्त तुला मी एवढेंच पुन्हा सांगून ठेवतों कीं, मीं तुझ्या प्रेमांत विघ्न घातला असें तूं मुळींच मानूं नकोस. त्याप्रमाणेंच प्रभावतीनें प्रथम माझ्याशीं लग्न करण्याचें कबूल केलें आहे हें खरें. पण तें केव्हां ! तुझा मुळींच पत्ता लागेना तेव्हां."

"पण आतां तिला माझा पत्ता लागला आहे ना ?"

"होय. म्हणूनच तिच्याही मनाची अवस्था कांहींशी तुझ्यासारखीच झाली आहे. पण जशी ती मला वचनबद्ध झाली आहे, तसाच तूं चांगुणेला वचनबद्ध झाला आहेस. असा हा पेंच आहे. यांतून परमेश्वर आपणां सर्वांची कशी मोकळीक करील तें पहावें."—"माणकोजी तळघरांत डोकावून पहात म्हणाला, बाबा व चांगुणा आलीं. आतां हा विषय तूर्त इतकाच पुरे. इतक्यांतच याची वाच्यता करण्याचें कारण नाहीं."

ॐ ॐ ॐ

भानाजी व चांगुणा हीं दोघें तळघरांतून मोहरांनीं भरलेले दोन हंडे घेऊन वर आलीं. लगेच माणकोजी व नानाजी यांनीं प्रभावतीचा विषय सोडला, व प्रयाणाची तयारी आरंभिली. तयारी ती काय करावयाची होती ! बरोबर हत्ती घोडे थोडेच घ्यावयाचे होते ! भानाजीनें आपल्या ठेवणीच्या शस्त्रांतून निवडक शस्त्रें निवडून काढलीं. चांगुणेनें आपल्या घोड्यांतून दोन घोडे जे विशेष चपळ व जातिवंत होते, त्यांच्यावर भानाजीच्या साह्यानें खोगीर चढविलें. नानाजी व माणकोजी यांचे घोडे होतेच. नानाजीचा हनुमान फारसा दमलेला नसल्यानें व शिवाय तो नानाजीला फार प्यारा असल्यानें त्यानें त्यालाच बरोबर घ्यावयाचें ठरविलें. माणकोजीचा घोडा बराच दमलेला होता. पण तो शुभशकुनी आहे अशी माणकोजीची खात्री पटल्यामुळें तो त्या घोड्याला सोडावयाला तयार नव्हता. त्यांनीं आपल्या घोड्यांच्या पाठीवर त्या मोहरा बांधून घेतल्या.

"सर्व तयारी झाली ?" भानाजीनें विचारलें.

"झाली." चांगुणा उत्तरली.

"तर मग देवाला नमस्कार करा व चला." भानाजी देवघराकडे वळून देवाला नमस्कार करून दोन्ही हात जोडून देवाची प्रार्थना करूं लागला, "देवा ! आज आम्ही आमच्या पूर्वजन्मींच्या पापांची फेड करण्यासाठीं परागंदा होत आहों.

पण आम्हीं हातीं घेतलेल्या कार्यांत आम्हांला यश देणारा तूं समर्थ आहेस. आपल्या देवपणाची तुला चाड असेल, आपली रोज पूजा व्हावी व आपणासमोर दिवा लागावा असें तुला वाटत असेल, तर तूं आज हा नानाजी व हा माणकोजी हे डावे उजवे हात मला दिलेस, चव्हाण व सुर्वे ह्या हाडवैऱ्यांचा एकोपा घडवून आणलास, तसेंच मदांध शत्रूच्या निःपातानें परम यश आमच्या पदरीं बांधून आमची प्रतिष्ठा राख व आपली राखून घे." तो लगेच नानाजी व माणकोजी यांच्याकडे वळून म्हणाला, "मुलांनो! माझ्याबरोबर देवाच्या पायांना हात लावून शपथ वहा कीं, विजयश्रीला वरून आम्ही पुन्हा तुझ्या पायापाशीं येऊं. तेव्हांच तुझ्यावरचा निर्माल्य निघेल; विजयश्री आम्हांला लाभली नाहीं तर आम्ही धारातीर्थीं मरून पडूं पण अपजयानें काळें झालेलें तोंड तुला दाखविणार नाहीं. आतां हीच तुझ्या देवपणाच्या परीक्षेची वेळ आहे."

भानाजीच्या आज्ञेप्रमाणें नानाजी व माणकोजी यांनीं देवापाशीं शपथ वाहिली; चांगुणेनेंही दोन्ही हात जोडून काय करावयाची ती प्रार्थना मनोमन केली. त्या भाविकांच्या भोळ्या भावाला आपली पूर्ण अनुमति आहे असें दर्शविण्यासाठींच कीं काय, देवानें आपली लीला त्याचक्षणीं दाखविली. चांगुणेनें 'यश कीं अपशय' ह्याविषयीं आपल्या भोळ्या मनाची समजूत करण्यासाठीं देवाचा उजवा कौल मागितला, व काय चमत्कार; देवानें उजवा कौल दिला. देवपंचायतनाच्या प्रभावळीवर पूर्वदिवशीं पूजेच्या वेळीं चांगुणेनें जीं फुलें गुंफलीं होतीं, त्यांतलीं उजव्या बाजूचीं चार फुलें नेमकीं खालीं पडलीं चांगुणेनें हर्षभरित अंतःकरणानें तीं फुलें प्रसाद म्हणून उचलून घेतलीं व त्यांतलें एक आपल्या केसांत खोंवून भानाजी, नानाजी व माणकोजी यांच्या पगडींतही एकेक फूल खोंवलें. देवाचा अंगारा प्रथम आपल्या, नंतर त्या तिघांच्या व नंतर चौघांच्याही घोड्यांच्या मस्तकाला लावला.

इतक्यांत पहिला कोंबडा आरवला. त्याबरोबर ती मंडळी आपापल्या घोड्यावर स्वार होऊन सागरगडावर जावयाला निघाली. मार्गानें जातांना त्यांना प्रथम एक गाय आपल्या वासराला पाजीत मार्गांत उभी असलेली आढळली. आणखी अमळ पुढें जातांच कांहीं सुवासिनी पाणवठ्यावरून घागरी भरून कमरेवर घेऊन घरीं जातांना त्यांना आढळल्या. असे एकसारखे शुभ शकुनच होत होते.

## प्रकरण चोविसावें

# राज्य कीं मरण?

सुकवारच्या तोंडून दर्यामहालांतील कारस्थानाची वार्ता ऐकून सिद्दी सात पहांटेच्या वेळीं अस्वस्थ चित्तानें दर्यामहालाकडे इंचबर्डसाहेबाची हालहवाल पहाण्यासाठीं निघून गेला, त्याचें पुढें काय झालें हें आपणाला आतां प्रथम पहावयाचें आहे. सिद्दी सात दर्यामहालापाशीं जातो तों सकृद्दर्शनीं महालाच्या दरवाजांतच त्याला काफूरचा मुड्दा पडलेला आढळला; त्याबरोबर येथें कांहीं तरी भयानक प्रकार आहे असें सिद्दी साताला वाटलें व त्याचें काळीज चर्रर्र झालें. इंचबर्डसाहेबाचीही अशीच गठडी वळली आहे कीं काय अशी अमंगळ शंका प्रथम त्याच्या मनांत आली, व त्या शंकेबरोबर भावी परिस्थितीचें ब्रह्मांड त्याच्या मनश्चक्षूसमोर उभें राहिलें. इंचबर्डसाहेब म्हणजे मुंबईकर इंग्रजांचा उजवा हात, त्याला दगाफटका झाला असला तर इंग्रज बिथरतील व आंग्रे आणि मराठे यांना आपल्याविरुद्ध सामील होऊन आपलीं पाळेंमुळें देखील खणून काढतील, हें सिद्दी सात ओळखून होता. त्याला सध्यांच्या प्रसंगीं तरी इंग्रजांशीं दावेदारी मांडावयाची नव्हती! तो मनांत अल्लानें स्मरण करून आपल्या दोन सेवकांसह वरच्या मजल्यावर ऐनेमहालाकडे गेला. तों महालाचा दरवाजा बाहेरून बंद! त्यानें सेवकांकडून दरवाजा उघडवून आंत प्रवेश केला, तों इंचबर्डसाहेब महालांतील एका कोचाशीं जखडून बांधला गेला आहे असा विचित्र देखावा त्याला मंद दीपप्रकाशांत पहावयाला सांपडला.

सिद्दी सात आश्चर्यातिरेकानें उद्गारला, "या अल्ला! कप्तानसाहेब! कोणा दगलबाजानें हें नामुष्कीचें काम केलें?"

पण इंचबर्डसाहेबाच्या तोंडून शब्द निघेना! त्याबरोबर सिद्दी साताला साहेब मेला असेल अशी शंका आली, व त्याच्या तोंडचें पाणी पळालें. त्यानें आपल्या सेवकाला पुढें करून साहेब मेला आहे कीं जिवंत आहे हें पहावयाला सांगितलें.

नोकर इंचबर्डसाहेबापाशीं जाऊन त्याचा चेहरा नीट न्याहाळून पहातो, तों त्याला कांहीं हालचाल दिसून आली. त्याबरोबर तो सिद्दी साताला म्हणाला, "मालिक! कप्तानसाहेब जिवंत आहेत."

" मग ते बोलत कां नाहींत ? " असें म्हणत सिद्दी सात पुढें जाऊन पहातो तों इंचबर्डसाहेबाच्या तोंडांत बोळा कोंबल्याचें त्याला दिसून आलें. लगेच सिद्दी सातानें साहेबाची मोकळीक केली व विचारलें, " कप्तानसाहेब ! तुमची अशी दशा कोणीं केली ? "

इंचबर्डसाहेबाला प्रथम सिद्दी साताचा प्रश्न केवळ मानभावीपणाचा वाटला. वास्तविक त्याची अशी दशा माणकोजीनें केली होती. त्या रात्रीं प्रथम ऐने-महालाचे दोन्ही दरवाजे बाहेरून बंद करून घेऊन प्रभावती व गजरा यांची दर्या-महालांतून मोकळीक केल्यावर इंचबर्डसाहेब आंतून मदतीसाठीं ओरडूं लागला, तेव्हां माणकोजीनें महालांत जाऊन त्याच्या तोंडांत बोळा कोंबून तोंड बंद केलें होतें, व त्याला त्या कोचाशीं जखडून बांधून ठेविलें होतें. माणकोजी तेव्हां इंचबर्डसाहेबाला ठार देखील करूं शकला असता; पण त्यानें मुद्दाम तसें केलें नाहीं. त्यानें त्यांतल्या त्यांत राजकारण लढविलें होतें. साहेबाचें सिद्दी साताशीं जें खलबत झालें तें माणकोजीनें ऐनेमहालालगतच्या रंगमहालांत लपून छपून बसून ऐकलें होतें; व त्यावरून इंग्रज आणि सिद्दी यांचें पुढेंमागें सूत जमण्याचा संभव आहे असा कयास त्यानें बांधला होता. तसें होऊं नये, सागरगडच्या वेढ्यांत सिद्दी सात मराठ्यां-च्या हातीं एकटाच कोंडला जावा, असें माणकोजीला व्हावयाला हवें होतें. ही गोष्ट साहेबाला ठार करण्यानें जेवढी साधली असती, त्यापेक्षां इंचबर्डसाहेबाला जिवंत ठेवून त्याचें मन सिद्दी साताविषयीं कलुषित करण्यांत जास्त साधेल, असा मुत्सद्देगिरीचा विचार करून माणकोजीनें इंचबर्डसाहेबाची गठडी वळली ती आपण सिद्दी साताचा अत्यंत आज्ञाधारक सेवक या नात्यानें वळली होती. माणकोजीचा हा डाव बराच यशस्वी झाला. इंचबर्डसाहेबाला ठाम वाटलें कीं, हें सारें सिद्दी साताचेंच कारस्थान असावें; व त्या कारस्थानाबद्दल पुरेपूर सूड घेण्याची आसुरी बुद्धि देखील इंचबर्डसाहेबाला सुचली. पण तो स्वतः संकटांत सांपडून दुबळा बनला होता, त्या संकटांतून त्याची मोकळीक होईतों त्या सूडबुद्धीला अर्थात् हवेंतील लहरीपेक्षां जास्त किंमत नव्हती. याच्या उलट सिद्दी सातानें जेव्हां इंचबर्डसाहेबाची ती दशा पाहिली, तेव्हां त्याला संशय नेमका प्रभावती व गजरा यांचाच आला; व त्या दोघी बायकांनीं आपणांसारख्या चतुर मर्दाच्या डोळ्यांतही खाशी धूळ फेकली याबद्दल तो मनांतल्या मनांत शरमला. त्यानें इंचबर्डसाहेबाची मुक्तता करून त्याला 'तुमची अशी दशा कोणीं केली, असा

प्रश्न विचारला, तो अगदीं सरळ भावनेनें विचारला, पण इंचबर्डसाहेबाला मात्र तो प्रश्न ऐकून 'हा गुलाम आपली मुद्दाम थट्टा करतो आहे, अस्वल मनुष्याला गुदगुल्या करून ठार मारतें' त्यांतला याचा हा कावा आहे असें वाटून त्याला मनांतून सिद्दी साताचा तीव्र संताप आला.

" पण ही वेळ संतापाची नव्हे. अगोदर दगडाखालीं सांपडलेला हात हलकेच सोडवून घ्यावा, मग पुढचें पुढें." असा स्वतःशीं दूरदर्शीपणाचा विचार करून इंचबर्डसाहेब मुद्दाम हंसें चेहऱ्यावर खुलविण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, " मेहेरबान ! पाहुण्यांना पाहुणचार देण्याची ही तुमची अजब रीत आहे."

इंचबर्डसाहेबाचे ते सौम्य व हंसरे शब्द सिद्दी साताला वज्रप्रहाराप्रमाणें असह्य झाले. इंचबर्डसाहेब रागानें बोलला असता, तरी देखील जितके त्याचे बोल सिद्दी साताच्या अंतःकरणाला झोंबले नसते, तितके ते सौम्यपणाचे बोल झोंबले. तो ओशाळेपणानें साहेबाला हात जोडून म्हणाला, " कप्तानसाहेब ! मी अल्लाची कसम खाऊन सांगतों, तुमची थट्टा करण्याचा माझा मुळींच मानस नव्हता. पण हरामखोर कटवाल्यांनीं दगा दिला आणि तेंही मला आतां नुक्तें थोड्या वेळापूर्वीं कळलें, त्याबरोबर मी इकडे आलों." तो साहेबाच्या पायांना हात लावून सपशेल माफी मागून म्हणाला, " कप्तानसाहेब ! मला सांगावयाला लाज वाटते कीं, कटवाल्यांनीं थेट माझ्या जनानखान्यापावेतों आपल्या कटाचें जाळें पसरलें आहे; त्याचा हा परिणाम ! "

असें कसें झालें याविषयीं त्या दोघांची बराच वेळ वाटाघाट झाली. त्या वाटाघाटीवरून खरोखरच सिद्दी साताचें ह्या गोष्टींत अंग नाहीं अशी इंचबर्डसाहेबाची खात्री झाली; व माणकोजी ह्या अनर्थाच्या मुळाशीं आहे, असेंही त्याला कळून चुकलें. उंदेरीच्या किल्ल्यावरील बंडाचा वृत्तान्त इंचबर्डसाहेबाला सिद्दी साताच्या तोंडून ऐकावयाला सांपडला, तेव्हां त्याला शत्रूच्या कारस्थानाची यथावत् कल्पना आली. मात्र ती कल्पनेची इमारत सकवारकडून सिद्दी साताला मिळालेल्या माहितीवर उभारलेली असल्यानें त्या कल्पनेंत कांहीं कांहीं गैरसमजांनाही चांगलाच थारा मिळाला, व त्या गैरसमजांचा पूर्वापार संबंध लागतां लागतां जो विस्तार झाला, त्यांतून निराळीच भासमान वस्तुस्थिति निर्माण झाली. माणकोजी उंदेरीच्या किल्ल्यांतून निसटला, तो तेथल्या महमदखान किल्लेदाराच्या गाफीलपणामुळें निसटला असा इंचबर्डसाहेबाचा ग्रह होणें अगदीं स्वाभाविक

होतें, व त्यानें सिद्दी साताच्या तोंडावर तसें कबूलही केलें. पण सिद्दी साताच्या तर्काची मजल याच्याही पुढें धावली. महंमदखान जंजिऱ्याच्या सिद्दी अबदुल रहमानाला सामील आहे हें त्याला माहीत होतें. अबदुल रहमानाला पेशव्यांनीं गादीवर बसविलें असल्यानें तो पेशव्यांच्या वतीनें वागणार हें उघड होतें; त्यामुळें त्याच्या सांगण्यानेंच महंमदखान पेशवे–आंग्रे यांना सामील झाला असला पाहिजे असा सिद्दी साताचा तर्कवाद इंचबर्डसाहेबाच्या मनाला अनायासें पटला. अर्थात् महंमदखानाचें पारिपत्य करून किंवा निदान त्याच्याऐवजीं दुसरा विश्वासांतील किल्लेदार उंदेरीवर नेमून किल्ला हातीं राखणें इचबर्डसाहेबाला अवश्य होतें; आणि तें कार्य पार पाडण्यासाठीं त्याला सिद्दी साताची मदत घेणें भाग होतें.

याप्रमाणें इंचबर्डसाहेबाला सिद्दी साताच्या मदतीची गरज नव्यानें भासूं लागली, व सिद्दी साताला तर इंग्रजांच्या मदतीची गरज पहिल्यापासून होतीच. त्यामुळें त्या दोघांचें त्याप्रसंगीं एकमत व्हावयाला मुळींच अडचण भासली नाहीं. त्या परस्पर हितसंबंधासाठीं दोघांनाही 'दे वाण, घे वाण' या न्यायानें वागणें अपरिहार्य होतें. सिद्दी सातानें त्याच्यासमोर उंदेरीवरील बंडाळीच्या स्वरूपाचें भयंकर शब्दचित्र रंगवून मराठे आंग्रे-पेशवे-सिद्दी यांच्या एकजुटीचा एवढा बाऊ केला होता कीं, त्यामुळें इंचबर्डसाहेबाचा धीर बराच खचला होता. त्यानें मुंबईहून सैन्य व आरमार आणवून उंदेरी ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला असता; पण त्याला अवकाश होता. त्यापूर्वींच शत्रूनें घाई करून उंदेरी काबीज करण्याचें मनावर घेतल्यास शेजारचा खांदेरीचा किल्लाही शत्रूच्या स्वाधीन असल्यानें तसें करणें शत्रूला मुळींच अवघड जाणार नाहीं हें ओळखून इंचबर्डसाहेबानें त्या प्रसंगापुरतें सिद्दी साताच्या तंत्रानें वागावयाचें ठरवून त्यालाच पुढें कसें करावयाचें याविषयींची सल्ला विचारली. तळें राखील तो पाणी चाखील हा जगाचा न्यायच आहे; त्या न्यायाला अनुसरून सिद्दी सातानें साहेबाला सल्ला दिली, "कप्तानसाहेब! या प्रसंगीं आपण पहिली एक गोष्ट केली पाहिजे; आपल्या विश्वासांतील किल्लेदार उंदेरीवर नेमून प्रथम तेथला बंदोबस्त केला पाहिजे." ही सूचना करण्यांत सिद्दी साताचा डाव उंदेरीवर आपल्या विश्वासांतील सिद्दी याकूबला किल्लेदार नेमण्याचा होता. पण इंचबर्डसाहेबाला आपल्या स्वार्थाचा संशयदेखील येऊं नये यासाठीं त्यानें प्रथमच सिद्दी याकूबचें नांव मुद्दाम सुचविलें नाहीं. त्याला इंचबर्डसाहेबाच्या तोंडून ते शब्द वदवावयाचे होते. साहेबानें आपल्या वतीचा किल्लेदार उंदेरीवर नेमावयाचें

मनांत आणलें तरी तें त्या घटकेला शक्य नाहीं हें सिद्दी सात ओळखून होता. तीच गोष्ट साहेबाच्या मनावर ठांसून बिंबविण्यासाठीं तो पुढें म्हणाला, " उंदेरीवर महंमदखानानें काय गोंधळ माजविला असेल व तेथें शत्रूच्या कटाचे सुरुंग किती खोलवर पेरले गेले असतील, याचा तर आपणाला कांहींच अंदाज नाहीं. तेव्हां हा मोठा पेंचच आहे."

सिद्दी सातानें खडा टाकला तो बरोबर लागू पडला. इंचबर्डसाहेब थोडा वेळ डोकें खाजवून विचार करून म्हणाला, " मेहेरबान ! तुम्ही म्हणतां तें खरें. पण असा विश्वासू किल्लेदार कोठला आणावा ? "

" असा विश्वासू व पराक्रमी माणूस मी आपणाला पाहिजे तर देईन व उंदेरी-वरील बंडखोरांचीं नाकें जागच्या जागीं ठेंचलीं जातील असें करीन. पण जसा तुमच्यावर हा प्रसंग आहे तसाच माझ्यावरही प्रसंग आहे हें तुम्ही जाणतांच. तेव्हां उंदेरीच्या रक्षणासाठीं मीं तुम्हांला मदत करावी, व सागरगड घेण्यासाठीं तुम्हीं मला मदत करावी, असा देवघेवीचा सौदा ठरल्यास त्यांत आपणां उभयतांचेंही कल्याण आहे."

इंचबर्डसाहेबाला सिद्दी साताची ही सूचना प्रथम धोक्याची वाटली. सिद्दी सात किती विश्वासघातकी माणूस आहे हें त्याला पक्कें माहीत होतें. आज त्याच्या वतीचा किल्लेदार उंदेरीवर नेमल्यानें तो उद्यां त्यालाच सामील होईल व किल्ला अचानक आपल्या हातचा जाईल हा दुष्परिणाम प्रथमच त्याच्या ध्यानीं आला. 'पण असें झालें तरी उद्यां होईल. आज सिद्दी सात संकटांत सांपडलेला आहे, त्यांतून मोकळीक होईपावेतों त्याला अशी दगलबाजी करावयाला अवसर मिळणार नाहीं. तोंवर आपण मुंबईहून सैन्य-सामग्री आणवून व इतर जरूर ती उपाय-योजना करून किल्ल्याची मजबुती करूं शकूं. तोंवर त्याच्या तंत्रानें वागणें प्राप्त आहे'. असा विचार करून तो सिद्दी साताला म्हणाला, " मेहेरबान ! ही तुमची योजना मला मान्य आहे. पण सिद्दी याकूब तरी तुमच्या पूर्ण विश्वासांतील आहे ना ? "

" मेहेरबान ! हें काय विचारावयाला हवें ! सिद्दी याकूब हा माझा उजवा हात आहे. तो जितका शूर तितकाच इमानी आहे. हेंच पहाना, अबदुल रहिमानचें माझ्याशीं वैमनस्य आल्यावर त्याला आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठीं अबदुल रहिमानानें व मराठ्यांनींही शिकस्त केली. पण तो त्यांना वळला नाहीं. तो जर

त्या पक्षाला वळता तर यापूर्वीच एखाद्या मोठ्या सुभ्याचा सुभेदार बनला असता. अंजनवेलच्या वेढ्यांत तो आंग्र्यांना सामील झाला असता तर आजला आंग्र्यांनीं त्यालाच अंजनवेलचा किल्लेदार नेमलें असतें. पण तो तसा माणूस नाहीं; म्हणून तो माझ्याबरोबर अज्ञातवासांत दिवस कंठीत आहे. असला विश्वासू माणूस तुमच्या स्वाधीन करण्यांत मला माझा उजवा हात तोडून दिल्याप्रमाणें दुःख होत आहे; पण आपणां उभयतांवरील प्रसंग ओळखून मी त्याला तुमच्या स्वाधीन करावयाला तयार आहें."

सिद्दी साताच्या उद्गारांतील मानभावीपणा न ओळखण्याइतका इंचबर्डसाहेब भोळा नव्हता. उलट कावेबाज सिद्दी सातच त्याच्यासमोर भोळा ठरला असता इतका तो बिलंदर होता. सिद्दी सात आपल्या मतें सिद्दी याकूबविषयीं इंचबर्ड-साहेबाचा अनुकूल ग्रह व्हावा म्हणून त्याची साहेबाच्या तोंडावर भरमसाट स्तुति करून मोकळा झाला. तीं चोराचीं पावलें चोरानें ओळखलीं. इतका सिद्दी साताच्या विश्वासांतील मनुष्य उंदेरीवर किल्लेदार नेमणें म्हणजे सिद्दी साताला किल्ल्यावर हातपाय पसरण्याला अवसर देणें होय, अशी खूणगांठ इंचबर्डसाहेबानें त्याच क्षणाला आपल्या मनांत बांधली, व शक्य तितक्या लौकर सिद्दी याकूबला उंदेरीवरून कमी करावयाचा असा मनोमय निर्धार करून बाह्यात्कारीं अगदीं भोळे-पणा दाखवून त्या योजनेला त्यानें मान्यता दिली. नंतर पहिलें काम त्यांना उंदेरी-च्या बंदोबस्ताचें करावयाचें होतें. सिद्दी सातानें सिद्दी याकूबला बोलावून घेऊन इंचबर्डसाहेबाकडून त्याला उंदेरीची किल्लेदारी देवविली व इंचबर्डसाहेबाबरोबर उंदेरी-वर जाऊन तेथला बंदोबस्त करावयाला सांगितलें. आपल्या पाठीमागें कदाचित् साहेबाचा बेत फिरेल व तो आपणाला कुमक पाठविणार नाहीं, ह्या भयानें स्वतः सिद्दी सातही त्यांच्याबरोबर उंदेरीवर जावयाला तयार झाला. उंदेरीचा बंदोबस्त होतांच सिद्दी याकूबनें किल्ल्यावरची कुमक घेऊन सिद्दी सातबरोबर त्याच्या मदतीला सागरगडाकडे जावयाचें असें ठरलें. सिद्दी साताच्या सांगण्यावरून त्या दिवशीं दोन प्रहरपर्यंत पांचशें कडवे लढवय्ये मुसलमान शिपाई सिद्दी याकूबनें निवडून काढून हुकूम होईल त्याप्रमाणें हुकुमाची तामिली करण्याची जय्यत तयारी केली होतीच; तेंच सैन्य घेऊन ते तिघेजण उंदेरीवर चालून गेले. सिद्दी सातानें इंचबर्डसाहेबाची पाठवणी फारच थाटामाटानें करून त्याला प्रसन्न केलें, त्याला बहाल केलेल्या अमोल देणग्या त्याला देऊन शिवाय आणखीही रत्नखचित मुठींच्या

तरवारी, एक सुंदर उमदा जातिवंत अरबी घोडा वगैरे देणग्या त्याला दिल्या. त्या देणग्यांच्या वर्षावानें साहेब त्याला वळला असें नाहीं; फक्त आपली जी फटफजिती झाली ती सिद्दी साताच्या मार्फत झाली नाहीं, माणकोजीनें ती निव्वळ दगलबाजी केली अशी इंचबर्डसाहेबाची खात्री होऊन तेवढ्यापुरतें त्याचें मन सिद्दी साताविषयीं निर्मळ झालें.

उंदेरीवरील बेबंदशाहीची हाकाटी तर सिद्दी सातानें मारे जोरानें केली. ते प्रत्यक्ष जाऊन पहातात तों त्यांना किल्ल्यावर थोडीशी अस्वस्थता दिसली. पण सिद्दी सातानें वर्णन केला त्यांतला कांहींच प्रकार इंचबर्डसाहेबाला तेथें आढळून आला नाहीं. महंमदखान त्याच दिवशीं किल्ल्यावर आला होता, व त्यानें सर्व बंदोबस्त करून आबादीआबाद केली होती. पण सिद्दी सातानें महंमदखानाला फितूर ठरविलें होतें, त्या आरोपाची नाशाबिती करण्याइतका अवसर महंमदखानाला मिळण्यापूर्वींच त्याला सिद्दी याकूबच्या साह्यानें इंचबर्डसाहेबानें पकडून ठार केलें, व तेथली किल्लेदारी आकस्मिकपणें सिद्दी याकूबच्या पदरीं पडली. सिद्दी साताच्या ह्या उपकारांची फेड कबूल केल्याप्रमाणें करण्याला इंचबर्डसाहेब वचनबद्ध झाला होता. तें वचन पाळण्यासाठीं नव्हे, पण सिद्दी साताला खूष राखण्यासाठीं त्याला कांहीं लांब पल्ल्याच्या तोफा, बराचसा दारूगोळा वगैरे सामान सिद्दी साताला द्यावें लागलें. तेवढी कुमक घेऊन सिद्दी सात सागरगडाकडे चालता झाला. सिद्दी याकूबनें आणखी कांहीं दिवसांनीं उंदेरीचा पक्का बंदोबस्त करून मग सिद्दी साताच्या मदतीला जावें असें ठरलें, व तें सिद्दी साताला मान्यही झालें. त्यानें सिद्दी याकूबसाठीं जी कामगिरी नियोजिली होती ती आणीबाणीच्या वेळीं पार पाडावयाची होती, व ती सिद्दी सातानें इंचबर्ड साहेबाच्या नकळत सिद्दी याकूबला नीट पटवूनही ठेवली होती. याप्रमाणें सिद्दी साताचा एक बेत तर सोळा आणे साधला, सिद्दी याकूबलाही आपणाला अचानक उंदेरीची किल्लेदारी मिळाल्यामुळें परमानंद वाटला. हे सिद्दी साताचे आपल्या डोक्यावर डोंगराएवढे उपकार आहेत याची सिद्दी याकूबला जाणीव होती, व त्या उपकारांची अंशतः फेड करण्यासाठीं आपण सिद्दी साताच्या वतीनें अखेरपावेतों झगडावयाचें त्यानें कबूलही केलें होतें.

सिद्दी सात उंदेरीहून निघून गेल्यावर इंचबर्डसाहेबानें सिद्दी याकूबला सिद्दी सातापासून फोडण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला. अर्थात् तो प्रयत्न करतांना

इंचबर्डसाहेबानें फारच सावधगिरी बाळगिली होती. त्यानें सिद्दी याकूबला उघड-पणें सिद्दी सातविरुद्ध वागण्याला न सांगतां 'उंदेरीचा बंदोबस्त करण्यासाठीं तुला येथें रहाणें अवश्य आहे; तूं येथें राहिलास तर खांदेरीचा किल्ला आपल्या अगदीं शेजारी असून तो मराठ्यांच्या हातीं आहे, तो आपण मराठे सागरगडच्या मोहिमे-च्या ऐनरंगांत गुंतून पडले आहेत अशी संधि सांपडतांच अचानक जिंकून घेऊं व तोही मग तुझ्या अंमलाखालीं येईल अशी तजवीज मी करीन' असें आमिष दाखवून सिद्दी याकूबला थोपवून धरण्याचा प्रयत्न केला. पण सिद्दी याकूब कसा झाला तरी सिद्दी साताचा इमानी नोकर पडला; शिवाय इंचबर्डसाहेब काय किंवा कंपनीसरकारचा दुसरा कोणीही इंग्रज अधिकारी काय, प्रसंग पडला कीं अघळ-पघळ वचनें देऊन साळसूदपणा पत्करण्यांत आणि काम होतांच तोंडच्या वाफे-बरोबर तें वचन दवडून देऊन आपला कावा सोळा आणे साधण्यांत कसे वाकब-गार आहेत हें त्याला पूर्वानुभवावरून पूर्णपणें अवगत होतें. आणखी असें कीं, तीच गोष्ट सिद्दी सातानें उंदेरीवरून सागरगडाकडे जातांना सिद्दी याकूबला बाजूला घेऊन त्याच्या मनावर चांगली ठसविली होती. उंदेरीची किल्लेदारी आप-ल्या पदरीं पडली तरी ती अळवावरच्या पाण्याप्रमाणें अशाश्वत आहे; ती आपल्या-कडे टिकावयाची तर इंग्रजांपाशीं सिद्दी साताचें महत्त्व कायम टिकलें पाहिजे, तें महत्त्व टिकण्यासाठीं सागरगडच्या वेढ्यांत सिद्दी साताला विजय मिळून नवें राज्य स्थापन करण्याला संधि मिळाली पाहिजे, व ती संधि मिळण्यासाठीं आपण सिद्दी साताला अशा आणीबाणीच्या वेळीं मदत केलीच पाहिजे, हें पक्कें ओळखून सिद्दी याकूब वागत होता. ह्या प्रसंगीं इंचबर्डसाहेबानें दाखविलेल्या आमिषांना भुलून सिद्दी साताच्या मदतीला न जावें तर न जाणो, उद्यां इंचबर्डसाहेबाने सिद्दी साताचा वरचष्मा असूं नये म्हणून कांहीं दिवसांनीं उंदेरीची किल्लेदारी यदाकदाचित् दुसऱ्या कोणाला सांगून आपणाला अर्धचंद्र दिला,तर इकडे हाही रोजगार बुडावयाचा, व तिकडे सिद्दी सातही पायांतल्या वहाणेपाशींदेखील उभा करावयाचा नाहीं; इतका पोक्त विचार करून सिद्दी याकूबनें आपला शब्द खरा करण्याचें ठरविलें व इंचबर्डसाहेबालाही त्याला उघड उगड नको म्हणतां येईना. सिद्दी याकूबला तरी आपला काळ सागरगडाशेजारीं दबा धरून बसला आहे व भवितव्यता आपणाला त्या काळाच्या जबड्यांत लोटण्यासाठीं ओढून नेत आहे हें काय माहीत!

सिद्दी सात उंदेरीवरील घडामोडी निभावून सागरगडावरील मोहिमेवर निघण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं सूर्यास्ताच्या सुमाराला चौबुरुजीवर आला. तेथें आणखी नव्या भानगडी उपस्थित झाल्या असल्यास त्यांची तड लावून मग पुढें जावयाला निघावयाचें असा त्याचा विचार होता. त्याची नौका थळच्या किनाऱ्याला लागते न लागते तोंच सकृद्दर्शनीं त्याला अपशकुन झाला. त्याच्या डोळ्यांदेखत चौबुरुजीवरील सिद्दीच्या सत्तेचें द्योतक हिरवें निशाण मोडून खालीं पडलें. सिद्दी साताचा शकुन-अपशकुनांवर अत्यंत भरंवसा असल्यानें तो अपशकुन पाहून त्याचें काळीज चर्र झालें. तो तशाच खिन्न मनानें जयमहालांत जाऊन पोंचतो तोंच सरदार शेख याकूब कांहीं महत्त्वाच्या बाबतींत वाटाघाट करण्यासाठीं तेथें येऊन पोंचला आहे अशी खबर त्याला मिळाली. शेखजी हा पूर्वीपासून मराठ्यांना फितूर झालेला होता व आज दोन तीन वर्षांत त्याची सिद्दी साताशीं गांठभेटही खुंटली होती. तो आज अकस्मात् भेटीला आल्याचें ऐकून सिद्दी साताला मोठा अचंबा वाटला, व त्यानें ताबडतोब शेखजीला भेटीला बोलावलें.

सुंभ जळलें तरी त्याचा पीळ कायमच असतो, त्याप्रमाणेंच सिद्दी साताचा पडता काळ आला असला तरी त्याचा अहंकार अजून लेशमात्रही लोपला नव्हता. शेखजी बैठकखान्यांत येतांच त्याला पूर्वीचें वैर आठवलें व आपला वैरी आपणासमोर आला असें वाटलें. एरव्हींच्या वेळीं जर शेखजी सिद्दी सातासमोर येता, तर सिद्दी सात त्याच्याशीं तोंडानें न बोलतां तरवारीनें बोलला असता, आजदेखील त्यानें जरी शेखजीला प्रत्यक्ष शासन केलें नाहीं, तरी हेतुपुरःसर त्याचा अपमान करण्यालाही त्यानें कमी केलें नाहीं. शेखजी आंत येतांच त्याला त्याच्या दर्जाला साजेशा मानानें वागविणें बाजूला राहून सिद्दी सातानें त्याला उभ्या उभ्या विचारलें, “शेखजी ! आज तुमची दृष्टि इकडे बरी वळली ! ”

सिद्दी सात हा जसा सिद्दीचा सरदार तसाच शेखजी हाही सरदारच. दोघांनाही सिद्दीच्या दरबारीं मानमान्यता होती व सिद्दीच्या राज्यांत त्यांची प्रतिष्ठाही थोर होती. असें असतां सिद्दी सात आपणाला थोरपणानें वागविण्याला तयार नाहीं, तो आपणाला 'बसा' असें देखील म्हणत नाहीं, हें पाहून शेखजीला राग आला. तो देखील जशास तसें या न्यायानें सिद्दी साताला सलाम सुद्धां न करतां म्हणाला, “सरदारसाहेब ! मी आज कोणी एखादा भिकारीसा तुमच्या दारीं आलेला नाहीं; मराठ्यांचा वकील व इलादी मेहेरबान सिद्दी अबदुल रहिमान

तुमचे–आमचे धनी यांचा प्रतिनिधि या नात्यानें तुमच्या हिताच्या चार गोष्टी तुमच्यापाशीं बोलण्यासाठीं आलों आहें. ह्या दोन नात्यांशिवाय मी तुमचा जुना स्नेही व नातेवाईकही आहें. माझ्याशीं तुम्ही अशाच बेमुर्वतखोरपणानें वागणार असाल तर मी आल्या पावलीं परत जावयाला तयार आहें. पण त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं."

शेखजीच्या खरमरीत बोलांनीं सिद्दी साताच्या डोक्यांत बराच प्रकाश पडला. वारा वाहील तशी पाठ फिरवण्याच्या कामीं त्याचा हातखंडा होता. त्यानें झाल्या गोष्टीबद्दल शेखजीपाशीं दिलगिरी प्रदर्शित करून त्याला आपल्याजवळ बसवून घेतलें व साळसूदपणाचें बेमालूम ढोंग करून विचारलें, "बोला सरदारसाहेब! आपला काय हुकूम आहे?"

शेखजी आपल्या अपमानाची भरपाई झाली ती गोड करून घेऊन म्हणाला, "सरदारसाहेब! सध्यां तुम्ही कोणत्या संकटांत सांपडलां आहां, याची खुद्द तुम्हांलाही नीटशी दाद नसेल; पण थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सागरगडच्या वेढ्याची वेळ जी तुम्ही जमवून आणीत आहां, ती तुमची घातवेळ आहे—"

"असें पहा, तुम्ही माझे गुरु ह्या नात्यानें बोलण्याचें सोडून मुद्दयावर येऊन काय तें बोला."

"मी तुमचा गुरु या नात्यानें बोलत नसून स्नेही व आप्त या नात्यानें बोलतों आहें."

"मला माझ्या स्नेह्यासोबत्यांची व आप्तांची किंमत यापूर्वीच कळून चुकली आहे. तुम्ही आमचा पक्ष सोडून मागें मराठ्यांना सामील झालां, तेव्हांच तुम्हांला स्नेहाची व आप्तपणाची चाड किती आहे हें मीं ओळखलें. तेव्हां ती तोंडदेखली भाषा वापरण्यांत अर्थ नाहीं."

"सरदारसाहेब! ही तोंडदेखली भाषा नव्हे; माझें नीट ऐकून घ्या. आज सर्व मराठ्यांनीं एकजुटीनें तुमचा निःपात करण्याचा निर्धार केला आहे. मानाजी आंग्रे व पेशवे हे आज ह्या एका कार्यासाठीं एक झाले आहेत. चिमाजीअप्पा पेशवे मुद्दाम एवढ्याचसाठीं कोंकणांत उतरून कुलाब्याला आले आहेत."

"चिमाजी अप्पा कुलाब्याला आले देखील?"

"होय. कालच ते कुलाब्याला येऊन पोंचले; त्यांचें मानाजी आंग्र्यांशीं काय खलवत व्हावयाचें तें झालें; व त्यांच्या फौजांनीं सागरगडाच्या आसमंतातील

-सान्या नाक्याच्या जागा व्यापून नाकेबंदी चालविली आहे. मराठ्यांचा जमाव मोठा आहे. शिवाय आपलें सरकार पूर्वींच मराठ्यांशीं सलोखा राखण्याला तहानें बांधले गेल्यामुळें या प्रसंगीं पेशव्यांनीं मदतीची मागणी केल्यास सरकारांना ती नाकारतां येण्याजोगी नाहीं."

" पण तुमच्यासारखे इतर मुसलमान सरदार जे आहेत, ते कांहीं मराठ्यांशीं सलोखा राखण्याला बांधले गेलेले नाहींत."

" नाहींत कसे ! सरदारसाहेब ! आम्ही सरकारांच्या बाहेरचे आहों कीं काय ? वास्तविक तुम्हींदेखील आपली पायरी सोडून वागावयाचें नव्हतें."

" मीं पायरी सोडली ! मीं कशी पायरी सोडली ? "

" मराठे व सिद्दी यांचा सलोखा झाल्यावर तुम्हीं पुन्हा मराठ्यांशीं बखेडा कां बरें मांडला ? तुम्हीं शांत चित्तानें विचार केला, तर सिद्दींचा अंमल मराठ्यांच्या डोळ्यांत सलण्याला सुरुवात तुम्ही परशराम येथें केलेल्या अत्याचारांपासून झाली. स्वामीला तुम्हीं दुखविलें म्हणजे जाणून बुजून सर्पाच्या शेंपटीवर पाय ठेवला. त्यापूर्वीं मराठे व सिद्दी यांच्यांतील तेढ एवढी विकोपाला गेली नव्हती. मरहूम मेहेरबान सिद्दी रसूलखान यांचा मराठ्यांशीं स्नेहसंबंध होता, स्वामीही त्यांना चहात असत; त्या परस्परांच्या प्रेमसंबधांत बिब्बा तुम्हीं घातला व तो निस्तरतां निस्तरतां आम्हांला पुरेवाट झाली. बरें; झालें तें झालें असें समजून पुढें तरी तुम्हीं परिस्थिति ओळखून वागावयाला हवें होतें.—"

" मी परिस्थिति ओळखूनच वागत होतों. सर्व सिद्दींनीं एक विचारानें मराठ्यांची सत्ता कोंकणपट्टींतून जमिनदोस्त करण्याचा निर्धार करून एक जुटीनें वागावयाचें ठरविलें असतें, तर ह्या उभ्या कोंकणपट्टींत हिंदूंची सत्ताच काय पण औषधापुरता एक हिंदूदेखील मीं राहूं दिला नसता. पण आमचेच लोक आमच्याशीं बेइमान झाले; ते फितूर झाले म्हणून आमची ही दशा झाली. काफरांची अवलाद नांवाला बाटून मुसलमान झाली व त्या बाटग्यांवर भरंवसा ठेवून आम्ही वागूं लागलों, म्हणून आमच्या वांटणीला ही दशा आली.—"

" हां ! सरदारसाहेब ! तोंड आटोपा." एखाद्या नागाला डिवचतांच तो जसा फूत्कारत उलटतो, तसा शेखजी उसळून म्हणाला, " तुम्ही माझ्या अवलादीवर याल, तर मलाही तुमची अवलाद काढतां येईल. अरे म्हटलें कीं कां रे असें विचारणें ओघानेंच प्राप्त होतें. काफर कोणाला म्हणतां ! "

" जे कोणी काफर असतील त्यांना !"

ते दोघे एकदम वर्दळीवर आलेले पाहून सिद्दी साताची बेगम-शेखजीची धाकटी बहीण दिलबहार एकाएकीं दचकून पुढें आली व दोघांचेंही शांतवन करूं लागली. सिद्दी सात उंदेरीहून तेथें येऊन पोंचण्यापूर्वींच शेखजी तेथें आला होता व त्यानें सर्व गोष्टींची दिलबहारशीं वाटाघाट केली होती; ती ध्यानीं घेऊन तिनें आपल्या पतीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, " दादा म्हणतो तें आपण नीटपणें ऐकून घ्या. आज आपला पडता काळ आहे, अशा वेळीं आपण थोडी पड खाऊनच वागलें पाहिजे."

" काय ? मी पड खाऊं ? मी पड कोणापाशीं व कां म्हणून खाऊं ? काफराशीं मी पड खाऊं ? काफरांना मी शरण जाऊं ? " सिद्दी सातानें जळफळत विचारलें.

" आपण कोणा परक्यांना शरण जाऊं नका; पण धन्यांना शरण जाण्यांत आपणाला कसला कमीपणा वाटतो ? आपण जर आज आपल्या धन्याशीं सलोख्यानें वागावयाचें कबूल करून बलिष्ठ मराठयांशीं दावेदारी करण्याचें सोडलें, तर आज सिद्दींच्या दौलतीची आबादी आबाद होईल, सागरगड जिंकण्याचा हेका आपण सोडला कीं मराठे आपोआप माघारे जातील, व धन्यांची सेवा करून आपणाला सुखानें आयुष्य काढतां येईल." दिलबहार म्हणाली.

" धन्याची सेवा ! काफरांनीं जें बाहुलें जंजिऱ्याच्या गादीवर बसविलें, त्या बाहुल्याला धनी मानून मी त्यांची सेवा करूं काय ? मराठे आणि मुसलमान यांचें कैक पिढ्यांचें हाडवैर मी अशा नामुष्कीनें विसरूं ? बादशाही सत्तेशीं बेइमान होऊन मराठयांना शरण जाणाऱ्या व मराठयांच्या मेहेरबानगीवर जगणाऱ्या अबदुल रहिमानचा धनीपणा मी मान्य करूं ? मी ह्या दौलतीचा धनी ! सिद्दी रसूलच्या पश्चात् मीं माझ्या मर्दुमकीच्या जोरावर दौलत राखण्यासाठीं माझ्या रक्ताची पांवळी केली, ती त्या दगलबाज नामर्दाच्या ताटाखालचें मांजर होऊन बसण्यासाठीं काय ? आणि दिलबहार ! तूं असली बद्सल्ला मला देतेस ? म्हणूनच मी म्हणतों कीं काफरांची अवलाद—"

" हां ! सरदारसाहेब ! पुन्हा तुम्हीं जीभ सैल सोडली ! पुन्हा तुम्ही माझा अपमान करीत आहां ! असे अपशब्द पुन्हा जर तुमच्या तोंडून निघाले तर याद राखा !" शेखजी पुन्हा पूर्वीपेक्षांही जास्त संतापून म्हणाला.

दिलव्हारलादेखील सिद्दी साताच्या त्या शिवीवजा शब्दांचा राग आला. ती जन्मतः हिंदु शेखजीची बहीण असल्यानें ती बाटून मुसलमान झाली असली तरी तिच्या मूळच्या हिंदुधर्मावर तिचा अजून अढळ विश्वास असल्यानें तिला ते दुःशब्द सहन होईनात. तिची स्थिति मूळपासून फार केंविलवाणी होती. ती बाटून सिद्दी साताची बेगम व्हावयाला तर प्रथम तयार नव्हतीच पण शेखजी स्वार्थाला बळी पडून बाटला, व त्यानें वैभवाच्या आशेनें तिला बळेंच सिद्दी साताच्या जनानखान्यांत कोंबलें, त्यामुळें तिचा नाइलाज झाला होता. तरीही तिच्या अंतःकरणांतील हिंदुधर्माविषयींचा आपलेपणा कायम होता. सिद्दी साताच्या अत्याचारांना आळा घालण्याचा ती वारंवार प्रयत्न करी; पण तिच्या शब्दाला सिद्दी सातापाशीं मुळींच किंमत नव्हती. एक सुंदर विलासदासी यापेक्षां जास्त मान सिद्दी सात तिला कधींही देत नव्हता. सिद्दी साताची इतकी वाताहात झाली ती त्यानें गोब्राह्मणांचा विध्वंस करून हिंदुजनांची अमानुष विटंबना केल्यामुळेंच, अशी तिची प्रामाणिक समजूत होती. पण ती दुबळ्या मनाची स्त्री होती. अप्रिय गोष्टी डोळ्यांसमोर घडूं लागल्या तर तिला अत्यंत खेद होई; पण त्या गोष्टी टाळण्याइतकें तिचें मन कणखर नसल्यानें ती त्या गोष्टी पाहून अथवा ऐकून नुसती रडत बसे. इतक्या लवचिक मनाची स्त्री ती होती, म्हणूनच तिच्या इच्छेविरुद्ध सिद्दी साताची बेगम होणें तिच्या कपाळीं आल्यावर 'पदरीं पडलें आणि पवित्र झालें' असा मनाचा विरंगुळा करून ती सिद्दी साताच्या जनानखान्यांत दिवस कंठीत होती. सहवासानें मनुष्याच्या मनांत निसर्गतःच प्रेम उत्पन्न होतें, त्याप्रमाणें तीही सिद्दी साताची बेगम झाल्यावर त्याच्यावर प्रेम करीत होती; व आज ती सिद्दी साताला समजुतीच्या गोष्टी सांगून आवरण्याचा प्रयत्न करीत होती, तीही मुख्यतः त्याच्या कल्याणासाठींच. जसा सिद्दी सात तिचा पति होता, तसाच शेखजी तिचा भाऊ होता. त्याचा सिद्दी सात पावलोपावलीं पाणउतारा करूं लागला व तिची देखील 'काफरांची अवलाद' म्हणून निर्भर्त्सना करण्याला त्यानें कमी केलें नाहीं, तेव्हां तिला देखील थोडी चीड आली. ती म्हणाली, "मालिक ! मीं आपल्या हिताची गोष्ट सांगितली असतांना माझी देखील आपण अशी विटंबना करण्याला तयार झालां ?"

पण सिद्दी सात यावेळीं कोणतीच समजुतीची गोष्ट ऐकण्याला तयार नव्हता. तो पुन्हा म्हणाला, "काफरांची अवलाद ! ती आपल्या मूळच्या जातीवरच जावयाची."

"इतका बांक अजून तुमच्या अंगीं आहे?" शेखजी ताड्कन् उठून आपली तरवार म्यानांतून सर्कन् बाहेर काढीत म्हणाला, "तर मग मीही सांगतों कीं, ही काफरांची अवलाद अशी आहे.—"

बोलतां बोलतां शेखजीनें आपल्या हातांतील तरवारीचा जोराचा वार केला. पण सिद्दी साताच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळा अजून आली नसल्यानें दिल्बहार शेखजीचा हात आवरण्यासाठीं म्हणून पुढें झाली, तिला तो वार लागून तिचें शीर त्याच क्षणीं धडावेगळें होऊन खालीं पडलें. इतक्यांत सिद्दी साताचे नोकर ती गडबड ऐकून धांवत तेथें आले. त्यांनीं शेखजीला आवरून धरलें. सिद्दी सात मूळचाच क्रूर, तशांत त्या वेळीं संतापलेला व तशांत शेखजीनें तरवार उगारून त्याचा अपमान केला; मग काय विचारतां! त्यानें सपाट्यासरसा एक-वार करून एका शेखजीचे दोन शेखजी करून टाकले.

ॐ ॐ ॐ

एकट्या शेखजीचाच बळी घेऊन सिद्दी साताचा क्रोधाग्नि शांत झाला असें नाहीं; त्यानें त्या रात्रौ चौबुरुजीवरील सर्व हिंदूंची एकजात कत्तल करविली, व आपल्या पदरच्या मुसलमानांना हिंदूंचीं घरेंदारें, देवालयें जाळून लूट करण्याला मुभा दिली. त्या एका रात्रींत चौबुरुजी व बजरंगगड येथें जो कहर गुदरला, त्याची केवळ कल्पनाच करणें बरें. इतक्या जनांचे आक्रोश व देवांचे शाप स्वतःला नकळत पदरीं बांधून तो दुसऱ्या दिवशीं सकाळींच सागरगडावरील मोहिमेवर निघून गेला. आतांपर्यंतच्या एकंदर प्रकारांवरून आपण त्या मोहिमेंत विजयी होऊं अशी आशा त्याला फारशी नव्हतीच. पण त्या आशेची उणीव दुर्दम ईर्षेनें भरून काढली होती. 'मी सागरच्या वेढ्यांत विजयी झालों तर स्वतंत्र राज्याचा धनी होईन; नाहींपेक्षां त्या वेढ्यांत मरेन. ज्या मराठ्यांशीं मी आजवर इतक्या बांकानें वागलों, ज्या धन्याला मी आजवर पायांतल्या पायपोसाप्रमाणें लेखीत आलों, त्या मराठ्यांसमोर मान वांकविणें व त्या धन्याला शरण जाणें हें माझें ब्रीद नाहीं. बस्स! 'राज्य किंवा मरण' हे त्यांचे सागरगडावरील मोहिमेवर निघतांचे अखेरचे मानसोद्गार होते. ते ऐकून भवितव्यता उपहासानें खदखदां हंसत होती! भवितव्यतेनें सिद्दी साताच्या नशिबीं काय बरें लिहिलें होतें? राज्य कीं मरण?

## प्रकरण पंचविसावें

# दरम्यानच्या घडामोडी

सिद्दी साताला वेळोवेळीं जे अपशकून घडले ते खरोखरच भावी परिस्थितीचें द्योतक होते; व त्याला जी एकेक बुद्धि सुचत होती, तीही त्याच्या कर्मासारखी त्याला नाशकारक होईल अशीच सुचत होती. तो 'राज्य किंवा मरण' अशा निर्धारानें थळच्या चौबुरुजीवरून सागरगडच्या मोहिमेवर निघाला; तों वाटेंतच त्याला कालें खिंडींत शत्रूशीं तोंड द्यावें लागून त्या सामन्यांत स्वतःचा फजीतवाडा पत्करून तेथून रेवसकडे पळ काढावा लागला. त्याला कालें खिंडींत शत्रूशीं तोंड द्यावें लागलें, तें कारण मुळांत दिसावयाला किती क्षुल्लक होतें! एक हिंदु बैरागीण आदल्या दिवशींच त्या खिंडींतील गजाननाच्या पडक्या देवालयांत आली होती. त्याच वेळीं रामधरणावरून सिद्दी साताच्या सैन्याची एक तुकडी सागरगडाला वेढा घालण्यासाठीं म्हणून खिंडींतून गडाकडे चालली होती. हिंदू लोकांच्या घरादारांची जाळपोळ व लुटालूट, हिंदूंना सक्तीनें बाटविणें किंवा ठार करणें, हिंदू बायकांवर अत्याचार करणें व हिंदु देव-देवालयांचा विध्वंस करणें, येथपासून सिद्दी साताच्या कोणत्याही मोहिमेचा उपोद्घात सुरू व्हावयाचा; ह्या सर्वसामान्य गोष्टीला ती मुसलमानांची तुकडी अपवाद नव्हती. त्या तुकडींतील सैनिक मार्गांत सर्वत्र हाहाःकार उडवीत खिंडीपार होऊं लागले, तेव्हां त्यांना तें गजाननाचें देवालय आढळलें व तें जमीनदोस्त करण्यासाठीं त्यांनीं तिकडे मोर्चा वळविला. तों देवालयांत त्यांना ती बैरागीण भेटली. त्या काळीं ब्रह्मेंद्र स्वामी बैराग्यानें त्या सर्व प्रांतांत असा विलक्षण दरारा बसविला होता कीं, बैरागी म्हणतांच हिंदूंना परमेश्वर सगुण रूपानें आपल्या पाठीशीं उभा आहे असें वाटून स्फुरण चढे, व मुसलमानांना मात्र बैरागी हा कर्दनकाळसा वाटे. बैराग्यानें बरेचसे अनुयायी जे आपल्यासभोंवार जमा केले होते, त्यांतल्या खास विश्वासांतील व कर्तबगार रणमर्दांना त्यानें बैराग्यांचेच वेश दिले होते. असा एकेक बैरागी एकेका खेड्यांत जाऊन आपल्या गुरूच्या नांवावर त्या खेड्यांत अमूप मनुष्यबळ व द्रव्यबळही मिळवी. हा बैराग्याचा व्याप त्या पहिल्या दोन तीन दिवसांत सागरगडच्या टापूंत एवढा प्रचंड वाढला होता कीं, त्यामुळें

नुसता एक बैरागी गांवीं आला तरी तो परम सामर्थ्यवान् बजरंग बैराग्याच्या शिष्य असल्यानें त्याच्या हांकेला धावून जाण्यानें आपण कळिकाळाचीही झडप निवारूं शकूं, अशा विश्वासानें गांवोगांवचे हिंदु एकजुटीनें व श्रद्धेनें त्याच्या हांकेला धावून जात; आणि ते त्या बैराग्याच्या अर्ध्या वचनांत वागण्याला तयार असत. याच्या उलट शेंपन्नास मुसलमानांच्या एखाद्या तुकडीला असा एखादा बैरागी भेटला तरी त्या तुकडींतील प्रत्येक मुसलमानाला भीतीनें कांपरें भरे. कांपरें अशासाठीं भरे कीं, अशा एखाद्या बैराग्याच्या मागें शेंकडों—हजारों हिंदू अनुयायांचें पाठबळ हटकून असावयाचें, किंवा नसलें तरी तें त्या बैराग्याच्या एका हांकेसरसें जमा व्हावयाचें, हें सिद्दी साताच्या सैन्यांतील प्रत्येक मुसलमानाला माहीत होतें. त्यामुळें असा कोणीही बैरागी सांपडला रे सांपडला कीं त्याला प्रथम ठार करावें असे सिद्दी साताच्या सर्व सैन्यांत सक्त हुकूम सुटले होते. केवळ बजरंग बैराग्याच्या दराऱ्यानें हिंदूंत एवढा आत्मविश्वास जागृत होतो, त्यांतलो मख्खी मुसलमान शिपायांना माहीत नसल्यानें त्यांना हा दैवी चमत्कारसा वाटे. शिवाय हे बैरागी लोक चेटुक करून आपला नाश करूं पाहतात असाही सर्व मुसलमानांचा ग्रह झाला होता.

अशा स्थितींत त्या मुसलमान तुकडीनें जेव्हां खिंडींतील गजाननाच्या देवालयांत त्या बैरागिणीला पाहिलें, तेव्हां साहजिकपणेंच त्यांच्या दृष्टीनें ती चेटकीण ठरली, व तिला ठार करण्यासाठीं ते मुसलमान तिच्यावर तुटून पडले. पण कर्मधर्मसंयोगानें तेवढ्यांत साक्षात् बजरंग बैरागी शंभर अनुयायांसह अकस्मात् तेथें प्रगट झाला! मुसलमान सैनिकांचा देवालयाला वेढा पडण्यापूर्वीच बैराग्याच्या सैन्यानें त्या मुसलमानांवर छापा घातला. त्या दोन्ही पक्षांत निकराची लढाई जुंपली असतांनाच सिद्दी सात आपल्याबरोबरच्या शंभर मुसलमान सैनिकांच्या तुकडीसह तेथें येऊन पोंचला, व तो ह्या लढाईंत सांपडला. खुद्द सिद्दी साताचें पाठबळ मिळतांच मुसलमान सैनिकांना लढण्याला जास्त हुरूप आला. उभय पक्षांतील बरेच लोक ठार मारले गेले. पण परिणामीं सिद्दी साताला पराजय पत्करून तेथून पळ काढावा लागला. नंतर बैराग्यानें देवालयांत जाऊन पाहिलें तों ती बैरागीण तेथें भीतीनें बेशुद्ध पडली होती. काय असेल तें असो, तिला पहातांच बैराग्याची नजर थोडा वेळ थिजल्यासारखी तिच्यावर खिळून बसली. त्याच्या डोळ्यांतून भळभळां

पाणीही वाहूं लागलें. बरोबरच्या लोकांना तो प्रकार पाहून अत्यंत विस्मय वाटला. गेल्या दोन दिवसांच्या अवधींत त्यानें शत्रूशीं अशा तीन चार चकमकी झडविल्या होत्या व त्या चकमकींत उभयपक्षांकडील शेंकडों लोक मृत्युमुखीं पडले होते. फार दूर कशाला ! त्या घटकेला उडालेल्या चकमकींतही बैराग्याचे बरेच लोक त्या धारातीर्थी पतन पावले होते. पण बैरागी मनाचा खंबीर; त्या बळी पडलेल्या लोकांविषयीं तो मुळींच रडत बसला नाहीं. 'देवाधर्माकारणें जे धर्मवीर मेले ते मरून अजरामर झाले. ईश्वरा ! त्यांना तूं आपल्या पायांपाशीं आश्रय दे" एवढी प्रार्थना मात्र त्यानें मनःपूर्वक केली. तोच बैरागी त्या बैरागिणीला बेशुद्ध पडलेली पाहून रडूं लागला. इतका खेद त्याला कां व्हावा हें कोडें त्याच्या अनुयायांना उलगडेना ! 'पण असें कां ?' असें बैराग्याला विचारण्याचें धैर्यही त्यांना झालें नाहीं. थोडा वेळ तेथें थांबून नंतर तो बैरागी आपल्या त्या अनुयायांपैकीं कांहींना म्हणाला, "ज्या बैरागिणीचा शोध करण्यासाठीं मी तुम्हांला सांगत होतों, ती ही. तुम्ही हिला आतांच्या आतां माझ्या झोंपडींत घेऊन जा; व ती सावध झाल्यावर तिला गडावर आणून पोंचवा. तोंवर मी पुढें जातों. आणि हें पहा, ह्या खिंडींतून शत्रूच्या आणखी टोळ्या येण्याचा संभव आहे. त्यांना पुढें येऊं न देण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे."

एवढें बोलून तो बैरागी तेथून जावयाला निघाला. तोंच ती बैरागीण हळुहळू शुद्धीवर यावयाला लागली. तें पाहून तिच्या रक्षणार्थ तेथें राहिलेल्या लोकांनीं ती गोष्ट बैराग्याच्या कानावर घातली. पण चमत्काराची गोष्ट अशी कीं, ती बैरागीण शुद्धीवर आलेली पाहण्याला बैरागी तेथें थांबला नाहीं.

ॐ ॐ ॐ

पहिल्याच पावलाला सिद्दी साताच्या दुर्दैवानें त्याला एवढी मोठी थप्पड लगावली ती मुकाटपणें सहन करून सिद्दी सात सागरगडच्या पायथ्यापाशीं जाऊन पोंचतो, तों तेथेंही तसेंच सतीचें वाण त्याच्यासाठीं वाढून ठेवण्यांत आलें होतें. सुलतान नुक्ताच तेथें येऊन गडाला वेढा घालण्याच्या तयारींत होता. सुभानजी व दत्ताजी पूर्वींच गडावर गेले होते, त्यांनीं गडावर वर वर दिसावयाला तरी चांगलाच भेद केल्यामुळें गड पाडाव करणें सिद्दी साताच्या अगदीं अवसानांत आलें होतें. आतां गड नक्की आपल्या हातीं येणार म्हणून सिद्दी साताच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. पण हा त्याचा आनंद फार वेळ टिकला नाहीं. त्यानें

शेखजीला व स्वतःच्या बायकोला-शेखजीच्या बहिणीलाही—चौबुहजीवर क्रूरपणें ठार केल्याचा बोभाटा सुलतानाच्या कानांवर जातांच सुलतान एकाएकीं बिथरला व सिद्दी साताशीं त्याची बाचाबाच झाली. तो कलह दोन दिवसांत इतका विकोपाला गेला कीं, अखेर सिद्दी साताला शत्रूशीं झगडण्यापूर्वींच सुलतानाशीं झगडावें लागलें. सुलतानाचा उत्कर्ष ज्यांना असह्य होत होता असे दुष्टबुद्धि लोक तेथेही होतेच; त्यांतलाच सुभानजी हाही एक होता. सुभानजीचें सुलतानानें प्रत्यक्षपणें असें कांहींच घोडें मारलें नव्हतें; उलट सिद्दी सातापाशीं आणीबाणीच्या वेळीं कांहीं खऱ्या व कांहीं खोटया गोष्टी बोलून त्यानें सुभानजीला वांचविलें होतें. त्या उपकारांची फेड सुभानजीनें करणें बाजूलाच राहिलें; उलट सुलतानानें चांगुणेच्या बाबतींत सुभानजीला शब्दानें बांधून घेतलें होतें, त्या बंधनांतून मुक्त होण्यासाठीं सुभानजी सुलतानाविरुद्ध कलेहूरे कोणतेही उपाय योजण्याला तयार होता, फक्त तो तशा संधीची वाट पहात होता. सुभानजी चौबुहजीवरून सागरगडावर आला तेव्हां व त्यापूर्वी 'चांगुणा मी तुला देईन' असें सुलतानापाशीं कबूल करतांनाही आपण कोणत्या उपायानें सुलतानाला फसवून चांगुणा मिळवावी याविषयींचे गूढ विचार त्याच्या डोक्यांत घोळत होतेच; मात्र चांगुणेचाच पत्ता नसल्यानें ते विचार कांहींसे मंदगतीनें चालले होते. पण तो सागरगडावर जाऊन पोंचला व चांगुणा त्याला तेथें भेटली, तेव्हां त्याच्या विचारांना द्रुतगति मिळाली. मनांतून तर त्याला सुलतानाचा दरारा वाटत होता; शिवाय दत्ताजीचा ससेमिरा जो सुभानजीच्या मागें लागला होता, तो सुलतानाच्या कारवाईमुळेंच लागल्याबद्दल सुभानजीची खात्री होऊन चुकली होती. चांगुणा सुभानजीनें सुलतानाला नजर करण्याचें अभिवचन दिलें तेव्हां दत्ताजी तेथें हजर होताच. अर्थात् दत्ताजीच्या देखत चांगुणा सुलतानाच्या हातीं लागूं नये अशी खटपट करणें सुभानजीला शक्य व इष्टही नव्हतें. इतकेंच काय; तो व दत्ताजी असे दोघे सागरगडावर येऊन पोंचले व चांगुणा तेथें त्यांना आढळली, तेव्हां आतां ती आपल्या हातची जाणार, अशी सुभानजीची निराशामय खातरजमा झाली होती. पण सुभानजीच्या वाटेंतील तो एक कांटा परस्पर दूर झाला. दत्ताजीचें काळेंकुट्ट अंतरंग प्रभावती व चांगुणा यांच्या प्रत्ययाला पूर्वींच आलें होतें, व मथुराबाई आंग्रे गडावर होती तिचीही दत्ताजीच्या दगलबाजपणाबद्दल प्रभावतीच्या सांगण्यावरून खातरजमा झाली होती. तेथला किल्लेदार हंबीरराव हा मथुराबाईशीं निष्ठेनें वागणारा असल्यानें

मथुराबाईनें दत्ताजीला त्याच्या गुन्ह्याबद्दल देहान्त शासन फर्माविलें तेव्हां त्याला कोणाचांही विरोध झाला नाहीं. विरोध येऊन जाऊन सुभानजीचा व्हावयाचा. पण तो कशाला विरोध करील ! किल्लेदार व मथुराबाई यांच्यापुढें आपलें कांहीं चालत नाहीं ह्या सोडवळ सबबीवर सुभानजीला वेळ मारून नेतां आली. सुभानजीची सबबही एकपरीनें खरीच होती. वारा वाहील तशी पाठ फिरवावयाची हा त्याचा बाणाच असल्यानें त्यानें जेव्हां गडावर येतांच तेथें सर्वत्र मथुराबाईचा दरारा पाहिला, मानाजी आंग्र्यानें मथुराबाईला गडावर नजर कैदेंत ठेविलें असूनही हंबीरराव हा मथुराबाई व संभाजी आंग्रे यांच्या बाजूचा असल्यानें गडावर मथुराबाई म्हणेल ती पूर्वदिशा असा प्रकार असल्याचें जेव्हां त्याच्या निदर्शनाला आलें, तेव्हां त्यानेंही गडावर फितुरी करण्याचा आपला पूर्वसंकेत बाजूला ठेवून मथुराबाई व हंबीरराव यांच्या तंत्रानें वागण्याला प्रारंभ केला होता. केवळ गडावरील परिस्थिति सुभानजीच्या पूर्वसंकेतांत याप्रमाणें बदल करूं शकली असें नाहीं; बाहेरची परिस्थितिच तसें होण्याला मुख्यतः कारण झाली होती. मानाजी आंग्रे व चिमाजीअप्पा हे एकजुटीनें प्रचंड सैन्यानिशीं गडावर चालून येत आहेत व त्यांची तयारी जबरदस्त आहे, बजरंग बैरागी प्रत्येक घटकेला शेंकडों नवे नवे अनुयायी मिळवून सिद्दी साताचा नायनाट करण्यासाठीं झटत आहे, सिद्दीच्या सैन्यांतील हिंदु सैन्य भराभर बैराग्याला फितुर होत आहे, जंजिरेकर सिद्दीची मदत सिद्दी साताला होण्यासारखी नाहीं, इंग्रज त्याला पाठीशीं घालण्याला तयार नाहींत, फिरंग्यांचें साह्य मानाजीनें पूर्वीच मिळविलें असल्यानें त्यांचाही सिद्दी साताला कांहीं उपयोग होणें शक्य नाहीं, व मथुराबाईशीं मानाजीनें वैमनस्य मांडलें असलें तरी अशा प्रसंगीं मथुराबाई तीं आपसांतील भांडणें बाजूला ठेवून मानाजीला साह्य करण्याला तयार आहे, ही सर्व बाहेरील परिस्थिति ध्यानीं घेऊनच सुभानजीनें आपला पुढील मार्ग आंखला होता. सिद्दी साताचा ह्या मोहिमेंत फडशा उडणार हें ओळखून त्यानें मथुराबाईशीं स्वामिनिष्ठापूर्वक वागण्याचें ठरविलें होतें, व पुढें मागें बजरंग बैरागी आणि मथुराबाई यांची भेट झाल्यावर बैराग्याच्या रोषाची झळ आपणाला लागूं नये म्हणून तो झाल्या गेल्या गोष्टींविषयीं मथुराबाई व हंबीरराव यांच्यापाशीं क्षमा मागून मोकळा झाला होता.

याप्रमाणें सुभानजी पूर्णपणें सिद्दी साताच्या शत्रूला सामील झाल्यावर गडावर

सिद्दी साताचा प्रवेश होण्याचा मार्ग आपोआपच बंद झाला. दत्ताजी काय किंवा सुभानजी काय, दोघेही चोरच ! पण सुभानजीचें नशीब जोरावर असल्यानें तो चोरावर मोर होऊं शकला. त्यानें शक्य तेवढी कारवाई करून दत्ताजीला तर यमसदनाला पाठविलेंच; आणि सुलतानलाही नामोहरम करण्याचे त्याचे प्रयत्न चालले होते. सुलतान हा चांगुणेच्या बाबतींत सुभानजीचा प्रतिस्पर्धी होता, तसाच इंबीरराव, मथुराबाई वगैरे सर्वांचा हाडवैरी होय. अर्थात् त्याच्या नाशासाठीं हरएक कुटिल कारस्थानें करण्याला गडावरील मंडळीकडून सुभानजीला प्रोत्साहनच मिळालें. इकडे मथुराबाई, इंबीरराव, वगैरे मंडळीचा विश्वास संपादन करण्यासाठीं सुलतानापासून गडाचें रक्षण करण्यासाठीं डोळयांत तेल घालून झटावयाचें, व तिकडे सुलतान, 'मथुराबाई वगैरे मंडळीला कैद कर; चांगुणेला माझ्या स्वाधीन कर' असा तगादा एकसारखा लावीत होता; त्याला नित्य नव्यानव्या थापांनीं थोपवून धरावयाचें, असा दुहेरी लपंडाव खेळतां खेळतां पहिल्या तीनचार दिवसांतच सुभानजी अगदीं मेटाकुटीला आला होता; व सिद्दी सात तेथें येऊन पोंचला तेव्हां तर आपला लपंडाव आतां उघडकीला येणार ह्या भयानें त्याच्या तोंडचें पाणीच पळालें होतें. पण सिद्दी सात व सुलतान यांच्यांत गैरसमज उत्पन्न झाले, शेखजीला सिद्दी सातानें ठार केलें, ही बातमी सुलतानाला कळतांच सुलतान बिथरून आपल्या भावाच्या वधाचा सूड सिद्दी सातावर घेण्यासाठीं वेळ्यांत ढिलाई करून शत्रूला सामील होण्याच्या तयारीला लागला. सुभानजी हा त्याच्या विश्वासांतील माणूस असल्यानें त्यानें सुभानजीलाही फितविण्याला कमी केलें नाहीं. सुभानजी पूर्वींच फितलेला होता; तो कोणाच्या उपदेशासाठीं अडून बसला नव्हता. त्यानें बाह्यात्कारीं सुलतानाला सिद्दी साताशीं निष्ठेनें वागण्याचा, सुलतान व सिद्दी सात यांचें सूत यापुढें कधींच जमणें शक्य नाहीं अशी स्वतःची पूर्ण खात्री करून घेतल्यावर उपदेश करण्याचा आव आणून त्याला नाउमेद केलें, व त्याच्या अपरोक्ष सिद्दी साताच्या कानांत मात्र सपाटून विष ओतलें. त्याचा परिणाम अखेर सिद्दी साताची सुलतानाशीं लढाई होऊन त्या लढाईंत सुलतानाचा बळी पडण्यांत झाला.

सिद्दी सात व सुलतान यांच्यांतली ही धुसपूस–झटापट–सुरू झाल्यापासून भेटेपर्यंत सुमारें पंधरा दिवस मोडले. सुलतानाला सिद्दी सातानेंच रेवसकडील सैन्याचा सेनापति नेमल्यामुळें भस्मासुरासारखी अवस्था त्यानें केली. त्या दरम्यान् चिमाजीअप्पा, मानाजी आंग्रे व बजरंग बैरागी ऊर्फ खाशाबा सुर्वे यांना

सुभानजीने सिद्दी साताच्या गोटांतील ह्या अंतस्थ कलहाची बातमी दिल्यामुळें त्यांनीं आपापल्या परीनें सिद्दी साताला सभोंवारून कोंडण्याचा सपाटा चालविला. त्यांना सिद्दी साताविरुद्ध लढाई देण्याची तयारी करण्याला ह्या आकस्मिक् कारणामुळें चांगलाच अवसर सांपडला.

मानाजी आंग्रे मूळपासूनच मथुराबाईच्या विरुद्ध होता व चिमाजीअप्पा मानाजीच्या मदतीला आलेले. असें होतें तरी मथुराबाईनें त्यांना कळकळीचीं विनंतीपत्रें पाठवून हें धर्मयुद्ध यशस्वितेनें लढण्याबद्दल कळकळीची विनंति केली होती. पण तिला खरा आधार खाशाबाचा मिळाला होता. अर्थात् खाशाबा बजरंग बैरागी याच नात्यानें वावरत होता. गडावर त्यानें एकदां मध्यंतरी फेरी केली तेव्हां मथुराबाईनें मुद्दाम त्याचें दर्शन घेऊन त्याचा शुभाशीर्वाद मिळविला होता व खाशाबानेंही स्वतः सिद्दी साताचा समूळ निःपात करण्याची पुन्हा एकवार प्रतिज्ञा करून सुभानजीसह गडावरील सर्व माणसांकडून तशी प्रतिज्ञा करविली होती. ह्या सर्व गोष्टी त्यानें आपल्या साधुवेशांतच पार पाडल्या होत्या. तो गोपनस्फोट होऊं नये एवढ्यासाठींच, माणकोजीकडून खाशाबाला गजरा सुरक्षितपणें गडावर पोंचल्याचें वर्तमान कळल्यामुळें गजरा कदाचित् आपणाला ओळखील ह्या भयानें गडावर गजरेला न भेटण्याविषयीं त्यानें पूर्ण खबरदारी घेतली होती. सुभानजीवर देखील त्याचा पूर्वीं जो राग होता, तो सुभानजीच्या वृत्तींत एकाएकीं कोणत्याही कारणावरून कां असेना; इष्ट फरक पडलेला पाहून आपोआप दूर झाला होता.

घटकेंत काळें खिंडींत तर घटकेंत खंडाळ्याच्या गुहेंत तर घटकेंत गडावर अशी खाशाबाला एकसारखी धांवपळ करावी लागल्यामुळें भानाजी, नानाजी वगैरे मंडळीची त्याला प्रत्यक्ष भेट होण्याला एक दिवसाचा अवधि लागला. पण एक दिवसाच्या उशिरानें कां होईना, ती मंडळी त्याला संकेतस्थलीं भेटली. भानाजीचा त्याचा दीर्घकालपासून असलेला राग माणकोजीच्या पहिल्या भेटींत बराचसा दूर झाला होता; व भानाजीच्या कृपेनें त्याला नानाजी भेटला, तेव्हां तर खाशाबा व भानाजी हे हाडवैरी दिल्दोस्त बनून गेले. वास्तविक ती वेळ केवढी आणीबाणीची! पण त्या वेळींही भानाजीनें आनंदातिशयानें नानाजीला आपली लेंक देण्याचा आपला मानस असल्याचें खाशाबाच्या कानावर घातलें, व खाशाबालाही तें ऐकून आनंद वाटला. अर्थात् ती गोष्ट ते दोघेही बोलले

तेव्हां नानाजी व माणकोजी हे दोघेही तेथें नव्हते; ते चांगुणेला सुरक्षितपणें गडावर नेऊन ठेवण्यासाठीं गेले होते. सुलतानाचा चांगुणेवर डोळा आहे हें नानाजी व खाशाबा ह्या दोघांनाही माहीत होतें; त्यामुळें वनवासांत असलें स्त्रीधन जवळ बाळगणें बरोबर नाहीं असा विचार करून सर्वांनुमतें तिनें ह्या मोहिमेचा शेवट लागेपावेतों गडावर गजरा, प्रभावती, मंगला, यांच्या संगतींत मथुराबाईच्या आश्रयाला रहावें असें ठरलें होतें. अर्थात् हा सारा प्रकार सिद्दी सात व सुलतान यांच्यांतील वैमनस्य विकोपाला जाण्यापूर्वीचा होता.

भानाजी, नानाजी व माणकोजी ही मंडळी मदतीला येतांच खाशाबाला जणूं काय ब्रह्मा–विष्णु–महेश आपल्या साह्याला धावून आल्याइतका संतोष वाटला. त्यांना पहातांच खाशाबानें पहिली गोष्ट त्यांना करावयाला लावली ती वेषांतराची व पहिली सूचना त्या माहीतगार मंडळीला दिली ती आपलें खरें स्वरूप प्रगट न होऊं देण्याची. चांगुणेला गडावर पाठवितांना देखील वैराग्याचें रहस्य न फोडण्याबद्दल खाशाबानें तिला अत्याग्रहानें बजावलें होतें. ती परिस्फोट न करण्याविषयीं खाशाबा इतकी खबरदारी घेत होता याचें कारण मानाजी आंग्रे त्याचा वैरी होता; तो केव्हां कसा घात करील याचा कांहींच नेम नव्हता. शिवाय सामान्य जनता त्याला बजरंग बैरागी या नांवानेंच ओळखीत होती व त्याच्या शब्दाला धावून येऊन स्वदेश आणि स्वधर्म यांच्या रक्षणासाठीं बैराग्याच्या भगव्या झेंड्याखालीं मरणाच्या मोलानें झगडण्याला तयार होती. एवढा मान खाशाबाला मिळत नसून बजरंग बैराग्याला मिळत होता, बजरंग बैराग्याच्या प्रत्येक शिष्याच्या हांकेंतही तसेंच अद्भुत सामर्थ्य उत्पन्न झालें होतें व होत होतें याचें कारण बहुजनसमाजाची बजरंग बैराग्याच्या ठायीं जडलेली श्रद्धा. त्या श्रद्धेचा फायदा अरिनिर्दालनाच्या कामीं करून घेण्यांत खाशाबा कोणत्याही प्रकारें कसूर करीत नव्हता; तेवढ्याचसाठीं त्यानें आपल्या बऱ्याच विश्वासू अनुयायांना बैराग्याचा वेष दिला होता व भानाजी, नानाजी आणि माणकोजी यांनाही त्यानें तोच वेष घ्यावयाला लावला होता. हें खाशाबाचें थोतांड होतें असें नाहीं; तो खरोखरच सर्वसंगपरित्यागी होता. रामाजीपंतानें मानाजीच्या वतीनें त्याला दीड वर्षापूर्वी दसऱ्याच्या दिवशीं कोटकामत्याच्या किल्लेदारीवरून पदच्युत करून त्याला कैदेंत टाकलें खाशाबा हरयुक्तीनें मानाजीच्या कैदेंतून सुटून प्रथम ब्रह्मेंद्रस्वामींपाशीं गेला, तेव्हां त्याला खरोखरच संसाराविषयीं वीट आला होता, व त्याचा निर्धार स्वामींच्या

चरणांच्या छायेला राहून हरिभजनांत काळ घालविण्याचा होता. पण स्वामींना खाशाबाची मर्दुमकी माहीत असल्यानें त्यांनीं त्याचा कोंकणपट्टींत मदांध सिद्दी साताचा नायनाट करण्याच्या कामीं उपयोग करून घेण्याचें ठरविलें; त्याप्रमाणेंच त्याचें वैराग्य हें अंतःकरणापासून त्यागाचें नसून त्राग्याचें आहे, त्यानें आपण होऊन आपल्या हातानें सर्वस्वाची होळी करून घेतल्यामुळें त्याला वैताग आला आहे, हें ओळखून 'तुझ्या संसाराची घडी पुन्हा पूर्ववत् बसेल, तुझीं लेंकरें व तुझी बायकोही तुला पुन्हा भेटेल व त्यांना सुखी करण्याचें पुण्य तुला लाभेल' असा त्याला आशीर्वाद देऊन त्याला 'बजरंग बैरागी' हें नांव देऊन कोंकणपट्टींतील कामगिरीवर पाठविलें होतें. तात्पर्य, 'बजरंग बैरागी' कोंकणपट्टींत सर्व हिंदु रयतेला उपदेशामृत पाजून सिद्दी साताच्या नायनाटाला उपकारक अशी जी भूमिका बनवीत होता व त्याच्या प्रयत्नांना एकसारखें यश येत होतें, तो स्वामींच्या आशीर्वादाचा व तपश्चर्येचा प्रभाव होता. खाशाबा, भानाजी, नानाजी, माणकोजी वगैरे मंडळीच्या पराक्रमामुळेंच सिद्दी साताचा चोंहींकडून कोंडमारा होऊन त्याचा विनाशकाळ जवळ आला होता; त्याप्रमाणेंच चिमाजीअप्पा व मानाजी आंग्रे यांच्या पराक्रमाचाही त्यांत बराच मोठा वांटा होता हेंही खरें. पण कोणत्याही मानवी प्रयत्नाच्या मुळाशीं भगवंताचें अधिष्ठान असणें अवश्य असतें. तें अधिष्ठान स्वामींच्या आशीर्वादानें व तपश्चर्येनें चिमाजीअप्पा, खाशाबा, वगैरे मंडळींच्या प्रयत्नांत निर्माण केलें होतें.

एवढें सारें झालें तरी त्या मंडळीच्या प्रयत्नांत एक दुर्दम वैगुण्य मात्र प्राणघातक रोगबीजाप्रमाणें ठाणें देऊन बसलें होतें. तें रोगबीज म्हणजे खाशाबाचा ऊर्फ बजरंग बैराग्याचा पक्ष व मानाजी–चिमाजीअप्पा यांचा पक्ष यांच्यांतील जुनापुराणा वैरभाव होय. संभाजी विरुद्ध मानाजी ह्या आंग्र्यांच्या घराण्यांतील वैरभावाचें तें प्रतिबिम्ब होतें. सिद्दी साताचा निःपात होऊन कोंकणपट्टींतील गो–ब्राह्मणांचा छळ थांबावा ही दोन्ही पक्षांची इच्छा खरी व दोन्ही पक्षांचे सवत्या-सुभ्याचे प्रयत्न त्या दृष्टीनें अत्यंत यशस्वी होत होते हेंही खरें; पण दोन्ही पक्षांचें अंतिम ध्येय मात्र निरनिराळें होतें. खाशाबाच्या पक्षाच्या मनांतून संभाजी सर-खेलांची सत्ता कुलाब्याच्या टापूंत पुन्हा प्रस्थापित व्हावी असें होतें व मानाजीला तर संभाजीचें नांव देखील नको होतें. त्यामुळें दोन्ही पक्षांचें मतैक्य होणें शक्य नव्हतें व त्या मतभेदामुळें सिद्दी साताचें फावण्याचा फार संभव होता. सिद्दी

सातही कमी चतुर होता अशांतली गोष्ट नाहीं. त्यानें आपल्या दोन शत्रुपक्षांत जास्त जास्त फूट पाडून स्वतःचा डाव साधण्याची शिकस्त चालविली होती. खाशाबापाशीं त्याच्या कारस्थानाला जरी यश लाभणें मुळींच शक्य नव्हतें, तरी मानाजी मात्र त्याला वळण्यासारखा होता;—नव्हे, वळला होता. खाशाबा तोच बजरंग बैरागी हें जरी मानाजीला माहीत नव्हतें, तरी बजरंग बैरागी आपला वैरी व संभाजीचा कैवारी आहे, हें तो पक्कें ओळखीत होता, आणि म्हणूनच तो सिद्दी साताशीं जरूर तेथें सलोखाही करण्याला तयार होता. चिमाजी-अप्पांना देखील बैरागी डोईजड वाटत होता. लोकमत बहुशः संभाजीच्या बाजूचें आहे व ज्या गडाच्या रक्षणासाठीं आपण एवढी धडपड करावयाची तो गड मथुराबाईच्या ताब्यांत असून तो आपल्या स्वाधीन होणें दुरापास्त आहे हें मानाजी व चिमाजीअप्पा हे दोघेही पक्कें जाणत होते. मथुराबाईनें थोर मनानें त्यांना समजुतीच्या गोष्टींचीं जिव्हाळ्याचीं पत्रें लिहून सर्वांची गोडी करण्याचे भगीरथ प्रयत्न चालविले होते; पण त्या प्रयत्नांना यावें तसें यश येणें दुरापास्त होतें. मथुराबाईचें गडावरील वास्तव्य मानाजीला अडचणीचें दुखणें होऊन बसलें होतें. मथुराबाईला राखावें तर गड संभाजीच्या स्वाधीन होऊं द्यावा; तोडावें तर गडावर सत्ता तिची असल्यानें व खाशाबा तिचा कट्टा कैवारी असल्यानें, हरप्रयत्नानें आपण संपादन केलेल्या यशावर संभाजीच्या नांवानें पाणी सोडून माघारें जावें. अशा तेढीमुळें यश मात्र प्रत्येक क्षणीं दुरावत होतें, व जसा सिद्दी साताशीं सुलतानाचा प्रत्यक्ष झगडा जुंपल्यामुळें गडाच्या वेढ्याचें काम ढिलें पडून त्यांची आपसांत खडाजंगी जुंपल्यामुळें मानाजी, चिमाजीअप्पा व खाशाबा या त्यांच्या वैऱ्यांना सिद्दी साताचा चोहोंकडून कोंडमारा करण्याला फावलें, तसाच पण अगदीं त्याच्या उलट प्रकार खाशाबा व मानाजी—पेशवे ह्या दोन पक्षांतील दुफळीचा होणार असा प्रसंग येऊन ठेपला.

होतां होतां ज्या दिवशीं सिद्दी सात व सुलतान यांची गडाच्या पायथ्याशीं निकराची लढाई जुंपली व सिद्दी साताचा नायनाट करण्याला ती उत्तम संधि प्राप्त झाली आहे असें पाहून एका बाजूनें मानाजी—चिमाजीअप्पा यांनीं व दुसऱ्या बाजूनें खाशाबा -मानाजी—नानाजी—माणकोजी यांनीं सिद्दी सातावर तुटून पडून त्याला पळवून लावलें; त्याच दिवशीं खाशाबा व मानाजी यांचीं सैन्यें एकमेकांच्या तोंडाशीं भिडून त्यांच्यांत तुंबळ युद्ध झालें. मानाजीचा विचार खाशाबाला जागच्याजागीं

-ठार करून आपला मार्ग निष्कंटक करण्याचा होता. पण देवाची तशी मर्जी नसल्यामुळें मानाजीचे प्रयत्न वाया जाऊन उलट तोच खाशाबाच्या सैन्याच्या हातीं कैद झाला. मात्र खाशाबानें मानाजीला अपमानास्पद रीतीनें वागविलें नाहीं. त्याला त्याच्या इतमामाप्रमाणें वागविण्याचें अभिवचन देऊन गडावर बंदोबस्तानें नेऊन ठेविलें. चिमाजीअप्पा रेवसच्या बाजूला सिद्दी सातानें पळ काढला होता त्याच्याशीं सामना देण्यांत गुंतून पडले असल्यामुळें त्यांना मानाजीच्या पाडावाची वार्ता कळण्याला बराच उशीर लागला; तेव्हां त्यांना सिद्दी साताशीं लढण्याचें काम तात्पुरतें आपल्या हाताखालाच्या लोकांवर सोंपवून मानाजीच्या मुक्तते-विषयीं खटपट करण्यासाठीं तांतडीनें गडावर जावें लागलें.

ॐ ॐ ॐ

सागरगडावरील मोहिम सुरू झाल्यापासून पंधरा दिवसांत काय काय घडामोडी होऊन गेल्या, त्यांचें दिग्दर्शन वर करण्यांत आलेंच आहे. आतां कथानकाच्या ओघानें दोन महत्त्वाच्या गोष्टींचा खुलासा व्हावयाचा राहिला आहे. पहिली गोष्ट, नानाजी व माणकोजी ह्या दोघांचें एका प्रभावतीवर प्रेम होतें हें वाचकांना माहीत आहेच. त्या प्रेमाच्या बाबतींत दोघांचीही कुचंबणा झालेली होती. त्या कुचंबणेचें स्थूल स्वरूप पूर्वीच विशद करण्यांत आलें असल्यानें त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें तादृश कारण नाहीं. चांगुणा व प्रभावती यांची गडावर भेट झाल्यावर त्या कुचंबणेंत आणखी भर पडली होती. प्रभावती व नानाजी यांचें परस्परांवर प्रेम आहे ही गोष्ट चांगुणेला माहीत नसल्यानें ती सहजगत्या आपलें लग्न नानाजीशीं ठरल्याचें प्रभावतीपाशीं बोलून गेली; पण त्या सहजासहजींच्या बोलण्यानें कमालीचे परस्पर गैरसमज उत्पन्न झाले होते. नानाजी ज्याप्रमाणें प्रभावतीविषयीं निराश झाल्यामुळें चांगुणेचें पाणिग्रहण करण्याचें कबूल करून मागाहून प्रभावती सुखरूपपणें गडावर असल्याचें ऐकतांच पस्ताव्यांत पडला होता; व प्रभावतीही प्रथम तशाच प्रकारच्या निराशेमुळें माणकोजीशीं लग्न करण्याचें कबूल करून पस्ताव्यांत पडली होती. तिला नानाजी व चांगुणा यांचें लग्न ठरलेलें ऐकून अत्यंत विषाद वाटला. पण त्यांत नानाजीची किंवा चांगुणेची कांहीं चूक आहे असें मात्र तिला म्हणवेना. हा नशिबाचा खेळ आहे असें म्हणून स्वस्थ बसण्याशिवाय तिला गत्यंतर नव्हतें. तिकडे माणकोजीला जेव्हां नानाजीनें आपली कर्मकहाणी बजरंगगडाहून निघाल्यावर वाटेंत निवेदन केली, तेव्हां

माणकोजीला नानाजी व प्रभावती ह्या दोघांचीही कींव आली, व त्यानें ह्या दोघांना सुखी करण्यासाठीं जरूर तेवढा स्वार्थत्याग करण्याचा निर्धार केला होता. ही माणकोजीच्या मनाच्या थोरपणाची गोष्ट झाली; पण नानाजीला हें अवघड कोडें कसें सोडवावें हेंच कळेना. प्रभावती व चांगुणा ह्या दोघींपैकीं कोणा एकीशीं तरी प्रतारणा करावी, तर तसें करण्याला त्याचें मन धजेना. बरें; माणकोजीनें सुचविल्याप्रमाणें त्या दोघींशींही लग्न करणें त्याला रुचेना, व तें वेळीं त्याला रुचलें असतें तरी तें चांगुणा व प्रभावती यांना आणि खाशाबा व भानाजी यांना रुचलें असतें असें नाहीं. ही गुंतागुंत कांहीं दिवसांनीं चांगुणेच्या कानीं आली, तेव्हां तिचेंही मन तिला बोंचूं लागलें. ह्या घोंटाळ्यांत समाधानाची अशी एकच गोष्ट होती. नानाजी, माणकोजी, चांगुणा व प्रभावती यांपैकीं कोणाचाही कोणा-विषयीं गैरसमज मुळींच झाला नव्हता. त्यामुळें सर्वांनाच दैवावर हवाला टाकून स्वस्थ बसणें प्राप्त झालें होतें.

रहातां राहिली येथें उल्लेखिण्यासारखी अशी एकच गोष्ट; ती बैरागिणीसंबंधाची होय. खाशाबाला कार्लें खिंडींत जी बैरागीण भेटली, ती कोण होती नकळे; पण खाशाबा त्या क्षणापासून तिची इतकी काळजी घेऊं लागला कीं, सांगण्याची सोय नाहीं. त्यानेच तिला यदृच्छया सिद्दी साताच्या अत्याचारी सैनिकांच्या हातून सोड-विलें होतें, व तिला गडावर सुरक्षितपणें पोंचती करण्याला सांगितलें होतें. त्या-प्रमाणें खाशाबाच्या सैनिकांनीं सुमारें पाव घटका देवालयांत थांबून ती बैरागीण चांगली शुद्धीवर येईतों वाट पाहिली व ती शुद्धीवर आल्यावर तिला ते गडावर पोंचती करणार, तोंच सिद्दी साताच्या वतीनें उंदेरीचा नवा किल्लेदार सिद्दी याकूब आपल्या निवडक दोनशें मुसलमान शिपायांसह सिद्दी साताला मिळण्यासाठीं त्या खिंडीच्या वाटेनें जावयाला निघाला. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं खाशाबाचे सर्व सैनिक आपल्या म्होरक्यानें संकेताचें शिंग वाजवितांच त्या बैरागिणीला देवाल-यातच सोडून खिंडीच्या तोंडाशीं धावून गेले. खिंडीच्या तोंडाशीं उभय पक्षाच्या सैन्यांत चांगलेच रण माजून राहिलें. खाशाबाच्या सैन्यानें मोठ्या शिकस्तीनें सिद्दी याकूबला मागें परतावेलें; पण तसें करतांना त्या सैन्याचा बहुतेक फडशा उडाला तरीही राहिलेले लोक आपल्या गुरूच्या आज्ञेप्रमाणें बैरागिणीला गडावर पोंचविण्यासाठीं तिचा शोध करीत देवालयापाशीं येतात, तों ती बैरागीण जाग्या-वर नाहीं! त्या सैनिकांनीं त्या खिंडीच्या आसपास तिचा कर कर तपास केला—पण फुकट!

खाशाबाला जेव्हां हा प्रकार कळला, तेव्हां त्याच्या मनाला अत्यंत हळहळ वाटली. त्यानें लगेच त्या बैरागिणीच्या शोधार्थ बरेच लोक रवाना केले. तरीही तिचा तपास कांहीं लागला नाहीं. नाहीं म्हणावयाला पुढें दहाबारा दिवसांनीं एक बैरागीण गडावर भिक्षा मागत हिंडत असते एवढा मात्र शोध लागला. पण तीच ती बैरागीण कीं काय हें ओळखण्याला कांहीं मार्ग नव्हता; व खाशाबाला तर त्या बैरागिणीची भेट घेण्याची अत्यंत उत्कंठा लागली होती. पण त्याच सुमाराला गडासभोंवारच्या टापूंत ठिकठिकाणीं निकराच्या लढाईला तोंड लागल्यामुळें खाशाबालाही तिचा जास्त शोध करतां आला नाहीं. तरीही त्यानें गडावरील आपल्या सर्व मंडळीला सांगून त्या बैरागिणीचा शोध चालविलाच होता.

## प्रकरण सव्विसावें

# आनंदी–आनंद

"आईसाहेब ! आतां तुम्हीच ह्या प्रसंगांतून सर्वांना तारलें तर, एरव्हीं कांहीं तरणोपाय दिसत नाहीं."

"श्रीमंत ! मी कोणाला काय तारणार ? परमेश्वर तारणार. तसें पाहूं जातां मलाच वास्तविक कोणींतरी तारलें पाहिजे आहे."

"याचा अर्थ काय ?"

"श्रीमंत ! मी मानाजीची कैदी आहें; त्यानें मला कैदेंत म्हणून येथें ठेविलें आहे."

"असें काय ?"

"होय. मात्र मला त्याबद्दल राग नाहीं. मी म्हणतें कीं, जसा संभाजी माझें लेंकरूं, तसाच मानाजीही लेंकरूंच. संभाजी माझ्या पोटचा गोळा असला व मानाजी सवतीचा मुलगा असला, तरी मी त्या दोघांशींही आजवर समभावानें वागत आलें आहें. पाहिजे तर मानाजीलाही विचारा. आतां, मानाजी जेव्हां दौलतीची विटंबना मांडून सरखेलांच्या नांवाला काळें फांसण्याला तयार झाला तेव्हां मात्र मीं त्याला विरोध केला; पण तो केवळ दौलतीची इभ्रत राखण्यासाठीं. बरें; संभाजी जेव्हां जेव्हां चिडून मानाजीचा नाश करण्याला धांवून आला, तेव्हां तेव्हां त्यालादेखील मी आंवरण्याला कमी केलें नाहीं. असे अनेक प्रसंग मीं अनुभवले आहेत कीं, त्या वेळीं मीं जर मध्यस्थी करून संभाजी, येसाजी, तुळाजी वगैरे मंडळीला आवरलें नसतें, तर मानाजीचा त्यांनीं रागाच्या भरांत चेंदामेंदा केला असता."

"तें सर्व खरें; पण आईसाहेब ! मानाजी काय किंवा संभाजी काय, तुमचीं लेंकरेंच ना ? मानाजीनें आजवर सहस्र अन्याय केले असतील; कबूल. पण तुम्हीं वडीलपणाच्या नात्यानें ते अन्याय पोटांत घालून त्याला या वेळीं रक्षिलें पाहिजे; व ही मोहीम यशस्वी करण्याचें श्रेय घेतलें पाहिजे."

"पण आतां मानाजीचें रक्षण करणें माझ्या हातीं थोडेंच आहे ?"

"असें कसें म्हणतां आईसाहेब ! तुम्ही मनांत आणाल तर सर्व कांहीं करूं शकाल."

" श्रीमंत! ही तुमची कल्पना चुकीची आहे. तुम्हांला खरी वस्तुस्थिति माहीत नाहीं म्हणून तुम्हीं असें म्हणतां. हां, एकट्या संभाजीच्या बाबतींतच जर मानाजीनें अन्याय केला आहे असें असतें तर मीं संभाजीची कशीतरी समजूत करून हा प्रसंग निभावून नेला असता. पण आज मानाजीला तारणें किंवा मारणें खरोखर ज्याच्या हातीं आहे, त्या सज्जनाचे–बजरंग बैराग्याचे–मानाजीनें एवढे महान् अपराध केले आहेत कीं, ते जर तुम्हीं ऐकाल, तर तुम्हांलाच मानाजीच्या वतीनें मध्यस्थीचा एक शब्ददेखील बोलण्याला तोंड उरणार नाहीं. तुम्ही लाजेनें खालीं मान घालाल. तुम्ही बजरंग बैराग्याला भेटून आलां म्हणतां; त्यानें तुमच्यापाशीं मानाजीच्या महत्पातकांचा पाढा वाचलाच असेल."

" नाहीं; बजरंग बैराग्यानें मला कांहींच सांगितलें नाहीं. तो माझ्याशीं ह्या मोहिमेच्या बाबतींत कोणतीही समजुतीची गोष्ट बोलण्यालाच तयार नाहीं. त्याच्या बोलण्याच्या रोंखावरून तो मानाजीचा कट्टा वैरी असावासें वाटतें. कदाचित् असें असेल, त्याच्या अनुयायांवर मानाजीनें जे अत्याचार आजवर केले, त्याचा हा परिणाम असेल. अशा कांहीं गोष्टी मात्र त्या बैराग्यानें मला सांगितल्या. विशेषतः खाशाबा सुर्व्यांची वाताहात जी मानाजीनें केली, ती त्या बैराग्याच्या जिवाला फार लागून राहिली आहे. म्हणून तर मी तुमच्यापाशीं आलों आहे. तुमचा शब्द तरी तो मानील अशी मला आशा आहे. मी एकट्या मानाजीसाठींच ही खटपट करतों आहें असें नाहीं; ह्या मोहिमेचें भवितव्य अत्यंत महत्त्वाचें आहे. आपणां सर्वांची समाधानकारक एकी झाली तर ही वेळ अशी आहे कीं, आपण सिद्दी साताच्या अमानुष जाचांतून गो–ब्राह्मणांना वांचवूं शकूं इतकेंच काय, पण हिंदुस्थानांतून अविंधांच्या आसुरी सत्तेचें उच्चाटण करून हिंदु-पद पादशाहीची सेवा करण्याचा आपणां सर्वांचा मानस सिद्धीला जाण्यालाही ह्या यशाचा अत्यंत उपयोग होईल."

मानाजी खाशाबाच्या हातीं कैद झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीं सागरगडावरील गढींत मथुराबाई आंग्रे व चिमाजीअप्पा यांच्यांत वरील संभाषण चाललें होतें. मानाजी कैद झाल्याची वार्ता ऐकून चिमाजीअप्पा त्याच्या मुक्ततेविषयीं खटपट करण्यासाठीं तांतडीनें गडावर आले. त्यांना प्रथम गडावर प्रवेश मिळेना. कारण खाशाबाच्या सैन्यानें गडावर येण्याजाण्याच्या सर्व वाटा रोंखल्या असल्यामुळें, खाशाबाच्या परवानगीशिवाय अथवा गडावरील कोणा अधिकाऱ्याच्या प्रत्यक्ष

ओळखीशिवाय मुंगीला देखील आंतबाहेर रीघ नव्हती. पण चिमाजीअप्पांनीं गडावरील पहारेकऱ्याच्या हातीं खाशाबाला-त्याच्या व गडावरील सर्वांच्या समजुतीप्रमाणें बजरंग बैराग्याला-आपण भेटीला आलों आहों असा निरोप पाठविला तेव्हां त्यांना आंत प्रवेश मिळाला. आंत जातांच त्यांना खाशाबाची भेट झाली; खाशाबानें त्यांना त्यांच्या थोरपणाला साजेशा गौरवानें वागविलें. त्यांच्याशीं मोहिमेच्या बाबतींत वाटाघाट करून एकविचारानें सिद्दी साताचा नायनाट करण्याच्या बाबतींतही दोघांचें एकमत झालें; पण असा एकविचार होण्यासाठीं म्हणून खाशाबानें 'गडावर संभाजी सरखेलांची सत्ता प्रस्थापित झाली पाहिजे; व मानाजीचा न्याय संभाजी सरखेलांच्या हातून होईपावेतों आपण त्याची मोकळीक करणार नाहीं' अशा दोन अटी घातल्या. त्या अटी अर्थातच चिमाजीअप्पांना मानवल्या नाहींत. त्या कां मानवल्या नाहींत याचें कारण उघड होतें. पेशव्यांनीं मूळपासूनच मानाजीचा पक्ष स्वीकारला होता. त्या पूर्वयोजनेला हरताळ फांसण्यासारखी गोष्ट चिमाजीअप्पा कशी व कां करतील! पण त्या अटींना स्पष्टपणें नकार देऊनही त्यांचें चालण्यासारखें नव्हतें. गडावर सत्ता खाशाबाची म्हणजे पर्यायानें संभाजीची प्रस्थापित झाली होती, गडाबाहेरील सारें वातावरणही 'खाशाबा म्हणेल ती पूर्वदिशा' अशी साक्ष देत होतें! चिमाजीअप्पा व मानाजी यांचें सैन्यबळ अफाट होतें तरी खाशाबाशीं उघड उघड दावेदारी मांडून चिमाजी-अप्पांचा मुळींच निभाव लागण्याजोगा नव्हता. ही साधक-बाधक परिस्थिति ध्यानीं घेऊन त्यांनीं 'प्रथम आपण शत्रूचा नायनाट करूं; मग आपसांतील भानगडी आपणाला पेशवे, शाहूमहाराज वगैरे खाशा मंडळीच्या सल्ल्यानें मिटवितां येतील. आपण पेशव्यांचे ताबेदार असल्यानें त्यांनीं ठरविलेल्या राजकारणांत त्यांच्या अपरोक्ष ढवळाढवळ करण्याचा अधिकार आपणाला नाहीं' अशा प्रकारच्या मुत्सद्देगिरीनें खाशाबाला संतुष्ट करण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण त्यांत त्यांना मुळींच यश आलें नाहीं. मात्र तेवढ्या संभाषणांत एक गोष्ट चिमाजीअप्पांच्या ध्यानीं आली. खाशाबा कोणाचा शब्द या वेळीं मानील तर तो फक्त मथुराबाईचा एवढें त्यांना ओळखतां आलें; व म्हणूनच ते मथुराबाईपाशीं आले होते.

मथुराबाईला चिमाजीअप्पांचें बोलणें ऐकून किंचित् हंसू आलें. ती हंसलेली पाहून चिमाजीअप्पांनीं संशयानें विचारलें, "आईसाहेब! हंसलां कां?"

"मी कां हंसल्यें! श्रीमंत! तें तुम्ही विचारूं नये व मी सांगू नये."

“छेः! छेः! असें नको. एकमेकांचीं मनें एकमेकांविषयीं गंगाजलाप्रमाणें पवित्र असलीं पाहिजेत, तरच खरी दिलजमाई होऊं शकते.” चिमाजीअप्पा म्हणाले.

“पण श्रीमंत! खरी दिलजमाई होण्यासाठीं माणसाच्या बोलण्यांत व कृतींत मेळ असावा लागतो. तसा तो मेळ तुम्हां पेशव्यांच्या बोलण्यांत व कृतींत नाहीं. मी कडू पण खरें बोलतें याबद्दल मला क्षमा करा. पण तुम्ही आपल्या मनाशींच पडताळा पहा कीं, आंग्र्यांच्या दौलतीची इभ्रत राखली जाईल अशीच तुमची आजवरची कृति आहे किंवा कसें?”

मथुराबाईचा प्रश्न चिमाजीअप्पांच्या वर्मी झोंबला. दुसरें तिसरें कोणी लेंचेंपेंच माणूस असतें तर त्याला चिमाजीअप्पांनीं आपल्या मुत्सद्देगिरीच्या मिठ्ठास भाषणानें तेव्हांच गार केलें असतें व युक्तिवादांत डाव जिंकला असता. पण मथुराबाई अशा सामान्य माणसांपैकीं नव्हती. आंग्र्यांच्या उभ्या दौलतींत तिच्या शब्दाला अजून मान होता, व पेशवे आणि शाहूमहाराज यांनाही तिचा विलक्षण दरारा वाटत होता. चिमाजीअप्पाही तिला ओळखीत होते. त्याप्रमाणेंच चढावाचें धोरण कधीं ठेवावयाचें व बचावाचें धोरण कधीं ठेवावयाचें हेंही त्यांना चांगलें अवगत होतें. मुंगी होऊन साखर खाण्यांत त्यांचा त्यांच्या पूर्वजांप्रमाणेंच हातखंडा होता. त्यांनीं ती वेळ ओळखून बचावाचें धोरण पत्करून मथुराबाईला म्हटलें, “आईसाहेब! पेशव्यांच्या हातूनही गैरसमजुतीनें कांहीं चुका झाल्या असतील; नाहीं असें नाहीं. माझ्यांही हातून कांहीं चुका झाल्या असतील. पण तुमच्यासारख्या वडील माणसांनीं आम्हांला ‘असें नव्हे असें’ असें सांगून सांभाळून घ्यावयाला हवें; आम्हांला मार्गावर आणावयाला हवें. पेशव्यांच्या व शाहूमहाराजांच्या हातून सरखेलीच्या व्यवस्थेच्या बाबतींत कांहीं अन्याय झाला असावा असें मलाही वाटतें. पण एकतर त्या अन्यायाचें निराकरण करण्याचा अधिकार मला नाहीं; व दुसरें, ही वेळ त्या जुन्या गोष्टींविषयीं अडून बसण्याची नव्हे. प्रसंग कसा आणीबाणीचा आहे हें तुम्ही जाणतांच; ह्या प्रसंगांतून सर्वांनीं एकविचारानें कसें पार पडावें हा मार्ग तुम्ही आम्हां सर्वांना दाखवून द्यावयाचा आहे. खाशाबा सुर्व्यांच्या बाबतींतही मानाजीनें अनंतापराध केले आहेत हें देखील मला कळलें आहे. तरीही तुम्हीं जर मनावर घेतलें तर सर्व गोष्टी जुळण्याजोग्या आहेत. तुमच्या दौलतीच्या इभ्रतीसाठीं म्हणा, आमच्या दौलतीच्या इभ्रतीसाठीं म्हणा, किंवा देवाधर्माच्या इभ्रती-

साठीं म्हणा, मी तुमच्या पुढ्यांत पदर पसरून एवढें मागणें मागतों आहें.—" असें म्हणून चिमाजीअप्पांनीं मथुराबाईच्या पुढ्यांत खरोखरच पदर पसरला.

मथुराबाई सुज्ञ व विचारी होती. सर्वांची एकी झाली तरच या वेळीं सिद्दी साताचा पूर्ण पाडाव होऊं शकेल व देव-ब्राह्मणांचा छळ थांबेल अशी तिचीही खात्री होती. ब्रह्मेंद्रस्वामी, शाहूमहाराज व बाजीराव पेशवे यांनींही तिला विनंतिपत्रें पाठवून हीच विनंति केली होती. चिमाजीअप्पा इतके काकुळतीला आलेले पाहून तिला त्यांची कींव आली. तिनें चिमाजीअप्पांना पदर पसरूं न देतां नम्रतेनें व मनमोकळेपणानें त्यांचें शांतवन केलें, "श्रीमंत! असें भलतेंच कांहीं करूं नका. जें तुमचें मत तेंच माझेंही मत आहे; व मीं त्याच दृष्टीनें प्रयत्न चालविले आहेत. आपण आतां असें करूं; एकवार त्या बैराग्याची भेट घेऊन त्यालाच आपणां सर्वांचें सांकडें घालूं म्हणजे झालें. चला; आपण आतांच त्याच्या भेटीला जावें का?"

"हो! म्हणजे उजाडत्या दिवशींच आपणाला एकजुटीनें सिद्दी सातावर हल्ला करतां येईल. जितक्या लौकर आपण सिद्दी साताला रणांगणांत खेंचून आणूं, तितका त्याचा दुबळेपणा आपल्या पथ्यावर पडेल. आपण दिवसगत लावली तर त्याला ताजातवाना होण्याला अवसर सांपडेल; व मग तो पुन्हा आपणाला भारी होऊन बसेल."

"तर मग चला; आपण आतांच तिकडे जाऊं." असें म्हणून मथुराबाई ताबडतोब खाशाबाच्या–नव्हे, बजरंग बैराग्याच्या–भेटीसाठीं गढीवर जावयाला निघाली. मथुराबाई ज्या वाड्यांत रहात होती, तो वाडा गढीच्या शेजारींच होता. खाशाबाचा मुक्काम गढीवरच होता. त्यामुळें त्या दोघांना त्या अपरात्रीच्या वेळींही गढीवर जाणें जड वाटलें नाहीं.

ॐ ॐ ॐ

मथुराबाई व चिमाजीअप्पा गढीवर जाऊन पोंचतात, तों तेथें त्यांना एक अपूर्व दृश्य आढळून आलें. एक बैरागीण तेथें प्रभावतीला पोटाशीं धरून तिला आपल्या आनंदाश्रूंनीं न्हाऊं घालीत आहे; नानाजी व चांगुणा हीं मायेपाशीं लेंकरें बसावीं तशा लडिवाळपणानें तेथें त्या बैरागिणीसभोंवार बसलीं आहेत; व बजरंग बैरागी, भानाजी, माणकोजी, किल्लेदार हंबीरराव हे हंसतमुखानें जवळच बसले आहेत; व गजरा आणि मंगला ह्याही प्रसन्न चित्तानें त्या बैरागिणीपाशीं

उभ्या आहेत, हा तेथील देखावा पाहून मथुराबाई व चिमाजीअप्पा हीं दोघेंही बुचकळ्यांत पडलीं कीं 'हें काय?'

पण मथुराबाई व चिमाजीअप्पा यांना फार वेळ आश्चर्य करीत बसण्याचें कारण पडलें नाहीं. खाशाबा त्यांना पहातांच सामोरा येऊन मथुराबाईच्या चरणांना वंदन करून म्हणाला, "आईसाहेब! आजवर मीं घेतलेल्या सोंगाची बतावणी करण्यासाठीं कांहींशा आढ्यतेनें वागलों असेन तर त्याबद्दल मला क्षमा करा."

"म्हणजे काय?" मथुराबाईनें जास्तच विस्मयचकित होऊन विचारलें.

"आईसाहेब! तुम्हीं मला ओळखलें नाहीं; मी तुमच्या पायांचा सेवक खाशाबा सुर्वे, आणि ही तुमची लेंक—" खाशाबा त्या बैरागिणीकडे अंगुलिनिर्देश करून म्हणाला, "हिला तुम्ही ओळखलें का?"

तोंच त्या बैरागिणीनें मथुराबाईपुढें येऊन तिला नमस्कार करून विचारलें, "आईसाहेब! ह्या तुमच्या गरीब लेंकीला तुम्ही ओळखीत नाहीं का?"

"हें काय?" मथुराबाई त्या बैरागिणीकडे न्याहाळून पहात तिला आलिंगन देऊन गद्गद कंठानें उद्गारली, "यशोदे! तूंच का ती?"

"होय आईसाहेब! मीच ती!" असें म्हणून बैरागिणीनें—नव्हे, यशोदेनें—मथुराबाईला आलिंगन दिलें.

खाशाबानें काल्लें खिंडींतील गजाननाच्या देवालयांत ज्या बैरागिणीला अविंधांच्या हल्ल्यांतून वांचविलें होतें, तीच ती बैरागीण होती; व ती यशोदा होती, हेंही वाचकांना आतां कळून चुकलें आहे. खाशाबानें तिच्या रक्षणासाठीं म्हणून जे सैनिक तेथें ठेविले होते, ते सिद्दी याकूबाच्या सैन्याशीं झगडण्यांत गुंतून पडले असतांना ती पूर्ण शुद्धीवर आली, व आपलें रक्षण करण्याला कोणी जवळ नाहीं अशा समजुतीनें तेथून जी निघाली, ती लपत छपत आडवळणांनीं हिंडत हिंडत अखेर आज अपरात्रीं गडावर येऊन पोंचली होती. ती खंडाळ्याला आली तेव्हां तिला आपला पति व पुत्र हे प्रस्तुतच्या मोहिमेंत प्रामुख्यानें सिद्दी साताशीं झगडत आहेत असें कळलें, म्हणून ती त्यांचा शोध करीत ठायीं ठायीं भिक्षा मागत सैरावैरा हिंडत होती. याप्रमाणें आठ दहा दिवस वणवण हिंडतां हिंडतां अखेर ती त्या दिवशीं सूर्यास्ताला गडावर येऊन पोंचली. तिला गडावरील पहारेकरी कोणी ओळखीत नसल्यानें गडावर येण्याला प्रथम प्रतिबंध झाला; पण तेवढ्यांत चिमाजीअप्पा गडावर येतांना तिला भेटले. 'माझा एकुलता एक मुलगा गडावर आहे, त्याची

व माझी आज जवळ जवळ दीड तपपावेतों गांठ-भेट नाहीं; मला आपण आपल्या पायांच्या आश्रयानें गडावर घेऊन जाल तर ईश्वर आपणाला दुवा देईल'. अशी यशोदेनें चिमाजीअप्पांची विनवणी करतांच त्यांना तिची दया येऊन त्यांनीं तिला आपणाबरोबर गडावर येऊं दिलें होतें. गडावर प्रवेश मिळतांच यशोदा आपल्या मंडळीचा शोध करीत इकडे तिकडे हिंडत असतां नानाजी व माणकोजी हे अचानक तिला भेटले. खाशाबानें मोहिमेचे पुढील बेत ठरविण्यासाठीं त्यांना मुद्दाम आपलीं ठाणीं सोडून गडावर बोलावल्यामुळें ते तेथें आले होते, व ते रातोरात पुढील बेत ठरवून माघारे आपल्या ठाण्यांवर जावयाचे होते. त्यांची व यशोदेची गांठ पडतांच त्यांनीं कांहीं प्रथम यशोदेला ओळखलें नाहीं; पण यशोदेनें मात्र नानाजीला ओळखलें. अर्थात् यशोदेचा वनवास त्याच क्षणाला टळला. नानाजी व माणकोजी हे तिला बरोबर घेऊन गढीवर आले. त्यापूर्वींच चिमाजीअप्पा खाशाबाला भेटून गेले होते. गढीवर येतांच सर्व मंडळी भेटली, तेव्हां त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाहीं, हें काय सांगावयाला पाहिजे! पण त्यांतही सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, चांगुणा, प्रभावती व गजरा ह्या यशोदेला भेटल्या तेव्हां—मातृहृदयच तें! प्रभावतीनें यशोदेला ओळखलें नाहीं तरी यशोदेनें प्रभावतीला ओळखलें; ती तिची मुलगी होती! यशोदा रेवदंड्याला फिरंग्यांच्या जाचांत सांपडली तेव्हां त्या मायलेंकरांची ताटातूट झाली होती; व तेव्हांपासून उंदेरीच्या किल्लेदारानें त्या लहानग्या मुलीला आपली मुलगी म्हणून पाळलें होतें. तो प्रकार वाचकांना पूर्वींच विदित झाला आहे.

खाशाबानें गजाननाच्या देवालयांत यशोदेला पाहिलें तेव्हांच तिला ओळखलें होतें व म्हणूनच तो तिची काळजी घेत होता, आणि म्हणूनच तिचा शोध लागत नाहींसा पाहून त्याला हळहळ वाटत होती. नानाजीला मायभेटीची तळमळ लागून तो यशोदेचा शोध करतां करतां आपल्या कर्तव्याला मुकेल ह्या भयानें खाशाबानें त्याला मुद्दाम यशोदेची ओळख दिली नव्हती. पण यशोदा परमेश्वरी कृपेनें आपल्या मंडळींत येऊन पडली, त्यामुळें सर्वांचेंच प्रिय झालें. प्रभावती ही नानाजीची बहीण असें ठरतांच त्यांच्या पूर्वींच्या वधू-वर-प्रेमाचें बहीण-भावंडांच्या प्रेमांत गोड रूपांतर झालें; व प्रभावती आणि माणकोजी यांच्या वधू वर प्रेमाची अमृतवेळा जी वाळत चालली होती, तिला जोमाची नवी पालवी फुटली. चांगुणा व नानाजी यांच्या वधू-वर प्रेमाला लागलेलें ग्रहण आपोआप सुटलें. गजरा व यशोदा

यांची मात्र ती प्रथम भेटच होती. पण तो प्रसंगच इतका उत्साहवर्धक होता कीं, त्या दोघींच्याही मनाला सवतीमत्सराचा अमंगळ विटाळ मुळींच न होतां त्या पाठोपाठच्या सख्ख्या बहिणींप्रमाणें एकमेकींना कडकडून भेटल्या.

याप्रमाणें ती सर्व मंडळी आनंदी-आनंदांत गढून गेली असतां मथुराबाई व चिमाजीअप्पा तेथें येऊन पोंचलीं, तेव्हां अर्थात् तीं देखील त्या आनंदी-आनंदाची वांटेकरी झालीं. आपण ज्या बैरागिणीला गडावर प्रवेश करून दिला, तीच ही यशोदा होय; कान्होजी आंग्र्यांनीं खाशाबा सुर्व्याला कामावरून बडतर्फ केलें असतां पेशव्यांच्याच मध्यस्थीनें तो पुन्हा आंग्र्यांचा आश्रय मिळविण्याला समर्थ झाला होता, तोच तो बजरंग बैरागी होय; असें पहातांच प्रसंगावधान राखून चिमाजीअप्पांनीं त्या गोष्टीची खाशाबा व यशोदा ह्या दोघांनाही आठवण करून दिली, तेव्हां तीं दोघेंही कृतज्ञतापूर्वक चिमाजीअप्पांच्या चरणीं लीन झालीं.

चिमाजीअप्पांनीं आनंदानें हंसत हंसत खाशाबाला म्हटलें, “ खाशाबा ! मी आमच्या ह्या ऋणाची फेड करून घेण्यासाठीं पुन्हा तुझ्यापाशीं आलों आहे; व आपणां सर्वांना आणि त्याबरोबरच आपल्या देशाला–देवाला–धर्माला यशोदायी होईल अशाच मापानें त्या ऋणाची फेड करून घेण्याचें मीं ठरविलें आहे. आतां मला सांग, तूं त्या उपकारांची फेड करणार किंवा नाहीं ? ”

मथुराबाईंही ती वेळ ओळखून चतुराईनें उद्गारली, “श्रीमंत ! आतां तो प्रश्नच उरला नाहीं. यशोदा ही माझी लेंक आहे. खाशाबाही मला माझ्या मुलासारखा आहे. नानाजी व प्रभावती यांच्यावर तर त्या मायलेंकरांपेक्षां माझीच मालकी जास्त आहे.” ती लगेच त्या मंडळीकडे वळून म्हणाली, “ खरें कीं खोटें ! ”

मथुराबाई जें बोलली तें अक्षरशः खरें होतें. खरोखरच खाशाबाच्या कुटुंबांतील एकूण एक माणसांच्या मस्तकावर तिच्या उपकारांचे डोंगर वाढले होते. ती इतक्या आपुलकीनें बोललेली ऐकून खाशाबा, नानाजी, यशोदा, प्रभावती ह्या सर्वांच्या अंगावर मूठभर मांस चढलें. तीं सर्वजण एकदम प्रेमातिशयानें मथुराबाईच्या चरणांवर मस्तक ठेवून उद्गारलीं, “ आईसाहेब ! आम्ही आपलींच लेंकरें आहोंत; आपल्या शब्दावर प्रतिशब्द बोलण्याचा वरचढपणा आम्ही कधींही करणार नाहीं.”

ॐ ॐ ॐ

आणि खरोखरच मथुराबाईच्या शब्दावर प्रतिशब्द कोणीही बोललें नाहीं. लगेच मथुराबाईनें त्या बैठकींत मानाजीला बोलावून आणलें, व त्यानें खाशाबा, यशोदा वगैरे मंडळीचा जो छळ केला होता, त्याबद्दल त्यांच्यापाशीं क्षमा मागून खाशाबाचा हात तिनें मानाजीच्या हातीं दिला. मथुराबाईच्या शब्दाला मान देण्यासाठीं म्हणून कोणींही जुनें भांडण उकरून काढलें नाहीं; सर्वांनीं एकविचारानें व एकजुटीनें सिद्दी साताशीं झगडण्याची शपथ घेतली. आतां, मनुष्याच्या स्वभावाला औषध नाहीं हें खरें; व म्हणूनच मानाजीनें खाशाबाशीं जी एकी केली ती मनांत डाव ठेवूनच केली हें सर्वांना माहीत होतें. मथुराबाईलाही मानाजीच्या बेइमानीपणाची चांगली पारख होती. असें असतांही तिनें 'आपले झगडे घरच्याघरीं आपण भांडूं; पण सिद्दी साताशीं झगडतांना आपण सारीं एक' हें तत्त्व सर्वांच्या मनावर ठसवून तो प्रसंग यथावत् साजरा करून घेतला. मानाजी, चिमाजीअप्पा, खाशाबा, भानाजी, माणकोजी व नानाजी यांनीं त्याच बैठकींत मोहिमेचा पुढील बेत ठरविला; व त्या बेताची अंमलबजावणी करण्यासाठीं रातोरात सर्वजण आपापल्या कामगिरीवर निघाले.

# उपसंहार


फक्त एकच दिवसाचें अंतर; पण त्या एका दिवसांत सागरगडच्या* मोहिमेची परिस्थिति पार बदलून गेली. मानाजी आंग्रे खाशाबाच्या हातीं कैद झाला व सिद्दी सात रेवसकडे आपल्या गोटांत पळून गेला, तेव्हां ह्या दोन्ही वार्ता वातावरणांत हां हां म्हणतां पसरल्या. त्यामुळें सिद्दी साताची दूरची फौज चिडून प्रतिपक्षावर सांपडेल तेथें हल्ले करीत सुटली, व मानाजी आणि चिमाजीअप्पा यांचें सैन्यही खाशाबाच्या सैन्याविरुद्ध लढूं लागलें. ह्या आपसांतल्या लढ्यांत सिद्दी साताला मात्र गड घेण्याची तयारी करण्याला फावलें. ज्या अर्थी मथुराबाई आंग्रे गडावर आहे, त्या अर्थी ती आपसांतील भाऊबंदकीमुळें कार्यनाश होऊं देणार नाहीं, अशी सिद्दी साताची खात्री होती. म्हणूनच त्यांच्या वाटाघाटी होऊन दिलजमाई पूर्वी त्याला गड पाडाव करावयाचा होता. सुभानजी जरी मथुराबाईच्या पक्षाला सामील झाला होता, तरी बाह्यतः तो सिद्दी साताशीं गोड होता व नाना प्रकारच्या खटपटी लटपटी करून त्यानें सिद्दी सातापाशीं आपणाविषयींचा विश्वास कायम राखला होता. त्यामुळें सिद्दी सातानें तांतडीनें गडाला वेढा घालून गड पाडाव करण्याचें ठरविलें, तेव्हांच गड आंतून लढला जाणार नाहीं अशाविषयीं खबरदारी घेण्याला त्यानें सुभानजीला आपल्या हेरामार्फत कळविलें. त्याच वेळीं सिद्दी सातानें कनकेश्वराला‡ वेढा घालून प्रतिपक्षाला फसवून पराजित करण्याची आपली

---

* ह्या डोंगरी किल्ला कुलाबा जिल्ह्यांत अलिबाग तालुक्यांत अलिबागेच्या थेट पूर्वेला कांहीं मैलांवर आहे. शिवाजी महाराज प्रथम ह्या किल्ल्यावर आले तेव्हां त्यांना येथून समुद्र दिसला, म्हणून त्यांनीं याचें नांव सागरगड असें ठेविलें असें म्हणतात. किल्ल्यावर एक उंच दगडी मनोरा आहे व गढीही आहे. मराठशाहीच्या व पेशवाईच्या काळीं येथला किल्लेदार ह्या गढींत रहात असे. ह्या किल्ल्याच्या डाव्या बाजूला कनकेश्वरची टेंकडी आहे. किल्ल्यावर कांहीं पडक्या इमारती आजला दिसतात, त्या पूर्वीच्याच आहेत. एका बाजूला डोंगराचा खांबासारखा उंच असा भाग आहे. त्याला वानरटोंक असें म्हणतात. कथानकाच्या काळीं ह्या लढाऊ किल्ल्याचें फार महत्त्व होतें.

‡ कनकेश्वरची टेंकडी कुलाबा जिल्ह्यांत अलिबागेपासून ईशान्येला आठ मैलांवर आहे. ह्या टेंकडीच्या माथ्यावर कनकेश्वराचें प्रसिद्ध शिवालय आहे.

योजनाही अंमलांत आणली. ती बातमीही सुभानजीला हेरामार्फत कळली. सुभानजीनें त्या हेरामार्फत आपण गड लढूं देत नाहीं असा नोंडदेखला निरोप सिद्दी साताला पाठविला; पण त्याच वेळीं आपल्या पक्षाच्या लोकांना ती खबर दिली. वस्तुतः त्या वेळीं सुभानजीकडून आंग्रे-पेशवे खाशाबा यांच्या संयुक्त पक्षाला ती खबर कळली, ती चांगुणेच्या चतुराईनें कळली. आपल्या अभिलाषामुळें सुभानजी इतक्या सलोख्यानें वागत आहे हें चांगुणेला माहीत होतें, व म्हणून प्रथमपासूनच तिनें सुभानजीला नादीं लावून ठेविलें होतें. आतां वास्तविक चांगुणेचें माणकोजीशीं



कनकेश्वर मंदिर

टेंकडीवर जाण्यास दक्षिणेच्या बाजूनें दगडी पायऱ्या बांधून फरसबंदी रस्ता केला आहे. ह्या रस्त्याची एकूण लांबी एक मैल असून रस्त्याच्या दोहों बाजूंना अशोक वृक्षांची दाट झाडी आहे. टेंकडीच्या अगदीं मध्यभागीं माथ्यावर एक अष्टकोनी कुंड आहे; व कुंडाच्या पश्चिमेला देवालय आहे. अनेक लहान लहान कळसांनीं युक्त असा घुमट पाहून देवालयाची बांधणी हेमाडपंती असावी असें वाटतें. देवालयाचा गाभारा बराच खोल असून आंत अंधार आहे. त्याच्या मध्यभागीं शिवलिंग आहे. देवस्थानाला सरकारांतून इनाम आहे. येथें दरसाल महाशिवरात्र व कार्तिकी पौर्णिमा ह्या दिवशीं मोठी यात्रा भरते.

लग्न नक्की ठरलें होतें. पण तरीही चांगुणेनें ती गोष्ट मुद्दाम सुभानजीच्या कानावर जाऊं न देतां त्याला आपल्या आश्वासनावर झुलविण्याचा क्रम ठेविला होता. म्हणूनच सुभानजीकडून सिद्दी साताकडील बातमी वेळींच बाहेर फुटली; व माणकोजी आणि भानाजी हे खाशाबाच्या संमतीनें कनकेश्वराचें रक्षण करण्यासाठीं पहांटेलाच तिकडे निघून गेले. नानाजी, खाशाबा, मानाजी व चिमाजीअप्पा ह्या चौघांनीं चार दिशांनीं थेट रेवसकडे सिद्दी साताच्या सैन्यावर चालून जाऊन त्याची अडवणूक करण्याचें ठरविलें व तात्र्डतोब ती योजना अमलांतही आणली. गडाचें रक्षण करण्याचें काम सुभानजीवर सोंपविण्यांत आलें. सुभानजी हें भरंवशाचें कूळ आहे असें कोणालाही वाटत नव्हतें. पण मथुराबाई, चांगुणा, प्रभावती, हंबीरराव वगैरे मंडळी त्याच्या पाठीवर असल्यानें त्या मंडळीवर विसंबून खाशाबा वगैरे मंडळीला निर्धास्त राहतां आलें. मानाजी व खाशाबा यांचा एकोपा जर झाला नसता, किंवा एकोपा होण्याला एखाद दुसरा दिवस अवकाश लागला असता, तर त्या दोघांचीं सैन्यें आपसांत झगडण्यांत गुंतून पडलीं असतांना सिद्दी सात गडावर चालून आला असता व गड बळकावून बसलाही असता.

असो. कनकेश्वराच्या पायथ्याशीं माणकोजी व भानाजी यांच्या सैन्याची व सिद्दी याकूबच्या सैन्याची खडाजंगीची लढाई झाली. व सिद्दी याकूबला तेथून पळ काढावा लागला. तो तसाच तात्र्डतोब सिद्दी साताच्या मदतीसाठीं रेवसकडे निघाला. तो जाऊन पोंचण्यापूर्वींच सिद्दी साताच्या प्रचंड सैन्याशीं मानाजी, खाशाबा, चिमाजीअप्पा व नानाजी ह्या एकाहून एक बंद्या वीरांचें कडाक्याचें युद्ध जुंपलें होतें. त्या रणयज्ञांत स्वतःची आहुति देण्यासाठींच कीं काय, सिद्दी याकूब काळानें ओढून नेल्यासारखा तिकडे धावत गेला. उभयतांच्या सैन्याची रेवस नजीक कापारलें तर्फ श्रीगांव येथें निकराची लढाई झाली. सिद्दी साताचा मानाजी, चिमाजीअप्पा, खाशाबा व नानाजी यांनीं सर्व बाजूंनीं कोंडमारा केला, व बुडत्याच्या डोक्यांत दगड या न्यायानें माणकोजी व भानाजी हेही कनकेश्वराकडील बंदोबस्त करून तेथें येऊन आपल्या मंडळीला मिळाले. उभयपक्षांचें तुंबळ युद्ध बराच वेळपर्यंत जुंपून राहिलें होतें. मानाजी आंग्रे, खाशाबा, चिमाजीअप्पा, नानाजी, भानाजी व माणकोजी यांनीं तर लढण्याची शिकस्त केली. माणकोजीच्या मनांतून सिद्दी याकूबला लोळवावयाचें होतें; सिद्दी याकूबनें कनकेश्वरचा वेढा लढवितांना कनकेश्वराची मशीद बनविण्याची व त्या मशिदी-

समोर माणकोजीची कुरबानी करण्याची प्रतिज्ञा केली होती. सिद्दी सात तर 'राज्य घेईन किंवा मरेन' अशा त्वेषानें लढत होता. याच्या उलट चिमाजीअप्पांनीं मोहिमेवर यावयाला निघतांना ब्रह्मेंद्रस्वामींपाशीं 'सिद्दी साताचा संहार करून विजयी होईन तरच माघारा येईन; नाहींपेक्षां तेथल्या तेथें मरून जाईन' अशी प्रतिज्ञा केली होती, व त्या प्रतिज्ञेची पूर्तता करण्यासाठीं ते निकरानें लढत होते. नानाजीनें सिद्दी साताचें शीर कापून बजरंगबलीला वहाण्याची शपथ घेतली होती. सिद्दी साताचा दांत मुख्यतः खाशाबा व मानाजी यांच्यावर होता. प्रथम चिमाजीअप्पांनीं सिद्दी सातावर समोरासमोर चाल करून व मानाजी आणि नानाजी यांनीं त्याला सभोंवार गराडा देऊन कोंडलें, व 'शरण ये तर जिवदान देतों' अशी स्वतःचा बचाव करण्याची संधि त्याला दिली. पण सिद्दी सात शरण यावयाला तयार न होतां व पळूनही न जातां अधिक त्वेषानें प्राणांवर उदार होऊन शत्रूची फळी फोडण्या साठीं पुढें घुसला. तेवढ्यांत सिद्दी याकूब माणकोजीच्या हस्तें ठार झाला. ही वार्ता सिद्दी साताला कळतांच 'अरेरे! माझा उजवा हात तुटला!' असे खेदोद्गार त्याच्या मुखांतून निघाले, व तो जिवाची आशा सोडून एकदम मानाजी आंग्र्या- वर तुटून पडला. त्यानें मानाजींवर सरळ नेम धरून गोळी झाडली; ती मानाजी- च्या उरांत लागली, व मानाजी घायाळ होऊन पडला. नानाजीनें सावधगिरी राखून तळपत्या सूर्याप्रमाणें सिद्दी सातावर चालून जाऊन त्याला मागें हटविलें. म्हणून मानाजी वांचला, नाहींपेक्षां तेथल्या तेथेंच ठार व्हावयाचा. मानाजी व सिद्दी सात या दोघांची तोंडोतोंड हातघाईची झुंज विलक्षणच झाली. दोघांनींही एकमेकांवर वारांवर वार करण्याचा सपाटा चालविला होता. नानाजीच्या देहाची जखमांनीं चाळण झाली होती व त्या चाळणींतून वहाणाऱ्या रक्तानें त्याचें सर्वांग थबथबत होतें. तरीही त्यानें धीर न सोडतां सिद्दी साताला ठार करून त्याचें शीर कापून घेतलें.*

सिद्दी साताचा शेवट झाल्यावर त्याच्या सैन्याचा धीर सुटून तें सैरावैरा पळत सुटलें. चिमाजीअप्पा, खाशाबा, मानाजी व माणकोजी यांनीं त्याचा पाठलाग करून त्याची धुळधाण उडवून दिली. सायंकाळीं सूर्य अस्ताला जाण्याच्या वेळीं त्या युद्धाचा शेवट झाला. तिकडे सूर्य पश्चिमेच्या क्षारमाथ्याआड झाला व त्याच- वेळीं कोंकणपट्टींत सिद्दी साताच्या असमानी सुलतानीचाही चिरकालचा अस्त झाला.

*मराठी रियासत, मध्यविभाग–१; पृष्ठ २६४ पहा.

२८८७०

पश्चिमदिग्विजयाचें महत्कार्य जें मराठयांनीं पेशव्यांच्या पुढाकारानें हातीं घेतलें होतें, त्याचें सिद्दी सातांच्या वधानें सार्थक झालें. खाशाबा, नानाजी, चिमाजीअप्पा वगैरे सर्वांच्या प्रतिज्ञा पूर्ण झाल्या आणि त्या मंडळींचें भाग्य एवढें थोर कीं, त्यांच्या खाशांपैकीं कोणीही माणूस जाया झाला नाहीं. मानाजीच्या उरांत गोळी लागली; नानाजीच्या शरीरावर एकवीस जखमांची चाळण झाली; खाशाबा, भानाजी, माणकोजी हे देखील थोडेफार जखमी झाले; त्या सर्वांच्या जखमा थोड्या दिवसांनीं बुजल्या; पण त्या जखमांतून वहाणाऱ्या रक्ताची शाई करून भवितव्यतेनें मराठयांच्या पश्चिमदिग्विजयाचा इतिहास जो लिहून ठेवला तो मात्र अजरामर होऊन राहिला. त्या दिग्विजयांत मराठयांच्या बाजूचे सर्व वीर वांटेकरी होते हें जरी खरें; तरी त्यांत मोठा वांटा चिमाजीअप्पा व नानाजी यांचा होता. चिमाजीअप्पांनीं मानाजी व खाशाबा यांच्या एकीसाठीं भगीरथ प्रयत्न केले व त्या प्रयत्नांत त्यांना यश आलें, म्हणूनच ती मोहीम यशस्वी झाली; व नानाजीनें निग्रहानें लढून सिद्दी साताला ठार करून त्या यशोमंदिरावर कळस ठेविला.

ॐ ॐ ॐ

नानाजीच्या ह्या कामगिरीचें योग्य सार्थक झालें. मथुराबाई व चिमाजीअप्पा यांनीं त्याची पेशव्यांपाशीं शिफारस करून त्याला कुसगांव हा त्याचा जन्मगांव इनाम देवविला. शिवाय सागरगडची किल्लेदारीही तेथला वयोवृद्ध किल्लेदार हंबीरराव याच्या शिफारसीनें नानाजीलाच मिळाली. माणकोजीला मानाजीनें कुलाबा येथें किल्लेदार नेमिलें.

ॐ ॐ ॐ

खाशाबा दोन्ही बायकांसह नानाजीपाशीं राहूं लागला; व भानाजी देखील आपल्या माणकोजीपाशीं राहूं लागून त्याच्या सुखाचा वांटेकरी झाला. मानाजी व खाशाबा यांच्यामधील दावेदारीला त्या पश्चिमदिग्विजयाच्या सुमुहूर्तावर मूठमाती मिळाली; व नानाजी आणि माणकोजी यांचा जो वर लिहिल्याप्रमाणें गुणगौरव झाला, तो मानाजी, मथुराबाई आणि चिमाजीअप्पा यांच्या संमतीनेंच झाला. थळचा किल्लेदार व त्याचा धनी हे दोघेही मदांध दैत्य ठार झाल्यामुळें थळची चौबुरुजी उघड्यावर पडल्यासारखी झाली होती. तेथला खरा माहीतगार सुभानजी असल्यानें त्यालाच मानाजीनें तेथला किल्लेदार नेमिलें. चांगुणा हातची

गेल्यामुळें सुभानजीला जो विषाद झाला होता, तो ह्या पारितोषकानें बराच कमी होऊन सुभानजी त्या दिवसापासून मानाजी आंग्र्याशीं गोडीगुलाबीनें वागूं लागला. लौकरच सुमुहूर्तावर माणकोजी व नानाजी यांचीं अनुक्रमें प्रभावती व चांगुणा यांच्याशीं मोठ्या थाटामाटानें लग्नें झालीं. लग्नसमारंभ मुद्दाम बजरंगबलीच्या देवालयाची शुद्धि करून व देवालयांत बजरंगबलीच्या मूर्तीची पुन्हा प्रतिष्ठापना करून तेथें करण्यांत आले. तेवढ्यासाठीं चिमाजीअप्पा मुद्दाम जावयाचे चार दिवस खोळंबून राहिले होते. मथुराबाई व मानाजी हीं दोघें त्या लग्नांना हजर होतीं. त्यांनीं वधूवरांना उत्कृष्ट आहेर केले. खाशाबा व यशोदा यांना बैराग्याच्या विरक्त वेषांत ज्यांनीं ज्यांनीं पाहिलें होतें, त्यांना त्यांना त्या दोघांना नानाजी व प्रभावती यांच्या लग्नांत पुण्याहवाचनाला बसलेलीं पाहून अपार कौतुक वाटलें. ह्या सर्वांच्या आनंदीआनंदाला भवानजीच्या वधामुळें मंगलेची जी निराशा झाली तें गालबोट लागलेलें असावयाचें; पण त्याच वेळीं मंगलेचें लग्न मानाजीच्या मुलाशीं व्हावयाचें ठरल्यानें मंगला देखील आनंदानें चांगुणा व प्रभावती यांच्या लग्नसमारंभांत मिरवली.

ॐ ॐ ॐ

ज्याप्रमाणें चिमाजीअप्पांनीं सागरगडच्या मोहिमेंत यश मिळवून देणाऱ्या मंडळींचा योग्य गौरव केला, त्याप्रमाणेंच चिमाजीअप्पांचाही उभ्या मराठमंडळांत त्या यशाबद्दल अपूर्व गौरव झाला. शाहूमहाराज, ब्रह्मेंद्रस्वामी, फत्तेसिंग भोंसले वगैरे राजवटीच्या सर्व खाशा मंडळीनें ब्रह्मेंद्रस्वामींच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे 'सिद्दी सात केवळ रावणासारखा दैत्य, तो मारून हबशांचा मूळ कंदच उपटून काढला' अशा गौरवपूर्ण शब्दांनीं चिमाजीअप्पांना गौरविलें. चिमाजीअप्पा साताऱ्याला जातांच‡ शाहूमहाराजांनीं त्यांना बहुमानाचीं वस्त्रें, हिरेजडित पदक, मोत्यांची कंठी, रत्नखचित तलवार, असे वस्त्रालंकार देऊन त्यांचा गौरव केला.

आतां, सागरगडच्या मोहिमेंत चिमाजीअप्पांनीं कबूल केल्याप्रमाणें आंग्र्यांच्या घराण्यांतील भाऊबंदकी संपण्याजोगी कोणतीच खटपट पुढें त्यांच्या अथवा बाजीराव पेशव्यांच्या हातून झाली नाहीं; व उलट पुढेंही पेशवेच आंग्र्यांच्या

‡ चिमाजीअप्पा सागरगडची मोहीम आटोपून इ० सन १७३६ च्या मेच्या अखेरीला साताऱ्याला आले.

समूळ नाशाला कारण झाले, व त्याचे भयंकर दुष्परिणाम साऱ्या राष्ट्राला भोगावे लागले हें जरी खरें, तरी तो वृत्तान्त अशा आनंदकारक प्रसंगीं सांगणें उचित नाहीं. 'कादंबरीमय पेशवाई'मधून पुढें योग्य वेळीं तें सत्येतिहासकथन कथन करण्यांत येईलच.

सागरगडची मोहीम आटोपते, तोंच वसईकडे पोर्तुगीजांनीं चालविलेल्या अमानुष अत्याचारांच्या तक्रारी साताऱ्याला येऊन पोंचत होत्या. अखेर चिमाजी-अप्पांना पोर्तुगीजांचें पारिपत्य करण्याचें महत्कार्य शिरावर घ्यावें लागलें. तो वसईच्या मोहिमेचा हृदयस्पर्शी वृत्तान्त 'पेशवाईंतील धर्मसंग्राम' ह्या कादंबरींत निवेदन करण्याचें वचन देऊन आम्हीं तूर्त वाचकांची रजा घेतों.

इत्यलम्

२८५४० ९८१२ २१५५९

IRBK-0100897

IRBK-0100897

श्री० हडप यांच्या 'कादंबरीमय पेशवाई'मधील

# आजवरच्या कादंबऱ्या

पेशवाईचें पुण्याहवाचन

पेशवाईची प्राणप्रतिष्ठा

पेशवाईचें ध्रुवदर्शन

पेशवाईचा ध्रुव ढळला

पेशवाईचा पुनर्जन्म

पेशवाईचें पुनर्वैभव

पेशवाईचा दरारा

पेशवाईंतील दुर्जन

पेशवाईंतील पश्चिमदिग्विजय

# पुढील तीन कादंबऱ्या

पेशवाईंतील धर्मसंग्राम

पेशवाईंतील उत्तरदिग्विजय

पेशवाईवरील गण्डान्तर

या व अशा आणखी मिळून सुमारें पंचवीस कादंबऱ्या 'कादंबरी-मय पेशवाई'मधून प्रसिद्ध व्हावयाच्या आहेत.